

# स्मृतिचित्रे

लक्ष्मीबाई टिळक

मुद्रक व प्रकाशक : ह. अ. भावे
वरदा बुक्स 'वरदा'
३९७-१ सेनापती बापट मार्ग
पुणे ४११ ०१६.

मुद्रणस्थळ : स्मिता प्रिन्टर्स (प्रमोद बापट)
१०१९, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

आवृत्या : पहिली आवृत्ती :
भाग–१– १५ डिसेंबर १९३४
भाग–२– १९३५
भाग–३– १५ डिसेंबर १९३५.
भाग–४– डिसेंबर १९३६.

प्रस्तुत आवृत्ती पहिल्या आवृत्तीबरहुकूम आहे.

नवी आवृत्ती :– २४ फेब्रुवारी १९८७

दुसरी आवृत्ती : १ जानेवारी १९८९

टीप : कॉपीराईट ॲक्ट १९५७ च्या कलम २२ व २४ अन्वये या पुस्तकाचे स्वामित्व हक्क आता खुले आहेत.

किंमत : रुपये एकशेवीस मात्र

मुखपृष्ठ : अनंत सालकर

डी. जे. जाधव
दृष्टी प्लॉट नं.४, यु.वे.बँक, कॉलनी
शाहुनगर, गोडोली, सातारा-४१५००१

## प्रकाशकाचे निवेदन

मराठीतील एक अक्षर-साहित्य येथे वाचकांना सादर करताना मला फार आनंद होत आहे. तळटीपांसह ही आवृत्ती मला सादर करता आली नाही. तरीही मुळातील ग्रंथाची गोडी सर्वांना चाखता येईलच.

जोपर्यंत मराठी भाषा आहे तोपर्यंत हे पुस्तक टिकेल व वाचले जाईल. कितीही वेळा वाचले तरी प्रत्येक वेळी या पुस्तकाच्या सौंदर्याचा नवीनच अंगाने साक्षात्कार घडतो. माझ्या पत्नीने हे पुस्तक किती वेळा वाचले याला गणतीच नाही. ग्रंथालयातून पुस्तक आणून वाचून परत केल्यानंतर जे पुस्तक मी विकत घेतले तेच हे पुस्तक.

लक्ष्मीबाईंचे जीवनच अद्‌भुतरम्य होते. त्यांनी तुमच्या नजरेपुढे त्यांनी पन्नास वर्षांचा चित्रपट उलगडला आहे. वाचता वाचता डोळे पाणावतील, अश्रू वाहू लागतील असे हे पुस्तक आहे.

या पुस्तकासंबंधी, गंगाधर गाडगीळापासून अनेक सुप्रसिद्ध लेखकांनी विस्तृत समीक्षा लिहून ठेवली आहे. तेव्हा त्याबद्दल मी जास्त काय लिहू ?

या पुस्तकाची स्वस्त जनता आवृत्ती काढण्याचा माझा विचार आहे.

ह. अ. भावे

**२४ फेब्रुवारी १९८७ रोजी स्मृतिचित्रांची नवी आवृत्ती मी प्रकाशित केली. प्रकाशन दुर्गा भागवत यांचे हस्ते झाले होते. मराठीतील या अक्षर साहित्याची दोन वर्षाच्या आतच पुन्हा आवृत्ती काढण्याचा योग आला याचा मला आनंद वाटतो.**

**ह. अ. भावे**

## अनुक्रमणिका

### ।। भाग पहिला ।।


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | सोनेनाणे धुऊन घेतले | १ |
| २. | तंगडीच मोडीन ! | ७ |
| ३. | दुष्ट ग्रह | १५ |
| ४. | पुन्हा पलायन | २७ |
| ५. | मिरवणूक | ३२ |
| ६. | माहेरी रवानगी | ३६ |
| ७. | माहेराहून सासरी | ४१ |
| ८. | सासुरवास | ४६ |
| ९. | माहेरचा आधार | ५३ |
| १० | काव्यगायन | ५७ |
| ११. | नथीतील मोती | ६४ |
| १२. | पहिला मुलगा | ६८ |
| १३ | सोळा वर्षांची झाली तरी– | ७३ |
| १४. | टिळकांचा धंदा : माझे शिक्षण | ८१ |
| १५. | श्रावणी सोमवारचा ब्राह्मण | ८५ |
| १६. | बुटींच्या बागेत | ९१ |
| १७. | वेडा झालो पुरा गड्यांनो | ९९ |
| १८. | महादेवभाऊजी | १०५ |
| १९. | दत्तूचा जन्म | ११३ |
| २०. | माझा आजार | ११७ |
| २१. | महादेव | १२७ |
| २२. | पहिला हिंदी वक्तृत्वसमारंभ | १३५ |
| २३. | खऱ्यांचे घर मागे राहिले | १४५ |

| | | |
|---|---|---|
| २४. | दत्तूवर कविता | १५० |
| २५. | सखारामभाऊजी व रखमाई | १५५ |
| २६. | डायरीवरून | १६० |
| २७. | ख्रिस्ती धर्माकडे प्रवृत्ती | १६५ |
| २८. | माझे जाते कोठे आहे ? | १६९ |
| २९. | राजीनामा | १७५ |
| ३०. | धर्मान्तर | १७९ |
| ३१. | धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे | १८९ |

## ।। भाग दुसरा ।।

| | | |
|---|---|---|
| ३२. | देवघरात बसविले | १९१ |
| ३३. | कोर्टात भेट | १९७ |
| ३४. | मास्तरांची खटपट | २०३ |
| ३५. | बाळंतविडा | २११ |
| ३६. | मैना तुझा ग पिंजरा मायेचा | २१६ |
| ३७. | मेव्हण्याचा अहेर | २२१ |
| ३८. | मी पाहिलेली पहिली ख्रिस्ती बाई | २२६ |
| ३९. | गोसाव्याचा बाप | २३२ |
| ४०. | आमचे पाय जागचे उचलेनात | २३८ |
| ४१. | पाहुणचार | २४३ |
| ४२. | दानावर दक्षिणा | २५१ |
| ४३. | घोट विषाचा की अमृताचा ? | २५६ |
| ४४. | परिवर्तन | २६० |
| ४५. | हौशी | २६६ |
| ४६. | कुळकर्णी | २७३ |
| ४७. | एक संस्मरणीय गोष्ट | २८० |
| ४८. | तू तर माझ्याही पुढे गेलीस | २८६ |
| ४९. | आमची शिल्लक | २९० |
| ५०. | आमचा वाढता संसार | २९४ |

५१. परत भेट ३००
५२. परमेश्वरी योजना ३०६
५३. हे तुझे लाड ! ३१८
५४. माझे शिक्षण ३२४
५५. राहुरी ३३०
५६. दीक्षा ३३५

## ॥ भाग तिसरा ॥

५७. टिळकांचे अंतरंग ३४२
५८. गोपाजी ३४५
५९. पुनर्जन्म ३५०
६०, जळगावचे कविसंमेलन ३५५
६१. बालकवी ठोंबरे ३६१
६२. घर गेले, म्हैस आली ३६८
६३. नगरातील ते दिवस ३७६
६४. माझे व्याही-जावई ३८२
६५. करंज्यातला मोदक ३९०
६६. ती आठ वर्षे थांबले ३९७
६७. नवा संसार ४०१
६८. कहाणी ४०८
६९. मी भित्री ४१५
७०. बालकवी ठोंबऱ्यांच्या आठवणी ४२३
७१. देवाचा दरबार ४३१
७२. सातारा ४३८
७३. संन्यास ४४२
७४. तीव्र जाणीव ४५०
७५. अभंगांजली ४५५
७६. नगरास शेवटली भेट ४६३
७७. दत्तूचे लग्न ४७०

७८. चिकी ४७६
७९. नव्हे ख्रिस्ती ख्रिस्ती । परि ख्रिस्त ख्रिस्त ४८१
८०. छाया ४८९
८१, भय काय तया प्रभु ज्याचा रे ४९८

## ।। भाग चौथा ।।

८२. नवा मनू ५०७
८३. मुंबई ५१६
८४. दु:खार्णवातील आनंदाच्या ऊर्मी ५२३
८५. विनाशकाले विपरीत बुद्धी ५३२
८६. मृत्युच्छायेच्या खिडीतून ५४३
८७. पाहुणे ५४९
८८. आजाराचा चौकोन ५५६
८९. मुलीची हौस ५६५
९०. स्वातंत्र्य ५७१
९१. कराचीस प्रयाण ५७७
९२. कराचीतील वास्तव्य ५८३ ते ५९१

# ॥ भाग पहिला ॥

डी. जे. जाधव
दृष्टी प्लॉट नं.४, यु.वे.बँक, कॉलनी
शाहुनगर, गोडोली, सातारा-४१५००१

## १ : सोनेनाणे धुऊन घेतले

ह्या काही काही आठवणी म्हणजे श्रुती होत. त्र्यंबकेश्वराच्या देवळात आई व आत्याबाई बोलत उभ्या होत्या. आत्याबाईंना मूलबाळ मुळीच नव्हते. आईने त्यांना कबूल केले होते, की आता ह्या खेपेला मुलगा होवो, मुलगी होवो, ती तुमची. त्या दोघी आपल्या वचनाला जागल्या व जवळजवळ मी अगदी आत्याबाईच्याच घरी वाढले, असे म्हणण्यास हरकत नाही. तसे म्हटले तर माझी सारीच भावंडे त्यांच्या घरी वाढली. मुलांना आपले सत्तेचे घर तितके आवडत नसे. आमच्या घरात आम्हाला, आमच्या आईला व आजीला भयंकर जाच असे. म्हणून साहजिकच आत्याबाईंच्या घरी आम्हाला आवडे. वडिलांना म्हणजे नानांना 'सोवळे' झाले होते व त्या सोवळ्यामुळेच घरात जाच असे. ती सोवळ्याची गोष्ट अशी सांगतात :–

सत्तावन सालच्या बंडाची धामधूम. माझे आजोबा– म्हणजे आईचे वडील– त्र्यंबकेश्वरी कोठीवाले होते. शिवाय त्यांची भिल्ल, कोळी वगैरे लोकांत सावकारी होती. त्यांच्यावर गरीबगुरीबांची मोठी श्रद्धा व गावकऱ्यांचे मोठे प्रेम असे. त्यांची भरभराटही फार होती. ही त्यांची चलती काही जणांना पाहवत नसे. सत्तावन सालच्या बंडाच्या धामधुमीचा फायदा आजोबांच्या वैऱ्यांनी घेतला व सरकारी अधिकाऱ्यांच्या मनात आजोबांच्या विरुद्ध काही किल्मिष त्यांनी उत्पन्न केले. आजोबांचे व माझ्या वडिलांचे एकमेकांवर बाप-लेकासारखे प्रेम होते. आजोबांना धरून नेण्यात आले व त्र्यंबकेश्वरीच ताबडतोब फाशी देण्यात आले. नाना तेव्हा नाशकास होते. तेथे त्यांना ती बातमी कळली. त्याबरोबर ते उठून तपोवनात गेले.

माझे माहेर जलालपूर. जलालपूर नाशकापासून चार-पाच मैलांवर आहे. नाना नाशकास होते, पण माझी आई व आजी– म्हणजे

नानांची आई, ह्या दोघीजणी जलालपुरास होत्या. त्या वेळी माझी सर्वांत वडील दोन भावंडे होती. बहीण होती सव्वा वर्षाची व भाऊ होता दीड महिन्याचा. व्याही फाशी गेल्याची बातमी आजीला कळली होती, पण तिने ती आपल्या सुनेला कळविली नाही. गाववस्ती अगदी खेड्याची. दंडाची जिकडेतिकडे धामधूम व धावपळ. अशा वेळी म्हातारीची काय स्थिती झाली असेल ती तिची तिलाच ठाऊक! घरावर दगड येत. नात म्हणे, चल गंमत पाहू. पण म्हातारी दोन्ही नातवंडांना मांजरीच्या पिलाप्रमाणे जपत असे. फाशीची बातमी आजीला कळली होती, पण आईला कळली नव्हती. ती भयंकर बातमी ऐकून म्हातारीने आपल्या सुनेच्या मागे टुमणे लावले, की तू आपल्या बहिणीकडे नाशकास दिवाळीसाठी जा. नाना घरी नाही. आपण दोघी बायकाच. आपण या धामधुमीत काय करणार ? आपले गाव हे खेडे. दोन लहान मुले. मनुष्यबळ काही नाही. पण आई काही तिचे ऐकेना. ती म्हणे, मी तुम्हाला एकट्यांना सोडून जाऊ कशी ?

शेवटी म्हातारीने सुनेची कशीतरी तयारी केली. बरोबर जाण्यास गाडी-घोडे काही मिळेना. शेवटी तिला बैलावर बसविले. पाठीशी पोर बांधून दिले. मुलीला गड्याच्या कडेवर दिले व अशा रीतीने म्हातारीने आईची व माझ्या वडील भावंडांची नाशकास रवानगी केली.

इकडे भाऊबीजेच्या दिवशी आमची आत्याबाई भावाच्या आंघोळीची तयारी करून बसली होती, पण त्याचा कोठे पत्ता लागेना. आपली भावजय गावात आली आहे, ह्याचीही तिला कल्पना नव्हती.

नाना जे सकाळी बाहेर गेले होते ते संध्याकाळी दिवेलावणीला कपडे वगैरे धुऊन व आंघोळ करून ओलेत्याने घरी परत आले. सर्वांनी त्यांना विचारले, " नाना, तुम्ही होता कोठे ? आणि असे ओलेत्याने का आला ?"

त्यांनी सांगितले, " मी तपोवनात गेलो होतो. तेथे एक महार तोंड धूत होता, आणि त्याचा शिंतोडा माझ्या अंगावर उडाला. मला त्याचा विटाळ झाला आहे. आता माझ्या अंगावर दुरून पाणी घाला. मी आंघोळ करतो." सासरा फाशीस गेल्याची दुःखाची बातमी समजताच

त्यांच्या मेंदूला धक्का बसला व तेच त्यांच्या सोवळ्याचे कारण असावे.

१८५७–५८ साली नानांना हे जे 'सोवळे' झाले ते शेवटपर्यंत म्हणजे पंचवीस वर्षे कायम राहिले.

ह्या सोवळ्यानंतर बारा-तेरा वर्षांनी माझा जन्म झाला.

त्यांच्या सोवळ्याने नुसते घरदारच नाही, तर सारा गाव त्रासून गेला होता. त्यांना ब्राह्मणांचासुद्धा विटाळ होत असे, मग मराठा व इतर जातीची काय कथा! घरातील बायका कोठे हळदीकुंकवाला गेल्या, तर परत न्हाऊन त्यांना घरात यावे लागे.

माझे माहेरचे घर म्हणजे वाड्याच्या दारासमोर ओटा, आत शिरताच गोठा, मध्ये अंगण, पुढे ओसरी, ओसरीच्या डाव्या हाताला देवघर व त्यामागे स्वैंपाकघर. देवघराला एक दारासारखी भली मोठी खिडकी. येथे बसले म्हणजे बाहेरचे सारे खडा न् खडा दिसे.

नाना सकाळी आठ वाजता बाहेर पडत व संध्याकाळी सहा वाजता घरी परत येत. त्या वेळी घड्याळे नव्हती. सकाळी जोत्याजवळ उन्हे पडली म्हणजे सकाळचे आठ वाजले, आणि संध्याकाळी गुरे घरी आली म्हणजे संध्याकाळचे सहा वाजले, असे आमचे अंदाजी घड्याळ होते. गुरे घरी येण्याच्या बेतालाच नाना घरी येत. असे त्यांचे वागणे नेहमीचेच होते. घरी आल्यावर आंघोळ, नंतर सायंसंध्या, जपजाप्य, देवपूजा ही होत. स्वैंपाकघरातही त्यांची करडी नजर असे. स्वैंपाक करणाऱ्या बाईने – व हे काम नेहमी आईकडेच असावयाचे– तो ओलेत्याने केला पाहिजे व सर्व उजव्या हातानेच केला पाहिजे. डावा हात मोडल्याप्रमाणे बाजूस राहिला पाहिजे. त्यांच्या सायंसंध्येला व इतर आन्हिकांना दोन तास सहज लागत. तितक्यात स्वैंपाक तयार होत असे आणि मग रात्री दहा-अकराला ते जेवीत.

मला एकंदर पाच भावंडे होती. तशी झाली पुष्कळ, पण जगली पाच. वडील बहीण भिकू हिच्यात व माझ्यात पंधरा-सोळा वर्षांचे अंतर होते. तिच्या पाठीवर केशव, मग भागीरथी, मग विष्णू व शेवटली मी. आमच्यापैकी एकही मूल नानांजवळ कधी बसत नसे की त्यांच्याबरोबर जेवीत नसे. सणावारालासुद्धा अगदी हाच बेत. पण ह्यावरून

त्यांचे मुलांकडे दुर्लक्ष असे, असे मात्र नाही. देवघरातील खिडकीतून त्यांची सर्वांच्या हालचालीवर करडी नजर असे.

कोणी शेजारी घरी आला– आणि अर्थात शेजार ब्राह्मणाचाच असावयाचा– तर तो परत जाताना आईने त्याच्यामागे पाणी शिंपडीत जायचे ! पण नाना एकदा सकाळी बाहेर गेले म्हणजे मग मात्र आमची सर्वांची मजा असे. ते गेले की शेजारच्या बायका आमच्या घरी बसायला येत. आम्हीही पोरेसोरे खेळायला गोळा करावी. आई तर माणसांची फार भुकेली. तिने दुसऱ्यांच्या मुलांना आंघोळी घालाव्या, सासुरवासणीच्या समजुती घालाव्या, कोणाला औषधे द्यावी, कोणाशी गोड बोलावे. एकदा तर एका मराठ्याच्या घरी जाऊन तिने तिथे पुरणाच्या पोळ्या करून दिल्या होत्या !

पण हे सारे अगदी चोरून ! नानांचे राज्य अगदी निराळेच होते. बाहेरून येणाऱ्या सर्व जिनसा ते धुऊन घेण्यास लावीत. मग ते तिखटमीठ असले तरी धुवावे लागे. एकदा त्यांनी मुलांना मीठ धुण्यास सांगितले. पोरांना नानांची खोड मोडायचीच होती. त्यांनी मीठ एका पंचात घालून चांगले भिजवले व तो पंचा खुंटीला टांगून ठेवला. थोड्याच वेळात मीठ विरघळून गळून गेले. नाना झोळीत मीठ पाहतात तो आत काही नाही ! तेव्हापासून मीठ, गूळ, साखर, तेल, तूप ह्या जिनसा धुतल्यावाचून घरात खपू लागल्या.

ही जिनसा धुण्याची कामे बहुतकरून आई व आजी ह्यांच्यावर पडत. ते सांगतील त्या जिनसा त्या धूत किंवा धुतल्याचा बहाणा करीत. मीठ, साखर धुण्याचे काम जोपर्यंत आई किंवा आजीकडे असे तोपर्यंत ती कधी विरघळली नव्हती ! त्या पुष्कळ वेळेस या धुण्याच्या बाबतीत लबाड्या करीत व आम्हालाही खोटे बोलण्यास शिकवीत. त्याचे कारणही तसेच होते. शेतातून धान्य घरी आले की ते साठवावयाच्या आधी धुतले पाहिजे असा नानांचा कडक नियम असे. आता वीस-वीस मण धान्य आईने व आजीने कसे धुवायचे ? त्या काय करीत, थोडेसे धान्य धुऊन त्याचा थर सर्व राशीवर घालीत. नाना घरी आले म्हणजे त्यांनी सर्व मुलांच्या जबान्या घ्याव्या. मुले सारी आधीच पढवून ठेवलेली

असावयाची. तेव्हा ती बहुतकरून एकच गोष्ट सांगत. पण जर का एखादा घाबरून चुकला, म्हणजे खरे बोलला, तर साऱ्या घरात गोंधळ सुरू व्हावयाचा. बायकांनी तेवढ्या रात्री नानांच्या नजरेखाली विटाळ झालेल्या वस्तू सगळ्या धुवावयाच्या, पोरांनी खोटे बोलल्याबद्दल रग-डून मार खावयाचा व पोरांना मारून झाल्यावर त्याच्या विटाळामुळे नानांनी पुन्हा आंघोळ करावयाची !

संध्याकाळच्या आमच्या सर्वच बाबतींत जबान्या होत असत. घरात बाहेरचे कोण आले होते, ते गेल्यानंतर पाणी शिंपडले किंवा नाही, धान्य कोणी कोणी धुतले, तुम्ही कोठे कोठे गेला होता– एक ना दोन, हजार प्रश्न होत असत.

खुद्द नानांचे सोवळे तर काही अजबच होते ! सकाळी शौचानंतर हात-पाय धुण्यास त्यांना चार नारळांएवढी माती लागे ! ही माती आडरानांत दोन-तीन मैलांवर जेथे कोणी जाण्याचा संभव नाही अशा एका ठराविक ठिकाणाहून सतत पंचवीस वर्षे त्यांनी आणली. तेथे एक मोठा खड्डा पडला आहे असे म्हणतात. नंतर ही माती घेऊन ते तासचे तास हात-पाय धूत बसत असत.

एकदा घरात जांबाच्या तीन पाट्या वळचणीखाली पडल्या होत्या. अगदी संध्याकाळ होईपर्यंत त्या पडून होत्या. वास्तविक त्या नाशिक येथे विकण्यास जावयाच्या, पण माणसांच्या अभावी त्या तशाच पडून राहिल्या. त्या विटाळल्या होत्या ! धुतल्या नव्हत्या ! त्या पाट्यांतील जांब खावे असे प्रत्येकाला वाटत होते, पण धीर कोणाचा होईना. संध्याकाळपर्यंत जांब खावेत की नाही ह्याच्यातच वेळ गेला. शेवटी असे ठरले की एके-काने दारापाशी पाळीपाळीने उभे राहावे व दुसऱ्यांनी जांब खावे. होता होता मीच एकटी राहिले. पण माझ्या वेळेस कोणी दाराशी उभे राहीना. शेवटी मीच आपली दारापर्यंत गेले व कोणी नाही असे पाहून जांब उचलून खाऊ लागले, इतक्यात नाना येऊन माझ्या पुढ्यात दत्त म्हणून उभे राहिले ! त्यांना पाहताच मी जी जीव घेऊन पळाले ती ओसरी-वर कोपऱ्यातल्या मुसळामागे लपले ! नानांनी मागील दारी जाऊन शिताफळीचा एक मोठा फोक काढून आणला व ‘ कुठे आहे ती फिंदरी ? ’

म्हणून मला मुसळामागून ओढून काढले व यथेच्छ मार दिला. माझा मार पाहून बिचाऱ्या आजीला अतोनात वाईट वाटले. घरातील सर्वच माणसांची पाचावर धारण बसली. त्यांना भीती पडली, की आता जर ही पोरगी साऱ्यांची नावे सांगू लागली तर साऱ्यांना मार बसूनच्या बसून वर सारे घरदार धुवावे लागणार ते निराळेच !

एक दिवस मी गव्हाच्या राशीजवळ निजले होते. जवळच माझी एक बाहुली पडली होती. त्या बाहुलीला मी लुगडे नेसविले होते. खेळता खेळता मला लागली झोप. बाहुलीचे लुगडे गव्हाच्या राशीला व मला लागले होते. नाना आले. त्यांनी ते पाहिले. गहू विटाळलेले पाहताच त्यांच्या तळव्याची आग मस्तकाला गेली. त्यांनी मला खसकन ओढली व चांगला मार देण्यास सुरुवात केली. माझ्या मधल्या बहिणीला व भावालाही कसलासा विटाळ झाला होता. त्यांच्याबरोबर मार देऊन मला गंगेवर (गोदावरीवर) आंघोळीला पाठविले.

गंगेवर जाता जाता आम्ही तिघांनी ठरविले, की आज कोणी तरी पाण्यात बुडून मरून जावयाचे. असे कोणी मेले म्हणजेच नानांचे डोळे उघडतील व ते कोणालाच त्रास देणार नाहीत.

विचार येण्याचा अवकाश, तो अमलात आणण्यास कितीसा वेळ लागणार ? आम्ही तिघे गंगेत डुंबू लागलो. सर्वांचा बेत एकच, की नानांना चांगली दहशत बसवावयाची. मला तर मारच बसला होता. तेव्हा नानांची खोडकी चांगली जिरविण्याचा हा बेत पार पाडण्याचे मी पक्केच ठरविले होते. मी थकले. नाकातोंडात पाणी जाऊ लागले. माझे तोंड पश्चिमेकडे झाले व डोळे सूर्याच्या किरणांनी दिपू लागले. त्याच वेळी समोर आमचे शेजारी कृष्णराव वाळवेकर संध्या करीत बसले होते. त्यांचे माझ्याकडे लक्ष जाऊन त्यांनी चटकन गंगेत उडी मारून मला बाहेर काढली. मग मला सावध करून घरी नेऊन पोचविली. नानांची खोड तर मोडली नाहीच, माझी मात्र पुरी खोड मोडली.

आता हसू येते. बाळपणचे ते मुसळाआड लपणे, नानांची खोड मोडणे अजून डोळ्यांसमोर सारे जसेच्या तसे उभे राहते.

एकदा वसुलाचे शंभर-दोनशे रुपये आले होते. ते अंगणात ठेवून

त्यावर शेणाचा पोह टाकला व नाना गेले आपल्या नित्य व्यवसायाला. आम्हा पोरांना त्या शेणाच्या पोहाभोवती पहारा ठेवण्याचे काम साऱ्या दिवसभर करावे लागले. संध्याकाळी नाना घरी आल्यावर ते रुपये धुण्यासाठी गंगेवर घेऊन गेले ते तेथेच विसरून आले! घरी आल्यावर गंगेवर रुपये विसरून आल्याचे त्यांच्या ध्यानात आले. पण उपयोग काय? गेले ते रुपये!

सारांश, या सोवळ्याओवळ्याच्या पायी नानांनी सोनेनाणेसुद्धा धुण्याचे कमी केले नाही!

## २ : तंगडीच मोडीन!

गोविंदराव खांबेटे हे माझ्या आत्याबाईंचे पती. मागे सांगितलेच आहे, की ह्यांना मूलबाळ काही नव्हते, तरी त्यांचे घर मात्र मुलाबाळांनी नेहमी गजबजलेले असावयाचे. त्यांचे नाशकासही घर होते. तेथेच मी त्यांच्याजवळ राहत असे. जवळच त्यांच्या बहिणीचे घर होते. तेथे एक बिऱ्हाड आले होते.

ह्या घरी सखू नावाची एक मुलगी सासुरवाशीण माहेरपणाला आलेली होती. बारा-तेरा वर्षांची व घरात तीच तेवढी बायकोमाणूस: पुरुषमाणसे म्हणजे तिचे दोन वडील भाऊ. एक इंग्रजी पाचवीत व एक सहावीत शिकत होता.

सखू खेळता येईल तितके खेळत असे. मीही नेहमी तेथे खेळायला जावयाची. आमच्या खेळण्याने सखूला चुलीशी लागावयाला उशीर व्हायचा. तिची भावंडे त्रासून-रागावून तशीच उपाशी झोपी जात.

ही बाहेरच्या मुली गोळा करते व भावंडांचे खाण्यापिण्याचे हाल करते, तेव्हा वडील भावाने स्वत:च तिच्याशी खेळण्यास सुरुवात केली. सोंगट्या, सागरगोटे वगैरे सारे तो खेळे. सागरगोट्यांत तर त्याने फारच

गंमत करावी. त्याचा खडा पडला म्हणजे चौखईवर जरी डाव आला असला तरी तो आपला सर्व डाव देवाला देऊन पुन्हा पहिल्यापासून डावाला आरंभ करी. अशाने त्या बहीणभावंडांची नेहमी भांडणे होत. कारण एकदा त्याच्या हातांत खडे गेले, की ते बहिणीला मिळणे दुरापास्त होई.

एकदा ह्या भावाचा असाच निश्चय झाला. ताई मुली जमवून खेळत बसते, आणि मग सगळ्यांना उपाशी बसण्याची वेळ येते. त्यापेक्षा आपण स्वतःच खेळू लागावयाचे व शेजारच्या काटर्या आल्या की त्यांना हाकून लावावयाचे, असे त्याने आपल्या मनाशी ठरविले.

मी रोजच्याप्रमाणे खेळण्यास गेले. त्या घराला दोन जिने होते. सखूच्या भावाने मला पाहताच काठी घेऊन एक जिना अडवला.

" खबरदार आमच्या घरात आलीस तर ! तंगडीच मोडीन ! "

वरून सखू हाका मारीतच होती. तेव्हा मी दुसऱ्या जिन्यावरून चढू लागले, पण काही उपयोग झाला नाही. तेथून पुन्हा शब्द आला, " पहा, लंगडी होऊन घरी जावं लागेल ! "

तेव्हापासून सखूच्या घरी जावयाचे नाही व तिच्या भावाचे तोंड पाहावयाचे नाही, असा मी निश्चय केला. पुढे सखूचे बिऱ्हाड उमामहेश्वराच्या देवळात म्हणजे आमच्या घराच्या अगदीच जवळ आले, तरी मी तिच्या घरात पाय घातला नाही.

हा निश्चय पुढे तर नेहमीच मी पाळणार असा रंग दिसू लागला. कारण गोविंदरावमामांनी सासुरवाडीसच– म्हणजे माझ्या माहेरच्या गावी जलालपुरासच-- घर बांधून तेथे कायमचे बिऱ्हाड केले. त्यांच्याबरोबर मीही नाशिक सोडून जलालपुरास आले. सखू आपल्या भावांसह दूर नाशकास राहिली व अशा रीतीने तिच्या घरी जाण्याचा मोहसुद्धा होण्याचा संभव उरला नाही.

गोविंदरावमामा माणसांचे फार भुकेले होते. गाव अगदी लहान व घर सदा सर्वांना उघडे, त्यामुळे फारच थोड्या दिवसांत ते जलालपुरास सर्वांना हवेहवेसे वाटू लागले. त्यांनी तेथेच शेतवाडी करून व सावकारी करून आपला उत्तम जम बसविला. गोखल्यांच्या घरचे तर

त्यांना सर्वच पाहावे लागे. त्यांची शेतवाडी, देणेघेणे, लग्न-मुंजी वगैरे सर्व भार त्यांनी आपल्या शिरावर घेतला.

मी तर त्यांचीच मुलगी. दोघेही माझे खूप लाड करीत. मी आता बरीच मोठी झाले होते; म्हणजे अकरावे वर्ष मला लागले होते.

त्या दिवसांत अकरा वर्षांची मुलगी लग्नावाचून राहणे म्हणजे फारच आश्चर्याची गोष्ट होती. आत्याबाई व गोविंदराव माझ्या लग्नाविषयीच्या काळजीत अगदी चूर होऊन गेले होते. पण ते मला ठिकाण पाहण्यास तयार नव्हते. ते म्हणत, "ठिकाण तुम्ही पहा. मी पाहणार नाही. तुम्हांस असे वाटायला नको, की मी पैशाकडे पाहून मुलीला भलत्याच ठिकाणी दिले."

मला अकरावेच वर्ष लागले होते तरी खाण्यापिण्याला उत्तम, काळजी कोणत्याही प्रकारची नाही, त्यामुळे मी वयाच्या मानाने आणखीच मोठी दिसे. गोविंदरावमामा पैसे खर्च करण्यास तयार होते, पण वरसंशोधन करण्यास तयार नव्हते. नानांना त्यांच्या महत्त्वाच्या सोवळ्याओवळ्या पुढे असल्या क्षुल्लक गोष्टीकडे लक्ष देण्याला फुरसत नव्हती, आणि यदाकदाचित ती मिळालीच असती तर त्यांच्या पसंतीला उतरेल असा सोवळा जावई त्यांना सापडला नसता. आईला काळजी. पण ती बायकोमाणूस; ती काय करणार ? तेव्हा ते ओझे माझे मेहुणे रावसाहेब नानासाहेब पेंडसे, वामनराव रानडे, रघुनाथराव महाबळ वगैरेंवर पडले.

नाशकास ह्याच सुमारास नारायण वामन टिळक नावाचा विद्यार्थी कवी व वक्ता म्हणून लोकांच्या नजरेत भरू लागला होता. नानासाहेब पेंडशांना फार वाटू लागले, की मनूचे लग्न ह्याच्याबरोबर व्हावे.

नानासाहेबांनी गोविंदरावमामांना ठिकाणासंबंधी कळविले. गोविंदरावांनी वामनराव टिळकांशी पत्रव्यवहार सुरू केला व मुलीला पाहण्यासाठी त्यांना बोलाविले. वामनरावांचे पत्र आले की, "मी हुंडा घेऊन आपल्या मुलाला विकणार नाही. जे तुम्हाला करता येईल ते तुम्ही करा. मला जे करता येईल ते मी करीन. टिपण मात्र चांगले

जुळले पाहिजे. त्याशिवाय मी संमती देणार नाही. तसेच माझ्या घरात कोणी बायकोमाणूस नाही, तेव्हा मुलगी मोठी होईपर्यंत ती तुम्हालाच सांभाळावी लागेल. मला पाहण्याची गरज नाही. तेथील सर्व मंडळीला ती पसंत असली म्हणजे झाले. मला पसंतच आहे."

हे पत्र वाचून सर्वांना फार आनंद झाला. गणगोत्र, पत्रिका वगैरे सर्व आधीच पाहून ठेवलेले होते. अडचण होती ती वामनरावांच्या संमतीची व ती अशा रीतीने अचानकपणे मिळाली. मोठी होईपर्यंत मला सांभाळण्यास मामा अगदी एका पायावर तयार होते. आता मला एकदा नाशकास नेऊन दाखवून आणण्याचे तेवढे राहिले होते. त्याप्रमाणे नाशकास माझ्या बहिणीकडे माझी रवानगी झाली.

प्रथम टिळक आपल्या मित्रमंडळीबरोबर नानासाहेबांच्या घरी आले. मी खालीच माझ्या बहिणीच्या मुलीबरोबर झोपाळ्यावर बसून झोके घेत होते. ह्या मंडळीने विचारले,

"नानासाहेब आहेत का?" मी उत्तर केले, "हो, आहेत बंगल्यात."

मंडळींना बंगल्याचा जिना सापडेना. त्यांची मोठी त्रेधा उडाली; ती पाहून माझी हसता हसता पुरेवाट झाली. नंतर मी त्यांना बंगल्याचा जिना दाखविला. नानासाहेबांची व त्यांची भेट झाल्यावर त्यांचा खाली निरोप आला.

माईसाहेबांनी मला नटवूनथटवून वर नेले. मला मात्र वर गेल्यावर मेल्याहून मेल्यासारखे झाले. एक तर मघा मी ह्या मंडळीला हसले होते व दुसरे मला घरातून हाकलून देणारा सखूचा भाऊच मला पाहण्यास आलेला! सखूच्या घरी पाय घालणार नाही असा माझा केवढा मोठा निश्चय! पण तो खास ढासळण्याचा प्रसंग मजवर आला.

घरात पाय टाकला तर तो मोडून टाकण्याची धमकी देणारे गृहस्थ अगदी परीक्षा वगैरे काही न घेता, बरोबरीच्या मंडळीलाच मी जशी काही पसंत आहे, असा बहाणा करून निघून गेले. आता माझ्या आजेसासूबाईंची परीक्षा राहिली. त्यांच्याही परीक्षेत मी उतरले. गंगा-

बाईंनी माझ्या डाव्या कानाचा चापा गच्च दाबून पाहिला व सांगितले, मुलगी मला पसंत आहे ! कान दाबला तरी मी हुश्श केले नाही की इश्श म्हटले नाही. त्यावरून आपण पोरीचा कान पकडून तिला कशीही वळविली तरी ती वळेल असाच त्यांनी अंदाज बांधला असावा.

मला नवल वाटते ते मी टिळकांना कशी पसंत पडले ह्याचे. माझे रूप, रंग अगदी बेताचेच होते. बाकी नाक-डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होतें व अगदी जागच्याजागी होते.

काही नाही तरी मामांनी माझ्या लग्नात एक हजार रुपये खर्च करण्याचे ठरविले. माझे वडील म्हणजे नारायणराव गोखले हे काय करणार होते ते दिसत होतेच. आईला पुष्कळ वाटे करावेसे, पण ती बिचारी काय करणार ? घरात तिला किती व कसा जाच होता हे वर आलेच आहे. तिचे समाधान म्हणजे करता येईल तितके दुसऱ्यांचे बरे करणे व खपता येईल तितके दुसऱ्यांकरिता खपणे. ह्याच तिच्या पुण्याईने तिच्या मुलांसाठी खपण्याकरिता देवाने ही माणसे निर्माण केली असावी. आईला लिहिता-वाचता येत नव्हते. मनाला विरंगुळा म्हणून तिने गाणी रचावी व ती शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या सुना-लेकींकडून पाठ करवून घ्यावी. ह्या व असल्याच समाधानाच्या गोष्टीचे तिच्या कष्टमय संसाराच्या गाड्याला ओंगण होते. मामांकडे सजल नेत्रांनी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यापलीकडे तिला काय करता येण्यासारखे होते ? मामांनाही हे कार्य अगदी आपले घरचेच वाटत होते. सख्खी मुलगी असती तर तिचे जितके केले असते त्यापेक्षाही माझे त्यांनी अधिक केले. मामांनी वामनरावांना पत्र टाकले, की गावात माझी मानमान्यता पुष्कळ आहे. लग्न मला माझ्या नावलौकिकाला साजेल असे केले पाहिजे. आज माझ्या घरी हे पहिलेच कार्य आहे. आमचा गाव जरी लहान असला, तरी आपण गावजेवण द्यावे अशी इच्छा आहे. वामनरावांनीही मामांची ही मागणी कबूल केली.

गोविंदरावमामा व आत्याबाई ह्यांच्या जिवांची केवढी धांदल ! वामनरावांनी म्हटल्याप्रमाणे बारा गाड्या वऱ्हाड आणले. पाहुण्या-रावळ्यांनी घर अगदी गच्च भरून गेले होते. दाराशी मोठा मांडव

घातला होता. लग्नाला चार दिवस राहिले. वामनरावांनी सुनेला पाहिले.

आता एक दुसरीच अडचण उभी राहिली. गोखले व टिळक ह्या दोघांची गोत्रे कश्यप व शांडिल्य. ह्या गोत्रांचे जुळत नाही; तेव्हा लग्न होणार कसे ? पण शास्त्राधार निघाला. गोविंदरावांच्या मांडीवर मला दत्तक देण्याचे ठरले. नाही तरी माझ्या जन्माच्या आधीपासून मला खांबेट्यांना देऊन टाकण्यात आले होते व जन्मल्यानंतर लग्नाच्या घटकेपर्यंत माझे सारे त्यांनीच केले होते. शेवटी चार दिवस का होईना, मी गोखल्यांची खांबेटे होणार, असे ठरले!

पण दत्तविधानाच्या वेळी दत्तक देण्यास नाना सापडेनात ! ते आपल्या नित्यनियमाप्रमाणे गेले होते रानात माती आणायला. संध्याकाळ होईपर्यंत ते परत येण्याचा संभवही नव्हता. ज्यांनी खुद्द सख्खी आई मृत्युशय्येवर पडली असताना, व "नाना, नाना" म्हणत असताना तिला निरोप पाठविला की, "थांब. माझी स्नानसंध्या होईपर्यंत मरू नको !", ते लेकीच्या दत्तविधानाची थोडीच पर्वा करतात ! !

गोविंदरावमामा आता खूप संतापले. मामा कधीच संतापत नसत, पण आता त्यांना अगदी खरे खरे वाईट वाटले. ते म्हणाले,

"ज्याची मुलगी तोच करील कन्यादान ! तेच जर एवढे बेपर्वाईने वागतात, तर आमचेच काय अडले आहे ? मुलगी त्यांची, त्यांना वाटेल ते, ते करोत." आत्याबाईही खूप संतापली होती. तिच्यातर तोंडाचा पट्टा एकसारखा चालूच होता !

माझ्या आईला मात्र मेल्याहून मेल्यासारखे झाले. थोडक्यासाठी आता लग्न मोडते की काय, अशी तिला धास्ती वाटू लागली. वऱ्हाडी मंडळीही हिरमुसली झाली. जिकडेतिकडे गोंधळ माजला.

इतक्यात मामांचे चुलते दिनकरशास्त्री खांबेटे आईच्या मदतीला पुढे सरसावले. त्यांनी शास्त्राधार काढून दिला, की आईलाही मुलगी दत्तक देण्याचा अधिकार आहे. हा शास्त्राधार म्हणजे उतास जाणाऱ्या दुधावर शिपडलेले चार थंड पाण्याचे थेंब ! सर्व शांत झाले. आईने ओल्या डोळ्यांनी मामांच्या मांडीवर मला दत्तक दिले.

येथे माझ्या सासरच्या माणसांचा नुसता नामनिर्देश करते. वामन सखाराम टिळक– ह्यांच्या पत्नी सौ. जानकीबाई– ह्या माझ्या लग्नाच्या वेळी दिवंगत झालेल्या होत्या. त्यांची मुले मथुरा, नारायण, सखाराम, सखू व महादेव. ह्यांच्याबद्दलच्या श्रुती पुढे मी देणारच आहे. माझ्या पतीचे वय लग्नात १७–१८ वर्षांचे होते व मी ११ वर्षांची होते.

दोन-तीन दिवसांनी लग्न लागले. मामांनी कन्यादान केले.

लग्नतिथीच्या दुसऱ्या दिवशी एकादशी होती. सोयऱ्याकडच्या सर्वच माणसांना चटकन एकादशी करण्याची हुक्की आली. त्यांचे वऱ्हाड बारा गाड्या ! शिवाय ते बारा घरचे बारा जण ! त्यात कोणाची काय हुक्की लागेल त्याचा काय नियम ? पण फराळाचे पुष्कळ प्रकारचे केलेले असूनही ते बाजूला ठेवण्यात आले व प्रत्येकाची एकादशी ज्याच्या त्याच्या मर्जीनुसार साजरी करण्यात आली.

मुलाकडील माणसांनी मुलीकडील माणसांच्या चोऱ्या कराव्या व त्या सापडल्याच तर थट्टा म्हणून ते सारे हसण्यावारी न्यावे, ह्या नियमाप्रमाणे आमच्या लग्नात असे फार झाले; कारण बारा घरचे बारा गाड्या वऱ्हाड !

लग्नकार्यात जावईबुवांवर रुसण्याचा प्रसंग आणतात. आमच्याही लग्नात तसे झाले. नवऱ्या मुलाला रुसायचे कसे हे चांगले पटवून ठेवण्यात आले होते. स्वभावत: टिळकांना कधीच रुसता येत नसे. ते रागावत वाटेल तितके, पण रुसणेफुगणे त्यांना मुळीच ठाऊक नव्हते. तरी त्यांना सांगून ठेवले होते, की तुम्हाला जेवायला बोलावतील तेव्हा जेवायला उठू नका. दोन तोळ्यांची अंगठी पाहिजे म्हणून सांगा व रुसून बसा ! टिळकांना पढवून-मथवून मग त्यांची मित्रमंडळी आपल्या जानोसघरी निघून गेली.

दुपारी एक वाजता केशवरावमामा– माझे वडील बंधू– टिळकांना जेवण्यास बोलावण्यास गेले. टिळकांनी सांगितले, "मी रुसलो आहे. आमची मंडळी जेवण्यास येतील तेव्हा मी येईन." आमच्याकडील वऱ्हाड्यांना भुका लागलेल्या. त्यांनी गुपचूप फराळ करून घेतला. मग बसले

सगळे जावयाची वाट पाहत. जावईबुवांनाही भूक लागली. त्यांनी हळूच केशवरावांना एका बाजूला बोलावून म्हटले, "आपल्याला आता भूक लागली बुवा !" हे ऐकून केशवरावांना आनंद झाला. त्यांनी पडत्या फळाची आज्ञा घेऊन त्यांना जेवण्यास वाढले आणि मग माझ्या सासरच्या वऱ्हाडयांकडे निरोप धाडला की, "पाने वाढून झाली. भात गार होऊ लागला. टिळक जेवण्यास बसले." झाले ! भराभर सारी वऱ्हाडी मंडळी पानावर येऊन बसली. नंतर कोणी अंगठीची विचारपूसही केली नाही. सुपाऱ्या खेळणे, गुळण्या टाकणे, घास घालणे, वगैरे सर्व प्रकार टिळकांच्या इच्छेविरुद्ध, पण पार पडले. आमच्या लग्नात भांडणे वगैरे काही झाली नाहीत.

मामंजींनी म्हटल्याप्रमाणे गावजेवणाची तयारी केली. टिळकांचे एक मित्र रा. खाडीलकर म्हणून होते. त्यांच्या डोक्यात एक कल्पना आली व त्यांनी ती अमलातही आणली. त्यांनी आणली भांग व घातली भज्याच्या पिठात. त्या जेवणावळीत भज्यांचा फार आग्रह झाला. लोकांनाही भजी फार आवडली. वराकडील मंडळींत हा प्रकार फक्त मामंजींना ठाऊक नव्हता. बाकी सगळी मंडळी मनातल्या मनात हसत होती. टिळकांनाही माहीत होते. त्यांनी माझ्या ताटातील भजी हळूच खाली काढून ठेवली. स्वत: अर्थात खाल्ली नाहीतच.

संध्याकाळ झाली. गार वारा सुटला. प्रत्येक जण उठून बाहेर फिरावयास जाऊ लागला. जो तो वेडेचार करायला लागला. माझी तर हसता हसता पुरेवाट झाली. एका मराठ्याने गाडी जुंपली व तिचे जूं बैलांसुद्धा झाडाला अडकविले ! बिचाऱ्या बैलांना फास बसू लागला. काही मुले फुले आणण्यास गेली ती तिकडेच लोळू लागली. पेंडसे गंगेवर संध्या करण्यास गेले; ते ज्या हातात अंगठी होती त्याच हाताने पाण्यात अंगठी पडली अशा भ्रमाने ती शोधू लागले. भिकूताईला स्वैपाकघरात शिरताच दिव्याच्या प्रकाशाने व चुलीच्या धगीने अधिकच भांग चढली. तेथे ओल्या करंज्या तयार करून ठेवल्या होत्या. तळायच्या तेवढ्या राहिल्या होत्या. त्या सर्व एकत्र कालवून ती त्यांची कणीक तिंबीत बसली व शेवटी एक मोठा गोळा करून तो तिने आत्याबाईच्या

स्वाधीन केला !

हे सर्व पाहून मामंजींना फारच वाईट वाटले. आपण करायला गेलो काय व हे झाले काय, असे त्यांना झाले. एकदाची मांडवपरतणी होऊन सर्व वऱ्हाड वधूवरांसह नाशकास येऊन पोचले. नाशकास पोचल्यावर आम्हा दोघांना नानासाहेब पेंडसे ह्यांच्या घरी ठेवून वऱ्हाडी घरोघर निघून गेले. त्याच रात्री वरात काढून घरामध्ये नववधूप्रवेश झाला व ज्या घरी पाय घालणार नाही, असा मी निश्चय केला होता त्याच घरी नेहमीचा पाय रोवून बसले.

## ३ : दुष्ट ग्रह

घरी आल्यावर कोकणातील माणसे निघून गेली. माझ्या आजेसासूबाई, सखूवन्सं वगैरे अगदी मोजकी माणसे तेवढी राहिली. मामंजीही गेले. तसे ते येऊन जाऊनच असत.

लग्नानंतर तीन महिन्यांनी चैत्र महिना आला. माझ्या आजेसासूबाईंनी मजकडून हळदीकुंकू करविले. सखूवन्सं होत्याच. घरातील दोघाचौघांनी गौरीची आरास चांगली करून दिली होती.

तो दिवस शुक्रवारचा होता. मामंजी आलेले होते, त्याच दिवशी कोकणातून मामंजींना त्यांच्या थोरल्या जावयाचे पत्र आले, की सौभाग्यवतीला नवज्वराने देवाज्ञा झाली ! पत्र दहा दिवसांनंतर आले असल्याने सर्वांची स्नानानेच मोकळीक झाली. ह्या वन्सं माझ्या लग्नाला आलेल्या होत्या.

दर शुक्रवारी मामंजींच्या अंगात देवी येत असे. अशा वेळी त्यांच्याजवळ घरच्या सर्व मंडळीने हजर असले पाहिजे अशी अपेक्षा असे. जर कोणी चुकले तर ते फार रागावत. माझा मात्र असला प्रकार पाहण्याचा माझ्या आयुष्यातील हा पहिलाच प्रसंग होता. मी फारच

धावरले.

त्या वेळी देवीला पुष्कळ प्रश्न विचारण्यात येत व देवीही अगदी सरळपणे उत्तरे देत असे. सर्व आटवड्यातील घरातील कटकटींचीही शहानिशा देवीपुढे होत असे. त्या दिवशी देवीने सांगितले, की आता जी मुलगी सून झाली आहे ती फार वाईट पायगुणाची आहे. हिच्यामुळे घरात सुख व शांती नांदणार नाही. हिच्यामुळे दुसऱ्यांचे वाईट होत जाईल. आत्ताच ह्या ' झाडाची ' मुलगी वारली ती हिच्याच पायगुणाने.

देवीचे हे प्रलाप ऐकून टिळकांना फार वाईट वाटले. देवी घुमू लागली म्हणजे सर्वांनी तिला हळदीकुंकू व फुले वाहावी, असा प्रघात होता. त्या दिवशी सर्वांनी त्याप्रमाणे केले, पण टिळकांनी तसे काही-एक केले नाही. ते मामंजीपुढे तसेच गप्प बसून राहिले.

वारे गेल्यावर काय काय झाले म्हणून मामंजींनी विचारले. त्यांना काय काय झाले ते कळले. त्यातच टिळकांनी देवीची पूजा केली नाही हेही कळले. तेव्हा मामंजी अर्थातच त्यांच्यावर रागावले व म्हणू लागले, " तू पूजा केली नाहीस, म्हणून देवी तुजवर रागावली आहे." टिळक म्हणाले, " देवी आता निघून गेली आहे, तेव्हा देवी मजवर रागावल्याचे तुम्हाला कसे कळले ?" ह्या उलट बोलण्याने देवीऐवजी मामंजीच टिळकांवर खूप कडाडले !

दुसऱ्याच दिवशी मामंजींनी माझ्या अंगावरील सर्व दागिने उत-रून घेतले. कुंकू व मंगळसूत्र तेवढे ठेवले. कपडेही परत घेतले. नाही म्हणायला पैठणी तेवढी मजजवळ राहिली. टिळकांना आपल्या वड-लांच्या ह्या कृत्याबद्दल काही शुभाशुभ वाटले नाही.

मामंजींना आपल्या घरात तीन दुष्ट ग्रह उत्पन्न झाले. एक मी, दुसरे टिळक व तिसरे महादेवभाऊजी. टिळक व महादेवभाऊजी ह्यांच्या संबंधी त्यांची पहिल्यापासूनच साशंक वृत्ती असे. कारण ह्या दोघांच्या हस्तरेषा त्यांना हव्या तशा नव्हत्या. त्यांची आवडती मुले म्हणजे सखारामभाऊजी व सखूवन्सं.

भुतेखेते, जादूटोणा, अंगात येणे, पायगुण, ग्रह, टिपण, हाता-पायांच्या बोटांची लांबीरुंदी ह्या गोष्टींवर त्यांची माणसांविषयीची

आवडनिवड अवलंबून असे. त्यांच्या अंगात येणारी देवी तर त्यांचे फारच आवडते दैवत. ही देवी नेहमी आम्हा तिघांबद्दल काही ना काही सांगायची. बहुतकरून एखाद्या आठवड्यात मामंजींच्या मनाविरुद्ध आमच्यापैकी कोणाचे वर्तन घडले, की देवी त्या शुक्रवारी हटकून आमच्याविरुद्ध आकांडतांडव करावयाची.

टिळकांच्या जन्माच्या वेळी मामंजींचे काम गेले होते तो टिळकांचा मोठा दोष, माझे लग्न झाल्यावर मोठ्या वन्सं वारल्या हा माझा दोष; व महादेवभाऊजींच्या जन्मानंतर सासूबाई वारल्या, हा त्यांचा पायगुण. एकूण, आम्ही तिघेजण त्यांच्या संसारातील तीन नतद्रष्ट माणसे ठरलो होतो.

सखारामभाऊजींच्या जन्माच्या वेळेस त्यांना नवीन नोकरी लागली! अर्थात ते चांगल्या पायगुणाचे ठरले व पुढे मामंजींनी त्यांना आपल्या सख्ख्या मुलाप्रमाणे व टिळकांना व महादेवभाऊजींना सावत्र मुलांप्रमाणे वागविले! घरात चहा झाला तर मामंजींनी सखारामभाऊजींना व सखूवन्संना जवळ बसवून तो प्यावा. टिळक व महादेवभाऊजींची वास्तपूस्तही करू नये.

माझ्या सासूबाईंना मी कधी प्रत्यक्ष पाहिले नव्हते, परंतु त्यांच्या चरित्रातील व टिळकांच्या पूर्वेतिहासातील ज्या काही गोष्टी मी ऐकलेल्या आहेत त्या थोडक्यात येथे दिल्यास ते अस्थानी होणार नाही असे वाटते.

माझ्या माहेरी माझ्या आईची जी गत होती तीच सासरी सासूबाईंची होती. टिळक व महादेवभाऊजी तर मामंजींचे नावडते होतेच, व माझ्या जागी मी येण्याआधी सासूबाई नावडत्या होत्या.

सासूबाई नावडत्या असण्याची दोन-तीन कारणे होती. पहिले म्हणजे त्या कविता करीत. त्यांच्या कविता मामंजी जाळून टाकीत. मामंजींच्या संतापाग्नीतून व खऱ्याखुऱ्या अग्नीच्या जबड्यातून सासूबाईंच्या कवितेतील फक्त दोनच ओळी आतापर्यंत टिकल्या आहेत. त्या दोन ओळी अशा होत्या :

स्मृ... २

**ही चिंधीची अल्प बाहुली प्रताप हीचा पहा ।**
**बाळपणापासून मुलींना शिकवी संसार हा ॥**

टिळकांना कवितेचे बाळकडू येथेच मिळाले म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आई कविता करते व लिहिते म्हणून तिचा दादा राग करतात, दादा आपलाही राग करतात, म्हणूनच प्रतिक्रिया म्हणून टिळकांचे आपल्या आईवर व कवितेवर त्यावेळपासून सर्वांत अधिक प्रेम असावे. आईच्या कुशीत निजावे असे त्यांना पाठीवर चार भावंडे झाली तरी वाटत असे; व त्यावरून निजताना रोज मारामाऱ्या होत. टिळकांच्या जवळ युक्त्या पुष्कळ होत्या. आई आपल्याकडे दुर्लक्ष करते असे वाटून एकदा त्यांनी हीव आल्याचे सोंग करून आईचे लक्ष आपल्याकडे ओढून घेतले होते. ती आठवण त्यांना अगदी शेवटपर्यंत होती. त्यांनी अगदी १९१८–१९ साली आपल्या एका अभंगात ती गोष्ट जशी काही काल घडली अशा रीतीने लिहिली आहे. त्यांचा तो अभंग असा आहे :–

**मला आठवते घेतली पासोडी । आणिली हुडूडी बळे अंगी**
**मुखें चालवीले अगाई अगाई । ठेवियेले नाही काही उणें**
**घाबरली माझी धांवली माउली । मजला कवळी दोन्ही हस्ती**
**अश्रुपूर्ण तीची नयने पाहिली । माझीही जहाली तीच गत**
**अनुतापे तप्त म्हणालो मी आई । खरे खरे नाही हीव माझे**
**सारे सोडूनी तू बसावे जवळ । उत्कंठा सबळ आवरेना**
**म्हणून हे सोंग, बतावणी सारी । क्षमा मज करी रडू नको**
**क्षणे वात्सल्याचा वाहे महापूर । त्यात पळीभर खेद-कोप**
**लबाडा म्हणून धरीयेला कान । वाटतो अजून धरलेला**
**दास म्हणे प्रेम खरे खरे वेडे । आनंदे सांकडे आलिंगील.**

टिळकांचे आपल्या आईवर किती प्रेम होते हे वरील अभंगाने चांगले दिसून येते. मायलेकरांतील हे प्रेम मामंजींना सहन होत नसे.

पण त्यांच्या ह्या वाटण्यानेच टिळक आपल्या आईला अधिक चिकटत, हे दुसरे कारण.

आणि तिसरे कारण म्हणजे सासूबाईंच्याकडे कोणी मिशनरी मडमा येत. त्यांनी त्यांना शिवण, टिपण, कशिदा वगैरे शिकविला होता. त्यांनीच बायबलमधील नीतीचे पुस्तकही सासूबाईंना दिले होते. ते त्या नेहमी वाचीत. मामंजींनी एक दिवस ते पुस्तक घेऊन जाळून टाकले.

त्या वेळेस टिळकांना आपल्या वडिलांचा इतका राग आला, की ते त्यांची काही तरी जबर खोडी काढण्यासाठी टपून बसले. मामंजींना तमाखूचे व्यसन होते. तमाखूत चुना घालून ती खावयाची, असा त्यांचा प्रघात होता. टिळकांनी त्यांचा डोळा चुकवून चंचीतून चुन्याची डबी लांबविली व ती दिली विहिरीत फेकून ! बाळपणच ते ! ! मामंजींनी नीतीचे पुस्तक जाळले, म्हणून जगातील साऱ्या नीतीच्या पुस्तकांची राखरांगोळी होणार नव्हती किंवा टिळकांनी मामंजींची चुन्याची डबी विहिरीत फेकून दिली, म्हणून साऱ्या चुन्याच्या डब्या पटापट विहिरीत जाऊन जीव देणार नव्हत्या. परिणाम मात्र असा झाला, की मामंजींचा राग भडकून अनावर झाला. त्यांचा तिकडे थयथयाट चालला होता तर टिळक आपल्या जागेवरून पडल्या पडल्या त्यांची गंमत पाहत होते. मामंजींनी सर्वांना हाका मारून प्रत्येकाची जबानी घेतली. कोणी कबूल होईना. शेवटी ते टिळकांवर कडाडले व एक मोठा फोक घेऊन त्यांनी त्यांना चांगले फोडून काढले. तिसऱ्या दिवशी टिळक घरातून पळून गेले. सहा महिने टिळकांचा पत्ता नाही ! मार खाल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी टिळक इतके चांगले वागले, की त्यांच्या वडिलांनीसुद्धा मनात वा म्हटले असेल. पण ते सारे आईसाठी होते.

पळून जाण्याच्या आदल्या दिवशी आईला पूर्ण सुख द्यावे असा त्यांचा हेतू होता. टिळक गेल्यावर बिचाऱ्या सासूबाईंची स्थिती अत्यंत शोचनीय झाली. ह्या देवाला नवस कर, त्या देवाला नवस कर, ह्याला सांग, त्याच्यापुढे तोंड वेंगाड, असे त्यांचे चालले होते. कोकणात त्यांनी आपल्या भावाकडेही निरोप धाडला होता. एक दिवस भाऊ म्हणजे

गोविंदराव बेडेकर कोकणातून बहिणीला भेटण्यास आले, त्याच दिवशी पुण्याहून एक माणूस कल्याणास आला होता. त्याने सासूबाईंना म्हटले, "अहो काकू, तुमच्या नानाला मी काल पुण्यास नाटकात काम करताना पाहिले !"

ह्या माणसाने खरोखरच टिळकांना पाहिले, अशी मनाची खात्री झाल्यावर सासूबाईंना फारच आनंद झाला. त्यांनी ती गोष्ट आपल्या भावाकडून मामंजींच्या कानावर घातली व मग टिळकांना पुण्याहून कसे तरी परत घरी आणले. घरी परत आल्यावर मामंजी टिळकांना फारच त्रास देऊ लागले. सासूबाईंचा जीव थोडा थोडा होत असे. त्यांना वाटे, टिळक पुन्हा पळून जातात की काय ? टिळक व सखारामभाऊजी, दोघे बरोबर शाळेत जात. भाऊजी आता त्यांच्या चहाडचा कमी सांगू लागले. आपल्यामुळेच नाना पळून गेला, असे त्यांच्या मनाने घेतले.

ह्याच सुमारास दोघांच्याही पायांना नारू झाले. सासूबाई दोघांचेही सारखेच करीत. पण मामंजी मात्र टिळकांना म्हणत, "चांगले झाले. तू लंगडा झालास तर मला आनंद वाटेल. तुझी खोडकी मोडलीच पाहिजे." जवळच सखारामभाऊजी पडलेले असत. त्यांना मामंजींनी म्हणावे, "बाळ, उगा अं. आता बरा होशील." दोघांचेही नारवाचे दोरे काढायला न्हावी बोलावला होता. दोरे काढताना मामंजी सखारामभाऊजींना मांडीवर घेऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत होते व त्यांची समजूत करीत होते. अर्थात टिळकांच्या नशिबी हे नव्हतेच ! उलट दोरे काढल्यावर घरात जाऊन त्यांनी सखारामभाऊजींना पेढा आणून दिला व टिळक रडत होते त्यांना माराचा धाक घातला !

ह्या काल्पनिक गोष्टी नाहीत. सखारामभाऊजींच्या तोंडावर टिळकांनी मला त्या सांगितलेल्या आहेत.

कर्ज म्हटले म्हणजे माझ्या सासूबाईंना व मामंजींना त्याचा अतिशय तिटकारा येत असे. त्यांनी कधी कोणाचे कर्ज काढले नाही, आणि म्हणूनच सासूबाई शिवणकाम करून मामंजींच्या पिठात आपले मीठ घालीत असत. आपली मुले शिकून मोठी कर्तबगार होतील व आपल्या पगारात आणखी भर घालतील असे त्यांना फार फार वाटे.

तसेच आपल्याला आजी म्हणायला नातू केव्हा येतो, ह्याचीही त्यांना उत्कंठा लागली होती. आपल्या अडीअडचणीला थोडाफार पैसा लागेल म्हणून त्यांनी शंभर रुपये मामंजींच्या नकळत बाजूला ठेवले होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे ह्या पैशाचा अडचणीच्या वेळीच उपयोग झाला. मात्र तो त्यांच्या इच्छेप्रमाणे नसून देवाच्या इच्छेप्रमाणे झाला. आता मुले पूर्ववत चांगली झाली व शाळेत जाऊ लागली. टिळक नाहीसे झाले असता सासूबाईंनी मारुतीला नवस केला होता, की हे मारुतीराया, माझे बाळ सापडू दे, मी तुला वड्यांची माळ घालीन. आणखीही काही नवस केले होते. ते टिळक सापडल्यावर फेडले. हा एकच फेडावयाचा राहिला होता.

त्याप्रमाणे त्यांनी एक वड्यांची माळ तयार करून आपल्या दोन्ही मुलांना सांगितले, की तुम्ही ही माळ मारुतीला घालून या.

टिळक म्हणाले, " आई, ते आम्हालाच का देत नाहीस ?"

ती म्हणाली, " तुम्हाला एकेक वडा ठेवला आहे. "

ते दोघेजण गेले. टिळक तळ्यावर गेले व तेथे त्यांनी माळेतील सर्व वडे स्वतःच खाऊन टाकले व पाणी पिऊन ढेकर देऊन ते घरी परत आले.

सखारामभाऊजींना जरी ही हकीगत माहीत होती, तरी ती त्यांनी कोणास सांगितली नाही.

घरी आल्यावर आई वडे देत असता टिळक म्हणाले, " मला नको. "

आई म्हणाली, " तुला हवे होते ना ?"

त्यांनी उत्तर दिले, " मी खाल्ले !"

" कुठे ?"

" तू जे वडे दिले होतेस ते."

" म्हणजे ? तू देवाचे वडे खाल्लेस वाटते ?"

" हो !"

सासूबाईंना या वेळी फार वाईट वाटले.

टिळक म्हणाले, " तू सांगतेस ना, की देव लांब नाही. तो

आपल्या अंतःकरणात आहे."

" अरे, पण असे करावयाचे नाही ! "

त्यांना जितका राग आला तितकेच कौतुक वाटले. त्या म्हणाल्या, " माझ्या सांगण्याचा तू असा अर्थ करशील हे मला माहीत नव्हते. देव अंतःकरणात आहे, म्हणजे आपण ज्या वाईट गोष्टी करतो त्या तो सर्व पाहतो."

दुसऱ्या दिवशी सासूबाईंनी मारुतीला वड्यांची माळ स्वतः नेऊन घातली.

मामंजींनी दुसरीकडे जागा घेतली व तेथे त्यांनी बिऱ्हाड केले. टिळक आपल्या मातुःश्रींना घरकामांतदेखील मदत करीत असत. स्वतःस पाणी पिण्यास देखील दुसऱ्याने द्यावे, असे मामंजींना वाटे. टिळक आपल्या आईला पाणी भरण्यास मदत करीत. ते पाहून मामंजी त्यांना म्हणत असत की, " भर, पाणीच भर ! तुझ्या नशिबी पाणीच भरावयाचे आहे. हा पहा सखाराम ! तुझ्याहून लहान असून कसा अभ्यास करीत आहे." हे ऐकून सासूबाईंच्या डोळ्यांपुढे आपल्या मुलाचे पाणक्याचे चित्र उभे राही व त्यांना फारच वाईट वाटे. टिळकांनी गणिताच्या तासाच्या वेळी कविता लिहीत बसावे, पण त्या कोणाच्याच दृष्टीस पडू देऊ नयेत. लगेच त्यांनी त्या फाडाव्यात. ह्या गोष्टी मामंजींच्या कानावर येऊन सासूबाईंनाही समजल्या होत्या. मामंजींचा राग व सासूबाईंची चिंता टिळकांच्या काव्यरचनेने वाढली होती. सासूबाई त्यांना म्हणत, " नाना, तुझे कसे होईल ? मी काय करू हेच मला समजत नाही." हे तिचे शब्द ऐकून टिळकांच्या डोळ्यांना पाणी येत असे, व ते म्हणत, " आता खरंच तू सांगशील तसाच मी वागेन."

पुढे मामजींची बदली मोखाड्यास झाली. तिकडे शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांनी एकटेच जाण्याचे ठरविले व बायकोमुले कल्याणासच ठेवली व ते मोखाड्यास आपल्या कामावर रुजू झाले. मामंजी गेल्यावर आता त्याच घरात शान्ती, सुख, समाधान व आनंद ही सर्वजण वावरू लागली. टिळकांच्या खोड्या कमी झाल्या. किंवा त्या जितक्या मामंजींना दिसत तितक्या त्या सासूबाईंना दिसत नव्हत्या असे

म्हटले तरी चालेल. आता टिळकांना आपल्या आईबरोबर मनसोक्त बोलावयास वेळ मिळत असे. त्याचे कारण म्हणजे मामंजी असताना काम फार व या मायलेकांचे बोलणे ऐकून त्यांना राग येत असे. आता असे बिलकुल नव्हते. आता फक्त मुले व आई! मग काय विचारता?

सासूबाई या एक आदर्श माता होत्या. त्या आपल्या मुलांची फारच काळजी घेत असत. साधेच, पण गरम गरम अन्न मुलांना घालीत असत. त्यांनी त्यांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे, त्यांच्या हालचालींकडे लक्ष द्यावे. टिळक तर आईला विचारल्याशिवाय घटकाभर घराबाहेर सुद्धा जात नसत.

टिळक घरात फार नम्रतेने वागत. आपल्या धाकट्या भावंडांना ते बिलकुल त्रास देत नसत. सखारामभाऊजींना आता समजून चुकले, की आता आपले दादा येथे नाहीत. तेव्हा आई व नाना यांच्या आज्ञेप्रमाणे आपल्याला वागलेच पाहिजे.

सासूबाई मुलांना घेऊन कधी कधी मामंजींच्या मावशीकडे म्हणजे सुभेदारांच्या घरी जात. आता त्यांना फक्त एकच काळजी होती. ती म्हणजे मामंजींच्या

खाण्यापिण्याची. टिळक म्हणत असत की, ''आई, दादा येथे नसले म्हणजे बरे वाटते. ते असेच नेहमी बाहेर राहिले तर किती छान होईल! मग आपल्याला काहीच त्रास नाही.''

''मग तुम्हाला खायला कोण घालील?''

''खरेच सांगू का आई, मला फार भय वाटते. कधी कधी तर असे वाटते, की ते अगदीच नसतील तर बरे.''

''असे भलतेच बोलू नये.''

''मीच एवढे त्यांचे काय गं घोडे मारलेय? तू सांगतेस तसा नाही का मी वागत? मी काय करतो हे माझे मलाच समजत नाही.''

''मोठा झालास म्हणजे सर्व काही समजेल.''

अशा प्रकारचे बालवयाला साजेसे संभाषण दोघा मायलेकांत होत असे. टिळक म्हणत,

''आई, तुला मी कधी कधी सोडून जाणार नाही. माझ्यासाठी तुला फार फार त्रास झाला ना?''

''बरे, असू दे रे, तू मात्र असाच चांगला राहा म्हणजे झाले.''

मनुष्याचे बेत, विचार आणि पुढील कृती वगैरे सर्व देवाच्या इच्छेवर अवलंबून असतात. अमृताच्या घटात जहरी सर्पाने गरळ घालावी तसे झाले. एक दिवस मोखाड्यातून मामंजींच्या सहीचे पण दुसऱ्याच्या हातचे पत्र आले. त्यात खालील मजकूर होता.

''वामनराव अतिशय आजारी आहेत, त्यांची डोळे-भेट घेण्यास अवश्य यावे. हयगय करू नये.''

बायकोमनुष्य, तशाच घरची गरिबी, नवऱ्याचे या प्रकारचे पत्र आलेले, भोवती मुलांचा गराडा, जाण्याची वाट अतिशय अवघड, या सर्व विचारांचे काहूर सासूबाईंच्या मनात उभे राहिले व आता कसे वागावे हेच त्यांना उमजेना. त्यांच्या पोटात कालवाकालव सुरू झाली. बिचारी करणार काय? त्यांना काहीच मार्ग सुचेना. तरी पण धीर करून त्या मुलांना म्हणाल्या.

''बाळांनो, तुम्ही येथेच राहा. मी एकटी जाते.''

टिळक म्हणाले,'' आई, आता आपण असे करू, की आपण दोघेजण जाऊ. सखाराम राहील सुभेदारांकडे. मी आल्याने तुला बरेच साहाय्य होईल. तू एकटी

काय करशील? दादा आजारी, घरातले काम, पाणी लांबचे. तू मला घेऊन चल. आपण दोघेही जाऊ. तू सांगशील तसाच मी वागेन.''

बुडत्याला काडीचा आधार. ही गोष्ट सासूबाईंना पटली. खरे सांगावयाचे म्हणजे टिळकांना आपल्या आईला सोडून राहण्यास नको होते. सखारामभाऊजींस सुभेदारांकडे पाठवून त्यांनी आपली तयारी केली. अडचणीसाठी ठेवलेले पैसे बरोबर घेतले. पन्नास वर्षांपूर्वीचा मोखाड्याचा रस्ता ज्याला माहीत असेल, त्याच्याच ध्यानात ते येईल. सासूबाईंच्या पाठीशी मूल, आणि टिळकांजवळ एक लहान बोचके, अशा थाटात ती दोघेजण निघाली. ते दिवस उन्हाळ्याचे होते. खाली जमीन तापलेली, वरून प्रखर ऊन लागते आहे, मनात चिंता, पोटात भूक, वाटेने पाण्याचा शुकशुकाट, पायाला पादत्राण नसल्यामुळे काटे, खडे बोचतातच आहेत. भोवताली गर्द झाडी, हिंस्र पशूंचे मनात भय, तशात एक डोंगर उतरून दुसरा चढावयाचा, एका बाजूला खोल दरी, वाटेत कोळ्याकातोड्यांची लहान-सहान खेडी, मध्येच वारुळातून मोठमोठाले साप बाहेर येत आहेत की काय असा भास होणे, पाल्यापाचोळ्यांतून आवाज होणे, असल्या बिकट वाटेने सासूबाई आपल्या आयुष्याची मर्यादा तुडवून जात होत्या. ''आई, आता घेतो त्याला. तू थकली असशील...''

''नको बाळ. मी तुझ्याहून मोठी आहे, म्हणून मला शक्ती जास्त आहे.'' अशा प्रकारे एकमेकांशी बोलत-चालत व एकमेकांचे श्रम हलके करीत कसेबसे त्यांनी मोखाडे गाठले. हे गाव टेकाडावर आहे. सासूबाई म्हणत असत की, ''मी एकदाचे त्यांना सुखी पाहिले म्हणजे मिळविली.''

''ते चांगले आहेत. तू काळजी करू नकोस. त्यांना काही झाले नाही.''

''नसो बाबा. मी हेच मागणे मागत आहे. देव करो नि हेच खरे ठरो. आता माझे काही मागणे नाही. संसार ही एक वाटच आहे. यातही आम्हाला प्रत्येकाला साह्य करावयाचे आहे व करून घ्यावयाचे आहे. मग ते कोणत्या प्रकारचे असो. ही वाट अशीच कठीण आहे.''

ही मंडळी दरड चढून गेली. हे गाव फार मोठे नाही. तेव्हाच तपास लागला. फारसा उशीर लागला नाही. ही मंडळी घरी जाते तो बाहेरच मामंजी गप्पा मारीत बसलेले! हे पाहून सासूबाईंच्या आनंदास पारावार राहिला नाही. त्यांचा श्रमभार ताबडतोब हलका झाला.

थोड्या वेळाने सासूबाई कामास लागल्या. घरातला केरकचरा काढून त्या मुलांना बरोबर घेऊन दरड उतरू लागल्या. त्यांना विहिरीवर अंग धुण्यास जावयाचे होते.

"काय गं आई, मी काय म्हणालो – त्यांना काही झाले नाही."

"तुझ्या तोंडात साखर पडो. तुझे शब्द खरे झाले. आता तू बोलल्याप्रमाणे राहा म्हणजे मिळविली." सासूबाईंच्या डोक्यावर हंडा, टिळकांच्या कडेवर महादेवभाऊजी, अशा रीतीने ती मंडळी निघाली.

"मी घेतो तो हंडा."

"नको. तुला तो जड होईल."

"आई, तू दमली नाहीस?"

"काही इतकी नाही." डोक्यावर हंडा, खांद्यावर धुणे. आता जाऊन स्वयंपाक करावयाचा, असे डोक्यात विचार, अशा त्या घरी परत आल्या. मामंजी दारासमोरच बसले होते. त्या दाराशी आल्या. "एवढा हंडा उतरावयाचा होता." हे शब्द कानी पडताच मामंजी वाघासारखे चवताळून त्यांच्या अंगावर आले.

"मी काही तुमचा चाकर नाही!" असे म्हणून त्यांनी सासूबाईंची मान धरून त्यांना मागून एक लाथ मारली. त्यासरशी सासूबाईंनी रामाला हाक मारून धरणीवर अंग टाकले. हे दृश्य पाहिल्याबरोबर दोन्ही मुले कावरीबावरी झाली व त्यांनी रडावयास सुरुवात केली.

टिळकांनी महादेवभाऊजींस खाली ठेवून आईच्या जवळ जाऊन विचारले, "तुला लागले का?" आईने हातानेच खूण केली, की नाही व तोंडाने 'राम राम' म्हटले. टिळकांनी कोरडे नेसावयास दिले. ते कसेबसे नेसून त्यांनी अंथरूण धरले. टिळकांच्या मनात पुन्हा वडिलांची काहीतरी खोड काढण्याचे येई, परंतु पुन्हा आपण आईला दिलेल्या वचनाची त्यांना आठवण होऊन ते गप्प बसत.

शेजाऱ्यांना हा प्रकार पाहून काहीच कळेना. मामंजी बाहेरच शांत बसून राहिले होते. मधूनमधून ते घरात ये-जा करीत. सासूबाईंनी आठ दिवस तोंडातून 'राम' या शब्दावाचून दुसरा शब्द उच्चारला नाही, की पाण्यावाचून तोंडात काही घेतले नाही. अशा स्थितीत आठव्या दिवशी मामंजींना विधुरावस्थेत टाकून व मुलांना जगाच्या हवाली करून त्यांनी 'राम राम' म्हणत प्राण सोडला.

+++

## ४ : पुन्हा पलायन

उन्हाच्या तापाने मोठमोठाले वृक्ष वठतात, दगडही उलतात, मग मामंजी तर मनुष्यप्राणीच होते. पत्नीवियोगाच्या प्रखर तापाने त्यांचे हृदय उलू लागले. आपल्याच अविचाराने हा प्रसंग आपल्यावर ओढवला, हे पाहून त्यांचे अंतःकरण पश्चात्तापाने दग्ध झाले. ते नेहमी विचारमग्न दिसू लागले. बायको गेल्यावर त्यांच्यावर मोठा कठीण प्रसंग ओढवला.

टिळकांचे मन तर फारच गांगरून गेले. त्यांच्या दुःखाला पारावार उरला नाही. ' न मातुःपरंदैवतम् ' अशी त्यांची आपल्या आईबद्दल वृत्ती अगदी पहिल्यापासून होती. आईच्या ऐवजी दादा गेले असते तर किती चांगले झाले असते, असे ते अगदी उघड उघड म्हणत. तिने शेवटी रामाचा धावा केला. आपले नावसुद्धा घेतले नाही. म्हणूनच रामाने तिला नेले. आपणही तसेच करावे. मग आपणही तिच्या मागे जाऊ. पण मग माधवाचा कोण सांभाळ करील ? असे नाना प्रकारचे विचार त्यांच्या डोक्यात थैमान घालीत होते.

मामंजींनी टिळकांना त्रास देण्याचे सोडले व टिळकांनीही त्यांच्या खोड्या करण्याचे सोडले. पण टिळक मनातल्या मनात एका मोठ्या विचारात गढून गेले होते. वडिलांच्या येथून निसटावयाचे व स्वतःचा चरितार्थ स्वतः चालवावयाचा, असे त्या लहानशा डोक्याने घेतले. पण ते त्यांनी कोणाला बोलून मात्र दाखविले नाही.

आपल्या पत्नीची हाडे गंगेत पडावी असे मामंजींना वाटू लागले. त्र्यंबकेश्वरला जाऊन क्रियाकर्मांतर करावे असा बेत ठरला. मोखाड्याहून त्र्यंबकेश्वर हेच क्षेत्र जवळ आहे.

महादेवभाऊजींना तेथेच शेजाऱ्याकडे ठेवण्याचे ठरले व टिळकांना बरोबर नेण्याचे ठरले. महादेवभाऊजींचे कपडे सासूबाईंनी बरो-

बर आणलेल्या बोचक्यातच होते. मामंजींनी ते बोचके सोडले. त्यात कपड्यांबरोबर त्यांना एक जडशी गाठोडी सापडली. तीत अडीअडचणीसाठी सासूबाईंनी बाजूस टाकलेले शंभर रुपये मामंजींना सापडले ! ते पैसे पाहून तर त्यांना फारच दुःख झाले. हर हर ! आपल्या उत्तरक्रियेसाठीच हे पैसे तिने ठेवले होते, असे म्हणून ते ओक्साबोक्शी रडू लागले.

त्र्यंबकेश्वरी टिळक व मामंजी आले. तेथील सर्व विधी आटोपल्यावर मेव्हण्याच्या स्वाधीन मुलेबाळे करून आपण मोकळे व्हावयाचे, असा मामंजींचा बेत होता व त्यांनी बेडेकरांना मोखाड्यास बोलावून ठेवले होते.

टिळक मनात म्हणत होते, मामा आले म्हणजे सखाराम व माधव ह्यांची सोय खात्रीने होणार. तेव्हा आता आपल्याला कसली काळजी नाही. मामांच्या बरोबर त्यांच्या घरी गेलो तर आपल्याला वारंवार आईची आठवण होऊन रडू येणार. तेव्हा आता आपण आपली सोय दुसरीकडेच बघावी. त्या वेळी टिळकांचे वय अकरा-बारा वर्षांचे असेल. रात्री सगळी निजानीज झाल्यावर टिळक हळूच उठले व पळून गेले. मामंजी सकाळी उठून पाहतात तो ते कोठे जागेवर आहेत ? पुन्हा हा प्रकार कल्याणसारखाच झाला. मामंजी गडबडून गेले व त्यांना त्यामुळे त्र्यंबक सोडण्यास ठरल्यापेक्षा बराच अधिक उशीर झाला.

टिळक जे रात्री निघाले ते एका धर्मशाळेत झोपले. पहाटेस एका रस्त्याने रस्ता नेईल तिकडे ते निघाले. ती वाट नाशिकची होती. त्यांच्याजवळ त्यांच्या अंगावरील कपड्यांखेरीज दुसरे काही नव्हते. जवळ एक पैसा नाही, की दशमी नाही. आपण कोठे जात आहो ह्याचाही त्यांना पत्ता नव्हता. सरळ जावयाचे व आपल्या पायावर उभे राहावयाचे, एवढेच त्यांना त्या वेळी ठाऊक होते.

मामंजी मोखाड्यास परत गेले. तेथे त्यांचे मेहुणे मुले नेण्यासाठी येऊन बसलेच होते. त्यांनी मुले नेली, तेव्हा मामंजींना फार वाईट वाटले. त्यांना त्या वेळी टिळकांबद्दलही वाईट वाटले.

टिळकांच्या डोळ्यांसमोर आपल्या आईची मूर्ती एकसारखी

दिसत होती व कानात तिचे राम राम हे शब्द गुणगुणत होते.

टिळक दहाच्या सुमारास नाशिक येथे पोहोचले. त्यांनी नाशिक गाठले खरे, पण ह्या गावाचे नाव मात्र त्यांना माहीत नव्हते. कारण ते यापूर्वी नाशिक येथे कधीच आलेले नव्हते. त्यांनी विचारपूस केल्यावर त्यांना हे नाशिक आहे असे समजले. गाव नाशिक आहे असे समजल्याबरोबर त्यांनी गंगेची वाट धरली व ते घाटावर आपले आसन मांडून बसले. देव कोणालाही विसरत नाही त्याप्रमाणे तो टिळकांनासुद्धा विसरला नाही. टिळकांच्याच वयाचा एक मुलगा स्नानासाठी त्यांच्याच जवळ थोड्याशा अंतरावर उतरला होता. तो टिळकांजवळ गेला व त्यांना विचारू लागला, "तू कोण ?"

"मी एक ब्राह्मण आहे."

"कोठून आलास ?"

"कोकणातून."

"जाणार कुठं ?"

"मला माहीत नाही."

"तुला कोण कोण आहेत ?"

"आईवाचून सर्व आहेत."

"येथे कोण कोण आहे ?"

"येथे कोणी नाही."

"माझ्या घरी येतोस का ? माझे घर मोठे आहे व मला आईवाचून कोणी नाही. तुला ती काहीतरी खावयास देईल." त्याप्रमाणे बोलणे व ओळख झाल्यावर त्या मुलाने आपले ओले धोतर वाळत टाकले व ते वाळल्यावर टिळकांना नेसावयास दिले. आंघोळी वगैरे आटोपल्यावर ते दोघेजण घरी गेले. घरी पोचल्यावर त्या मुलाने आपल्या आईशी टिळकांची ओळख करून दिली. त्या मुलाची आई तर त्याच्यापेक्षा अधिक प्रेमळ होती.

त्या बाईंनी टिळकांजवळ त्यांची सर्व माहिती विचारली. त्यांची करुण कहाणी ऐकून बाईला फारच वाईट वाटले व ती म्हणाली, "बाळ, मी काही फार श्रीमंत नाही. पण मला तुझ्यासाठी जे काही करता

येईल ते मी करीन व तुला मी थोडीफार मदतही करीन. तू कोठे भटकू नकोस. आमच्याजवळच राहा. घर मोठे आहे व त्यात आम्ही दोघेजण राहत असतो. " ह्याप्रमाणे टिळकांना आधार मिळाला व ते तेथेच राहू लागले. येसूबाईंनी टिळकांची वाराने जेवण्याची सोय लावून दिली. त्यांचे चार वार बाहेर लागले आणि तीन वार बाईंनी आपल्याकडे लावून घेतले.

ह्या बाई स्वभावाने चांगल्या होत्या, पण पैशाने गरीब होत्या. त्यांच्या मुलाची विद्या झालेली नव्हती, पण काळजी-कळकळीने त्या टिळकांना योग्य ती मदत करू लागल्या. त्यांना पोटाचा आजार असे. टिळकही त्या बाईंना घरकामात साह्य करीत असत. टिळकांना त्या बाईची गरिबीची परिस्थिती माहीत होती. असे असून त्या बाईने त्यांचे तीन वार घेतले हे पाहून त्यांना जरा वाईट वाटले. काही दिवसांनी टिळकांची गावात बरीच ओळख झाली. त्यामुळे त्यांचे आणखी दोन वार बाहेर लागले व बाईंच्या घरी एकच राहिला.

टिळकांच्या ह्या नवीन मित्राचे नाव विश्वनाथ बाळकृष्ण मायले व त्याच्या आईचे नाव येसूबाई. ही दोघे माय-लेक टिळकांवर निःसीम प्रेम करीत असत. टिळकांवाचून त्यांना एकही घास कधी गोड लागत नसे. दोघा मित्रांचे प्रेम जवळजवळ बंधुप्रेमच होते. येसूबाईंवर आपल्या खर्चाचा बोजा पडतो म्हणून टिळकांनी जेथे जेथे त्यांच्या ओळखी झाल्या होत्या तेथे तेथे भाजीपाला आणून द्यावा व त्यांच्याकडून दोन रुपये, तीन रुपये दरमहा घेऊन येसूबाईंना ते पैसे देत जावे.

टिळकांना संस्कृत भाषेचा नाद लागला, वेदशास्त्रसंपन्न गणेश-शास्त्री ह्यांच्याकडे जाऊन व आपला हेतू त्यांना कळवून संस्कृत शिकण्यास त्यांनी प्रारंभ केला. शास्त्रीबुवांचे चिरंजीव कै. वा. लक्ष्मण-शास्त्री त्या वेळी लहान होते. टिळक कधी कधी नाशिक येथील भट-जींच्या मठातही संथा घेण्याकरिता जात असत.

टिळकांनी आपल्या शिक्षकांचे प्रेम फारच संपादन केले. त्या वेळी त्यांचे मास्तर रहाळकर म्हणून होते. टिळकांची अलौकिक बुद्धिमत्ता पाहून त्यांचे हे मास्तर त्यांना वारंवार आर्थिक मदतही करीत असत.

टिळकांना आता आपल्या वडिलांचा त्रास व आईचे प्रेम ह्यांचा विसर पडला. परंतु काव्यदेवी, निसर्गदेवता व वक्तृत्व ह्या गोष्टी मात्र सोडून गेल्या नाहीत. एखाद्या वस्तूचे लक्षपूर्वक निरीक्षण करणे, कविता रचणे, आपल्यास जे काही मिळेल त्यातून दुसऱ्यास देणे ही तत्त्वे त्यांनी चालूच ठेवली होती.

जवळजवळ आठ-नऊ महिन्यांनी मामंजींना आपला मुलगा नाशिक येथे आहे असे समजले व त्यांना ते ऐकून संतोषही वाटला. लगेच त्यांनी गोविंदराव बेडेकरांना पत्र दिले, की नाना नाशिक येथे आहे व त्याची तेथे शिकण्याची सोय चांगली आहे. खर्चही कमी लागतो. म्हणून श्रीधर, (टिळकांचा मामेभाऊ) सखाराम, व तुमची भावजय यांस नाशिक येथे बिऱ्हाड करण्यास सांगा. मी दहा रुपये दरमहा देईन. तुम्ही दरमहा काही देत जा. गोविंदरावांची एक विधवा भावजय होती. हे पत्र वाचून दाखवीत असता गंगाबाईंचे डोळे पाण्याने भरून आले. त्यांना मुलीचे दुःख झालेच होते, पण त्यातल्या त्यात त्यांना नातवाची काळजी फार होती. मामंजींनी सुचविल्याप्रमाणे सखारामभाऊजी, श्रीधरभाऊजी, टिळकांचे मामा व मामी ही मंडळी नाशिकला अचानक येऊन उतरली. टिळकांना शोधून काढून नंतर ही सर्व मंडळी एकत्र राहू लागली. हळूहळू आणखी थोडी स्थित्यंतरे होऊन टिळक ह्या नाशिकच्या घरचे कर्ते पुरुष बनले व त्यांच्याच हातात येथील बिऱ्हाडाचा खर्च व बोजा अंगावर पडला. ह्याच वेळेस मी सखूवन्संकडे खेळायला जात असे व मला तेथून हाकलून दिले होते.

मामंजी व गोविंदराव बेडेकर प्रत्येकी दहा दहा रुपये टिळकांना पाठवीत व टिळक स्वतः थोडे काही काही मिळवीत व आपला इंग्रजीचा व संस्कृतचा अभ्यास करीत.

पुढे आमचे लग्न झाल्यावर लौकरच सखारामभाऊजी आपले येथील शिक्षण आटोपून पुण्यास गेले. श्रीधरभाऊजी कोकणात गेले. राहता राहिलो आम्ही दोघेच. अर्थात वीस रुपये येत होते ते बंद झाले. त्यामुळे अर्थातच टिळकांना सासुरवाडीखेरीज एकदम आपल्या पायावर

उभे राहणे शक्य नव्हते. तेव्हा आम्ही दोघांनी जलालपूरला जाण्याचे ठरविले

## ५ : मिरवणूक

गोविंदरावमामांचे आपल्या जावयावर अगदी बापाप्रमाणे प्रेम होते. ते म्हणत, " माझे आहे काय ? मनी ही माझी एकुलती एक मुलगी. पुढेमागे माझे जे आहे ते सारे मनीचे नि टिळकांचेच आहे. "

पण आत्याबाईंचे पाहणे निराळे असे. जावयाला नेहमी कामधंद्या-वाचून घरातच लाडावून ठेवले तर ह्यांचे पुढे कसे व्हावयाचे, ह्या मत-भेदामुळे त्या नवरा-बायकोंत नेहमी खडाजंगी उडे. आत्याबाईंनी म्हणावे, " टिळकांना काही संसाराची काळजी नाही. दोन वेळा जेवतात व हातावर पाणी पडले की जातात टोळभैरवांबरोबर भटकायला. " ह्यावर मामांनी म्हणावे, " असू दे ग. वय लहान आहे तो असेच चालायचे. पुढे आपो-आप सगळे कळू लागते. "

जलालपुराजवळच गंगापूर आहे. दोहोंमध्ये गंगा तेवढी आडवी. गंगापूर जलालपुरापेक्षा मोठे, श्रीमंत व हौशी गाव. तेथे दशावतारी नाटके होत. त्या गावात टिळकांना मित्रमंडळी व त्यांच्या कवितेचे रसिक श्रोतृगणही बरेच मिळाले होते. त्यांच्या आग्रहाने व स्वतःच्याही हौशीने त्यांनी ह्या नाटकात काम करण्यास सुरुवात केली. पण हे सारे अगदी चोरून ! गोविंदरावमामांच्या कानी ह्यापैकी काही जाऊ न देण्याची सर्व मंडळी मोठी खबरदारी घेत. पण एवढ्या खबरदारीच्या कुंपणातून मामांच्या कानी ही बातमी हटकून जात असे ! एखादा माणूस सहज बोलून जाई–

" काय हो मामा, तुमच्या जावयाने तर काल मोठी बहार उड-वून दिली ! दशरथाचे काम इतके चांगले केले की सारी माणसे ढसाढसा

रडू लागली ! " ह्यावर मामा म्हणत की, "हे शक्य नाही. ते रात्री घरातच होते."

आम्ही निजल्यावर मामा दाराला बाहेरून हळूच कुलूप लावून घेत व त्या कुलपाच्या जोरावरच लोकांच्या तोंडाला कुलूप लावण्याचा त्यांचा प्रयत्न असे.

सर्व सामसूम झाल्यावर गंगापुरास चाललेल्या नाटकाची गडबड जलालपुरास ऐकू येई. "आता गणपती आला, डफावर थाप पडली. ते पहा 'नाच शारदे' गाणे कसे स्पष्ट ऐकू येते !" असे पडल्या पडल्या टिळकांचे अधीर शब्द अंधारात उमटायचे, तर इकडे खिडकीखाली कुजबूज सुरू व्हावयाची. टिळकांची मित्रमंडळी खिडकीखाली जमून त्यांना खिडकीतून हळूच उतरवून घेत. घर शेतकऱ्याचे असल्यामुळे कासरे, दोर वगैरे जेथे तेथे टाकलेले असत. ह्यांचा उपयोगही अर्थात होतच असे.

एक दिवस टिळक असेच मध्यरात्री गंगापूरला पळून गेले, व पहाटे पहाटे त्याच दोराने खिडकीतून आत आले. मामांनी किल्ल्या चाचपून पाहिल्या, त्या जेथल्या तेथे होत्या. जावई नाटकात काम करतो, ही खोटी बातमी सांगून आपल्या दोघांत वितुष्ट पाडण्याचा काही लोकांचा बेत असावा असे त्यांना वाटे. त्या दिवशी पुन्हा रात्रीच्या चांगल्या कामाची बातमी नित्याप्रमाणे मामांच्या कानावर येताच ते म्हणाले, "तसे नाही. आज रात्री मीच येतो नाटक पाहायला. तुमची तोंडे तशाने बंद नाही होणार." मामा खरोखरच त्या रात्री गुपचूप नाटक पहायला गेले. आपले श्वशुर गर्दीत बसलेले असतील ह्याची टिळकांना कल्पना नव्हती. राम वनवासाला निघाले आहेत, आणि दशरथ शोक करीत आहे, असा प्रवेश होता. टिळक स्वतःच्या कविता करून त्या गाऊ लागले. प्रेक्षक रडू लागले. टिळकांच्या हयातीत काव्यगायनाची प्रथा पडलेली नव्हती, पण त्यांनी आपले काव्यगान अशा रीतीने त्या वेळी केले. मामांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले व त्यातच त्यांचा क्रोधाग्नी विझून गेला !

स्मृ... ३

मामांचा क्रोधाग्नी विझला खरा, पण आत्याबाईंची वीज कडकडावयाची होती ती कडाडलीच.

टिळक संध्याच करीत नाहीत, संध्येचे मांडून ठेवले म्हणजे ताम्हनात पाणी ओतून ठेवतात व भस्म खाऊन टाकतात, असा आत्याबाईंनी टिळकांच्याबद्दल गावात बोभाटा करावा, तर टिळकांनी उलट सांगावे, की सासू फार खाष्ट ! सासरा फार चांगला ! तो माझ्या अंगावर पांघरूण घालतो व ती बायकोकडून काढून घेते !

ह्या धुसफुशीमुळे शेवटी टिळकांनी जलालपूर सोडण्याचे ठरविले. मला घेऊन ते पुन्हा नाशकास आले. चार दिवस आम्ही नाशकास राहिलो, पण चारच दिवसांत नाशिकचा कंटाळा आला. पुन्हा परत जलालपुरास जावेसे वाटू लागले. पण कोणी या म्हणाले नाही, तेव्हा उठायचे नि जायचे तरी कसे ? पण शेवटी जायचेच असे ठरले. आता प्रश्न आला चार कोस पायी मला न्यायचे कसे ? मग केले एक घोडे. पण ते पायी व मी घोड्यावर ह्याला मी कबूल होईना ! शिवाय मला घोड्यावर बसावयाचे भयही वाटत होते. टिळक म्हणाले, "आपण दोघेही बसू घोड्यावर."

पण दोघांनी एकदम घोड्यावर बसायची लाज वाटू लागली.

त्यांनी माझी समजूत काढली, "बाजारची वेळ गेली आहे टळून. कोणी भेटणारच नाही वाटेने, कोणी भेटलेच तर सांगू, आपण शेजारी आहो !"

माझी समजूत पटली, व आम्ही दोघे घोड्यावर बसून चालू लागलो.

जवळजवळ जलालपूरपर्यंत कोणी भेटले नाही. पण आळंदीजवळ गावचा न्हावी भेटला. आम्हाला पाहून तो मोठमोठ्याने हसू लागला. "अवो जावईबुवा, ही वरात छान काढलीत !" असे त्याने हसता हसता म्हटले.

आम्ही दोघे लाजून खाली उतरलो. न्हाव्याच्या हातावर आठबारा आणे पडले. कोणाला सांगणार नाही असे त्याने कबूल केले. घोड्यावर आम्ही टाकलेली गोधडीही त्याला अर्पण केली. कारण ती

जलालपुरास न्यायची कशी ? घोड्यावर बसून न्हावीबोवांनी आपला नाशकाचा प्रवास सुखाने केला व आम्ही गोविंदरावमामांच्या दारी पायी येऊन उभे राहिलो.

आमचे स्वागत स्तब्धपणेच झाले ! दोन-चार दिवस घरात मुक्याचे व्रत होते. मग हळूहळू आत्याबाईंचा ज्वालामुखी पेट घेणार अशी चिन्हे दिसू लागली व शेवट जे व्हावयाचे ते झालेच. मामाही आता आत्याबाईंसारखेच बोलू लागले. संसारात टिळकांचे लक्ष नाही, असे दोघांचे म्हणणे. शेवटी टिळक रुसले व मला टाकून गेले.

गंगापूरपर्यंत ते अगदी जोराने गेले. पुढे गती कमी झाली. वाटेत भेटले गोपाळभट. हे जलालपूरचे ग्रामजोशी. त्यांच्या अत्याग्रहावरून आपला राग विसरून टिळक जलालपूरला परतले.

ह्या वेळेस माझे वडील बंधू केशवरावमामा ह्यांनी टिळकांचे स्वागत केले.

"का खाल्लात पुन्हा मुरडकानोला ?"

"छे रे ! मी कुठे येत होतो ? गोपाळभटानं मला आणलं !"

"अग अग म्हशी मला का ग नेशी असेच झाले म्हणायचे !"

टिळक हसले. त्यांचे मेव्हणेही हसले.

पण ह्यानंतर आम्हाला जलालपुरास फार दिवस राहणे शक्य नव्हते. जावयाचे संसारात लक्ष नाही, हे विकत श्राद्ध घेऊन सव्यअपसव्य करीत बसण्याची वेळ आली आहे, वगैरे आत्याबाईंचे शब्द दुसऱ्याकडून टिळकांच्या कानी गेले व जलालपुरास ह्यानंतर राहणे अशक्य झाले. जलालपूर सोडून नाशकास जाण्याचा पुन्हा विचार ठरला.

विचार अमलात आणावयास टिळकांना फारसा वेळ लागत नसे. लगेच त्यांनी नाशिकचा रस्ता धरला व ते नाशिक येथे पंचवटीत वामनराव रानडे ह्यांच्या येथे उतरले. पुढे काही दिवसांनी त्यांच्याच सल्ल्याने एक खाजगी इंग्रजी शाळा त्यांनी काढली व त्यात ते इंग्लिश शिकवू लागले. त्यांचे इंग्रजी शिक्षण सहा इयत्तेपर्यंतच झाले होते. तरीपण त्यांचा इंग्रजीचा व्यासंग फारच दांडगा होता. ही शाळा पंचवटीतील कृष्णमंदिरी स्थापन केली होती. तेथेच त्यांचे मित्र कृष्णराव भोंडे

राहत असत. चवदा-पंधरा मुले जमली होती. प्रत्येकी आठ आणे फी ठेवली होती.

टिळकांनी आता आपले बिऱ्हाड पंचवटीतील फडणिसांच्या वाड्यात वामनराव रानडे यांच्या शेजारी केले होते.

वामनरावांची चुलती माझी थोरली आत्या. त्यामुळे आमच्या नव्या घरी मला अगदीच चुकल्याचुकल्यासारखे वाटत नसे. टिळकांनी जी जोखीम पत्करली ती शेवटपर्यंत पार पाडली. ते काम त्यांना जीव की प्राण वाटत असे. त्यांचा सर्व वेळ बहुतेक मुलांमध्ये जात असे. एक दिवस त्यांना घरी येण्यास उशीर झाला. रात्रीचे दहा-साडेदहा वाजून गेले होते. मी घरात एकटीच स्वयंपाक करून त्यांची वाट पाहत बसले होते. वाट पाहत जाजमावर बसल्या बसल्या तशीच मला झोप लागली. टिळक घरी आले. दोन्ही दारांना धक्के मारून दमले. त्यांना पुष्कळांनी सांगितले, की ही त्यांची पहिली झोप आहे. त्या इतक्यात उठणार नाहीत. तुम्ही आमच्या घरी जेवावयास चला. पण ते काही केल्या कोणाचेच ऐकेनात. माझ्या आत्याला पण माझा राग आला. शेवटी माझ्या दिराने शिडी लावून एका मोठ्या काठीने खिडकीतून मला डिवचले, तेव्हा कोठे मी खडबडून जागी झाले. टिळकांना बराच राग आला होता. ते म्हणाले, "बघ, आता मी ही सर्व हकीगत लिहून तुझ्या वामनदादाच्या पत्रात छापण्यास देतो." दुसऱ्या दिवसापासून कानाला खडा लावून घेतला. झोप येऊ लागली तर मी डोळ्यांना पाणी लावून उभ्या उभ्या वेळ घालवीत असे.

## ६ : माहेरी रवानगी

आमचा संसार अशा रीतीने सुरळीत चालला असता एक दिवस मामंजी सखारामभाऊजींना घेऊन नाशकास उतरले. आमचा संसार

पाहून त्यांना समाधान झाल्यासारखे दिसले. मामंजींचा पूर्वीचा एक सत्यनारायण करावयाचा राहिला होता. सत्यनारायणाची सर्व तयारी करण्याचे त्यांनी मला सांगितले. मी म्हणजे पोरच होते. पण रानडयांच्या येथील माझ्या आतेचा ह्या वेळी मला फार उपयोग झाला. त्यांनी आमच्या घरी येऊन सर्व काही केले. मामंजी सगळा बेतबात पाहून अगदी खूष झाले. ते ज्याच्यात्याच्याजवळ म्हणू लागले, "आमची लक्ष्मी नावाचीच लक्ष्मी नाही, खरोखरीच लक्ष्मी आहे. वय लहान, पण बुद्धी किती चलाख ! संसारात लक्ष किती घालते," वगैरे. त्यांच्या तोंडचे हे शब्द ऐकून माझ्या अंगावर मूठभर मांस चढले.

सत्यनारायणाची पूजा झाल्यानंतर मामंजी व भाऊजी परत गेले. ते परत गेले न गेले तोच त्यांचे पत्र आले, की सखारामभाऊजींचे लग्न ठरले आहे, तरी तुम्ही उभयता पुण्यास या. वडिलांच्या आज्ञेप्रमाणे आम्ही दोघे पुण्यास गेलो. आपण स्थापन केलेली शाळा सोडताना टिळकांना फार वाईट वाटले. आपली ही चिमुकली संस्था रा. कृष्णराव भोंडे ह्यांच्या हवाली करून टिळक मला घेऊन पुण्यास आले. टिळकांच्या स्वभावातील हा एक विशेष—पुढे वाचकांच्या ध्यानात येईलच—होता, की दृष्टीसमोर असेल ते त्यांना जीव की प्राण असे. एकदा का एखादी व्यक्ती किंवा काम दृष्टिआड झाले, की मग त्याची त्यांना पुष्कळदा आठवणही राहत नसे. मग काळजी—कळकळ तर बाजूलाच राहिली !

त्यांची 'पांखरा येशिल का परतून' ही कविता एखाद्याने त्यांनाच उद्देशून म्हटली असती तर त्यात काही वावगे झाले नसते. ते बाहेर गेले म्हणजे 'वाऱ्यावरचा तरंग तू रे, जाशिल की भडकून' असे म्हणण्याची आमच्यावर पाळी येत असे. ते असे कोठे गेले म्हणजे मी रडत बसावे, घरातल्या वृद्ध मंडळीने काळजीत पडावे व तरुणांनी शोध करीत सुटावे.

सर्व वऱ्हाड जमले; पण कोठे काही माशी शिंकून भाऊजींचे ते लग्न मोडले. अर्थात सर्व पांगापांग झाली. मागे आलेच आहे, की पैठणी व मंगळसूत्र ह्याखेरीज मजजवळ काही राहिले नव्हते. टिळकांना ते

ठाऊक होते. त्यांनी काही निमित्त करून मजजवळून पैठणी मागून घेतली. त्या पैठणीचे काय झाले ते कळले नाही. टिळक मात्र गेले मला पुण्यास टाकून.

एक दिवस मामंजींनी माझी जबानी घेण्यास सुरुवात केली. माझे वय त्या वेळी तेरा-चवदा वर्षांचे होते.

"लक्ष्मीबाई ! पैठणी कुठं आहे ?"

"मला ठाऊक नाही. मी त्या कोनाड्यात बांधून ठेवली होती."

"ते काही ठाऊक नाही. पैठणी आणून द्या, नाही तर माझ्याशी गाठ आहे !" मामंजी घुश्शात असले म्हणजे मला अहो-जाहो म्हणत.

खरी गोष्ट अशी होती, की भाऊजींनी व मामंजींनी गहाण पडलेली पैठणी सोडवून आणली होती. पुढे मात्र ती पैठणी माझ्या कधीच नजरेस पडली नाही म्हटले तरी चालेल. काही तरी बापलेकांची कुरबूर होऊन टिळक गेले असावे.

मी एकटीच सासरी– म्हणजे सासऱ्याच्या कचाट्यात– सापडले.

"मामंजी, मला बांगड्या भरायच्या."

"मग ? मला काय सांगता ? पैठणी आणून द्या –मग बांगड्या भरू."

"माझी लुगडी फाटली..."

"मग ? मी काय करू ? पैठणी आणून द्या– मग लुगडी घेऊ."

"मी पैठणी तुमच्या गळ्याशपथ हरवली नाही."

"ते मला काही ठाऊक नाही. मोलाची दळणी दळा अन् भरा बांगड्या, घ्या लुगडी !"

वरील तऱ्हेचा संवाद झाल्यावर मी मुळूमुळू रडत बसे. शिकेकाई, तेल– काही काही मला देत नसत. मागायला गेले की वरील ठराविक साच्याचे उत्तर यावयाचे.

एक दिवस सखारामभाऊजींनी मला एका बाजूला घेऊन सांगितले, की 'पैठणी आहे. नानाने ती गहाण टाकली होती. ती सोडवून परत आणली आहे; पण ती तुम्हाला देता काही येणार नाही. कारण दादा रागावतील.' मी म्हणाले, "हरकत नाही. मला दिली नाही तरी आहे एवढे पुष्कळ झाले."

पुण्यात वामन बाळकृष्ण रानडे राहत असत. ते माझ्या वडील आतेचे पुतणे होते. म्हणून मामंजींनी त्यांना बोलावून आणून सांगितले की, तुमच्या बहिणीची व्यवस्था करा.

त्यांनी उत्तर केले की, "तुम्ही तिचे प्रत्यक्ष सासरे आहा. इतके दिवस आम्ही तिची व्यवस्था केली. आता ती करण्याचे काम तुमचे आहे. तुम्ही कोणी नसताना आम्हाला सारे करणे भागच होते व आम्ही केलेही असते."

जाताना रानड्यांनी मला एकटीला एका बाजूस घेऊन सांगितले, "मने, तू भिऊ नको. आम्ही काही तुला टाकले नाही. आम्ही **सगळे** काही करू."

मला तेवढाच धीर आला. मी लागलीच म्हणाले,

"मला पुण्याच्या बांगड्या भरायची हौस आहे. मामंजी म्हणतात, मोलाची दळणी दळून पुण्याच्या बांगड्या भर."

दुपारी मामंजी बाहेरून आले. त्या वेळी ते माझ्याशी फार गोड बोलू लागले.

"लक्ष्मीबाई, तुम्हाला लुगडी पाहिजेत ना ?"

मला फार आनंद झाला.

"होय. माझ्या साड्या अगदी फाटून गेल्या आहेत."

"एक पाहिजे का दोन ?"

"दोन."

"एक पाहिजे असेल तर चार रुपयांचे घेतो. दोन पाहिजे असतील तर दोन-दोन रुपयांची दोन मिळतील."

झाले ! मी काय बोलणार ? मला फार वाईट वाटले. पुन्हा कोपऱ्यात जाऊन डोळे पुसून कामाला लागले. लग्न झाल्यानंतर सासरच्या ह्या पहिल्याच साड्या. मला माझ्या माहेरची व गोविंदरावमामांच्या प्रेमाची आठवण येऊन सारखे उमाळे येत होते. थोड्या वेळाने मला दोन-दोन रुपयांवाल्या दोन साड्या मिळाल्या.

संध्याकाळी रानडे आले. त्यांना मामंजींनी सांगितले, "रानडे, मी मुलीला पाठविण्याची सर्व व्यवस्था केली आहे. तुम्हाला आता

काही त्रास नाही. या आता आपण, "

सकाळी साताच्या गाडीला मला नाशिकचे तिकीट काढून देण्यात आले. पुण्याच्या बांगड्या भरायचे राहिलेच शेवटी ! मला सोबतीला दोन बाया होत्या. भाऊजी स्टेशनवर पोचवायला आले होते. त्यांनी गाडी सुटताना माझ्या हातावर एक रुपया ठेवून म्हटले, "वहिनी, तू कितीतरी वेळेस बांगड्यांचे म्हणालीस, पण दादांच्या भयाने मला काही करता येईना. हा घे रुपया व बांगड्या भर."

"पण मला पुण्याच्या बांगड्या हव्या होत्या !" पुढे गाडी सुटल्याने पुण्याच्या बांगड्या पुण्यातच राहिल्या.

संध्याकाळी आम्ही नाशिकास पोचलो. माझ्या सोबतिणींनी मला आपल्या घरी पंचवटीत नेले. गावात खंडीभर गोत असून मी त्या रात्री परक्याच्या घरी उतरले. मला वर माडीवर बसविले व त्या दोघी आत गेल्या. तेथे तबला, वीणा वगैरे संगीताची उपकरणी पाहून मला आधी कुतूहल व नंतर भीती वाटली. मी ही वाद्ये ह्यापूर्वी कधीच पाहिलेली नव्हती. आधी खेड्यातले राहणे, तशात नारायणराव गोखल्यांची मुलगी ! आगगाडीचे डबे म्हणजे लाडवाच्या डब्यासारखे असून आत माणसे घालून मग झाकण लावीत असावे, अशा तऱ्हेची कल्पना करणारी मी मुलगी ! ती वाद्ये पाहून मला भय वाटले व मी त्या खोलीतून खाली उतरून त्या माउल्यांना हाका मारीत घरभर अंधारात चाचपडत फिरू लागले. खाली चिरेबंदी चौक होता. चौकात मी दणकन आपटून तेथील दगडी चौरंगावर माझे हात आदळले. पुण्याच्या बांगड्या तर दूरच राहिल्या, पण हातांत असलेल्या नाशकाच्याही सर्व बांगड्या वाढवल्या ! मी इतकी जोराने आदळले, पण माझे डोके काही फुटले नाही. माझ्या पडण्याच्या आवाजाने त्या दोघी बाया धावत आल्या व त्यांनी मला उचलून वर आणले. आपल्या गळ्यांतील गळसऱ्या काढून त्यांनी माझ्या हातांत बांधल्या व काही खाण्याविषयी आग्रह करू लागल्या. मी त्यांच्या हातचे खाण्याचे नाकारले. पण बिचाऱ्यांनी ते अगदी मनावर न घेता रात्रभर सोबत केली व त्यांच्याकडून करता येईल तितके साहाय्य केले.

दुसऱ्या दिवशी त्यांनी मला एक आण्याच्या बांगड्या भरल्या व मग मी नाशिकचा रस्ता धरला. मी थेट जलालपुराला जाण्यास निघाले. पण नाशिक सोडण्याच्या आधीच रविवार पेठेत गोविंदरावमामा येताना दिसले. मला पाहून त्यांना फार आनंद वाटला, आश्चर्य वाटले. पण एकंदर प्रवासवर्णन ऐकून तितकेच वाईट वाटले. मग आम्ही दोघे त्याच पावली जलालपुरास गेलो.

## ७ : माहेराहून सासरी

टिळकांनी पुण्याहून जी भरारी मारली ती थेट वऱ्हाडात धामक गावी ! तेथे त्यांना सरकारी शाळेत पंचवीस रुपयांवर मास्तरचे काम लागले.

**" घरोघर बाप घरोघर आई । घरोघर ताई भाई माझे**
**माझिया ममत्वे व्यापियेले नाही । असे न एकही स्थान कोठे ।**

हा त्यांचा अभंग त्यांच्याच चरित्राला शोभतो. धामकास त्यांच्या घरची कोणी माणसे जवळ नव्हती. पण जवळची कोणतीही माणसे त्यांना नेहमी घरचीच वाटत. त्यांचा संसार वाढू लागला. त्यातच एक गरीब ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याचा गळा गोड होता. त्याला जवळ घेऊन टिळकांनी त्याच्याकडून चार कीर्तने बसवून घेतली. ही चारी आख्याने टिळकांनी त्याच्यासाठी लिहिली होती. अशा रीतीने त्यांनी त्याला मार्गाला लावला.

तेथेच टिळकांना कोणी एक योगी साधू भेटला. टिळक त्याचे शिष्य बनले. त्याने टिळकांना काही गुरुमंत्र दिला. नदीत बसून त्याचा ते जप करीत. कडुलिंबाचा पाला वाटून त्याचे गोळे खात. टिळकांच्या भोवती माणसे अधिकच जमू लागली. पण त्यांनी रानात जाऊन ध्यान करीत बसावे. असे करता करता त्यांना शाळेला रामराम ठोकावा लागला.

पण ह्या नवीन आयुष्याचा त्यांना आपल्या गुरुजींच्याच आज्ञेने त्याग करावा लागला. साधुबुवांनी एक दिवस टिळकांना विचारले, " तुमची घरची मंडळी कोण कोण आहे ? त्यांच्या संमतीने तुम्ही त्यांचा त्याग केला का ? अर्थात् त्या प्रश्नाला ' नाही ' असे उत्तर द्यावे लागले. तेव्हा गुरुजींनी ताबडतोब जलालपुरास जाण्याविषयी टिळकांना आज्ञा केली, व आपण नेहमी भेटत जाऊ, असे आश्वासन दिले.

माझ्या माहेरची माणसे टिळकांचा तपास करीतच होती, व त्यांच्या तपासाची इतिश्री निराशेत झाली होती. एक दिवस गळचात लिंबाएवढाल्या रुद्राक्षांची माळ, अंगात कफनी, दाढी व जटा अफाट-पणे वाढलेली, अशा थाटात टिळक मामांच्या दारात येऊन उभे राहिले. हा अवतार पाहून गोविंदरावमामांना फार वाईट वाटले.

त्यांनी आता अगदी दृढ निश्चय केला, की टिळकांना मुळीसुद्धा बोलायचे नाही. आताच्या वेषावरून ते केव्हा संन्यास घेतील ह्याचा नेम नाही. आत्याबाईंनाही त्यांनी बजावून ठेवले. आत्याबाईंनी आपली जीभ पुष्कळच आवरली. पण ' मूळस्वभाव जाईना ' त्याप्रमाणे माज-घरात एक दिवस बोलणे सुरू झाले. मामा, आत्याबाई व मी बोलत होतो.

" काय खुंटावरचा कावळा पाहून दिला ! "

" मी दिली नाही. तुझ्याच माणसांनी हे ठिकाण पाहिले. "

" पण आत्याबाई , साऱ्यांनीच पालखीत बसायचे, तर पालखीचा दांडा कोणी उचलायचा ? "

" ही मोठी आली कड घ्यायला ! तू आहेसना पालखीचा दांडा उचलायला. तो करीत जाईल गाणी, आणि तू म्हणत जा. मागा दोघे जण भीक. "

हा कडकडाट माजघरातून बाहेर आला. टिळक ओसरीवर बसले होते. त्यांनी लागलीच आपले गाठोडे बांधले. मामा त्यांची समजूत करू लागले. ते ऐकेनात. शेवटी मामांनी सांगितले.

" तुमची बायको आता मोठी झाली आहे. तिला तुम्ही आपले घेऊन जा. मी तिला सांभाळायला तयार नाही."

मामंजींची बदली मुरबाडला झाली होती. तेथे मला घेऊन

जाण्याचे टिळकांनी ठरविले. माझे मामंजी म्हणजे अतिशय टापटिपीचे गृहस्थ होते. सासूबाई वारल्यानंतर त्यांनी दुसरे लग्न केले नाही की इतर काही भानगडी केल्या नाहीत. त्यांचे वर्तन फार शुद्ध असे. परस्त्री ते मातेसमान मानीत. सासूबाईंच्यानंतर घरातील सर्व व्यवस्था ते स्वतः पाहत. स्वतः हाताने स्वयंपाक करीत व तो इतका बेताचा, की जेवण झाल्यावर भाताचे एक शीत उरायचे नाही ! घरात प्रपंचाला लागणाऱ्या सर्व जिनसा ते ठेवीत. एकदम पाहणाऱ्याला असे वाटले असते, की ह्यांच्या घरात बायकामाणसे असली पाहिजेत. मुरबाडास ते रामाच्या देवळात राहत असत. शेजारीच एक खानावळ होती.

आम्ही मुरबाडास पोचलो तेव्हा मामंजींचे जेवण झाले होते. ते बाहेर ओसरीवर बसले होते. अर्थात घरात आम्हाला काही खाण्यास मिळाले नाही. मामंजींनी बाहेर खाणावळीत आमची रवानगी केली. भाताचा बळी, हळद-कुंकवाएवढे वरण, भाजलेले कडवे वाल, शेवटी ताकाळलेले पाणी, असा जेवणाचा थाट होता ! टिळकांना त्याचे काही वाटले नाही. पण चार पिढ्या देशावर काढलेल्या मला मात्र ते जेवण उपासाहून अधिक त्रासदायक वाटले. जेवण होऊन आम्ही घरी आल्यावर मामंजींनी मला आपले घर दाखविले.

" लक्ष्मीबाई, येथे जर तुम्ही काही अव्यवस्था केली, गबाळेपणा केला, तर मला अगदी खपणार नाही. हे सर्व साहित्य, हे सरपण, ती बाहेर विहीर. आता संध्याकाळचा स्वैपाक तुम्ही करा."

तांदळाच्या भाकरी करण्याचा तो माझा पहिलाच प्रसंग. तांदळाची भाकरी मी पूर्वी कधी जन्मात केली नव्हती की पाहिली नव्हती. पहिल्या पावसानंतर जमिनीला जशा भेगा पडतात तशा माझ्या भाकरींना भेगा पडल्या होत्या.

" लक्ष्मीबाई, हे चालणार नाही. तुमची माहेरची माणसे जनावरे असतील– मी नाही ! उद्यापासून स्वैपाक चांगला झाला पाहिजे."

मी स्वयंपाक करण्यास बसले की मामंजी पुढच्या खोलीत बसायचे. तेथून त्यांना स्वयंपाकघरात काय काय चालले असेल ते दिसे. पुष्कळ वेळेला एकीकडे त्यांची देवपूजा चाले, तर एकीकडे मला स्वयंपाक शिक-

विणे चाले. मला स्वयंपाक चांगला येत होता– पण तो देशावरचा. एकदा मामंजींनी मला सांगितले, " आमटीला जिवंत फोडणी दे ! "

" जिवंत फोडणी कशी द्यावयाची ? "

" पळी तापवून. "

मी पळी तापवून नेहमीप्रमाणे फोडणी देऊ लागले. तो मामंजी संतापले.

" तू दगड झाली असतीस तर तुझा पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता ! "

" कोणास ठाऊक पायखान्याच्या पायरीला उपयोग झाला असता का देवाच्या मूर्तीला उपयोग झाला असता ? " मात्र माझे हे म्हणणे मनातल्या मनात होते.

मामंजींनी सांगितले, तेलाचा जाळ झाल्यावर फोडणी द्यायची. मी जाळ करण्यासाठी जळते लाकूड उचलून पळीवर धरले ! अर्थात पुढे जाळ चांगलाच झाला, व त्याबरोबर मामंजीही चांगलेच कडकडले !

एक तर कोकणी पदार्थ आमच्या देशावरील पदार्थांहून निराळे. दुसरे, त्यांची नावे विलक्षण, व तिसरे मामंजींचे उपरोधिक बोलणे. त्यामुळे माझी फारच त्रेधा उडे.

एकदा मामंजींनी मला 'आयती' करायला सांगितले. मला वाटले, मी आयती बसून खाते, असे म्हणण्याचा तर काही मामंजींचा हेतू नाही ? एकदा त्यांनी सांगितले, पेजबुड्या भात कर. मी पाणबुड्या हा शब्द ऐकला होता– पण पेजबुड्या म्हणजे काय, हे मला कळेना. शेवटी मला एक गुरू भेटला. विहिरीजवळ एक बिऱ्हाड होते. तेथे गंगाबाई नावाची एक माऊली होती. मामंजींनी काही सांगितले की मी कळशी घेऊन पाणी आणायला पळे व पाणी काढता काढता खिडकीतून गंगाबाईंना हळूच विचारी. गंगाकाकूही मला सारे समजून सांगत. " पेजबुड्या भात म्हणजे काय हो काकू ? "

" अग, पुष्कळ पाणी भातात घाल, म्हणजे झाला पेजबुड्या भात ! "

मी हसत हसत घरी आले व मामंजींना पाहिजे होता तसा पेजबुड्या भात शिजवून त्यांना वाढला. मग त्यांनी काही तरी विचित्र

पदार्थ करायला सांगावे व गंगाकाकूच्या सांगीप्रमाणे मी सरळपणे– जसे काही मला बाळपणापासून ते ठाऊकच आहे असे– ते करून टाकावे.

आता मामंजींना संशय येऊ लागला व त्यांनी माझ्या यशाची गुरुकिल्ली शोधून काढली. मामंजींचे व जोश्यांचे फार चांगले होते, पण माझ्यावरून ते बिनसले. गंगाकाकू मला शिकवितात् हे त्यांना खपेना. त्यांनी एक दिवस जोश्यांना सांगितले की, "माझ्या सुनेला तुमच्याकडे येऊ देत जाऊ नका."

त्यांनी उत्तर केले, "ते काही आमच्याने होणार नाही. तुम्ही पाहिजे तर तिच्या पायाला दोरी बांधून ठेवा."

अर्थात ते बोलणे तेवढ्यावरच राहिले; कारण माझ्या पायाला दोरी बांधून ठेवणे मामंजींना बरे वाटले नाही. त्यांनी जोश्यांचाच नाद सोडून दिला.

टिळकांनी येथेही एक शाळा काढली. ते आता ह्या कामात फार तरबेज झाले होते. इंग्रजी शिकविण्यात तर त्यांचा हातखंडा असे. त्यांच्या शाळेचे असे असे, की विद्यार्थी म्हणजे त्यांचे दोस्त, बंधू. त्यांची शाळा म्हणजे आताच्या शाळांसारखी पगारी शाळा नसे. त्यांचे आपल्या विद्यार्थ्यांवर मुलासारखे प्रेम असे व विद्यार्थी त्यांना वडिलांसारखा मान देत. फीही चांगली मिळे. शिक्षणक्रम त्यांचा स्वतःचा असे. सुसंस्कृत करणे हा त्यांचा हेतू असे. शिक्षण नसले तरी सुसंस्कृतता त्यांच्या नुसत्या सहवासाने अंगी येत असे. असो. अशा तऱ्हेची शाळा त्यांनी येथेही स्थापिली व तीही नेहमीप्रमाणे जोरात सुरू झाली.

दुपारची जेवणीखाणी झाली की टिळक शाळेत जात व मामंजींच्या शतपावल्या सुरू होत. शाळा देवळात भरत असे. देऊळ व घर एकमेकांना लागून होती. त्यांच्या शतपावल्या म्हणजे देवळातून स्वयंपाकघरात व स्वयंपाकघरातून देवळात असत. ह्या वेळी त्यांचे सारे लक्ष माझ्या हाल-चालींवर असायचे.

माझा जन्म जसा काही खाण्यासाठीच झालेला! मला मामंजींच्या बारीकसारीक आज्ञांची आठवण राहत नसे. पुरुषांची जेवणी झाली की मी उष्टीखरकटी काढून शेणगोळा भांड्यांजवळ ठेवून हात धुई; मग स्वतःचे वाढून घेई. एक-दोन घास तोंडात पडेपर्यंत मामंजी

कधी काही बोलत नसत. पण ते पडले, की त्यांनी म्हणावे,

" लक्षुंबाई, शेणगोळा येथे भांड्यांजवळ पडला आहे. तेवढा दूर फेकून या पाहू."

की मी जेवण दूर सारून शेणगोळा टाकून यावे. मामंजींचे नेहमी सांगणे, की शेणगोळा भांड्यांजवळ टाकू नका. पण मी ते नेहमी विसरे. पुन्हा जेवायला येऊन बसले की हळूच त्यांनी म्हणावे,

" लक्षुंबाई, तुळशीला पाणी घातले का ?" की मी पुन्हा उठावे. हे काम रोज विसरे व रोज मला जेवताना त्यासाठी उठावे लागे.

" तुम्हाला जेवणाची कशी आठवण राहते ? जेवला नाही तर मराल का ? आणि मेलात तर तुमच्यावाचून जग ओस पडेल का ?"

हा दिवसाचा कार्यक्रम. रात्रीचाही कार्यक्रम होताच. मामंजींनी सांगावे,

" लक्षुंबाई, तुम्ही जेवायला बसायच्या आधी माझा बिछाना घालून ठेवा, टिनपाटात पाणी ओतून ठेवा. विसरू नका बरं."

रात्रीची जेवणे फार उशिरा होत. मला लागे भूक. बिछाना आधी टाकावा तर मंडळी नेहमी बसलेली असावयाची. मग टाकावा तर ओवळे नेसून तो टाकायचा व पुन्हा सोवळे नेसून जेवावयास बसायचे हा त्रास. जेवूनच मग करावे बिछान्याचे काम, असे म्हटले, की ते नेहमीच अंगावर उलटे. कारण दोन घास तोंडात पडताच मामंजींनी नेमके म्हणावे,

" लक्षुंबाई, माझा बिछाना घाला पाहू !" की उठल्याच लक्षुंबाई. ओवळे नेसावे, बिछाना घालावा व पुन्हा सोवळ्याने जेवायला बसावे !

## ८ : सासुरवास

एकदा मी स्वयंपाक करायला बसले असता काही विद्यार्थी आले व म्हणाले,

" अहो वहिनी वहिनी, नानांचा नि तुमचा दादा बारावा-तेरावा घालीत आहेत ना तिकडे ! "

मी आपली तडक उठून काय प्रकार आहे तो पाहण्यास देवळात गेले तो काय ! माडीवरून मामंजी एक एक उपकरणे खाली फेकीत होते. उपकरणे थेट रामाच्या सभामंडपात येऊन पडे. प्रत्येक फेकीच्या वेळी त्यांचा मंत्रघोष व्हायचा–

" माझी सून मेली ! तिचा आज बारावा आहे. माझा मुलगा मेला ! त्याला तिलांजली देतो."

झाले होते काय, की उपकरण्यांना डाग पडले होते. उपकरणी होती तांब्याची, पाणी विहिरीचे, राख लाकडाची व दिवस पावसाचे, ह्यामुळे मी ती कितीही लख्ख घासली तरी त्यांच्यावर ढग येत.

मी माडीवर गेले. तेथेच शाळेच्या एका कोपऱ्यात मामंजींनी आपले देव मांडले होते. मी वर जाऊन सारी उपकरणी गोळा केली. मामंजी माझ्या मागे आले.

" तू ही भांडी घासली होतीस ?"

" हो ! "

" वाहा माझी शपथ ! "

" तुमची शपथ, मी घासली."

" मी मेलो तर तुला काय रडू येणार आहे ? धर मंगळसूत्र हातात, नि वाहा शपथ ! "

मी मंगळसूत्र हातात धरून शपथ वाहिली. कर नाही तर मला डर कसली आली ?

" थांब. मी बायकांची सभा बोलवितो व तीत ही भांडी ठेवून त्यांची मते विचारतो. त्या घालतील चांगले शेण तोंडात ! "

पण माझी खात्री होती, की बायकांनी काही माझ्या तोंडात शेण घातले नसते.

" धर माझे पाय आणि वहा शपथ. पहा, जळून भस्म होशील पायांना हात लावलास तर ! "

मी त्यांच्या पायांवर हात ठेवू लागले, तसे ते मागे मागे सरकू

लागले.

" पाहा, विनाकारण जळून जाशील. "

" काही हरकत नाही. तुमच्या पायांजवळ मरण आले तर काही वाईट नाही. "

शेवटी मी पालथी पडले व त्यांचे पाय गच्च धरले. मी काही जळून मेले नाही. मोठी निराशा झाली माझी. एकदाची मरून गेले असते तर बरे झाले असते, असे मलाही झाले होते. पण मामंजींची तेवढी तपश्चर्या नव्हती म्हणा, किंवा मी उपकरणी खरोखरच घासली होती म्हणा, मी त्या दिवशी जळाले काही नाही !

एकदा मामंजींनी टिळकांना जवळ बोलावून म्हटले,

" नाना, तू दुसरी बायको कर ! मी तुला कोकणातून दहा मुली आणून देतो. "

टिळक म्हणाले,

" मला एकीचेच पोट भरता भरता मारामार पडते तर दुसरी कशाला ? "

" तिला तू तिच्या माहेरी टाकून दे. "

" मी तसे कधीच करणार नाही. माझा संसार नाही झाला तरी असले कृत्य माझ्या हातून कदापि घडणार नाही. "

टिळकांचे माझ्यावर किती प्रेम होते ते वरील संभाषणावरून व खाली दिलेल्या गोष्टीवरून त्याच वेळेस चांगले निदर्शनास आले.

म्हणजे समोरच्या विहिरीचे पाणी आटले. रानात विहीर होती तेथे पाण्याला जावे लागे. तेथे दिवसा अतोनात गर्दी होई. मामंजींनी सांगितले, रात्री जाऊन पाणी आणीत जा. मला अंधाराचे भय वाटे. पण त्यांना त्याचे कधीच काही वाटत नसे. त्यांनी मला सांगितले, " तुला जर कोणी खायला आले, तर त्याला सांग, माझा सासरा देवळात बसला आहे, त्याला आधी खाऊन ये अन् मग मला खा. "

पण टिळकांनी मला सांगितले, " भिऊ नको. मी पाणी आणीन."

आणखी रात्र झाली म्हणजे खरोखरच त्यांनी पुढल्या दारून फिरायला म्हणून निघावे व मी मागल्या दारून पाण्याला निघावे. नंतर

मी घराच्या आसपास थांबून त्यांनी विहिरीवरून भरून आणलेले पाणी घरात आणून साठवावे ! मामंजींना वाटावे की, सून काय विश्वासाने पाणी भरीत आहे !

एकदा मी मामंजींची पिकदाणी धूत होते. मला किळस येऊन मी थुंकले. मामंजींच्या तीक्ष्ण नजरेतून ते सुटले नाही. संध्याकाळी फार गोड बोलून त्यांनी मला सांगितले, " लक्ष्मी, तुझे पाणी प्यायचे भांडे मला फार आवडते, तेच ठेव माझ्या उशाशी ! "

मी रोज माझे भांडे त्यांच्या उशाशी ठेवू लागले.

एक दिवस भांडी घासणारीण सांगू लागली की, बाई, " तुमच्या भांड्याचा दादा पिकदाणीसारखा उपयोग करतात !

मला ते खरे वाटेना. दुसऱ्या दिवशी बाईने मला प्रत्यक्षच दाखविले. तेव्हा माझ्या डोक्यात सर्व लख्ख प्रकाश पडला. नंतर मी तेच भांडे त्यांच्या देवपूजेला ठेवू लागले. ते ते दूर ठेवू लागले.

मामंजी मला वर दिल्याप्रमाणे छळीत; पण दोन गोष्टींबद्दल मला त्यांचे गुण घ्यावेसे वाटतात. एक म्हणजे मला त्यांनी कधी अपशब्द वापरले नाहीत व कधी अंगाला बोट लावले नाही. तसे ते एखाद्या वेळी माझी इतरांजवळ वाखाणणीही करीत. एकदा त्यांनी कोणालासे जेवायला बोलाविले. सारा स्वयंपाक त्यांनीच आपल्या हातांनी केला होता. मलाही त्यांचे आश्चर्य वाटले ! थोड्या वेळाने पाहुणे आले. त्या दोघांना मी वाढले. पाहुण्यांना मामंजींनी विचारले,

" स्वयंपाक कसा झाला आहे ? "

" वा ! फार उत्तम ! स्वैपाकाचे काय विचारता ! "

" नाही, आमच्या सूनबाईंनी केला म्हणून मुद्दाम विचारतो ! "

पाहुणे उत्तम स्वयंपाक झाला म्हणून खूष झाले व मी मामंजींच्या वर्तनामुळे आश्चर्यचकित झाले.

मात्र हे एखाद्या वेळीच. त्यांच्याजवळ काही मागितले तर त्यांचा फार संताप होई. तेल, शिकेकाई मला कधी मिळाली नाही. ती मागायला गेले की त्यांनी म्हणावे, मोलाची दळणी दळ आणि आण तेल, शिके-

स्मृ... ४

काई. मी आपली मातीने डोके धुवावे. त्यातही एखाद्या वेळेस न्हायला बसले की माझ्यापुढचे गरम पाणी त्यांनी उचलून न्यावे व स्वत: आंघोळीस लागावे ! मी उरलेले न्हाणे गार पाण्याने करावे. तेल-शिके-काईच्या नेहमीच्या खटक्यात ते एक गोष्ट सांगत,

" एकदा लाकडे संपली होती. माझी बायको गर्भारशी होती. तरी मी तिला लाकडे फोडायला लावली. मग तुझी काय कथा ? माझी बायको उलटून बोलत नसे. घरातले सामान संपले म्हणजे उरलेले माझ्यासमोर मुकाट्याने आणून ठेवी व त्यावरून मी समजे, सामान संपले ! पण आत्ताच्या तुम्ही पोरी फार उद्धट. वडील माणसाशी कसे वागावे हे तुम्हाला नाहीच यायचे. "

मला दर महिन्याला एकदा तीन दिवसांचा उपवास घडायचा ! मामंजी आपले अन्न आपल्यापुरते शिजवून खात. मग टिळकांच्या ध्यानात हे आले म्हणजे त्यांनी मला शिजवून वाढावे. तसेच त्या वेळेस मला अंधारात बसावे लागे. अंधाराची मला भीती वाटे; पण उपयोग काय ? पण ह्यामुळे मी हळूहळू अंधाराला भिईनाशी मात्र झाले !

टिळकांची कवी म्हणून आता प्रसिद्धी होऊ लागली. मुंबई-पुण्या-पर्यंत त्यांचे नाव ऐकू येऊ लागले. मला जरी घरात त्रास होता, तरी त्यांच्या दृष्टीने आता हे चांगले दिवस आले होते. इतक्यात त्यांना मुंबईत कोठेसे व्याख्यान देण्यासाठी आमंत्रण आले. आठ दिवसांनी येतो म्हणून टिळक मुंबईला गेले, ते तिकडेच रमले ! आठ दिवस झाले, दहा झाले, पंधरा झाले तरी पत्ता नाही की पत्र नाही !

मला फारच काळजी वाटू लागली. माझ्या डोळ्यांचे पाणी खळेना. त्यात मामंजींना त्यांनी सरदारगृहाचा पत्ता दिला होता. त्याने तर माझी पुरीच पाठ पुरविली. मामंजी म्हणत,

" आज तुझ्या नवऱ्याचे पत्र आले."

" हं. "

" त्याला सरदारगृहात धोतरं धुण्याचं काम मिळालं आहे."

" मग मी ती वाळत टाकीत जाईन. "

" तो तेथली पाने वाढतो. "

" मी उष्टी काढीन. मला तुम्ही मुंबईला नेऊन पोचवा. "

" मजजवळ पैसे नाहीत. तुला पाहिजे तर तू कशीही जा. पण मुंबई म्हणजे मुरबाड नाही. तेथे एखाद्या खड्याप्रमाणे तुझा पत्ताही लागणार नाही. "

एक दिवस मी फार रडल्ये. मामंजींना माझी दया आली. ते मजजवळ पाट टाकून बसले.

" लक्ष्मी, मला काही फार मुली नाहीत. फक्त एकच आहे. एक मेली. तू माझी दुसरी मुलगीच आहेस. जशी सखू तशी तू. रडू नको, जाऊ दे तो गेला तर. उद्या हरताळका आहे. तू संध्याकाळी दोन बायका आवरणाला बोलीव. लाडू कर. मी तुला सर्व काही सामान देतो. "

असे म्हणून त्यांनी बाजारात जाऊन बेसनाच्या लाडवाचे सर्व सामान आणून दिले. मी सर्व तयारी केली. लाडू केले. मामंजींनी लाडू तयार होताच तीन लाडू बाहेर काढून ठेवले व डबा उचलून आपल्या पेटीत ठेवला व पेटीला कुलूप लावले ! आलेल्या बायांना तीन लाडवांवर जेवणावळ घातली !

पाहुण्या बायकांजवळ मामंजींनी माझी गाऱ्हाणी करण्यास सुरुवात केली.

" लक्ष्मी चोरून खाते ! "

गंगाबाई चांगल्याच उसळल्या.

" काय चोरून खाते हो ? तुमचा तर सारा माल कुलपात असतो. काय चोरून खाते लाकडं ? अन् घासलेट पिते होय ? "

अर्थात हरताळका अशी झाली. आपण लाडू का उचलून ठेवले हे त्यांना सांगावयाचे होते ; पण त्यांनी वरील प्रस्तावना करताच बाजू त्यांच्यावरच उलटली. टिळकांच्या गैरहजेरीत घडलेली माझ्या सासुरवासातील आणखी एक गोष्ट आठवते. मामंजी शेजारचीपाजारची मुले गोळा करून त्यांना संध्याकाळच्या गोष्टी सांगत. एक दिवस ते कोठे बाहेर गेले होते. मुले जमली व त्यांनी मामंजींची दौत उपडी केली. मी शेजारी बसायला गेले होते तेथे ती धावत धावत येऊन सांगू लागली, " वहिनी, वहिनी, दादांची दौत उपडी झाली. " मी घाबरून उठले व

जाऊन सांडलेली शाई माझ्या पायांनी पुसून परत आले. माझी पावले जमिनीवर वठली.

मामंजी घरी येताच शाई सांडलेली पाहून त्यांचा मोठा संताप झाला. कोणी पोर कबूल होईना. मग त्यांनी प्रत्येकाचे पाऊल उठलेल्या पावलावर ठेवून पाहिले व शेवटी गर्जतच ते स्वयंपाकघरात आले !

" चल वर ! "

मी आज्ञेप्रमाणे वर गेले.

" ही शाई कोणी सांडली ? "

" मला नाही ठाऊक ! "

" हे पाऊल कोणाचे ? ठेव तेथे पाऊल. सांग, शाई सांडलीस की नाही ? "

" मी नाही सांडली. "

" तूच सांडलीस. ही सरकारी शाई होती. तुला ती भरून द्यावी लागेल. "

" मी कशी भरून देऊ ? "

" दळण दळ मोलाचे ! "

हे पालुपद माझ्या चांगले परिचयाचे झाले असल्याकारणाने त्याचे मला काही वाटेनासे झाले होते व तसा प्रसंगही देवाने मजवर कधी आणला नाही.

मामंजींनी दोन पत्रे लिहिली. एक टिळकांना मुंबईस व दुसरे गोविंदरावमामांना जलालपुरास.

टिळकांना लिहिले की, " तुझी बायको रात्रीची बाहेर जाते व पहाटे घरी येते. तू येऊन तिला घेऊन जा. मजवर काही जबाबदारी नाही. नाही तर आजच तिला तिलांजली दे. "

गोविंदरावमामांना लिहिले, " तुमचा जावई फार बिघडला आहे. त्याला नाही नाही ती व्यसने जडली आहेत. त्याने आपली बायको टाकून दिली आहे. तो भांग, गांजा, चरस, चंडोल ओढतो. तुम्हाला तुमच्या मुलीची गरज असेल तर तीन दिवसांत घेऊन जा, नाही तर मी तिला कोठेही सोडून देईन. "

टिळकांची माझ्याबद्दल पूर्ण खात्री होती व वडिलांचाही स्वभाव त्यांना चांगला ठाऊक होता. तेव्हा मामंजींच्या पत्राचा टिळकांवर काही परिणाम झाला नाही.

मामा आणि आत्याबाई मात्र फार घाबरली. आत्याबाई म्हणे, " जावई भांग, गांजा ओढतो हे ठीक झाले–पण चंडोल कसा ओढतो ? तो हाती कसा लागतो ? तो तर म्हणे आकाशात उडतो ! "

त्यावर मामांनी ' चंडोल म्हणजे अफू ओढतो ' म्हणून सांगितले. तेव्हा तर ती फारच घाबरली.

नाना ह्या वेळेस फार आजारी होते. त्यांचा अगदी भरंवसा नव्हता. त्यांना तसे टाकून मुलीकडे जावे, का त्यांच्याजवळ बसून मुलगी हातची गमवावी, अशा पेचात ती दोघे पडली.

## ९ : माहेरचा आधार

शेवटी मामांनी हळूच नानांना विचारले, " मनीला आणायला जाऊ का ? "

नानांनी ' जा ' म्हणताच पडत्या फळाची आज्ञा म्हणून मामा तडक मुरबाडला येण्यास निघाले.

इकडे मामंजींचे टिळकांकडे दुसरे एक पत्र जाऊन धडकले होते. पत्र दुसऱ्याकडून लिहिलेले होते. त्याचा आशय असा होता की, तुमचे वडील फार आजारी आहेत. तरी तार समजून ताबडतोब निघून या.

ह्या पत्रावर टिळकांचा मुळीच विश्वास बसला नाही. कारण दोनच दिवसांपूर्वी मागे सांगितलेले पत्र खुद्द मामंजींच्या हातचे गेलेले होते व त्यात आजाराचा वगैरे काही उल्लेख नव्हता. परंतु टिळकांच्या मनाने असे घेतले, की दादांच्या बोलण्याने कंटाळून मी जीव दिला असावा, व म्हणूनच असे हे पत्र आले असावे. तेव्हा टिळकही तातडीने

मुरबाडास येण्यास निघाले.

आता मुलगा नाही तर व्याही ह्यांपैकी कोणी तरी येऊन ही देशावरची, वाईट पायगुणाची, कोकणी स्वैपाक येत नसलेली, अशिक्षित सून आपल्याजवळून घेऊन जाईल, ह्या आनंदात मामंजी चूर होऊन गेले होते, तर तिकडे ते दोघे काळजीने हवालदिल होऊन मुरबाडचा प्रवास करीत होते.

मुरबाडला मुंबई जवळ असल्याने टिळकांचा आगगाडीचा प्रवास तावडतोब संपला. आगगाडीच्या स्टेशनवरून मुरबाड बारा-पंधरा मैल असावे. त्या वेळी हा प्रवास बैलगाडीने करावा लागत असे. पण बैलगाडीपेक्षा पायी प्रवास केल्यास आपण लौकर पोचू, असे वाटून टिळक पायीच निघाले. पावसाळ्याचे दिवस, तशात भाद्रपदाचा महिना. पण ते तडक चालू लागले. वाटेत एक भली मोठी नदी लागते (तिला पूल नव्हता) तिला पूर आलेला. टिळकांनी तिच्यात उडी टाकली व ते पोहून पैलतीराला लागले. पुढचा रस्ता सगळा वाईट. ह्या प्रवासाने त्यांना बराच त्रास झाला.

पण घरी मामंजी आपल्या मित्रमंडळींसह मोठमोठ्याने गप्पा मारीत बसले होते. टिळकांनी घरी पोचताच पहिला प्रश्न केला,

"दादा, तुम्हाला कसे वाटते ?"

"मला काय झाले आहे ? तू आपल्या बायकोला घेऊन जा. माझ्याजवळ ती नको. ती तुला बऱ्याच चहाड्या सांगेल. तर तिचे तू ऐकू नको. ती कधी माझ्याशी बोलत नाही."

आणखीही ते बोलतच होते, पण पुढे काही ऐकण्यास टिळक तेथे थांबलेच नाहीत. ते तडक आत स्वयंपाकघरात आले. मी तेथे रडत बसले होते. त्यांनी माझी समजूत काढली व आपल्याला मुंबईस काम लागले असून उद्या सकाळी आपण निघू, असे त्यांनी मला सांगितले. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. मामंजींनाही आनंद झाला, व दुसऱ्याच दिवशी आम्ही मुंबईला जाण्यास निघालो.

आम्ही मुरबाड सोडले सकाळी व त्याच दिवशी गोविंदरावमामा मुरबाडास पोचले संध्याकाळी !

मी मुरबाडास नाही असे पाहताच त्यांच्या पोटात धस्स झाले. मामंजी त्यांच्याशी धड बोलेनात. तुमची मुलगी तिच्या नवऱ्याबरोबर मुंबईला गेली, एवढे मात्र त्यांनी मामांना सांगितले. मुंबईचा आमचा पत्ता विचारला तर मला ठाऊक नाही, असे त्यांनी उत्तर दिले.

आमच्या मागोमाग मामांनी मुंबईचा रस्ता धरला. ते मुंबईस पोचले. पण मला शोधायचे कोठे ? अगदी वेड्यासारखे तीन दिवस ते रस्त्याने चाळींकडे पाहत पाहत वणवण करीत होते.

इकडे माझी स्थिती म्हणजे मोठीच गमतीची झाली होती. मुंब–ईच्या त्या पाच-पाच, सात-सात ताळी माड्या पाहून व ती ट्रॅम व ते रस्ते पाहून मी अगदीच गांगरून गेले होते. स्टेशनवर उतरल्यापासूनच मी गांगरले होते. माझी नजर माझ्या पायांकडे नव्हतीच. मी एक-सारखी इकडेतिकडे पाहत होते. घरी पोचेपर्यंत टिळकांना मला तीन-चार वेळेस रस्त्याकडे लक्ष देण्यास सांगावे लागले. घरी ! पण घर अजून नव्हतेच. आम्ही दोघे खाणावळीत उतरलो. मग दुसऱ्या दिवशी प्रार्थनासमाजाच्या जवळ कोठेतरी गिरगावात एक खोली भाड्याने ठर-विण्यात आली. मग मी व टिळकांनी आमचा संसार त्या खोलीत थाटला. घरात सामानसुमान त्यांनी आणून टाकले व मी ते लावण्याचे अंगावर घेतले. पण मुंबईच्या नवलाईने मला इतके भारून टाकले होते की, जरा काही 'झे ऽ मी' करून किंवा 'अरे प्राण्या' म्हणून कोणी ओरडले, की मी बाहेर येऊन डोकावून जात असे.

अशीच एकदा बाहेर डोके काढून रस्ता न्याहाळीत असता आ वासून वर पाहत चाललेले मामा मला दिसले ! मी मोठ्याने हाक मारली,

"मामा !"

"मने !" म्हणून खालून आश्चर्यचकित मामांनी साथ दिली.

आम्हांला दोघांना केवढा आनंद झाला म्हणून सांगू ! माझ्या-पेक्षा मामांनाच फार आनंद झाला. मुलगी आपल्याला मुकलीच, अशी त्यांची पक्की समजूत झाली होती. तीच मी मनी अशा रीतीने अचा-नक सापडले !

थोड्या वेळाने सासऱ्याजावयांच्या गाठीभेटी झाल्या. मामांना पाहून टिळकांना फार आनंद वाटला. मामांनी नाना अत्यवस्थ असल्याचे टिळकांना सांगून माझी जलालपुरास जाण्याविषयी परवानगी विचारली. अर्थात टिळक नाही म्हणणे शक्य नव्हते. दुसऱ्या दिवशी मी बोरीबंदरवर पुन्हा दाखल झाले.

मामांनी मला बायकांच्या डब्यात बसविले व प्रत्येक स्टेशनवर येऊन ते माझी चौकशी करू लागले. मी त्यांना सर्व ठीक आहे म्हणून सांगत होते, पण खरा प्रकार निराळाच होता.

सिंहस्थाचा तो शेवटला **महिना** होता. डब्यात साऱ्या भाट्या-गुजराथ्यांच्या बाया बसल्या होत्या. एकेकीचा दंड तुळईसारखा जाड ! मला कोणी बसायलाही जागा देईना. ह्या सगळ्या भाट्यांमध्ये मी एखाद्या लहानशा उंदराप्रमाणे सापडले होते. तरी मी उंदराच्या चिरचिरीप्रमाणे त्यांना मध्येच म्हणे, " स्टेशन आले म्हणजे मी स्टेशनमास्तरला सांगेन."

पण तेवढ्याने त्या थोड्याच दाद देणार ! त्यांचे आपले कोपरखळी मारण्याचे व मधूनमधून चिमटे घेण्याचे काम चालूच होते. कल्याण सोडल्यावर हळूच एका बाईचे मूल घेऊन मी खेळवू लागले. मला थोडीशी बसायला जागा मिळाली. पण हळूहळू डब्यातली सारीच मुले माझ्या अंगावर पडली ! असो, मुले खेळवीत का होईना, पण सुखरूपपणे चांगले बसून नाशिकपर्यंत पोचता आले, हे का थोडे झाले ?

स्टेशनावर उतरल्यावर गावात जाण्याला टांगेवाले पाच रुपये स्वारी मागू लागले. मामांच्याजवळ तितके पैसे नव्हते.

ते म्हणाले, " तू टांग्यात जा."

मी म्हणे, " तुम्ही जा, मी पायी येते."

असे करता करता दोघांनीही पायी जाण्याचे ठरले.

आमच्या लोकात बोलण्याचालण्याचा पोच नसतो एवढे मात्र खरे. मामा व मी दगदगीने अतिशय थकलेलो. स्टेशनवरून उन्हातान्हात सहा-सात मैल चालून नाशकास आलेलो. पुढे तसे पाहिले तर नाशकास थोडा मुक्काम करून खाऊन-पिऊन घरची गाडी बोलवून नंतर जलाल-

पूरचा पुढचा सहा मैलांचा प्रवास आम्हाला उरकायचा. पण गावात शिरताच उपाध्याय भेटले. त्यांनी खाली दिल्याप्रमाणे प्रताप केला.

" का गोविंदरावमामा, कोठे गेला होता ?"

" मनूला आणायला."

" किती दिवस झाले ?"

" चार."

" मग नाना गोखले वारले तेव्हा तुम्ही तेथे नव्हता वाटते ?"

हे ऐकल्याबरोबर आम्हा दोघांनाही अतिशय वाईट वाटले. आता खाणेपिणे नि विसावा कसला ! आम्ही तडक पायीच जलालपूरला जाण्याकरिता निघालो.

नानांनी जरी मला कधी प्रेमाने कुरवाळले नसले तरी मला त्यांच्या मृत्यूने अतोनात दुःख झाले. माझी आई मला माझ्या वयाच्या बाराव्या वर्षीच सोडून गेलेली. ते सारे आठवले.

जव्हारीस आई वारली. मी तिच्याबरोबर होते. जाताना वाटेने मोखाड्यास आमचा मुक्काम झाला होता. आईने शेजाऱ्यापाजाऱ्यांना विचारून सासूबाई वारल्या ते घर पाहून घेतले होते. मग आम्ही पुढे गेलो होतो. तेथून सातच कोस जव्हारी. आपल्या गतविहिणीचे मृत्यूचे ठिकाण पाहून घेतल्यावर बरोबर बाराच दिवसांनी त्याच तापाने म्हणजे विषमाने आईचा अंत झालेला. दोन्हीही दुःखी जीव सौभाग्य-पणी इहलोक सोडून गेले मला साऱ्यांच्याच आठवणी येऊन रडायला येत असे.

## १० : काव्यगायन

मी येण्याच्या आधी एकदा मामंजी मुंबईस येऊन गेले होते. त्यांनी जाताना टिळकांजवळून चाळीस रुपये नेले होते. म्हणजे आधीच

उल्हास त्यातून– तशातली गत झाली. टिळकांना ह्या वेळेस रा. मोरोपंत वाळवेकरांच्या छापखान्यात नोकरी लागली होती व रा. वाळवेकरांचे टिळकांवर फार प्रेम असे. मामंजींनी चाळीस रुपये नेल्यामुळे आमची फारच अडचण झाली होती. आमची अडचण पाहून रावसाहेबांनी आम्हा दोघांनाही आपल्या घरी पाहुण्यासारखे ठेवले. येथेच टिळकांनी आपले 'आनंदराव' नावाचे नाटक लिहिले व ते छापलेही होते.

माझ्या बहिणीचे पती नानानासाहेब पेंडसे. बहीण भिकूताई. हिच्या-माझ्या वयात जवळजवळ पंधरा-सोळा वर्षांचे अंतर होते. हिचे माझ्यावर आईसारखे प्रेम होते. तसेच भिकूताईचे मजवर जेवढे प्रेम होते तेवढेच नानासाहेबांचे टिळकांवर होते.

नानासाहेब ह्या वेळेस करमाळ्याला मामलेदार होते. त्यांना घारूमाई नावाची एकुलती एक मुलगी होती. घारूमाई मला सख्ख्या बहिणीसारखी वाटे. आमचा दोघींचा एकमेकींकडे फारच ओढा असे.

आम्ही मुंबईस असताना घारूमाईचे लग्न निघाले. नानासाहेबांच्या घरचे हे पहिले व शेवटले कार्य. त्यात साऱ्यांना अतिशय हौस व पैसाही मुबलक, तेव्हा ते कार्य अगदी थाटात होणार हे ठरलेले. नानासाहेबांचे पुतणे बाळासाहेब पेंडसे हे मुंबईस असत. लग्नाला यावे असे पेंडशांचे टिळकांना फार आग्रहाचे पत्र आले. टिळकांनी मला सांगितले, "तू तयारी कर. संध्याकाळी बाळा येईल त्याच्याबरोबर तुला करमाळ्याला घारूच्या लग्नाला जायचे आहे."

इतके सांगून टिळक गेले बाहेर ! मी तयारी कसली करणार ? बहिणीच्या घरचे हे पहिले कार्य. भाची माझी एवढी आवडती. तिच्या लग्नाला नुसते हात हलवीत कसे जायचे ? मी लंकेची पार्वती व टिळक कफल्लक शंकर. शंकर-पार्वतीच्या चरित्रांतील अशाच एका प्रसंगाची आठवण होऊन मला हसूही आले व रडूही आले.

इतक्यात कापडाचे नमुने घेऊन एक माणूस आला. टिळकांनीच त्याला पाठवून दिले होते. कोणते कोणते कापड खरेदी करायचे हे मी ठरवून बसले; पण ते घेणार कसे ? अगदी संध्याकाळ होईपर्यंत टिळक

परत आले नाहीत, कापडवाला मात्र कंटाळून परत गेला.

टिळक आले ते बाळासाहेबांना घेऊनच. बाळासाहेब निघण्याची घाई करू लागले. त्यांच्या देखत मला पैशासंबंधी काही बोलता येईना. कापड घेतले नव्हते तर नव्हते, पण काही पैसे तरी बरोबर ! शेवटी नुसते टिळकांनाच ऐकू जाईल अशा बेताने मी म्हटले,

" मला काही--"

" तू काही काळजी करू नको. मी बाळाला सर्व सांगून ठेवले आहे. तुला जे काही लागेल ते त्याच्याजवळून मागून घे."

टिळकांनी माझ्या हळू प्रश्नाला मोठ्याने उत्तर दिले. त्यावर बाळासाहेब म्हणाले, " तू आता उशीर करून गाडी चुकवू नको. काय आहे, नाही, याची आपण पुढे चौकशी करू. तू आटप लौकर कशी !"

वऱ्हाड पंधरा दिवसांपासून जमू लागले होते. स्टेशनवर शिपाई व फराळाची व्यवस्थाही ठेवलेली होती. गाडी पोचताच शिपायाने विचारले, " मनुताई आल्या का ?"

नानासाहेबांची बहीण फराळाजवळ होती. तिने म्हटले,

" आल्या आहेत. मनुताई आल्या आहेत, फनुताई आल्या आहेत-सगळ्या आल्या आहेत."

गोदूताईला वाटले होते की, पहा, आपला कोणी तपास केला नाही, पण भिकूताईच्या बहिणीचा तपास केला. खरे पाहिले तर गडी गोदूताईच्याच लांबून येणार असलेल्या एका चुलतबहिणीचा तपास करीत होता. ह्या चुलतबहिणीला भेटून नानासाहेबांना बारा वर्षे झाली होती, तेव्हा एकमेकांची तोंडे एकदम प्रत्यक्ष न पाहता मारुतीच्या देवळात जाऊन काशाच्या भांड्यात तेल घालून मध्ये पडदा धरून त्या तेलात प्रथम एकमेकांना बघून मग घरी जावयाचे असे काही शास्त्र होते ! म्हणून त्या मनुताईची चौकशी गडी करीत होता.

मला मात्र गोदूताईच्या बोलण्याचे अतिशय वाईट वाटले. आपण गरीब, ज्याने त्याने आपला अपमान करावा हे ठरलेलेच, असे मला वाटले.

करमाळ्यास जाऊन पोचल्यावर पाहते तो जे ते आपल्याच

कामात गुंग व आपल्याच विचारात गर्क. निदान मला तरी तसा भास होत होता. आधी स्टेशनवरच गोदूताईचे "मनुताई फनुताई" शब्द ऐकले होते; त्यात इतकी लांबून आलेली मी, पण माझी कोणी वास्तपूस्तही केली नाही.

सर्व मंडळींबरोबर मी जेवले व वऱ्हाडणींमध्येच घारूमाईला पोटाशी धरून निजले. 'मी गरीब, म्हणून माझा असा अपमान होतो. बहीणसुद्धा माझ्याशी बोलायला राजी नाही. कारण ती श्रीमंताची बायको! ती मामलेदारीण! ती कशाला माझ्याशी बोलेल? माझ्या अंगावर गोठ व तोडे असते तर सर्वांनी मला विचारले असते,' हे विचार एकीकडे डोक्यात घोळवीत व एकीकडे **मुळूमुळू** रडत मी अकरा-बारापर्यंत अंथरुणावर पडले होते.

मध्यरात्रीच्या सुमारास हातात बत्ती घेऊन भिकूताई प्रत्येक वऱ्हाडणीचे तोंड पाहत पाहत मजजवळ आली. तिने माझ्या अंगावर हात ठेवला व थोडा वेळ ती तशीच बसली. मी जागीच होते, पण मला झोप लागली आहे असे वाटून तिने हळूच मला हाका मारावयास सुरुवात केली.

मी एकदम तिचा हात झिडकारून टाकला व म्हटले, "मी तुझी बहीण नाही! तू कशाला आलीस? माझ्या अंगावर गोठतोडे थोडेच आहेत?"

भिकूताईला गहिवरून आले. ती म्हणाली, "मने, अग वेडे, तू मला गोठतोड्यांहून अधिक मोलाची नाहीस का? नाना-आई वारल्यापासून आज दोन-तीन वर्षांत प्रथमच तू मला भेटते आहेस. मला कसे तुझ्याशी बोलवेल? काम टाकून पाहुण्यांसमोर मी तुझ्याबरोबर रडत बसले तर ते करणे मला शोभेल का? मला ते काय म्हणतील?"

भिकूताईचे हे बोलणे ऐकून मला जरा बरे वाटले. दुसऱ्या दिवशी भिकूताईने आपल्या अंगावरचे सर्व दागिने काढून माझ्या अंगावर घातले. मला एक मोठे लुगडे नेसायला दिले. चार दिवसांत लग्नसोहळा खूप थाटात झाला. मीही नंतर ते चार दिवस आनंदात काढले. आता मुलीला पाठीराखी म्हणून मलाच पाठवायचे असे भिकूताईच्या मनात होते. तिने

नानासाहेबांजवळ गोष्ट काढली. 'मनीला आता दोन महिने तरी ठेवून घ्या.' पण नानासाहेबांनी आजच्या आज मला पाठवून देण्याचा आग्रह धरला.

"धारूबरोबर दुसरे कोणी जाईल. आज मनीला सोबत आहे. तेव्हा जाऊ द्या तिला."

भिकूताई म्हणे "आज तीन वर्षांनी बहीण भेटलेली. तिच्याशी धड बोलायलाही वेळ मिळाला नाही. तिला कशी जाऊ द्यावयाची ?"

शेवटी नानासाहेबांनी खरे काय ते सांगितले. "ह्या चार दिवसांत टिळकांच्या चार तारा आल्या आहेत. खुद्द लग्नाच्या दिवशी दोन तारा आल्या. मी त्या वेळी मुद्दाम त्या बाजूला ठेवल्या, पण आता तिला ठेवणे अगदी अशक्य."

अर्थात भिकूताईचे तोंड बंदच झाले व त्याच दिवशी माझी मुंबईस रवानगी झाली.

मी मुंबईस पोचले; पण टिळकांना नुसती सर्दी झालेली ! मी त्यांच्यावर खूप संतापले. मला चार दिवस बहिणीकडेही धड राहू दिले नाही. टिळकांनी माझी खूप समजूत केली व शेवटी जलालपुरास नेऊन ठेवतो, असेही ते म्हणाले. हो, नाही करता करता मी तयार झाले व माझी माहेरची 'ट्रीप' सुरू झाली. माझ्यामागे त्यांनी त्र्यंबकराव वैद्य लागवणकर ह्यांच्या मुगभाटातील चाळीत एक खोली ठरवून ठेवली. खोलीला सात रुपये भाडे होते. त्याच चाळीत बाळासाहेव पेंडसेही राहण्यास आले होते. नवीन व स्वतंत्र बिऱ्हाडाची सोय करून ते जलालपुरास मला नेण्यास आले.

टिळकांच्या बोलण्याच्या नादाच्या पुष्कळ गोष्टी सांगता येतील व मधूनमधून त्या येतीलही. परंतु नाशिक रोड स्टेशनवर जो एक प्रसंग त्या सुमारास घडला तो काही अजून माझ्या मनातून पुसून गेला नाही.

जलालपुराहून आमचा लक्ष्मीनारायणाचा जोडा निघाला. आता खरोखरच नवा व सुंदर संसार स्वतंत्र रीतीने आम्हाला थाटावयाचा होता. मी माहेराहून माझ्या नव्या संसारासाठी घेता येईल तेवढे सामान घेण्याचा प्रयत्न करीत होते, तर टिळकांचा, प्रवासात सामान घेण्याचा

तिटकारा त्याला आडवा येत होता. तरी मी भाजीपाला व फळफळा-वळ घेता येईल तितकी घेतलीच. जलालपुराहून आम्ही नाशिकला आलो. तेथें टिळकांची अलोट मित्रसंपत्ती होती. त्या संपत्तीत लोळण्यात टिळकांनी दोनदा गाडी चुकविली. आता मात्र तिसऱ्यांदा गाडी चुकू द्यावयाची नाही, असा निश्चय करून आम्ही दुसऱ्या दिवशी नाशिक गाव सोडून नाशिक रोड स्टेशनवर येऊन पोचलो. अगदी प्लॅटफॉर्मवर आलो. आता माझ्या जिवात जीव आला. टिळकांनी हमालाबरोबर सामान देऊन मला पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर पाठवून दिले व आपण तिकीट-ऑफिसपुढील गर्दीत दिसेनासे झाले. मी सारे सामान व्यवस्थित मांडून गाडी येताच आत चटकन शिरण्याच्या तयारीने उभी राहिले. गाडी आली. हमालाने सामान आत ठेवले. मी आत जाऊन बसले. गाडीने शिटी फुंकली, मी भराभर सामान बाहेर फेकून देऊन खाली उडी टाकली. कारण टिळकांचा पत्ता नव्हता. समोरून गाडी पाहता पाहता निघून गेली, तेव्हा पलीकडच्या प्लॅट-फॉर्मवर टिळक कोणाशी वादविवाद करण्यात गर्क झालेले दिसले ! गाडी गेली तरी तिकीट द्या असे टिळक म्हणाले नाहीत. मी आपली भिरीभिरी पाहत उभी राहिले.

इतक्यात टिळकांना स्टेशनवर त्यांचे बाळमित्र भिकाजीपंत गोऱ्हे हे भेटले. ते तेथेच राहत असत. ते येऊन त्यांना घरी चलण्याचा आग्रह करू लागले, तेव्हा कोठे टिळकांना माझी आठवण झाली. मग भिका-जीपंतांनी हमाल करून आमचे सामान घरी नेले व आम्हीही त्यांच्या बरोबर गेलो.

मला बरोबर घेतलेल्या भाजीपाल्याची व फळफळावळीची काळजी वाटू लागली. पण अशा काळज्या दूर करण्यात टिळक फार पटाईत असल्याने त्यांनी चटकन ती दूर केली. त्यांनी भाजी वाटून टाकण्याचा सपाटा लावला ! माझ्या धूर्तपणानेच त्यातील अर्धी भाजी वाचली.

दुसऱ्या दिवशी नक्की जाण्याचे ठरले. सामानसुमानाची नीट बांधाबांधी पुन्हा झाली, तरी अगदी निघेपर्यंत गाडीत दोघांनीही

पाय ठेवीपर्यंत शाश्वती नव्हती. ते आपले बोलतच होते. जेवण इतके घाईघाईने उरकून घ्यावे लागले की मला खाणावळीची आठवण झाली.

एकदाचे आम्ही निघालो. एकदोन स्टेशने सुखरूपपणे पोचलो नाही तोच टिळकांचे लक्ष भाजीपाल्याकडे वळले. फळफळावळ त्यांनी सारी डब्यातच वाटून टाकली व भाजीपाला खिडकीतून बाहेर एकएक, एकएक सरळ फेकून दिला ! काय सामानाचा अटाट तुला, वगैरे तोंडाने चाललेच होते. बायकांना माहेरची काडी माडीहून अधिक प्रिय असते. पिशव्यांतून मी काही डाळ-तांदूळ वगैरे सामान घेतले होते त्याने तेवढे बोरीबंदर स्टेशन पाहिले.

'मुंबईत आईबापांखेरीज सारे मिळते' हे त्यांचे मला सांगणे होते. आम्ही नवीन घरी आलो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मुंबईस पोचताक्षणीच त्यांचे बंधू सखारामभाऊजी येथेच आमची वाट पाहत असलेले आढळले. सामान गेल्याबद्दल मन खट्टू झाले होते, तरी घरात डाळीचे पीठ व तांदूळ सापडले. तेवढ्यावरच मी आमची नवीन घरातील पहिली मेजवानी केली.

वाढायला घेतले, इतक्यात टिळक म्हणाले, "सखाराम, मुकटा नेस. मी आत्ता शौचास जाऊन येतो."

टिळक गेले ! भाऊजी सोवळ्यात त्यांची वाट पाहत बसले. मी वाढलेला भात पुन्हा तपेलीत भरला. आठ वाजले, साडेआठ वाजले— टिळकांचा पत्ता नाही. भाऊजींनी इकडेतिकडे शोध केला. शेवटी ओवळे नेसून गावात टिळकांच्या जेथे जेथे ओळखी होत्या तेथे तेथे ते जाऊन आले व शेवटी घरी येऊन निराशेने भुकेने व्याकुळ होऊन भावाची वाट पाहत बसले.

आम्ही दोघे गुपचूप बसून राहिलो होतो. इतक्यात खालच्या मजल्यावरील जिन्याजवळच्या खोलीतून टिळक कविता म्हणत आहेत असा भास आम्हाला झाला. सखारामभाऊजी खाली जाऊन पाहतात तो तिथे काव्यगानाला पूर आलेला !

"किती मूर्ख आहेस सखाराम तू ! अरे, मी का पळून गेलो होतो कोठे ? इतके घाबरण्याचे कारण काय होते ? तू जेवायचे सोडून उगीच

माझा तपास करीत बसलास. आमचा विषय कोण बहारीचा चालला आहे, अन् यात तू आलास. थांब जरा आता."

आणि झाला विषय पुढे सुरू. भाऊजी तेथेच तोंड वेडेवाकडे करून टिळकांचा अपुरा राहिलेला विषय ऐकत बसले.

संध्याकाळी सात वाजता मांडलेल्या पानांवरून अशा रीतीने रात्री बाराला मंडळी जेवून उठली.

## ११ : नथीतील मोती

टिळकांचा वाटेल त्या इसमावर विश्वास बसे. अगदी एखादा अट्टल चोर असला व त्याने येऊन टिळकांना सांगितले, की मी साव आहे की ते ताबडतोब तेवढ्यावरच तो साव आहे म्हणून विश्वास ठेवीत व जगाशीही त्याच्यासंबंधी हुज्जत घालण्यास कमी करीत नसत. मनुष्यप्राणी हा जात्या दुष्ट नाही, परिस्थिती त्याला दुष्ट बनवीत असते, असे त्यांचे म्हणणे होते. डेक्कन क्वीनचे ब्रेक इतर गाड्यांहून विशेष बळकट असावेत, कारण तिला वेगही तसा येतो. तद्वत टिळकांच्या या सद्‌गुणाला त्यांच्याच सहवासामुळे माझ्या संशयी वृत्तीचा ब्रेक उत्पन्न झाला होता. त्यांचा एखाद्या माणसावर विश्वास बसला की माझा हटकून त्याच्यावर अविश्वास ठेवलेला ! ह्यावरून आमचे नेहमी खटके उडावयाचे. ह्या कित्येक गोष्टी क्रमाने हळूहळू येतीलच. परंतु मुंबईची सोनाराची गोष्ट येथे सांगते.

माझी नथ मोडली होती. टिळकांनी ताबडतोब सोनार बोलावून आणला व त्याला मोती मोजून देऊन नथ गुंफून आणण्यास सांगितले. मी म्हटले, सोन्याची तार करून आणण्याला सांगा त्याला. नथ तो आपल्या देखत गुंफील. त्यावरून आमचा चांगलाच खटका उडाला.

त्यांनी माझे न ऐकता सोनाराला सोळा मोती मोजून देऊन वाटेला लावले. तो गेल्यावर मला वर उपदेशाचे बरेच डोस दिले. नव्हे, चांगला एक टमरेलभर उपदेश पाजला पण त्याचा काही उपयोग न होऊन दोनतीन दिवस माझ्या डोळ्यांपुढची नथ व तो 'लबाड' सोनार हलेनात.

तिसऱ्या दिवशी सोनार नथ घेऊन आला. त्याने आणलेल्या नथेत सोळांच्या ऐवजी अठरा मोती होती! टिळक मला म्हणाले, 'पाहिलेस, लोकांवर विश्वास टाकावा. ह्या माणसाने पदरची दोन मोती घालून तुझी नथ नाणून दिली.'

नथेतले सगळेच मोती खोटे निघाले हे त्यांनी पुढे पुष्कळ दिवसांनी कबूल केले. पण काही दिवस तरी सोनाराने आपल्या पदरचे आणखी दोन खरे मोती आपल्या बायकोच्या नथेत घालून दिली, असा त्यांचा अगदी प्रामाणिक समज होता.

टिळक स्वभावाने अतिशय शान्त पण अतिशय रागीटही होते! ते कसे हे सांगता येणार नाही. पण ते तसे होते हे खरे. आणि राग येण्यास व जाण्यासही कारण अगदी क्षुल्लक लागे. सोंगट्या खेळताना त्यांना आलेला राग त्यांच्या पुष्कळ मित्रमंडळींच्या माहितीचा आहे.

मला एक दिवस ते म्हणाले, 'चल, सोंगट्या खेळू!' सोंगट्या खेळताना मला एक मोठा रोग जडत असे. तो म्हणजे हसणे! टिळकांच्या अंगावर डाव उलटू लागला, की मला हसू लोटायचे, आणि मी हसू लागले, की ते चिडायचे! त्या दिवशी खेळता खेळता माझी सरशी होऊ लागली. माझा हसण्याचा आजार वाढू लागला. टिळकांचा रागाचा पारा चढू लागला. तसा माझा आजारही बळावू लागला. व त्या दिवशी त्या 'आजारा' पायी खरोखरच मृत्यूशी गाठ पडण्याची वेळ आली होती. थोडक्यात बचावले.

सोंगट्या, पट, फासे थर थर कापू लागली. काहींनी खालील गटाराचा आश्रय केला. घातलेले बिछाने घरात सैरावैरा धावू लागले. सगळ्या सामानाने बंड पुकारले. जागच्या जागी काही राहिले असेल

स्मृ... ५

तर ते फक्त बायको व दिवा ! प्रकरण इतके हातघाईवर आले, की शेवटी दिव्यानेही राम म्हटले. आगपेटी केव्हाच पासोडीचा आसरा करून बिछान्याच्या ढिगारात तोंड लपवून बसली होती. तरी मला वाटत होती गंमत. मी आणखी जोराजोराने हसू लागले.

आता त्या युद्धकांडातील शेवटला भाग. जिन्याला नव्हते दार ! टिळकांनी मला अंधारात लोटले.

मी जिन्यातून ' घालीन लोटांगण वंदीन चरण ' करीत खाली तव-कडीत येऊन पडले. टिळकांचा राग मावळला व माझे हास्य पळाले. टिळक घाबऱ्या घाबऱ्या आगपेटी शोधू लागले. ती सापडेना. शेवटी अंधारातच चाचपडत ते खाली आले व मला उठवून वर घेऊन गेले. मला तो सातवा महिना होता.

स्वतःच्या असल्याच संतापीपणावर त्यांनी एक प्रहसन लिहिण्यास घेतले होते. ते अर्धवटच राहिले आहे. ते मुद्दाम येथे देते. त्यात आम-च्यामध्ये भांडणे होत, त्यातील कित्येक वाक्येची वाक्ये आलेली आहेत. पण आपण संतापतो, हे त्यांना नंतर कळे व त्याबद्दल वाईटही वाटे. आणि संताप गेल्यानंतर संतापाच्या कारणाचे यत्किंचितही किल्मिष त्यांच्या मनात राहत नसे.

खाली दिलेले अर्धवट प्रहसन टिळकांच्या एका डायरीत आहे. ते १८८७ साली लिहिलेले असावे. असे डायरीतल्या संदर्भावरून वाटते. १८८७ तच आमचा पहिला मुलगा विद्यानंद जन्मला.

## अंक पहिला

तिरसिंगराव : (" घरी येतो. पागोटे दूर फेकून देऊन धाडकन अंग टाकून देऊन खाली बसतो.) हां गाढवाच्या लेका ! पुन्हा तर असं बोल ! जीवच घेईन ! देणं झालं म्हणून काय झालं ? घेशील घेशील, घर घेशील, दार घेशील, बायको घेशील, पोर घेशील, जीव घेशील ! घे ! खुशाल घे ! पण असं बोलावंस का ? अं ! ! (जमिनीवर बुक्क्या मारतो.) (सगुणा प्रवेश करते)

सगुणा : अगबाई ! हे ग काय अरिष्ट हे ! हा इतका संताप काय करायचा ?

तिरसिंग : त्या तीनगेंडयाचा ! गाढवाचा लेक मला सतरा शब्द बोलला ! देणं झाल म्हणून काय झालं ? उद्या फेकून देईन.

सगुणा : हे ग काय बाई नवलच आपलं एकेक ! ज्याचं कर्ज आहे तो बोलेलच. म्हणून असा त्रागा करायचा की काय ? पुरे झालं आता ! अगदीच मेलं असं काय करावं ते ? चला उठा. पागोटं कुठं आहे ? (दूर फेकून दिलेलं पागोटे पाहून) आता बरीक शर्थ झाली ! हे ग काय बाई चरित्र हे ! एखाद्या पोरासोरासारखं डोकीवरचं पागोटं फेकून द्यायचं, शोभतं का हे आता ?

तिरसिंग : बस बस ! देऊ आम्ही आपलं फेकून ! तुझ्या बापाचं काय गेलं ?

सगुणा : हं ! खुशाल काढा त्राप ! त्यांनी तुमच्याशी गाठच घातली आहे— मग काय ! कोण मेला स्वभाव हा ! परवा नुक्ते दोन आणे देऊन पागोटं बांधून आणलं .

तिरसिंग : मग मग ! आम्ही काय हवं ते करू आमच्या पागोटयाचं ! फाडून टाकू ! विस्तवात टाकू ! तुला काय करायचं ?

सगुणा : काय करायचं म्हणजे ? मलाच करायचं आहे ! समजलं का ? बरं पण, आता नाही का माझं ऐकायचं ? उठा न गडे (जाऊन पागोटे उचलते) खरंच अगदी चुंबळ झाली पागोटयाची !

तिरसिंग : ए ! उगाच अशी टुरटुर लावू नको.

सगुणा : बरं, नाही लावीत.

तिरसिंग : पुढे बोलतेस का ? लाथ मारीन कमरेत ! ठाऊक नाही अजून ! हां ! !

सगुणा : बरे, नाही बोलत ! झालं ना ?

तिरसिंग : पण तू असंच का म्हणालीस ?

सगुणा : चुकले. आता क्षमा करावी.

तिरसिंग : गाढवी ! तोंड संभाळतेस का नाही ?

सगुणा : बरं, स्नानाला नाही का जायचे आता ?

तिरसिंग : चल हो चालती इथून ! आम्ही हवे तेव्हा येऊ! चल नीघ नीघ नीघ ! नीघ इथून ! दुष्टे अवदसे ! कर तोंड काळं !

सगुणा : मी हात जोडते, पदर पसरते, चला गडे आता. बाहेर एक वाजला.

तिरसिंग : काय ? तू तोंड नाही आटपीत ! घे (लाथ मारतो) – दुष्ट-खराब–××

सगुणा : (रडत घरात जाते.)

तिरसिंग : नको नको नको हा संसार, (आपलेच थोबाड आपण बडवून घेतो. इतक्यात बन्या प्रवेश करतो.)

बन्या : (खूप हसू लागतो) अग आई, ए आई, इकडे ये; ही पहा बाबा कशी गंमत करताहेत !

तिरसिंगराव : गाढवाच्या लेका !

बन्या : मी नाही काही गाढवाचा लेक ! तुमचा लेक आहे मी !

तिरसिंग : कारट्या ! माझी थट्टा? अँ ! अरे हरामखोरा– (त्याला मारतो)

बन्या : अरे मेलो मेलो. अरे धावा रे धावा ऽअग आई ग आई ! (बोंब मारतो व शेजारचे लोक धावत येतात.)

रामभट : अरे आहे काय ? तिरसिंगराव, वाहवा ! आम्ही तुम्हाला मोठे शहाणे समजत होतो. हे काय ? जीव घेता की काय पोराचा ? चला सोडा त्याला.

तिरसिंग : चल, चल थेरड्या !

## १२ : पहिला मुलगा

एक दिवस मामंजींचे पत्र आले, की मी मुंबईला येतो. तुझे नवे घर मला सापडणार नाही, तेव्हा तू बोरीबंदरवर मला नेण्यास ये.

टिळकांनी मला हे पत्र वाचून दाखविले नाही. तेव्हा अर्थात

मामंजी येणार त्याची मला दादही नव्हती. टिळक मात्र पत्र खिशात टाकून वडिलांना सामोरे जाण्याच्याऐवजी दुसरीकडे निघून गेले.

मामंजी स्टेशनवर उतरले. तेथे मुलगा नाही असे पाहून संतापले. पण करतात काय ! गोविंदरावमामांची जशी त्यांनी स्थिती केली होती, तशी आता त्यांची स्थिती झाली.

त्यांना बाळासाहेब पेंडशांचे घर अंधुक अंधुक आठवत होते. तिकडे ते कसेतरी जाऊन पोचले. तेथे पोचताच त्यांनी बाळासाहेबांशी भांडण्यास सुरुवात केली,

" तुमच्यामुळे माझा मुलगा बिघडला. "

" मी काय केले ?"

" तुम्ही नाही तर तुमच्या मावशीने त्याला स्टेशनवर येऊ दिले नाही."

" हे बघा दादा, तुम्ही येथे कसे आलात ?"

" मला हे ठिकाण माहीत होते; त्याचे घर माहीत नव्हते, म्हणून मुद्दाम त्याला स्टेशनवर मी बोलाविले होते ! "

" चला तर मी दाखवितो तुम्होला त्यांचे घर ! "

मामंजींना घेऊन बाळासाहेब आमच्या बिऱ्हाडी आले. पुढे बाळासाहेब व त्यांच्यामागे मामंजी जिना चढत होते. मामंजींच्या शिव्या मला वर ऐकू येत होत्या व ते आले हे मी शिव्यांवरूनच ओळखले.

आमच्या दोघांपुरता स्वयंपाक करून टिळकांची मी वाटच पाहत बसले होते. मामंजी येताच त्यांना जेवायला वाढले. नंतर टिळक आले. ते आल्यावर काय गहजब झाला असेल व माझा किती उद्धार झाला असेल ह्याची कल्पना करण्याचे मी वाचकांवरच सोपविते.

दुसऱ्या दिवशी गंगापूरचे एक सावकार टिळकांना भेटण्यासाठी आले. हे टिळकांचे मित्र होते. आत टिळक झोपी गेले होते. मामंजी जागे होते. सावकारांनी हाक मारली, तेव्हा मामंजींनी कोण आहे म्हणून विचारले. "आम्ही आहो गंगापूरकर" असे उत्तर मिळाले. बस ! येथेच सारे संभाषण आटोपले. मामंजींनी ह्यावर काही प्रत्युत्तर दिले नाही. ते पाहुणे बिचारे बाहेरच उभे राहून राहून कंटाळून निघून गेले. पुढे गंगापूर-

हून टिळकांना पत्र आले व सर्व प्रकार कळला. मामंजी गेले. मज-जवळ त्या वेळेस फक्त तीन रुपये होते. टिळक कसातरी खर्च करीत. त्यांना व्यवहारज्ञान कमी असा माझा समज, म्हणून मी त्यांनी आण-लेले सर्व पैसे जप्त करून मजजवळ ठेवीत असे. हा क्रम शेवटपर्यंत होता. त्यामुळे पैशांच्या भानगडी मला जन्मभर निस्तराव्या लागल्या.

असो. त्या दिवशी घरातील सर्व शिधासामग्री संपली होती. मी होते नव्हते ते सर्व पैसे टिळकांच्या हवाली केले व त्यांना सामान आण-ण्यास सांगितले.

टिळक बाजारातून आले. आले तेव्हा मोठ्या आनंदाने हसत होते. बरोबर त्यांनी त्या तीन रुपयांचे एक घड्याळ आणले होते ! माझा संतापाचा पारा फारच चढला. ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी आपल्या समोर ते घड्याळ ठेवून दिले व एक लहानसे काव्य लिहिले. त्या काव्याचे नाव 'घड्याळ काय म्हणते' असे होते. हे त्यांनी दुसऱ्या दिवशी कोणालासे नेऊन विकले व ते पैसे मला आणून दिले. किती पैसे आणले बरोबर आठवत नाही– पण वीस रुपये असावेत असे वाटते.

ह्याच सुमारास त्यांनी 'माझा ओसाड पडलेला गाव' नावाचे काव्य लिहिले. ते पुस्तकरूपाने छापून प्रसिद्ध झाले.

आपण आता बाप होणार असे टिळकांच्या ध्यानात आले तेव्हा त्यांनी मला जलालपुरास गोविंदरावांच्या घरी नेऊन पोचविले.

आत्याबाईंनी व मामांनी माझे करता येईल तितके कौतुक केले. माझे सारे डोहाळे पुरविले. परंतु मला एकसारखी टिळकांची काळजी वाटे. एक क्षणभरही मला काळजीवाचून गेला असेल असे वाटत नाही. मी नेहमी रडत बसे. गोविंदरावमामांनी म्हणावे, " मनुताई, तू कशाला रडतेस ? तुझा नवरा कोठेही असला तरी मी त्याला शोधून आणीन. तू काही काळजी करू नको."

सहा महिनेपर्यंत टिळकांचा काही पत्ता नव्हता, की पत्र नव्हते. त्या काळात ते कोठे दडी मारून बसले होते काही ठाऊक नाही.

आमच्या ह्या काळजीतल्या दिवसांत मामांना व आत्याबाईंना अत्यानंददायक गोष्ट घडली. त्यांना नातू झाला.

गोविंदरावमामांच्या आईचे नाव सखूबाई होते. तिचे नाव मुलाला द्यावे असे मामांना वाटत होते व त्यांनी मुलाचे नाव सखाराम ठेवले. परंतु सखारामभाऊजींमुळे पुढे ते बदलून टिळकांच्या इच्छेप्रमाणे विद्यानंद असे ठेवण्यात आले. ह्याच सुमाराला आपण कोकणात असल्याचे टिळकांकडून पत्र आले. नंतर तेच स्वत: आले. विद्यानंदाला बरे वाटत नव्हते, म्हणून त्याला घेऊन आम्ही नाशकास नानासाहेब पेंडशांच्या घरी आलो. चांगले औषधपाणी मिळाल्यावर मुलगा खडखडीत बरा झाला. मामाही आमच्याबरोबर नाशकास आले होते.

ह्या सुमारास नाशिक, नागपूर, मुंबई वगैरे ठिकाणी वक्तृत्व-समारंभ होत असत. उत्तम वक्त्यांना रोख रुपयांची बक्षिसे मिळत. टिळकांना व्याख्याने देण्याचा फार नाद व असल्या समारंभात भाग घेऊन ते बहुतेक नेहमीच बक्षिसे मिळवीत. नागपुरास वक्तृत्वसमारंभ होता. नागपुरास जाण्याची गोष्ट टिळकांनी आपल्या सासऱ्याजवळ काढली. टिळक काही पैसे आणतील, अशा आशेने मामांनी त्यांना जाऊ दिले. हे परत तरी येतात की गुंततात तिकडेच, असे मला भय पडले. पण टिळक ताबडतोब परत आले. बक्षिसाच्या सर्व पैशांची विल्हेवाट लावून, येताना एक मोठे तबक मात्र ते घेऊन आले होते.

टिळक हात हलवीत परत आलेले पाहून गोविंदरावमामांना फार राग आला. ते म्हणाले,

" आम्ही आता तुमच्या बायको–मुलाला सांभाळणार नाही. तुम्ही तिला वडी ठेवा नाही तर पिंपळी ठेवा– मला तिची जरुरी नाही."

टिळक म्हणाले, " ठीक आहे. मी सर्व पाहून घेईन. तुम्ही काही काळजी करू नका. "

गोविंदरावमामा गेले जलालपुरास निघून. आणि टिळक माझी व्यवस्था पाहणार !

आमचे बिऱ्हाड कोठूनही हलले की ते बिऱ्हाड म्हणजे आम्ही माणसेच तेवढी हलत असू. सामानसुमान तिथल्या तिथे शेजाऱ्यापाजाऱ्यांना अर्पण करण्यात येत असे. आता नाशकास आमचा स्वत:चा असा एक फुटका तांब्याही आमच्याजवळ नव्हता. नानासाहेबांचे मोठे घर

होते, पण ह्याच गडबडीत त्यांची संगमनेरास बदली झाल्याचे कळले व ती मंडळी संगमनेराची बांधाबांधी करू लागली.

भिकूताईला माझी मोठी काळजी पडली. शेवटी तिने व तिच्या सासूने मलाही संगमनेरी नेण्याचे ठरविले. नानासाहेबांनी टिळकांना मोठ्या आग्रहाचे आमंत्रण केले. अशा रीतीने त्यांनी सहकुटुंब व सहपरिवार संगमनेर मुक्कामी जाण्याचे नक्की केले.

नानासाहेब पुढे गेले. बाकी आम्ही सर्व मंडळी बैलगाड्यांनी नंतर गेलो.

संगमनेरला जाण्याच्या आधी माईसाहेबांनी माझ्याकरता डिगामेथ्यांचे लाडू वगैरे बाळंतिणीला उपयोगी असे बरेच पदार्थ तयार केले होते. त्यांतील दोन डबे भरून तिने आत्याबाईकडे पाठविले.

आत्याबाईला आमच्या सगळ्यांचाच फार राग आला होता. टिळकांवर तर ती नेहमीच रागावलेली असे, पण माईसाहेबांवर राग असा होता, की मला पाठविले, माझे लग्न करून दिले, माझे बाळंतपण केले, ते सगळे आत्याबाईंनी व मामांनी; आणखी बहिणीला आता आयत्या पिठावर रेघा ओढायला काय होते ? तिला आता जो मनीचा एवढा प्रेमा आला, तो मागेच का नाही आला ? टिळक नुकतेच नागपूरला जाऊन आले होते. त्यांना तेथे वक्तृत्वसमारंभात बक्षिसे मिळाली होती; पण मिळालेले सर्व पैसे तेथल्या तेथे ते दान करून आले होते, म्हणून त्यांच्यावर आता विशेष राग होता. तिला वाटे, की मनीला आम्ही सोडून दिले ते खरे खरे थोडेच सोडून दिले ? ह्या दोघांनी आपली थोडी मनधरणी करायची होती, म्हणजे झाले. पण भिकूताई व टिळक ह्यांना मात्र मामांचा व आत्याबाईंचा राग खरा वाटून त्यांनी संगमनेरला आमचे बिऱ्हाड नेण्याचे ठरविले.

लाडवांचे दोन डबे आत्याबाईंकडे गेले, पण त्यांच्यातील पदार्थांना तिने हात लावला नाही. इतकेच नाही, तर गोविंदरावमामांना शपथ घातली की, "तुम्ही जर भिकीने दिलेल्या पदार्थांतून काही खाल तर गाईचे मांस खाल. त्यातून मीही काही खाणार नाही. तुम्ही म्हणालात, आतापासून तुमच्या बायको-मुलाला मी सांभाळणारा नाही.

झाले ! भिकीला तेवढेच पुरले नि झाली बहिणीला न्यायला तयार ! कष्ट करायला मी, लहानाची मोठी केली मी, पैसा खर्च केला मी आणि त्यांना काय होतं आयत्या पिठावर रेघा ओढायला ?"

आत्याबाईने अशा रीतीने डिगामेथ्यांच्या लाडवांवर आमचा राग काढून वडयाचे तेल वांग्यावर काढले. भांडण, संताप ह्यामध्ये त्या बिचाऱ्या पदार्थांचे मरण ! अखेर उकिरडयाची धन झाली !

त्याच सुमारास सटाण्याचे मामलेदार यशवंतराव महाराज ऊर्फ देवमामलेदार ह्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्यावर टिळकांनी एक काव्य लिहिले व ते छापून काढले. नागपूरप्रमाणे नाशकासही वक्तृत्वसमारंभ झाला व त्यांनाही बक्षिसे मिळाली, व तेथेही ती त्यांनी वाटून टाकली.

## १३ : सोळा वर्षांची झाली तरी–

नानासाहेब पुढे संगमनेरला गेले होते. आम्ही मागून बैलगाडया करून गेलो. पण आम्हाला जाण्याचे कारण असे घडले– भिकूताई कधी टिळकांच्या समोर येत नसे व त्यांच्याशी बोलतही नसे. तिला वाटे, की टिळक आपल्यावर कविता करतील.

नानासाहेब गेल्यावर दुसऱ्या दिवशी जेवायला बसले असता भिकूताईच्या कानावर जाईल अशा रीतीने टिळक म्हणाले, "मला काही भांडी व तुमच्या घरातील दोन खोल्या द्या. मी येथे राहतो."

भिकूताईला विचार पडला. धरले तर डसते, सोडले तर पळते; मामांनी मला सोडले आणि टिळक सांभाळणार म्हणतात ! त्यांना काय, दुसरी बायको मिळेल. मला थोडीच बहीण मिळणार आहे ? त्या दोघा सासवासुनांनी एकत्र बसून पुष्कळ विचार केला व शेवटी नानासाहेबांना संगमनेरी सविस्तर पत्र घातले. पत्राचे ताबडतोब उत्तर आले, की टिळकांसह सगळयांनाच संगमनेरास घेऊन या. त्याप्रमाणे आम्ही सर्व

बैलगाडीतून संगमनेरी गेलो.

आम्ही सर्व सात माणसे होतो. त्यातच माझ्या बहिणीचा मामेदीर होता. पहाटे पाचला निघून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही संगमनेरास पोचलो. वाटेत डुबेऱ्यास फराळ केला. रस्त्याने कोठे कडुलिंबाचे झाड लागले की टिळक त्याचा पाला ओरबाडून खात. त्या वेळी आजीबाई सुनेला म्हणत, "जानकी, तुझा मेव्हणा योगी आहे ग बाई. तुम्ही त्याला नावे ठेवा, पण तो सिद्ध पुरुष आहे."

आम्ही ज्या वाड्यात उतरणार होतो त्याची भुताखेतांसंबंधी ख्याती आम्ही नाशकासच ऐकली होती. तेथे पोचताच भिकूताईने विद्यानंदाला गरम पाण्याने न्हाऊ घातले व मलाही कढत कढत पाणी घातले. आमची सर्वांची जेवणी झाली. मुलगा दीड महिन्याचा होता म्हणून मला खाटशेगडीची व्यवस्था केली होती. आम्ही दोघे खाटेवर निजलो. तेथेच खाली जाजमावर घारूमाई, आजीबाई, वामनकाका ही मंडळी एका दंडाळीला निजली. नानासाहेब, भिकूताई व टिळक वर माडीवर निजले. माझ्या खाटेभोवती एक जाजमाचा पडदा लावला होता. वाडा चौसोपी असून, मला वाटते, त्याचा दरवाजा पूर्व बाजूस होता. बाहेरून येताच डाव्या बाजूला चौकातच भिंत घालून केलेला घोड्यांचा तबेला लागे. माडीवर जाण्यास व ओटीवर येण्यास चौकातूनच दगडी पायऱ्या होत्या. माडीचा बाहेरील जिना माझ्या पड्यासमोर होता.

मला काही केल्या झोप येईना. नाही नाही ते विचार डोक्यात थैमान घालू लागले. रिकामे डोके सैतानाचे माहेरघर असे जे म्हणतात ते काही खोटे नाही. खोलीला लागूनच घोड्यांचा तबेला होता, हे मला ठाऊक नव्हते. माझ्या उशाला समई मिणमिण जळत होती. उशाकडे धपधप आवाज होत होता. सर्व माणसे गाढ झोपी गेली होती. मी पडल्या पडल्या मानसुद्धा न हलविता डोळे गरगर फिरवून इकडे तिकडे पाहण्याचा प्रयत्न करीत होते. आज काय होईल ते होवो, हडळ कशी असते ते पाहण्याचे मी ठरविले होते. छाती धडधडू लागली. जिन्यातून जोडव्यांचा आवाज ऐकू येऊ लागला. कोणीतरी जिना उतरत होते. माझ्या काळजाचे पाणी झाले ! जीभ कोरडी पडली. पण तशीच धैर्याने पड्या-

कडे टक लावून मी पाहत होते. पुन्हा टपटपटपटप. जिन्यातून एक आकृती दिसू लागली. माझे डोळे आपोआप मिटू लागले तो समोरून एक उंच बाई तांबडे लुगडे नेसलेली, केस मोकळे सोडलेली व कपाळी मोठे आडवे कुंकू असलेली वरून उतरताना दिसली ! तिच्या हातात लामणदिवा होता. वाड्यातील हडळीचे जे वर्णन ऐकले होते ते अगदी तंतोतंत जुळले. माझी पाचावर धारण बसली. ती बाई येत येत अगदी माझ्याजवळ येऊन उभी राहिली. मी मुलाला पोटाखाली घालून त्याच्यावर निजले व वर अंगावर पासोडी गुरफटून घेतली. माझ्या अंगावर थरारून काटा फुटला व दरदरून घाम आला. ती अगदी अंथरुणाजवळ येऊन उभी राहिली. आता तिने पोराला हात लावला ! आता हळूहळू त्याला काढून घेऊ लागली ! तू कोण आहेस ते मी ओळखले, असे मला त्या हडळीला म्हणायचे होते. पण तोंडातून शब्द उमटेना. मी नुसते को–को–को करू लागले. खाली निजलेल्या सर्व मंडळींनीही एक दिलाने माझ्या सुरात आपला को–को–को असा सूर मिळवून दिला. आम्ही पाच-सहा माणसे तालासुरावर को–को–को असे ओरडत होतो. ती बाई काय– काय– काय म्हणून आमच्याबरोबर ओरडत होती. वरून नानासाहेब धावत धावत आले व तेही को–को–को करू लागले. टिळक आले. ते मात्र हसू लागले. त्यांना भय कधी वाटत नसे व हा प्रकार पाहून तर त्यांना मोठीच गंमत वाटली.

ती बाई म्हणजे भिकूताई. माझे वय लहान. मी अंगाखाली मूल चेंगरीन अशा भीतीने ती मधूनच उठून खाली आली होती व मी खरोखरच विद्यानंदाला पोटाखाली घेतलेले पाहून त्याला हळूच बाहेर काढण्याचा ती प्रयत्न करू लागली. घोड्यांच्या टापा, जोडव्यांचा आवाज व बहिणीचा तो अवतार ह्या साऱ्यांमुळे माझ्या मनाने तिलाच हडळ बनविले. तशात तिच्या हातात तो लामणदिवा व त्याच्या ज्योतीमुळे हलणारी भिंतीवरील तिची अगडबंब सावली. मग काय विचारायचे ?

संगमनेरास एक प्रसिद्ध कीर्तनकार आला होता. त्याच्या कीर्तनास बरीच मंडळी जात असे. कीर्तनात बाजाच्या पेटीने नुकताच प्रवेश केला होता. त्या कीर्तनकाराचा आवाज उत्तम, कीर्तनातील गाणी सुंदर व

अनुसंधानही बहारीचे, तेव्हा कीर्तनास अतोनात गर्दी जमू लागली. एके दिवशी पूर्वरंग आटोपून अनुसंधानाला आरंभ होणार तोच टिळक व नानासाहेब तेथे येऊन बसले. त्यांना बुवांच्या अगदी समोरच जागा देण्यात आली. बुवांना माळ घालण्याकरता आणली ती त्यांनी आपल्या हातात घेऊन टिळकांच्या गळ्यात घातली व त्यांच्या पायावर डोके ठेवले. नंतर अनुसंधानास सुरुवात झाली. हा प्रकार पाहून पेंडसे अगदी आश्चर्यचकित झाले. पण तेथे त्यांना काही बोलता येईना. कीर्तन संपल्यावर बुवांनी टिळकांचे कुशल विचारून त्यांची रजा घेतली.

हा काय प्रकार आहे, ह्याची नानासाहेबांना खुमखुम लागली. त्यांनी घरी येताच टिळकांना विचारले. तेव्हा टिळकांनी सांगितले, की 'धामक येथे असताना ह्या माणसाला तीन-चार कीर्तने लिहून दिली व ती त्याच्याकडून बसवून घेतली व तीच तो करीत आहे.'

पेंडशांना फार आनंद झाला. "टिळक, आता तुम्ही स्वतःच येथे कीर्तन करा," म्हणून ते टिळकांच्या मागे लागले. टिळकांनी दोन-तीन दिवस तयारी करून सुभद्राहरणावर एक सुंदर कीर्तन रचले. ते कीर्तन एकसारखे तीन दिवस चालले होते. कीर्तनाचे मूळपद असे होते—

**सेवक तव समरधीर चाललो झुंजाया**
**रथ माझा रम्य काय**
**ध्वज तूझे सदय पाय**
**अश्व विवेकाद्युपाय**
**लागलो लढाया**

कीर्तनाचे आमंत्रण साऱ्या गावात गेले. पण पेंडशांचा जीव धाकधूक होत होता. अगदी कीर्तन सुरू होईपर्यंत ते म्हणत होते, "टिळक, पहा बुवा— अजून विचार करा. फजिती नाही ना होणार ? मी पाहिजे तर सांगतो लोकांना, टिळक आजारी झाले म्हणून."

पण एकच आख्यान एकसारखे तीन दिवस चालल्यानंतर मात्र पेंडशांचा संशय फिटला. त्यांचा आनंद गगनात मावेना. पेंडशांचे अगोदरपासूनच टिळकांवर अत्यंत प्रेम होते. ते ह्या कीर्तनामुळे अधि-

कच वाढले. आजीबाई व भिकूताईही अगदी खूष झाल्या.

मला दोन-चार गोष्टींचा विशेष नाद होता, व थोडचाबहुत प्रमाणात तो अजूनही आहे. तो म्हणजे बाहुल्या खेळणे, गाणी म्हणणे, गोष्टी सांगणे व ऐकणे आणि रांगोळचा घालणे. माझ्या ह्या नादीपणामुळे आत्याबाईंची व भिकूताईची मला खूपच बोलणी खावी लागत. मी गोष्टी सांगू लागले की त्यांनी म्हणावे, " ह्या गोष्टींच्या पायी बायका आपली घरेदारे सोडून गेल्या आहेत. तुझ्या गोष्टी कोणत्या थरास जातील त्या जावोत." गाणी म्हटली म्हणजे म्हणावे, साऱ्या संसाराची गाणी केली आहेस. बाहुल्या खेळू लागले म्हणावे, साऱ्या संसाराचा खेळखंडोबा करून टाकला आहेस. पण ह्या बोलण्याचा माझ्यावर काही परिणाम होत नसे. जित्याची खोड मेल्यावाचून जायची नाही.

नानासाहेब कचेरीत गेले की विद्यानंदाला घेऊन भिकूताई व आजीबाई वरच्या अंधाऱ्या खोलीत जाऊन निजायच्या. टिळकही वरती काही लिहीतवाचीत बसायचे, नाहीतर वारूमाईशी सागरगोटे खेळत बसावयाचे. राहता राहिले मी एकटीच. मला काहीच उद्योग नसे. लिहिता-वाचता त्या वेळेस तर अगदीच येत नसे. आणि अजूनही अगदी बेतापुरते. अजून ड व ढ, क्ष व ज्ञ, कै व खै ही अक्षरे आली, की मी गडबडून जाते व बोटे मोडून त्यांचे स्थान कोणते हे मला ठरवावे लागते. तेव्हा त्या वेळेस काही लिहीत वाचीत बसेन तर हे शक्यच नव्हते. तेव्हा मी वर सांगितलेल्या गोष्टी करू नये तर माझा वेळ कसा घालवावा ! एकदा मुली लिहूवाचू लागल्या म्हणजे चूलबोळकी, बाहुल्या ही मागे पडतात. पण मी म्हणजे अशिक्षितांतील अशिक्षित.

ह्या सासवासुना निजल्या, की मला उजाडे. सर्व चाकरनोकरांना मी त्यांच्या बाईंचा उजवा हातच वाटत असे व माझ्या हुकुमाची ते वाट पाहत. बारा-एकपासून चारपर्यंत सर्व काही माझ्या हातात असे. ह्या वेळात मी बाहुल्यांचे काम करून घेई.

घरात दोन घोडे, एक म्हैस व विद्यानंदासाठी घेतलेली एक गाय, इतकी जनावरे होती. गडी चारा आणण्यात पैसे खाई. तेव्हा ते काम मला देण्यात आले. दारावरून जाणारे भारे मी ठरवून घ्यावयाचे. मिळेल

तेवढा मी रुपया-सवा रुपयात घेत असे. उरलेले पैसे मी भिकूताईला देत नसे. घारूमाईला मात्र मजजवळ किती किती पैसे साचले ते ठाऊक होते. नाव घारूमाईचे सांगावे व तिच्या आईने हे करण्यास सांगितले आहे असे म्हणावे. चाऱ्याचे साचलेले पैसे हातात असतच. त्याच्यावर माझा बाहुल्यांचा संसार चांगला थाटला होता. एकदा सोनाराकडून पितळेचे दागिने बाहुल्यांसाठी बनविले. कामटयांचे मखर केले.

घारूमाईने म्हणावे,

" मावशी, नको गडे. आई रागे भरेल. "

मी तिला म्हणावे, " अग, काय रागावते ? तिला सांग माझं नाव ! "

एक दिवस दोघी रोजच्याप्रमाणे निजल्या. गड्याला मी सांगितले, " माईसाहेबांनी मला केळीचे खांब आणायला सांगितले आहेत." त्याप्रमाणे त्याने ते आणले. ते दोन दाराला व चार ओसरीच्या खांबांना बांधले. चार दिवस वाजंत्र्यांना बोलावून ठेवले, बायांना हळदीकुंकवासाठी आमंत्रणे दिली. माईसाहेबांच्या नावाखाली सगळा थाट उडवून दिला. चांदीची भांडी काढली. पानसुपारी, खोबऱ्याची खिरापत वगैरे सर्व तयार झाले. आपण बाहुल्या खेळतो आहो, हे माझ्या ध्यानातच राहत नसे.

बायका जमू लागल्या. जी ती विचारू लागली, की माईसाहेब कोठे आहेत ? माईसाहेब निजल्या होत्या माडीवर. घरातली गडबड ऐकून त्या जाग्या झाल्या. भिकूताई जागी झाली म्हणजे तिचे डोळे चटकन उघडत नसत. ती काय प्रकार आहे तो पाहण्यास डोळ्याला पाणी लावून लावून ते उघडण्याचा प्रयत्न करू लागली. मी खिरापत वाटली. इतक्यात दारी चौघडा वाजू लागला. आजीबाई खडबडून जाग्या झाल्या. त्या दाराला दोन्ही हात देऊन हा काय प्रकार आहे, ते आ करून पाहत उभ्या राहिल्या. विद्यानंद तर खोलीत रडतच होता. माझी बहीण खाली येऊन आलेल्या बायकांचे हसतमुखाने स्वागत करीत होती. आतल्या आत मात्र तिचा अगदी चडफडाट झाला होता. वाजंत्र्यांचा आवाज **ऐकताच** टिळक खाली आले. त्यांनाही हा काय प्रकार

आहे काही कळेना. त्यांनी घारूमाईला एका बाजूस नेऊन हा काय प्रकार आहे म्हणून विचारले. मी नको नको म्हणत असता मावशीने हे केले, असे तिने त्यांना सांगितले. त्यांनी मला घारूमाईबरोबरच निरोप पाठविला, की ह्या पोरीजवळून तरी काही शीक.

संध्याकाळी नानासाहेब आले ते मुळीच रागावले नाहीत. बाहेर चौघडा बंद झाल्यावर माझ्या हृदयात चौघडा वाजू लागला.बहिणीने पंचपक्वान्नांचे ताट मजपुढे वाढून ठेवले. त्यात कोणती पक्वान्ने नव्हती? गाल-गुरोळच्या होत्या, चापटपोळच्या होत्या, धम्मकलाडू होते, मुष्टि-मोदक होते, मुरुडकानोले होते. त्यातच भर पडली चांदीच्या वाटीची. भिकूताईने खिरापत वाटता वाटता ती वाटी कोठे ठेवली. ती गडबडीत हरवली असे वाटून त्यामुळे गडगडाट झाला. पहिला दिवस असा साजरा झाला.

दुसऱ्या दिवशी आम्ही जेवायला बसलो तोच बाहेर वाजंत्र्यांचा आवाज येऊ लागला! त्याच्या पाठोपाठ वाढून आले! ते जाते तो दुसरे, मग तिसरे! आता बरीक माझी बहीण फारच लाल झाली.

"कार्टे, तुझा हा खेळ माझे नाव बद्दू करील. लोक म्हणतील, आता ह्यांची बदली होणार, म्हणून ह्यांनी ही उकळणी चालवली आहे."

चार दिवस घरोघरची वाढणी येत होती. तीही अगदी वाजत-गाजत. प्रत्येक वाढण्यात तीन प्रकार असत. निरसनाचे, धान्य फराळाचे व जेवणाचे. निरसनाचे आजीबाईंना जाई, फराळाचे म्हणजे लाडू वगैरे पदार्थ मोठी माणसे घेत, व जेवण आमच्या वाट्याला येई! श्रीमंत जिन्सीवाले ह्यांच्या घरचे तर इतके मोठे वाढून आले, की ते पाहून मी सुद्धा खजील झाले. दहा-वीस पानांचे व पाची पक्वान्नांचे ते होते. त्याने अर्धे माजघर भरून गेले!

वाढणी येता थांबेनात व इकडे बहीणही रागावता थांबेना. मी म्हणे, "रागावतेस, मग वाढून आलेले कसे फराळाचे डबे भरून ठेवतेस? आम्हाला फराळाचे काही देत नाहीस."

ह्यावर तिने रागाने म्हणावे, "रोज देते ते पुरत नाही का?"

फराळाशिवाय खणा-नारळांचीही गर्दी उडाली होती. असे

करता करता चौथा दिवस उजाडला. एखादी आई किंवा सासू असावी त्याप्रमाणे माझी स्थिती त्या बाहुलीबद्दल झाली होती. घारू माझ्या हाताशी. पडद्याआड मी सूत्रधार. विद्यानंद रडला की होतीच भिकूताई व आजीबाई करायला. त्या दोघी करीत त्याचे.

उद्या पालखी पाहिजे. ती कोण करून देईल ? बाहुली तर मिरवलीच पाहिजे. जिन्सीवाले पालखीपदस्थ होते. त्यांच्या आत्याबाई आजीबाईकडे येत-जात असत. त्यांना हळूच जाऊन विचारले. त्यांनी आपल्या घरातील खेळातली पालखी पाठवून दिली. पालखी पाहून माझा आनंद गगनात मावेनासा झाला. मला वाटले, मीच आज पालखीपदस्थ आहे. पालखी आणून खाटेखाली ठेवली. सकाळीच मिरवणूक निघणार. पण बाहुलीवरून दहीभात उतरून टाकायला सकाळीच भात कोठून मिळणार ? आजीबाई घारूमाईला सकाळीच भात करून घालीत असत. तिला हळूच सांगून ठेवले, की एक घासभर भात बाजूला काढून ठेव. मग तो आपण बाहुलीवरून उतरून टाकू. घारूने तसा भात काढून ठेवला बाजूला. सर्व आपापल्या कामात गढून गेले होते. टिळक आपले रात्रीचे लिखाण पेंडशांना वाचून दाखवीत होते. इतक्यात वाजंत्री वाजू लागली. आता तो नेहमीचाच प्रकार झाल्याने तिकडे कोणाचे लक्ष गेले नाही. भिकूताई विद्यानंदाला घेऊन वर गेली होती. मी व घारूमाई शाली पांघरून हळूच मिरवण्यास निघालो. माराच्या धाकाने जवळूनच मिरवणूक काढून आणण्याचे ठरले. मागील दारी येताच मी आत शिरले. कारण भात कालवून ती मिरवणूक पुढल्या दारी येताच चटकन बाहुलीवरून ओवाळून टाकायचा होता. आत टिळक होते. मी कामाच्या धांदलीत. मला लौकर दही हवे होते. स्वयंपाकघरात चुलीजवळ ब्राह्मण काहीसे करीत होता. दुभत्याची पेटी उघडून मी दही घेण्यास मान आत घातली तोच टिळक मला नकळत माझ्या मागे आले व एखाद्या चोरट्या मांजराची मान चोरी करताना धरून त्याला वर उचलावे तसे त्यांनी मला मान धरून बाहेर काढले. माझ्या हातात दही होते, ते मी सोडीना. पुढच्या खोलीत आजीबाई जप करीत बसल्या होत्या. त्यांची नजर आमच्याकडे गेली तसा टिळकांचा हात ढिला पडून

त्यांच्या हातातून मी निसटले. त्यांना मला अधिक समज देता आली नाही. मी कशीतरी कापत कापत जाऊन दहीभात उतरून टाकला. मुली माझी वाट पाहत उभ्याच होत्या.

मूल रडत होते. खाटेजवळ भिकूताई त्याला घेऊन बसली होती. मला पाहताच अगदी लाल होऊन ती उसळली.

ती म्हणाली, "तुझी भावली दुसऱ्यानं संभाळावीत आणि तू बस चिंध्यांच्या भावल्या खेळत !"

आजीबाईही माझ्यापुढे कमरेवर हात देऊन उभ्या राहिल्या, "बाई मनू, तुला कधी शहाणपण येणार ? घारू दहा वर्षांची होईपर्यंत सकाळी भात खाते व तू सोळा वर्षांची झाली तरी बाहुल्या खेळतेस."

माझ्या खेळाच्या पायी भिकूताईला मात्र खर्च झाला. दोन खण्याळी आणली, एक जेवणावळ घातली व सर्वजणींच्या तिने खणा-नारळांनी ओटचा भरल्या.

ह्याच वेळेस टिळकांनी 'माझी भार्या' हे काव्य लिहिले. अर्थात टिळकांचे उत्तम श्रोते पेंडसे. त्यांना त्यांनी आपले काव्य तावडतोब वाचून दाखविले.

पेंडसे म्हणाले,

"आमची मनू आहेच तशी."

ह्यावर टिळकांनी उत्तर दिले,

**"केले काव्य परंतु ह्यांत मम हो संबंध काही नसे !"**

## १४ : टिळकांचा धंदा : माझे शिक्षण

संगमनेरी माझ्यावर जिवापलीकडे प्रेम करणारी माझी बहीण व भाची होती. तसेच टिळकांवर पेंडशांचे अलोट प्रेम होते. त्यांचे कौतु-

स्मृ... ६

कट्टी पेंडसे पुष्कळ करीत. पण टिळकांच्या मनाला येथे प्रशस्त वाटेना. नोकरीशिवाय दुसरे काहीतरी करावे असे त्यांना सारखे वाटे. त्यांनी गोविंदरावमामांना लिहिले, 'मी काही धंदा शोधतो. तुम्ही तुमच्या मुलीला काही दिवस संभाळा.'

मामांना व आत्याबाईला तेच पाहिजे होते. सर्वांचा रुसवा गेला व आम्ही सर्व पुन्हा जलालपुरी एकत्र जमलो.

जलालपुराहून जवळच आभाळचाची वाडी म्हणून एक वाडी आहे. तेथे एक कुटुंब होते. नवरा व बायको. नवरा आंधळा होता. त्याची सेवा करण्यात व त्याचे कोडकौतुक करण्यात बायकोचा वेळ जाई. पुढे तो अभागी आंधळा मेला व अशा रीतीने सौभाग्यहीन झालेली त्याची विधवा आपला काळ वैधव्यात घालवू लागली. मोहतूर करता येण्यासारखी तिच्या समाजाची रचना होती व मोहतूर लावण्यास कोणीही तयार झाले असते असे तिचे स्वरूप व वय होते. परंतु तसे काहीच झाले नाही. तिने आपल्या मृत पतीची दगडाची मूर्ती करून बसविली व त्याची पूजाअर्चा करण्यात व त्याच्या स्तुतिपर गाणी म्हणण्यात तिचा वेळ जाऊ लागला. ह्या गोष्टीचा टिळकांच्या मनावर फार परिणाम झाला. त्यांनी ह्या विषयावर 'गंगा' नावाचे एक काव्य केले.

पुढे टिळक मला जलालपुरास ठेवून काहीतरी धंदा करण्यास म्हणून नागपुरास गेले.

दिवाळीचा सुमार होता. त्या वेळी खपेल असा माल त्यांनी खरेदी करून एक दुकान काढले. दुकान होते फटाकड्यांचे. आणि टिळक फुलामुलांचे कवी तसे फुलामुलांचे अगदी जवळचे दोस्त होते. फटाकड्यांचे दुकान हातात असलेला मित्र मिळाल्यावर कोणती मुले त्याच्यापासून फटकून राहतील ? खूपच मित्रमंडळी त्यांच्याभोवती जमा झाली. मुलांनी व मुलांच्या ह्या दोस्ताने दुकानातील सारे फटाकडे उडवून मौज केली.

तेथे टिळकांचे एक मित्र गणपतराव खरे म्हणून होते. ते त्यांना म्हणाले, 'व्यापारात तुमचे काही चालणार नाही. तुम्ही राजनांदगावास चला. तेथे मी तुमच्या योग्यतेचे असे काम शोधून देतो."

टिळक गणपतरावांच्या म्हणण्याप्रमाणे राजनांदगावी गेले. तेथे

त्यांना बलराम प्रेसमध्ये तावडतोब काम मिळाले.

दोन-चार महिने तेथे काम केल्यानंतर मला नेण्यासाठी ते जलालपुरास आले. जलालपुरास विद्यानंद फार आजारी पडला होता. टिळक येऊन पोहोचल्यावर दोनच दिवसांनी तो वारला. गोविंदरावमामांनी तर अंथरूण धरले, इतका त्यांचा शोकक्षोभ झाला. टिळकांनाही अतिशय वाईट वाटले. त्यांनी आपले पहिले 'बापाचे अश्रू' काव्य ह्या वेळेस लिहिले. हे काव्य छापले होते, पण त्याच्या प्रती कोठेच मिळत नाहीत. ह्यानंतर वीस वर्षांनी दुसरे 'बापाचे अश्रू' काव्य त्यांनी आमचे मित्र प. वा. विनायकराव साठे ह्यांच्या मुलावर अहमदनगरास रचले.

ह्या काव्याच्या पहिल्या दोन ओळी अशा होत्या :

**प्राणवल्लभे ! कविते ! तुझिया छंदे दुःखे नाना ।**
**विसरे मी परि कसे आज हे दुःख घेतसे प्राणा ॥**

दुःख थोडे विसरल्यावर टिळक व मी राजनांदगावास गेलो.

राजनांदगावास गेल्यानंतर मी पहिल्यांदा माझी मुळाक्षरे शिकले. माझा अभ्यासाचा आरंभ व शेवट तेथेच झाला व ते आणि तेवढेच माझे शिक्षण असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

रा. खरे यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई ह्यांना लिहितावाचता येत असे. टिळकांना येथेच प्रथम स्फूर्ती झाली, की मलाही लिहितावाचता आले पाहिजे.

मला अक्षरओळख नव्हती व अजूनही एखाद्या वेळेस लिहितावाचताना माझी गडबड उडते. पण मला टिळकांच्या सहवासाने अगदी लहानपणापासून कळत असे पुष्कळ. त्यांच्या कविता रचून झाल्या की बहुतकरून पहिला श्रोता व टीकाकार मी असायची. काव्यरत्नावली चालू असतानाच त्यांनी काव्यकुसुमांजली काढली होती; तेव्हा एका कवितेत त्यांनी रत्नावलीवर टीका केलेली माझ्या चटकन ध्यानात येऊन मी त्यांना तसे बोलूनही दाखविले होते. माझी ही 'कळण्याची शक्ती' पाहून त्याच वेळेस टिळकांनी आश्चर्य व्यक्त केले होते.

असो. लक्ष्मीबाई खऱ्यांना लिहितावाचता येते, तसे लक्ष्मीबाई

टिळकांनाही आले पाहिजे, असे टिळकांनी ठरविले. टिळकांना लहान मुलांना चांगले शिकविता येत असले तरी माझ्या बाबतीत ते अगदी निराळेच ठरले. एक तर मी लहान नव्हते. दुसरे, मी परकी नव्हते. तिसरे, मला हसू फार येत असे. त्या हसण्याने माझ्या शिक्षणातही दगा दिला.

मला शिकविण्याचे ठरल्यावर टिळकांनी पहिलीपासून सहावी-पर्यंत पुस्तके— जवळ होते नव्हते तितके सर्व पैसे खर्च करून— एक दिवस खरेदी करून आणली ! एका बाजूला टिळक बसले. पलीकडे मी बसले. मध्ये पुस्तकांचा ढीग घातला व आमच्या अभ्यासाला सुरुवात झाली.

व्याकरणापासून सुरुवात.

टिळक म्हणाले, " शब्द म्हणजे काय ?"

मला सपाटून हसू लोटले. हा कसला बाई चमत्कारिक प्रश्न ? शब्द म्हणजे शब्द !

" शब्द म्हणजे शब्द !" मी उत्तर केले.

" पण शब्द म्हणजे काय ?"

" शब्द म्हणजे शब्द !"

" पण शब्द म्हणजे काय ?"

पुन्हा माझे आपले शब्द म्हणजे शब्दच ठेवलेले ! झाले ! टिळक खूप संतापले. ते संतापत तसतशी मी हसू लागे. तसतसे ते आणखी संतापत.

शेवटी संतापाग्नीने व माझ्या हास्याच्या वायूने मोठा भडका उडाला. तो भडका होताच पुस्तकांचा भडका उडाला ! टिळकांनी सारी पुस्तके टराटर फाडून टाकली व त्या चिध्यांच्या ढिगाऱ्याला काडी पेटवन लावून दिली !

हा आमचा पहिल्या दिवसाचा ' अभ्यास '. एका आठ दिवसांच्या आत आपल्या बायकोने आपल्यासारखे व्हावे असे टिळकांना वाटे, व मी पडले मठ्ठांतली मठ्ठ. तेव्हा ते व्हायचे कसे ?

पण हळूहळू त्यांना आपली चूक कळून आली व त्यांनी मला अ पासून ज्ञ पर्यंत अक्षरे वळविण्यास दिली. ती झाल्यावर क ची बाराखडी

करून घेतली. पण हे शिक्षण देत बसण्यात त्यांना काहीच गंमत वाटेना, व माझे शिक्षण तेथेच आटोपले ! मात्र ह्यापुढे माझे वाचन पुष्कळ वाढले व त्या वाचनातच वाकीच्या बाराखड्या व जोडाक्षरे वगैरे मला आपोआप आली. पण मागे सांगितल्याप्रमाणे क्ष, ज्ञ, कै, खै वगैरे मंडळी अजून माझी एखादवेळेस फजिती करतात.

## १५ : श्रावणी सोमवारचा ब्राह्मण !

एक दिवस जलालपुराहून पत्र आले की गोविंदरावमामांना देवाज्ञा झाली.

पत्र वाचून आम्हा दोघांना फारच वाईट वाटले. आम्ही ताबड-तोब राजनांदगाव सोडले. जलालपुरास मला आणून पोचविल्यावर टिळक परत राजनांदगावी गेले.

पण राजनांदगावी दोन-तीन महिने त्यांनी कसेबसे काढले व नंतर राजनांदगाव सोडून ते नागपुरास आले.

नागपुरास महादेवभाऊजी शाळेत शिकत होते. महादेवभाऊजी अतिशय बुद्धिमान विद्यार्थी होते. शिवाय त्यांचा स्वभाव काहीएक विलक्षणच होता ! त्यांच्या प्रेमळपणामुळे सगळे जगच त्यांना आपले वाटे. शाळेला जाताना एखादा गरीब माणूस चिंध्या पांघरलेला आढ-ळला, की ते आपला सदरा त्याला देऊन टाकीत व उघडे बोडके शाळेला जात. त्यांचे एक जीवश्चकंठश्च मित्र होते. ह्यांचे नाव वासुदेवराव पट-वर्धन. टिळकांची व वासुदेवरावांचीही चांगली दाट ओळख झाली होती. वासुदेवराव कवी होते व चांगले रसिकही होते. तेव्हा अशा रसिक व कवी मित्राकडे टिळकांनी येऊन राहणे अगदी साहजिक होते. अर्थात राजनांदगावचे काम कवीसाठी थोडेच अडून राहते ! राजनांदगाव सुटले व टिळक नागपूरकर बनले. तेथे त्यांना बऱ्याचशा शिकवण्या

मिळाल्या व चांगली व्यवस्था लागली.

नागपुरास गोरक्षणाच्या चळवळीत त्यांनी बराच भाग घेतला होता. गोरक्षणावर त्यांनी एक नाटक लिहून ते त्या वेळी बसविले होते. हेही पुस्तक छापलेले होते. ह्या चळवळीला त्यांनी बरेच पैसे मिळवून दिले. एक गाईचे चित्र त्यांनी बनविले होते. त्यात चंद्र-सूर्य होते; खाली संस्कृत श्लोक होता. गाईच्या प्रत्येक अवयवात शिंगापासून, डोळ्यांपासून शेपटीपर्यंत एक-एक देव बसविला होता. हे चित्र त्या वेळी छापून काढले होते. नागपुरास त्या वेळी टिळकांचा फार चांगला जम बसला. पुष्कळ मानमान्यता मिळू लागली. मित्रमंडळीही पुष्कळ मिळाली.

जलालपुरात तीन-चार महिन्यांनी टिळकांची तार आली, "मी फार आजारी आहे. तावडतोब यावे."

आत्याबाई फार घाबरून गेली. ती आधीच दुःखाने पोळलेली होती. घरात पैसाअडका काही नव्हता. पुरुषमाणूस कोणी नाही. नागपूर कितीतरी दूर. तिने शेतसाऱ्यासाठी पन्नास रुपये भिंतीत पुरून ठेवले होते. तेच घेऊन जाण्याशिवाय आता गत्यंतर नव्हते. सकाळपासून साऱ्याचे पैसे वसूल करण्यास कुलकर्णी येऊन बसले होते, व तारही त्यांनीच वाचून आणविली होती. पैसे तर तेवढेच होते. शेवटी आत्याबाई कुळकर्ण्यांशी बोलत बसली व मला हळूच तिने भिंतीत पुरून ठेवलेली रुपयांची डबी काढून बाजूस ठेवण्यास सांगितले. मी घाबरले होते. गुपचूप काढायला सांगितलेल्या पैशांचा गाजावाजा झालाच. डबीचे झाकण निघाले व सगळे रुपये खणाखणा खाली पडले. कुळकर्ण्यांना हे सगळे दिसत होते व ऐकूही येत होते, पण जणू काही काहीच घडले नाही, अशा रीतीने ते बसून राहिले. गंगेला पाणी चढत होते तरी त्याच कुलकर्ण्यांनी आम्हाला व आमच्या रुपयांना सुरक्षितपणे गंगापूरला नेऊन पोचविले व तेथून आम्ही बैलगाडी करून स्टेशन गाठले. जलालपुरास माझ्या लहानपणी अशी स्थिती होती, की गावातल्या सर्व जातीच्या सर्व लहानथोर मंडळीला आपण एका कुटुंबातील माणसे आहो,असे वाटे. अस्पृश्यता अगदी कडक होती, पण अस्पृश्य म्हणजे

कोणी परका किंवा दूरचा वाटत नसे. तसेच कुलकर्णी म्हणजे सरकारी पैसे उकळणारा पठाण, अशी कल्पना नव्हती. सगळे एकमेकांच्या गरजेला जागत. प्रत्येक कुटुंबाचे वेगळे असे काही गुपित नसे. सर्वांच्या अडचणी सर्वांपुढे असत व सर्वजण दुसऱ्यांच्या साह्याला धावून जात.

नागपुरास गेल्यावर टिळकांचे बिऱ्हाड कसे सापडेल, आपल्याला कोण पोचवील वगैरे काळजी नाशिक सोडल्यापासून मला लागली होती. त्या काळजीत आम्ही मूर्तिजापूरपर्यंत आलो. मूर्तिजापूरला टिळकांचे एक स्नेही भिकाजीपंत गोऱ्हे राहत असत. मूर्तिजापूर नाव ऐकताच मला भिकाजीपंतांची आठवण झाली व मी एका पोर्टराला बोलावून भिकाजीपंतांना निरोप पाठविला, की टिळकांची मंडळी नागपूरला चालली असल्याची नागपुरास तार करा. त्यांना निरोप पोचून त्यांनी तारही केली होती, हे नागपुरास पोचताच दिसून आले. कारण तेथे दोन-तीन स्नेही मंडळी आम्हाला उतरून घेण्याकरता आली होती.

आम्हाला घरी पोचविले, परंतु टिळकांचा पत्ता नव्हता. ते बरे असून व्याख्याने देत आहेत, व चळवळीत भाग घेत आहेत वगैरे ऐकून आम्हाला मोठा आनंद वाटला. विशेषत: त्यांना तापबीप काही कधीच आला नव्हता, हे ऐकून आम्हाला फार संतोष वाटला. रागही आला, पण तो तेवढ्यापुरताच.

त्या दिवशी श्रावणी सोमवार होता. टिळकांची मित्रमंडळी त्यांना भेटली.

"आज एका म्हाताऱ्या बाईला ब्राह्मण पाहिजे, तुम्ही जाता का ?" असे त्यांना त्यांच्या मित्रमंडळीने विचारले. टिळक कबूल झाले.

दिवेलावणीच्या वेळी टिळकांना घेऊन त्यांची मित्रमंडळी आली. टिळकांना म्हातारी दिसली व ते चमकले... ही तर आपली सासू !

"तुम्ही आला ? हे घर कोणाचे ?"

आत्याबाईने टिळकांच्या मित्रमंडळींकडे बोट दाखविले. मित्रमंडळी खो खो करून हसू लागली.

टिळक म्हणाले, "थँक यू !"

टिळकांच्या मित्रमंडळींनी त्यांची ही गंमत केली होती. घर घेऊन,

सर्व संसार मांडून व धान्यधून्य भरून, आम्हाला बोलावून मग त्यांनी टिळकांना अशा रीतीने चकित केले होते.

दोन-चार दिवसांनी मामंजी तेथे आले. आता मात्र आमच्या संसारात पुष्कळच जिवंतपणा आला. मामंजी तशा स्वभावाचे व आत्याबाई अशा स्वभावाची.

आत्याबाई मोठी सुग्रण होती, आणि दुसरी गोष्ट म्हणजे आपल्या स्वयंपाकाला कोणी नावे ठेवलेली तिला कधी खपत नसत. मामंजींनाही आपल्या स्वयंपाकाचा मोठा अभिमान. विशेषतः देशावरचा स्वयंपाक व कोकणी स्वैपाक ह्यांची ते नेहमी तुलना करीत. वाढावयाचे काम माझे. बाहेर येऊन वाढून गेले, की माझ्या व आत्याबाईंच्या कानावर पडेल अशा तऱ्हेने काही टीका करावी. तिकडे आत गेले, की आत्याबाईंनी तुझा सासरा माझ्या स्वयंपाकाला नावे का ठेवतो, म्हणून रागवावे. माझी मात्र मृदंगासारखी स्थिती झाली होती. एक थप्पड मामंजींची की लगेच दुसऱ्या बाजूने दुसरी थप्पड आत्याबाईंची.

असो. काही दिवसांनी हे दोघेही आपापल्या गावी निघून गेले.

टिळकांचे दातृत्व कमालीचे होते ! त्याबद्दल काही काही आठवणी पुढे मी योग्य ठिकाणी देणारच आहे; पण त्यांच्या स्वभावातील विशेष म्हणजे पैशाची त्यांना कधीच किंमत वाटली नाही. पैसा असला तर त्यांना जेवढा आनंद वाटायला पाहिजे तेवढाच नसला तरीही वाटत असे. मी तर त्यांना उलट असे म्हणावयाची की, "तुम्ही पैसा असला म्हणजे तो जाईल कसा ह्याच्या काळजीत असता." माझी स्थिती उलट होती. तो राहील कसा, ह्या काळजीत मी असायची. पैसा घालविणे फार सोपे. त्यामुळे ह्या लढाईत नेहमी त्यांचाच विजय होत असे. शिवाय त्यांना कर्जही देण्यास लोक नेहमी तयार असत. तेव्हा मजजवळ पैसा ठरणे शक्यच नसे. कारण कर्ज करावे त्यांनी, फेडावे मी हेही चाललेलेच असे.

असो. नागपूरचीच गोष्ट. एक दिवस घरात काही नव्हते. मजजवळ एकुलता एक रुपया राहिला होता.

"बाजारात जाता का ?"

"हो, जातो. तुझे पैसे ! आम्हाला काय नोकर माणसांना !" ह्यावर थोडासा प्रेमाचा वादविवाद होऊन शेवटी मी तांदूळ आणण्यास सांगून त्यांची रवानगी केली. ते गेल्यावर मी वाट पाहत बसले. पण नेहमीप्रमाणे उशीर न करता ते ताबडतोब परत आले. हसत हसतच आले. पण हातात तांदळाचे गाठोडे दिसत नव्हते.

मला फार राग आला. असे नेहमीच होत असे. मी रागावले म्हणजे ते मला जिजाई म्हणत व स्वतःला तुकारामबुवा म्हणत. त्यांनी खिशातून एक सुंदरी काचेची दौत काढून मजपुढे ठेवली.

"पाहिलीस ! किती सुंदर दौत आहे ती !"

"आता काय ही दऊत शिजत घालू ? काय करावं आता ?"

टिळकांनी दौत उचलून सरळ माडीचा रस्ता धरला व वरच्या खिडकीतून सरळ रस्त्यात ती दऊत फेकून दिली व वरून म्हणाले, "तुला मानसशास्त्र समजत नाही."

खरोखर मानसशास्त्र मला काही कळत नव्हते व अजूनही कळत नाही. मला वाटते, जिजाबाईलाही कळत नसेल व सॉक्रेटिसच्या बायकोलाही कळत नसेल. पण त्या जर आपल्या आयुष्याच्या गोष्टी लिहून ठेवत्या, तर त्यांच्या संसारातल्या अडचणी लोकांच्या ध्यानात आल्या असत्या. त्यांना दुसऱ्यांच्या मनाविषयी काही कळत नसले तरी आपल्या, स्वतःच्या मनात काय काय चलविचल होत आहे, हे चांगले कळत असले पाहिजे.

टिळकांना वाटे, ही एवढी संसारात लक्ष का घालते ? मला वाटे, टिळक संसारात लक्ष घालीत नाहीत म्हणून मला घालणे भाग आहे. दोघेच्या दोघे विरक्त बनलो तर दोघांनाही उपास घडायचे ! भाजीपाल्याची वगैरे नेहमी अडचण पडे. ब्राह्मणांच्या बायका त्या वेळी स्वतः बाजारात जात नसत. तेव्हा मी वडे, पापड, लोणची वगैरे नेहमी करून ठेवी. एकदा बोरकूट करून ठेवण्यासाठी बोरे आणविली व ती वर गच्चीवर वाळत टाकली.

"हे काय केलेस ?"

"बोरकूट करण्यासाठी बोरे वाळत घातली."

मी एवढी संसारात गुरफटून जाते म्हणून टिळकांना फार राग आला व त्यांनी गच्चीवरून भराभर बोरे फेकण्यास सुरुवात केली. खाली मुले मजेत बोरे वेचून खात होती. मला रडायला येत होते व हसायलाही येत होते. त्याच सुमाराला मी आजारी पडले. त्या वेळी टिळकांनी माझी एखाद्या आईप्रमाणे शुश्रूषा केली. एक महिनाभर मला नुसत्या संत्र्यांवर ठेवली होती.

एक दिवस ते म्हणाले, 'मी तुला सांजा करून देतो."

मी म्हटले,

"तुम्हांला सांजा करता येणार नाही. मला सांजा नको."

रागावले टिळक. "का म्हणून सांजा करता येणार नाही ? मी का माणूस नाही ? का मला अक्कल नाही ?'

मी म्हणाले, "तुम्हाला अक्कल नाही असे मी म्हणत नाही. अक्कल पुष्कळ आहे, पण सांजा करता येणार नाही."

पण त्यांनी हट्टाने सांजा तयार करण्यास घेतला. चूल पेटली. सांजा करण्यास आरंभ झाला. पण सांजा काही शिजेना. साखर घातली, जाळ कमी केला, पण काही उपयोग होईना. शेवटी ते हळूच मजकडे आले व म्हणाले, "काय बुवा, सांजा काही होत नाही."

आम्ही दोघेही हसलो व मी म्हटले, "ज्याचे काम त्यानेच करावे."

आम्ही लक्ष्मीबाई बुटींच्या वाड्यात राहत होतो. तेथे एक कीर्तन झाले. आरतीमध्ये सर्वांनी एक-एक आणा टाकला. पैसे थोडे दिसू लागले. टिळकांनी बुवाला आपल्या घरी पाहुणाच म्हणून ठेवून घेतले. हळूहळू बुवांनी आपल्या अडचणी टिळकांच्या पुढे मांडण्यास सुरुवात केली. टिळकांचे अंतःकरण कळवळू लागले. शेवटी घरात होते नव्हते तेवढे– वीस रुपये– बोवांच्या पदरी बांधून वर आणखी उधारी करून त्यांना कपडे करून टिळकांनी बुवांची बोळवण केली ! दुसऱ्या दिवशी उसने पैसे आणून आमच्या गृहव्यवस्थेला सुरुवात झाली.

ह्या वागण्यामुळे अगदी शेवटपर्यंत आमचे खटके उडत. ते म्हणत, "हे पहा, मी मरेपर्यंत हे असे चालणारच. मात्र मी मेल्यावर तुम्हाला

कोणाचे कर्ज ठेवून मरणार नाही." आणि अगदी तसे झाले. शेवटचे एक वर्ष आम्हाला एक पैचेही कर्ज नव्हते. तेथपर्यंत मात्र त्यांची वजा-बाकी व माझी बेरीज ही चाललेली असायची.

## १६ : बुटींच्या बागेत

टिळक अतिशय निःस्पृह होते. श्रीमंत मुकुंद कृष्ण ऊर्फ अप्पा-साहेब बुटी ह्यांचे धाकटे चिरंजीव गोपाळराव ऊर्फ बापूसाहेब बुटी यांना शिकविण्याचे काम टिळकांना होते. पगार चांगला, शिवाय त्यांच्याच बागेत बंगल्यात राहण्यास जागाही अप्पासाहेबांनी दिली होती.

एक दिवस अप्पासाहेब टिळकांना म्हणाले, "टिळक, बापूसाहे-बांना तुमच्याच घरी ठेवावे असे मला वाटते."

टिळकांनी अप्पासाहेबांचे म्हणणे ताबडतोब कबूल केले. परंतु मुलाच्या खाण्याराहण्याबद्दल ते देत असलेले पैसे मात्र त्यांनी नाकारले. त्यांचे म्हणणे, की गुरुगृही राहायचे म्हणजे खाणावळीत राहायचे नाही.

गोपाळराव स्वभावाने अत्यंत गरीब, नम्र व विनोदी होते. त्यांच्या एकट्याच्या वरकड खर्चाला शंभर रुपये त्यांना मिळत. त्यांचे काम करण्यास दोन हुजरे होते. पण ते आमच्या घरी आले ते एखाद्या गरीब विद्यार्थ्याप्रमाणे आले. त्यांना आपल्या मोठेपणाची घमेंड असल्याचे त्यांनी एकदासुद्धा भासू दिले नाही.

घरात मी त्याला अरे-तुरे म्हणे व तोही घरातील कामे निमूटपणे हसत हसत करी. त्याच्या घरी नुसता खर्च मांडण्यास कितीतरी कार-कून होते. परंतु त्याच्या घरची परिस्थिती कधी आमच्याही ध्यानात येत नसे व त्याच्याही ध्यानात येत नसे.

आमच्या घरी खर्च पुष्कळ होता. जमा मात्र बेताचीच असाव-याची. आमच्या घरातील मालक आम्हीच व हुजरे आम्हीच! धनी

आम्ही व कारकूनही आम्हीच! गोपाळ टिळकांना 'गुरुजी' म्हणे व मला 'बाई' म्हणे. म्हणून दत्तू मला ख्रिस्ती होईपर्यंत बाई म्हणत असे. माधव-भाऊजी आमच्याच घरी होते. त्यांची व गोपाळरावांची गट्टी जमली.

बागेतील वाळलेला पाचोळा गोळा करून दोघांनी रोज आपले स्नानाचे पाणी तापवून घ्यावे व टिळकांचे पाणी तापवून ठेवावे. रात्रीचा शिळा भात ऊन करून ताकाबरोबर खाऊन बाहेर जावे. कधी कोणी त्यांना विचारले की, "बापूसाहेब, आज काय होते जेवायला?" तर त्यांनी मोठमोठ्या पक्वान्नांची नावे सांगावी. त्याला घरात बापावाचून व भावावाचून कोणी मायेचे नव्हते. बायको सात वर्षांची व भावजय नऊ वर्षांची होती.

आमचे घर त्याला स्वतःच्या घराप्रमाणे वाटे. तो म्हणे, "मला साहेब म्हणायला फार लोक आहेत. पण अरेतुरे म्हणणारे कोणी नाही."

आमचे दोघांचे त्याच्यावर मनापासून प्रेम होते. मी स्वयपाक केला की त्याने पाने मांडावी नंतर सर्व आवराआवर व झाकपाकही तोच करी.

एक दिवस टिळक बाहेर गेले होते. भाऊजींचा व गोपाळचा एक मित्र त्यांना भेटायला आला होता. तिघा मुलांची जेवणी झाली. दर-रोजप्रमाणे त्यांनी आपली सर्व कामे आटोपली, आपले बिछाने घातले व मला म्हणाले," बाई, या तुमचे आवरून बाहेर. मग आपण अंगणात गप्पा मारीत बसू."

माझे जेवणखाण आटोपून मी बाहेर आले. तिघेच्या तिघे झोपी गेले होते. मी त्यांना हलवून जागे केले. दोघेजण जागे झाले. पण गोपा-ळची काही हालचाल दिसेना. मी घाबरून गेले. ते दोघेही घाबरून गेले. गोपाळचे अंग गार-थंड लागू लागले. एवढा गोंधळ होत आहे तो मध्य-रात्रीचा सुमार झाला. मी रडू लागले. ते दोघे भिटी भिटी पाहू लागले.

"बाबांनो, तुम्ही वाड्यात जा व ही सर्व हकीकत महाराजांच्या कानावर घाला," असे मी म्हटले की ते म्हणत,

"आम्हाला भीती वाटते."

माझ्या मनात एक एक कल्पना येऊ लागल्या! जवळच स्मशान

होते. भुताखेताचा तर प्रकार नाही ? मी पुन्हा पुन्हा बापूसाहेबास चाचपून पाही. तर तो आपला गार लागे !

" अरे, मी जाते. तुमच्यापैकी एक जण इथे बसा व एकजण माझ्याबरोबर चला."

पण त्यालाही ते कबूल होईनात.

" फाटकाला कुलूप आहे. तुम्ही जाणार कशा ?"

" मी जाते. त्याला का असेच मरू द्यायचे ?"

" तुम्ही गेला तर आम्ही दोघांनी येथे कसा दम धरायचा ?"

" तुम्ही दम धरा नाही तर सोडा, मी आता चालले."

असे त्यांना निक्षून सांगून मी निघाले. बंगल्यापासून बागेचे फाटक बरेच दूर होते. चांदणे टिप्पोर पडले होते. मी ओचे-पदर बांधून फाटकावर चढू लागले. मनात नाना विकल्प येत होते. मी वाड्यात कशी शिरू ? मला चोर म्हणून धरून महाराजांपुढे तर नाही ना उभे करणार ? तेथे तर संगिनींचा खडा पहारा ! मला जर ओळखले नाही तर माझी काय स्थिती होईल ? अशा विचारांनी डोक्यात काहूर उठविले होते. फाटकावरून चढून पलीकडे जाणार तो बागेतून कोणी माझा पाय ओढला. खाली पाहते तो बापूसाहेबांसारखे काही दिसले ! बापूसाहेबांचे भूतच ते ? माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला, बोबडी वळली ! मी मोठ्याने ओरडले, " कोण रे तू ?"

दोघांनी मला एका झाडाला टेकून बसविले व एकाने धावत जाऊन पाणी आणले. मी सावधच होते, पण माझी बोबडी वळली होती.

बापूसाहेबांनी माझे पाय घट्ट धरले. " बाई, तुम्ही हे गुरुजींना सांगू नका. माझी चूक झाली. तुमची आम्ही ही थट्टा केली. पुन्हा कध्धी कध्धी असे करणार नाही."

मी फारच रागावले होते.

" हसा पाहू बाई, हसा ! त्याशिवाय मी तुमचे पाय सोडणार नाही."

मला रडायला आले व हसायलाही आले.

माधवभाऊजी गंभीरपणे म्हणाले,

"माझेही मत आहे, की तू नानांजवळ ह्यापैकी काही सांगू नयेस."

"मग तुम्ही मला असाच त्रास देणार का ?"

"नाही, नाही. तुला आतापासून आम्ही कधीच त्रास देणार नाही."

अशा प्रकारे ती गंमत झाली. त्या तिघांचा अगोदरपासून बेत ठरलेला होता. महादेवभाऊजी त्या बेताच्या विरुद्ध होते, पण त्या दोघां-पुढे त्यांचे काही चालेना. मात्र त्याचा परिणाम असा होईल अशी आधी कोणालाच कल्पना नव्हती.

एक दिवस महादेवभाऊजी सांगू लागले, "नानांना कनी– आज एक चांगले बक्षीस मिळाले. ते त्यांनी कोणाला देऊन टाकले. तू त्यांना सांगू नको, मी हे तुला सांगितले म्हणून."

रात्री टिळक घरी आले. मी अंथरुणावर पडले होते. भाऊजी अभ्यास करीत होते. मी मुद्दामच झोपेचे सोंग घेतले. मग मी सोंगा-तल्या झोपेत बरळू लागले,

"पैसे दिले म्हणून काय झाले ! इकडून आले– तिकडून गेले. वळवाचा पाऊस तो ? त्याचे पाणी थोडेच राहत असते ?" टिळक मला हलवू लागले.

"अग ऊठ ! काय बडबडते आहेस ? स्वप्न का पडते आहे तुला ?"

भाऊजी, गोपाळ जवळच बसले होते. खाली पाहून ते हसत होते. मग मी खोटी खोटी जागी झाले.

"स्वप्न पडत होते का तुला ?"

"हो. तुम्हाला जसे काही पैसे मिळाले नि ते तुम्ही दुसऱ्याला देऊन टाकले."

"मोठे नवल आहे बोवा. खरोखरच मी एकाला पैसे दिले आज."

एक दिवस बापूसाहेब म्हणाले, "बाई, आज काहीतरी खाऊ पाहिजे."

टिळक जवळच बसले होते. मी त्याला चार आणे दिले व त्याने बाजारात जाऊन दोन खरबुजे आणली.

खरबुजे पाहून मी म्हटले, " खरेच, आपल्याला हळदीकुंकू करायला पाहिजे."

टिळक म्हणाले, " काय मूर्ख आहेस ! हळदीकुंकू करणे म्हणजे निव्वळ प्रदर्शन आहे. आपली कला दाखवायला तुजपाशी आहे काय ? आहे का काही ?"

" नसले म्हणून काय झाले ? गोरी असेल तरच काजळ घालायचे की काय ?"

मध्येच गोपाळ म्हणाला,

" बाई, आज मला वाड्यात जेवायला जावयाचे आहे."

आमचे हळदीकुंकवाचे बोलणे तेवढ्यावरच राहिले. गोपाळ त्या दिवशी जो वाड्यात गेला तो दिवसभर तिकडेच राहिला. रात्री निजायला घरी आला.

दुसऱ्या दिवशी नियमाप्रमाणे जो तो आपल्या उद्योगाला लागला. टिळक एका बाजूला जाऊन लिहीत बसले. मला चुलतसासूचा धाक होता. मी तिचे डोके धरून बसले. इतक्यात दारापुढे दोन-तीन गाड्या आल्या. मला वाटले, बंगल्यात आणखी कोणी राहण्यास आले. गाडीतली मोठमोठाली भांडी स्वयंपाकघरात येऊन पडू लागली. सामानसुमान व लाकडे ह्यांचा पडवीत ढीग पडला. मी तर आश्चर्यचकित झाले. आचारीपाणके ह्यांची सारखी धावपळ चालू झाली. बंगल्यात ठाकठोक असा आवाज येऊ लागला. इकडे टिळक, महादेवभाऊजी, गोपाळ ही मंडळी आपापल्या कामात चूर होती.

मी स्वयंपाकघरातून बंगल्यात व बंगल्यातून स्वयंपाकघरात करीत होते. मी म्हटले, आपण उगीच येथे राहायला आलो. घराचे आपण भाडे देत नाही. महाराज त्याचे मालक. ते वाटेल ते करणार ! आम्हाला काय वाटेल ह्याची त्यांना थोडीच पर्वा असणार ? हे वनभोजन आहे की काय ? स्वयंपाक तरी कसा करायचा ह्या गोंधळात ? आता जेवायला मंडळी आली म्हणजे त्यांना वाढायचे तरी काय व

कसे ? मी इकडे जेवणाच्या काळजीत चूर तर तिकडे दहा-बारा पानांचा स्वयंपाक तयारही झाला ! वाढप्याने पाने वाढली. जेवणाची तयारी झाली. मी अगदी चकितच झाले. जेवण्याला माणसे जमली. मलाही जेवायला बोलावले !

मी म्हणाले, "मी येत नाही. माझी माणसे अजून जेवली नाहीत नि मी कशी जेवायला बसू ?"

मला अन्नाला नाही म्हणणे पाप वाटे. पण माझी मोठी चमत्कारिक स्थिती झाली. त्यांना मी म्हटले, "माझ्या स्वैंपाकघरात तुम्ही सारा गोंधळ घातलात. बापूसाहेब वाड्यात गेले की काय आज ?"

त्यावर ते म्हणाले, "बाईसाहेब, बापूसाहेबच जेवायला बोलावीत आहेत !"

मग मात्र मी खरोखरच रागावले. त्यातल्या त्यात मला टिळकांचा अधिक राग आला. मी त्यांना चक्क सांगितले, "मी जेवायला येत नाही असे सांगा त्यांना."

पण गोपाळ स्वतःच आला. त्याने माझा हात धरला. मी हिसकावून टाकला.

"बाई, माझे ऐका तर खरे. मग माझ्यावर खुशाल रागवा."

असे म्हणून त्याने मला बंगल्यात नेले. आत जाऊन पाहते. तो अर्धीअधिक गौर मांडलेली ! ती गौरीची आरास पाहून मी अगदी थक्कच झाले ! माझे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. मला बापूसाहेबांशी काहीच बोलवेना. माझा त्यांच्यावरील सर्व राग लयास गेला.

टिळक जेवायला आले. त्यांना वाटले की आज वाड्यातील कोणी पाहुणेमंडळी वनभोजनास येणार असावी. म्हणजे कोणासच कशाचा पत्ता नव्हता. जेवण झाल्यावर टिळक बंगल्याच्या दिवाणखान्यात जातात तो तेथे गौर मांडलेली !

झाले ! टिळक संतापले माझ्यावर !

"तुझाच अट्टाहास हा. तू फार अविचारी आहेस. हा जबाबदारीचा माल आपल्याला कशाला पाहिजे ? हे सोने, रुपे, हिरे, माणके—हरवले तर त्याबद्दल कोण जबाबदार राहणार ?"

"कोण म्हणजे ? ज्याने आणले तो !"

"पहा बुवा ! मला तरी हे बिलकूल पसंत नाही," असे म्हणून टिळक पुन्हा कोठे निघून गेले.

गौरीची आरास इतकी सुंदर होती, की मी उभ्या जन्मात अशी आरास पाहिली नव्हती व पुढे कधी पाहीन असे वाटत नाही. दुपारी दोनच्या सुमारास बापूसाहेबांची भावजय, बायको व एक दासी गाडीतून उतरल्या. दालनाभोवती वाळ्याच्या झडपा लावून पाणी सोडण्याची व्यवस्था केली होती. गौरीपुढे चांदीच्या समया, पुढे मोठमोठी चांदीची ताटे. ताटांत फराळाचे सामान भरलेले, एक बाजूला हळदीकुंकवाची सर्व तयारी केलेली, अत्तर–गुलाब, पान–सुपारी, खिरापत वगैरे सर्व व्यवस्था न सांगता लागलेली. मुली आल्या त्या ह्याच तयारीने आल्या होत्या. त्यांनी हळदकुंकू दिले. मी खिरापत वाटली. त्या दोघी अगदी सुनांप्रमाणे वागत होत्या.

हळदीकुंकवाचा समारंभ झाला. मी घरात जाते तो पुन्हा पाने मांडलेली ! हळूहळू टिळकांची स्नेहीमंडळी जमू लागली. महाराज आले. जेवणाचा थाट अगदी श्रीमंती होता. चटण्या, कोशिंबरी, चार भाज्या, श्रीखंड-पुरी वगैरे चाऱ्ही ठाव बेत होता. महाराज म्हणाले, "टिळक, आज तुमच्या घरी तुमच्या पंक्तीचा लाभ झाला म्हणून आनंद वाटतो."

टिळक नुसते हसले.

गोपाळ बुटीला आमचे घर अगदी आपल्या घराहूनही अधिक वाटे. घरात महादेवभाऊजी व बापूसाहेब जेवायला बसले आणि तितक्यात बाहेर कोणी ओळखीचे आले म्हणजे त्याने मला मोठमोठ्या पक्वान्नांची नावे घेऊन वाढण्यास सांगावे. श्रीखंड म्हणजे बेसन, बासुंदी म्हणजे आंबट वरण, पुरण म्हणजे पोळ्या, साखरभात म्हणजे फोडणीचा भात, अशी आमची सांकेतिक भाषा ठरली होती. कोणी आले, की त्याने म्हणावे, "बाई एकच भाजी चार ठिकाणी वाढा. माझ्या मित्रमंडळीला तुम्ही जेवण्याचा आग्रह करा व मी म्हणेन, वाड्यात महाराज

स्मृ... ७

वाट पाहत असतील, ते रागावतील." व अशा रीतीने तो ह्या मित्रमंडळींची बोळवण करी व आपल्या घरातील राहणीबद्दल चांगली कल्पना करून ती मंडळी जात.

हळदीकुंकवाच्या दिवशी महाराजांच्या हे लक्षात आले. शिवाय टिळकांची दानप्रवृत्ती त्यांना ऐकून ठाऊक होती. टिळकांनी आपल्याकडे रोजच्या रोज यावे असे त्यांना वाटे. तेव्हा त्यांनी पगार घरी हातात पडून टिळकांच्याही हातात पैसा राहावा व त्यांनी रोजच्या रोज आपल्याला भेटावे म्हणून एक युक्ती योजली.

ते म्हणाले, "टिळक तुम्ही माझ्याकडे येऊन रोज दोन रुपये घेऊन जात जा. मात्र ते मी दुसऱ्या कोणाला देणार नाही; तुम्ही स्वतःच आले पाहिजे."

टिळकांनी ते नाकारले व ते नेहमीप्रमाणे राहू लागले.

वागीश्वरीच्या जानेवारी १९३४ च्या अंकात श्री. बापूसाहेब भवाळकर ह्यांनी जी एक वाङ्मयसूची दिलेली आहे. तीत टिळकांच्या लेखनापैकी खालील लेखनांचा उल्लेख आहे. हे सर्व लेखन १८८७ पासून १८९२ पर्यंतचे व नागपूरचे असावे.

परंतु ह्यातील आनंदराव नाटक मुंबईस लिहिलेले होते व तेथेच छापले होते. बोध आणि रंजन नावाचे गोष्टीचे पुस्तक १९०७–०८ साली ख्रिस्ती झाल्यानंतर ट्रॅक्ट व बुक सोसायटीने प्रसिद्ध केले आहे. ते व रा. भवाळकर म्हणतात ते एकच की काय समजत नाही. शिवाय नावात घोटाळा होण्यासारखे आणखी एक पुस्तक 'आमच्या विधवा' (कादंबरी) ख्रिस्ती झाल्यावर त्यांनी लिहिले होते व तेही ट्रॅक्ट व बुक सोसायटीमधून प्रसिद्ध केले होते.

(पहिले) बापाचे अश्रू (काव्य), माझा ओसाड पडलेला गाव (काव्य), तीन विधवा (कादंबरी), वीरकन्या (कादंबरी), आनंदराव (नाटक), गोदुःखविमोचन (नाटक), बोध व रंजन ( ? ), काव्यकुसुमाञ्जली (कवितांचे मासिक), विविधविषयतरंगिणी (मासिक), ऋषी (मासिक)

## १७ : वेडा झालो पुरा गड्यांनो

माझे दिवस भरत आले. मला माहेरी आणून घातली. माहेरी आता आत्याबाईच होती. मामांच्या मागे त्यांच्या इस्टेटीची वाताहात होऊन घर सावकारांनी जप्त केले. तेव्हा आम्ही दोघी माझ्या भावाकडे राहण्यास आलो. पेंडशांची बदली कळवणास झाली होती. मी जलालपुरास आल्याचे कळताच भिकूताई मजसाठी जलालपुरास येऊन राहिली. माझ्या आठवणीत ती आपले घर सोडून कधीच बाहेर राहिली नव्हती. माहेरीसुद्धा ती कधी जात नसे. पण माझ्या ह्या बाळंतपणात दोन-तीन महिने ती जलालपुरास येऊन राहिली. मला मुलगी झाली. मुलीचे नाव नर्मदा ठेवले. आम्ही तिला माई म्हणत असू. फार गोड मुलगी होती ती. टिळकांच्या जवळून मी दूर गेले की बहुतकरून ते आपल्या नोकरीचे दान व संसाराची दक्षिणा देऊन माझ्या मागोमाग बाहेर पडत. तसेच ह्याही वेळेस झाले. बहुतकरून ह्या दानदक्षिणेत घरात एखादा फुटका तांब्याही राहत नसे. त्यांना धामकच्या आपल्या गुरूंची आठवण झाली व ते पुन्हा लिंबाच्या पानांवर राहू लागले.

मुलगी तीन महिन्यांची झाली. एके दिवशी संध्याकाळी टिळक आले. बरोबर एक बॅग होती. तिच्यातून लुगड्यांच्या घड्यांसारखे काहीसे दिसत होते. पोरे हिशेब करू लागली. एक माईंना, दोन माझ्या भावजयींना, मला एकदोन, अशी ही लुगडी असावी ? टिळक बॅग पुढे घेऊन बसले. पुढे मुले जमली, बॅग उघडली. पण लुगड्यांऐवजी त्यातून मोठमोठ्या कोऱ्या वह्या निघाल्या ! हिच्यातल्या एका कोऱ्या वहीतून त्यांनी अगदी कल्पनेने संपूर्ण सावित्री आख्यान वाचून दाखविले ! जणू काय लिहिलेलेच वाचीत आहेत ! वाचन झाल्यानंतर वही उघडून पाहिली तर सर्व पाने कोरी !

भिकूताई गेल्यानंतर त्यांच्या पाठोपाठ पेंडशांचे टिळकांना तात-

डीचे पत्र आले, की सहकुटुंब सहपरिवार कळवणला आमच्या घरी राहण्यास यावे. अर्थात हे आमंत्रण स्वीकारून आम्ही कळवणला पोचलो.

टिळक बोलता बोलता कविता करतात. ते आपणावरही कविता करतील अशी माईंना फार भीती वाटत असे. म्हणून ती त्यांच्यापुढे फारच क्वचित येई. कळवणात टिळक आल्यावर घारूमाई तेवढी त्यांच्याशी बोलण्यास रिकामी होती. नानासाहेब कचेरीच्या कामात, भिकूताई घरातल्या कामात. राहता राहिलो मी व घारूमाई. मी मुलीच्या गडबडीत. तेव्हा घारूमाईची व टिळकांची पूर्वीचीच गट्टी आणखी दृढ झाली.

नबीला भिकूताईने मनगटच्या, हासळी, बिंदली वगैरे बाळलेणे केले होते. एक दिवस घारूमाई टिळकांजवळ हट्ट घेऊन बसली, की दुसऱ्यांच्या मावशा आपल्या भाच्यांना दागिने करून देतात, तसे तुम्ही मला दागिने करून द्या. टिळकांनी कागद व पेन्सिल घेऊन तिला कोणकोणते दागिने पाहिजे होते, त्यांची यादी करून घेतली. मग थोड्या वेळात दागिने घेऊन जा, असे सांगून तिला त्यांनी आत पाठवून दिली. घारूमाई आपले दागिने व तेही इतक्या झटपट तयार होणारे दागिने कसे काय असतील. ह्या उत्सुकतेने मधूनमधून टिळकांच्या खोलीत जाता येता डोकावीत होती. टिळक मात्र आपल्या लिहिण्यात गढून गेलेले दिसत होते.

शेवटी एकदाचे दागिने तयार झाले व घारूमाईला टिळकांनी हाक मारली. दागिने तिला दिले. तिलाही फारच आनंद वाटला. दागिने अगदी सारे तिला पाहिजे होते ते एकूण एक होते. घरचाच कारागीर असल्यावर मग काय पाहायला पाहिजे. हे ते दागिने :–

**पतिप्रेम ह्या मंगलसूत्रे कंठ किती शोभला**
**क्षमा शांति धृती सरी गळसरी ठुशी आवडे मला**
**नवविध भक्ती नवरत्नांचा हार नसे ज्या तुला**
**सखि अनसूया मौक्तिकमाला शोभे अतिनिर्मला**

समाधि सागर धुंडाळिला
बोध हा सापडला शिंपला
त्यातुनी घेऊनी मोते मला

नथ केली ती देते वदना प्रसन्नता चांगली
किति योगीजन–सुवर्णकारी बहुश्रमे गुंफिली
व्यर्थ भार हे इतर दागिने माझि भूषणे भली
अक्षय निर्मल अनर्घ्य यांना कोण धनानें तुली ॥१॥
समाधानवृत्तीची बिंदी, विवेक हा बिजवरा
मर्यादा मुद फुले नीतिची भाव नाग साजिरा
गुरुवचने मधु कर्णभूषणे दूर न करिते जरा
सदुपदेश हा मला आवडे प्राणांहुन गे हिरा

पायीं विनयाचे तोडर
जपुनी चालतसे भूवर
जोडवी फुले किती सुंदर

भूतदया ही करांत माझ्या शोभतसे पाटली
दान शौर्य जोडुनि भूषणे घडली हातांतली

घारूमाईला हे दागिने फार आवडले. तिने तो दागिन्यांचा करंडा-कागद– उचलून माजघरात दौड मारली.

घारूमाई आत आली तेव्हा मी व भिकूताई नबीच्या बाळलेण्याचे कौतुक करीत बसलो होतो. घारूमाई म्हणाली,

"आई, मलाही टिळकांनी कितीतरी दागिने करून दिले आहेत पहा. तुला वाचून दाखविते," असे म्हणून तिने सर्व कविता वाचून दाखविली. आपली कविता आपल्या मेहुणीला कशी काय आवडली हे पाहण्यास टिळक मागे दारात येऊन उभेच राहिले होते. पण भिकूताईने त्यांना उभे असलेले पाहिले नाही. लेकीने कविता वाचून दाखविल्यावर तिने एक लांब उसासा टाकला व म्हटले,

" काय करावे ? इतके शहाणपण असून काय उपयोग आहे ? इतका शिकला-पढला, पण पदरी एक रुकासुद्धा नाही. एखाद्या नगड-दरवेशाप्रमाणे बायकोला घेऊन दारोदार फिरतात ! घरात नेहमी नकारघंटा असते. करायचे काय ? बांगड्या भरा त्याला ! "

टिळकांनी हे सर्व ऐकले व ते तसेच मागल्या पावली जाऊन पासोडी घेऊन गुरफटून ओसरीवर पडले.

त्याच दिवशी पेंडशांच्या घरी एक ज्योतिषी आला होता. ज्योतिषी-बोवांना घरातील मंडळीची फारशी माहिती नव्हती. भिकूताईंनी त्यांना घरातील सर्व मंडळींचे हात दाखविले. घरातील स्वैपाकी ' अय्या ' होता. मोठा ऐटबाज पोषाख करायचा तो. त्याचा हात दाखविला. बुवांनी मोठी गंभीर मुद्रा करून विद्या पुष्कळ आहे, नावलौकिक पुष्कळ मिळेल वगैरे त्याला सांगितले.

पलीकडे पासोडीत डोके खुपसून टिळक पडले होते. त्यांच्याकडे हात करून भिकूताई म्हणाली, " पहा, त्यांच्या नशिबात काय आहे ते तरी पाहू या. "

बुवांनी टिळकांना पुढे येण्यास सांगितले.

टिळक पुढे आले.

" हात दाखीव. "

टिळकांनी त्यांच्यापुढे पालथा हात केला.

बुवा संतापले, " हात असा दाखवितोस का ? बोंबा मारायच्या आहेत का ? तुम्ही बोंबाच मारणार ! " टिळकांनी गपचूप सोयीचा हात दाखविला.

ज्योतिषीबुवांनी भविष्य वर्तविले,

" विद्येच्या नावाने शंख ! पैसा मुळीच नाही ! लग्न होणार नाही. "

माईंनी हळूच विचारले,

" पोरेबाळे तरी आहेत का नशिबात ? "

" अहो, बायको नाही तेथे पोरेबाळे काय घेऊन बसलात ? "

इतके झाल्यावर बुवा गेले गावात फेरीला.

संध्याकाळी पेंडसे आले. ते येताच टिळक त्यांना म्हणाले,

" नानासाहेब, तुम्ही नेहमी मला कीर्तन करण्याचा आग्रह करता, आज मला कीर्तन करण्याची हुक्की आली आहे. तेव्हा आज रात्री जेवण झाल्यावर कीर्तन ठरवा माझे. "

पेंडशांना फार आनंद झाला. मामलेदार असल्यामुळे त्यांना कीर्तनाची तयारी एका घंटचा-दीड घंटचात करणे काही अवघड नव्हते.

जेवणी झाल्यावर लोक जमू लागले. कीर्तनाला सुरुवात होणार, इतक्यात ज्योतिषीबोवा समोर येऊन बसले. पलीकडे स्त्रियांत भिकूताई बसली.

कीर्तनाला सुरुवात झाली. कीर्तनारंभी पहिलेच गाणे हे–

**माझे ग्रह फिरले ग्रह फिरले**

**भवबंधन मम तुटले ॥धृ०॥**

**मानामाना सुखदुःखाला मन्मन हे अन्तरले १**

**मायाराशिस विवेक रवि ये भलतेसलते रुचले २**

**स्वर्ग-मुक्ति–संसार सारखा हरि भजनी मन रमले ३**

**मीपण–शनिने मीपण तूपण अनुभूतिस्तव हरिले ४**

**श्रीनारायणसुरकुळटिळका नाम तुझे बा जपले ५**

पासोडी पांघरलेला पाणक्या तो हाच व अगदी आपल्याच राशीस बसू लागला हे पाहून ज्योतिषीबोवांची पाचावर धारण बसली. भिकूताईला मात्र ज्योतिषीबोवांची फजिती झालेली पाहून फार आनंद वाटला. त्या ज्योतिषीबोवांकडे टवकारून पाहू लागल्या. आपल्या मेहुण्याला त्या धन्यवाद देऊ लागल्या. इतक्यात दुसरे पद सुरू झाले.

**वेडा झालो खरा गडयांनो वेडा झालो खरा**

**कोणी म्हणती हा दरवेशी हाकलून द्या घरा**

**गडयांनो वेडा झालो खरा**

**शिकला पढला रुका न पदरी ह्यास बांगड्या भरा**
**गड्यांनो वेडा झालो खरा**
**घरात वाजे नकारघंटा दाद न त्याची जरा**
**गड्यांनो वेडा झालो खरा**

आता मात्र माईसाहेबांचे सारे हास्य लयाला गेले. तिला आपले दुपारचे बोलणे आठवले. आपला मेहुणा कधी तरी आपल्यावर कविता करून आपली फजिती करणार ही तिची भीती खरी ठरली. तिच्या मनाची स्थिती फारच चमत्कारिक झाली. रागारागाने ती उठून जाऊ लागली.

पेंडशांना मात्र ह्या दोन्ही माणसांच्या मनाची काहीच कल्पना नव्हती.

शेवटी राग थोडा शांत झाल्यावर ती म्हणाली,

" आहे, एक बहीण आहे म्हणून मेव्हणा मजवर कीर्तन करतो. बहीण मेल्यावर मेव्हणे तोंडही पाहण्यास तयार नसतात. सोसले पाहिजे. "

वरील उद्‌गार ऐकून माझ्या जिवात जीव आला. मला इकडे आड नि तिकडे विहीर असे झाले होते.

ह्यानंतर दुसऱ्याच दिवशी ज्योतिषीबोवांनी कळवणहून पोबारा केला. टिळकही लागलीच कळवण सोडून निघाले ते जलालपुरास मला व नबीला घेऊन आले.

कळवणास टिळक १८९० च्या फेब्रुवारी–मार्च महिन्यात असावे. कारण नानासाहेब व रंगराव बुद्धिबळे खेळत असता टिळकांनी तेथे बसून एक कविता लिहिली. तिच्या हस्तलिखिताखाली कळवण, १३-३-९० अशी टीप आहे. टिळकांची वृत्ती त्या वेळी कशी झाली होती, हे ह्या कवितेवरून दिसून येणारे असल्यामुळे ती येथे दिली आहे.

**बुद्धिबळातील हत्ती घोडे वजीर राजे नर दिसती**
**पूर्वकर्म खेळले तसे हे चढती पडती की मरती ध्रु०**

वीरशिरोमणि पंडित कविमणि थोर सार्वभौमिक नृपती
कृतकर्माने बद्ध दीसती थोर तपस्वी विरत यती
मी केले ! ही वृथा नरा रे मोहमयी तव जाण मती
कारण घडले तत्परिपाके होय तुझी सुगती–कुगती
स्मर नारायण यास्तव टाकुन नित्य विचारे अहंकृती

## १८ : महादेवभाऊजी

ज्योतिषीबोवांनी कळवण सोडले व त्याच्या दुसऱ्याच दिवशी आम्ही सोडले. आम्ही जलालपुरास आलो.

मला जलालपुरास ठेवून टिळकांनी सप्तश्रृंगीस जाण्याचे ठरविले. आता प्रश्न आला पैशांचा. सासूजवळ मागणे तर आता अशक्यच होते. मेव्हण्याजवळ कसे मागायचे ?

माझ्याजवळ नबीचे बाळलेणे होते; पण ते भिकूताईने केलेले. त्याला कसा हात लावायचा ? राहता राहिले एक कोरे लुगडे. टिळकांनीच घेतले होते ते. ते त्यांच्याजवळ देऊन मी म्हटले, "हे दुकानदाराला परत नेऊन द्या व ते पैसे घेऊन पुढे जा."

पण टिळक ते घेईनात. मोठ्या पंचाइतीने मी ते त्यांच्या हवाली केले व टिळक गेले.

दुसऱ्या दिवशी गाडीवाल्याबरोबर लुगडे परत आले. निरोप आला की, हे लुगडे चुकून माझ्या सामानात आले होते ! खरी गोष्ट म्हणजे दुकानदाराने त्यांना खर्चाला उसने पैसे देऊन लुगडे परत केले होते.

सुरगाण्यास नाना संत नावाचे एक अत्यंत उत्कृष्ट वैद्य होते. त्यांचे बिऱ्हाड वणीस होते. नानासाहेबांचा टिळकांवर फार जीव असे. टिळ-

कांनी त्यांच्याकडून त्यांची विद्या थोडीबहुत हस्तगत करून घेतली. मात्र टिळक आपल्या वैद्यकीवर पैसे मिळवीत नसत. ह्या दोघा गुरुशिष्यांच्या संगनमताने टिळकांनी आता आपले ठाणे वणीस दिले. तेथे टिळकांनी शाळा काढली. ही शाळा टिळकांच्या सर्व शाळांत अधिक उत्तम चालली. चाळीस विद्यार्थी जमले. फी एक रुपया ठेवली होती. ती ते मोठ्या आनंदाने देत. त्या काळात गुरुजींस शिष्यवर्ग जो मान देई त्याच्या शतांशानेही आता पाहण्यास मिळणार नाही.

टिळकांचे शिक्षणही काही निराळे असे. वणीतील कितीतरी बाल-गोपाल त्या वेळी कविता करू लागले होते. ह्या वर्गात इंग्रजीही शिकविण्यात येत असे.

टिळक वणीस गेल्याबरोबर त्यांनी आपले उपाध्ये रा. काकाजी मुळे ह्यांच्या घरी आपले बिऱ्हाड ठेवले व पुढेही त्यांच्याच घरात आम्ही राहू लागलो व शाळाही त्यांच्याच माडीत भरे. काकाजींची आई व बायको ह्या फार प्रेमळ बायका होत्या. टिळक गेल्यानंतर एक महिन्याने मी व नबी वणीस गेलो. तेथे आम्हाला अगदी घरच्यासारखे वाटू लागले. हे जरी आमचे उपाध्ये होते तरी तेथे आम्हाला परकेपणा असा इतका-सुद्धा वाटला नाही.

टिळकांचे नबीवर अतिशय प्रेम होते. तिला आम्ही माई म्हणत होतो. त्याच सुमाराला डॉ. आनंदीबाई जोशी ह्या अमेरिकेस गेल्या होत्या व त्यांच्या संबंधाने नेहमी वर्तमानपत्रांत काही ना काही येत असे. टिळक म्हणत, आनंदीबाईसारखी ही शिकणार. ती पोरगीही फार गोड होती. तिचे लाडही करायला हवी तेवढी माणसे होती. आम्ही तर सोडूनच द्या, पण काकाजींच्या घरची सारी माणसे, शिवाय चाळीस विद्यार्थी तिचे कौतुक करायला होते. तेथे बापूसाहेब जहागीरदार होते. त्यांचा व टिळकांचाही चांगला स्नेह होता. टिळक नबीला शाळेत नेत. नबी सुंदर होती. माझ्याजवळ आल्यावर ही माझीच मुलगी, असे कोणी म्हटलेसुद्धा नसते.

वणीस देवीच्या धर्मशाळेत जाऊन टिळकांनी तेथे सापडतील त्या भुकेल्या माणसांना आणून अन्नपाणी द्यावे, कोणाला कपडे द्यावे, कोणाला

औषधपाणी करावे, अशा रीतीने पैसे मिळतील त्यांची विल्हेवाट लागत असे. वणी खेडेगाव असल्याने अगदी मनुष्याच्या गरजेपुरतेच तेथे मिळे व त्यामुळे इतर खर्च होण्याचा संभवच नव्हता. टिळकांप्रमाणेच त्यांचे सर्वांत धाकटे बंधू महादेवभाऊजी होते. किंबहुना एक काकणभर अधिकच म्हटले तरी चालेल ! एक दिवस महादेवभाऊजी जलालपुरास गेले. एका धोतराखेरीज त्यांच्या अंगाबर दुसरी चिंधीसुद्धा नव्हती. डोक्यावर टोपी नव्हती. की पायात जोडा नव्हता. त्यांनी हे सगळे कोणालातरी देऊन टाकले होते. नागपुरास भाऊजी ह्या वेळेस कॉलेजमध्ये शिकत होते. तेथून सुटी झाली म्हणून ते वणीस येण्यास निघाले होते, वाटेत आत्याबाईला भेटून जावे म्हणून ते जलालपुरास गेले.

आत्याबाईंनी त्यांना विचारले, " अरे महादेवा, तू फक्त नुसत्या नेसू धोतरानिशी कसा आलास ?"

भाऊजींनी म्हटले, " आत्याबाई, मला आगगाडीत झोप लागली. तेव्हा माझी चोरी झाली. सारे काही चोरीस गेले. "

पण ह्या बोलण्यावर विश्वास कसा बसायचा ?

आत्याबाई म्हणाली, " महादेव, अरे तू जरी झोपेत असलास तरी तुझ्या अंगातले रे कसे कोण काढील ?"

भाऊजींचा हा स्वभावच ! कोणी अडचणीत पाहिला की त्यांनी जवळ असेल नसेल ते देऊन टाकावे व मग कोणी विचारले म्हणजे अशा थापा माराव्या.

नागपुरास ते मांझ्या एकदा मागे लागले की, " वहिनी, मला रेशीमकाठी धोतराची फार हौस आहे. मला एक रेशीमकाठी धोतर घे."

धोतर घेतल्यानंतर दोन-चार दिवसांत ते दिसेनासे झाले. मी सारे घर शोधले. तेही मजबरोबर शोधू लागले. दुसऱ्या दिवशी एक गोंधळी आला. त्याच्या अंगावर ते धोतर ! मी भाऊजींच्या अंगी लावले तेव्हा त्यांनी कबूल केले, की धोतर आपण त्या गोंधळ्याला दिले म्हणून.

असो. आत्याबाईने मामांचे काही कपडे भाऊजींना देऊन त्यांची वणीस रवानगी केली. आता तर काय, आमच्या घरात एकसे दो भले झाले. दोघांनीही घरातील जिनसा, कपडे बाहेर कोणाला लागतील

त्याना नेऊन देण्याचा सपाटा लावला.

एक दिवस घरातला तांब्या नाहीसा झाला. तांब्या काय झाला, तांब्या काय झाला, म्हणून मी ओरड केली व टिळकांच्या मागे भुणभुण लावली, तुम्हीच तो कोणालातरी दिला. असे मी त्यांच्या अंगी लावण्याचा प्रयत्न करी; पण ते काही पत्ता सांगू देत ना,

एक दिवस मी दळीत बसले होते. तेथे भाऊजी आले व त्यांनी जात्याचा खुंटा धरला. " वहिनी, तुम्हाला राग येईल का ? तुम्ही नानांना बोलू नका. तांब्या मी एका गरिबाला दिला."

खरा प्रकार कळल्यावर मला हसू आले. मी म्हणाले, " भाऊजी, तुम्ही अगोदर का नाही सांगितले ?"

" तुम्ही रागवाल म्हणून. वहिनी, तुमची मला फार भीती वाटते."

एक दिवस रात्रीचे गडावर जाण्याचे भाऊजींनी ठरविले. त्यांच्याबरोबर त्यांचे एक मित्र जाणार होते.

भाऊजी माझ्याकडे येऊन गयावया करू लागले की, " वहिनी, तुमची धाबळी द्या. "

मी सांगितले, " मी देणार नाही. तुम्ही ती कोणाला तरी देऊन टाकाल."

त्यावर त्यांनी आणखी गयावया केली. कबूल केले, की, " धाबळी कोणाला देणार नाही. अगदी तुमच्या हातात आणून देईन."

शेवटी त्यांनी धाबळी नेली व ती देऊन टाकली. मला त्यांचा ह्या गुणामुळे फार राग येई व मी रागावते म्हणून ते मला फार भीत.

नागपुरास असताना भाऊजींना पुष्कळ मुली सांगून आल्या होत्या, पण ते लग्नाला कबूल होत ना. ते म्हणत, " वहिनी, तुम्ही उगीच कशाला काळजी लावून घेता ?"

ह्या त्यांच्या बोलण्यामुळे माझ्या पोटात धस्स होई. पण व्हायचे ते झाले. त्यांना जणू स्वप्नच पडले होते.

एक दिवस भाऊजी नागपुरास परत गेल्यावर वासुदेवराव पटवर्धनांचे पत्र आले, की भाऊजी विषमाने आजारी असून त्यांनी माझा, आत्याबाईंचा व टिळकांचा ध्यास घेतला आहे. आम्ही सर्वांनी निघण्याची तयारी केली. पण दुसऱ्याच दिवशी तार आली की, भाऊजी

आम्हाला सोडून देवाघरी चालते झाले. भाऊजींचे लग्न केले असते तर केवढा अनर्थ झाला असता, हे आता आम्हाला कळले. अशी माणसे देव आपल्याकडे लवकर नेतो म्हणतात ते खोटे नाही.

वणीस असताना टिळकांनी 'देवीचा प्रसाद' नावाचे कवितांचे पुस्तक लिहिले. ते वणीच्या जहागीरदारांनी छापून प्रसिद्ध केले.

वणीस नाना संत आमच्या घरी नेहमी येऊन बसत. ते म्हणत, "जेवण झाल्यावर मला जशी पानसुपारी लागते, तसे तुमचे एखादे भांडण ऐकण्यास बरे वाटते. मोठी मौजेची तुमची भांडणे असतात."

आणि आम्ही खरोखरच नेहमी भांडत होतो. आमच्या भांडणाचे विषयही विविध असत.

वणीस एकदा चोरांचा फार सुळसुळाट झाला होता. टिळकांनी चोर पकडण्याची युक्ती काढली. ती मला पसंत पडली नाही. झाले ! कडाक्याचे भांडण ! त्यांची युक्ती अशी होती, की घराच्या दाराजवळ एक मोठा खड्डा खणावा. त्यात पानसाबर टाकावी. वर एक मोठी पत्रावळ– त्या कार्यासाठी मुद्दाम बनविलेली– टाकावी. मग चोर आला की पडेल आतमध्ये.

मी म्हणे, "चोरच कशावरून पडेल ? तुम्ही किंवा मीच कशावरून नाही पडणार ? दुसरे असे, की खड्डा खणताना गावातील लोकांना दिसणार नाही कशावरून ?"

"मी सांगतो, तसे कधी होणार नाही !"

यानंतर झाली भांडणाला सुरुवात आणि नाना संत बसले येऊन गंमत पाहत. असे नेहमी चालायचे.

राग, प्रेमळपणा, दयालुत्व व थोडासा विक्षिप्तपणा ही सारी ह्या दोघाही भावांच्या अंगी होती. नागपुरास असताना एकदा टिळक कोठेसे गेले होते. घरात काही सामान नव्हते. महादेवभाऊजी व मी, असे आम्ही दोघेच घरी. माझ्याजवळ दोन रुपये होते. ते भाऊजींच्या हवाली करून मी सांगितले, "भाऊंजी, अमुक अमुक सामान आणा."

भाऊजी बाजारात गेले व दोन रुपयांची तूपसाखरच घेऊन आले. शिवाय बरोबर हजामत करण्यास न्हावी घेऊन आले. मला त्यांचा

इतका संताप आला, की मी त्यांना म्हटले, "न्हावी राहिला बाजूला, आता मीच तुमची चांगली हजामत करते! आता का नुसती तूप-साखर खाऊन दिवस काढायचे? जा, मी जीवच देते!"

असे म्हणून मी वर माडीवर जाऊन बसले. अर्थात जीव देण्याचा माझा मुळीच हेतू नव्हता. तशी मी फार जिवट स्वभावाची व चिवट शरीराची आहे. भाऊजी खाली तोंड फुगवून बसले व मी माडीवर जाऊन बसले. माझी काही गडबड ऐकू येईना, तेव्हा ते घाबरले व बागेतल्या विहिरीतून डोकावून पाहू लागले. मी माडीवरून सारी गंमत पाहत होते. माझा पत्ता लागेना, तेव्हा ते मोठमोठ्याने गळा काढून रडू लागले.

"अग वहिनी, तू कसा ग जीव दिलास? आता नानांना मी काय सांगू? कोठे ग तू जीव दिलास?"

शेवटी मला राहवेना व मी खाली आले. मला पाहताच भाऊ-जींनी मोठ्याने रडून माझे पाय धरले. "वहिनी, मी आता कधी नाही ग असे करायचा!"

मला त्यांचा खरा स्वभाव तेव्हा कळला नव्हता, म्हणून अशा साधुपुरुषाचा मला राग येई. आता त्यांची खरी किंमत कळते.

असो. भाऊजींनी वचन दिले, ते रडले, तरी त्यांचे होते ते होतेच. नागपुरास मामंजी वारल्याची बातमी आली तेव्हा भाऊजींना बाजारात पाठविले. बाराव्या-तेराव्याचे ब्राह्मण बोलावले होते. भाऊजी बाजा-रात गेले. बाजार आणला. टिळक व भाऊजी ह्या दोघांजवळून मी हिशोब घेत असे. कारण ते काय व कसा खर्च करतील ह्याचा नेमच नसे. भाऊजींनी सारा हिशोब चोख दिला, पण चार आण्यांचा हिशोब त्यांना देता येईना! शेवटी कबूल केले, की दोन आणे एका भिका-ऱ्याला दिले व दोन आण्यांची जिलबी घेऊन खाल्ली.

"भाऊजी, आज जिलबी घेऊन खाल्लीत? तुम्हाला काही वाटते का सांगायला?"

"वहिनी, मग मी काय करू बरं? मला भूक लागली."

"पण भाऊजी, अजून सारं व्हायचं राहिलं आहे. ब्राह्मण जेवले

नाहीत. आणि तुमचे वडील वारलेले; तुम्ही गोड हो कसे खाल्ले ?"

"ते दूर वारले वहिनी !"

मला खरोखरच त्यांच्या असल्या काही कृत्यांचा अर्थच कळत नसे.

माझा पहिला मुलगा वारला तेव्हा भाऊजीच आम्हाला आमच्या मुलासारखे वाटत. त्याच वेळची आणखी एक गोष्ट आठवते. मुलाची मला फार आठवण येत असे व नेहमी रडायला येत असे. तेव्हा टिळकांनी मला एक राघूचे पिल्लू आणून दिले होते. त्या पिल्लाचा पुढे मोठा राघू झाला. त्याला टिळकांनी संस्कृत शिकविले होते. पण 'भो भो महादेव' एवढेच तो म्हणत असे. त्यातील 'महा–देए–व' असे मोठे आळवून म्हणे. ह्या पोपटाला मी कसे सांभाळले, हे टिळकांनी कवितेत लिहून ठेवले आहे. संपूर्ण कविता हाती लागली नाही. ही कविता पुढे तो पोपट उडून गेल्यावर केली होती.

**पर न रे फुटले तनुला पुरे**
**दिसतसे तनुचे मृदु मांस रे**
**मृदुल चोच तुझी शुकबालका**
**स्मरण त्या स्थितिचे तुज होय का १**

**चंचु तेव्हा रचुनि अपुल्या दोन हस्तांगुलांची**
**चारा बाळा तुज भरविला ! व्यर्थ माया मनाची**
**माझ्या जिव्हेवरुनि कितिदा भक्षिले सांग भक्ष्य**
**क्रूरा तेव्हा डसशि परि मी त्यास केले अलक्ष्य २**

**रात्री तूते हृदयि अपुल्या घेउनी मी निजावे**
**वेळोवेळी दचकुन तुझ्या चिंतनाने उठावे !**
**पोरालाही इतुकि जपले पोटच्या मी न ऐशी**
**हा ! हा ! कीरा ! तुजशि जपले निर्दया, साच तैशी ३**

उत्साहाने पाहटेला उठावे
बोलायाला मी तुला शीकवावे
मध्ये मध्ये कामकाजा त्यजावे
घेवोनीया तूजलागी रमावे ४

किति ममत्व तरी तव लागले
घडिभरी तुजला न विसंबले
उपवनी फिरता असता घरी
तुजशि बाळगिलेच करी उरी ५

देवास नैवेद्य न दाखवीला
प्रियास वा अर्पित नाहि केला
पदार्थ गेहात नवीन झाला
आधी तरी तो तुज चारियेला ६

उपजताच किरात धरी तुला
जननिला मुकशी अबला मुला
समजुनी द्रवले मन हे अती
तुज शुका बघुनी रडले किती ७

प्रथम पृष्ठिवरी पर पातले
हळु हळू सगळे वपु झाकले
चिमुकले फुटले तुज पांख रे
जननिचे सुख हो मजला खरे ८

हळु हळू उडण्या बळ यें तुला
मम सुखा मग साच नुरे तुला
रुचिर पूर्ण दशागत रूप रे
तव मुला भुलवी मजला पुरे ९

हा आमचा आवडता राघू पुढे एक दिवस पाहता पाहता उडून गेला. आम्हा तिघांना अतिशय दुःख झाले.

मधूनमधून तो परत येई व उंच झाडावर बसून म्हणे,

" भो भो महा–देए–व "

तेव्हा आम्हा सगळ्यांना आनंद व्हावा; पण एकदोनदा भाऊजींना हाका मारून त्याने निघून जावे.

शेवटी आमचाही पोपट आम्हाला असाच सोडून जाईल, अशी कल्पना नव्हती. प्रो. पटवर्धनांची तार येऊन ती खरी झाली. काही काळ आमचा आनंद पार मावळला व नाना संतांना आमची भांडणे ऐकायला मिळेनाशी झाली.

## १९ : दत्तूचा जन्म

टिळकांना मुलीची फार हौस. देवाने मुलगी दिली. ती सुंदर, बुद्धिमान, बाळसेदार व अतिशय गोड स्वभावाची दिली. तिचा आवाज मंजुळ होता. तिचे बोबडे बोल सर्वांना वेडे करीत. टिळकांची मनीषा तृप्त झाली. त्यांना साऱ्या जगात आपले असे दुसरे मौल्यवान तिच्यावाचून काही उरले नव्हते. आमच्या नबूताईला ताप आला. निमित्त नव्या तांदळाचा मोदक खाल्ल्याचे झाले. पण ती आम्हाला इतकी चटकन सोडून जाईल अशी मात्र कोणाला कल्पनाही नव्हती. टिळक तर आदल्या दिवशी नाशकास काही कामानिमित्त जाण्यास निघाले होते. थोडेसे गेले नाहीत तो वाटेत त्यांना एक फकीर भेटला व त्याने त्यांना वाटेतून परतविले. घरी आल्यावर माईने त्यांना 'देवीचा प्रसाद' काव्यातील गाणी म्हणण्यास लावले. ती गाणी तिला फार आवडत.

स्मृ... ८

शेवटी आमची मुलगी आम्हाला सोडून गेली. त्या वेळी रा. शंकर बळवंत कुलकर्णी हे आमच्या येथे होते. ते लहान होते. आम्ही दोघेही दुःखाने अगदी वेडावून गेलो. टिळकांच्या दुःखाला तर अगदी सीमा राहिली नाही. नबीबद्दल त्यांच्या केवढाल्या आशा-उमेदी होत्या ! पण त्या सगळ्या अगदी रसातळाला पोचल्या.

एक दिवस खिन्न मनाने टिळक माडीवर नाना संतांशी बोलत बसले होते. मी खालून जिन्यातून वर येत होते. त्यांचे बोलणे मला ऐकू येत होते.

टिळक म्हणाले, "नानासाहेब, काय हो माझी बायको खरोखरच राक्षसीण आहे ! अहो, तिने माझा मुलगा, मुलगी, बाप, भाऊ, बहीण अशी कितीतरी माणसे खाल्ली !"

"खरेच सांगा, राक्षसिणीचे लग्न कोणाबरोबर होते ?" मी वर पोचताच नानासाहेबांना प्रश्न केला. "अहो, ह्यांनी माझा मुलगा, मुलगी, आई, बाप, दत्तक बाप, आत्या, सासरा, दीर, नणंद अशी कितीतरी माणसे खाल्ली. मी ह्यांची खाल्ली त्यापेक्षा कितीतरी अधिक माणसे ह्यांनी माझी खाल्ली आहेत."

टिळक गप्प बसले. त्यापुढे त्यांनी कधी जन्मात असले अभद्र शब्द उच्चारले नाहीत, की असली अभद्र कल्पना मनात आणली नाही.

काही दिवस गेले. भाऊजींबद्दलचे व माईबद्दलचे दुःख ओसरले. मला माहेरी जाण्याची वेळ आली. मी म्हणे, "मी जात नाही. मामा वारले. आत्याबाई दुसऱ्यांकडे."

पण त्यांचा आग्रह की, "जा. मी पैसे पाठवीन."

आणि आता पैसेही बरे मिळत होते. आमचा हा वाद चालला आहे तोच माझ्या भावाचे पत्र आले, की सौभाग्यवती प्रसूत होऊन मुलगा झाला. उभयता बारशाला यावे.

आता टिळकांचा फारच आग्रह सुरू झाला. "पहा, तुझ्या भाच्याच्या बारशाला गेली नाहीस तर फार वाईट दिसेल. तशात हा तुझ्या भावाचा पहिलाच मुलगा. पुढे जायचे म्हणालीस तर बैलगाडीची दगदग तुला सोसणार नाही."

हो–ना करता करता माझी तयारी झाली. मी घरात तयार केलेले सर्व सामान घेतले. आम्ही एक गाडी भरली व निघालो.

जलालपुरास पोचलो तो शनिवार ! अमावस्या ! तशात घरात पाचवी ! आत्याबाई म्हणे, "घरात जाऊ नको."

मी सांगितले, "मी जाणार. मला माझ्या भावजयीची पाचवी बाधते ! आणि माझ्या वेळेस ती पाचवीला कोठे जाईल ?"

मी आत्याबाईचे मुळीच ऐकले नाही. सरळ भावाच्या घरी जाऊन राहिले. टिळक परत गेले. महिना-दीड महिन्यांनी ते पुन्हा जलालपुरास आले. माझ्या पोटात धस्स झाले. मला वाटले, नेहमीच्या रिवाजाप्रमाणे सर्वस्वावर तुळशीपत्र ठेवून हे वणीहून आले असावे. पण तसे काही नव्हते. ह्या वेळेस टिळकांचा खिसा चांगलाच गरम होता. संध्याकाळची वेळ होती. घरात आंब्यांच्या आढ्या लावल्या होत्या. त्यामुळे गोड वास चहूकडे दरवळला होता. संध्याकाळी गुरे घरी आली. त्यांच्या मागोमाग माझे धाकटे बंधू विष्णुकाका घरी आले. गुरांना चारा वगैरे सोडून ते टिळकांपुढे येऊन बसले.

"टिळक, माझे दुखते आहे पोट आज. तुम्ही मोठ्या राजवैद्यांपाशी त्यांची कला शिकलात म्हणून ऐकले. पहा पाहू माझी नाडी."

टिळकांनी नाडी पाहून सांगितले की, "आज आंब्याचा रस व कांद्याची भजी जरा अधिक झाली आहेत."

"वा वा ! तुम्ही वैद्यलोक मोठे चाणाक्ष असता. घरात आंब्याचा वास येतो आहे. शिवाय आज कांदेनवमी आहे. तेव्हा खूप बेत जमला. इकडे-तिकडे पाहून ठरवायचे. शेजारी बत्ता पडला असला की रोग्याने बत्ता खाल्ला म्हणून ठोकून द्यावयाचे. तसे नाही. मनीची नाडी पाहून तिची केव्हा सुटका होईल ते बरोबर सांगा, तर म्हणेन खरी. ये ग मने बाहेर. आता यांची परीक्षा पाहू."

"मी सांगतो, पण माझे बरोबर झाले तर तुम्ही पेढे दिले पाहिजेत. नाही तर मी देईन." ह्या अटीवर माझी नाडी पाहण्याचे ठरले.

मी बाहेर येऊन बसले. मला त्या दिवशी बरे नव्हते, पण ते मी कोणाला सांगितले नव्हते. टिळकांनी माझी नाडी पाहून सांगितले की,

" उद्या दुपारी दोन वाजता ही प्रसूत होईल व मुलगा होईल."

दुसऱ्या दिवशी दोन वाजता माझी सुटका झाली व मुलगा झाला. पहिल्या दोन खेपेला टिळक जवळ नव्हते, पण ह्या खेपेला होते. मी फार आजारी पडले. ती पहिली आषाढी दशमी होती. मुसळधार पाऊस पडत होता. पण तेवढ्या पावसात टिळक नाशकास गेले व तेथून त्यांनी मोठ्या फीचा डॉक्टर आणला. शिवाय त्याच्या टांग्याचे भाडेही टिळकांना द्यावे लागले.

पहिली दोन मुले गेली म्हणून हा तिसरा मुलगा मी माझ्या भावजयीच्या ओटीत घातला. मुलाला पाहताच तिला पान्हा फुटला. तिचा मुलगा सहा महिन्यांचा होता. ती आत्याबाईला म्हणे, " सासूबाई, त्याला मी आत्ताच घेते."

ती म्हणे, " असे म्हणू नये. त्याची आई सुखरूप राहो. "

हे अगदी कृष्णासारखे झाले. देवकीचा पुत्र पण यशोदेने सांभाळला. भावजयीने तीन महिने व वणीस आणखी दोघींनी तीन-चार महिने त्याला सांभाळला.

टिळकांनी दहा दिवस वाजंत्री लावली. दहा रुपयांचे पेढे वाटले. भावांनी जेवण दिले. तेराव्या दिवशी नाव ठेवले व टिळक वणीला गेले. पाळण्यात मुलाचे नाव दत्तात्रय ठेवले.

रमावहिनीजवळ तो राही. मजजवळ किंवा आत्याबाईंजवळ रडे ! हा असे काय करतो म्हणून आत्याबाईला कसेसेच वाटे. एक दिवस तिला स्वप्न पडले, की गोविंदरावमामा जसे तिला म्हणताहेत की, टिळकांचा जीव संसारात नाही म्हणून मनूकडे मी आलो आहे. आत्याबाईंच्या मनाने घेतले, की गोविंदरावमामा पोटी आले. तिने पुन्हा वाजंत्री लावली, पेढे वाटले, बारसे केले व दत्तूचे नाव गोविंद ठेवले. ह्या मुलाला पुढे आणखीही तीन नावे मिळाली.

वणीस काकाजींच्या आईने माझ्याबद्दल नवस केला होता. तो फेडताना अंबादास नाव ठेवले. पुढे मुलगा दोन-अडीच वर्षांचा झाल्यानंतर आम्ही राजनांदगावला गेलो. तिथे टिळकांची एका बंगाली डॉक्टरांशी मैत्री जमली. त्यांच्या आग्रहावरून आम्ही दत्तूला शरच्चंद्र म्हणू

लागलो. आणि पुढे ही सारीच नावे पडून देवानेच दिलेला म्हणून देव-दत्त असे बाप्तिस्म्याच्या वेळी त्याचे पाचव्यांदा नाव बदलण्यात आले. मात्र नेहमी आम्ही त्याला दत्तूच म्हणू लागलो.

## २० : माझा आजार

असो. तीन महिने पुरे झाल्यावर मला नेण्यासाठी टिळकांनी वणीहून गाडी पाठविली. बरोबर माझ्या भावजयीच्या मुलासाठी व दत्तूसाठी अंगडी, टोपडी, खण, आत्याबाईला लुगडे वगैरे सामान पाठविले. पण गाडी पाहताच आत्याबाई रागावली. आज कोजागिरी पौर्णिमा आहे. आज मी मनीला पाठवीत नाही. मुलगा पाच महिन्यांचा झाला म्हणजे घेऊन जा म्हणावे, असा निरोप देऊन गाडी परत पाठवून दिली. गाडी गेली.

तावडतोब टिळकांचे रागारागाचे पत्र आले, की पत्र पाहताच निघून ये, न आलीस तर मी आपले तोंड तुला दाखविणार नाही.

मी घाबरून गेले. भावाने गाडी करून दिली. मी एकटीच दत्तूला घेऊन गेले. पण वणीस मी पोचते तो टिळक सखारामभाऊजींकडे गेल्याचे कळले. पंधरा दिवसांनी ते परत आले.

मुलगी वारली तेव्हा काकाजींच्या आईने नवस केला होता, की आता जर मनूताईला मुलगा झाला तर त्याचा पाळणा गडावर घालून त्याचे नाव अंबादास ठेवू. त्याचे वजन करून त्याच्या भारंभार गूळ वाटू व पाचव्या वर्षी त्याचे जावळ गडावर काढू. त्याचे नाव ठेवण्यासाठी आत्याबाई जलालपुराहून आली. आम्ही दहा-वीस माणसे गडावर गेलो, त्यांत नाना संतही होते. ज्या दिवशी आम्ही गडावर गेलो त्याच रात्री मला तेथे ताप भरला. दुसऱ्या दिवशी तेथे जेवणावळ करायची असे

ठरले होते. नाना संतांनी माझी नाडी पाहून सांगितले," जेवणावळीच्या भानगडीत पडू नका. ताबडतोब हिला घेऊन खाली चला. ताप दोषी आहे."

मला ताप आला तो चढण्याच्या श्रमाने. जाताना मी सबंध गड चढून गेले होते. कसेतरी नाव ठेवले व डोली करून मला खाली आणले. डोलीबरोबर टिळक धावतच होते. सर्व मंडळी मागे राहिली. दत्तू आत्याबाईजवळ मागेच होता. तो सारखा रडत होता. घरी आल्यावर रात्रीही मधूनमधून ओरडत उठे. टिळक मजजवळ बसून होते. पोराने तिकडे रडून रडून आकांत मांडला. आत्याबाई त्याला अंगारेधुपारे करू लागली, पण त्याचे रडे संपेना. दुसऱ्या दिवशी काकाजींच्या मुलीने त्याला आपल्या पायांवर घेऊन डोलवायला सुरुवात केली. तिचा हात त्याच्या टोपड्यास लागला की तो अधिक किंचाळे. शेवटी तिने कुंचडे चाचपून पाहिले तो तिच्या हाताला सुई लागली. मी कशिदा काढायला घेतला होता व सुई कुंचड्याला टोचून ठेवली होती. त्याच्या डोक्याला सुई पुष्कळच बोचली होती.

आत्याबाईचा अंगारा बंद झाला. दत्तू चांगला हसू लागला. पण माझा ताप हटेना. दत्तूच्या खाण्याचे हाल होऊ लागले. पण सौ. भागीरथीबाई मुळे व सौ. पार्वतीबाई देशपांडे ह्यांनी ह्या संकटकाळी त्याला काही अंगावरचे तर काही गाईचे दूध पाजून वाचविले. तो बहुतेक दिवसभर बापूसाहेबांच्या घरी असे. रात्री त्याला आत्याबाईच्या स्वाधीन करीत. टिळक आत्याबाईंना म्हणत, त्याला जहागीरदारांच्या घरीच राहू द्या. पण ते बोलणे ऐकले म्हणजे म्हातारी फार संतापे. ती म्हणे, "मला दिवसा काम असते म्हणून मी दूर करते. मी त्याला दूर करणार नाही. त्याची आई जगलीच तर बरे. नच जगली तर मी त्याला पाठीशी बांधून मोलमजुरी करीन व त्याला सांभाळीन. तुम्ही मात्र पैसे न दिले तरी चालतील."

मला पुढे पुढे मुळीच कशाची शुद्ध राहिली नाही. टिळक एक-सारखे माझ्या बिछान्याजवळ बसून होते. नाना संतही जाऊन येऊन होतेच. एक दिवस त्यांनी टिळकांना सांगितले. "आता उद्यापर्यंत ही टिकाव धरणार नाही. आजची रात्र ही जेमतेम काढील." गाव लहान असल्याने

मंडळी भरभर जमा झाली. पुष्कळ विद्यार्थी निजावयाला आले होते

टिळकांनी नाना संतांना विचारले," ही आज रात्री अगदी खात्रीने मरणार ना ?"

"हो" म्हटल्यावर टिळकांनी विचारले, "इच्छाभेदी देऊ का हिला ?"

"संत म्हणाले, नको. तुम्ही तिचे मरण दोन तास अलीकडे आणाल."

"मरणार हे खरे ना ? मग दोन तास अगोदर आले तर काही हरकत नाही," असे काही त्यांच्याशी, काही स्वत:शी बोलून टिळकांनी मला इच्छाभेदीची गोळी दिली. नाना संतांनी तेथून पाय काढला. ते म्हणाले,

"तुम्ही वाटेल ते करा, मी जातो. मला उगीच असे वाटायला नको की ती माझ्यामुळे मेली."

टिळक माझी नाडी धरून बसले होते. पहाटे मला कल पडला. सकाळी नाना संत येऊन त्यांनी मी जगल्याचे सर्टिफिकेट दिले. टिळकांच्या धैर्याचे त्यांनी कौतुक केले. पुढे हळूहळू मला बरे वाटू लागले. माझ्या आजारात आत्याबाईने पुष्कळसे नवस केले होते. ते पुढे सर्व फेडले. काही दिवसांनी टिळकांनी मला व दत्तूला श्री. देशपांडे ह्यांच्या घरी ठेवून पुण्यास प्रयाण केले.

टिळक गेले ते तिकडेच ! महिना दीड महिना झाला– त्यांचा पत्ता नाही. पत्र नाही. हे माझ्या भावाला कळल्यावर त्याने येऊन मला व दत्तूला जलालपुरास नेले.

दत्तू आठ-नऊ महिन्यांचा झाला. मी माहेरीच होते. एक दिवस माझी भावजय म्हणाली, "काय हो वन्सं, भुतं खरंच असतात का हो ?"

मी म्हणाले, "नाही ग. ही उगीच काही कल्पना आहे."

"मग आपल्या घरी देवांत आजोबा कसे ?"

माझ्या माहेरी ओजोबांच्या नावाचा टाक करून बसविला आहे. त्यावर सर्वांचा भाव आहे. बाहेर जाता, घरात येता, लग्नकार्यात, अडीअडचणीत जे काही करायचे ते आजोबांचे नाव घेऊन करतात. आमचे त्या टाकावरून पुढे पुष्कळ बोलणे झाले व बोलता बोलता आम्ही झोपी गेलो.

आम्ही नेहमी एका दंडाळीला निजत असू. उन्हाळ्याला सुरुवात झाली होती. म्हणून त्याच दिवशी आम्ही माजघरात न निजता ओसरीवर निजलो होतो. पहाटे मला स्वप्न पडले, की आजोबा आले. मी जागी झाले. बाहेर चांदणे पिठासारखे पडले होते. त्यामुळे ओसरीवर अधिक काळोख वाटत होता. अंगणात चार भील निजले होते. विष्णूकाका ओसरीवरच्या खोलीत आतून कडी घालून निजले होते. ही खोली फळ्यांची होती. कामदारीण शेजारी दळायला गेली. तिने वाड्याला बाहेरून कडी लावून घेतली.

म्हैस नुकतीच व्याली होती. तिची चार दिवसांची पारडी ओसरीवर वहिनीच्या पायाशीच बांधली होती. तिने वहिनीचा पाय चाटला आणि वहिनीने मोठा सूर काढला. ती उठताच आत्याबाई उठली व तिने तिचे मूल आपल्या मांडीवर घेतले. तिला ती जागी करू लागली, पण तिचाही शब्द उमटेना. तीही ओय ओयच करीत होती. दोघींच्या आवाजात काहीच फरक नव्हता. मी चांगली जागी होते, पण मलाही दुसरा आवाज काढता येईना. मीही त्या दोघींमध्ये आपला सूर मिळवून दिला. बरे झाले, जवळ कुंभाराचे घर नव्हते. भाऊ शेजारच्या खोलीत फळ्यांवर लाथाबुक्क्या मारू लागला. "अरे, मला दार उघडा, म्हणजे मी एकेकाचे पाहणे पाहतो," असे तो ओरडत होता. कामदारणीच्या कानी हा आवाज जाताच ती घाबऱ्या घाबऱ्या धावत आली आणि बाहेरून दाराला धक्के देऊ लागली. आपणच बाहेरून कडी घातली आहे हे ती विसरून गेली होती. अंगणात निजलेले गडी हातात कुऱ्हाडी व लाठ्या घेऊन नाचू लागले. 'ब्राह्मननी जिव मेल्या, बाह्मननी जिव मेल्या,' हे त्यांचे पालुपद होते. पण आम्ही आत आहो असे त्यांना वाटत होते.

असा सारा गोंधळ चालला होता. इतक्यात मी वहिनीच्या गळ्यात हात टाकला. तो पलीकडे आत्याबाई होती तिला लागला. त्याबरोबर ती ओरडली,

"अये पाहता काय ? हाच च्योय !"

तसे बाहेरचे चारही गडी माझ्या अंगावर धावले. मी दत्तूला उभ्या उभ्याच गादीवर टाकून अंगणात पळाले व "अरे, मी मनी, मी

मनी, " म्हणून सांगू लागले. व मग पुढे सर्व उलगडा झाल्यावर पहाटे-पर्यंत एकसारखा हशा पिकला व पुढे कित्येक महिने ही गंमत आठवून आठवून आम्ही हसत होतो.

काही दिवसांनी टिळक जलालपुरास आले. वणीस आता आमचे फारच चांगले बस्तान बसले होते. तेथे टिळकांना त्यांच्या आवडीचे काम, तसेच समाजसेवा व धर्माचा अभ्यास करण्यास सवड, ही सारी मिळाली होती. पण आम्ही वणी सोडण्याची आता वेळ आली होती.

श्रीमंत अप्पासाहेब बुटींचे टिळकांना जलालपुरास पत्र आले, की काहीतरी जनसेवा हातून घडावी, ह्या हेतूने मी वेदाचे भाषांतर करण्याचे ठरविले आहे. तरी त्या कामी मला तुमची मदत पाहिजे. तुम्ही ताबडतोब नागपुरास या. तुम्हाला पूर्वीचीच जागा राहण्यास मिळेल.

ठरले आमचे नागपुरास जायचे. दत्तू आठ-दहा महिन्यांचा होता. भिकाजीपंत मोऱ्हे हे आता नागपुरास बदलून गेले होते.

नागपुरास आम्ही पुन्हा बागेत राहू लागलो. टिळक काही वेळ लिहिण्याचे काम करीत व काही वेळ बापूसाहेबांना शिकवीत. तेथे असताना टिळकांनी एका मोठ्या कादंबरीलेखनाला आरंभ केला. ती कधी पुरी झाली नाही ! जसजशी ते ती लिहीत, तसतशी ती छापूनही आणीत. तिचे नाव आठवत नाही. मात्र बऱ्याचशा छापील कागदांनी आमची एक खोली कित्येक वर्षे अडवून ठेवली होती. त्यावरून ती कादंबरी माझ्या चांगली ध्यानात राहिली आहे.

ह्याच सुमारास 'वीरकन्या' नावाची एक लहानशी कादंबरी, 'तीन विधवा' नावाची आणखी एक कादंबरी, 'एका फुलाचा इतिहास' (वनवासी फूल) व 'काव्यकुसुमांजली' ही छापली.

अप्पासाहेबांच्या घरी एक साधू आले होते. टिळकांचा पुष्कळ वेळ ह्या साधूंच्या सान्निध्यात जाऊ लागला व त्यांच्यावर त्यांनी काही कविताही केल्या होत्या.

आधीच उल्हास, अशी स्थिती झाली. संसाराकडे त्यांचे लक्ष अगदी पहिल्यापासून जेमतेमच. त्यात आता अभ्यास, वाचन, वादविवाद ह्यांना पूरच आलेला; व भोवताली माणसेही पुष्कळ. तेव्हा त्यांना

घराची आठवण राहू नये ह्यात नवल नाही.

अप्पासाहेबांच्या वाड्यात धार्मिक चर्चा चालत व पुष्कळ पुस्तकेही होती. नवीन काही लागली, की अप्पासाहेब ती चटकन मागावून देत. अशा रीतीने टिळकांचे दिवसाचे चोवीस तास वाचन व विचारात जाऊ लागले.

टिळकांना भय असे कोणाचेच कधी वाटत नसे. जर काही भय त्यांच्या हृदयात असेल, तर ते देवाचे व त्याच्या खालोखाल माझे !

एकदा त्यांच्यावर स्वयंपाक करण्याची पाळी आली. दत्तू तेव्हा नुकताच भात खाऊ लागला होता. टिळकांनी स्नान वगैरे उरकून चुलीवर डाळ शिजत टाकली व कपडे चढविले.

" डाळ शिजेपर्यंत आता मी जाऊन येतो, " असे सांगून ते बाहेर पडले.

मी म्हणत होते, " जेवणी झाल्यावर बाहेर जा. "

पण त्यांनी ते ऐकले नाही.

इकडे डाळ शिजली, जळाली व शेवटी तिचे कोळसे झाले– पण टिळकांचा पत्ता नाही. दत्तू भुकेने अगदी व्याकूळ झाला. गाव बराच दूर जवळ एक पैसा नाही. बारा वाजून गेले. दत्तूला सांभाळायला एक तेल्याचा मुलगा ठेवला होता. त्याच्याकडून तीन दगड मांडून मी भात करवून घेतला व त्याच्याकडून दत्तूला जेवू घातले.

मी उपाशीच होते. डोळ्यांतून पाणी गाळणे हेच माझे समाधान होते व तेच माझ्या हाती होते. चार वाजून गेले तरी टिळक आले नाहीत. बागेत प्रेमा नावाची एक महारीण होती. तिला हे कळले तेव्हा तिने बागेतून काही फळे आणून ती मला आग्रह करकरून खाऊ घातली

" काय करू बाई ? तुम्हाला आमच्या हातचे चालत नाही. नाही तर मी मुलाला जेवू घातले असते. "

किती प्रेमळपणा हा ! पण आम्हाला खरोखरच तिच्या हातचे चालत नव्हते.

रात्र झाली. त्या मुलाने पुन्हा भात करून दत्तूला जेवू घालून निजविले.

रात्री नवाच्या सुमारास भिकाजीपंत शिष्टाई करायला आले. येताना बरोबर बेसनाचा लाडू व चिवडा त्यांनी आणला होता. घरात दिवा मिणमिण जळत होता. एका कोपऱ्याला मी निजले होते व दुसऱ्या कोपऱ्याला दत्तू निजला होता. भिकाजीपंतांनी दार उघडले तेव्हा मी फारच संतापले.

"एवढ्या रात्री का आला ?"

"खरेच सांगू का वहिनी, नाना आले आहेत हंसापुरीत. त्यांनी मला सांगितले, की दत्तू नि तुम्ही भुकेले असाल. म्हणून मला हे खाण्याचे पदार्थ घेऊन त्यांनी पाठविले आहे. ते मागून जेवून येतील. त्यांना तुमचे भय वाटते."

ह्यानंतर पुष्कळ उशिरा टिळक घरी आले. काही दिवसांनी धार्मिक मतांवरून किंवा दुसऱ्या काही कारणांवरून टिळकांचे व अप्पासाहेबांचे बिनसले असावे. निदान धार्मिक बाबतींत त्यांचे मन येथूनच अस्वस्थ होऊ लागले होते असे वाटते. ह्याच वेळी बापूसाहेब रामटेकला हवा बदलण्यास गेले. टिळकांनीही त्यांच्याबरोबर जावे अशी त्यांची इच्छा होती; परंतु ते टिळकांना नको होते. ते गेले नाहीत. नंतर जवळजवळ एक महिना टिळक कोठे नाहीसे झाले. मजजवळ एक पैसा नव्हता. जवळ एक कामदार, एक माकड, मी, मुलगा एवढा संसार मला चालवायचा. खायला घरात दाणे नाहीत, जवळपास शेजारपाजार नाही. बागेत काडचाकुडचा गोळा करून त्यांचे सर्पण वापरावे. कामाला ठेवलेला मुलगा गावात जाऊन मजुरी करी व तीवर आपले व माकडाचे चालवी.

अशा स्थितीत दिवस कंठीत असता घरात आडबाजूला पडलेली दोन शेर ज्वारी एक दिवस मला सापडली. ही ज्वारी पाहून मला इतका काही आनंद झाला, की मला वाटते, तसा आनंद फारच थोडच्या लोकांना झाला असेल. त्या ज्वारीच्या कण्या भरडून मी त्या ताकाबरोबर खाऊ लागले. बागेतील मिरच्यांची खमंग भाजी तोंडी लावायला होई. दोन शेर दुधाचा रतीब होता. पैशाच्या साळीच्या लाह्या आणून ठेवायच्या व त्या थोडथोडच्या दुधात भिजवून दत्तूला खाऊ

घालायच्या, असा आमचा संसार सुरू झाला.

माझा असा बाणा होता, की काही झाले, कितीही हाल सोसावे लागले तरी माहेरी म्हणून जायचे नाही. त्याप्रमाणे मी नागपूर सोडले नाही की माहेरी कळविले नाही.

एक दिवस दत्तूने भातासाठी हट्ट धरला. पण भात देणार कसा? घरात तांदळाचा एक कणही नव्हता. त्याच दिवशी दुसऱ्या बाजूला बागेत वाड्यातील मंडळी वनभोजनाला आलेली होती. त्यांच्याकडून थोडा भात आणून दत्तूला द्यावा, असे माझ्या मनात येऊन मी चटकन तिकडे गेले. तेथे त्या वेळी शंभर पानांचा स्वयंपाक होत होता. तेथे एका वृद्ध बाईकडे सारी व्यवस्था होती. तिच्याकडे जाऊन मी म्हटले, "आजीबाई, मला तुपाच्या वाटीभर भात दत्तूसाठी द्या. मला आला आहे कंटाळा चूल पेटविण्याचा."

ती वेळ संध्याकाळची होती. बाई माझ्या अंगावर वसकन येऊन म्हणाली, "हे काय हो भलत्याच वेळी मागता? अजून आमची जेवणी-सुद्धा झाली नाहीत."

वरील वाक्ये ऐकून मी आल्या पायी मागे परतले. मला ब्रह्मांड आठवले. ह्या अडाण्या बाईने मला असे बोलावे! मला माझे माहेर आठवले. कितीतरी माणसे तेथे जेवून तृप्त होऊन जातात. माहेरी भात पिकतो. बहिणीकडे रोज दोन-तीन शेराचा भात शिजतो, आणि मी आज एका तुपाच्या वाटीभर भाताला महाग झाले ना?

त्या दिवसाइतके पूर्वी मला कधीच वाईट वाटले नव्हते. दत्तूची मी कशीतरी समजूत करून त्याला निजविले. जवळ मीही पडले होते. मला झोप येईना. सारखे विचारांचे काहूर उठले होते. मी म्हणे, आता नाही तर नाही. माझा मुलगा मोठा झाल्यावर चार माणसांना भात घालील. इतक्यात दारावर कोणी थाप मारली. मी दार उघडताच ती बाई आत आली. तिच्या मागोमाग ताट वाढून आणलेला ब्राह्मण आत आला.

"बाई, मला फार वाईट वाटते. मघा मी तुम्हाला टाकून बोलले. राग मानू नका. मी दत्तूला वाढून आणले आहे."

" पण तो आता निजला. आणखी तो काय एवढे खातो ?"

पण अन्नाला पाठ दाखवायची नाही, असा माझा नियम असल्याने मी ते अन्न परत केले नाही. व्यंकटेशस्तोत्रातील एक कडवे मला आठवले. " अन्नासाठी दाहि दिशा । आम्हा फिरविसी जगदीशा ।। " बाईने बरोबर तांदूळ आणले होते.

मी विचारले, " हे कशाला ? मजजवळ तांदूळ आहेत, पण ते शिजविण्याचा मला कंटाळा आला होता एवढेच."

" तुम्ही आळशी आहात म्हणूनच हे आणले आहेत. आता माझा राग मानू नका. जसा दत्तू आहे तशीच मीही समजा. "

" असे कसे म्हणता ? मी तर तुम्हाला आजीबाई म्हणते."

" काहीही म्हणा, पण तुम्ही माझे ऐकले पाहिजे, " असे सांगून ती बाई निघून गेली. ते अन्न मी व गड्याने दोन दिवस खाल्ले. आणि लाडू तर आणखी काही दिवस पुरले.

त्या बाईला काही तरी माणसांचे मन होते. नाहीतर माणसे अशी सापडतात, की दुसऱ्यांना त्रास देऊन वर स्वतः साळसूद म्हणून मिरवतात !

असो. दुसऱ्या दिवशी सकाळी दूधवाली आली. दूध घातल्यावर ती पैसे मागू लागली, त्या वेळेस मात्र मला त्रिभुवन आठवले. पुष्कळ वेळ माझ्या तोंडातून शब्द फुटेना. मी म्हणे, आता जर ह्या बाईने दूध बंद केले तर उद्या मी मुलाला काय घालू ? मला मोठा हुंदका आला. दूधवालीने " बाई, काय झाले ?" म्हणून विचारल्यावर तर मला रडू थांबविताच येईना. मी तिला सर्व हकीकत सांगितली व म्हटले,

" मी त्यांचा तपास करीत आहे. नाहीतर माहेरी जाऊन मी पैसे पाठवीन. तू आपला पत्ता मला देऊन ठेव. पण मी जोपर्यंत येथे आहे आहे तोपर्यंत मुलाचे दूध बंद करू नको."

बाई म्हणाली, " दत्तूला माझ्याबरोबर धंतोलीला पाठवा. मी त्याला चांगला जीव लावीन. "

" तू जीव लावशील पण माझा जीव कोठे राहील ?"

" बरे, नका धाडू; पण जोपर्यंत तुम्ही येथे आहा, तोवर ह्या

मुलाचे दूध मी सोडणार नाही. मला पैसे मिळोत न मिळोत– मी दूध घालीन. पैसे मिळतील पण माणसे मिळणार नाहीत," असे म्हणून तिने मजपुढे तिला आलेले एका रतिबाचे दोन रुपये टाकले.

" हे घ्या तुम्हाला खर्चायला. आजच मला मिळाले आहेत. "

मला धन्य वाटले. परमेश्वरी लीला अगाध आहे. एका अगदी खेडवळ बाईचे अंतःकरण केवढे उदार हे !

बाई जाते न जाते तोच भिकाजीपंत आले. " का वहिनी, आताशा नाना आमच्याकडे येत नाहीत ? ते कुठे गावाला गेले की काय ? "

" हो. "

" कुठे ?"

" माहीत नाही ! "

" किती दिवस झाले ?"

" एक महिना. "

" मग घरात सामानसुमान तरी आहे का ? का देऊ आणून ?"

" सर्व आहे. आता तुम्ही आलाच आहा तर त्यांना तार करा. "

" पण कुठे करू ? आणि काय करू ?"

" राजनांदगावला गणपतराव खऱ्यांकडे ते असतील. मी फार आजारी आहे व दत्तूला सांभाळण्यास कोणी नाही, अशी तार करा. " ते नको नको म्हणत असता मी दूधवालीने दिलेल्या दोन रुपयांपैकी एक रुपया त्यांच्या हातावर टाकला, व भिकाजीपंतांनी तार केली.

तार केल्याच्या दुसऱ्याच दिवशी टिळक आले. तेव्हा मी दारी सडा घालीत होते. टिळक म्हणाले, " किती मूर्ख आहेस तू ! अशाने तुजवर कोण विश्वास ठेवील ? त्या धनगराच्या गोष्टीसारखे होईल. तुला असा कोणता आजार झाला होता ?"

" पाय मुरगळला होता. "

टिळकांचे स्नान झाले. नंतर ते जेवायला बसले. त्यांच्यापुढे मी ताक, कण्या, मीठ व बागेतल्या मिरच्या ठेवल्या.

" हे काय ?"

" तुम्ही गेल्यापासून मी जे खात होते ते ! "

टिळकांना फार वाईट वाटले, पण ते तेवढेच ! ते म्हणाले,

" आपल्याला राजनांदगावी जायचे. "

" का ? येथे काय वाईट आहे ? "

" ते काही नाही. मी सांगतो आहे ते ऐक, नाहीतर जा जलालपुराला. "

माझी माहेरी जाण्याची वेळ झालीच होती.

## २१ : महादेव

आम्ही राजनांदगावाला आलो. राजनांदगावी सुमारे दोन वर्षे आम्ही होतो. हा दोन वर्षांचा काळ टिळकांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा काळ होता. राजनांदगाव सोडल्यावर पुढे ताबडतोब मुंबईस जाऊन त्यांनी बाप्तिस्मा घेतला. राजनांदगावास गेल्याबरोबर त्यांनी पाच-सहा महिने लिहिलेल्या त्यांच्या काही लिखाणाचा मी माझ्या स्मृतिचित्रांच्या या भागात उपयोग करणार आहे. ह्यामुळे त्या वेळेस टिळकांना मजबद्दल काय वाटत असे, हेही ह्या दोन-तीन प्रकरणांत त्यांच्याच शब्दांत दिसून येईल.

१८९४ साली म्हणजे राजनांदगावास पोचल्यावर त्यांना डायरी लिहिण्याचा नाद लागला. पूर्वी ते डायरी ठेवीत असत; पण तीत रोजच्या रोज लिहीत नसत. कधी वर्ष-सहा महिन्यांनी लिहीत. १८९४ साली राजनांदगावची जी डायरी त्यांनी लिहिलेली आहे, ती मात्र पाहण्यासारखी आहे. अगदी आरंभी " ह्या सालचे हेतू " म्हणून पान आहे. वरती " सिद्धीस नेणारा परमेश्वर आहे " असे वाक्य आहे. खालील मजकूर असा आहे–

१ सुटली बिचारी खाटकाच्या हातून, २ यशवंतरावांचे चरित्र,

३ येशू खिस्ताचे चरित्र, ४ मेघदूत नाटक, ५ लहान मुलांकरिता १०० गोष्टी ही पुस्तके लिहावी.

२ एण्ट्रन्सच्या परीक्षेला जावे.

३ येथील छापखाना आपल्या ताब्यात घ्यावा.

४ फाल्गुनात वणी कोकणात जाऊन यावे.

५ निदान ५०० रुपये शिल्लक टाकावे.

६ प्रथमत: औषधाची चांगली योजना करावी.

फेब्रुवारी ४, रविवार

७ येथे बिगाऱ्यांवर जुलूम होत आहे, त्याची दाद सरकारात लावणे. जानेवारी १ च्या पानावर त्या दिवसाचे टिपण खाली दिल्या-प्रमाणे आहे –

**मित्राचा उदय सती सुशीघ्र होतो । सृष्टीला अरुण कथी सहर्ष हो तो ।**
**निद्रेने तव अपुला हळूच पाश । काढीला मग उठलो विनावकाश ।**
**झालो शुचिर्भूत, बघून लक्ष्मी ।सुश्रांत निद्रावश, चुल्लीला मी ।**
**समार्जुनी अग्निहि दीप्त केला । स्नानार्थ होतो बहु मी भुकेला ।**
**नवकथा लिहिण्यास्तव घेतली । चपल दूर जरी मति धावली ।**
**तरि तिला धरूनी परतावली । अनुरती तिज हृयांतचि लाविली ।**
**परि घरी बघुनि जल तापले । गृहिणिने मज लौकर बाहिले ।**
**करुनि दूर घडीभरि लेखिनी । सहज मी रमलो अवगाहनी ।**
**उपाहारा**

येथपर्यंतच मजकूर अगदी पानाच्या शेवटपर्यंत आहे. दुसऱ्या दिवसापासून अगदी बारीक अक्षरांनी डायरी लिहिली आहे. ‘पहाटे पाच वाजता उठलो,’ वगैरेपासून सुरुवात करून रोज काय काय घडले ते अगदी इत्थंभूत लिहिलेले आहे. काही काही ठिकाणी तर अक्षर इतके बारीक आहे की, मॅग्निफाइंग ग्लासने वाचावे लागते. जानेवारी व फेब्रुवारी व पुढे जुलै-ऑगस्ट ह्या तीन-साडेतीन महिन्यांचीच डायरी ठेवलेली

N.R.P.

आहे; परंतु ती ऐकल्यानंतर कित्येक गोष्टींची मला जी सुसंगती लावता येत नसे, ती आता लावता आली आहे.

राजनांदगावी जाण्याचा हा दुसरा प्रसंग होता. पहिल्या वेळेस बलराम प्रेसमध्ये काम होते, व आता मास्तरचे होते. ता. १ मे १८९४ च्या डायरीत कामाविषयी असा मजकूर आढळतो : " क्लार्क ऑफ कोर्ट व हेडक्लार्क, इतकेच नाही, तर सर्व कचेऱ्यांचा इंग्लिश क्लार्क मी एकटा बनलो आहे." पुढे १८९८ साली प्रसिद्ध केलेल्या 'एका विद्यार्थ्याची साक्ष' ह्या पुस्तकात (पान १९) टिळक म्हणतात : " राजनांदगावास मी शिक्षकाचे व सर कारकुनाचे, अशी कामे केली. शेवटल्या हुद्द्यात नाझराच्या कामांचाही समावेश झाला होता."

ही कामे असली तरी शाळेचा त्यांचा शेवटपर्यंत काही तरी संबंध असावा असे त्यांच्या डायरीवरून दिसते. एकदा तर कोणत्याशा इन्स्पेक्टरने शाळा तपासून व्हिजिटर्स बुकात लिहिलेल्या इंग्रजी शेऱ्यात खूप चुका केल्या होत्या. त्या टिळकांनी इन्स्पेक्टरसाहेबांस दाखवून त्यांच्याशी तंटा केला.

ता. ५ फेब्रुवारीच्या पानावर अशी माहिती सापडते : " ३॥– ५ शाळा. अयोध्यानाथ हेडमास्तर ह्यांच्याशी बोलत होतो. ५ च्या सुमारास शाळेचा चपराशी नोहर आला. हेडमास्तरने त्याची बायको काल रात्रीपासून या वेळपर्यंत प्रसववेदनांनी व्याकूळ होऊन पडली आहे, सुटका होत नाही, वगैरे हकीकत सांगितली. नोहरची प्राप्ती दरमहा ५ रुपये ! ह्याची दया कोणाला येणार नाही ? मला कचेरीचे विस्मरण झाले. मिल्टनच्या घरी गेलो. तो घरी नव्हता. बाहेर एक पोलिस होता. त्यास मिल्टनच्या बायकोशी बोलण्याची इच्छा आहे, असा निरोप सांगितला. हो, बाई मिडवाईफ आहे. हिला फी देण्यास मी तयार झालो. ती फुकट येण्यास तयार झाली. शारंगपाणी यांनी टांगा दिला. सारांश, हिच्या परोपकारी व दयाळूपणाने व ईश्वराच्या कृपेने नोहरची बायको सुखरूप प्रसूत झाली व मी ७॥ वाजता घरी आलो."

वरील वर्णनावरून व त्याच डायरीत जागजागी शाळेचा उल्लेख

स्मृ... ९

येत असल्याने असे वाटते, की राजेसाहेबांकडे टिळकांना जरी काम असले, तरी शाळेचेही काही काम असावे.

नागपूर सोडताना मी माहेरी जावे अशी टिळकांनी सूचना आणली होती, पण तिला बहुमत न मिळाल्याने ती नापास होऊन मी राजनांदगावाला त्यांच्याबरोबर गेले. माझी पहिली तीन बाळंतपणे जलालपुराला झाली. दोन आत्याबाईंकडे व दत्तूच्या वेळेचे भावाकडे. आता मात्र हे बाळंतपण सासरी होण्याचा योग आला. माझ्या सासूबाई मी पाहिल्या नव्हत्या, व त्या जिवंत असत्या तर मला सासुरवास झाला नसता; पण राजनांदगावाला मला एक सासू उभी राहिली व तिने सासुरवासही खूप केला.

राजनांदगावला आम्ही सदाशिवराव रेटरेकरांच्या घरात राहू लागलो. ह्याच घरात आणखी एक बिऱ्हाड होते. त्या बिऱ्हाडकरूची म्हातारी आई होती. तिला टिळक आई म्हणत व तितकाच मानही देत. घरात घरवाल्याचे बंधू गोविंदराव व त्यांची बायको आनंदीबाई हेही राहत असत. सदाशिवराव राजनांदगावला नसत.

गोविंदरावांनी व टिळकांच्या मानलेल्या आईने एक बाई कामाला ठेवली होती. ही बाई दोघांचे काम करी. निदान तसे भासवी तरी. कारण, सारा वेळ ती म्हातारीच्या तैनातीत असे. पगार मात्र दोघांनी मिळून द्यावयाचा! टिळकांच्या मागे लागून तिने हीच बाई चार रुपये पगारावर दत्तूला सांभाळण्यासाठी ठेवली. म्हातारी व गोविंदराव ह्यांच्याकडून मिळणारे तीन रुपये व आमच्याकडून मिळणारे चार रुपये असा सात रुपये पगारही तिच्या पदरात पडू लागला व तो म्हातारीच्या कृपेने, तेव्हा तीही तिच्या उपकाराच्या ओझ्याखाली वाकलेली होती. गोविंदरावांची बायको आनंदीबाई हिला ह्या काकू सुनेप्रमाणे वागवीत, तसेच त्या मलाही वागवू लागल्या. पण मी आनंदीबाईंप्रमाणे गरीब नसल्याने काकूंचे काही चालू देईना. तेव्हा काकूंनी टिळकांच्या कानी लागून त्यांच्या-माझ्यात वितुष्ट पाडण्यास सुरुवात केली.

आम्ही येथे आलो तेव्हा माडीवर एक खोली व अंगणात झोपडीवजा दुसरी खोली, एवढीच जागा आमच्या ताब्यात देण्यात आली. पण

त्याच वेळेस टिळकांनी बोली सोडवून घेतली होती, की म्हातारीच्या ताब्यातील काही जागा पुढे आम्हाला लागेल तेव्हा द्यायची, व ते त्या वेळेस तिने कबूलही केले होते. अंगणात बिनरहाटाची विहीर होती. हिचे पाणी आम्ही सगळे वापरीत होतो. ही विहीर जमिनीसरशी होती.

म्हातारीने काही दिवस झोपडी घ्यावी व तिचे घर आम्हाला द्यावे, अशी मूळ समजूत. माझे बाळंतपणाचे दिवस अगदी जवळ आले, पण म्हातारी काही झोपडीत जाईना. ती म्हणे, बाळंतपणाला अवकाश आहे.

भाद्रपदाचा महिना. झोपडीत ओल फार येऊ लागली. शेवटी सर्व मंडळी एकत्र जमली असता मी गोविंदरावांना म्हटले, "काका, मला जागा पाहिजे."

माझा आशय समजून टिळक म्हणाले, "तू माहेरी जा."

"मला माहेरी जायचे नाही."

"तू फारच हट्टी बायको आहेस. नाही तर मर येथेच !"

"हो, येथेच मरेन; पण माहेरी जाणार नाही. मला ती जागा द्या."

ह्यावर टिळकांनी आपल्या आईकडे वळून म्हटले, "काकू, द्या हो तिला जागा."

"पण ते घर स्वच्छ नसेल. मला त्याची जमीन-भिंती सारवून पाहिजेत." काकू म्हणाल्या.

मी म्हणाले, "एखादी बाई लावा अन् जमीन व भिंती सारवून घ्या."

"मला नाही बाईच्या हातचे आवडणार."

त्यावर आनंदीबाई म्हणाल्या,

"मी देते भिंती व जमीन सारवून."

"पण इतक्यात कशाला ? मला सर्व काही समजते. मी तुम्हा सर्वांपेक्षा मोठी आहे."

"तुम्ही मोठ्या असा किंवा लहान असा– मला आजच्या आज

जागा पाहिजे."

"थोडेफार तरी वडील माणसांचे ऐकावे," असा टिळकांनी मला टोला दिला.

मी म्हणाले, "मी कोणाचे ऐकणार नाही. आनंदीबाई, तुम्ही जा माझ्या झोपडीत आणि तुमचे घर द्या मला राहायला. तुमच्याच नवऱ्याने आम्हाला जागा देण्याचे कबूल केले आहे."

मग मात्र गोविंदरावांनी हुकूम करण्याच्या स्वराने म्हातारीला सांगितले, की तुम्ही आजच्या आज झोपडीत राहायला जाऊन टिळकांना तुमची जागा द्या.

आनंदीबाईंनी झोपडीतील सर्व जागा उभी-आडवी सारवून दिली. त्यांनी कामदारणीच्या मदतीने दोन्ही घरांच्या सामानाची ने-आण केली. मीही करवेल तेवढी धावपळ केली. म्हातारी मात्र टिवल्या-बावल्या करीत बसली होती. म्हातारीच्या घरात उंदीर-घुशींनी पुष्कळ बिळे पाडून ठेवली होती. ती सर्व आम्हाला बुजवून घ्यावी लागली.

टिळक कामाला गेले. ते गेल्यावर म्हातारी मोलकरणीला आमच्या कामाला हात लावू देईना. तेव्हा आनंदीबाई व मी– आम्ही दोघींनीच बहुतेक काम केले. आनंदीबाई मला साह्य करीत होत्या, हे सुद्धा म्हातारीला खपेना. हिच्यामुळे आनंदी बिघडली, अशी तिची सारखी बडबड चालली होती. संध्याकाळी गोविंदराव व टिळक घरी आल्यावर त्यांच्याजवळ आम्हा दोघींबद्दल म्हातारीने पुष्कळच कागाळ्या केल्या.

टिळकांनी एक नाटक लिहिले असून ते बसविण्यास ते शाळेत का वाड्यात गेले होते. दत्तूला पुष्कळ ताप आला होता. तो आनंदीबाई-जवळच त्या रात्री निजला. पहाटे तीन-चारच्या सुमारास आनंदी-बाईंनी त्याला तापातच कडेवर मजकडे आणला व त्याचा भाऊ त्याला दाखविला. दत्तू मात्र बाई–बाई करून रडू लागला.

गोविंदरावांनी दत्तूला घेतले. तेथे भंग्यांच्या सुइणी असत. मी म्हटले, "मला तसली सुईण नको." तेव्हा बाळंतपण काकूंनीच केले. मग आनंदीबाई आल्या.

मी आधीपासून म्हणत होते, की हे आणा, ते आणा. पण काकू म्हणत, अजून पुष्कळ अवकाश आहे व त्यांचे ऐकून टिळकही माझ्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करीत. त्यामुळे त्या रात्री घरात दिव्याचे तेलसुद्धा नव्हते, व माझ्या काळजीच्या तेवढ्या त्या काकूच घरात होत्या !

दुसऱ्या दिवशी सकाळी टिळक नाटकाहून आले. दुसरा मुलगा पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनी जलालपुरास तार करून आत्याबाईंना मुलगा झाल्याचे कळविले. तिकडे बाळंतणीला तीन दिवस काही खायला देत नाहीत आणि मुलाच्या पोटावर शंभर चोचे मारतात. पण ह्या चालीविरुद्ध मी बंड पुकारले. आनंदीबाईजवळून दोन पोळ्या घेऊन मी गुपचूप त्या खाल्ल्या. झाले ! पोळ्यांचा ताकभात होऊन मी ताकभात खाल्ला अशी बातमी टिळकांच्या कानी गेली. टिळक माझ्यावर खूप संतापले. मीही काही कमी नव्हते. मी खाटेवर बसून त्यांच्याशी खूप भांडले. ताबडतोब मजवर एक काव्य तयार झाले. ते अर्थात मला आवडले नाही, पण काव्यदृष्टीने चांगले झाले होते. ते टिळकांनी फाडून टाकले असावे. तिसऱ्या दिवशी लक्ष्मीबाई खरे आल्या व त्यांनी मला फारच साह्य केले.

दत्तूचा ताप आता गेला होता. तो हिंडूखेळू लागला. एक दिवस टिळक माडीवर लिहीत बसले होते. आमच्या तोंडमानल्या सासूबाई– टिळकांच्या आई– काकू विहिरीजवळ उभ्या होत्या. दत्तूही तेथे खेळत खेळत आला. सासूबाई त्याच्याकडे टकमका पाहत होत्या; पण तो खेळता खेळता विहिरीकडे चालला, तरी त्या काही बोलल्या नाहीत की त्याला त्यांनी उचलून बाजूला केले नाही. गोविंदरावांनी हे पाहून धावत येऊन त्याला उचलले. त्या दिवसापासून टिळकांचा आपल्या मानलेल्या आईवरील विश्वास उडाला. ही आई मोलकरणीसाठी आपल्याकडून दत्तूला सांभाळण्याकरता म्हणून चार रुपये उपटते व मोलकरणीचा काही उपयोग होत नाही हे आता त्यांच्या ध्यानात आले.

लौकरच आत्याबाई आल्या. आत्याबाईंचे व टिळकांचे नेहमीचेच खडाष्टक. ती आल्यानंतर टिळकांचा घरात पाय ठरेनासा झाला. माझी मात्र अडकित्त्यात सापडलेल्या सुपारीसारखी स्थिती झाली. आत्या-

बाईंची घरात सारखी कुरकूर चालावयाची. ती म्हणे, "येथे कशाला राहिलीस ? जलालपुरास का नाही आलीस ?"

टिळकांना काही आणण्यास तिने सांगितले की टिळक बाहेर जात व तिकडेच जेवून येत. घरी आल्यावर आत्याबाई हटकून त्यांना काही-तरी बोले. ती बोलली की त्यांनी माडीवर एखादे सुंदरसे काव्य तिच्या-वर रचून ते मोठमोठ्याने म्हणण्यास सुरुवात करावी.

दोघेही एकमेकांना अगदी कंटाळली. इतकी, की एक दिवस टिळक संन्यास घेण्यास निघून गेले. आम्हाला त्यांनी तसे काही सांगि-तले नाही, पण माझ्या भावा-बहिणीला त्यांनी आपण संन्यास घेण्यास जात असल्याचे पत्र लिहून कळविले.

माझ्या माहेरी प्रत्येकजण घाबरून गेले. जो तो नवस करू लागला. कोणी सत्यनारायण तर कोणी सोळा सोमवार. कोणी म्हणत ज्ञानदेव, सोपानदेव वगैरेंच्या बापासारखे हे परत येतील. पण मग ह्यांना झालेल्या मुलांची काय व्यवस्था करायची ?

माहेरी उडालेल्या गोंधळाची आम्हाला काहीच दाद नव्हती. तिकडून जेव्हा पत्रे येऊ लागली तेव्हा ही भानगड आमच्या ध्यानात आली. आठ दिवस झाले. टिळक परत आले. त्यांच्या गैरहजेरीत आलेली पत्रे मी त्यांच्यापुढे टाकली.

"हे खरे का ?"

"हो. खरे. पण तुझ्या परवानगीवाचून मला संन्यास देत नाहीत, म्हणून मी परत आलो."

टिळक आल्यानंतर दोन दिवसांनी धाकट्याला आकडीचा रोग झाला. खोली कोंदट, हवा खेळती नाही, जमीन ओलसर, तेव्हा हे घर बदला, असे डॉक्टरांनी सांगितले. गोपाळराव जोशी नावाच्या गृह-स्थांच्या घरी आम्ही बिऱ्हाड बदलले. पण येथे आल्यावर दुसऱ्याच दिवशी मुलगा वारला.

माझ्या मांडीवरच त्याला मृत्यू आला. मी चटकन बाजूला झाले व नंतर आत्याबाईला हाका मारल्या व म्हटले, "बाळ कसेतरी करतो आहे." आत्याबाईने धावाधाव केली, पण तिचा काही उपयोग अर्थात

काही झाला नाही. कारण तो गेल्यावरच मी तिला धावाधाव करण्याला लावली. नाहीतर तिने सगळ्या विटाळाचांडाळाच्या भानगडी उपस्थित केल्या असत्या व टिळकांचे व तिचे त्यावरून पुन्हा कडाक्याचे भांडण झाले असते. ते सारे टाळण्यासाठी मी दूर बसून तो जिवंत असल्याचा बहाणा थोडा वेळ केला. मुलाचे नाव महादेव ठेवले होते. महादेवभाऊजी पोटी आले अशा समजुतीने हे नाव ठेवले होते. निदान तो दिसण्यात तरी भाऊजींसारखा होता.

महादेवाच्या मृत्यूनंतर तर टिळकांची व आत्याबाईंची अधिकच कुरबूर सुरू झाली. ती टिळकांना म्हणे, "तुमच्या नाचरेपणामुळे सोन्यासारखे मूल गेले." त्यावर ते म्हणत, "तुमच्या मूर्खपणाच्या गावंढळ समजुतीमुळे मूल गेले." माझी मात्र स्थिती फारच वाईट होई.

अशाच एका भांडणानंतर रागाच्या सपाट्यात आत्याबाईने जलालपुरास जाण्याचे ठरविले. आम्ही तिला पोचविण्यास स्टेशनावर गेलो होतो. सकाळपासून तिने काही खाल्ले नव्हते. गाडीत बसल्यावर टिळकांनी खजूर व पेढे तिच्या हातात दिले; पण गाडी सुरू होताच तिने ते खाण्याचे पदार्थ गाडीतून आमच्याकडे फेकून दिले. तिचा फार संताप झाला होता; व दत्तूला सोडून जायचे म्हणून फार वाईटही वाटले होते.

## २२ : पहिला हिंदी वक्तृत्वसमारंभ

आत्याबाई गेल्यानंतर घरात शांतता मात्र झाली. टिळक आपल्या डायरीत लिहितात : "काकू (लुच्चांची राणी)चा शेजार सुटला. सासूबाई गेल्या, तेव्हापासून घरात चांगली शांती दिसते. (२ जा. १८९४) परंतु टिळकांच्या मनात मात्र शांती नसली पाहिजे. अप्पासाहेबांकडे संस्कृतवाचन, विचार व वादविवाद ह्यांना पुष्कळ वाव होता, पण येथे

आल्यापासून ते नाहीसे झाले. भोवतालची मंडळी बहुतेक स्थानिक राजकारणात व उलाढालींत गुंतलेली, तर आपण काहीतरी देशसेवा करावी अशी टिळकांना तळमळ लागलेली होती. ता. ३ जानेवारीच्या डायरीत ते लिहितात : " येथे सर्व बाजार पाच-सात वर्षांत करून टाकून देशसेवेस मोकळे होणे आहे ! " राजनांदगावास मजुरांवर होणारा जुलूम नाहीसा करण्यासाठी टिळकांनी जिवापाड मेहनत केली. त्या वेळी वरिष्ठांची खप्पामर्जी होण्याचाही संभव होता; पण त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. उच्च वातावरणात वावरत नसलेल्या व्यवहारी माणसांनी त्यांना वेड्यातही काढले. त्यांच्याबद्दल टिळक ६ जा. डायरीत म्हणतात : " डॉक्टर म्हणत होते, ' तुम्हाला येथील लोक पागल म्हणतात ! ' बरोबर आहे, जेथे हलकट, पाजीसारखे कृतघ्न बदमाष लोक जमले आहेत, तेथे मी पागलच ठरलो पाहिजे. आजपर्यंतच्या माझ्या अनुभवावरून कोठेही पहा, हिंदू लोकांत हांजीहांजी, तोंडपुजेपणा, लाचखाऊपणा ह्या गुणांस जो मान आहे तो दुसऱ्या कशास नाही. अन्नगंधालाच लुब्ध होऊन खेटरे खाणारे कुत्रे व हिंदू सारखा आहे. प्राप्ती असो वा नसो, नुसत्या द्रव्याच्या वासालाच जिभा काढून लाथा खात बसलेले हजारो लोक आहेत. "

वर दर्शविलेल्या विचारावरून टिळकांची मन:स्थिती त्या वेळी कशी होती हे दिसून येते. त्यांचे वाचनही सपाटून चालले होते, व पुष्कळ पुस्तके पाठ करण्याचाही त्यांनी सपाटा लावला होता. ' लेटर रायटर पाठ करीत आहे; सिसरो पाठ करीत आहे ' वगैरे वाक्ये मधूनमधून त्यांच्या डायरीत आढळून येतात. बायबल व बाबा पदमनजी ह्या ख्रिस्ती पंडिताने लिहिलेली पुस्तके टिळकांच्या वाचनात ह्या वेळी पुष्कळ आली. शिवाय मनाला पटेल ते करावयाचे, हा एक त्यांचा पहिल्यापासून मोठा बाणा असल्यामुळे त्या काळात अगदीच विलक्षण दिसणाऱ्या गोष्टी ते करीत.

एक दिवस सासूबाईंचे श्राद्ध होते. मी एकसारखी मागे लागले होते, " श्राद्ध आहे, ब्राह्मण सवाष्ण बोलवायला पाहिजे. "

" मला श्राद्ध करावयाचे नाही. "

" का नाही ?"

" मी ज्यांना जेवायला सांगेन, त्यांना जर तू वाढशील तर मी श्राद्ध करतो; नाही तर करणार नाही."

" म्हणजे ? कोणाला सांगता ?"

" आंधळेपांगळे, कोणत्याही जातीचे, कोणत्याही धर्माचे !"

" श्राद्ध म्हणजे त्या दिवशी आई येणार, आणि हे भलतेच काय ?"

" माझ्या आईला दया आवडत असे. ती कर्मठ नव्हती."

" म्हणून काय झाले ? आधी ब्राह्मण जेवतील, मग तुमचे सारे आंधळेपांगळे बोलवा, मी नाही म्हणत नाही."

" मला त्या आंधळ्यापांगळ्यांना ब्राह्मणांच्याच जागी बसवायचे आहे. ब्राह्मणांना बोलवायचेच नाही."

शेवटी हो, न करता करता टिळकांच्या म्हणण्याला कबूल झाले व गुपचूप स्वतःच जाऊन एक द्राविडी ब्राह्मण सांगून आले. रेटरेकरांची बायको सवाष्ण होती.

टिळकांचे आंधळेपांगळे आले. माझी ब्राह्मण–सवाष्ण आली. त्यांची पंगत बाहेर बसविली, माझी आत बसली. टिळकांनी आंधळ्या-पांगळ्यांना धोतरजोडे दिले. माझे ब्राह्मण कुरकूर करू लागले. तुम्ही दुसरे ब्राह्मण का बोलविले नाही व बाहेर ही माणसे कोण आहेत ? मी त्यांना सर्व काही समजावून सांगितले व नंतर म्हणाले, " तुम्हाला कोणी काही विचारले तर तुम्ही सांगा, की मला बोलविले, मी गेलो. मला काय ठाऊक कोण कोण येणार ते ? आणि एकदा पानावर बसल्यावर उठता थोडेच येते ?"

ह्यासंबंधी टिळकांच्या डायरीत ८ जानेवारी, १५ फेब्रुवारी व २५ फेब्रुवारीत उल्लेख आहेत. ते धनुर्मास, कुळधर्म व श्राद्ध ह्या प्रसंगी आमचे जे खटके उडाले यासंबंधी आहेत.

" लक्ष्मीकडून १० अभंग वाचून घेतले. हिचे लक्ष वाचनात नाही. तिच्या आत्याबाईने तिच्या डोक्यात जे एक महातत्त्व भरून दिले आहे, की आपली जी स्थिती, ज्या समजुती पूर्वापार चालत आल्या आहेत,

त्या तशा थेट पुढे चालविणे हेच नरदेहाचे साफल्य होय. या तत्त्वाने एखादी रीतीची गोष्ट नुसती सांगू लागले की तिच्या अंगात भूतसंचार होत आहे. धनुर्मास म्हणजे खिचडीचा समारंभ केला नाही. यावरून मी इतकेच म्हटले की, मनाचा अत्यंत नीच, कृपण, वृथाभिमानी, मूर्ख व धष्टपुष्ट भट्ट बोलावण्यापेक्षा ज्यांस असले अन्न कधीही मिळत नाही असल्या चार गरिबांस बोलवावे. झाला संताप !"

"जेवायला कुलदैवते अजि घरी येतात की आमुचे ।।
वर्षे उत्सव तन्निमित्त करिता काही न चित्ता सुचे ।।
भार्येच्या मम, कालपासुन दळी कांडी भरी पाखडी ।
बोलायासही वेळ हीस न मिळे सांगू किती तातडी ।।१।।

माझा बालक दोन अर्ध अवघी वर्षे वया त्याचिये ।।
खाया गोड वडे अपूप मिळती ध्यानी तयाच्या न ये ।
तेणे तो न हसे उठे परि रडे की माय आजी तया ।।
सोडीते कितिदा त्यजून अवघे वात्सल्य माया दया ।।२।।

कोठे कोकण आज वास अमुचा कोठे मधे राहती ।।
मोठे पर्वत शेकडोहि सरिता सिंधू न ज्याला मिती ।।
तेथोनी परि खावयास अमुचे येती वडे-घारगे !
धावोनी कुलदैवते ! खचित हे साचे दयाळू सगे ।।३।।

आला ब्राह्मण एक देव अवघे त्यालाच मानी सती ।।
देवी सर्व सुवासिनींत दिसती होते पहा संप्रती ।।
चित्ती ही वदते ज्वरादि न घरा आता पुढे पाठवा ।।
जेवा आज वडे अपूप ! सुख हो आम्हा सदा दाखवा ।।४।।

वडे अपूपास्तव दुःख देती ।।
भांडून मागून छळून घेती ।।

आश्चर्य वाटे मज ! काय देव ? ॥
जे सर्व शक्तीस गुणांस ठाव ॥५॥

"आज मातु:श्रीचे श्राद्ध ! कचेरीतून ९ वाजता आलो."

" आई वर्षे तुजसि अठरा जाउनी आज झाली ॥
स्वर्गी तूझी कथिति मजला मूर्ति जाऊन ठेली ॥
गेली गेली स्मरणपथही सोडुनी दूर गेली ॥
कलावती कळत न किती खोल ठायी निमाली ॥१॥

गेली पाची जननि विरूनी पंचतत्त्वांत तत्त्वे ॥
योनीं अन्या कथिति तुजला प्राप्त झाली ममत्वे ॥
मिथ्या सारे मजसि कथिती लोक हे मूर्ति आई ॥
ह्या माझ्या गे सतत हृदयी ती तुझी रम्य राही ॥२॥

केव्हा केव्हा तुजसि हृदयातून काढून पाही ॥
नेत्री पुष्पे मधुर वचने आसवे नीर वाही ॥
वेडे सारे त्यजुन मजला दूर जाशील कैशी ॥
" मेली " याचा हृदयि मम तू येऊनी राहतेशी ॥३॥

तू माझ्या गे जवळ तुजला नित्य मी पूजिताहे ॥
ग्रासोग्रासी स्मरुनि तुजला नित्य मी जेविताहे ॥
आई तूझे म्हणति मजला श्राद्ध म्या आचरावे ॥
लोकी खोटी अनुगतिकता काय हीते करावे ॥४॥

कोठे आई अतिविमल ते शील तूझे उदार ॥
वात्सल्यादी तव अतुल ते की क्षमा ही अपार ॥
कोठे खोटे कृपण जननी भट्ट हे दक्षिणाश ॥
पूजू कैसे प्रतिनिधि तुझे मानुनी सांग यास ॥५॥

दीपा पहाया प्रतिदीप व्हावा ॥
श्रद्धेस की श्राद्धविधी असावा ॥

धन्योऽसि बाई जगतात रूढी ॥
तूझ्यापुढे कोण न हात जोडी ? ॥६॥

शेवटी श्राद्ध केले. पण जेवायला रेटरेकरांची पत्नी आनंदी सुवासिनी असून एक वृद्ध सनाढ्य ब्राह्मण जातीचा भिकारी व एक आंधळा शूद्र हे असून, संकल्प मराठीत केला. जेवण २। वाजता झाले. जेवताना त्या आंधळ्या भिकाऱ्याची फार चमत्कारिक स्थिती झाली होती.

(साकी)

शिळे कोरडे तुकडे तेही पुरे न मिळती ज्याला ॥
मान न ज्याला लोकी मिळतो मान जसा प्रेताला ॥१॥

गेले डोळे सदा सोहळे पुरते ज्या देहाचे ॥
जनी चालते सांगो किती मी दीन दुर्दशा वाचे ॥२॥

तशात याची जाति शूद्र ह्या द्यावा कोणी ग्रास ॥
विप्रा सोडुन इतरा देउन जोडावे पापास ॥३॥

गंगौघासम धन खर्चोनी द्विजांस पुष्ट करावे ॥
पुष्ट करावे मौर्ख्यालस्या व्यसनां वृद्धिस द्यावे ॥४॥

पंगु दीन जे त्यांही खाण्यावाचुन मरुनी जावे ॥
असा धर्म हा श्रेष्ठ जगी ह्या अभिमानास धरावे ॥५॥

असो, ह्यामुळे अनाथ ऐसा अंध सर्वथा तो की ॥
श्राद्धी भोजन मिळे वदे हे नवल दिसे मज लोकी ॥६॥

षड्रस ते मिष्टान्न चाखुनी हर्षे आकुल झाला ॥
पाणी आले त्या फुटक्याही त्याच्या त्या नेत्राला ॥७॥

वाढायाला जी जी जाई हात जोडितो तिजला ॥
किति आभारी दीन बिचारा हृदयी तो तरि झाला ॥८॥

**आई श्राद्धी अभिमानी द्विज अनीतिचा निधि बसला**
**पाहुन तुज हो तोष की कथी अंध पाहुनी असला ।।९।।**

**ज्याला भूक न तयास देऊ अन्न तुझ्या नावाने ।।**
**किंवा ऐशा दीन क्षुधिता काय सांग तुज माने ।।१०।।**

**मज ठावे तू होतिस भारी कनवाळू दीनांची ।।**
**तरी तुला ही खचित रुचेलचि मम रीती श्राद्धाची ।।११।।**

पुणे, मुंबई, नाशिक ते नागपूरपर्यंत वक्तृत्वसमारंभ होत असत व त्या प्रत्येक गावी टिळक जाऊन बक्षिसे मिळवीत. ते लोण राजनांदगावास पोचविण्याचे त्यांच्या मनाने घेतले. अर्थात येथे मराठीत वक्तृत्व कोण करणार ? तेव्हा हिंदी वक्तृत्वसमारंभ ठरला. मला वाटते, बहुतकरून रायपुराहून रा. वामन दाजी ओक ह्यांचे टिळकांना ह्या बाबतीत प्रोत्साहन असावे. कारण राजनांदगावाहून रायपूरला व रायपुराहून राजनांदगावला अशा त्यांच्या पुष्कळ फेऱ्या होत व रा. ओकांचा उल्लेख त्यांच्या डायरीत ठिकठिकाणी आढळतो. त्या वेळी रा. ओक एखादे मासिक काढीत असावेत.

टिळक म्हणतात, "ओकांचा विचार फिरला व कविता ज्ञानसंग्रहाच्या ऐवजी विविध ज्ञानविस्तारास पाठविण्याचे ठरले. कवितेच्या खाली माझे नाव होते ते देणेही अयोग्य ठरवून ते रबराने काढून टाकले. मी क्षूद्र असून माझ्या नावामुळे कविताही क्षूद्र ठरेल, हा ओकांचा आशय."

जानेवारी महिन्यात आपण रायपूरला किती वेळा गेलो, ह्याची टिळकांनी एक जंत्रीच लिहून ठेवली आहे. तीवरून दर चार-सहा दिवसांआड ते रायपूरला जाऊन येत, असे दिसून येते. हिशोबाच्या शेवटी जमा व खर्च आहे. त्यात राजनांदगावी मुक्काम दि. २०—१४ तास व रायपूरला मुक्काम दि. १०—१० तास एकूण ३१ दिवस असा आहे !

टिळकांना पैशाची पर्वा किती असे, हे माझी स्मृतिचित्रे वाचणा-

त्यांना सांगायला नकोच. वक्तृत्वसमारंभाला चहूंकडे निमंत्रणपत्रिका गेल्या. राजनांदगावात तो एक अपूर्व प्रकार होता. जिकडेतिकडे गडबड सुरू होती. आमचे घर तर लग्नघरच होते. टिळकांनी आपला अर्धा पगार वर्गणी म्हणून देऊन टाकला! सामानसुमानाची पाहुणेमंडळीं-करिता जय्यत तयारी ठेवली. मी मीठमसाला वगैरे सर्व तयार करून ठेवले. त्या वेळी भाऊजी व रखमाई आमच्याच घरी होती.

पाहुणेमंडळींची स्वयंपाकाची वेगळी व्यवस्था करण्याचे ठरले होते. परंतु आचारी फारच पैसे मागू लागला. जमलेली वर्गणी बक्षिसे व इतर खर्च ह्यांना पुरेल इतकीच होती.

टिळक मला विचारू लागले, "तू काय वर्गणी देतेस बोल!"

"मी काय देऊ? तुम्ही दिली तीच मी दिली."

"असे कसे? मी जेवलो की तुला जेवायला लागत नाही का?"

"तसे कसे होईल?"

"मग तसेच माझी वर्गणी म्हणजे तुझी वर्गणी नाही."

"पण मजजवळ पैसे कुठे आहेत?"

"एक युक्ती आहे. आम्हाला आचारी मिळत नाही. पैसे फार मागतो."

"मी करते स्वयंपाक. मग पैसे द्यावे लागणार नाहीत ना?"

आणि अशा रीतीने माझी वर्गणी मी भरली. दोन-तीन दिवस मी स्वयंपाक केला. तेथे एकंदर चार-पाच बायका होत्या. त्यांतील एकी-कडे कोठीचे काम होते. ती म्हणे, "जे काही दुपारचे राहिले असेल तेच ऊन करून वाढा."

मी म्हणाले, "मी तसे वाढणार नाही. पिठले-भात का होईना, पण ताजा करून वाढला पाहिजे. ती माणसे आपली पाहुणी आहेत."

झाले. तेवढ्यावरून बोलणे वाढता वाढता मी रागाने उठून घरी आले.

सभा सुटली. सभासद जेवणासाठी जमले. पण तेथे माझा पत्ता नाही. टिळकांना माझा राग आला. ते सगळी माणसे घेऊन घरी आले.

"आज पाहुणेमंडळीला थंडा फराळ का?"

"छे ! सर्व तयारी आहे. तुम्ही जरा त्यांच्याशी बोलत बसा."

"पण तू अशी घरी का निघून आलीस ?"

"माझे भांडण झाले."

घरात सात-आठ दिवसांची जी काही शिधासामग्री होती, ती काढून मी स्वयंपाक केला व माझ्या जावेने वाढले. पाहुणे जेवून गेले. टिळकांना आनंद झाला व समारंभ पार पडला.

समारंभासंबंधी टिळकांच्या डायरीत खालील उल्लेख आढळतात.

(२० मे १८९४)

"सभेची जमवाजमव. आज दिवाणसाहेबांस बोलाविले, पण हे उदरंभरी पुढे पाहू म्हणून आले नाहीत. मिल्टनला काम होते म्हणून तो आला नाही. शंकरप्रसाद, आनंदीप्रसाद, आपाजी मोडक हे गावात नाहीत. आपण वक्तृत्वसमारंभार्थ एक पगार कबूल केला असून आज तो द्यावा लागेल म्हणून हे. मा. अयोध्यानाथ आज आला नाही असे ऐकतो. असो. प्रेसिडेंटचे स्थान व्ही. शारंगपाणी यांस मिळाल्यावर सभेच्या कामास सुरुवात होते...वक्तृत्वसमारंभासंबंधाने थोडी प्रस्तावना झाल्यावर तत्संबंधाने विचार सुरू झाला. १३ मनुष्यांची व्यवस्थापक मंडळी स्थापित झाली. ह्या मंडळीचे अध्यक्ष शारंगपाणी, मंत्री मी व भगवानदत्त, खजिनदार लक्ष्मणराव मोडक, ह्याप्रमाणे ठरले. साधारण खर्चाचा अंदाज पाहता २०० रुपये लागतील असे दिसू लागले. येथवर सभेतील मंडळी हलकेच उठून गेली, व २५ मनुष्यांपैकी १२ उरले !... अस्तु. खर्च बराच होत असून वर्गणी इतकी होणार नाही व आपण रोख शेपन्नास रु. देण्यास समर्थ नाही, एवढ्याकरिता समारंभार्थ येणाऱ्या सर्व पाहुण्यांची व्यवस्था मी ठेवीन म्हणून मी म्हटले. प्रथमतः माझ्या गरिबीकडे पाहून मंडळी विरुद्ध होती, पण माझा आग्रह पाहून मंडळी कबूल झाली तरी ××-×× ही मंडळी मजवर तुटून पडली. यांच्या गप्पा मात्र मी पुष्कळ ऐकल्या आहेत, पण स्वदेशाप्रीत्यर्थ रतिमात्र मेहनत घेताना पाहिले नाही, व विशेषतः नीच द्वेषबुद्धीने केवळ मला दुखवावे हा त्यांचा हेतू पाहून माझे पित्त खवळले व विलक्षण तंटा झाला. लोक म्हणतात, ही माझीच चूक आहे ! बरोबर आहे. कारण ते माझ्या अंगी

शांतीची आशा करितात. आज वर्गणी १३५ जमली.

(२१ मे)

भगवानदत्ताचे कालच्या तंट्याबद्दल भाषण व माझा निश्चय– आजपासून पुढे संतापाच्या स्वाधीन होऊन लोककार्यांत जर अंतराय झाला तर त्याच क्षणी हा देह ठेवायचा नाही.

(१२ जुलै)

आज येथील 'प्रथम हिंदी वक्तृत्वसमारंभ' सुरू झाला. समारंभास नागपूरहून हरिपंत पंडित, शंकर लक्ष्मण गोखले, M. A. रा. अत्रे, B. A. घनश्याम देऊसकर, कृष्णशास्त्री घुले वगैरे १२ गृहस्थ आले आहेत. रायपुराहून सुमारे ८, कामठीहून ३ व इतर ४ ठिकाणचे १० मास्तर डे. इ. वगैरे आले आहेत. सभा दुपारी २ वाजता सुरू होऊन ६ वाजता बंद झाली. ××× च्या सांगण्यावरून राजा व दिवाण बिथरले आहेत. असल्या महामूर्ख शिरोमणीला हा चांडाळ कसा लुटीत आहे, हे ह्याच्या ह्या भित्रेपणावरून सहज समजते. आज सखाराम सहकुटुंब येतो.

(१३ जुलै)

बालोद येथील हे. मा. विश्वनाथ शर्मा व इतर मास्तर लोक केवळ तल्लीन झाले आहेत. पहिल्या विषयावर ९ वक्ते बोलले, दुसऱ्यावर ९ व तिसऱ्यावर ९ च आहेत...राजाकडचे पैसे कबूल केलेले १०० रुपये मिळतात की नाही शंका आहे.

(१४ जुलै)

आजचा सर्व दिवस राजाकडील शंभर रुपये मिळविण्यात गेला. १८५ बद्दल मोठ्या मुष्किलीने १०० रुपये मिळाले! ह्या दुष्ट.स काय करावे समजत नाही.

१५ जुलैच्या डायरीत कोणाला काय बक्षिसे मिळाली ते लिहून शेवटी टिळक म्हणतात, "आम्हांस सेक्रेटरी या नात्याने दोघा मैथिली ब्राह्मणांकडून शिव्या मिळाल्या."

## २३ : खऱ्यांचे घर मागे राहिले !

राजनांदगावला आल्यावर टिळकांनी वाचनाचा व अभ्यासाचा सपाटा लावला होता. उर्दू शिकण्यास एक मुनशी ठेवून त्याच्यापासून ते उर्दूचे पाठ घेत. इंग्रजी पुस्तकेही पुष्कळ वाचीत व कित्येक पाठ करीत. ती पुस्तके कोणती हे मला नुसत्या आठवणीने सांगता आले नसते, पण त्यांच्या डायरीवरूनच बायबलचा फार जोराचा अभ्यास चालला होता, असे दिसते. प्रसिद्ध ख्रिस्ती लेखक बाबा पदमनजी व रे. डॉ. अॅबट ह्यांचा व त्यांचा पत्रव्यवहार होता. व बहुतकरून त्यांच्याच सूचनेवर त्यांनी रे. बाबा पदमनजीचे चरित्र, रे. करमरकर ह्यांचे चरित्र, रे. मोडक ह्यांचे चरित्र, रे. हरी रामचंद्र ख्रिस्ती यांचे चरित्र, हिंदू व ख्रिस्ती धर्मांची तुलना वगैरे बरीच ख्रिस्ती पुस्तके वाचली असावी, असे डायरीवरून दिसते. ते पुष्कळ लिहितात, लोक येऊन त्यांच्याशी वादविवाद करतात, वगैरे वगैरे गोष्टी किंचित निराळ्या अशा मला वाटत, पण हे काय गौडबंगाल आहे हे मला त्या वेळी कळत नसे.

मी माझ्याकडून लिहिण्यावाचण्याचा प्रयत्न करी, पण ते त्यांच्या मनाला येत नसे. माझे लिहिणेवाचणे तेव्हापासून आजपर्यंत अगाध आहे. पेन्सिल, टाक, लेखणी– शेवटी आगपेटीची काडीदेखील मला चालते.

टिळक डायरीत म्हणतात : (७ फे. १८९४) " दत्तू–गृहस्थ गात आहेत. पुढील श्लोक शिकवितो. देवा मला दे बळ खेळण्याला ।। जगातली मौज पहावयाला ।। बाईस नानास सुखात ठेवी ।। प्रभो विनंती मम आयकावी ।।१।। लक्ष्मी काडीने हा श्लोक लिहून घेत आहे. १०० वेळा एक-एक चरण सांगितला तरी पत्ता नाही. चुक्या तर कितीतरी !

स्मृ... १०

ह्या रखमाबाई खांबेटीचा अवतार ! ढोरासारखे काम करील ! तोंडाळ-पणामुळे सर्वांस अप्रिय होईल. "

ह्या वेळेस बायबलवाचनाचा तडाखा चालला होता. त्यावरून तेथील मंडळींशी त्यांचे कडाक्याचे वाद होत.

डायरीत टिळक लिहितात, " विष्णुपंत गोरे घरी अले. त्यांनी रे. बाबांचे चरित्र वाचून परत दिले व बायबलला वाईट शिव्या दिल्या. यावरून त्यांचे व माझे संभाषण. लक्ष्मीचे पित्त खवळले व ती मूर्खासारखे तटकन तोडून बोलली. त्यावरून तिचे व माझे लहानसे भांडण."

बायबलवाचनाचा व विशेषत: डोंगरावरील उपदेशाचा परिणाम मात्र त्यांच्यावर होऊ लागला होता. वर उल्लेखिलेल्या लहानशा भांड-णाबद्दल त्यांना फार वाईट वाटले.

" माझ्या अंगी क्षमा नाही, शांती नाही, काही नाही. शिव ! शिव ! माझी विद्या, विचार व्यर्थ होत," ते असे पुढे म्हणतात.

ख्रिस्ती धर्माविषयी (डायरी १९–२–९४) ते म्हणतात, " ख्रिस्ती धर्माकडे माझ्या मनाची प्रवृत्ती होत आहे. मनुष्याच्या मनास शांती, भक्ती, नीती, धृती, मुक्ती देणारा हा धर्म दिसतो ! काटे, झाडे, खोल दऱ्या, भयंकर पर्वत, भयाण वाळवंटे व मनोरम आंबराई यांनी गजबजलेल्या अमर्याद हिंदुधर्मापेक्षा ह्या लहानशा ख्रिस्तीधर्मरूप सदा प्रफुल्ल व सुफलित बगीच्यात राहणे बरे असे वाटत आहे ! पण आज तर असे उद्‌गार मुखाबाहेर काढण्यासही मला धीर नाही ! लक्ष्मी तर वाचण्याचा सुद्धा कंटाळा करते ! केवळ हिच्या धाकाने व मायेने मी अडलो आहे. परमेश्वरा, मला व तिला सुबुद्धी दे."

टिळक आताशी रोज रात्री कोठेतरी जातात. पण कोठे हे कसे कळावे ? त्यांच्या ह्या वर्तनाचा शोध कोण लावणार ? घरवालीच्या मुलाला सांगावे तर तो मुलगा लहान. त्यालाही टिळक रागाच्या भरात मारायचे. तेव्हा एक दिवस मी विचार केला, की स्वत:च ह्याचा शोध लावायचा. एक दिवस दत्तूला खायला घालून निजविला होता. आमचे दोघांचे कशावरून तरी भांडण झाल्याने रात्री नऊच्या सुमारास चुली-वर थालीपीठ चढले होते. टिळक बाहेर निघाले. जाताना मला म्हणाले,

" मी खऱ्यांच्या घरी जाऊन येतो. "

मी दार लावून घेतले व दाराच्या फटीतून पाहू लागले. टिळक बुटाचा कर्र कर्र आवाज करीत खऱ्यांच्या घराच्या बाजूला वळले. दहा-पंधरा पावले गेल्यावर ते हळूच मागे परतले व पाऊल न वाजविता विरुद्ध दिशेला चोरट्या पावलांनी चालू लागले. चांदणे स्वच्छ पडले होते. थालीपिठाचे पातेले तसेच चुलीवर टाकून मी घराचे दार सताड उघडले व काही अंतरावरून झपझप पावले टाकीत टिळकांच्या मागे चालू लागले. पण पुढे डोक्यात आले, की लोकांच्या घरी शोभा होण्यापेक्षा व दत्तू उठण्याच्या आत घरी गेलेले बरे. तेव्हा त्यांना ऐकू जाईल अशा बेताने मी म्हणाले, " खऱ्यांचे घर मागेच राहिले. ही वाट त्यांच्या घराची नाही."

हे शब्द कानी पडताच टिळक मागे वळले. मीही मुरुडकानोला खाल्ला. आता आमची शर्यत सुरू झाली. मला पुढचा रस्ता दिसेनासा झाला. जमीन दुभंग होऊन मी आत गडप होऊन जाईन तरी किती चांगले होईल, असे मला झाले. मी घरी पोचले व स्वयंपाकघरात जाऊन आतून कडी लावून घेतली.

टिळक येऊन दारावर धक्के देऊ लागले. मी दार उघडीना. शेवटी दार मोडायच्या बेतात आले तेव्हा मी ते उघडले. दार उघडताच टिळकांनी मला यथास्थित चोप दिला. तिकडे थालीपीठ रामरक्षा म्हणतच होते. शेवटी राग शांत झाल्यावर दोघांनीही थंडा फराळ केला.

दुसऱ्या दिवशी माझी सुजलेली पाठ पाहून मात्र टिळकांचे मन अतिशय दुःखी झाले.

त्या दिवशी ते मिल्टन नावाच्या एका युरोपियन माणसाकडे चालले होते. तेथे ते नेहमी जात, बायबल वाचीत, ख्रिस्ती धर्मासंबंधी वादविवाद करीत व खातही, हे त्यांच्या डायरीतील पुढील उताऱ्यांवरून दिसून येईल.

" मिल्टनच्या बरोबर त्यांच्या घरी मिसेस मिल्टनशी परिचय. क्रिश्चियानिटीसंबंधी माझी समजूत व तत्संबंधी मि. मिल्टनशी भाषण.

डायरीतील कित्येक कविता वाचून दाखविणे, वगैरे. मनुष्यास इहपर सुखदायक, पूर्णपणे सुसाध्य व आनंददायक धर्म म्हणजे क्रिश्चियानिटी, असा माझा विश्वास बनत आहे ! जीझस यास परमेश्वराचा पुत्र मी मानीत नाही. पण अत्यंत उदार महात्मा मानतो, हे मी प्रांजलपणे कबूल करतो. १० घरी." (१३–२–९४)

टिळक मिल्टनच्या घरी जेवीत असताना काय घडले याबद्दल ते लिहितात– " हे अद्‌भुत कृत्य पाहावे ह्या हेतूने येथील एक कॉन्स्टेबल यशवंतराव हा काहीतरी काम काढून चारदा आत आला. इतक्यात मिल्टनची मुलगी सारा भात व रोटी घेऊन आत आली. मग तर ह्या गृहस्थाची पक्कीच खात्री झाली ! जातिभेदामुळे परज्ञातीय मित्राच्या येथे जेवणे हेसुद्धा या लोकांना ब्रह्महत्येसारखे वाटत आहे ! पण माझे मनसुद्धा यशवंतरावास पाहून कचरलेच ! धैर्यावाचून विचार कसे लंगडे आहेत पहा." (.१९–२–९४).

" छत्तीसगडात मिशनचे काम करू इच्छिणारे दोघे अमेरिकन मिशनरी किल्ल्यात आले होते. एक वयोवृद्ध व दुसरा केवळ १८ वर्षांचा आहे... मि. मिल्टन, ते दोघे अमेरिकन यांसह बायबलवाचन, संभाषण, भोजन, प्रार्थना.

**।। पद ।।**

**खरोखर हर्ष मला झाला !**
**पाहुन त्या प्रभुभक्ताला ।। ध्रु० ।।**

**प्रेमा कोठे तो त्यांचा ।। कोठे दंभहि विप्रांचा ।।**
**महिमा संस्कृत वाणीचा ।। थोर न संशय मज याचा ।।**
**परी जरि बोध न शब्दांचा ।। तरी तो काय कळे साचा ।।**
**चाल ।। तेच तेच हो संध्यावंदन नित्य एकसरिसे ।।**
**प्रेमा हे हृदया कैसे ? ।। १ ।।**

**भाषा अपुली जन्माची ।। तीच हो गोड फार साची ।।**
**तीतचि जगदाधाराची ।। प्रार्थना ये करिता मनिची ।।**

**ह्यांही भक्तिस ये पूर ।। येतो धावुन बाहेर ।।**
**भाषा लाट गमे त्याची ।। नाही संस्कृत शब्दांची ।।**
**चाल ।। बाळ बोबडे अपुले वदता संतोषे माता ।।**
**नच की शिकलेले वदता ।। २ ।।**

(२६-२-९४)

टिळकांचा पत्रव्यवहार अलीकडे फार वाढला होता. पण ते कोणाला पत्रे लिहीत व त्यांना कोण पत्रे लिहीत हे मला कळत नसे. कित्येक मला सांगत, की त्यांच्या पत्रव्यवहारावर मी नजर ठेवावी व ती चोरून त्यांना द्यावी. पण मी असल्या कृत्याला कधी कबूल झाले नाही. एकदा मला टेबलावरचे बायबल घेऊन जाळून टाकण्याविषयी उपदेश देण्यात आला.

मी उत्तर केले, "बायबल काय हे मला ठाऊक नाही. पण मी हे जाळले तर त्यांना आणखी ते मिळणे अशक्य आहे का? जगातील सारी ती पुस्तके जळून जातील का? तर मग मी ते जाळीत नाही."

डायरीवरून आता कळते, की त्यांचा पत्रव्यवहार मुंबईच्या ख्रिस्ती पुढाऱ्यांबरोबर- व विशेषत: रे. बाबा पदमनजी ह्यांच्याबरोबर होता. १८९५ साली. रे. बाबांनी आपला अनुभवसंग्रह प्रसिद्ध केला त्यात (पान २६९-७०) टिळकांच्या पत्रव्यवहारासंबंधी खालील उल्लेख सापडतो-

"काही दिवसांमागे एका अनोळखी विद्वान पंडिताकडून मला पत्र आले. त्यात असे लिहिले होते, की याने माझे अरुणोदय पुस्तक व दुसरी पुस्तके वाचिली. त्याविषयी त्याने असे दर्शविले आहे की, "ह्या पुस्तकात शब्दलालित्य किंवा अलंकार किंवा शास्त्रदृष्टचा कोणताही गुण नसून मला ती शेकडो वेळा पुन्हा पुन्हा वाचावी असे वाटले. त्यात खरा कळवळा, खरी भक्ती व साधेपणा, व निरिच्छता आहे. आपले आत्मचरित्र मी सध्या सहाव्या खेपेस वाचीत आहे."

ह्या गृहस्थास कोणी ख्रिस्ती गृहस्थ भेटले होते. त्यांचे त्यांचे संभाषण झाले. त्याचा सारांश सदरील पत्रात दिला आहे. तो येणे-

प्रमाणे–

"त्या ख्रिस्ती मनुष्याने मला बायबल वाचले आहे काय, म्हणून विचारले. मी उत्तर दिले, की मी वेद-वेदांगे, पुराणे वगैरे वाचून बसलो आहे. एकंदर धर्मशास्त्रे मनुष्यकृत आहेत, इतकेच नाही तर ती माझ्यापेक्षाही नीच स्वभावाच्या माणसांनी केलेली आहेत ! आता माझे बायबल हे आकाश, ही पृथ्वी, ही वने. सारांश, आता ह्या सृष्टीतच मी ईश्वराचे चरित्र वाचीत आहे. हे ऐकून तो गृहस्थ इंग्रजीत म्हणाला, की आपणाशी वादविवाद करण्याचे सामर्थ्य मला नाही. पण हे बायबल घ्या व हे निदान तीन वेळा वाचा. मी त्यास होय म्हटले व वचनाप्रमाणे पण मोठ्या नाखुषीने वाचायास आरंभ केला. जो जो मी वाचीत गेलो तो तो मला भासू लागले, की हे वर लिहिण्याप्रमाणे भयाण जंगल नसून फार मनोहर असा छोटेखानी बगीचा आहे. ह्या गृहस्थाच्या विनंतीवरून मी त्यास कित्येक पुस्तके पाठविली."

पुढे पुढे त्यांनी बायबलचा अगदीच बारकाईने अभ्यास चालविला असला पाहिजे, असे त्यांच्या १३ सप्टेंबरच्या डायरीवरून दिसते. नेहमीच्या सरावाप्रमाणे "सकाळी उठलो" पासून सुरुवात नसून एखाद्या विद्यार्थ्याने परीक्षेच्या पुस्तकासंबंधी टीपा लिहाव्या तशा टीपा त्या पानावर आहेत.

## २४ : दत्तूवर कविता

राजनांदगावी टिळकांनी दत्तूवर पुष्कळ कविता लिहिल्या मात्र काळाच्या तडाख्यातून आतापर्यंत त्यांपैकी फार थोड्या उरल्या आहेत. (१६–२–९४) –

"दत्तूस मजेने घेऊन रायपूरला जावे असे मनाला वाटते. त्याप्रमाणे त्यास घेऊन वाटेत शाळेतून एक पोरगा घेऊन स्टेशनवर पेण-

शास भेटून २॥ वाजता गाडीत. (Intermidiate Class) डब्यात दत्तू खूप मजा करीत होता.

झाले केवल तीस मास पुरते ज्या बालकाच्या वया ।
ज्याला क्षुद्रपदार्थदर्शन पुरे सानंद नाचावया ॥
धावद्वन्हिरथांत घेउन जरी ह्यालागि मी बैसतो ।
सांगू काय तदीय मौज तरि मी जीच्या सुखा भोगितो ॥

"ही सृष्टीच नवीन । ही न आपुले हो जन्म जीच्यामधी"।
भासोनी नवला करी कितितरी ह्या अर्भकाची सुधी ॥
झाडे जीव वने नद्या सकल हे धावे असे पाहुनी ।
नाचे ! हासुन ओरडे ! बघ म्हणे टाळ्या पिटी मोहुनी ! ॥

वाटे भीति न हा त्यजून मजला धावे गवाक्षाकडे ॥
माझ्या मात्र उरी भरेच धडकी आता गमे हा पडे !
दाबावे तरि हा रडेल भय हे व्यापी मनाला तसे ।
ह्याचे कौतुक कोण हो पुरविता माझ्याविना तो असे ? ॥

नैराश्याग्निकणा सुमावर न ह्या ईशत्प्रफुल्लावरी ।
टाकायास धजे मदीय मन हे मी घेतले दो करी ॥
त्याला चुंबुन दाविले सकल जे त्याने मनी इच्छिले ।
हर्षे मन्मन की तदीय मन तै सांगू किती नाचले ॥

(३१–१–९४)

दत्तूबरोबर खेळलो. त्याला वाजा दिला तेव्हा–

हरिख ते लव वाद्य विलोकुनी
करित नृत्य जणू शिशुच्या मनी
कितीतरी हसला वदला किती
मधुर शब्द मला न जया मिती

दत्तूचे चुंबन—
(९-२-९४)

(द्रुतविलंबित)

त्रिभुवनी अति गोड सुधा असे।
वदति चाखियली कुणि ती नसे ॥
तव शिशो मधुचुंबन घेतले।
अमृत हेच खरे मज भासले ॥ १ ॥
अमृतही न रुचेल अती पिता।
परि तुला मज तृप्ति न चुंबिता ॥
जरि सहस्र दिनी घडली तरी।
सरत भूक गड्या न पहा दुरी ॥२॥
नव मधू वचने तव बोबडी।
परिसता अवघा दिन ही घडी ॥
मज गमे न कळे मज का मनी।
विसरतो अपणा तव लालनी ॥३॥
हे एक दोन तिन चार दहा हजार।
झाली तरी न मज तृप्ति भुके न पार ॥
दे दे अजून मज चुंबन एकवार।
बाळा तसेच मधु ते जगतात फार ॥४॥

एक दिवस पेणसे ह्यांची मुलगी नर्मदाबाई— तेलंग्याला दिली होती ती— आमच्या घरी बसावयाला आली होती. बरोबर तिचा दोन-अडीच वर्षांचा मुलगा होता. त्याची व दत्तूची क्षणात दृढ मैत्री झाली. टिळकही त्यांच्याबरोबर खेळू लागले. त्या प्रसंगी त्यांनी खाली दिलेली कविता केली—

१५-२-९४

" दोघे शिशु समवयस्क सुंदर दो अडिचा वर्षांचे
कळे जणू ते रम्य शोभती कोमल मधु सुमनांचे

अन्योन्याला पाहुन फुलले किती हासले हर्षे
गोड बोबड्या वचनांचा तै शीतल पाउस वर्षे
हृदये ती अव्याज सारखी प्रेमे एक जाहली
हातामध्ये हात घालुनी नाचति शिशु ज्या काळी
शरश्चंद्र मम त्या नानाला देई आपुला बाजा
सांगे काही भाषा त्याची तोच जाणता समजा
अन्योन्याला घेउ पाहती कटिवर अंकी स्कंधी
नानापरिच्या लीला करिती बालक ते आनंदी
अल्प थोर की परिचित न तसे भेद हा न तै येई
मधे आडवा ! त्या बाळांच्या प्रेमानंदी पाही
मन्मन रिझले, लीन जाहले, शोकाकुलही झाले
झाले मायाविवश तसे ते वेदांतांतहि शिरले
वदलो पुढती बाळांनो तुम्हि असेच हो अज्ञान
रहा ! जन्मभर नाचा खेळा हसा नको धनमान "

टिळक रायपूरला दत्तूला घेऊन गेले असता रात्री तो झोपेत दचकला त्या वेळची कविता अशी आहे–

" जरा लोळला हालला बोलला तो
तरी घाबरा जीव होऊन जातो
पलंगावरोनी पडे का खाली
गमे स्वस्थ माते न हो झोप आली
दचकला तिनदा प्रिय मी तसा
दचकलो तिनदा न कळे कसा
नच शिशू ममता मज जागवी
उगिच भीति मनी अनुराग वी
आई घरी म्हणतसे ' छळ काय मेला '

क्रोधे कधी सहज दे चपराक याला
मी चुंबिले जवळ घेउन मात्र बाळा
याच्यामुळे जरि न झोप पळैक याला
सारे असो धन कलत्र न पुत्रमोह
माया महानदीतला अति गाढ डोह
सारी नदी तरुन जो अडकून जाय
येथे तया न परपारद हो उपाय

तसेच दत्तूला एकदा खूप ताप आला होता. त्या वेळी खालील कविता टिळकांनी लिहिली :–

" ज्वरे ग्लानी आली शिथिल वपु होऊन पडला
कधी नाही एक क्षणभरहि जो स्वस्थ बसला
सदा ज्याची चाले बडबड न तो शब्दहि वदे
किती हाका मारी जननि परि तो उत्तर न दे
अवस्था ही पाहे प्रिय निजसुताची गडबडे
मुखा पाही त्याची हनु धरुनि बोले बहु रडे
मनी चिंता भीती अशुभ उपजे जै उर उडे
मुले जी गेली ती अजि जणु उभी खेळति पुढे
पोटा लावुनि हात ताप बघते अंगी मुलाच्या किती
कैशी शंभरदा घडीत चळली वाटे हिची ही मती
दाबी पाय शिरास थापटि बळे देते स्तनाला मुखी
मायेने नवसा करी कितितरी पाहून चिंतामुखी

हा दृष्टिचा सर्व विकार ह्याला
की कोप आला कुलदेवतेला
मी फेडिले ना नवसास तीच्या
ह्या कल्पना येति मनी सतीच्या

नथ उतरुनि ठेवी नाक घासून बोले
उघडिल जरि माझा बाळ रात्रीत डोळे
तरि तव नवसाला आधि फेडीन देवी
मग नथ अपुल्या ही नासिका जाण लावी
तात्पर्य; की, यातच रात्र गेली
मलाहि ती स्वस्थ न झोप आली
उठोनि नाडीच उगा पहावी
की कल्पना मी भलती करावी
वैद्यास मी आणुन दावियेले
बाळास, त्याने मज धैर्य आले
आली झोप परंतु नाही
त्याची अहा ती निजलीच आई

## २५ : सखारामभाऊजी व रखमाई

वक्तृत्वसमारंभाच्या गडबडीत सखारामभाऊजी रखमाईसह आले होते. रखमाईस नववा महिना होता. भाऊजी तिला ठेवून गेले. नंतर तिला पाठवून देण्याविषयी पत्रावर पत्रे येऊ लागली. शेवटी भाऊजी तिला घेऊन जाण्यासाठी पुन्हा आले. ते आल्यानंतर चार-सहा दिवसांत रखमाईस घेऊन गेले. त्यांच्याबद्दल टिळक आपल्या डायरीत लिहितात:– (७–८–९४)

ही प्रेमवल्ली अशीच आहे :– पद

**' ही प्रेमाची वल्ली । खेळ न बापा फार निराळी ।।ध्रु।।**
**इतर लता त्या वृक्षी चढती ।**
**भिन्नपणे त्या त्यावर वसती ।**

ही तो तरु आपण ही–धरिति एकचि रूपगुणाली ॥
ही प्रेमाची वल्ली ॥१॥
विरहोष्णाने जो जो जळते
तो तो पावे वर्धन बळ ते
तरुपासुन दुर दिसते–नित्य परी त्या लपटुनि रमली ॥
ही प्रेमाची वल्ली ॥२॥
इतर लता त्या लपटिति तरुला
तरुला ही की तरुही हिजला
लोकास्तव नच जगती–अन्योन्यास्तव जन्मा आली ॥
ही प्रेमाची वल्ली ॥३॥
पुष्पधनूने पुष्पशराने
पुष्पि लाविले हिला स्मराने
माळी हा हिस पाळी–ह्याच्या हातुन सफल जहाली ॥
ही प्रेमाची वल्ली ॥४॥
ह्याच्यावाचुन कोठे न दिसे
विरळा कोठे दिसते निवसे
जशि अमुच्या संसारी–श्रीनारायण ठेवी वहिली ॥
ही प्रेमाची वल्ली ॥५॥

अस्तु. हे गृहस्थ ७०० मैलांवरून काही कारण नसता केवळ पत्रात कळविल्याप्रमाणे आपल्या Sweet–heart करिता आले आहेत. हे आपल्या कुटुंबास घेऊन जाण्याविषयी विचार करीत आहेत. हिचे ९ महिने भरत आले आहेत, शिवाय पोरगी आजारी, पाऊस म्हणतो मी ! धन्य आहेस बाबा !

* * *

कालचाच गोंधळ आज. आज हे आमच्या मागे लागले आहेत की आपल्या कुटुंबाला पाठवा. हे बायकोला नेणार, तेव्हा लक्ष्मीला पाठविणे आलेच.

धाडाया प्रिय सखिला । बहू अवघड वाटे मम जीवाला ॥ध्रु॥
रोज जरी मी हिजला । बहु दुखवी बोलुन कटु शब्दाला ॥१॥
दर्शन नलगे मजला । जा नीघ जरी मी म्हणतो हिजला ॥२॥
वाटे सर्व जनाला । जरि त्रासुन गेला हा भार्येला ॥३॥
विरहोष्णे प्रेमाला । अजि कैसा आता ऊतच आला ॥४॥
नारायण लक्ष्मीला । मम लौकर देवो आणुन मजला ॥५॥

बरे हे हिचे झाले; पण दत्तू . . .

कुडीचा प्राण दूर जातो । तैसा भासे जणु होतो ॥ध्रृ॥
सोडुन दूर बाळ ह्याला । भासे शून्य सर्व मजला
नेतो दूर प्रकाशाला । बंधू आज न बाळाला

॥ चाल ॥ वरुनी न दिसे वडवानळसम विरह कृती करितो ।
हृदया माझ्या जाळीतो ॥१॥

त्याला काय बेटचाला ? श्लोक

काका काका आगगालीत आई
तू मी बैसू आणखी कोणि नाही
जाऊ जाऊ दूर की मौज पाहू
खाऊ खाऊ खूप ताईस देऊ ॥१॥

अस्तु; पण लक्ष्मी– पद

पाय न उचले हात न चाले मुख उतरोनी हीचे गेले ॥
मोठेपण दावाया हासे डोळे परि हे भरुनी आले ॥ पाय न ० ॥ध्रु॥
कांता मम हे प्रेमळ किति हे आज मला कळले ॥
व्यर्थ गांजितो ह्या अबलेला पश्चात्तापे मन्मन जळले ॥१॥
विलंब होता घरास येता एक पळाचा ही बहु खवळे ॥
पारतंत्र्य ते न सहे मज परि हीचे कळले प्रेमच सगळे ॥२॥

अल्पबुद्धिने देउ दुरुत्तर प्राण हिचे मजवर हे कळले ।।
भार्या नामा योग्य सतीला आजवरी मी व्यर्थचि छळिले ।।३।।

(१०-८-९४)

* * *

सखारामपंतांचे बायकोला घेऊन जाणे ठरते. ८-१ सेटलमेंटचे काम. सखारामपंतांचे जाणे रहित होते. सगळी तऱ्हा आहे. जावोत की न जावोत, मी पोष्टातून १० रुपयांपैकी ९।।। रुपये आणले. अहाहा-

नाही दहा हे रुपये कशाचे । होते जणू अंकुर हे तृणाचे
दारिद्र्यडोही बुडल्यास थारा । तोहीं परी ढासळलाच सारा

० ० ०

(११-८-९४)

आज सखारामपंतांचे पुन्हा जाणे ठरते. याची... बायको हा गोंधळ करीत आहे. यांच्याजवळ ही येण्याविषयी हट्ट धरीत आहे. आमच्याजवळ मला धाडू नका म्हणून आर्जव करीत आहे. लबाड ! पहिल्या नंबरची लबाड ! याच्या समक्ष हिची फजिती उडविली, तरी याला बेट्याला आपले बायकोचे सारेच अज्ञान ! ह्याला म्हणतात प्रेमांध !

संध्याकाळच्या गाडीने सारी जातात.

गाडीत बसल्यावर -बंधू -

गेले जेव्हा सोडुनी बायकोला । तेव्हा नेत्रा अश्रुंचा पूर आला ।।
आता भावा सोडुनी जाय बोले । प्रेमे येतो ! नेत्र नाहीत ओले ।।

भावजय :- - - - -

लक्ष्मी:- नेत्रांतोनी टप टप सखी आसवे टाकिताहे ।।
माझ्या तोंडा बघून-जणु ते प्रेम बाहेर वाहे ।।
बोलो पाहे परि न वदवे कंठ दाटून आला ।।
कष्टे सांगे स्वतनुस जपा नेहमी पत्र घाला ।।

मी:- सारीच सोडुन मला अजि दूर जाति ।।

येणे मनात मम भासत थोर खंती ।।
हासोन मी जरि वदे शिव पंथ व्हावा ।।
चित्तांत कोण भडका मज मात्र ठावा ।।१।।

दत्तू :– बसायास त्याला मिळे ' आगगाई '
अहा बाळ नाचे हसे आणि गाई
कुठे दाद त्याला तदा ह्या पित्याची
मुके घेतले शुद्धि ही नाहि त्याची.

आम्ही राजनांदगाव सोडल्यानंतर टिळकांना आमची फार आठवण होत असे. ता. २८ ऑगस्टच्या डायरीत टिळक म्हणतात :

" जेव्हा जेव्हा प्रिय मम सखी सोडुनी दूर जाते
तेव्हा तेव्हा स्थिति मम अशी फार वाईट होते
जी जी गावे त्यजुनि रिघलो चाकऱ्या सर्व ती ती
सोडी भार्याविरहविकला होऊनी चित्तवृत्ती

मुंबई, नागपूर, वणी आणि आता हे राजनांदगाव केवळ अशाने सुटले. बायको जवळ नसली म्हणजे माझे डोके फिरते, यात संशय नाही. राजीनामा नामंजूर झाला व कर्जमुक्त झालो तर काही होवो– कुटुंबास घेऊन यावयाचे. चमत्कार तो हाच :–

साकी

जवळी असता एक दिवस नच कलहावाचुन गेला ।
जाता दूरी सदा चिंतितो आता मी भार्येला ।।१।।

केव्हा केव्हा संन्यासाची वेळ भांडता यावी।
आता क्षणही नेत्रांपुढची मूर्ति न दूर सरावी ।।२।।

तीन तीन दिन धरुन अबोला कोपे दूर रहावे ।
स्वप्नी तिजसह आता प्रेमे भाषण मधुर करावे ।।३।।

लिहिता पढता मध्ये वदली तरी कोप ये मजला ।
लिहिणे पढणे आता न दुजे एक सोडुनी तिजला ॥४॥
काय करीतो कोठे जातो वदतो लिहितो काय ।
भान न मजला भ्रांत मतीही वाळुन गेला काय ॥५॥
त्याग करुन जन्माचा व्हावे पूर्ण मोकळे वाटे ।
आता रात्रंदिवस तयेच्या स्मरणे हृदयचि दाटे ॥६॥
हसणे बसणे वदणे सारे तेव्हा मज नावडती ।
आता सारे विलास तीचे मधुर मनोहर गमती ॥७॥
प्रेमलता ही विचित्र मरते जी मज तेव्हा गमली ।
तीच पहा ही विरहाग्नीनें कैशी पुष्ट जहाली ॥८॥

## २६ : डायरीवरून

राजनांदगावास असता रा. वामन दाजी ह्यांची व टिळकांची पुष्कळ मैत्री जमली. टिळक त्यांच्याकडे रायपुरास पुष्कळ वेळेस जात. रायपुरास एकदा कमिशनरचा दरबार भरला होता. त्यात राजनांदगावच्या राजेसाहेबांबरोबर टिळक गेले होते. ओकांच्या घरची मुले राजनांदगावास आमच्याकडे एक-दोन वेळेस आली होती.

ह्या मुलांबद्दल टिळकांनी असे लिहून ठेवले आहे :– " सोमवार २९–१–९४, रायपूर. वामन दाजी ओक ह्यांच्या वडील मुलाचे नाव गणपती. वय सुमारे १६. धाकटा गोपाळ, वय १२–१३, मुलगी बयो, वय २०. काशी ६–७ पुतण्या शिवराम, वय २२–२३, पुतण्या दामू, वय १६. गणपती मनाचा उदार, प्रेमळ व एकंदरीत उदात्तप्रकृती आहे; गोपाळ मंद, गरीब दिसतो. शिवराम आपले काम बरे व आपण बरे अशांतला, पण दूरदर्शी दिसतो. दामू वामनरावांची प्रतिमा होणार. यांत गणू व

दासू चांगले बुद्धिमान आहेत. वयो गरीब, सुशील, मायाळू, मर्यादशील दिसते. काशी तशीच होईल, पण रागीट होईल."

ही सर्व बालगोपाल मंडळी पुढे जगात पुढे आली का मागे राहिली हे नक्की माहीत नव्हते, परंतु नागपुरास साहित्यसंमेलनाच्या वेळी गोपाळराव ओक, सौ. काशीताई भट व रा. दामोदरपंत ओक ही मंडळी भेटली. रा. दामोदरपंत नागपूरच्या नॉर्मल स्कूलचे मुख्याध्यापक झाले आहेत ! काशीताई मुळीच रागीट दिसल्या नाहीत व गोपाळरावांचा लहानपणाचा गरीब स्वभाव अगदी आहे तसा कायम आहे असे दिसून आले ! ही सारी मंडळी ३५।४० वर्षांनी अचानक भेटली !

रायपूरला दरबारात राजेसाहेबांतर्फे जे इंग्रजी भाषण वाचण्यात आले, ते टिळकांनी लिहून दिले होते व हायस्कूलच्या मुलांसाठी त्यांनी कविताही करून दिल्या होत्या.

ओकांच्या घरी रा. दामोदरपंत व रा. गणपतराव ह्यांची व टिळकांची विशेष मैत्री असावी असे दिसते. एकदा त्यांचा चष्मा हरवला व रा. दामोदरपंतांनी तो खूप शोधला वगैरे मजकूर डायरीत सापडतो. तसे स्टेशनवर हे दोघे पोचवावयास गेले होते असे लिहितात, " एकंदर मुले मजकरिता विरहदु:खी झाली. " त्या दिवशी घरी आल्यावर दत्तूबद्दल ते लिहितात,

**" नाना नाना म्हणताचि शरच्चंद्र धावून आला ।**
**घे घे घे घे म्हणून बिलगे बाळ माझ्या तनूला ।।**
**आले माझे नयन भरुनी घेतला चुंबियेला ।**
**गेला माझा श्रमभर पळे दूर तै सर्व गेला ! ।।"**

* * *

एकदा दारावरून एक मोतीवाला गेला तेव्हा टिळक मला म्हणाले, " मला भिकबाळी चांगली दिसेल नाही ? " टिळकांना दागिन्यांचा किंवा छानछोकीचा मुळीच नाद नसे. त्यांनी आपल्याला भिकबाळी असावी असे म्हटलेले ऐकून मला फार वाईट वाटले. आमच्या

स्मृ... ११

घरात अठराविश्वे दारिद्र्य नसले तरी टिळकांच्या वागण्याने आमची नेहमी अडचण मात्र होत असे. तेव्हा नवीन मोती घेऊन त्यांना भिकबाळी करून घालणे निदान त्या दिवशी तरी शक्य नव्हते. शिवाय मोती विकत घेतली असती तर ते मजवर खात्रीने खूप रागावले असते. एकदा मी एक तांबड्या खड्यांचा बिजवरा घेतला, तर त्यांनी केवढे थैमान केले होते ! त्यांच्या डायरीत (१६–१–९४) त्यासंबंधी उल्लेख आहे. " बायकोची इच्छा मीच बाजार केला पाहिजे ! म्हणजे माझे संसारात लक्ष खरे ! लक्ष्मीने आज तीन रुपयांचा खोट्या दगडांचा व भिकार सोन्याचा बिजवरा विकत घेतला. घरात शिल्लक काय ती ८ रुपये ! इतक्यावर महिना काढावयाचा ! त्यात हा विनाकारण खर्च ! ३ रुपये जानकीस म्हणजे XXX नावाच्या भंगट पटवाऱ्याच्या बायकोस उसनेही दिले ! असे मी करतो तर मात्र हिने माझा प्राण कासावीस केला असता ! " – (अर्थात माझे नेहमीचे मत, की हे उधळपट्टी करतात. पण असो.)

मी माझी नथ होती ती मोडून त्यांना भिकबाळी करण्याचे ठरविले. ही नथ– मुंबईच्या सोनाराने जिचे काही मोती बदललेले होते तीच नथ– मोडून सोनाराकडून त्यांच्यासाठी भिकबाळी बनविली व दत्तूला केशवमामांनी दीड तोळ्याची बिंदली करून दिली होती, ती मोडून त्या सोन्याची अंगठी करून त्यांच्या हातात घातली.

ह्याबद्दल टिळकांच्या डायरीत असा उल्लेख आहे : (१४-२-९४)

" आज सकाळी एक हृदयद्रावक गोष्ट घडली ती अशी :–

(साकी)

**मोती घ्या मोती बहु उत्तम खरा माल घ्या कोणी**
**वदत असे चालला प्रभाती अमुच्या दारावरूनी १**

**गृहकर्मा विसरल्या बायका ऐकुन त्या वचनाला**
**ठेवुन शिशुला द्वारी आल्या किती धावुनी बाला २**

**धनाढ्य जाती परत करोनी तुच्छ तया मालाते**

नीच मनाच्या युवती करिती तुच्छ दरिद्र पतीते ३
संसारी ज्या नुकत्या शिरल्या त्या नाथावर रुसती
बरे चल गडे पाहू मोते तो वदता मृदु हसती ४
पतिशी करुनी विश्वासाचा घात जाहल्या सधना
वदती ‘ ये तू बाहिर जाता नाथ सोडुनी सदना ’ ५
प्रिया मदीया संसारी बहु दक्ष काचमणि घेई
माझी वृत्ती पूर्ण जाणुनी धांदावलि जी नाही ६
मीच परी बोललो मला घे भिकबाळीला मोत्ये
कधी न म्हणणाराचे माझे वचन तिला लागे ते ७

(श्लोक)

मायाळू मम त्या वचा परिसुनी चित्ती सखी खोचली
माझ्यावाचुन कोण ह्यास म्हणुनी भारी श्रमी जाहली
होती एक जुनी घरात नथ जी प्राणाहुनी आवडे
मोडी तीच ! खरोखरीच ममता ! हे मत्करे ना
घडे ८

भिकबाळी स्वये गुंफी आनंदे बैसुनी
निजहस्ते कर्ण माझा भूषविते कामिनी
मजपुढती दर्पणाला धरिते की प्रेमला
संसारी सौख्य साचे अजि लाधे हे मला ” ९

* * *

टिळकांकडून मला वीस रुपये घ्यावयाचे होते. घरात नेहमी अडचण असे. तरी ह्या वीस रुपयांतले पाच रुपये घरात खर्चाला ठेवून बाकीच्या पैशांचा काही दागिना करावा असे मला वाटे. टिळक म्हणत, “ दागिन्यांचा सोस तुला फार. ” ह्यावर आमचे भांडण झाले. ते झाल्यानंतर ही कविता तयार झाली :–

(२४–२–९४)

आता येतिल नाथ वीस रुपये माझे तुम्हांपासुनी
दत्तूला लघु दागिना घडविणे ही हौस माझ्या मनी
ठेवोनी गृहि पाच मात्र रुपये आणीन चांदी नवी
तोळे होतिल पंचवीस मग मी हौस हो पूरवी ॥१॥

सोन्याची नव मुद्रिका घडवुनी घालीन किंवा करी
नाथा मी तुमच्या बघेन मज तै हो धन्यता अंतरी
गेही तंदुलतैलसैंधवघृता पैसा न हा संशय
मेला नित्यचि लागला ! कधि पुरा व्हावा तरी आशय ॥२॥

होईल निर्वाह कसा तरी तो
घेणेकरी काय जिवास घेतो ?
पैसा नसे ह्यास्तव काय झाले ?
आयुष्य का आजवरी न गेले ॥३॥

असा जरी निश्चय मी न केला
धडा जिवाचा जरि हा न झाला
तरी मरे तो पुरणार काय
माझी जगी हौस लहान हाय ॥४॥

वदे असे पुष्कळ ती मजेचे
देती मला हर्षचि शब्द तीचे
दरिद्र आम्ही परि धैर्य हौस
प्रेमा किती देति तरी सुखास ॥५॥

आशा धृती निश्चय हाच पैसा
प्रेमा मणीचा निधि गेहि जैसा
राहे उणे काय तरी अम्हाला
निर्द्रव्य पाही नच दृष्टि ज्याला ॥६॥

टिळकांची प्रकृती ह्या वेळेस फारच ढासळू लागली होती. त्यात आपण फार आजारी आहो– कधी क्षय झाला, तर कधी दमा लागला, तर कधी तिसरेच, असा टिळकांना संशय येई. त्यामुळे आता आमच्या घरात पुस्तकांच्या व्ही. प्यां. बरोबरच औषधांच्याही व्ही. प्यां. चा सुळसुळाट झाला होता. रायपुरास त्यांनी आपली छाती तपासून घेतली. तेथील एका डॉक्टराने सांगितले, की डिस्पेप्शिया झाला असून लिव्हरजवळच्या दोन लंगस् खराब झाल्या ! असे सांगणाऱ्या ह्या डॉक्टर-साहेबांनी टिळकांची चेष्टा केली, की पैसे उकळण्यासाठी काहीतरी सांगितले कळत नाही. टिळक त्याच स्थितीत राहिले असते तर त्यांचा मृत्यू मात्र खात्रीने पंचवीस वर्षे आधी नमूद करावा लागला असता.

ख्रिस्ती धर्माकडे त्यांचा उघड उघड कल दिसू लागला व ज्ञानोदयात तशा अर्थाचे त्यांचे काही लिखाणही प्रसिद्ध झाले. (१८-२-९४) "हरि रामचंद्र ख्रिस्ती यांचे चरित्र पुरे केले. हिंदुधर्माचा यथानुशक्ती शोध करीत असता वेद-वेदान्त वगैरेने किंवा महमदी धर्माची माहिती मिळवीत असता अत्यंत आवेशी मुसलमानांच्या भाषणाने जो आनंद झाला नाही, तो ही ख्रिस्ती पुस्तके वाचीत असता मला होत आहे. मिशनरी लोकांनी प्रेमपुरस्सर दिलेली कितीतरी पुस्तके मी न वाचता फेकून दिली, फाडलीसुद्धा ! पण ती बाळपणी मात्र," असे टिळक आपल्या डायरीत लिहितात.

एक दिवस टिळक नियमाप्रमाणे बाहेर गेले. मी मुलाला निजवून सचिंत मनाने बसले होते. सुखदुःख सांगायला तरी कोणी हवे ना ? तसे माझे कोण होते ? एक मुलगा. पण त्याला खाण्याखेळण्यावाचून काहीच माहीत नाही. तेथे टिळकांच्या विरुद्ध काही माणसें होती. तेव्हा बाहेर कोणाशी बोलण्याचे भय वाटे. त्यातून भाषा निराळी. टिळक

ख्रिस्ती होणार म्हणून चहूंकडे बभ्रा झालेला. ते घरी आल्यावर मी विचारलं,

" खरंच का हो तुम्ही ख्रिस्ती होणार ?"

" तुला कोण सांगतो ?"

" लोक !"

" तू लोकांशी लग्न केलेस का माझ्याशी ?"

" तुमच्याशी !"

" मग मी सांगतो ते खरे का लोक सांगतात ते खरे ?"

" तुम्ही सांगता ते."

" मग मी तुला सांगतो– मी ख्रिस्ती होत नाही."

इतके भाषण झाल्यावर टिळक बाहेर गेले. मी दाराला आतून कडी लावून घेतली व अगदी हंबरडा फोडून मनमुक्त रडले. त्या रडण्याने मला हलके वाटले. अगदी संथ पाण्यावर लहानशा वाऱ्याच्या झुळकीने लहरी उठतात. माझे मन तर भूत, वर्तमान व भविष्य ह्या तिन्ही ठिकाणच्या वादळाने उचंबळून आले होते. त्या दिवशी मी माझी पहिली कविता लिहिली. ती कविता मला अजून आठवते.

**म्हणे जातो सोडून नाथ माझा**
**अतां कवणाला बाहूं देव राजा**
**सर्वव्यापी सर्वज्ञ तूच आहे**
**सांग कोणाचे धरू तरी पाये**

कवितेची शेवटची ओळ लिहून होताच दाराला धक्का बसला. कवितेच्या कागदाचा चोळामेळा करून मी तो रद्दीच्या टोपलीत फेकून दिला. दाराला धक्के बसतच होते. दार उघडण्याला उशीर झाला म्हणून टिळकांना राग आला.

ते म्हणाले, " तू कधी दाराला कडी लावीत नाहीस, नि आजच कशी लावली ?"

त्यांना माझा काही संशय आला.

" तू काय करीत होतीस ?"

" निजले होते."

" दार का नाही लवकर उघडलेस ?"

" उठायला वेळ नको का ? मी काय यंत्र आहे वाटतं ?"

" चल, जेवायला वाढ."

मी आत गेले. मी गेल्यावर टिळक चहूकडे पाहू लागले. त्यांना वाटले, मी कोणाला पत्र लिहिले असावे. त्यांना काहीच समजले नाही.

शेवटी त्यांनी रद्दीची टोपली पालथी केली. तीत शोधता शोधता माझा कवितेचा कागद त्यांना सापडला. माझी कविता पाहून टिळकांना अत्यानंद झाला. त्यांनी ती उचलून कपाटात बंद करून ठेवली. अलीकडे टिळक आपले कागदपत्र कुलपात ठेवीत. ते बाहेर गेल्यावर लोक मजजवळ त्यांचे कागदपत्र पाहण्यास मागत.

मी त्यांना म्हणे, " मी कधीच दाखविणार नाही. तुम्ही जरी माझ्या हिताचे सांगत असाल तरी मला ते दाखविता येणार नाहीत."

" निदान त्यांच्या टेबलावरची बायबलची प्रत तरी जाळून टाका."

मी म्हणे " बायबलची ही प्रत जाळली, तर साऱ्या जगातल्या प्रती नाहीशा होतील का ? सांगा. मग मी ती प्रत जाळते." माझ्या ह्या उत्तराने ती माणसे जात.

माझे कागद न दाखविण्याचे कारण मात्र निराळेच होते. आम्ही एका लहानशा संस्थानात होतो. ह्या संस्थानात त्या वेळी दक्षिणी ब्राह्मणांवर डोळा होता असा माझा समज झाला होता. कारण काही ब्राह्मण काही न काही कारणांनी तुरुंगात पडले होते. तेव्हा ह्यांच्या कागदात राजाविरुद्ध काही असले तर काय करायचे ? तशात संस्थानात बिगाऱ्यांवर काही जुलूम होत असे, त्या बाबतीत टिळकांनी बरीच खटपट चालविली होती.

ता. ४ फेब्रुवारीच्या डायरीत टिळक ह्यासंबंधाने लिहितात,

" किल्ल्यातून सुमारे १०० बिगारी घेऊन पाच-सहा शिपाई खऱ्यांकडील लोखंडी पिंजरा (वाघाचा) उचलून नेण्याकरिता जात आहेत ! काल सकाळी १०० बिगारी फुकट उपाशी ३ वाजेपर्यंत सकाळपासून ठेवून पुरता २० हात पिंजरा गेला नाही. डोक्यावर पिंजरा !

त्यामुळे दमदेखील टाकवत नाही. अशा स्थितीत एका बिगाऱ्याच्या पायाला लागून जखम झाली; त्यामुळे सहजच त्या वेदनांनी तो व्याकुळ होऊन त्याच्याच्याने नेट देववेना ! म्हणून एका चपराशाने त्यास गुरासारखे चाबूक हाणले ! कोण जुलूम ! केवढी निर्दयता ! आणि केवढी ही छत्तीसगडी गाढवांची भीरुता ! सहनशीलता ! पाश्चात्त्य देशांत १०० माणसांच्या समुदायावर २ शिपुर्डे असा जुलूम करतील काय ? आमचे राजेसाहेब डोळ्यांनी ह्या बिगाऱ्यांची ही दुर्दशा पाहतील तर बरे होईल. राजेसाहेबांस ह्या बाबतीत आधी अर्ज करायचा. ४-५ बिगाऱ्यांच्या बाबतीत हिंदीत अर्ज लिहून शारंगपाणी व सदाशिवराव यांच्याजवळ राजेसाहेबांजवळ देण्याकरिता दिला. असे ठरले आहे, की हे दोघे असतील तेव्हा राजेसाहेबांजवळ जाऊन ह्या अर्जासंबंधाने बोलणे करावे. कित्येक मंडळीस या कृत्याबद्दल मी पागल वाटत आहे ! आमचे शिरस्तेदारास हे फाजीलपणाचे दिसत आहे. ईश्वरा, तू या गरिबांवर दया करून मला धैर्य व राजास दयाबुद्धी दे. मी तर काही होवो, तुझ्यावर भाव ठेवून प्रयत्न करणारच करणार !" आणखी एके ठिकाणी ते म्हणतात, "राजाचे डोळे उघडतील असे एखादे पुस्तक लिहिण्याचा विचार आहे."

ह्या प्रकरणावरून किंवा ख्रिस्ती होणार म्हणून ह्या प्रकरणाचा उपयोग करून टिळकांना गोत्यात आणण्यासाठी त्यांचे कागदपत्र कित्येक मंडळी पाहण्यास मागत असावी, अशी माझी समजूत झाल्याने मी त्या बाबतीत फार जपू लागले. ते पडले संस्थान. टिळक काही आडपडदा न ठेवता वाटेल ते लिहून टाकायचे. कोणी 'ध' चा 'मा' करून त्यांना गोत्यात आणले तर काय करायचे ? मी त्यांच्या प्रत्येक चिटोऱ्याला जपू लागले.

आता आमच्या येथे पाहुण्यांची गर्दी जमू लागली. नित्य नवे व पुष्कळ पाहुणे येऊ लागले. टिळकांची त्याच्याशी बोलण्याची व वादविवाद करण्याची धांदल. हे लोक आहेत तरी कोण व का येतात असे मी टिळकांना एक दिवस विचारले.

त्यांनी सांगितले, "हे सगळे माझे मन वळविण्यास येतात."

एकजण म्हणाला, "पहा टिळक, मला कोणी नाही. माझी इस्टेट बरीच आहे. मी तुम्हाला सर्व बक्षीसपत्र करून देतो."

त्यांना दत्तक घेण्यास तो तयार झाला. टिळकांनी त्यांना सांगितले की, "मी ख्रिस्ती होत नाही, आणि झालोच तर पैशासाठी होणार नाही."

अप्पासाहेब बुटींनी बापूसाहेबांना मुद्दाम राजनांदगावास पाठवून कळविले की, मी तुम्हांस शंभर रुपये तुमच्या हयातीपर्यंत देतो, घर देतो व दत्तूची विद्या करतो ! पण तुम्ही ख्रिस्ती होऊ नका.

टिळकांनी बापूसाहेबांची समजूत करून त्यांना परत लावून दिले.

टिळक ख्रिस्ती होणार अशी बातमी नाशकास पेंडशांना कळली, तेव्हा त्यांचे पत्र आले, 'की तुम्ही मजजवळ येऊन रहा. मी तुम्हांला जन्मभर पोशीन व दत्तूची विद्या करीन. तुम्ही माझ्या येथे मांसमच्छर खा, वाटेल ते प्या, मी तुम्हांला मुळीच मना करणार नाही; पण तुम्ही ख्रिस्ती होऊ नका.'

श्रीमंत अप्पासाहेब बुटींच्या ठिकठिकाणी पेढ्या होत्या. त्या प्रत्येक ठिकाणी टिळकांच्या हालचालीवर नजर ठेवण्याविषयी अप्पासाहेबांचे निरोप गेले. बापूसाहेबांनी जाताना मला हे सर्व सांगितले व पैसेही दिले. 'जर काही कमजास्त वाटले तर आम्हाला ताबडतोब तार करा. आम्ही काहीतरी करून त्यांना अडकावून ठेवू. त्यांच्यावर कर्ज दाखवून शेवटी तुरुंगात ठेवू, पण ख्रिस्ती होऊ देणार नाही. तुम्ही काही काळजी करू नका.'

## २८ : माझे जाते कोठे आहे ?

भाऊजींच्या बरोबर रखमाईच्या बाळंतपणासाठी मी पंढरपुरास गेले, ते मागे लिहिलेच आहे. रखमाई ज्या दिवशी बाळंत व्हावयाची त्याच दिवशी राजनांदगावहून टिळकांची तार आली की, 'मी आजारी आहे. तरी सौभाग्यवतीस लौकर पाठवून द्यावे.' पत्रापेक्षा टिळकांना

तार करणेच अधिक आवडे. तार तितकी लौकर जाते. मात्र खिशात पैसे पाहिजेत. ते असले म्हणजे ते वाटेल तेव्हा तारा करीत.

तार पाहताच कोवळ्या मनाचे भाऊजी घाबरून गेले. त्यांनी ताबडतोब माझी तयारी केली. त्या वेळी भाऊजींच्या घरात फार अडचण होती. पण त्यांनी आपल्या अडचणीकडे मुळीच पाहिले नाही. ते मला म्हणाले, " वहिनी तुम्ही पुष्कळ दिवसापासून इकडे आला आहा; नानांची जेवणाची अडचण झाली असेल, तरी आजच जा. "

त्यांनी मजजवळ तिकिटाचे पैसे दिले. पंढरपूरहून बैलगाडीने कुर्डुवाडीस जावयाचे, पुढे पाच-सहा ठिकाणी गाडी बदलायची. लहान मुलगा माझ्याबरोबर. तेव्हा मी भाऊजींना म्हणाले, " मला सोबत कोणीतरी द्या. मी एकटी कशी जाऊ ?"

पण भाऊजींनी कसकसे जायचे ते मला अगदी नीट समजावून लिहून दिले. मीही मग दत्तूला घेऊन एकटी जाण्यास निघाले.

पंढरपूरला तात्यासाहेब काणे नावाचे एक ओव्हरशियर राहत होते. त्यांची बायको भिकूताईची मैत्रीण होती. निघताना मी त्यांचा निरोप घेण्यास गेले. तिला मी म्हटले, " आज मी चालले. "

" तुमच्याबरोबर कोण आहे ?"

" कोणी नाही, मी एकटीच जाणार आहे. "

" भिकूताई मला काय म्हणेल ? मी तुम्हाला एक बाई पाहून देते. हे पैसे घ्या, " असे म्हणून तिने माझ्या हातावर वीस रुपये ठेविले.

मी माझ्या सोबतिणीला घेऊन निघाले. ती विधवा होती. तारेमुळे मी फार घाबरले होते, त्यामुळे बरोबर खाण्यापिण्यास काही घेतले नव्हते. आम्ही दोघी आपल्या उपाशीच प्रवास करीत होतो. दत्तूला काहीतरी घेऊन देत होतो. असे करता करता भुसावळ आले.

भुसावळला रखमाईचे वडील राहत असत. ते मला स्टेशनवर भेटायला आले होते. भाऊजींनी त्यांना तार केली असावी. त्यांनी बरोबर पुष्कळ फराळाचे आणले होते. ते आग्रह करू लागले, की आजच्या दिवस येथे राहून जा.

" काका, मला राहता येत नाही. तार आली आहे. मला लौकर घरी गेलेच पाहिजे. "

म्हातारा फार फटकळ होता. प्रेमळ फार, पण अभद्रही फार बोलायचा. त्यांनी माझी समजूत केली, " हे पहा, मी सांगतो तुला, टिळक काही मरत नाही तू एक दिवस इथे राहिलीस तर. "

" हे हो काय काका असे अभद्र बोलता ?"

मला रडायलासुद्धा आले. गाडी चालू लागली. रात्री आठाच्या सुमाराला ती नागपुरास येऊन उभी राहिली.

मी माझ्या सोबतिणीला घेऊन नागपुरास उतरले व तपास करीत भिकाजीपंतांच्या दाराशी येऊन उभी राहिले. दार बंद होते. आमचा दोघींचा जीव भुकेने अगदी व्याकुळ झाला होता. दत्तूची किरकीर चालूच होती व मनात टिळकांबद्दल हुरहूर लागून राहिली होती.

दाराला धक्के दिल्यावर कितीतरी वेळाने दार उघडले गेले. दार उघडताच व मी नजरेस पडताच पहिले शब्द कानी पडले,

" वहिनी, माझे जाते कुठे आहे ?"

" जळो तुमचे जाते ! माझा भुकेने प्राण चालला आहे. आधी जेवायला वाढा. "

" चला, भाऊंचे पान वाढून ठेवले आहे. ते गेले आहेत बाहेर. तुम्ही बसा आधी. " मी जेवले. बरोबरच्या बाईने फराळ केला.

पाच-सहा वर्षांपूर्वी आम्ही पहिल्यांदा नागपुरास होतो तेव्हा बुटीच्या चाळीत मी ह्यांचे जाते आणले होते. त्यानंतर आमचे तीन-चार संसार मोडले होते. टिळकांनी हे जाते कोणाला तरी देऊन टाकले होते.

भिकाजीपंत आल्यानंतर राहण्यासाठी आग्रह करू लागले. पण मला तार आलेली होती. तेव्हा मी राहणे शक्यच नव्हते. आम्ही सकाळी साताच्या गाडीने बसून अकराला राजनांदगावी पोचलो. स्टेश-नवर हमाल मिळेना. तेव्हा मी घेतले बोचके व बाईने घेतले दत्तूला व आम्ही चालत चालत घरी आलो.

घरी आलो तो दाराला कुलूप ! माझ्या पोटात धस्स झाले. घरवाली घरात नव्हती. तेव्हा मी खऱ्यांच्या घरी गेले. तेथे जाऊन तपास केला तेव्हा समजले, की टिळकांची प्रकृती खडखडीत आहे ! मग आम्ही खऱ्यांच्या घरी जेवलो व परत येऊन चार वाजेपर्यंत अंगणात टिळकांची वाट पाहत बसलो.

चार वाजता टिळक आले. मी विचारले,

" हे काय ? तार कशाला केलीत ?"

" तूं कामाने दमून जाशील म्हणून."

" इतके दिवस राहिले– आणखी दहा दिवसांनीच दमणार होते का ? त्यांची केवढी बरे अडचण झाली !"

" घेतील करून ते."

असो. नेहमीप्रमाणे थोडासा गोंधळ, आदळआपट होऊन मग आम्ही गुण्यागोविंदाने राहू लागलो.

एक दिवस टिळक मला म्हणाले,

" आज मला दोन मिशनरी भेटले. त्यांनी इंग्रजीत प्रार्थना केली. अशी सुंदर प्रार्थना मी कधीच जन्मात ऐकली नव्हती. मला ती फार आवडली."

टिळक सांगत होते पण माझे त्यांच्याकडे लक्षच नव्हते. पुढे काय होते इकडे माझे लक्ष होते.

थोड्याच दिवसांनी टिळक मुंबईस जाण्यास निघाले. मी म्हटले, " मुंबईला कशाला चालला ?"

ते म्हणाले, " मला राजेसाहेबांकरता घोडे खरेदी करावयाचे आहेत."

खरे-खोटे त्यांचे त्यांनाच माहीत. शेजारीपाजारी म्हणत, त्यांना जाऊ देऊ नका. ते ख्रिस्ती होण्यास जात आहेत. मला काही सुचेना. त्यांना जर विचारले तर ते म्हणायचे, तू माझ्याबरोबर लग्न केलेस का लोकांबरोबर ? दुसरे, ज्यांनी मला असे सांगितले त्यांच्याशी ह्यांचे फुकट भांडण. तेव्हा मी आणखी काही बोलले नाही. विचारात मात्र खूप दूर झाले.

शेवटी एक रामबाण युक्ती सुचली. मी टिळकांना म्हटले, "तुम्ही दत्तूला बरोबर घेऊन जा."

"का ? त्याला कशाला ?"

"उगीच."

माझा खरा हेतू असा होता, की मुलगा बरोबर असल्यावर ते कसे ख्रिस्ती होतील ? हो-ना करता करता दत्तूला बरोबर नेण्याचे ठरले व मी निर्धास्त झाले.

टिळकांनी वाटेतच नाशकास उतरून दत्तूला पेंडशांच्या घरी नेऊन ठेवला व स्वतः पुढे मुंबईला निघून गेले. दत्तूचे वय अवघे दोन वर्षांचे होते. तो आईबापांपासून दूर कधीच राहिलेला नव्हता. तो पेंड-शांच्या येथे फार रडे. तेव्हा त्यांनी त्याला जलालपुरास माझ्या भावांच्या घरी पाठविला.

संकटे दारातून येऊ लागली म्हणजे रोगही खिडकीवाटे डोकावू लागतो. जलालपुरास दत्तू गोवराने आजारी पडला. सर्वांना काळजी वाटू लागली. पण इकडे त्याच्या आजाराची खबर त्याच्या आईलाही नव्हती व बापालाही नव्हती.

मी नेहमीप्रमाणे लंकेची पार्वती बनून राजनांदगावात एकटी बसले होते. बापूसाहेब बुटींनी तारेसाठी देऊन ठेवलेल्या पाच रुपयांपैकी दोन रुपये जवळ शिल्लक होते, बाकीचे तीन रुपये घरात खर्च झाले होते.

टिळक गेल्यानंतर शेजारीपाजारी मजभोवती जमा झाले. ते म्हणू लागले, "हे काय केलेत तुम्ही ! टिळकांबरोबर मुलाला कशाला धाडला ? तो मोठा थोडाच आहे ? त्याला काही समजेल का ? टिळ-कांना आपल्या मुलासुद्धा नाही का ख्रिस्ती होता येणार ?"

खरेच की. माझ्या हे कसे लक्षात आले नाही ? माझ्या उरात आता दोन सुऱ्या खुपसल्या. पण वरून मी शेजाऱ्यांची समजूत करी, की एखादे वेळेस दत्तूमुळे त्यांचे मन फिरेल.

मन मात्र फारच उदास झाले होते. नातलगांपासून पाचशे मैलां-वर दूर मी एकटीच पतिविरहाने व पुत्रविरहाने तळमळत रात्रीच्या रात्री

रडण्यात घालवू लागले.

टिळकांना जाऊन तीन आठवडे झाले. मुलगा कोठे, टिळक कोठे, वगैरे काहीच पत्ता लागेना. मी स्वत:ला दोष देऊ लागले. मी होऊनच दत्तूला पाठविले. मन चिंती ते वैरी नाही चिंतीत. स्टेशन जवळ होते. रोज दोन वेळेस मी स्टेशनवर जाऊन, निराश होऊन, हिरमुसले तोंड करून परत यावे.

राजनांदगावी सखारामपंत नावाचे एक जेलर होते. ते टिळकांचे मित्र होते. त्यांच्याकडे टिळकांचे बरेच जाणेयेणे असे. तेव्हा त्यांना काही माहिती असण्याचा संभव होता, म्हणून मी त्यांच्याकडे जाण्याचे ठरविले. पुन्हा शंका आली की मी त्यांच्याकडे गेले तर लोक काय म्हणतील. तरी तशीच मी त्यांच्याकडे गेले. ते बाहेर गेल्याचे चौकीवर कळले. तेव्हा घरी त्यांना बोलावले आहे म्हणून निरोप सांगून मी घाबऱ्या घाबऱ्या आपल्या घरी आले.

गावात सगळे म्हणू लागले की, आता टिळकांचे काम खात्रीने जाणार. एक हितचिंतक येऊन मला म्हणू लागले, " बाई, तुम्ही जाऊन दिवाणांचे पाय धरा म्हणजे तुमच्या नवऱ्याचे काम राहील. नाहीतर काम खात्रीने जाणार. "

माझा खरा सल्लागार देव होता. दिवाणाचे पाय धरण्याला माझे मन काही घेईना. तरी पण लोकाग्रहास्तव मी दिवाणाच्या घरी जाण्यास निघाले. अगदी घराजवळ पोचले.

तेथे मनात विचार आला, मी दिवाणाचे पाय धरले आणि त्याने टिळकांचे काम टिकवले तर लोक म्हणतील, बायकोमुळे टिळकांचे काम टिकले. हरकत नाही काम गेले तरी, पण लोकांनी टिळकांना असे काही म्हणता उपयोगी नाही. काम गेले तर भीक मागण्याचा तर प्रसंग येणार नाही. आणि आलाच तर ते भीक मागतील व त्यांच्या मागे मी पदर पसरीन. हे विचार येताच मी अगदी दिवाणाच्या उंबऱ्यावरून परत फिरले.

चार वाजता जेलर आले. मी विचारले, " टिळक कोठे गेले ?"

" मला काहीच माहीत नाही."

" खरंच अगदी ?"

" अगदी खरं. "

" मला वाटलं तुम्हाला ठाऊक असेल. "

" खरंच नाही. "

" मग एक तार करा. "

" कोणाला ?"

" नारायण कृष्ण पेंडसे यांना नाशिकला तार करा. "

" काय लिहू ?"

" टिळक तिकडे आले आहेत का ?"

मी जवळ असलेला रुपया त्यांना दिला व त्यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे तार केली.

## २९ : राजीनामा

माझी तार नाशकास पोचली त्याच दिवशी मुंबईहून टिळकही नाशकास येऊन पोचले. त्यांना पाहताच भिकूताईने त्यांच्याजवळ पन्नास रुपये देऊन सांगितले, की 'आत्ताच्या आत्ता राजनांदगावला जाऊन मनीला घेऊन या. तिला भेटून दोन वर्षे झाली. आजच सकाळी तिची तार आली आहे आणि आमचीही बदली कोठे लांब होण्याचा संभव आहे.' हे ऐकताच टिळक निघाले ते राजनांदगावला येऊन पोचले. मी माझ्या नित्यनियमाप्रमाणे स्टेशनवर हजर होतेच. टिळकांना पाहून मला फार आनंद झाला. पण दत्तू कोठे दिसेना ! तेव्हा मी कावरीबावरी झाले.

" दत्तू कोठे आहे ?"

" मामाच्या घरी. "

" का ?"

" आपल्याला आता तिकडे जायचे आहे. "

" मी येत नाही. "

" तुझ्या मेव्हण्याची बदली दूर होणार आहे. भिकूताईची लौकर भेट होणार नाही म्हणून तिने तुला बोलाविले आहे. तिने मजजवळ भाड्यालासुद्धा पैसे दिले आहेत. "

" दिले असतील– पण मला यायचे नाही. "

" तू किती हट्टी आहेस ! तुला तुझ्या बहिणीला देखील भेटावेसे वाटत नाही का ? किती निर्दय आहेस तू ! "

" मला तुम्ही वाटेल ते म्हणा, पण मी येणार नाही."

" मग काय करणार ?"

" काय म्हणजे ? मी येथे राहीन !"

" पण मी येतो ना तुझ्याबरोबर. "

" आणि कामाचे काय करणार ?"

" राजीनामा देणार. "

" बरं, सामानाची काय व्यवस्था ?"

" सामानाकरता पुन्हा येऊ. "

धरले तर डसते, सोडले तर पळते अशी माझी स्थिती झाली. कोठेही जाण्याचे झाले की सारे सामान आवरून पेट्यांत भरून त्यावर माझ्या नावाचे सील करून मी ठेवीत असे. कारण नाहीतर टिळक सर्व सामान वाटून टाकीत. अर्थात सीलबंद सामान त्यांच्या तडाख्यातून वाचे असे नाही. बहुतकरून एखादे गाव सोडले म्हणजे माझी व त्या सामानाची पुन्हा कधी गाठ पडत नसे. त्या गावाचीसुद्धा भेट होत नसे, मग सामानाचे कसचे काय ! किल्ल्यांची मात्र मी नेहमी धनीण असे व अशा किल्ल्या टिळकांच्या मृत्यूपर्यंत शेर दोन शेर वजनाच्या घरात साचून राहिल्या होत्या.

टिळक म्हणाले, " आपण लौकरच परत येऊ. तेव्हा फार सामान बरोबर घेऊ नको." तरी मी त्यांच्या ब्यागमध्ये दोन कोरी लुगडी, एक फाटकी पासोडी, एक फुटका तांब्या इतके सामान निघता निघता कोंबलेच. आम्ही दोघांनी राजनांदगावला रामराम ठोकला व आमची गाडी पुढे चालू झाली.

. नागपूरपर्यंत टिळक मजबरोबर होते, पण नागपूरचे स्टेशन येताच त्यांना तेथल्या एका जरुरीच्या कामाची आठवण झाली. ते मला म्हणाले, " तू जा पुढे; मी येतो मागून. मला नागपुरास फार जरुरीचे काम आहे."

टिळकांची नेहमीच जरुरीची कामे निघत. ती पुष्कळ वेळेला मला कळत नसत. मी तरी कुठे वाद घालीत बसणार ? त्यांच्याशी वाद घालणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याप्रमाणे होते.

मला एकटीला घेऊन गाडीने नागपूर सोडले. जवळ पैसा नाही. नाकातल्या सुंकल्याशिवाय दागिना नाही. दत्तूची बिंदली मोडून टिळकांना दोन तोळ्यांची अंगठी केली होती तीही त्यांनी कोणाला देऊन टाकली होती व मला हरवली म्हणून सांगितले होते. जवळ टांग्यालासुद्धा पैसे नव्हते.

नाशिक स्टेशनवर दुपारी तीन वाजता गाडी आली. नाव लक्ष्मीबाई अवतार लंकेच्या पार्वतीचा. फाटके लुगडे, नाकात बारीकसे सुंकले, हातात टिळकांचे नाव मोठ्या अक्षरांत लिहिलेली बॅग. अशा अवताराने मी स्टेशनवर उतरले.

दोन माणसे माझ्याकडे धावून आली. ती माझ्या हातातील बॅग घेऊ लागली. मी घाबऱ्या घाबऱ्या त्यांच्या तोंडाकडे पाहू लागले. ही अनोळखी माणसे असे काय करतात मला कळेना. ते मला म्हणाले, " मावशी, तुम्ही आम्हाला ओळखले नाही ? आम्ही पेंडशांकडून तुम्हाला नेण्यासाठी टांगा घेऊन आलो आहो."

भिकूताई दारातच माझी आतुरतेने वाट पाहत उभी होती. टांगा येताच तिने मला उतरून घेतले. माझा तो अवतार पाहून तिला फार वाईट वाटले. तिने गहिवरून मला पोटाशी घट्ट आवळून धरले. " मने, काय तुझी ही दशा झाली आहे !"

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी झाल्यावर माझे अंग धुणे वगैरे होऊन मी जेवायला बसले. जेवून बाहेर येते तो भाऊ गाडी घेऊन आला. " मनू, दत्तूला फार खोकला येतो. तू चल जलालपुराला."

भिकूताई म्हणाली. " ने बाबा तिला. सीता निघाली वनवासा।

स्मृ... १२

पाठी लागती अवदशा। आईची व मुलाची जवळजवळ सव्वा महिना ताटातूट झाली आहे."

जलालपुरास गेल्यावर दत्तूकडे पाहून मला अतिशय रडू कोसळले. तिसऱ्या दिवशी भिकूताईकडून जलालपुरास आम्हाला नेण्यासाठी तांगा आला व आम्ही दोघे नाशिकला आलो. आता सर्वांना फक्त टिळकांचीच काळजी राहिली होती.

सात-आठ दिवसांनी टिळक आले. मग मात्र आम्ही सर्व निश्चित झालो. सर्व आनंदात होतो. पण मला आपली काळजी वाटेच. पुढे काय करायचे याबद्दल प्रत्येकजण आपल्यापरी टिळकांना सल्ला देऊ लागले.

घारूमाई म्हणे, "टिळक, तुम्ही कीर्तने करीत हिंडा. मावशी न् दत्तू राहतील आमच्याकडे. तुम्ही येऊन जाऊन राहत जा."

पेंडसे म्हणत, "तुम्ही आता कोठेच जाऊ नका. मी जिवंत आहे तोवर तुम्ही सगळे माझ्याजवळ राहा. जेवणखाण माझ्याकडेच होत जाईल. शिवाय खर्चाला मी तुम्हाला दरमहा २५ रुपये देत जाईन.'

टिळक म्हणाले, "मला कोणाचीच ताबेदारी नको. घारूमाईच्या सल्ल्याप्रमाणे मी कीर्तनकार बनतो; पण कीर्तनासाठी लागणारे सामान लागेल ते आणायला मला मुंबईला गेलेच पाहिजे."

पेंडसे म्हणाले, "एवढ्यासाठी मुंबईला कशाला जायला पाहिजे? मी बाळाला पत्र टाकतो की ताबडतोब तो तुम्हाला पाहिजे ते सर्व सामान पाठवून देईल."

पण टिळकांना ती कल्पना पसंत नव्हती. ते म्हणाले, "तसे कसे? हे सामान ज्याचे त्याने आपल्या पसंतीने खरेदी केले पाहिजे."

ह्यावर नानासाहेब काय बोलणार? ते बिचारे गप्प बसले.

चांदोरीचे जहागीरदार त्या वेळी नानासाहेबांच्या घरी उतरले होते. त्यांना एका बाजूस घेऊन नानासाहेबांनी सर्व हकीगत सांगितली व टिळकांना बरोबर नेऊन त्यांचे लक्ष दुसरीकडे लागेल असे करा, अशी त्यांना विनंती केली. जहागीरदारांनी पेंडशांची विनंती मान्य केली.

टिळक थोड्या वेळाने पेंडशांना म्हणाले, "जहागीरदार मला चांदोरीस आपल्याबरोबर चला म्हणतात."

पेंडसे म्हणाले, " बरे आहे. जा त्यांच्याबरोबर काही दिवस."

जाताना टिळकांनी घरच्या प्रत्येक माणसाचा निरोप घेतला. दत्तूला मांडीवर घेऊन त्याचे मुके घेतले तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून खळखळा अश्रुधारा वाहू लागल्या. सर्वांना वाटले, टिळकांना आता पश्चात्ताप झाला. आता ते संसारात लक्ष घालतील.

दहा-बारा दिवसांत चांदोरीहून टिळक परस्पर मुंबईस निघून गेले. म्हणजे टिळकांचा पेंडशांच्या घरचा तो शेवटला दिवस ठरला.

टिळक गेल्यावर जहागीरदारांचे पेंडशांना पत्र आले. ते त्यांनी माईसाहेबांना एका बाजूस नेऊन दाखविले. पत्र वाचल्यापासून माईसाहेबांनी बिछाना धरला तो अगदी शेवटपर्यंत.

दोन-चार दिवसांत पुष्कळशा वर्तमानपत्रांतून टिळक ख्रिस्ती झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली.

## ३० : धर्मान्तर

टिळक ख्रिस्ती झाल्यानंतर काय काय झाले ते दुसऱ्या भागात सांगेन. ह्या प्रकरणात आता ख्रिस्ती होण्यासंबंधी त्यांनी लिहून ठेवलेला मजकूर देऊन हा भाग संपविते.

" आपणा सर्वांस माहीत आहे की, जे सत्यशोधक आपल्या कोत्या बुद्धिमत्तेच्या कसोटीवर पवित्र शास्त्राची किंमत करू पाहतात, त्यांच्या मार्गांत नव्या करारात सांगितलेले प्रभू ख्रिस्ताचे चमत्कार डोंगरासारखे येऊन पडत असतात. या शोधकांस " मनुष्याच्या पुत्राची " ओळख होते, पण " देवाच्या पुत्रास " ओळखण्याची योग्यता त्यांच्या ठायी नसते. ते खांबी गेलेल्यास ओळखतात, पण पुन्हा उठलेल्या प्रभूला ओळखण्याची त्यांना मारामार असते. अशा शोधकांची खातरी करण्याचा उत्तम उपाय म्हटला म्हणजे त्यांच्याबरोबर प्रार्थना करावी,

प्रार्थनेच्या सुवर्णमहाद्वारातून त्यास वारंवार बापापुढे नेऊन उभे करावे व त्या दयावंत जगत्पित्याविषयी त्यांच्या हृदयात खरे प्रेम जागे करून द्यावे. येणेकरून त्यास बापाची ओळख पटेल, व अर्थातच ह्या चमत्कारांविषयीच्या त्यांच्या शंका निरास पावतील. मला नेहमी असे वाटते, की खऱ्या शोधकाला ईश्वरच स्वतः असले कठीण मुद्दे स्पष्ट करून दाखवितो.

नवीन ख्रिस्ती झालेल्या व्यक्तीभोवती– मी तसाच आहे, कारण मला धर्मांतर करून नुकते अकरा महिने झाले आहेत– खऱ्या सत्यशोधकांपेक्षा ज्यांचा बाणाच मूर्तिपूजेचा आहे किंवा सदा नन्नाचा पाढा घेऊन बसलेले पाखंडी, अगर ज्यांना काही समजत नाही, काही समजून घेण्याची इच्छाही नाही, ज्यांच्या अंगी टवाळकीपलीकडे काही करण्याची योग्यता नाही, असल्या लोकांचा घोळका जमत असतो. यांतले पुष्कळ लोक ह्या चमत्कारांवर विश्वास ठेवण्याइतका मी वेडा कसा झालो म्हणून हसत आहेत. जे मला पूर्णपणे ओळखतात त्यांस तर हे मोठेच गूढ कोडे वाटत आहे. या सर्वांस माझा जबाब एकच असतो. मी त्यांना म्हणतो, " पहा, मीच चालताबोलता चमत्कार आहे. मजकडे पहा. निदान जे मला ओळखतात त्यांस तरी हा चमत्कार उघड उघड कळण्यासारखा आहे. मी ख्रिस्ती नाही का ? माझा प्रभू ख्रिस्ताचे ठायी पूर्ण भाव आहे ना ? सुमारे दोन-सव्वादोन वर्षांपूर्वीच मी ह्या ख्रिस्ताचा व त्याच्या अनुयायीजनांचा हाडवैरी नव्हतो का ? आज ख्रिस्तसेवेस्तव सदा उत्सुक अशा ह्याच हाताने त्याच ख्रिस्ताच्या निंदेच्या भरात किती कागद भरकांडिले आहेत ? आज जी जिव्हा ख्रिस्ताच्या एका कृपेची साक्ष द्यावयास सदा तयार आहे तिनेच त्या पवित्र नामाची एका काली नाही नाही ती अवहेलना केली आहे ना ? त्या वेळेस हा ख्रिस्ती होईल असे कोणाला स्वप्नात तरी वाटले होते का ?

हिंदुधर्माचा इतका अभिमान बाळगणारा हा गृहस्थ, त्या धर्माला त्याज्य मानून बायबलवर्णित देवाच्या इच्छेस सादर होईल अशी त्या वेळेस कोणी कल्पना तरी केली असेल काय ? तथापि माझा तो अभिमान गळाला व आज मी देवापुढे ख्रिस्ताचा हात धरून लहान बाळा-

प्रमाणे उभा आहे, हे पाहून इतर लोक आश्चर्य करतील यात काहीच नवल नाही. पण माझे मलाच याचे आश्चर्य वाटत आहे. यापेक्षा आणखी चमत्कार कोणता पाहिजे ? ह्या चमत्काराच्या खरेपणाला प्रमाणे नकोत.

खरोखरच बंधुभगिनींनो, हा चमत्कार अशातला आहे की, ही सर्व देवाची दया होय. यावाचून अन्य शब्दांनी याचे स्पष्टीकरण व्हावयाचे नाही. ख्रिस्ती होणारा मी नव्हे; तर त्या ममताळू मेंढपाळानेच मजकरिता आपली नव्याण्णव कोकरे सोडून, मला भयंकर पहाडातून धुंडाळून आणिले आहे. माझ्या अंगात किती अभिमान आणि ताठा भरून उरलेला ! माझी तयारी नवीन धर्मसंस्थापना करण्याची होती– तोच मी आता येशूचा शिष्य बनलो आहे ! धन्य तो प्रभू ! खरोखर, सारा धन्यवाद त्यालाच असो."

" हिंदुस्थानासाठी एक नवीन धर्म स्थापण्याचा मी प्रयत्न करीत होतो खराच. इतकेच नाही, तर ज्याच्या योगाने जगातील सर्व राष्ट्रे एका बंधुत्वाच्या अनुबंधाने एकजीव होतील असल्या धर्माच्या मागे मी लागलो होतो. ह्या कल्पनेने कित्येक वर्षे मी गुंगून गेलो होतो. ही कल्पना म्हणजे पुढे ख्रिस्तीपणाचे महामंदिर रचण्याकरिता, परमेश्वराच्या सदय कराने, माझ्या अंतःकरणात आधारशिलेसारखी बसविण्यात आली होती.

कोणतेही कार्य एकदम होत नाही. मी ख्रिस्ती झालो, पण हा परिणाम ज्या परोक्षापरोक्ष कारणपरंपरेचा झाला, तिचे इत्थंभूत वर्णन देण्यास मला अवकाश नाही. इतके पुरे, की माझी आई फार भाविक व प्रेमळ होती. तिची ही वृत्ती कशाने बनली ते मला माहीत नाही. तिने ख्रिस्ताचे नाव कधी काढल्याचे मला आठवत नाही, पण " देवाला भिऊन वागा," " सर्वांचे बरे करा," हा उपदेश ती आम्हाला नेहमी करीत असे. मातृपणाच्या पवित्र कर्तव्यासंबंधाने माझ्या आईसारखी परिपूर्ण बाई माझ्या पाहण्यात दुसरी आली नाही. ती मूर्तिपूजक असून असे कसे होईल, अशी शंका घेण्याचे कारण नाही; कारण ईश्वर आपल्या विशिष्ट कार्यार्थ मूर्तिपूजकांसही सद्‌गुण देऊन साधनीभूत करून घेतो,

हे आपणास ठाऊक आहे. याशिवाय फार लहानपणी मला एक शिक्षक मिळाला होता. ह्या गृहस्थाला स्वदेशाच्या उपयोगी कसे पडावे हे जरी कधीच समजले नाही, तरी स्वदेशप्रीतीला मात्र त्याच्या अंतःकरणात सदैव पूर आलेला होता. त्याने आपल्या हाताखालची लहान डोकी तशीच आपल्याप्रमाणे स्वदेशभक्तीने वेडी करून टाकिली.

ह्या व अशाच इतर परिस्थितीमुळे माझ्या मनाला काही चमत्कारिक वळण मिळाले. मला चांगले आठवते, की अगदी बाळपणी वर्गात भूगोलाचा धडा चालला असता तेथे माझे शरीर मात्र असे, पण मन दूर प्रवास करायला जाई. कारण इकडे धडा चाललेला व तिकडे माझे डोके पुढे हिंदुस्थानाचे काय होणार ह्या गहन विचारात गढून गेलेले ! इतक्या लहानपणीसुद्धा माझ्या देशातला जातिभेद पाहून माझे पित्त खवळे.

मी केवळ चवदा-पंधरा वर्षांचा असता, एकदा मुलांच्या सभेत " एकंदर दानधर्माचा मक्ता ब्राह्मणांकडेच का ?" या विषयावर बोललो होतो. त्या वेळेस माझ्या बापाने काही मौजेने व काही रागाने " हा पुढे एक दिवस बाटणार " म्हणून जे उद्गार काढले होते, ते आता मला आठवतात. एखाद्या जुन्या चालीस चिकटून राहणाऱ्या शिक्षकाच्या हाताखाली मी कधी होतो असे मला वाटत नाही. बहुधा माझी गाठ सुधारक शिक्षकांशीच पडलेली असे. येणेकरून कोणत्याही विषयावर प्रांजलपणे विचार करण्याची मला सवय लागली. या शिक्षकांनी मला विचार, उच्चार व आचार या त्रयींत धीटपणा दिला. माझी आई लवकरच निवर्तली; व एकंदर माझ्या बाल्यावस्थेत, जेणेकरून माझ्या विचारस्वातंत्र्याला खंड पडेल असला धाकदपटशहा माझ्या कपाळी कधीच आला नाही.

हिंदुस्थानला ऊर्जित काळ आला तर तो धर्माच्या महाद्वारानेच येईल, अशी माझी पक्की समजूत झाली होती. त्यामुळे माझ्या शक्तीप्रमाणे धर्म व तत्त्वज्ञान ह्या विषयांच्या अभ्यासात मी गढून गेलेला असे. शेवटी नागपुरास मला एक खरा आश्रयदाता मिळाला.

आजपर्यंत मी ह्या सन्मान्य गृहस्थाला आपल्या बापाप्रमाणे

मानीत आहे. चार-पाच वर्षांपूर्वी मी ह्या गृहस्थाचे काम पत्करिले. काम म्हणजे नुसते लेखनवाचन. हिंदुधर्मसंबंधी, विशेषतः वैदिक व अध्यात्मवाङ्मय जितके उपलब्ध होते तितके मिळविण्यात त्यांनी हजारो रुपये खर्च केले. त्या अध्यात्मज्ञानात व कल्पनासागरात एकसारखा तीन वर्षे मी पोहोत होतो. मला अभ्यासाची हौस होती व ती ह्या सन्मित्राने पुरविली. शेवटी माझ्या नवीन धर्माची मूलतत्त्वे मी तयार केली ती ही :–

१ जगाचा कर्ता कोणीतरी अन्तःकरणविशिष्ट व्यक्ती आहे, त्याला सर्व मनुष्यजाती लेकरासारखी आहे.

२ सर्व धर्मशास्त्रे मनुष्यकृत असून, ईश्वराचे ज्ञान करून देणारा एकच ग्रंथ आहे, तो ग्रंथ हे जग होय.

३ पूर्वजन्म व पुनर्जन्म हे मुळीच नाहीत. मनुष्याचे सुखदुःख व्यक्तीच्या आनुवंशिक, आत्मविशिष्ट व सामाजिक कर्तव्यपराङमुखतेवर अवलंबून आहे.

४ देवाचे ठिकाणी भाव व इहपरलोकी बंधुता हेच सर्व धर्माचे सार होय.

५ मूर्तिपूजेसारखे पाप दुसरे नाही.

ह्या मतांची स्थापना करावयाची म्हणजे मला एक अवलियाच बनले पाहिजे होते. नंतर मी निरनिराळ्या धर्मसंस्थापकांच्या चरित्रांचा अभ्यास करू लागलो. त्यांपैकी पुष्कळांचे व माझे जमले नाही. तथापि गौतम बुद्धाची व माझी गट्टी जमली व त्याच्या चुक्या सोडून त्याचेच अनुकरण करण्याचा मी विचार केला. आश्चर्य वाटते की, बायबल किंवा ख्रिस्त ह्या गोष्टी माझ्या स्वप्नीही आल्या नाहीत. याचे पहिले कारण बायबलची अत्यंत सोपी भाषा होय. आपणास सर्वथा दुर्गम किंवा ज्याच्या योगाने मेंदूला बरीच कसरत पडेल अशा विषयांत ब्राह्मणाचे लक्ष लागावयाचे. हा त्यांचा जणू काय जन्मस्वभावच बनून गेला आहे. जर हिंदुधर्मावरील संस्कृत ग्रंथांची प्राकृत भाषान्तरे करून ती ब्राह्मणांच्या हातात दिली, तर माझी खातरी आहे, की ते ती केराकचऱ्यासारखी समजून दूर फेकून देतील. ज्यातले एक अक्षरही समजत नाही

असे मंत्र कोणी म्हणू लागला की हे लोक खूष ! पण तेच जर कोणी भाषांतर करून म्हणेल तर त्याची टर उडालीच !

ख्रिस्ती धर्माकडे मुळीच न पाहण्याचे हे एक कारण झाले, तरी यापेक्षा फारच मोठे कारण म्हटले तर दुसरेच आहे. ते हे की, मला कोणी ख्रिस्ती उपदेशकच मिळाला नाही, व माझे लक्ष लागेल अशी तद्धर्मविषयक मराठी पुस्तके माझ्या हाती आली नाहीत. याशिवाय इतर मूर्तिपूजकांप्रमाणेच ज्या बायबलची पुरती एक-दोन पानेही मी कधी वाचली नव्हती. त्याच्याविरुद्ध मात्र पुष्कळ गोष्टी माझ्या वाचण्यात व ऐकण्यात आल्या होत्या. ह्या धर्माकडे माझे लक्ष स्वदेशीय ख्रिस्ती लोकांकडे पाहून जावे तर माझ्या पाहण्यात जे ख्रिस्ती लोक आले त्यांची अध्यात्मस्थिती फार शोचनीय होती. मला असे वाटे की, मूर्तिपूजक व ख्रिस्ती यांच्यामध्ये भेद काय तो खाण्यापिण्याच्या रीतीभातीपुरताच आहे. ह्या सर्व गोष्टी ख्रिस्त व ख्रिस्ती धर्म यांच्यापासून मला दूर ठेवण्यास कारणीभूत झाल्या होत्या.

सन १८९३ मध्ये माझ्या आश्रयदात्याच्या इच्छेस अनुसरून धर्म व तत्त्वज्ञान ह्या विषयावर एक नवीन मासिक पुस्तक काढण्याचे मी पतकरिले. म्हणजे याचे संपादकत्व मात्र मी आपल्याकडे घेतले. दोन अंक निघाले व पुढे माझ्या नवीन मतांमुळे मला ते काम सोडून द्यावे लागले.

याच वेळेस नागपूरपासून सुमारे ८५ कोसांवर राजनांदगाव नावाचे एक संस्थान आहे, तेथील राजेसाहेबांनी मला काम दिले. तेथे जाण्याकरिता मी आगगाडीवर आलो. बंगाल–नागपूर रेल्वेवर तिसरा व दुसरा वर्ग यांच्या दरम्यान एका वर्गाचा डबा असतो. त्याला “ इंटर्मिडिएट ” वर्ग म्हणतात. या वर्गाचे मी तिकीट काढले होते. डब्याजवळ येऊन पाहतो तर आत एक साहेब बसले आहेत. नेहमीच्या अनुभवाप्रमाणे त्यांनी आम्हाला धुडकावून द्यावयाचे, पण तसे काही न करता उलट त्यांनी थोडेसे हसून मला जागा दिली.

या ठिकाणी मी आपल्या परवानगीने एक गोष्ट आपणा श्रोत्यांस सुचवितो ती ही की, आगगाडीकडले कित्येक गोरे लोक व गोरे

प्रवासी आपल्या वर्तनाने ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या वाटेत डोंगरासारखे आड येत आहेत. हिंदू लोकांत ख्रिस्ती धर्मसंबंधाने हसू येण्यासारखे अज्ञान आहे. तरी त्यास ख्रिस्ती म्हणविणाऱ्यांनी कसे वागावे याची बरीच कल्पना करता येत आहे. तशास ते जितके गोरे तितके सारे ख्रिस्ती असे समजत असल्यावरून कित्येक साहेबांच्या दुर्वर्तनामुळे त्यांच्या दृष्टीने ख्रिस्तीपणाला काळिमा लागत आहे. लोकांशी अरेरावीचे वर्तन करून ख्रिस्ताच्या राज्यास धक्का पोचविणारे हे लोक रेल्वेकडे कितीतरी भरले आहेत. असे का, याचे मला वारंवार सखेदाश्चर्य वाटते. देव या रेल्वेकडे प्रीती म्हणजे काय ते ह्या लोकांस शिकवायास आपले काही सेवक पाठवो. असो.

आमच्या डब्यातले सोबती फार सभ्य व नम्र होते. इतके, की त्यांस पाहून कोणाचेही मन प्रसन्न झाले असते. या वेळेस वाचण्यासाठी मी आपल्याबरोबर एकच पुस्तक म्हणजे माझे आवडते भवभूतीचे उत्तररामचरित घेतले होते. संस्कृत कवितेत या कवीची उदात्त कविता मला फारच आवडते. आमचे दोघांचे कवी व कविता यांविषयी बरेच बोलणे झाले. या गृहस्थाच्या संभाषणाने माझे फार रंजन केले. मला लवकरच आढळून आले की, साहेबास थोडेसे संस्कृत येत असून, संस्कृत वाङमयाची चांगलीच माहिती होती. हळूहळू त्यांनी विषय बदलला व ख्रिस्ती धर्मासंबंधाने माझी मते कशी काय आहेत वगैरे विचारपूस चालविली.

मी त्यांना आपल्या नवीन धर्माची कल्पना सांगितली. ती ऐकून ते मोठ्या गंभीरतेने म्हणाले, "मला वाटते, आजपासून दोन वर्षांच्या आतच तुम्ही ख्रिस्ती व्हाल."

हे ऐकून मला मोठे आश्चर्य वाटले. त्यांचे ते भविष्य वेडपणाचे होय, असेच मला भासले. त्यानंतर आम्ही पुष्कळ वेळ बोलत होतो.

साहेब मला म्हणाले, "तरुण गृहस्था, देव तुला ओढून घेत आहे. बायबलचा अभ्यास कर, ख्रिस्तचरित्राचे चांगले परिशीलन कर, म्हणजे तू खरोखर ख्रिस्ती होशील."

हे बोलणे मला फार अविचाराचे वाटून मी मनात त्याची काहीशी

निर्भर्त्सना केली. शेवटी त्यांनी प्रार्थना केली व मला एक नव्या कराराची प्रत काढून दिली. मला सकृद्दर्शनी ते पुस्तक न आवडले तरी ते वाचीन, असे मी त्यांस वचन दिले. त्या पुस्तकात काही अर्थ आहे असे समजून मी हे वचन दिले नाही, तर केवळ त्या सुशील गृहस्थाच्या भिडेस्तव मला ते द्यावेसे वाटले. माझे स्टेशन आल्यावर आमचा दोघांचा प्रेम-पुरस्सर सलाम होऊन मी खाली उतरलो. आश्चर्य हे की, आम्ही शेवट-पर्यंत एकमेकांचे नाव-गाव विचारून घेतले नाही.

राजनांदगावास मी शिक्षकाचे, हुजूर कारकुनाचे व सरकारकुनाचे अशी कामे केली. शेवटल्या हुद्द्यात नाझराच्या कामाचाही समावेश झाला होता. परंतु ज्याला वाचनाचा व्यासंग आहे, अशा मनुष्याचे मन रम-विण्यास त्या ठिकाणी साधने कमी, तशात मला अत्यंत प्रिय असे माझे संस्कृत ग्रंथ नागपुरास राहिलेले, त्यामुळे सदहू साहेबांस दिलेले वचन मला पाळावेच लागले व तेणेकरून नव्या कराराचे वाचन आणि मनन मला घडले.

माझ्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे हे पुस्तक अथपासून इतिपर्यंत वाचून टाकावे व त्यात विचारणीय स्थलांवर खुणा करून घ्याव्या, असा मी बेत केला; पण डोंगरावरील उपदेशापर्यंत मात्र मी आलो– त्या उप-देशातील प्रीती, करुणा व सत्य यांनी रसरसलेल्या वाक्यरत्नांस सोडून मला पुढे जाववेना. हिंदू तत्त्वज्ञानातील अत्यंत दुर्बोध प्रश्नांची उत्तरे, येथे मात्थीच्या ह्या तीन अध्यायांत मला मिळाली. जन्मांतरासारख्या गहन विषयाचे पूर्णपणे यात खंडन केलेले पाहून मला मोठे आश्चर्य वाटले. ख्रिस्ता विषयी अधिक माहिती मिळावी, अशा उत्कंठेने मी बाय-बल शेवटपर्यंत वाचीत नेले.

राजनांदगावास एक ख्रिस्ती गृहस्थ पोलीस सुपरिंटेंडेंटच्या कामा-वर होते. त्यांनी मला लहान लहान पुस्तकांचे व पत्रकांचे पुडके दिले. त्यात मला बुशनेल साहेबांनी लिहिलेले "ख्रिस्तशील" (Character of Jesus) नावाचे एक पुस्तक मिळाले. त्यांच्या वाचनाने, येशू-चरित्रज्ञानाची माझी क्षुधा अधिकच प्रदीप्त झाली.

ख्रिस्ताने म्हटले आहे, "मागा म्हणजे तुम्हास मिळेल." एके

दिवशी या म्हणण्याचा मला संशय येऊन एखाद्या मूर्ख, दांडग्या पोराप्रमाणे त्या वचनास कसोटीस लावून पाहण्याचा मी विचार केला. मी प्रार्थना केली की, " ज्यात पालेस्ताईनचा इतिहास दिला आहे, व ख्रिस्ताच्या काळी असलेल्या परिस्थितीचे वर्णन केले आहे, असे एखादे पुस्तक मला येथल्या येथे लवकर मिळावे."

या प्रार्थनेत मी असेही म्हटले की, " जर माझे मागणे निष्फल झाले तर देव प्रार्थना ऐकतो व उत्तरे देतो, हे मत मी सर्वथा मिथ्या मानीन." हा केवळ मूर्खपणा होता. पण देवाने ह्या दीन अर्भकावर दया केली. दुसरेच दिवशी एकाएकी माझी एका कचेरीतून दुसऱ्या कचेरीत बदली झाली. तेथे जाऊन पाहतो तर एका पेटीत रद्दीखाली तीन पुस्तके माझ्या दृष्टीस पडली. यात दोन फार मोठी सुमारे वेवस्टरच्या मोठ्या कोशाएवढी बायबले असून, एक " सुंदर कथानक व धार्मिक विचाररत्ने " नावाचे पुस्तक होते. या तिन्ही पुस्तकांत मला पाहिजे ती माहिती होती. यानंतर देवाने एकामागून एक अशी माझ्या प्रार्थनांची उत्तरे दिली. मी आश्चर्याने चकित झालो. ख्रिस्ताचे ठायी माझे मन पूर्णपणे जडले.

ता. १० मार्च १८९४ रोजी ख्रिस्ती मनुष्याला असे मी पहिलेच पत्र लिहिले. हे गृहस्थ ग्रंथकर्ते म्हणून मला माहीत होते. (रे. बाबा पदमनजी कृत अनुभवसंग्रह, पृष्ठ २६९ पहा.) काही महिन्यांनी मला भासू लागले की, मी अंतःकरणतः ख्रिस्ती आहे. तथापि लोकप्रियता व मानमरातब यांच्या मोहात पडून मी नीचाने ती गोष्ट दडवून ठेविली. माझ्या वाचनात " ख्रिस्ती मंडळीचा इतिहास " व फाक्सकृत " ख्रिस्तासाठी देह ठेवणारांचा वृत्तान्त " हे ग्रंथ आले होते. एकदा एका मराठी पत्रात मिशनरीची उगीच कोणी निंदा केली होती. मला ती सहन झाली नाही व मी उत्तरादाखल " मिशनरी आणि त्यांची कृत्ये " नावाची कविता लिहून ज्ञानोदयास पाठविली. (ज्ञानोदय ता. ३०–९–९४ चा अंक किंवा " फुलांचा हार ", पृष्ठ १५ पहा)

यानंतर माझे बरेच लेख त्या पत्रात प्रसिद्ध झाले. जरी या लेखाखाली मी एक काल्पनिक नाव लिहीत असे, तरी माझ्या हिंदू मित्रांनी माझे लेख ओळखिले. शेवटी मी अंतर्यामी खरोखर ख्रिस्ती बनलो आहे

अशी सर्वांची पूर्णपणे खातरी झाली.

एखाद्या वरिष्ठ जातीचा हिंदू ख्रिस्ती होतो असे त्याच्या जातिबांधवांस समजले म्हणजे त्याचे जे सुखसोहळे होत असतात ते इतरांस समजणे कठीण आहे. इतर प्रसंगी दूर राहिली, तरी दुखण्याबाहण्यात जशी आई रात्रंदिवस आपल्या मुलाजवळ राहते, तसा देव या वेळेस मजजवळ होता. नाना प्रकारच्या संकटांतून त्याने मला वाचविले. मी दुष्टाने मनुष्याचा धाक वाटून कित्येक वेळा, कित्येक जणांशी लपंडाव केला असेन; पण असल्या पाप्याला देवाने सोडले नाही.

माझी नोकरी गेली, मला अठराविश्वे दारिद्र्य आले, मला आपल्या एकुलत्या एका लेकरास सोडावे लागले, आजपर्यंत वस्तुछाये प्रमाणे दोघे राहिलो असून, माझी पत्नी हो-नाही करीत करीत शेवटी माहेरालाच लुब्ध झाली; पण देवाने मला दूर केले नाही.

शेवटी १८९४ च्या नोव्हेंबर महिन्यात लागोपाठ तीन रात्री मला स्वप्नात कोणी येऊन म्हणावे की, "त्याच्या मागे जा; भिऊ नको."

मग मात्र मला राहवेना. जरी बाप्तिस्मा घ्यावयास मला पुष्कळ अडचणी होत्या, तरी आपण ख्रिस्ती आहो असे आताच्या आता जगात प्रसिद्ध करावे, असा माझा निश्चय झाला व तदनुसार मी अमेरिकन बोर्ड मिशनचे रे. जे. ई. ॲबटसाहेब यांस मी ख्रिस्ती आहे असे प्रसिद्ध करण्याविषयी विनंती केली. त्यांनी ज्ञानोदयात ते प्रसिद्ध केले व माझा जीव खाली पडला. मग तर पुसूच नका! मला माझ्या देशबांधवांची प्रीती जर नसती तर मी खुशाल पुढे कोणकोणते प्रकार झाले ते जगापुढे मांडले असते.

पण नको. असल्या गोष्टी विसरून जावे हेच बरे. देवाचा गौरव असो की, पुढे लवकरच ता. १० फेब्रुवारी १८९५ रोजी मुंबईस अमेरिकन मिशनच्या भजनालयात माझा बाप्तिस्मा झाला. दोन वर्षांपूर्वी केलेले आगगाडीतल्या साहेबांचे भविष्य पुरे झाले. देवाने मला ओढून घेतले व आजपर्यंत तोच असल्या अशक्त मुलाचे अतर्क्य वात्सल्याने परिवर्धन करीत आहे."

## ३१ : धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे

तुम्ही ख्रिस्ती झाला असता तुमची उत्कट स्वदेशभक्ती कायम राहील काय ? तुमचे आमच्यावर प्रेम राहील काय ? अशा प्रकारचे प्रश्न एका मित्राने केल्यावरून त्यास दिलेले उत्तर–

साकीवृत्त

**ममता तव ही पाहुन माझ्या हृदया पाझर फुटले ।**
**मित्रा माझ्या वाहुन बाहिर नयनातुन जे आले ॥ १ ॥**
**प्रेमापुढती विवेकशक्ती नष्ट होउनी जाते ।**
**कल्पी वैरी कदा न ऐसे तर्क चित्त कल्पीते ॥ २ ॥**
**बाळ सहज जरि अल्पमात्रही निजले असता कण्हले ।**
**तरि मायेला भासे त्याचे मरणचि येउन भिडले ॥३॥**
**थोडे गेले अधिक दूर ते सोडुन खेळायाला ।**
**तरि मायेच्या धाके धडकी भरते मृदु हृदयाला ॥४॥**
**हा मायेचा खेळ ! न तीचा उपाय काही त्याते ।**
**ज्ञानधैर्यमदगुणांस माया निमिषार्धी व्यापीते ॥५॥**
**ह्यास्तव तुझिया ह्या प्रश्नांचे नवल न वाटे मजला ।**
**मित्रप्रेमे मोहित केले उदार तव हृदयाला ॥६॥**
**तुला सांगतो ठेव सख्या तू मजवरती विश्वासा ।**
**बंधू तुमचा राहिन जोवर करितो श्वासोच्छ्वासा ॥७॥**
**रविप्रकाशे कमल वाढते परि नच सोडि जलाला ।**
**ख्रिस्तयशोरत झालो तरि मी सोडि न जन्मधरेला ॥८॥**

प्राणप्रियतर दुजे न माझे साच तुम्हाहुन भाऊ।
एक भूमिची सर्व लेकरे आपण कोठे जाऊ ॥९॥
स्वदेश पाहुन कुदशागत हा व्याकुळ होतो प्राण।
असाच होईल पुढे मम तुझ्या कंठाची मज आण ॥१०॥
खिस्तधर्म हा कल्पवृक्ष बा प्रीतिभूमिवर झाला !
जगद्बंधुता छाया त्याची धरितो विनयसुमाला ॥११॥
निर्मल सुख हे फळ ह्या तरुचे ह्याचा माळी थोर।
शांतिजलाने सत्य-खताने दे ह्या वृद्धि अपार ॥१२॥
अशा तरूवर कोटर करुनी त्याचे फळ भक्षोनी।
धन्य न व्हावा कोण सांग बा नवजीवन पावोनी ॥१३॥
मित्रवरा, दे शंका सोडुन मजविषयीची भलती।
आहे ठाउक पहिल्यापासुन तुजला माझी वृत्ति ॥१४॥
ज्याने आपुले रक्त योजिले नरपापांस धुवाया।
देवनंदना तया शरण मी गेलो नाही वाया ॥१५॥
मित्रवरा, तू उगाच नाही प्रश्न असा मज केला।
कसले आपुले स्वदेशबांधव पुरे ठाउके तुजला ॥१६॥
तसेच तुजला पुष्कळ ठावे खिस्तीही असतील।
वैरे ज्यांचे वैर वाढते अयोग्य होते शील ॥१७॥
तुला सांगतो एक खूण बा सत्य येशुभक्ताची।
हृदयी त्याच्या वृद्धी होते वैराने प्रेमाची ॥१८॥
जेथे न दिसे खूण अशी तो खिस्तभक्तजन नाही।
जसा नाटकी बनला राजा भिक्षान्नाशन पाही ॥१९॥
कराल वाटे मला मजवरी स्वदेशबांधव सारे।
अपशब्दांची वृष्टी मेघा लाजविती मित्रा रे ॥२०॥
मेला ! मेला ! नष्ट जहाला ! असेच हो मानाल।
कुतर्कजाली मला गुंतवुन भयद जनां दावाल ॥२१॥

तोंड पहाया अयोग्य ऐसा गणाल, वैर धराल।
परंतु मजला तो तो प्रियतर मद्बांधवही व्हाल ॥२२॥
अपशब्दाला आशीर्वच मी निंदेला स्तुति देई।
कोपा शांती दुःखाला सुख ! पहाल संशय नाही ॥२३॥
वैराग्नीवर मी प्रेमाचा पाउस पाडिन जाण।
स्वदेशबांधव मम हो वाहिन तुमच्या कार्या प्राण ॥२४॥
रडेन मी वा झुरेन मित्रा श्रमेन राहिन लोकी।
मरेन आपुल्या देशासाठी ख्रिस्ती जरि झालो की ॥२५॥
असे करिन मी तरीच शोभा होउनिया ख्रिस्ताचा।
दास ! ना तरी ख्रिस्ती केवळ ढोंगी उपवनांवाचा ॥२६॥
आत्मस्तुति ही पुरे; इतर जन ऐकुनिया हसतील।
उदार ज्यांचे तुझ्यासम नसे माझ्याविषयी शील ।२७॥

–ज्ञानोदय २७–१२–९४

॥ भाग दुसरा ॥

## ३२ : देवघरात बसविले

टिळकांनी चांदोरीच्या जहागीरदारांचा वाडा सोडला तो रेव्ह-रंड डॉक्टर जस्टिन ॲबट ह्यांच्या बंगल्यांची पायरी चढण्यासाठी. भायखळ्याला उतरून शोध करीत करीत ते तेथील अमेरिकन मिशन हायस्कूलमध्ये शिरले.

पुढे स्वतःच्या हिमतीवर अमेरिकेत जाऊन आलेले रेव्ह. आनंद-राव हिवाळे त्या वेळी त्या शाळेत एक विद्यार्थी होते. ते त्यांना दारा-शीच भेटले. आनंदरावांनी त्यांच्या रेव्ह. ॲबट व रेव्ह. ई. एम. ह्यूम

(धाकटे ह्यूमसाहेब) ह्यांच्याशी गाठी घालून दिल्या. डॉ. अॅबट व टिळक ह्यांचा पत्रव्यवहार पहिल्यापासून होताच. टिळकांना ह्या मंडळीने ठेवून घेतले व चार महिने त्यांचा ख्रिस्ती धर्माचा अभ्यास झाल्यावर त्यांना मुंबईतील भेंडीबाजारात अमेरिकन मिशनचे चर्च होते त्यात बाप्तिस्मा दिला.

बाप्तिस्म्याच्या वेळेपासून ख्रिस्ती लोकांत एक प्रकारच्या निराळ्याच विचारांचा ओघ टिळकांनी सुरू केला असे म्हणता येईल. डॉ. अॅबट हे त्या वेळी टिळकांचे धर्मगुरू होते असे म्हणण्यास हरकत नाही. परंतु त्यांच्या हातून किंवा दुसऱ्या कोणाही परदेशीय मिशनरीच्या हातून बाप्तिस्मा न घेता हिंदीच माणसाच्या हातून तो घेण्याचा निश्चय त्यांनी जाहीर केल्यामुळे रेव्हरेंड तुकारामजी नथोजी ह्यांच्या हातून त्यांचा बाप्तिस्मा झाला. हे रेव्हरेंड नथोजी त्या वेळी ज्ञानोदयाचे संपादक होते. बाप्तिस्मा झाल्यावर टिळक वसईस रेव्ह. सुमंतराव करमरकरांकडे राहण्यास गेले.

टिळक ख्रिस्त झाल्याचे वृत्त जिकडेतिकडे अग्नीप्रमाणे हा हा म्हणता पसरले. नाशकालाही ही खबर तावडतोब आली. पेंडशांच्या घरी त्यांचे नातेवाईक व इष्टमित्र एकसारखे खेपा घालू लागले.

पण नानासाहेबांनी अशी व्यवस्था ठेवली होती, की घरात कोणीच काही बोलत नसत. मंडळी आली की गपचिप बसत. काही काही माझ्याकडे व दत्तूकडे पाहून गुंजडीसारखे तोंड करून डोळे पुशीत. हा सारा प्रकार पाहून माझी स्थिती फारच चमत्कारिक झाली. मला वाटे, काही अपघात होऊन टिळक वारले की काय ? 'मन चिंती ते वैरी न चिंती ' असे माझे झाले होते.

नानासाहेब एकसारखे खिडकीच्या बाहेर तोंड काढून दोन्ही हातांनी आपले डोके गच्च दाबून धरून बसलेले होते. ज्याने त्याने दुसऱ्याकडे शून्य दृष्टीने पाहावे, बोलू नये. फार झाले तर डोळे पुसावे ! दत्तूचीही स्थिती फार विलक्षण झाली होती. त्याला एकसारखे लोक उचलून घेत, खायला देत; पण बोलत कोणी नसे. हे सारे पाहून माझे हातपाय अगदी गळून गेले.

एक दिवस नानासाहेबांनी दोन-तीन बैलगाड्या करून घरातील सारी माणसे पांडवलेणी पाहण्यास रवाना केली. घरी भिकूताई व नानासाहेब एवढीच राहिली. नंतर त्यांनी जलालपुरास टांगा पाठवून केशवरावमामांना बोलावून आणले. हेतू हा, की माझ्या कानावर काही न जाता भिकूताईस व त्या दोघा मेव्हण्यांस काय बोलायचे, काय करायचे ते मनमोकळेपणे बोलता करता यावे. केशवराव तांगा पोचताच नाशकास आले. नानासाहेब **म्हणाले** " काय रे बाबा, झाली गोष्ट ती झाली. आता पुढे काय करायचे ?"

मामा म्हणाले, " आम्ही दोघे भाऊ आहो. तिलाही आम्ही आमचा तिसरा लंगडा लुळा भाऊच समजू. "

पेंडसे म्हणाले, " ते राहू दे. तिचे काय करायचे ते आपण पुढे पाहू. टिळकांची खरी खबर आपल्याला प्रथम लागली पाहिजे. मला वाटते, तू मुंबईस बाळाकडे जा व तुम्ही दोघे टिळकांचा तपास करा. त्यांनी जर धर्मान्तर खरेच केले असेल तर मग प्रश्नच नाही. नाहीतर ही अंगठी घेऊन जा व त्यांच्या खिशात किंवा कशात तरी टाकून दे व पोलिसाकडे वर्दी दे. खटला येथेच येईल. मग पाहू काय करायचे ते. हे पंचवीस रुपये घेऊन जा."

केशवराव ताबडतोब निघाले. बाळासाहेब हे नानासाहेबांच्या वडील बंधूंचे चिरंजीव. ह्या दोघांनी मुंबईतील सर्व मिशनांत तपास केला. शेवटी टिळक वसईस असल्याची बातमी लागल्यावरून ते वसईला गेले.

तेथे टिळकांची व ह्या दोघांची गाठ पडली. टिळकांनी त्यांना विचारले, " तुम्ही का आला ?"

त्यावर केशवरावमामा म्हणाले, " आम्ही तुमचा तपास करायला आलो आहो. " टिळक म्हणाले, " मी ख्रिस्ती झालो आहे. तुम्ही आपल्या बहिणीला संभाळा. नाशकास नि जलालपुरास गंगा आहे. ती जीवबीव देईल. तेव्हा तिच्याकडे लक्ष ठेवा. "

केशवरावमामा म्हणाले, " जीव दिला नाहीतर जिवंत राहिली,

स्मृ... १३

आता तुमचा-तिचा काही संबंध राहिला नाही. "

असे म्हणून ते दोघे वसईहून जड अंतःकरणाने परत फिरले. निघताना टिळकांच्या शेंडीकडे पाहून तर केशवरावांना हुंदका आला. रागाचा कितीही आव आणला तरी आरंभापासूनच त्यांचे डोळे पाण्याने भरले होते ते निघताना पूर्णपणे निथळले.

केशवराव माझे बंधू. माझी भाची घारूमाई ह्यांना मामा म्हणे, त्यामुळे सारीच माणसे मामा म्हणू लागली होती, व मलाही सारी मावशी म्हणत.

केशवरावमामा आले ते एकदम बंगल्यात भिकूताई अंथरूण धरून पडली होती तिच्याजवळ जाऊन बसले. त्यांनी तिला सारी घडलेली हकीगत सांगितली. भिकूताईचा कंठ दाटून आला. ती म्हणाली, "आता तूच मनीला काय सांगायचे ते सांग. मला काही सांगवणार नाही."

मला वर बोलविण्यात आले. धसक्याने माझी स्थिती इतकी वाईट झाली होती की मला जिना चढवत नव्हता ! लहान मुलासारखी मी हात टेकीत टेकीत भावाबहिणीपुढे येऊन बसले.

भावाने मला उपदेश करण्यास सुरुवात केली, " सीता, सावित्री, तारा, द्रौपदी अशा कितीतरी पतिव्रता होऊन गेल्या, की ज्यांची कीर्ती दिगंती गाजते आहे..."

मी म्हणाले, " सारे पुराण माहीत आहे. तुम्ही मला वर उपदेश करण्यासाठी बोलावले का ? तुम्ही मुंबईला गेला होता त्यांची खबर काढण्यासाठी. ते जिवंत आहेत ना ते मला आधी सांगा."

" हो ! जिवंत आहेत ! खुशाल आहेत ! आनंदात आहेत ! तेथे त्यांना मास्तरचे काम लागले आहे. पण–पण–"

" मग पण काय ?"

" ते ख्रिस्ती झालेत. "

" होऊ द्या झाले तर. कुठेही असले नि सुखरूप असले म्हणजे झाले. ते गेले तर त्यांनी काय माझ्या कपाळाचे कातडे थोडेच काढून नेले आहे !"

असे म्हणून मी ताडकन उठले व झराझरा जिन्याच्या पायऱ्या उतरून खाली आले. पण खाली पोचताच माझ्या अंगातील सर्व शक्ती नाहीशी झाली. दारात घरातील इतर स्त्रिया उत्सुकतेने उभ्या होत्या. त्यांनी मला धरून खाली बसविले. सर्वांना ही बातमी माझ्या आधीच कळली होती. त्या माझी समजूत करू लागल्या,

" जाऊ दे गेला तर. देवाने तुला सोन्यासारखा मुलगा दिला आहे ! एक लाल नि पृथ्वीचे मोल ! तो उद्या तुझे पांग फेडील ! जितके तू कष्ट सोसलेस तितके पुढे सुख भोगशील. " पण तो सारा बोध पालथ्या घागरीवर पाण्यासारखा होता. मी एखाद्या दगडासारखी झाले होते. माझ्या डोळ्यांना अश्रूंचा टिपूस येईना. माझी भयंकर कोरड वळली होती.

रात्री आमचे बहुतेक नातलग पेंडशांच्या घरी निजायला आले होते. जेवले कोणीच नाही. बोलतही कोणी नव्हते. ज्याने त्याने यावे, जे सापडेल ते अंथरावे व कोठेही पडावे. कोणीही कोणाला या, बसा, खा, प्या, वगैरे काहीच म्हणत नव्हते. बंगल्यात बरीच मंडळी निजली होती. मी मध्ये निजले होते. माझ्या एका बाजूला केशवरावमामा व दुसऱ्या बाजूला भिकूताई निजली होती. दोघांनी माझ्या अंगावर हात टाकले होते.

एक-दोनच्या सुमाराला निद्रेने आपले जाळे विणण्यास सुरुवात केली. त्यात माझ्याखेरीज सर्वजण सापडली. मी हळूच दोन्ही बाजूंनी दोघांचे हात माझ्या अंगावरून काढून हळूच बाजूला ठेवले. ओचा–पदर कसून बांधला, दत्तूला शोधले. पण तो कोठेच दिसेना. मग मी आपला मार्ग सुधारला. पुढल्या दाराशी येऊन मी दाराचा अडसर काढू लागले.

इतक्यात तेथेच राउंडची अलबेल कानावर पडली. ती ऐकताच माझ्या डोक्यात विचारमालिका सुरू झाली. ' जर मला ह्या लोकांनी पकडून चौकीवर नेऊन बसविली, आणि उद्या चौकशी सुरू झाली, तर ही अमक्या अमक्याची मेहुणी म्हणून बाहेर जग बडबडणार व बिचाऱ्या नानासाहेबांना खाली पाहावे लागणार. सुंदरनारायणाच्या डोहात जाऊन उडी टाकण्याचा माझा बेत होता, पण तो वरील विचारांनी बदलला व

मी घरातील आडाजवळ येऊन उभी राहिले. हा आड फारच अरुंद आहे.

पुन्हा विचार आला, ' ह्यात मी जीव दिला तर मला बाहेर काढणार कसे ? शिवाय उद्या पंचनाम्याच्या वेळी नानासाहेबांना माझ्यासाठी खाली पाहण्याचा प्रसंग येणारच !' माझे डोके भणाणून गेले. मला काही मार्ग दिसेना. मी आपल्या जागी येऊन निजले.

थोड्या वेळाने मी केशवरावमामांचा हात इतका जोराने दाबला की ते खडबडून जागे झाले. त्यांनी भिकूताईला उठविले. " भिकूताई, ही पहा मनी कशी करते आहे ! "

सारी माणसे उठून बसली. ' काय झाले ? काय झाले ?' म्हणून जे ते विचारू लागले. मामांनी माझा हात कसातरी सोडविला. त्यासरशी माझ्या हातापायांची सर्व शक्ती गेल्यासारखे झाले. मी चांगली शुद्धीत होते, भोवताली काय काय चालले आहे ते मला कळत होते– पण माझी यत्किंचितही हालचाल होत नव्हती. जे ते आपापल्यापरी उपाययोजना सुचवीत होते.

माझी दातखीळ बसली. कोणी म्हणत, हिला संतापवायू झाला. कोणी म्हणत, हिने विष खाल्ले. भिकूताई म्हणाली, " तिजजवळ एक दिडकीही नाही. ती विष कोठून आणणार ?" तर कोणी कल्पना काढली, की तिने काचा कुटून खाल्ल्या असतील. त्या वेळेस नुकतेच केरवे निघाले होते. बहिणीने मला व घारूमाईला नऊ नऊ केरवे भरले होते. ते तिने चटकन मोजून पाहिले.

वैद्याला आणले. नाडीचा त्याला पत्ता लागेना. त्यानेही अभिप्राय दिला, की मी विष खाल्ले. माझी दातखीळ उघडून थोडा मोरावळा, काही मात्रा, दूध वगैरे भरविण्याचा सपाटा सुरू झाला. मला सगळे कळत होते पण एखाद्या लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे मी झाले होते. माझी जीभ आत ओढल्यासारखी होऊन तिजवर काटे आले होते. ते पुढे महिनाभर गेले नाहीत.

भिकूताईचा आजार पळाला. तिने बिछाना गुंडाळला व मजजवळ उभीच्या उभी राहून ती रात्रंदिवस काढू लागली. तिला माझे सारेच

करावे लागे. मी नुसती पडून होते– माझे दातसुद्धा तिला घासावे लागत. वरचेवर मला दूध–ताक पाजावे लागे. बऱ्याच दिवसांनी माझ्या अंगात थोडीशी शक्ती आली. मी अंथरुणात उठून बसू लागले. आता माझ्या डोळ्यांना पाझर फुटले. एकसारखे मला रडू येत असे. डोळ्यांचे पाणी म्हणून खळेना. झोपेत काय ते थांबत असेल तेवढेच. मी कोणाशीच काही बोलत नसे.

एक दिवस मी त्याच वाड्यात एक बिऱ्हाड होते त्यांच्या घरी जाऊन रडत बसले. दत्तू आपला बहुतेक वेळ मावशीजवळ घालवीत असे. पण त्या वेळी मला दुसरीकडे बसलेली पाहून तो मजजवळ आला व त्याने माझा हात धरून मला तेथून उठवून देवघरात नेऊन बसविले.

तेथे नेऊन बसविल्यानंतर तो मला म्हणाला, "बाई, तू आपल्या मामा-मावशीच्या घरात रड. लोकांच्या घरात रडू नको. तुला काय हवे सांग. घारूमाईसारखे पुष्कळ दागिने पाहिजेत का ? का मावशीसारख्या सरी–वाकी पाहिजेत ? का मोठ्या काठाची लुगडी पाहिजेत ? सांग. पण अशी उगीच रडू नको."

भिकूताई जवळच होती. तिने दत्तूला ओढून पोटाशी धरले व रडत रडत मला म्हटले, "घे त्याची तरी अक्कल थोडीशी !"

मला मात्र दत्तूचे हे सुखाचे शब्द ऐकून अधिकच दुःखाचे उम्हाळे आले.

## ३३ : कोर्टात भेट

टिळक ख्रिस्ती झाल्याचे नागपुरास बापूसाहेब बुटींना कळल्या-बरोबर ते वसईला जाऊन टिळकांना भेटले व तेथून मला भेटायला नाशकास आले. त्यांना पाहून मला जोराचा हुंदका आला व त्यांनाही आला. त्यांनी रडत रडत एवढेच सांगितले, "बाई, मी तुमचा मोठा

मुलगा व दत्तू लहान मुलगा असे समजा." इतके बोलून ते गेले.

गेल्याबरोबर पंचवटीतून त्यांनी मला दहा रुपये पाठविले व पुढेही दर महिन्याला दहा रुपये पाठवावे, असा त्यांचा मानस होता; पण माझ्या भावाबहिणीला ते आवडले नाही व त्यांनी त्यांना तसे, त्यांना वाईट न वाटेल अशा रीतीने कळविले. आपली बायकोमुले तरी मी तुमच्या भेटीला आणीन, असे त्यांनी लिहिले– पण हीही त्यांची इच्छा शेवटपर्यंत शेवटास गेली नाही.

त्याच उन्हाळ्यात टिळक प्रथम प्रथम महाबळेश्वराला गेले. बापूसाहेबांनीही तेथे बंगला वगैरे भाड्याने ठरवून मला व दत्तूला आपल्याबरोबर नेण्याचे ठरवून मला तसे लिहिले. पण तीहि बेत अमलात न येण्यास काही अपरिहार्य कारणे घडली. मला ती आठवत नाहीत.

महाबळेश्वरास टिळकांनी प्रथमच फुलामुलांवरील आपल्या प्रसिद्ध कविता लिहिण्यास सुरुवात केली. अहमदनगरचे रेव्हरेंड डॉक्टर ह्यूम ह्यांनी त्यांना जवळजवळ आपल्याच घरी ठेवले होते. तेथे त्यांची मुले, त्याच्या मेहुण्याची मुले, व महाबळेश्वरातील जेथे तेथे उगवणारी रानफुले! टिळकांची वृत्तीही त्या तऱ्हेची काव्ये लिहिण्यास फार अनुकूल होती. 'पाठीवर रुळति धूसर मुक्त बाल' ही त्यांची प्रसिद्ध कविता मिस फेअरबँक ह्या गोजिरवाण्या मुलीवर ह्याच वेळेस त्यांनी लिहिली. ह्या एकंदर सर्व तऱ्हेच्या आनंदी वातावरणात त्यांचा 'क्षय' हां हां म्हणता पळाला.

महाबळेश्वर सोडल्यानंतर टिळक नगरास ह्याच डॉ. ह्यूमच्या हाताखाली नगरच्या ईश्वरविद्येच्या शाळेत शिकू लागले व त्याच वेळी तेथे काही काही विषय शिकवूही लागले.

पेंडशांची बदली पंढरपुरास झाली. तेथेच सखारामभाऊजी होते. पेंडशांबरोबर मीही पंढरपुरास गेले; पण माझे होते तेच होते. म्हणजे डोळ्याचे पाणी खळले नाही व तोंडाला वाचा फुटली नाही.

माझे सारे भिकूताईला व तिच्या जावेला करावे लागे. भिकूताईची ही जाऊ बाळासाहेबांची सावत्र आई. ही बालविधवा होती. दत्तूला तिचा लळा फार होता. तिच्या लुगड्यावरून तो तिला लाल

मावशी म्हणत असे.

त्याने आपल्या प्रत्येक मावशीला अशीच नावे दिली होती. ठेंगणी मावशी, लुकडी मावशी, लाल मावशी अशी त्यांची नावे असत, व प्रत्ये-कीला आपले नाव पाहून दत्तूचे कौतुक वाटे. भिकूताई लठ्ठ होती म्हणून तिला तो लठ्ठ मावशी म्हणे.

पंढरपुरास जाताच दत्तूकरिता भिकूताईने एक मास्तर ठेवला. हा मुलगा शिकून शहाणा झाला की आपण मिळविली. मग आपल्याला बहिणीची काही काळजी नाही, असे तिला वाटे. ती त्याच्या मागे एक-सारखी अभ्यासाकरिता लागे.

नानासाहेब म्हणत, " का त्याच्या मागे लागतेस ? खेळू दे त्याला. त्याचे काय वय गेले आहे ? शिकेल तो हळू हळू. "

पण माईसाहेबांनी आपला हेका कधी सोडला नाही.

पेंडसे दत्तूचे फार लाड करीत. त्याला सोडून ते कधी काही खात नसत. पण माईसाहेबांना दत्तूने नानासाहेबांच्या फराळाच्या वेळेस तेथे असू नये असे वाटे. फराळाची वेळ झाली, की त्यांनी म्हणावे, दत्तू, फराळाची वेळ झाली, की दत्तूने म्हणावे, मावशी, मी बाहेर खेळतो. पण ही सूचना करताना व त्याचे उत्तर ऐकून त्यांना फार वाईट वाटे. त्यांना वाटे, दत्तूने नानासाहेबांना काही त्रास दिला तर ? त्यापेक्षा त्यांनीच त्याला हाक मारलेली बरी. पण नानासाहेबांनी मात्र एक दिवसही दत्तूखेरीज फराळ केला नाही. ते त्याला ' टिळक ' म्हणत.

कामावरून येताच पेंडशांनी त्याचा शोध करावा. " टिळक कुठे आहे ? त्याला बोलवा फराळाला. टिळक, अरे टिळक, हा घे लालू. "

आणि मग टिळक आल्यावर दोघांनी फराळ करायचा, हा रोजचा क्रम ठरलेला होता. रोज फराळाचे काय करायचे त्याबद्दल लाल मावशीने आधी दत्तूचा विचार घ्यावयाचा, व त्याच्या विचारानेच फराळाचे तयार व्हावयाचे.

मी मात्र अंथरुणावर पडलेली असे. जेवणसुद्धा मला बळे बळे घालीत. पुढे पुढे मी लुगडी फाडू लागले. भिकूताईला वाटले, ही आता खात्रीने वेडी होणार. ही त्यापेक्षा मेली तर बरे. माझ्यामागे वेडीला

कोण सांभाळील ? माझी ही स्थिती टिळकांच्या कानावर गेली. त्यांची तार आली. आतापर्यंत त्यांच्याकडून एखादे पत्रही आलेले नव्हते. पण मग मला पत्र आले व त्यात आपल्या पत्त्याची पाकिटेही त्यांनी पाठविली होती. मी मोठ्या चोरीने त्यांना पत्र पाठविले. मला पत्र पाठविण्याची परवानगी नव्हती. माझ्या पत्रात कवितेवाचून काही नसे. ह्या पत्रात जी कविता पाठविली तिच्या तीन ओळी मला आठवतात.

**सखि रात्रंदिन छळित मला सवत कल्पना**
**आशा ही बहिण खरी रंजवी मना**
**चिंती परि दासी तिची करीत वल्गना।**

आणखी एक कविता नवरा म्हणून त्यांना पाठविली होती. ती अशी :–

**गुणरूपाने मनासारखा परंतु झाला पिसा**
**साजणी हा तरि नवरा कसा– ध्रु०**
**काय बोलते सुबुद्धि ऐका प्रपंच माझा कसा**
**विवेक नवरा मशि बोलेना हा बघ रुसला असा**
**याने कसे मला सोडिले**
**दुध म्हणुनी विष पाजिले**
**कंठावरती हात ठेवुनी मांडिलि ही हेळणा**
**साजणी तुम्ही मनामधि अणा– १**
**आशा, मनिषा, तृष्णा, जावा ह्या माझ्या तिघिजणी**
**ममता सासू. करिती माझ्या जीवाची खेळणी**
**हा क्रोध खाटिक सुरा**
**हा निर्दय मम सासरा**
**नाहि विसावा षड्रिपु दीरा गांजिति रात्रंदिनी**
**तरी नच पाही पति ढुंकुनी २**
**माय बाप तर दूर राहिली विवेक नवरा असा**
**न कळे माझा जीव वाचला आजवरी गे कसा !**

**भ्रांती वन्सांनी गांजिले**
**क्रोधाच्या हाती दिले**
**किती गांजणुक सोसू बाई फारच मी श्रमले**
**शेवटी निसंग मी बनले– ३**
**सासुसासरा खुशाल आता शिमगा करिती घरी**
**जीव-शिवाचे ऐक्य पावुनी मी तर सुटले बरी**
**राम-नामाचा अमृत पेला**
**निजवदनी स्वीकारिला**
**सुरकुळ-टिळक-श्रीनारायण चरणि लीन जाहली**
**लक्ष्मी मी तू हे विसरली– ४**

माझ्या नव्या उद्योगाने मला जरा बरे वाटू लागले; पण कविता करून मीच पाठविते हे टिळकांना खरे वाटेना.

सखारामभाऊजी पंढरपुरासच होते. ते रोज मला भेटायला येत. अशी एक गप्प उठली होती की भाऊजी टिळकांना दरमहा शंभर रुपये खर्चायला पाठवितात. टिळक जरी ख्रिस्ती झाले होते आणि भिकूताईचा त्यांच्यावर राग होता तरी तिला त्यांच्याबद्दल अभिमान वाटे. ही गप्प तिच्या कानावर गेल्यापासून ती भाऊजींवर फार संतापली होती. एक दिवस भाऊजी आले तेव्हा नानासाहेब जेवीत होते. तेथेच भाऊजींना पाट टाकून दिला. भिकूताई त्यांच्यापुढे येऊन उभी राहिली व म्हणाली,

"का हो, तुमच्या भावाने धोपटी कधीपासून घेतली?"

भाऊजींना भिकूताईंच्या बोलण्याचा व एकंदर आविर्भावाचा काहीच अर्थ कळेना. ते म्हणाले,

"तुम्ही काय म्हणता ते मला कळत नाही."

"कशाला कळेल? तिकडे भावाला शंभर रुपये दरमहा पाठविता नि इकडे भावजयीची लुगडी फाटली ती तुम्हाला दिसत नाहीत."

भाऊजी भिकूताईंचे सर्व बोलणे मुकाट्याने खाली मान घालून

ऐकून घेत होते. दुसऱ्या दिवशी त्यांनी माझ्याकरता एक लुगडे व दत्तू-करता दोन कुडती पाठविली.

एक दिवस सखारामभाऊजी मजजवळ येऊन बसले. इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पागोष्टी झाल्यावर त्यांनी हळूच टिळकांचा विषय काढला. मी निजूनच हं हं करीत होते.

भाऊजी म्हणाले, "वहिनी, तुम्ही आजारी आहा. कितीतरी माणसे तुमचे करीत आहेत. तसे तिकडे नानाचे कोणी करीत असेल का? सांगा! तुम्ही त्यांना सूटपत्र द्या म्हणजे ते मोकळे होतील. तुमची काळजी घेणारी माणसे आहेत!"

हे बोलणे ऐकताच "अन् त्यांना नव्हती का काळजी घेणारी?" असे म्हणून मी तटकन उठून बसले. "आता कुठे ते बांधलेले आहेत? सूटपत्र कशाचे देऊ? मी का पळून गेले? का निघून गेले? जसे त्यांचे कोणी नाही तसे माझे कोणी नाही. मला पैसा नाही, विद्या नाही. मूल लहान. मी काय करणार? तुमची सगळयांची भांडीच घासणार की नाही? तुमची ही शिष्टाई पुरे. त्यांना पत्र पाठवा. म्हणावे, आधी येऊन बायकोचे लग्न नीटनेटके लावून द्या आणि मग स्वतःचे लग्न करा. तुम्हाला काही वाटत नाही मी कोणाशी बोलतो ते?"

मी बोलता बोलता उभी राहिले. भाऊजी मुकाटयाने खाली मान घालून सर्व ऐकून घेत होते.

टिळकांची मला रोजच्या रोज पत्रे येत. कधी कधी तीन पत्रे येत. मी एखादे लिही. त्यात कविता असे. मला काही त्यांच्याजवळ मागायचे नव्हते की त्यांना काही सांगायचे नव्हते. एक दिवस मला भेटायला येतो अशी टिळकांची पेंडशांना तार आली. 'माझ्या घरी येऊ नका' अशी पेंडशांनी उलट तार केली.

त्या दिवशी थेट नाशकासारखी स्थिती झाली. कोणाच्या पोटात अन्न नाही की डोळयाला झोप नाही. कोणी कोणाशी बोलत नव्हते. मला हे काहीच ठाऊक नव्हते.

सकाळी आठ वाजता टिळक पंढरपुरास आले. दुपारी दोनाचा सुमार झाला तरी पेंडशांचे उत्तर नाही. आपण इतकी पत्रे पाठविली

तरी त्यांचे उत्तर नाही, हे पाहून टिळकांना फार राग आला.

त्यांनी शेवटचे पत्र पाठविले : " माझ्या बायकोला बरे नाही असे कळल्यावरून मी मुद्दाम तिला भेटायला आलो. आल्यापासून तीन-चार सामोपचाराची पत्रे मी येथून पाठविली. आपणाकडून त्यांचा जबाब नाही. वाईट वाटते. मी तिची भेट घेतल्यावाचून जाणार नाही. आपल्या इच्छेविरुद्ध जाण्याचा माझा बेत नाही. तरी पण मी उद्या कोर्टात तिची भेट घेईन."

## ३४ : मास्तरांची खटपट

पत्र येऊन पोहोचले. ह्यातून कसा मार्ग काढावा ह्याविषयी नानासाहेबांनी माईसाहेबांना बोलावून त्यांचा विचार घेतला. त्या म्हणाल्या, " जे बरे असेल व बरे दिसेल ते करावे. मला काय कायदे माहीत ? परंतु मला वाटते, की उद्या जे धिडवडे निघणार त्यापेक्षा आजच मनूला मुकाट्याने त्यांना भेटवून आणा. मग टिळक जातील."

" तू मनूची बिलकूल काळजी करू नको. मी तिला कधीच जाऊ देणार नाही. तिला त्यांच्या भेटीला पाठवू. तिच्या बरोबर वहिनी जातील. शिवाय मी दोन शिपाई बरोबर देतो."

नानासाहेबांनी टिळकांना पत्र लिहिले, की रात्री नवाच्या पुढे मनूताईला तुमच्या भेटीला पाठवितो. आपणांस सवड असली तर थांबा. नाहीतर माझा नाइलाज आहे.

टिळक पंढरपुरास आले आहेत इतकेच मला माहीत होते. मधली ही भानगड मला काही ठाऊक नव्हती. नानासाहेब व भिकूताई बाहेर बैठकीच्या खोलीत बसली होती व मी अलीकडच्या माझ्या कार्यक्रमाप्रमाणे बिछान्यावर लोळत होते. इतक्यात येसू मला बोलवायला आली. येसू ही येवल्याच्या डॉ. भटांची पत्नी. ही पेंडशांची नात. ती त्या वेळी

आठ-नऊ वर्षांची होती. बाहेर नानासाहेब बोलवीत असल्याचा तिने येऊन निरोप सांगितला.

त्यासरशी मी बाहेर जाऊन त्या दोघांपुढे बसले. पेंडसे म्हणाले, " मावशी, तुला टिळकांना भेटावयाचे आहे का ?"

मी हो म्हणताच ते म्हणाले, " तर मग माझ्या पायावर हात ठेव आणि शपथ वहा, की मी त्यांच्याबरोबर जाणार नाही."

मी त्यांच्या पायावर हात ठेवून सांगितले, " मी टिळकांच्या बरोबर जाणार नाही."

मग मी तडक आत गेले. भिकूताई माझ्या मागोमाग आली. तोंडाने तिची बडबड चालली होती की, " काय बाई मोठ्या कौतुकाने वहिणीला भेटायला बोलावली व पुढे हे सरकारदरबारचे प्रसंग आले !"

हे ऐकून माझ्या मनाची फारच चमत्कारिक स्थिती झाली. मी काय करीत होते ते माझे मलाच समजत नव्हते.

पण आज मला चालायची हुक्की आली. माडीतून माजघर, माजघरातून माळवद, माळवदावरून अंथरूण, पुन्हा माडी असे माझे सारखे सुरू झाले. भिकूताईला ते पाहून फार वाईट वाटले.

ती म्हणाली, " हे ग काय असे वेड्यासारखे करतेस ? हो वेडी आणि त्या सोन्यासारख्या मुलाचा कर पुरताच उन्हाळा ! नवऱ्याने लावले दिवे आणि तू पाजळ टेंभे म्हणजे झाले !"

मला तिचे सारे बोलणे ऐकू आले व सारे समजलेही. पण माझे जे काय होते ते संध्याकाळपर्यंत तसेच चालू होते. मी असे का करीत होते हे माझे मलाच समजत नव्हते. संध्याकाळ झाली. साऱ्यांची जेवणाची वेळ झाली. मला भेटायला पाठवितात की नाही, ह्याची मला वरचेवर शंका येत होती.

तांगा, घोडी, नोकर ह्यांच्याकडे माझे सारखे लक्ष होते. मला कोणाशी बोलता येत नव्हते. कारण सर्वांचाच मजवर पहारा होता. शिपाई, गडी, मोलकरीण, पाणक्या, आचारी, माई, बाई, येसू, पेंडसे अशा नवग्रहांनी मला वेढले होते. ह्यांच्या सक्त पहाऱ्यातून मला इतकेसुद्धा काही इकडचे तिकडे करता येत नव्हते. काय करता ? काय

खाता ? कुठे जाता ? काय लिहिता ? असे ज्याच्या त्याच्या तोंडचे शब्द सारखे माझ्यामागे लागले होते. मागील दारी जायचे झाले तरी-सुद्धा कोणीतरी मजबरोबर असायचेच.

नवाचे ठोके पडले तसे माझ्या हृदयातील ठोके अधिकाधिक जोराने पडू लागले. टिळकांची भेट होते की नाही, अशी मला शंका वाटू लागली व वाढू लागली. माझी सारी नजर खाली अंगणात खिळून राहिली होती. इतक्यात तांगा जुंपलेला दिसला. बाईंनी शाल अंगावर घेतली व 'मावशी' अशी हाक माझ्या कानावर पडली. हाक कानी पड-ताच मी चटकन बाहेर पडले.

मला पाहताच पेंडसे म्हणाले, "मनू, मी काय सांगितले ते ध्यानात आहे ना ? बघ, नाही तर मी तुमच्या दोघांच्या मागे पोलीस लावीन. मी कोण आहे हे ठाऊक आहे ना ?"

मी नुसते मानेनेच हो म्हटले.

नानासाहेबांचे झाल्यावर माईसाहेब पुढे आल्या. त्यांचा मारा निराळ्या बुरुजावर होता. त्या म्हणाल्या, "मने, ह्या पोराची तरी कीव येऊ दे."

तिलाही मी मानेनेच उत्तर दिले. पुढे काय वाढून ठेवले आहे ह्याबद्दल मन साशंक व जीव धाकधूक होत होता. हातपाय लटपट कापत होते. जिभेला कोरड पडली होती. पाणीदारपणा काय तो डोळ्यांतच उरला होता व त्याचा प्रभाव मधूनमधून पदराला कळत होता. दादर उतरून मी कशीबशी खाली आले. पुढे मला उचलून तांग्यात बसविली. दोन शिपाई, तांगेवाला, मी व बाई इतकी पाच माणसे आम्ही पाचामुखी परमेश्वराचा धावा करीत चाललो.

टिळक आपले घडचाळ पाहत धर्मशाळेच्या दारात उभे होते. तांगा पाहताच ते आत गेले. मला दोन माणसांनी उचलून त्यांच्यापुढे नेऊन ठेवली. ते उभेच होते. त्यांना पाहताच मी त्यांच्या पायावर डोके ठेवले.

"माझ्याकडून तुमचा असा कोणता अपराध घडला म्हणून तुम्ही असे भलतेसलते करून बसला, ते मला सांगा. मग मी पाय सोडीन."

" तू माझा कधीच काही अपराध केला नाहीस, " असे म्हणून त्यांनी आपले पाय सोडवून घेतले.

झाले. आमचे एवढेच बोलणे झाले. टिळक खांबाला टेकून उभे होते. आम्हा दोघांना पुढे काहीच बोलवेना. इतक्यात बाई म्हणाल्या, " मनू, चल आता. दत्तू वाट पाहत असेल. बराच उशीर झाला आहे."

मी ताबडतोब निघाले. गडयांनी मला उचलून पुन्हा टांग्यात बसविले. टिळक बाहेर उभे राहून टांगा दिसेनासा होईपर्यंत पाहत होते.

इकडे नानासाहेब व भिकूताई ह्यांचा जीव धाकधूक होत होता. टांगा घरी पोचताच नानासाहेब धावतच टांग्याजवळ आले व काय झाले म्हणून विचारू लागले. बाईंनी घडलेली सर्व हकीगत त्यांना सांगितली, तेव्हा त्यांना फार आनंद वाटला.

दत्तू निजला होता. तेथे बसून त्याच्या अंगावरून हात फिरवीत भिकूताई म्हणाली, " बाबा, आता तुझ्या आईला देव चांगली बुद्धी देवो. "

त्या रात्री सर्व मंडळी शांतपणे निजली. टिळकांनी मात्र माझी ती अवस्था पाहून रात्र तळमळत काढली. टिळक परत जाणार म्हणून दुसऱ्या दिवशी भाऊजी त्यांना भेटायला गेले तेव्हा टिळकांनी सांगितले, " मी आत्ताच जात नाही. तिला बरे वाटले म्हणजे जाईन."

भाऊजींनी ती बातमी नानासाहेबांना सांगितली. ते म्हणाले, " मी नानाला जेवण पाठवीन, पण तुमचा माणूस ते पोचते करायला द्या."

पेंडसे म्हणाले, " तसे नको. आम्हीच जेवण पाठवू."

दुपारी टिळकांसाठी डबा भरताना भिकूताईच्या डोळ्यांतून गंगा-यमुना वाहू लागल्या. ज्यांना आपल्या हातांनी आपल्या घरात प्रेमाने जेवायला वाढले त्यांना आता दुसऱ्याच्या हाती जेवण पाठवायचे व तेही धर्मशाळेत, ह्याचे तिला वाईट वाटत होते. त्यापेक्षा आपल्याला बहीणच नसती तर बरे होते ! टिळकांना आधी जेवण पाठवून मग घरातील मंडळी बसली. ती सारी बरोबर बसत असत व आचारी वाढीत असे. नानासाहेबांना जेवण जाईना. ते म्हणाले, " मला कसेसेच वाटते." त्यांचे

डोळे पाण्याने भरून आले. ते म्हणाले,

"मुसलमान शिपाई आपल्या घरात चालतो, तो आपल्या घरी जेवतो. ते लोक पाहिजे ते खातात. मग टिळकांनीच का धर्मशाळेत जेवावे ?"

"पण लोक काय म्हणतील ?"

"लोक काय म्हणतात ? मला कोणाला माझी मुलगी द्यावयाची नाही, कोणाची मुलगी करावयाची नाही. एक मुलगी, ती देऊन टाकली आहे. मी त्यांना घरी आणणार. जग मग मला हवे ते बोलो—मला त्याचे काही नाही."

जेवणी झाली. नंतर नानासाहेबांनी "तांगा जुंपून कालच्या जागी जाऊन तेथल्या पाहुण्यांना घेऊन ये," असे शिपायाला सांगितले. तांगा गेल्यावर नानासाहेब सारखे वाटेकडे डोळे लावून बसले होते. कधी टिळकांना पाहीन असे त्यांना झाले होते.

तांगा आला. घरातील सर्व माणसे दाराशी गोळा झाली. टिळकांनी दत्तूला उचलून घेतले, पण त्याने त्यांना ओळखले नाही. त्यांच्या प्रकृतीत फारच फरक झाला होता. त्याने नानासाहेबांकडे जाऊन शेवटी आपल्या लाल मावशीचा आश्रय केला.

नानासाहेब त्याला म्हणाले, "अरे टिळक, आपल्याला चहा करायला सांग पाहू."

दोन कप चहा आला. टिळक व नानासाहेब चहा घेऊ लागले. त्यांच्यासमोर भिकूताई येऊन बसली.

"टिळक, मी आता तुम्हाला पहिल्यासारखी भिणार नाही. आता तुम्ही मजवर हव्या तितक्या कविता लिहा व छापा. मी आता तुमच्याशी भांडणार आहे."

पेंडसे म्हणाले, "हे काय ? आज तेच आपल्याला कोर्ट दाखविणार होते. आपणच त्यांच्याशी भांडायचे ?"

"ते काही मला ठाऊक नाही. कोर्टातील भांडणे तुम्हा पुरुष माणसांची. का हो, माझा काय असा गुन्हा होता, की तुमच्या बायकोला भेटायला आणले आणि तुम्ही हे असे करून बसलात ?"

टिळक म्हणाले,

" भिकूताई, तुम्ही मला हवे तितके बोला. मी काही तुमच्यावर कविता लिहीत नाही नि छापीतही नाही."

" मने, येतेस ना टिळकांना कोर्टात भेटायला ?"

मी सारे दाराच्या मागे उभी राहून ऐकत होते. टिळक आल्यापासून माझ्या प्रकृतीत पुष्कळ फरक पडला, तरी माझ्या डोळ्यांचे पाणी मात्र खळले नाही.

नानासाहेब तेथेच मामलेदार होते. त्यांच्याकडे पुष्कळ माणसे येत व साऱ्यांच्या गप्पा रात्री दहा-दहा वाजेपर्यंत चालत. त्यांच्यातच शाळेचे एक हेडमास्तर होते. नानासाहेबांनी त्या सर्वांची टिळकांशी ओळख करून दिली. माझी पत्रे त्यांनी बरोबर आणली होती. त्यांतील कविता कोण करून देते म्हणून त्यांनी कसून चौकशी केली. शेवटी त्या मीच केल्या अशी खात्री झाल्यावर त्यांना फार आनंद वाटला. त्यांतील कित्येक सुधारून त्यांनी छापण्यासाठी पाठवून दिल्या.

टिळक जेवायला बाहेर बसत. बाकी मंडळी आत बसे. सखारामभाऊजी बहुतेक रोज ह्या वेळी येत. एक दिवस भिकूताई म्हणाली, " का हो सखारामपंत, तुमच्या भावाला जातीत नाही का घेता येणार ?"

पेंडसे म्हणाले, " हो ! काय झाले न घ्यायला ? प्रयत्न व पैसा असला म्हणजे झाले."

" मग मी माझे सगळे दागिने देते. मला जर चार बहिणी असत्या तर नसते का त्यांच्या लग्नाला मी खर्च केले ? मी आपली असेच समजेन, की मी माझ्या चार बहिणी उजविल्या. बोला सखारामपंत, तुम्ही किती द्याल ते."

" मी एक हजार रुपये देईन."

" बाकी लागेल ते मी देईन." पेंडसे म्हणाले.

इतक्यात बाहेर टिळकांशी कोणीतरी मोठमोठ्याने बोलत असल्याचे आमच्या ध्यानात आले. पेंडसे म्हणाले, " जा हो पंत, बाहेर कोण बोलते ते पाहून या."

भाऊजी पाहून आले. बाहेर हेडमास्तर आले होते व त्यांचा टिळकांशी वादविवाद चालला होता.

" अहो मास्तर ! वा ! बरे झाले. बाहेर काय आहे ? आत या की ! का त्यांच्याबरोबर जाण्याचा विचार आहे ?"

मास्तर आत आल्यावर नुकत्याच झालेल्या बेतावर त्यांचा विचार घेण्यात आला. ते म्हणाले, " टिळकांना ह्यापैकी काही कळवू नका. उद्या आधी आपण सभा भरवू. मग ह्या विषयाचा आपल्या सभेत ऊहापोह झाल्यावर पुढे काय करावयाचे ते ठरवू."

त्या रात्री मास्तरांना झोप आली नाही. कोण कोण बोलवायचे, विषय कसा मांडायचा, लोक काय म्हणतील वगैरे असंख्य विचारांनी त्यांच्या डोक्यात काहूर माजविले होते.

भिकूताईलाही आनंदामुळे त्या रात्री झोप आली नाही. एकदा ही मनी आपल्या घरीदारी चांगल्या रीतीने गेली-की मिळविले. दागिन्यांच्या सावलीत थोडेच बसायचे आहे अशी, सुखस्वप्ने तिने अगदी उघडया डोळयांनी सारी रात्रभर त्या दिवशी पाहिली.

दत्तू व टिळक मात्र फारच गाढ निजले होते. दत्तू आता आपल्या नानांजवळ निजत असे. त्यांनी त्याला कितीतरी गोष्टी सांगाव्या व गोष्टी सांगता सांगता व ऐकता ऐकता दोघांनी झोपी जावे.

दुसऱ्या दिवशी मास्तर भाऊजींना घेऊन नानासाहेबांकडे आले. संध्याकाळी गावातील काही प्रमुख मंडळींची सभा बोलवून तीत मास्तरांचे धर्मांतरावर व्याख्यान ठरले होते. नानासाहेबांनी सांगितले, " माझी तुम्हाला पूर्ण सहानुभूती आहे. मात्र ह्यात माझे अंग आहे असे कोणाला कळवू नका."

ठरल्याप्रमाणे त्या दिवशी सभा भरली. मास्तरांचे मोठे परिणामकारी व्याख्यान झाले. त्यांची भाषाशैली व विषयाबद्दलची तळमळ ह्यांमुळे बहुतेक मंडळी त्यांनी आपल्या बाजूस वळवून घेतली. भाषण झाल्यावर त्यांनी बहुतेक मंडळींच्या सह्या घेऊन दुसऱ्या दिवशी आपल्या मित्रमंडळींसह येण्यास सांगून सभा विसर्जन केली. नंतर ते नानासाहेबां-

स्मृ...१४

कडे आले. तीन दिवस अशा रीतीने भाषणे व सह्या मिळविण्याचे काम चालले होते.

पुढे ते काम गावकऱ्यांनी व गावातील पुढाऱ्यांनी आपल्या अंगावर घेतले. आठ दिवस त्यांच्या बैठकी होत होत्या. प्रत्येक सभेत मास्तर हजर राहत व सभेचा साद्यंत वृत्तान्त आमच्या घरी येत असे. सर्वांना धीर वाटू लागला. पण त्यांना पाहिजे तसे शास्त्राधार सापडेनात. इकडे नानासाहेब व त्यांच्याबरोबर माईसाहेब हळूहळू टिळकांचे मन चाचपून पाहत होत्या.

टिळक म्हणाले, " माईसाहेब, कशाला हा खर्च करता ? समजा तुम्ही खर्च कराल व मी पुन्हा गेलो तर ?"

" तर काय, आम्ही खर्च भरून घेऊ. "

पण टिळक पुढे काही बोलले नाहीत. मला आत्ताच कुठे बरे वाटून मी बोलूचालू लागले होते. माझ्या दुखण्यात आणखी भर नको पडायला; असे त्यांना वाटले असावे. ते पुढे गप्पच बसले.

शास्त्राधार सापडेना, तेव्हा नानासाहेब टिळकांच्या मागे लागले, की तुम्ही योग्य तो शास्त्राधार काढून द्या, व टिळकांनीही तो काढून दिला. शास्त्राधाराचे घोडे पेंड खाऊ लागले तो आणखी एक अडचण उभी राहिली. ब्रह्मवृन्दाने सांगितले, की आता टिळकांनी येऊन आपली चूक कबूल करून आमच्या पाया पडावे. टिळक काही ह्या गोष्टीला कबूल होईनात. मास्तरांनी अगदी गयावया केली, पण टिळकांचा निश्चय ढळला नाही. शेवटी मास्तरांनी जाऊन टिळकांच्या वतीने सर्वांची माफी मागून त्यांच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला.

आता तो कागद आणखी दोन क्षेत्रांत जाऊन शेवटी जगद्गुरू शंकराचार्यांकडे जायचा व नंतर टिळकांचे शुद्धीकरण होणार, असे ठरले.

इतक्यात पंढरपूरचा मिरासदार कॉलरा आपल्या बागेची साफसफाई करण्यास आला व वृद्ध, तरुण, बाले अशी निरनिराळ्या प्रकारची रोपटी भराभर जागची हलवू लागला.

नानासाहेब राहत होते तेथेच एक केस होऊन एक तरुण यात्रेकरू पाहता पाहता मृत्युमुखी पडला.

टिळकांना ही पाऊलवाट मिळाली. नानासाहेब भोळे. त्यांना टिळक सांगू लागले, " ह्या पोरासारखी माझी गत झाली तर तुम्ही काय करणार ? लोक तुम्हाला किती त्रास देतील ! त्यापेक्षा मला आता जाऊ द्या. शंकराचार्यांकडून उत्तर येण्यास अजून अवकाश आहे. तोपर्यंत येथला कॉलरा काही कमी होईल आणि मग पाहू काय करायचे ते. "

पेंडशांनी त्यांना परवानगी दिली, भाडे दिले व त्यांची मुंबईस रवानगी केली.

## ३५ : बाळंतविडा

टिळक गेले तेव्हा ह्या खेपेला फारसे वाईट वाटले नाही. आता ते खात्रीने परत येतील असेच ज्याला त्याला वाटत होते. मीही आता चांगली बरी झाले होते.

टिळक गेल्यानंतर दत्तू फार आजारी पडला. वणीस असताना टिळकांच्या उपाध्यायांच्या आईने नवस केला होता, की पाचव्या वर्षी सप्तशृंगीस गडावर जाऊन त्याचे जावळ काढायचे. तो नवस तेथे जाऊन फेडण्याचे भिकूताईने ठरविले. तिने जलालपुरास आमच्या भावास पत्र टाकले, की पंचवीस पानांचा शिधा घेऊन वणीस या. तुमचा शिधा व माझे पैसे मिळून आपण हा नवस फेडू. मी काही वणीस गेले नाही.

पंढरपुरास ह्यांच्यामागे एक दिवस वकिलामार्फत मला नोटीस आली, की मुलावर माझा हक्क आहे. तो कोणी नाही म्हणणार नाही. अमुकअमुक दिवसांच्या आत मुलगा माझ्या ताब्यात आणून दिला नाही तर मला तो कोर्टात फिर्याद करून घ्यावा लागेल. आता टिळकांनी शस्त्र उगारले. रोज मला पत्रे येत. मुलाला पाठवून दे, नाहीतर त्याला घेऊन माझ्याकडे ये.

सर्व मला सल्ला देत, की तू उत्तरच धाडू नको. कोणी म्हणत, तू पत्र घेऊच नको की ते वाचू नको. नाशकास असतांना माझ्या दूरच्या काही नातेवाइकांनी मला सांगितले होते, की मी जर टिळकांकडे गेले तर माझे दुसऱ्याबरोबर लग्न करून देतील आणि मला भंग्याचे काम करायला लावतील. मांसाचा स्वयंपाकही करायला लावतील. ही भीती घातलेली आणि टिळकांचा पूर्वीचा अनुभव ! त्यांच्याकडे गेले आणि ते मुसलमान झाले तर ? आता नातलग तरी विचारतात, मग तर तेही विचारणार नाहीत. दुसऱ्यांचे नवरे मरतात त्या म्हणतात, आमचे नवरे जिवंत असते, तर आम्ही कुठेही त्यांना डोळे भरून पाहिले तरी असते. आणि मी त्यांना नुसते पत्राचे उत्तरही पाठवू नये !

पुन्हा माझ्या मनाला भरती आली. मी विठोबाच्या देवळात घंटा घंटा जाऊन रडत बसू लागले. मी तेथे सगळ्यांच्या ओळखीची झाले होते. कोणी कोणी बाया सल्ला देत, कशाला रडतेस ? खुशाल खावे-प्यावे. आणि भावाबहिणीजवळ अशी किती दिवस राहणार ? मोलाची दळणी दळावी नाहीतर खाणावळ काढावी, पण स्वतंत्रपणे राहावे. मी सारे निमूटपणी ऐकून घेत असे.

एकदोघींना मी म्हटले, "मी मोलाची दळणी दळण्यापेक्षा माझ्या आप्तांजवळ राहून त्यांची दळणी मोजून देण्यातच मला आनंद वाटतो. बाहेरच्या लोकांची उष्टीखरकटी काढीत बसण्यापेक्षा माझ्या प्रेमळ भावाबहिणींची उष्टीखरकटी मी मोठ्या आनंदाने काढीन. त्यांची हांजी हांजी करण्यापेक्षा माझे तीन मालक–भाऊ, बहीण व दीर ह्यांचीच हांजी हांजी मी करीन." त्यांचे नाही पटले तर माझ्या चौथ्या मालकाकडे निघून जाईन. माझ्या या उत्तराने पुढे मला कोणी असला उपदेश केला नाही.

भिकूताई वणीहून दत्तूला घेऊन पंढरपुरास परत आल्यावर तिला ही हकीगत समजली. तिला फारच वाईट वाटले. काय हा सापासारखा उलटला, वगैरे ती बोलू लागली.

इकडे रोजच्या रोज टिळकांची पत्रे येतच होती. ती पत्रे रागाची असत, प्रेमाची असत, त्रासाची असत. एखाद वेळेस ते म्हणत, तावडतोब

निघून ये. एखाद वेळेस म्हणत, तुला माझी पर्वा नाही. मी दुसरे लग्न करतो. मला सूटपत्र दे. मी माझ्या नातेवाइकांचा त्याग करून तावडतोब त्यांच्याकडे जावे असे त्यांना वाटे.

शेवटी डॉ. अॅबट व टिळक ह्यांचे बरेच बोलणे झाले. त्या वेळी टिळक मुंबईस मिशन हायस्कूलमध्ये मास्तर होते व अॅबटसाहेबही तेथेच होते.

अॅबटसाहेब त्यांना म्हणाले, " हे पहा टिळक, मला एकंदर परिस्थितीवरून लक्ष्मीबाईंचे तुमच्यावर अतिशय प्रेम आहे असे स्पष्ट दिसते. तुम्ही त्यांना रागारागाची पत्रे न धाडता त्यांचे सौम्य रीतीने मन वळवा. चला, मीही तुमच्याबरोबर येतो."

त्याप्रमाणे टिळकांनी करण्याचे ठरविले. त्यांचा प्रार्थनेवर फार विश्वास होता व प्रार्थना करून ह्या बाबतीत त्यांनी परमेश्वराचे साह्य घेण्याचे ठरविले व पंढरपुरास नंतर लौकरच तार आली की टिळक येत आहेत.

टिळकांना ह्या वेळेस पेंडशांकडे उतरणे शक्य नव्हते. भाऊजी राहत होते राममंदिरात. तेथे त्यांना कोण येऊ देते ? ते डॉ. काशीबाई झणकर ह्यांच्याकडे उतरले व सकाळीच नानासाहेबांच्या घरी आले.

जिन्याच्या एक-दोन पायऱ्या चढतात तोच वर भिकूताई आडवे हात लावून उभी राहिली व म्हणाली, " खबरदार एक पायरी चढाल तर ! तुम्हाला कोर्टे मोकळी आहेत. तुम्ही आपले तिकडे जा. "

टिळक मागे फिरले. दत्तूला पुन्हा गोवर आला होता. त्याला भयंकर ताप आला होता. तशात हा दुसरा ताप माझ्यामागे लागला होता. माझा जीव दोन्हीकडे लागला होता. रात्री डॉ. काशीबाईंच्या आई लक्ष्मीबाई घाईघाईने मजकडे आल्या व म्हणू लागल्या, " मावशी, चला चला. काशीला विंचू चावला आहे तो उतरा. "

मी विंचू उतरवते. टिळक उतरीत व त्यांचे पाहूनच मी शिकले होते.

टिळक तेथे उतरल्याचे आम्हाला माहीत नसल्याने भिकूताईने मला त्यांच्याबरोबर पाठविले. तेथे जाऊन पाहते तो टिळक माझी वाट

पाहत बसलेले!

" तुला कसे वाटते ?"

" पहिल्यासारखेच. "

" दत्तू कसा आहे ?"

" त्याला ताप आला आहे. "

" बरे तर, जा, " एवढेच आमचे बोलणे झाले. पण माझी प्रकृती सुधारलेली पाहून टिळकांना फार आनंद झाला. मी आले ती तडक अंथरुणावर जाऊन पडले. घर जवळच होते. दत्तूला भिकूताईने घेतला होता. नानासाहेबांना मी डॉक्टरणीकडे गेले वगैरे तिने सांगितले. त्यांनी गडी पाठवून डॉक्टरणीला बोलावून आणले. तिने जे जे झाले ते सर्व त्यांना सांगितले.

ते ऐकून नानासाहेब म्हणाले, " तुम्हाला तिचा काय विचार दिसतो?"

" जाण्याचा. "

" कशावरून ?"

" तिने मजजवळ एकदा विष मागितले होते. ती म्हणाली, माझ्याजवळ तुम्हाला द्यायला काही नाही; पण पायातली जोडवी आहेत ती देते. मला असे विष द्या की मी झिजून झिजून मरेन. कारण माझी पुढे चौकशी व्हायला नको व कोणावर माझ्यामुळे दोष यायला नको. "

" तुम्ही तिला काय सांगितले ?"

" मी तिची समजूत करून तिला परत लावून दिले. "

" बरे, पुन्हा आता ह्या असल्या भानगडीत पडू नका, " असे म्हणून पेंडशांनी शिपाई देऊन त्यांची रवानगी केली.

हा जो प्रकार झाला तो मला मुळीच माहीत नव्हता. अलीकडे मला फार झोपा येऊ लागल्या होत्या. मी जी आले ती निजले व सकाळी जागी झाले. जागी झाले तो एका पाटावर दोन लुगडी, दोन चोळचा, मुलाचे थोडे बाळलेणे, कुंची अशा जिनसा माझ्या उशाकडे ठेवलेल्या. मी उशाजवळ काय आहे ते पाहू लागले.

टिळक आल्यापासून घरात माझ्याशी कोणी फारसे बोलत

नव्हते. नानासाहेबांची भाची आली होती ती तेथेच होती.

कुंचीचे गोंडे पाहून मी तिला म्हटले, "काय ग सई, हा बाळंतविडा कोणाकरता आणला ?"

तिने म्हटले, "तुझ्याचकरता."

मी ते ऐकून गप्पच बसले. इतक्यात भिकूताई व बाई तेथे आल्या. भिकूताई म्हणाली, "मने, तुला जायचे असेल तिकडे जा. मी तुझे सामान, तुझ्या मुलाची कुंची, त्याचं बाळलेणं—सगळं तिथं ठेवलं आहे."

मला हा घोटाळा व गोंधळ काहीच कळेना. जा म्हणतात तर जावे व वणीच्या डोंगरात योगिनी बनून राहावे, असे ठरवून मी ताबडतोब एक लुगडे व एक कुंकवाचा करंडा घेऊन निघाले. मी म्हटले, आपल्याला कोणीच नको. नावाला तरी कोठवर भ्यायचे, आणि वाऱ्याला तरी कोठवर पाठ द्यायची ? देवाला, माईला व बाईंना नमस्कार करून मी निघाले.

सईने विचारले, "मावशी, तू कुठे चाललीस ?"

"देव नेईल तिकडे."

"तुला शक्ती नाही, तुजजवळ पैसा नाही."

"पैसा नको आणि काही नको. देवाकडून आले तेव्हा कुठे होता पैसा, तर आता त्याच्याकडे जाताना तो मला लागणार आहे ?"

भिकूताई म्हणाली,

"अग सई, त्यांचे रात्रीच ठरले असेल. त्याशिवाय कशी अशी तडक उठून ती जायला निघेल ?"

मी बाहेरच्या दालनात आले. मला पाहून नानासाहेब म्हणाले,

"कुठे जातेस ?"

"जिकडे देव नेईल तिकडे. माणसांनी सोडले म्हणून तो थोडाच सोडणार आहे ?"

"खरे सांग, अशी वेड्यासारखी का करतेस ? घरात जा पाहू. जा घरात आणि नीज."

सोडमुंजीत मुंजा आपल्या मामाच्या आग्रहाने काशीयात्रेचा बेत रहित करतो तसेच माझे झाले. मी आत जाऊन निजले.

शरीराचा त्याग करण्याचे प्रसंग मजवर कितीतरी वेळेस आले

असतील; पण तो मी कधीच केला नाही व मला वाटते, तो कधी होणे शक्यही नव्हते. माझ्या मनाची ठेवणच अशी आहे, की सर्व निराशामय अंधकारातून चाचपडत धडपडत का होईना, पण आपला मार्ग आक्रमायचा. मध्येच पडून प्राण सोडायचा नाही. थोडक्यात म्हणजे रबरी चेंडूप्रमाणे आहे माझे. असो.

टिळक डॉ. काशीबाईंकडून निघाले ते कुठे गोपाळपुऱ्यात डॉ. ॲबट उतरले होते तिकडे गेले. डॉ. ॲबटनी त्यांना विचारले, "झाली तुमची भेट ? तुम्हाला काय वाटते ?"

"माझा समज चुकीचा होता. तिचे जे प्रेम होते ते काहीच कमी झाले नाही."

"मग आता तुम्ही काय विचार करता ? तुम्हाला उगीच लोक भर देतात," असे म्हणून डॉ. ॲबट ह्यांनी ख्रिस्ती शास्त्राप्रमाणे पतिपत्नींचे संबंध कसे असावे हे त्यांना बायबलमधून काढून वाचून दाखविले. नंतर त्या दोघांनी प्रार्थना केली व टिळकांनी वचन दिले, की मी आपल्या बायकोसाठी ती येईपर्यंत वाट पाहीन.

टिळक परत गेले. मला त्यांचे फारच चांगले पत्र आले. 'तू प्रकृतीला जप. दत्तूची काळजी घे. मी तुला मुळीच त्रास देणार नाही. परमेश्वर तुला बुद्धी देईल तेव्हा मुलाला घेऊन ये. मी मात्र तुझी नेहमी वाट पाहीन. तुम्हाला त्रास होईल असे मी येथून पुढे काही करणार नाही. मी एकपत्नीव्रताने राहीन. त्याची मुळीच काळजी करू नको.' वगैरे मजकूर त्या पत्रात होता.

## ३६ : मैना तुझा ग पिंजरा मायेचा

भिकूताई व नानासाहेब आता माझ्याशी चांगली वागू लागली. म्हणजे त्यांचे वागणे तसे कधीच वाईट नव्हते, पण मध्यंतरी मी

टिळकांबरोबर जाते की काय, अशी त्यांना शंका आली होती एवढेच. भिकूताईने मला पाटल्या, बिलवर वगैरे दागिने केले. पण जेव्हा जेव्हा टिळकांकडून काही काळजी उत्पन्न करण्यासारखी पत्रे येत तेव्हा तेव्हा भिकूताईला माझा राग येई. त्यांच्या घरी दत्तूची व माझी नीटनेटकी व्यवस्था होती.

एक दिवस नानासाहेबांची नगरास बदली झाल्याचा हुकूम आला. आता साऱ्यांना मोठा विचार पडला. खुद्द टिळक जरी नगरास नसले तरी ख्रिस्ती लोक तेथे पुष्कळ ! मनूला तेथे कसे न्यायचे ? ह्या विचारात ते आहेत तोच टिळकांचे पत्र व पत्त्याची पाकिटे आली. टिळकांनाही नगरास काम लागले व ते लौकरच नगरास जाणार, असे त्या पत्रात होते.

आता तर मला भिकूताईबरोबर जाणे अशक्यच झाले. नानासाहेबांनी भिकूताईच्या संमतीने माझ्या भावांना पत्र टाकले की, माझी बदली नगरास झाली आहे. तेथे मनूला नेणे इष्ट नाही. तेव्हा तिला जलालपुरास पाठवितो. खर्चाची व दोघांच्या कपडचालत्त्यांची व्यवस्था आमच्याकडेच राहील. तुम्ही एक गोष्ट मात्र करायची. ती म्हणजे तिच्या मनाला व शरीराला जपायचे.

हे पत्र हाती पडताच माझ्या दोघा भावांनी आपल्या बायकांना सांगितले, "आज तीन वर्षे आमची बहीण सोयऱ्यांच्या घरी आहे. तिला आता आपल्याकडे आणली पाहिजे. आम्ही लोकांचे तमाशे पाहतो तसे लोक आमचे तमाशे पाहतील. तरी तुम्ही तिला एक पाहुणा किंवा आमचा एक आंधळा भाऊ समजून वागणार असाल तर आम्ही तिला आणू. तिने जरी आमची काही नुकसान केली तरी त्याची जबाबदारी आमच्यावर आहे. तुम्ही तिच्या मनाला लागेल असे काही करायचे नाही."

माझ्या दोघी भावजयांनी म्हटले की, " तुम्ही त्यांना खुशाल आणा. आम्ही एका शब्दाने त्यांना दुखविणार नाही. "

नानासाहेबांना ठरल्या तारखेला नगरास हजर राहावयाचे असल्याने ते पुढे गेले. भिकूताई, बाई, मी, दत्तू व येसू इतकी माणसे आम्ही

जलालपुरास पोचलो.

भिकूताईने आपल्या भावाभावजयांना जवळ बोलावून माझे सर्व सामान एक एक एक एक त्यांना ट्रंक उघडून दाखविले. सोनेनाणे, दागदागिने, खणलुगडी वगैरे सामानाने माझी एक मोठी ट्रंक गच्च भरली होती.

भिकूताई म्हणाली, "हिचे नशीब आधीच हिच्या मागे हात धुऊन लागलेले आहे. उद्या तुमच्या बायकांनी असे म्हणू नये, की हिच्या पेटीला कुलूप आहे, किंवा हिने आमची एखादी जिन्नस घेतली म्हणून. म्हणून मी तुम्हाला सर्व दाखवून ठेवते आहे. आधी कडू मग गोड असलेले बरे."

ती एक दिवस राहून मग गेली. जाताना तिला फारच वाईट वाटले. तिच्या डोळ्यांना पाणी आले. अगदी जाता जाता तिने भावांना सांगितले की, "दत्तूचे दूध बंद करू नका."

पाच-सहा दिवस मला फारच जड गेले. तीन-चार दिवसांनी टिळकांकडून पत्र व पाकिटे आली. जलालपुरास मी गेले हे टिळकांना कसे कळले कोणास ठाऊक.

जलालपुरास माझ्या भावजयांनी मला अगदी काम पडू दिले नाही. दोघींनी माझे काम वाटून घेतले. थोरली मुलाचे सर्व पाहत असे व धाकटी माझे पाही. मला माझे लुगडेसुद्धा तिने धुऊ दिले नाही. मी अलीकडे फार देव देव करू लागले होते. माझे अंग धुण्याचे पाणी काढून देणे, लुगड्याच्या निऱ्या करून ठेवणे, पूजेचे करणे हे सारे ती करी.

मी म्हणे, "वहिनी, तू किती ग श्रम घेतेस?"

तेव्हा तिने म्हणावे, "वन्सं, तुमचं मी काही केलं तर त्यात देव मला आशीर्वाद देईल, तसं माईसाहेबांचं केल्यास देणार नाही. माईसाहेबांचं केलं तर देव व माणसं म्हणतील, ही स्वार्थासाठी करते आहे. आणि तुमचं मी निःस्वार्थी बुद्धीने करते आहे." ह्याच भावजयीने दत्तूला बालपणी संभाळले होते.

जलालपुरास आल्यापासून माझी लोळणफुगडी थांबली होती. मला आता देवाचा नाद लागला होता. दुसरा काहीच व्याप माझ्या-

मागे नव्हता. सकाळी उठल्यावर वेणीफणी, अंगधुणे करून नियमाने गुरुचरित्र, शिवलीलामृत, देवपूजा, तुळशीची माळ व नंतर जप, हा माझा नित्यक्रम असे. मी एक वेळ जेवी. मला उपासही बरेच असत. शिवाय चार शुक्रवार, चार शनिवार, चार मंगळवार ह्या दिवशी शुक्रवारी रात्री फक्त दूधभात खायचा, तर शनिवारी रात्री फक्त वडेच खायचे व मंगळवारी रात्री नऊ मुठींचे कानवले करून त्यांतील सहा मुठींचे गाईला घालून तीन मुठींचे मी खायचे. एकादशा वगैरे असतच. हे सारे टिळकांनी प्रायश्चित्त घेऊन परत जातीत यावे म्हणून मी करी.

ज्या दिवशी उपास नसे त्या दिवशी माझी वडील भावजय आपले सर्व कामधाम आटोपल्यावर मी पडलेली असेन तेथे एवढे दूधपोहे घेऊन यायची व मला आई-बाई करून ती बळे बळे खायला घालायची. एकीकडे तिचा उपदेश चालायचा.

ती म्हणे, " वन्सं, सर्व संपत्तीपेक्षा आधी शरीरसंपत्ती पाहिजे. ती जर तुम्ही घालवून बसला तर तुम्हाला कोण विचारील ? चालतील बाह्या तर विचारतील आयाबाया."

टिळकांनी परत यावे म्हणून मी नुसते उपास-तापास करून राहिले नाही. आणखी जे जे सुचेल ते ते मी करी. पण ह्या दोघीजणी मला काही बोलत नसत. त्या म्हणत, " ह्या कोणाचे काही वाईट करीत नाहीत, काही नुकसान करीत नाहीत, मग ह्यांना कशाला दुखवा ?"

जलालपुरास एक भला मोठा मारुती आहे. त्याच्या हातात मी काठी देत असे. हेतू हा, की त्याने टिळकांच्या मागे लागून त्यांना परत आणावे. पण हे कोण करतो, हे गावकऱ्यांना कळत नसे. कधी कधी मी मारुतीच्या डोक्यावर दगड ठेवायची. हेतू हा, की दगड दिला म्हणजे त्याला माझे काम करावेच लागेल. म्हण आहे ना, की तुझ्या डोक्यावर कुणी दगड दिला होता ? म्हणजे अमुक एक गोष्ट करण्याची तुजवर बळजबरी कोणी केली होती का ?

मग मी रामनामाच्या चिठ्ठ्या लिहून मारुतीच्या डोक्यापासून पायांपर्यंत चिटकवू लागले. हे काम अगदी पहाटे उठून अंग धुऊन, कोणी जागे होण्याच्या आधी करावे लागे. रामाच्या नावाच्या चिठ्ठीचा

पायांना स्पर्श होण्याच्या आत मारुती स्वतःवरचे ते संकट टाळण्यासाठी माझ्यावरचे संकट निवारील अशी कल्पना ह्यात होती.

मारुतीच्या हातात काठी, डोक्यावर दगड, अंगभर चिठ्ठ्या हा काय प्रकार आहे ह्याचे गावभर कुतूहल निर्माण झाले. हे चेटूक कोण करतो ते पाहिले पाहिजे व त्या चेटकिणीला चांगला ठोक दिला पाहिजे असे गावातील प्रमुख मंडळीने ठरविले. एक दिवस ही मंडळी तेथेच लपून बसली. मी अंग धुऊन ओलेत्याने तेथे गेले व एक चिठ्ठी लावून उजवी घेत आहे इतक्यात दोघेचौघे हातात काठ्या घेऊन माझ्या अंगावर धावले. थोडे थोडे दिसायला लागले होते.

जवळ येताच मंडळींनी मला ओळखले. दादा कुलकर्णी म्हणाले, " ताई, तू असशील अशी आम्हाला कल्पना नव्हती. बरे तर बरे, आज त्या पोराची आई नाहक प्राणास मुकली असती. आम्हाला वाटले, कोणी चेटकीण हे चेटूक करीत असावी, म्हणून आज आम्ही मुद्दाम टपून बसलो होतो. चालू दे तुझे उपाय. तुला ह्यात यश मिळून टिळक येवोत म्हणजे झाले."

गंगेपासून घरापर्यंत मी पावले काढीत असे. तसेच देवीला रोज तांबडे फूल वाहण्याचा मी नियम केला होता. फूल मिळाले नाही म्हणजे त्या दिवशी मी उपास करायची. मला उपास पडू नये म्हणून माझ्या भावजया मला कोठूनतरी तांबडे फूल आणून देत.

माझे एक काम देव देव हे होते व दुसरे मुलांना शिकवायचे होते. दत्तूची पहिली मास्तरीण मीच होते. पुढे दत्तूच्या मुलांचीही मास्तरीण मीच झाले ! रोज वेळ मिळेल तेव्हा दत्तू व भावांची मुले ह्यांना घेऊन मी त्यांना लिहायला शिकवीत असे.

एक दिवस अशीच मुलांना शिकवीत असता माझे दोन्ही भाऊ संध्याकाळचे घरी येऊन तेथेच आमच्याजवळ बसले. त्यांची पिकांसंबंधी बोलणी चालली होती. मुलांनी आपल्या पाट्या-पेन्सिली तशाच हातात ठेवल्या व हळूहळू आम्ही सगळेच बोलू लागलो.

मुले दत्तूला म्हणू लागली, " दत्तू, बघ आमची शेते कशी आहेत. आमचे बैल, नांगर कसे आहेत."

त्यांचे हे बोलणे ऐकून केशवरावमामा म्हणाले, " अरे भाऊ-बापू' बैल, नांगर तुमचेच आहेत असे नाही, दत्तूचेही आहेत. तो तुमचा भाऊ नाही का ?"

मुले ते कबूल करीनात. " तो आमचा भाऊ कसा ? तो तर टिळक आहे. आम्ही गोखले आहो."

दत्तूने आपली पाटी त्यांच्यापुढे करून म्हटले, " हे पहा माझे शेत. ही पेन्सिल माझा नांगर आणि ही बोटे माझे बैल आहेत."

पण तुझ्या ह्या शेतात दाणे काही उत्पन्न होत नाहीत, असे त्यांनी म्हटल्यावर दत्तू म्हणाला, " ही अक्षरे माझे दाणे आहेत."

दत्तूचे हे बोलणे ऐकून माझ्या दोन्ही भावांच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. थोरल्या मामांनी त्याला आपल्या पोटाशी धरले. त्या वेळी मला काय वाटले असेल त्याची वाचकांनीच कल्पना करावी.

भिकूताईने मला जलालपुरास आणून टाकली होती ह्याचे कारण तिला वाटे, मी एखादे वेळेस चटकन टिळकांकडे निघून जाईन. ती माझ्यावर एक गाणे म्हणत असे, " मैना तुझा ग पिंजरा मायेचा " वगैरे. गाण्याचा अर्थ असा होता, की मैने, तुला कोंडून ठेवले आहे तरी हा पिंजरा म्हणजे कैदखाना नाही. आम्हाला मायेनेच तुला कोंडावे लागते. नाहीतर तू केव्हाच भुरकन उडून जाशील.

## ३७ : मेव्हण्याचा अहेर

जलालपुरास आल्यावरही टिळकांची पत्रें रोजच्या रोज येत. ती कधी कधी फार रागाची असत. एखादे वेळी रागाने कोरे कागदच ते पाठवून देत. कोऱ्या कागदाचे पत्र आले म्हणजे मला रडायला येई. का रडते, असे कोणी विचारले म्हणजे मी ते कोरे पत्र दाखवी. पण लोक म्हणत, हे पत्र कोरे नाही. ह्यात काहीतरी युक्ती आहे. कोरे पत्र का

कधी कोणी पाठविते ? मनूमावशीला हे कसे वाचायचे ह्याची युक्ती ठाऊक असली पाहिजे. तसे मी अधिक रडावे.

जलालपुरास टिळक मला भेटायला तीनदा आले. त्यांची प्रकृती आता फारच चांगली झाली होती. ते पहिल्यांदा आले तेव्हा माझ्या धाकटचा भावाने त्यांना मार देण्याचे ठरविले. तो कुऱ्हाड घेऊन इकडे-तिकडे हिंडू लागला. मी म्हणे, "तुम्ही त्यांना वाटेल तितके बोला, त्यांच्याशी भांडा, पण मारूबिरू नका."

दत्तू म्हणे, "कोण माझ्या नानाला मारतो ते पाहतो. मी त्याला मारीन !"

टिळक आले. त्यांच्या मागे गंगापुरातून मोठी माणसे व पोरे गोळा होऊन आली. जलालपूरचीही माणसे अर्थात जमा झालीच. खेडेगावात साधारण कोणीही बाहेरचा पाहुणा आला की भोवती माणसांचे कडे जमा होतेच. त्यात टिळक ओळखीचे व त्यांच्यात एवढा फरक पडलेला. पण ते घरी आले तेव्हा माझा धाकटा भाऊ बाहेर आलाच नाही. थोरला भाऊ घरीच नव्हता. ते आले तसे दारापुढे रस्त्यावर उभे राहून गर्दीतच माझ्याशी दोन शब्द बोलून परतले.

दुसऱ्या खेपेला ते आले तेव्हा केशवरावमामा घरी होते. त्यांनी टिळकांना घरात बोलविले, त्यांना बैठकीवर बसविले. भांडण किंवा मारामारी काही झाली नाही.

पुन्हा चार-सहा महिन्यांनी टिळक आले. ह्या वेळेस माझे दोन्हीही भाऊ घरी नव्हते. मी न्हाले होते. केस मोकळेच होते. शिवाय गावातल्या आखाडसास्वांच्या बडबडींना उत्तर म्हणून मी कपाळी चांगले कपाळ भरून कुंकू लावीत असे. ते केस सोडलेले व ते कपाळभर कुंकू ह्या महामायेच्या अवतारात मी टिळकांच्या पुढे येऊन कमरेवर हात देऊन उभी राहिले. त्यांच्याबरोबर ह्या वेळेस एक युरोपियन बाई होती. ती दोघे अंगणात उभी होती.

ती युरोपियन बाई मला म्हणाली, "बाई, पहा तुमचा नवरा किती चांगला आहे. त्याने दुसरे लग्न केले नाही."

ते ऐकताच मी तिच्यावर उसळले. टिळकांकडे बोट करून मी

म्हणाले, "ह्यांनी तुम्हाला वकील म्हणून बरोबर आणले आहे एकूण! काय हो, हे चांगले आहेत आणि मी कोणती वाईट आहे ? मी देखील अजून लग्न केले नाही. माझे-त्यांचेच केवळ लग्न झाले आहे. तुम्हाला मध्ये शिष्टाई करण्याचे कारण नाही. ते माझ्याशी बोलतील काय बोलायचे ते."

ह्यावर ती गप्प बसली. माझ्या मागे घरातील मुले, त्यांच्या मागे माझ्या भावजया. टिळकांच्या व त्या मडमेच्या मागे जलालपूर–गंगापुरातील लोक व पोरे, असा तो 'सीन' होता.

टिळकांनी विचारले, "चांगले चालले आहे ना ?"

मी म्हणाले, "जशी तुम्ही व्यवस्था करून ठेवली आहे तसे सर्व ठीक चालले आहे. आता कोणतीच काळजी करण्याचे कारण नाही."

इतके बोलणे झाल्यावर टिळक, ती मडम व गावकरी परतले.

मी मोठे कुंकू लावण्याचे कारण, गावात माझी सवाष्णींत गणना होत नसे. ते एक दिवस माझ्या भावजयीच्या लक्षात आले. एकदा मला ग्रामजोशाकडे सवाष्ण सांगितली. ते आमंत्रण माझ्या भावजयीने माझ्या परोक्ष घेतले होते. नंतर ती गंगेवर गेली. तेथे गंगेच्या घाटावर बायकांची बोलणी चालली होती. त्यात माझ्या नावाचा उल्लेख ऐकून ती थबकली.

"का हो काकू, हे हो काय ? त्या मनूचा नवरा धादांत बाटला आणि तुम्ही तिला देवाची सवाष्ण सांगितलीत !"

"अगबाई ! खरंच, माझ्या ध्यानातच आलं नाही. आता कसं काय करावं ?"

"आता काय, तिला जेवायला येऊ द्या व देवीची सवाष्ण दुसरी सांगा म्हणजे झाले."

हे गंगेवरचे भाषण माझ्या भावजयीने ऐकताच ती पुढे झाली व म्हणाली, "काकू, आमच्या वन्संनी परान्नाचा नेम धरला आहे. मला काही ते ठाऊक नव्हतं. तरी त्या काही तुमच्या घरी जेवायला येणार नाहीत. तुम्ही दुसरी एखादी सवाष्ण सांगा."

त्या बाईलाही तेच पाहिजे होते. रमावहिनीने नंतर हा सगळा

प्रकार मला व माझ्या थोरल्या भावजयीला सांगितला व मला म्हटले, "वन्सं, तुम्ही पण परान्नाचा नेम धरा."

मी कधी माझ्या भावजयांच्या विरुद्ध वागत नसे. मी परान्नाचा नियम धरला, व मी जलालपुरास असेपर्यंत माझ्या भावजयाही कधी कोणाच्या घरी जेवायला गेल्या नाहीत. त्यांना माझ्याबद्दल कोणी काही म्हटले तर अगदी खपत नसे. अशा भावजया मिळणे म्हणजे परमेश्वराची मोठी कृपाच.

टिळक ज्या मडमेबरोबर जलालपुरास आले होते तिने त्यांना ताबडतोब सांगितले, की "तुमची बायको तुमच्याकडे येणार व ती लौकरच येणार, असे मला खात्रीने वाटते."

त्यानंतर काही दिवसांनी ह्या मडमेचे मला पत्र आले. त्यात तिने लिहिले होते की, "तू आपल्या नवऱ्याकडे ये. मी तुला दरमहा दहा रुपये देत जाईन."

मी तिला उत्तर दिले, की, "मला पैशासाठी माझ्या नवऱ्याकडे जायचे नाही."

ही मडम म्हणजे नाशिक येथील झनाना मिशनची सुप्रसिद्ध 'आई' ऊर्फ मिस हार्वे होय. पुढे तीस वर्षांनी आम्ही नाशकास आलो तेव्हा ह्यांचा प्रेमळपणा आमच्या अनुभवास आला. अगदी प्राण सोडायच्या आधी तिने तीन-चारदा लक्ष्मीबाई लक्ष्मीबाई म्हणून मला हाका मारल्या! पण तिचे स्वागत मी प्रथम केले ते हे असे होते!

माझ्या दोन्ही भावांच्या मुलांना आता सातवी वर्षे लागली होती. दत्तूला सहावे वर्ष लागले होते. ह्या तिन्ही मुलांच्या मुंजी कराव्या, असा आता घरात विचार सुरू झाला. तिन्ही मुलांच्या मुंजी बरोबरच लावावयाच्या असे ठरले होते. पण कित्येक म्हणू लागले, दत्तूची मुंज आत्ताच करू नका. जर त्याच्या बापाने त्याला नेले तर मुंजीचा खर्च फुकट जाईल.

केशवरावमामा म्हणाले, "काही हरकत नाही. जानव्याचा दोरा गळ्यातून काढून टाकायला काही खर्च लागत नाही. त्याचीच मी आधी मुंज करीन नि मग आमच्या मुलांच्या करीन."

मामा नाशकास जाऊन ह्या वर्षी मुलांना मुंजी लाभतात की नाही

पाहून आले होते. तिघांनाही मुंजी लाभत होत्या.

नाशिकहून येताना मामांनी एक बातमी आणली, की आता काय नाशिकची मुंबई होणार व जलालपूर–गंगापूरचे नाशिक होणार ! आता एवढेशेशा खेड्याचे नाशिकसारखे शहर होणार म्हणून ज्याला त्याला आनंद झाला. मुंजीच्या गडबडीत मामांच्या नाशकास बऱ्याच खेपा होत.

अशाच एका खेपेत त्यांनी आणखी एक बातमी आणली, की एक निराळा आजार उत्पन्न झाला आहे. पाहता पाहता माणसाच्या शरीरावर व विशेषत: काखेत एक-दोन गोळे येतात व माणूस चटकन मरतो. ह्या बातमीने गावातील लोक सगळे हवालदिल झाले.

मुंजीची तयारी कडेकोट झाली. माझ्या भावजयीने भावाला सांगितले, "आमच्या मुलांच्या मुंजीत पाहिजे तर बारकाई करा, पण दत्तूची मुंज चांगली झाली पाहिजे. वन्संना वाईट वाटेल असे काही करू नका. त्यांचे हे एकच कार्य आहे."

मामा म्हणाले, "सर्वांत जास्त खर्च मी त्याच्या मुंजीत करीन. तू काही काळजी करू नको."

पण मुलाची मुंज मामाच्या घरी किंवा मामाच्या मांडीवर लागत नाही. आता काय करायचे, हा प्रश्न आला. सखारामभाऊजींना मामांनी पत्र टाकले, की तुम्ही मुंज लावण्यास या.

त्यांचे उत्तर आले, "तुम्हीच दत्तूला व तुमच्याही मुलांना घेऊन पंढरपूरला या, म्हणजे मी सर्वांच्याच मुंजी माझ्या खर्चाने लावतो."

हे उत्तर वाचून माझ्या भावांना फार वाईट वाटले. त्यांनी लिहिले कोणत्या अर्थाने व त्याचे उत्तर भाऊजींनी कोणत्या अर्थाने पाठविले. मात्र तिन्ही मुलांच्या मुंजी लावण्यास तयार झालेल्या भाऊजींना दत्तूच्या मुंजीला एक पैही पाठविता आली नाही, ह्याबद्दल चार दिवस सगळ्यांनाच कुतूहल वाटत होते.

मग मामांनी पेंडशांना लिहिले, की तुम्ही तरी येऊन मुंज लावा. पेंडशांचे उत्तर आले, "मी काही असा नवस केला नव्हता, की टिळकांनी जावे आणि त्यांच्या मुलाची मुंज माझ्या मांडीवर लागावी. मी वाटेल

स्मृ...१५

तितका पैसा खर्च करीन, पण मला त्याच्या मुंजीला हजरदेखील राहव-
णार नाही. मी येणार तो मोठा जीव करून येणार."

दत्तूची मुंज आधी करायची व मग स्वतःच्या मुलांच्या मुंजी करायच्या असे ठरवून त्यांनी तशा मुळचिठ्ठयाही पाठवून दिल्या होत्या. हेतू हा, की दत्तूच्या मुंजीची तिथी तर त्यांना कळू नये व मुंज होणार एवढे तर त्यांच्या कानावर जावे. तीथ नक्की कळती आणि त्याच वेळेस त्यांनी मुंजीत काही अडथळा आणला असता तर ?

दत्तूच्या मुंजीत सर्व मंडळी तीन दिवस रडतच होती. उपाध्यायांच्या मांडीवर त्याची मुंज लागली. तोही बिचारा रडत होता. कारण त्याला मुलगा नव्हता. तो म्हणे, "ज्याला बाप आहे त्या मुलाची ही अवस्था व ज्यांना मुलगे नाहीत त्यांची ही अवस्था."

थोडक्यात म्हणजे पैपाहुण्यांपासून दत्तूच्या मुंजीत सर्वांनी एका दिलाने खाऱ्या पाण्याची पर्जन्यवृष्टीच चालू ठेवली होती.

रडतखडत पण कशीतरी निर्विघ्नपणे दत्तूची मुंज पार पडली. मुलाच्या मुंजीचे देवदेवक बसवायच्या वेळेस टिळकांची भल्ली लठ्ठ लठ्ठ चार पत्रे येऊन पोचली. दोघा भावांना दोन, पेंडशांना एक व मला एक. ती पत्रे म्हणजे त्यांच्या डोक्यात आले त्या साऱ्याचे चित्रपटच होते. त्यात काय नव्हते ? शिव्यांची लाखोली, सरकारदरबाराचा धाक– सारे काही होते.

मामा म्हणाले, "मेव्हण्याने आहेर पाठविला."

## ३८ : मी पाहिलेली पहिली ख्रिस्ती बाई

टिळकांचे फक्त पत्रांवरच भागले. पुढे त्यांचा काही त्रास झाला नाही. मुंजीची पाहुणेमंडळी अजून होतीच. इतक्यात एक दिवस जेवणी झाल्यावर मोलकरीण भांडी घेऊन गंगेवर गेली– व ती गंगेत भिजत

टाकून आरडतओरडत साऱ्या गावातून धावत आली व सांगू लागली, की साहेब आला ! झाले. जिकडेतिकडे पळापळ सुरू झाली.

घरात किंवा गावातही पुरुषमाणसे कोणी नव्हतीच. ती शेतावर गेली होती. आत्याबाई, माझ्या भावजया, मुले– सगळी शेतावर गेली होती. दत्तू, मी व भावाचा मुलगा एवढीच आम्ही घरी होतो. मी दत्तूला मागील दाराच्या भिंतीवरून खाली सोडून दिला व सांगितले, " वाटेल तिकडे जा."

भावाचा मुलगा तापाने पडला होता. त्याला सोडून मी पळून जाणे शक्य नव्हते. मी तेथेच दाराच्या दोन्ही बाह्यांना दोन्ही हात टेकून साहेबाची वाट पाहत उभी राहिले. रस्त्याने बाया पळताना दिसत होत्या. एका बाईने चवाळ्याचा एक पदर हाती घेऊनच बाकीचा भाग जमिनीवर लोळवीत धूम ठोकली होती तर दुसरी केरसुणी घेऊनच पळत होती. कित्येक बाया मुलांना पाजीत पाजीत पळत होत्या तर कित्येक हातात चाटू, पळी, टिनची चिमणी वगैरे जे हाती लागेल ते घेऊन पळत होत्या.

माझ्या पोटात धडकी भरली. मी आपले आंबट तोंड करून पुढच्या अरिष्टाची मार्गप्रतीक्षा करीत दारात उभी होते. इतक्यात ते साहेबाच्या रूपाने दारात दत्त म्हणून उभे राहिले. त्या साहेबाबरोबर पाटील, कुलकर्णी, नाईक, येसकर वगैरे मंडळी व त्याची काही माणसे, इतके लटांबर होते. घराची दारे मोकळीच होती. त्याने विचारले, " घरात कोण आहे ?"

" कोणी नाही. साऱ्या बाया तुम्ही आल्याचे ऐकून पळून गेल्या."

" आजारी कोणी आहे का ?"

" कोणीच नाही. आत जाऊन पहा पाहिजे तर."

त्या माणसांनी इकडेतिकडे जरा डोकावले व तेथून पुढे कूच केले. माझा जीव खाली पडला. हळूहळू सारी माणसे परत जमली. माझ्या भावांना ही हकीगत कळताच ते घाईघाईने शेतावरून परत आले. ते म्हणाले " नाशिकची मुंबई कसली ! ही जिवाचीच मुंबई झाली."

गंगेत भिजत टाकलेली भांडी दुसरे दिवशी सकाळी घरी आली.

मुंजीत मला पुष्कळ पैसे मिळाले होते. ते आता मजजवळ वळवळ करू लागले. मी भावांना म्हटले," मजजवळ साठ-सत्तर रुपये आहेत. मी आता शेंगांची खोती घेते. पैशांनी पैसा वाढतो. ह्या व्यापारात फायदा होईल. मग दत्तूच्या विद्येसाठी मला पैशाची काळजी करीत बसावे लागणार नाही."

भाऊ म्हणाले, " तुला ते जमणार नाही. तुला कल्पना नाही हे काम किती अवघड आहे ते. त्यापेक्षा तू हे पैसे व्याजी लाव."

त्यांचे म्हणणे मला पटले व मी हळूहळू त्यांनाच माझे सगळे पैसे गरज लागेल तसतसे व्याजी लावून टाकले. ते पैसे व त्याचे व्याज अजून मला वसूल करून घ्यायचे आहे.

पंढरपुरास दत्तूची प्रकृती जशी होती तशी ती येथे राहीना. त्याला हिवताप लागला व दिवसातून दोन-दोन, तीन-तीन हिवे त्याला येऊ लागली. त्याच्या मामांनी पुष्कळ उपाय केले पण गुण येईना. मी म्हणे, नागपूर-पंढरपूर येथे कसे दत्तूला चांगले वाटत होते. येथेच कसे त्याला बरे वाटत नाही ? ज्याच्या जिवावर मला आपले आयुष्य कंठायचे आहे त्यालाच जर बरे नाही तर येथे राहून करायचे तरी काय ? पण जायचे कोठे ? टिळकांच्या भयाने मला घरची माणसे कोठेच जाऊ देणार नाहीत.

शेवटी माझ्या मनाने दिराकडे पंढरपुरास जाण्याचे घेतले. पण जायचे कसे ? जवळचे सारे पैसे भावांकडे व्याजी लावलेले ! टिळकांकडे पैसे मागावे तर नगरास पेंडसे आहेत. तेथे नुकतेच मामाही गेलेले. त्यांना जाऊन जर टिळकांनी सांगितले तर ? शेवटी मी टिळकांनाच पत्र पाठविले की, " मी तुम्हाला एक गुप्त गोष्ट लिहिणार आहे. तरी मला वचन द्या, की कोणाला सांगणार नाही म्हणून."

टिळकांनी पत्र पाहताच उत्तर पाठविले की, " माणूस चुकणारा प्राणी आहे. मोठमोठ्या ऋषिमुनींच्या हातून चुका घडल्या आहेत. झाले त्याबद्दल काहीच वाईट वाटून घेऊ नको. तुला जरी तुझ्या सर्व नातलगांनी किंवा जगाने सोडले तरी मी तुला कधी सोडणार नाही. तू म्हणत असशील तर मी तुला नेण्यास येतो. प्रकृतीला जपत जा."

पत्राचे हे उत्तर ! मी तर अगदी हतबुद्धच झाले ! हसावे का रडावे मला समजेना. एकपरी समाधान वाटले, की त्यांचे माझ्यावर इतके प्रेम होते. मी उलट ताबडतोब त्यांना लिहिले की, "मी चुकले नाही, माझ्या नातेवाइकांनी माझा त्याग केला नाही. जगानेही मला सोडले नाही. आज तीन महिन्यांपासून दत्तूला ताप येत आहे. त्याला घेऊन मला पंढरपूरला जावे असे वाटते, पण जवळ पैसे नाहीत. ते मी गोळा केले असे समजले तर नातलग मला जाऊ देणार नाहीत. तरी ही बातमी बाहेर न फोडता पंढरपुरास जाण्याचे तीन माणसांचे भाडे पाठवा. मी भाऊजींकडे जाते."

त्यांनी ताबडतोब पैसे पाठविले व दरमहा दहा रुपये भाऊजींकडे पाठवीन म्हणूनही लिहिले.

पैसे येताच मी ताबडतोब पंढरपूरची तयारी केली. आत्याबाईला दत्तूची काळजी लागून राहील म्हणून तिलाही बरोबर घेतले.

माझा भाऊ माझ्या जाण्याच्या विरुद्ध होता. तो म्हणे, "ज्याने मुंजीत एका पैनेही साह्य केले नाही त्याच्याकडे न बोलावता तू जावेस हे मला पसंत नाही. तू जर आपल्या हट्टाने जात असलीस तर पुन्हा मात्र मला तोंड दाखवू नको."

मी म्हटले, "मी हौसेने जाते आहे असे नाही. मला दत्तूसाठी गेलेच पाहिजे."

भावजया म्हणू लागल्या, "दत्तूकरता जायचे असेल तर जा. पण तुम्ही आम्हाला मुळीच जड नाही. टिळकांकडे मात्र जाऊ नका."

धाकटचा भावजयीला तर फारच वाईट वाटले. तिने अकराव्या दिवसापासून दत्तूला स्वतःच्या अंगावर पाजून संभाळले होते.

मी जलालपूर सोडून बैलगाडीने नाशिक गाठले. तेथे एक रात्र माझ्या मावसभावाकडे– महाबळाकडे घालविली. तोही माझ्या पंढरपूरला जाण्याच्या विरुद्धच होता. तेथे पुष्कळच लोकांनी माझ्या जाण्यात मोडा घातला. पण मी म्हणे, "मला दत्तूच्या प्रकृतीकडे पाहिलेच पाहिजे."

दत्तूच्या अंगात ताप होता. स्टेशनवर प्लेगची तपासणी सुरू होती.

मात्र अशी तपासणी सुरू असल्याचे मला ठाऊक नव्हते. संध्याकाळच्या वेळी एकदाची गाडी गाठली. गाडीप्रमाणेच माझे मन धावत होते. श्वास जोराने चालला होता. एकदाचे दत्तूला बरे वाटले म्हणजे झाले. भावाने सांगितल्याप्रमाणे त्याला शरण जाण्याची पाळी न येवो म्हणजे मिळविली, असे मला वाटत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी नवाच्या सुमाराला गाडी अहमदनगरच्या स्टेशनावर येऊन उभी राहिली. टिळक नगरास होते, तेव्हा अर्थात मी कुतूहलाने व आतुरतेने स्टेशनभर पाहू लागले.

इतक्यात एक निराळीच बाई आमच्या डब्याकडे आली. कोणी डब्यात आले की त्याला जागा करून द्यावयाची, ही माझी नेहमीचीच सवय आहे. पण ह्या बाईला मी मजजवळ बोलावून घेतली. तिचे ते बिनकासोटचाचे लुगडे, बांगड्यांपर्यंत बाह्या असलेले ज्याकीट, हातातील दोन-दोन बांगड्या, कुंकू नसलेले कपाळ व शुद्ध मराठी भाषा, ह्या सर्व गोष्टींनी 'ही बाई ख्रिस्ती तर नसेल ना ?' अशी शंका मला आली व म्हणूनच मी तिला मजजवळ बसवून घेतली.

आत्याबाई व बरोबर आणलेली काशीबाई दत्तूसह पलीकडच्या बाकावर बसल्या होत्या म्हणून मला समाधान वाटत होते. कारण आत्याबाई धांदरट. काहीही कोठेही बोलून जायची. व मला तर ह्या बाईपासून टिळकांची माहिती काढायची होती. मी हळूच बाईशी बोलण्यास सुरुवात केली–

"बाई, तुम्हाला कोठे जायचे आहे ?"

"केडगावास."

"नगरास तुमचे कोण आहे ?"

"नगरास आमचे घर आहे. केडगावास माझी बहीण आहे. तिला भेटायला मी जात आहे. पण तुम्ही रडता का ?"

"ह्या मुलाच्या पाठीवर मुले जगत नाहीत म्हणून. आणि आज ह्यालाही बरे नाही."

"तुम्ही कोठून आला ?"

"राजनांदगावहून."

" जायचे कोठे ?"

" पंढरपुरास दिराकडे. तेथे मुलाला बरे वाटले तर पाहू. "

" तुमचे नाव काय ?"

" मनू. "

" आडनाव काय ?"

" जोशी. "

" राजनांदगावला टिळक होते ते तुम्हाला ठाऊक आहेत का ?"

" हो. पण ते आता ख्रिस्ती झाले आहेत. आमच्या शेजारीच राहत असत तेथे. "

" आम्ही पण ख्रिस्ती आहो. "

आणि मग बाईंनी टिळकांविषयी अगदी मनमोकळेपणाने माझ्याशी बोलण्यास सुरुवात केली. दत्तूला ताप बराच भरू लागला. मी त्या बाईला विचारले, " का हो बाई, ताप तर वाढतो आहे आणि आता तपासणी होणार ? आता काय करू ? "

तिने सांगितले, " त्याच्या हातापायाला गार पाणी लावा व वारा लागू द्या. मग तपासाच्या वेळी त्रास होणार नाही. "

" तुम्ही कोठे उतरणार ?"

" दौंडला. "

" तुम्हाला तेथेच उतरायचे तर मग माझी दुसऱ्या गाडीत बसायची सोय करून द्या ना !"

" अहो, त्यात काय आहे मोठेसे ! ही गाडी जाईल, नंतर दुसरी येईल, ती पंढरपूरला जाईल. हमालाला सांगा की तो बसवून देईल."

" तुमचे नाव काय ? "

" राजस कुकडे. "

अशा रीतीने बोलत बोलत आम्ही दौंडपर्यंत आलो. बाईंनी सांगितल्याप्रमाणे मी प्रयोग केल्याने त्यांच्या अंगात ताप लागेनासा झाला. डब्यातून बाई उतरणार तो मी तिचा हात गच्च धरून ठेवला.

" माझी चांगली सोय करा. तुम्ही ओळखलेत का मी कोण आहे ती ?"

" मी कशी ओळखणार ?"

" ज्या टिळकांच्याबद्दल आपण इतका वेळ बोलत होतो त्या टिळकांची मी बायको ! "

## ३९ : गोसाव्याचा बाप

मीच लक्ष्मीबाई टिळक असे कळताच राजसबाईंना फारच चमत्कारिक झाले. टिळकांच्या संबंधी इतका वेळ आपण बोलत होतो त्यात काही कमी-अधिक तर शब्द नाही ना बोलले मी, असे त्यांना वाटले असावे. पण मी कोण हे कळल्यावर त्यांनी माझी सर्व व्यवस्था करून दिली आणि मग त्या केडगावास गेल्या.

आम्ही गाडीतून उतरताच एका भल्या मोठ्या नाड्याच्या वेटोळ्यात आम्हाला पकडण्यात आले. गाडीतल्या साऱ्या डब्यांना कुलपे लावीत व एकएका डब्यापुढे डॉक्टर, पोलीस, शिपाई वगैरे उभे राहून भोवताली एक नाड्याचे वेटोळे करीत. मग कोंडवाड्यात गुरे सोडावी त्याचप्रमाणे त्या डब्यातली माणसे त्या नाड्याच्या कोंडीत सोडीत. मग डॉक्टराने सर्वांची तपासणी केल्यावर पास झालेल्या उतारूला पुढे जाण्यास परवानगी मिळे. आमच्या कोंडीतल्या माणसांची तपासणी अशीच झाली.

मला दत्तूचे फार भय वाटत होते. पण त्याचे हात थंडगार केल्याने तो चटकन पास झाला व आम्ही कुर्डुवाडीच्या गाडीची वाट पाहत दुसऱ्या बाजूला जाऊन बसलो. योग्य वेळी ती गाडी आली व रात्री दहाला आम्ही कुर्डुवाडीच्या स्टेशनवर पोचलो.

खाली उतरताच बडव्यांची गर्दी आमच्या भोवती जमा झाली. मी त्यांना सांगितले, " आम्हाला टिळकांच्या घरी जायचे आहे. आम्ही काही यात्रेकरू नाही. " तेव्हा ते गेले.

बैलगाडी ठरविली. गाडीवाल्याने सांगितले, " चंद्र उगवल्यावर गाड्या निघतील. तोपर्यंत तुम्ही धर्मशाळेत निजा. आम्ही तुम्हाला हाक मारू. "

आम्ही तिघी व दत्तू धर्मशाळेत जाऊन निजलो. ह्या वेळेस मजजवळ रोकड व दागिने मिळून हजार-बाराशेंचा ऐवज होता. नथच तीनशेंची होती. ह्या ऐवजाचे बोचके मी डोक्याखाली घेतले होते. आत्याबाई मध्ये निजली होती. दगदगीमुळे सर्वांचाच डोळा चटकन लागला.

झोप लागल्यावर माझ्या पायाला कोणी चिमटा घेतला. पायाला चिमटा घेऊन डोक्याखालचा ऐवज लांबविल्याच्या गोष्टी मी ऐकल्या होत्या. मी तशीच पडून राहिले व आत्याबाईला पडल्या पडल्या मेणबत्ती लावण्यास सांगितले. मग गाठोडे पोटाशी घेऊन उठून बसले.

पायाजवळ एक माणूस उभा होता. त्याला मी दरडावून विचारले, " कोण रे तू ? पोलिसाला हाका मारू का ?"

तो म्हणाला, " बाई, मी उतारू आहे. तुम्ही झोपा. चंद्र उगवायला अजून अवकाश आहे. "

पण चोराच्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवील ? आम्ही उरलेला वेळ बसूनच काढला.

आता माझ्या आत्याबाईला बोलणे सुचले आणि ते सर्व आपल्या ऐश्वर्याचे. मी तिला दापीतच होते व ती आपल्या, पेंडशांच्या व माझ्या दागिन्यांच्या गप्पा मारीतच होती.

चंद्र निघाला. गाडी निघाली. पण तेवढीच एकटी गाडी होती. आमच्या गाडीच्या मागे एक माणूस एकसारखा धावत येत होता. मी त्याला विचारले, " धावतोस का ?"

तो म्हणाला, " पुढे चोरांची भीती आहे म्हणून मी येतो आहे ! "

म्हणजे ह्या चोराच्या उलटचा बोंबा !

मी म्हणाले, " अरे बाबा, चोर आम्हाला काय त्रास देणार आणि आमच्या जवळून काय घेणार ? आम्ही चाललो आहो पंढरपूरच्या अन्नछत्रात भाकरी भाजायला. तू कशाला उगीच दमतोस ?"

ह्या बोलण्यानंतर आमचा संरक्षक मागे राहिला व आमच्या मागची एक काळजी दूर झाली.

भाऊजींना माझी व टिळकांची पत्रे गेलीच होती. तेव्हा ते व माझी जाऊ आमची वाटच पाहत बसली होती. त्या दोघांनी रीतीप्रमाणे मला नमस्कार केले व म्हटले, " घर तुमचेच आहे. आम्हाला दत्तूसारखे समजा. "

देवब्राम्हण झाल्यावर आत्याबाई व बरोबरची सोबतीण परतल्या. मला माझ्या दिराने व भावजयीने घरात वडील माणसाप्रमाणे मोठ्या मानासन्मानाने वागविले. आमचे जावाजावांचे कधीच भांडण झाले नाही. उलट कोणी काही सांगायला मागायला आले, की रखमाई मजकडे बोट दाखवी व म्हणे, "त्यांना विचारा. मी मालकीण नाही."

घरातील सर्व व्यवस्था माझ्या हाती सोपवून रखमाई माझ्या हाताखाली काम करू लागली. येथेही माझा देवधर्म अगदी जोरात व कडकपणे चालला होता.

आता मला सारी काळजी दत्तूची होती. त्याला शाळेत घातला होता तरी सकाळ-संध्याकाळ मी त्याला शिकवी. तो नियमाने शाळेत जात असे. एक दिवस असाच शाळेला जात असता एक भरधाव घोडा आला. घोडा आपल्या अंगावर येतो आहे असे पाहून दत्तू पालथा पडला व त्याला काही इजा न होता घोडा वरून गेला. ही बातमी मला कळली तेव्हा मी दुसऱ्या दिवसापासून स्वतः त्याला शाळेत नेऊन पोचवू लागले व स्वतः जाऊन शाळेतून घरी आणू लागले.

म्हटल्याप्रमाणे टिळकांची दहा रुपयांची मनीऑर्डर आली. आमचा पत्रव्यवहार जोरात चालला होता. मधूनमधून त्यांची पुष्कळ वाकडीतिकडी पत्रे येत. मी देवळात जाऊन तासन्तास रडत बसे. दिवसातून एकदाच माझे जेवण असल्याने ते मला साधतही असे.

कधी कधी लोक मला टोचून बोलत. त्या वेळी मला फार वाईट वाटे. कोणाकोणाचे वाग्बाण तर अगदी ऊर भेदून बाहेर निघून जात. त्यात एखादे वेळी भाऊजीही भर घालीत. त्यामुळे माझा जीव अगदी पिसाळून गेला होता. काय करावे काहीच मार्ग सुचेना.

एक दिवस मी भाऊजींना म्हटले,

" भाऊजी, तुम्हाला माझी काही कीव येते का ? मला आता हे सहन होत नाही. तुम्ही एक करता का ?"

" मी काय करू ? तुम्ही सांगा. "

" तुम्ही सर्वांना पत्रे पाठवा, की मी दत्तूला घेऊन पळून गेले. मला आता कीर्ती-अपकीर्तीचे काही वाटत नाही. आता मला साऱ्यांचा कंटाळा आला आहे. बहिणीची जी काय चीजवस्तू मजजवळ आहे तिची यादी करा. ती सारी तुमच्याजवळ ठेवते. तिने असे म्हणायला नको, की बाबा गेला नि दशम्या गेल्या. "

" तुम्ही जाणार कोठे ?"

" मला वाट फुटेल तिकडे जाईन. गेल्यानंतर तेथून तुम्हाला पत्र पाठवीन. कुठे जायचे ते माझे ठरलेले नाही. दत्तूकडे पाहून दिवस काढीत आहे. त्याची विद्या करून मी आपली कसेतरी पोट भरीन. काही दिवस तरी सर्वांच्याच जाचातून मी सुटेन. "

भाऊजींना माझी कल्पना बरी वाटली. आदल्या दिवशी विठोबाच्या देवळात मला एक बाई भेटली होती. मला रडत बसलेली पाहून तिने जवळ येऊन माझी करुण कहाणी मोठ्या सहानुभूतीने ऐकून घेतली होती. तिचीही कहाणी करुणच होती. ती अगदी वृद्ध होती; तिचे पती तिच्याहून वृद्ध होते. त्यांचा एकुलता एक मुलगा नुकताच वारला होता. वृद्धापकाळी त्यांचे असे कोणी उरले नव्हते. तीर्थयात्रा करीत करीत ते पंढरपुरास आले होते. दुसऱ्या दिवशी गाणगापुरास जाण्याचा त्यांचा बेत होता. गाणगापुरास उरलेले आयुष्य ते घालविणार होते.

माझी करुण कहाणी ऐकून बाईंच्याही डोळ्यांना पाणी आले. मी तिला म्हणाले, " मी तरुण आहे. मला काही दिवस तरी कोणाचा आश्रय पाहिजे. मला तुम्ही आपल्याबरोबर न्या. मजकडून अनायासे दत्ताचीही सेवा घडेल. तुम्ही माझी धर्माची आई व्हा. मला काही दिवस गुप्त राहण्याशिवाय गत्यंतर नाही."

ती बाई माझ्या म्हणण्याला कबूल झाली. दुसऱ्या दिवशी माझे भाऊजींशी आरंभी सांगितलेले बोलणे झाले. नंतर आमचे सर्वानुमते,

एकविचाराने जाण्याचे ठरले व मी बांधाबांधी करण्यास सुरुवात केली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही निघणार तो आदल्या दिवशी सकाळी भाऊजींना तार आली, ' गोसावीज फादर कमिंग.' खाली सही वगैरे काही नव्हती.

सगळे बुचकळ्यात पडले की गोसाव्याचा बाप कोण येतो आहे ?

पण दुसऱ्या दिवशी टिळक येऊन उभे राहिले. त्यांची तार ' गो सेज फादर कमिंग ' अशी होती. म्हणजे मला परमेश्वराचा संदेश आहे, जा आणि मी येतो. पण तार-ऑफिसमध्ये परमेश्वराला किंवा त्याच्या संदेशाला कोण विचारतो ? तार पाठविणाऱ्याला वाटले, गोसाव्याचा बाप येतो असेच असेल व त्याने तशी तार भाऊजींच्या हातात दिली.

* * *

टिळक वाईहून पंढरपुरास आले होते.

त्याचे असे झाले. वाईस आशम्माबाई शेख उमर नावाच्या एक अत्यंत सालस, देवभीरू व प्रेमळ ख्रिस्ती बाई राहत असत. टिळक ह्यांना आई म्हणत. टिळक ख्रिस्ती झाल्यानंतर त्यांनी दुसरे लग्न करावे, अशी कित्येक खटपटी लोकांची खटपट सुरू झाली होती. मी त्यांच्याकडे जाण्याची आशा जवळजवळ खुंटलेली. त्यांना ख्रिस्ती होऊन पाच वर्षे होत आलेली.

ख्रिस्ती झाल्यानंतर सहाच महिन्यांनी लिहिलेल्या डायरीत हे शब्द आढळतात : " रात्री दारावरून बगी गेली की माझे कुटुंब आले आहे म्हणून मी खिडकी उघडून पाहावे ! यात एक वाजेपर्यंत जागलो ! देवा ! ह्या दीन दासावर व त्या दीन दासीवर आणि त्या अज्ञ अर्भकावर दया कर. तुझ्याच गौरवार्थ आम्हाला एकत्र कर. माझा विश्वास आहे, ह्या आठवड्यात माझ्या प्रार्थनेचे मला उत्तर मिळेल." ( २६ ऑगस्ट १८९५.)

आदल्या दिवशीच्या डायरीत ते म्हणतात, " देवा, तुझी इच्छा आहे की माझ्या कुटुंबाने मजकडे यावे ; पण मी अधीर आहे. मला क्षमा कर."

यावरून टिळकांची मन:स्थिती कशी काय झाली होती हे दिसून येते. अशा मन:स्थितीतच जवळजवळ त्यांनी पाच वर्षे काढली होती. दुसऱ्या लग्नाच्या कटकटीला ते कधी कधी बळी पडत, पण ते क्षणमात्रच. एकदा त्यांना अशीच कोणी गळ घातली असता व चांगली सुंदर मुलगी त्यांना दाखविली असता त्यांनी खाली दिलेले उत्तर दिले होते.

**माझे मला द्या**

**तार्‍यांची माला। नको मज द्या त्या सुमनाला! ॥ध्रु॥**

**रत्नपारखी हंसोत नलगे हिरा लाल मोती। मला हो**
**कल्पलतेचे फूल नको जरि आले ते हाती। मला हो**
**चंपक, जाई, जुई, मोगरा केवळ हो मोती। मला हो**
**तया फुलास्तव देइन जीवाला ॥१॥**

**श्यामल माझे फूल कितीतरि साधे गमतीचे। खरोखर**
**निधान माझ्या सर्व सुखाचे जगती प्रीतीचे। खरोखर**
**भ्रमराचेही भ्रमण थांबवी गाऊ गुण त्याचे। किती मी**
**का मज वधिता? द्या माझे मजला! ॥२॥**

**सख्या फुला! मी गाणी गाइन सदैव रे तुजला। मधुरशी**
**जीव असे तो अश्रु वाहुनी करिन पूजनाला। तुझ्या मी**
**विरही तुझिया जळुन मरावे हेच पुरे याला। यापुढे**
**हाच सुखाचा परमावधि झाला ॥३॥**

ही कविता मे १८९९ च्या सुविचारसमागमात प्रसिद्ध झाली असून तिच्या खाली अशी पादटीप आहे :–

एका एकनिष्ठ पतीस आपल्या विरहांतरित पत्नीचा त्याग करून दुसरा संबंध करण्याविषयी एका गृहस्थाने सूचना केली. या सूचनेला हे त्या विरहव्याकुल, दीन व प्रेमळ पतीचे उत्तर आहे.

हे पद लिहिल्यानंतर आठ-पंधरा दिवसांनीच वर लिहिल्याप्रमाणे

टिळक मला भेटले. महाबळेश्वराहून परतताना व महाबळेश्वरास जाताना ते आपल्या ह्या मातेला भेटल्यावाचून व त्यांच्या घरी चार दिवस राहिल्यावाचून पुढे जात नसत. आशम्माबाईंचे पती व मुलेबाळे सर्व गत झाली होती. परंतु नावाप्रमाणेच त्या मूर्तिमंत आशा होत्या.

महाबळेश्वराहून परतलेले टिळक आशम्माबाईंकडे उतरले होते. रोज सकाळ-संध्याकाळ दोघे माझ्यासंबंधी परमेश्वराजवळ मोठ्या आग्रहाने प्रार्थना करीत. एक दिवस त्यांनी फारच आग्रहाची प्रार्थना केली, की, " देवा आमच्यासाठी नको तर तुझ्या गौरवासाठी ह्या मायलेकरांस तू आण."

प्रार्थना झाल्यावर आशम्माबाईंनी टिळकांना दहा रुपये देऊन सांगितले की, " तुम्ही तार करा व आत्ताच्या आत्ता पंढरपुरास जा. लक्ष्मीबाई खात्रीने येणार आहेत."

दोघांनाही वाटले,की टिळकांनी नगरला न जाता परस्पर पंढरपुरास जावे, असा परमेश्वरी संदेश आला आहे. त्याप्रमाणे टिळक निघाले व मी गाणगापुरास निघण्याच्या आधी बारा तास पंढरपुरास येऊन पोचले.

## ४० : आमचे पाय जागचे उचलेनात

टिळकांना पाहून मला फार आनंद वाटला. गाणगापूरचे माझे बेत जागच्या जागी विरले. दोन-तीन दिवस माझे फार आनंदात गेले.

पेंडशांच्या वेळचे एक फडणीस पंढरपुरास होते. टिळक आलेले समजताच त्यांनी मला बोलावणे पाठविले. मी गेले. ते म्हणाले, " तुम्हाला येथून जायचे असेल तर जलालपूरला जा. मी तुम्हाला पैसे देतो. टिळकांबरोबर जर जाल तर मी योग्य तो बंदोबस्त करीन हे ध्यानात ठेवा ! "

मी म्हणाले, " मी जलालपुरास जाणार नाही. तेथे दत्तू आजारी

पडतो. मी येथेच राहीन."

फडणिसांनी मला "पहा, संभाळून रहा" अशी निघता निघता ताकीद दिली.

घरी येताच टिळकांनी विचारले, "तुला कशाला बोलावले होते?"

मी म्हणाले, "उगाच."

"उगाच कसे? मला नाही कोणी उगाच बोलावले?"

ते अगदी माझ्या खनपटीलाच बसले तेव्हा मी त्यांना काय बोलणे झाले ते सगळे सांगितले.

ह्या गोष्टीनंतर दोन दिवसांत त्या फडणिसांची पंढरपुराहून बदली झाली. ती कशी झाली हे कोडे शेवटपर्यंत सुटले नाही.

सखारामभाऊजी कोणाशी बोलेनासे झाले. बायको, भाऊ, भावजय, दत्तू, इतकेच नाही तर स्वतःची अकरा-बारा महिन्यांची मुलगी– ह्या सर्वांशीं त्यांनी जणू अबोला धरला. आम्हा जावाजावांना ह्याचे कारण कळेना. ते बोलेनात तेव्हा आपोआपच घरात सगळ्यांनीच मुक्याचे व्रत धरले. होता होता ह्या स्थितीचा सगळ्यांना कंटाळा आला.

शेवटी टिळकांनीच बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, "दत्तूच्या शिक्षणाची मला सोय केली पाहिजे. हेच त्याचे शिकायचे वय आहे. एकदा का शिक्षण मागे पडले, की त्याचे जन्माचे नुकसान होईल. तू मजबरोबर नगरास चल. मी तुला निराळे बिऱ्हाड करून देतो."

मी म्हटले, "नगरासच का? येथे द्या मला निराळे बिऱ्हाड करून. मी राहते येथे."

"तू असा पैजेचा विडाच उचलला आहेस. सारा जन्म गेला, मी सांगितले नि तू ऐकले असे कधीच मला आठवत नाही. आजपर्यंत मी तुझे ऐकले. आता मात्र ऐकणार नाही. तुझ्या नादी लागून मला मुलाचे नुकसान करावयाचे नाही. आज साडेपाच वाजेपर्यंत तुला मी वेळ देतो. तेथपर्यंत काय ते ठरीव. आज साडेपाच वर्षे मी तुला विचार करायला वेळ दिला. आता मात्र अधिक वेळ देता येत नाही. मी दत्तूला नेणार. तुम्ही मला नेऊ दिला नाही तर मला दुसरे मार्ग मोकळे आहेत." त्यांचा सूर बोलता बोलता वाढू लागला. शेवटी अगदी पंचम झाला.

आम्ही दोघी घाबरलो व एकमेकींच्या तोंडाकडे पाहू लागलो. टिळकांनी पुन्हा खडसावून सांगितले की, " मी साडेपाच वाजेपर्यंत तुम्हाला वेळ देत आहे. नाहीतर एका आठ दिवसांत मला काय करता येते ते मी तुम्हाला दाखवीन."

असे म्हणून ते फिरायला गेले. मी उठून स्वयंपाकघरात गेले. रानात चहूंकडून एकदम वणवा पेटावा तसे मला वाटू लागले. चहूंकडे ज्वाला भडकत आहेत असे मला झाले. इतक्यात माझी जाऊ आत आली. तिने मला मिठी मारली. मग आम्ही दोघी खूप रडलो.

" बाई, मला सांगा, मी तुमच्यासाठी काय करू ? तुम्ही सांगाल ते करायला मी तयार आहे."

" तू काय करणार ? देवाला काय करायचे असेल ते तो करील. सर्वांनीच मला चोहींकडून वेढले आहे. तू सारे ऐकलेच आहेस. त्याचा अर्थ मी मुलाला नेतो नि तू बैस दुसऱ्यांच्या घरी कष्ट करीत."

" बाई, असे करण्यापेक्षा तुम्ही त्यांच्याबरोबर जा कशा. ते काही तुम्हाला ख्रिस्ती हो म्हणत नाहीत, काही नाही. आणि तसा प्रसंगच आला तर इकडे पत्र टाका. मी तुम्हाला पैसे पाठवीन."

" तू कोठून आणशील पैसे ?"

" मी हवे ते करीन. तुम्हाला कोणीच चांगला सल्ला देत नाही. ह्यांना हा मार्ग वाईट दिसतो, त्यांना तो वाईट दिसतो. मध्ये तुमचा चेंदा. कोणी म्हणे दुसरे लग्न करून देतात, मांसाचा स्वयंपाक करायला लावतात. कोणाचे तोंड धरवते का ? तुम्ही कोणत्याही स्थितीत कोणत्याही वेळेस परत या. मी माझ्या तोंडचा घास तुम्हाला काढून देईन. जसा माझा हक्क या घरात आहे तसाच तुमचाही आहे. त्यांचे भाऊ येतात, मग माझ्या जावेने का नाही येऊ ?"

संध्याकाळी दोघे भाऊ घरी बरोबरच आले. कोणी काही बोलले नाहीत. जेवणे बरोबर झाली नाहीत. दुसऱ्या दिवशी रखमाईने माझी तयारी करण्यास सुरुवात केली. एका हाताने उचलणार नाही इतके सामान तिने बांधले. तिखटमिठापासून मेतकुटापर्यंत सर्व काही त्यात होते. सामान बांधताना ती रडत होती.

आम्ही दोघींनी सखारामभाऊजींना विचारले, जावे का म्हणून. त्यांनी कानावर हात ठेवले. हेच त्यांचे बोलणे. रखमाबाईने मला न्हाऊ घातले. त्या वेळेस ती एकसारखी रडत होती. एकीकडे ती बोलत होती, "आता मी मालीच्या लग्नाला कोणाला नमस्कार करू ? माझी बाई आजच मला मेली !" वगैरे.

गाडी आली. गाडीत टिळक, दत्तू व मी बसलो. भाऊजी गाडी येताच बाहेर निघून गेले. रखमाई सोवळे नेसली होती. तशीच मालीला कडेवर घेऊन ती अनवाणी गाडीच्या मागे निघाली. भाऊजींना न विचारताच आम्ही निघालो.

टिळक आपल्या भावजयीची एकसारखी समजूत करीत होते व परत जायला सांगत होते. "माझ्या बाईला संभाळा, दत्तूला संभाळा" असे ती एकसारखे बजावून सांगत होती.

ते म्हणत होते, "तुझी ती जाऊ आहे पण माझी बायको आहे. तुला तिच्याबद्दल इतके वाईट वाटते तर मला किती वाटत असेल ह्याची कल्पना कर."

मी एकसारखी विठोबाच्या देवळाकडे टक लावून बसले होते. अलीकडे तेच माझ्या विसाव्याचे ठिकाण होऊन बसले होते.

मी मनातल्या मनात म्हणत होते, देवा, मी आपल्या दोन्ही हातांत दोन मशाली घेऊन ह्या डोहात उडी टाकीत आहे. तुला हवे तर तार नाही तर मार; पण पुन्हा कुणाला शरण जाण्याची वेळ आणू नको. मी एकसारखी रडत होते. वरून जरी कठोर मुद्रा करण्याचा टिळक प्रयत्न करीत होते तरी त्यांचे अंतःकरण स्वभावतः अत्यंत मृदू असल्याने त्यांना आमची दोघींची स्थिती पाहून गहिवर येत होता.

दत्तूला गाडी बसायला मिळाली म्हणून फार आनंद वाटत होता. पुढे तर त्याला आगगाडीत बसायला मिळणार होते. येववेल तेथपर्यंत रखमाई आमच्या मागे चटचट पाय उचलीत येत होती. पुढे गाडी जोरात हाकलली. रखमाई गाडीकडे पाहत उभीच होती. थोड्याच वेळात ती दिसेनाशी झाली. मला हुंदक्यावर हुंदके येऊ लागले.

स्मृ...१६

टिळक म्हणाले, " असे काय वेड्यासारखे करतेस ? मी तुला कधीच जुलमाने ख्रिस्ती करणार नाही. मला तो धर्म आवडला म्हणून मी तो स्वीकारला. तुला आवडला व तू ख्रिस्ती झालीस तर मला आनंद वाटेल; पण मी कधी जुलूम करणार नाही. त्या धर्माबद्दल तुला ज्या काही गोष्टी कळल्या आहेत त्या निव्वळ खोटचा आहेत. तुझे कोणा-बरोबर लग्न होणार नाही. मांसाचा स्वयंपाक तुला करावा लागणार नाही. कोणी हे तुझ्या डोक्यात भरवून दिले ? डॉक्टर ह्यूमसाहेबांचे आजच पत्र आले आहे, की त्यांनी एक पंचवीस रुपयांचे भाडचाचे घर तुमच्या-साठी घेतले आहे. ब्राह्मणाचेच ते घर आहे. त्यात भांडीकुंडी वगैरे सर्व संसार मांडून ठेवला आहे. शिवाय पेंडशांच्या घराजवळच ते घर आहे. उगीच का रडतेस ?"

टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे खरोखरच मला अनुभव आला. आज पस्तीस वर्षे तो येत आहे. आमच्या घरात कधी मांस शिजत नाही.

कुर्डुवाडीस टिळकांनी आम्हाला काही फळफळावळ आणून दिली. त्यांना काय, ते गेले मुल्लाभटाच्या उपाहारगृहात. नंतर गाडी आली व आम्हाला घेऊन चालली. तीन वाजता आम्ही नगरास पोचलो. स्टेशन जवळ जवळ येऊ लागले तसतसे माझ्या व दत्तूच्या पोटात धसधस होऊ लागले.

आम्ही नगरास येत आहो ह्याबद्दल पेंडशांना मुळीच माहिती नाही, अशी आमची कल्पना होती. पण ज्या दत्ताला भ्यावे तेच समोर. गाडी स्टेशनात येऊन उभी राहत नाही तो आमच्याच डब्यापुढे नाना-साहेब पेंडसे, काकासाहेब मिरीकर वगैरे मंडळी उभी ! कोणीसे येणार होते की जाणार होते, त्यांच्यासाठी ही मंडळी स्टेशनवर आली होती असे ते म्हणाले. त्यांना पाहताच दत्तूचे व माझे पाय जागचे उचलेनात. टिळक अगदी निर्भयपणे निघाले.

पेंडशांनी मला पाहताच विचारले, " मनू, तू इकडे कुणीकडे ?"

" दत्तूच्या शिक्षणासाठी मी येथे आले आहे. त्याला बरे नव्हते. मी येथेच घर घेऊन राहणार आहे. "

" बरे, आता तू कोठे जाणार ?"

" तुम्ही सांगाल तेथे. "

नानासाहेबांनी मला व दत्तूला सामानासह आपल्या घरी पाठवून दिले. टिळक आपल्या बिऱ्हाडी.

## ४१ : पाहुणचार

आजचा माझा पाहुणचार काही नवीन प्रकारचाच होता. घरात गेले तर कोणी दिसेना. येसू लहान, ती तेवढी पुढे आली व मला विचारू लागली, "का मावशी, का आलीस ?" मी "उगीच" म्हणून तिची समजूत केली. माझी कोरी लुगडी, चोळ्या, दागदागिने, वगैरे सारे मी बहिणीच्या स्वाधीन करण्यासाठी येसूजवळ दिले. विटाळाचे कपडे धुण्यासाठी बाजूला काढून ठेवले. ब्राह्मणाने पाणी तापवून दिले. अंग धुऊन दुसऱ्या दिवसासाठी एक लुगडे बिऱ्हाडी नेऊन वाळत घातले. बिऱ्हाड जवळच होते. ते येसूच्या साहाय्याने शोधून काढले.

तेथे जाताच घो घो घो घो बायका गोळा झाल्या. कोणी डोळ्यांनी, कोणी बोटांनी तर कोणी नुसत्या मानेने एकमेकींना खुणावीत होत्या. मला काही समजत नाही असा त्यांचा समज होता. मला सारे काही समजत होते.

मी माझा नवा संसार पाहिला. डॉ. ह्यूमसाहेबांना पंढरपुराहून टिळकांनी लिहिले होते व त्यांनी एका ब्राह्मणाच्या घरात जागा घेऊन हा संसार मांडून ठेवला होता. त्यात ताटवाट्यांच्या जागी कपबशा व प्लेटी होत्या व पळ्याओगराळ्यांच्या जागी काटे-चमचे, सुऱ्या होत्या ! मी हे पदार्थ पूर्वी जन्मात कधी पाहिलेले नव्हते.

लुगडे वाळत घालून परत आले तो टिळकांचा निरोप आला, " चहा पाहिजे."

आता काय, टिळकांचे सत्तेचे बिऱ्हाड होते, सत्तेची बायको होती;

पण घर मनेचे नव्हते. मी जाऊन त्यांना चहा करून दिला. टिळक म्हणाले, " तू आता थकली आहेस तर पेंडशांच्याकडेच जाऊन जेव. मी काही संध्याकाळी जेवायला येणार नाही. उद्या येईन. "

मी जाण्याच्या आधी घरवाल्याने त्यांना सांगितले होते, की तुम्ही आमच्या घरी येऊ नका. तुम्हाला यायचे असेल तर तुम्ही आपले दुसरे बिऱ्हाड पहा. पण टिळकांनी मला हे सांगितले नव्हते. मी पेंडशांकडे गेले व ते आपल्या बिऱ्हाडी गेले. मी आपली मनात मांडे खात होते, की आता काय, मी व भिकूताई शेजारी शेजारी राहू.

पेंडशांच्या घरी गेले. तेथे जेवणे होऊन गेली होती. माझ्याशी कुणी बोलेना. चुलीवर गुळांब्याचे एक मोठे थोरले पातेले शिजत होते. आचाऱ्याने माझ्यापुढे एक ताट ठेवले. त्यात एक चतकोर बाजरीची भाकरी व मीठ ! जवळ कोणी उभेसुद्धा राहिले नाही. माझ्या डोळ्यां-तून पाण्याच्या सारख्या धारा चालल्या होत्या. दत्तू जेवून स्वस्थ निजला होता. टिळक आपल्या बिऱ्हाडी खाऊन स्वस्थ लिहीत बसले असतील.

टिळकांना आपल्या स्वभावाप्रमाणे काळजी अशी फार क्वचित वाटत असे. घरवाल्याने दुसरे बिऱ्हाड पाहण्यास सांगितले तेव्हा ते स्वतःची समजूत करून घेऊ लागले, की हीही एक परमेश्वरी योजनाच आहे. आपण कशाला काळजी करा ? ह्या घरवाल्याला अगाऊ भाडे दिलेच होते.

सकाळी टिळक जेवायला येणार, आपल्याला काहीतरी केले पाहिजे, म्हणून मी सकाळीच उठून बिऱ्हाडी आले. मिठाबरोबर खाल्लेल्या चतकोर भाकरीखेरीज तीन दिवस माझ्या पोटात अन्न नव्हते. पंढर-पुराहून निघताना बरोबर जेवण गेले नाही. रस्त्याने खाणे शक्य नाही व पेंडशांच्या घरी जेवणाचा हा प्रकार.

बिऱ्हाडी जाऊन मी ते नीटनेटके लावले, स्वैपाक केला व टिळकांची वाट पाहत बसले. डोक्यात कल्पनांचे काहूर माजलेले. घरातून दारात, दारातून खिडकीत अशा माझ्या एकसारख्या येरझारा चालल्या होत्या. दत्तू पेंडशांकडे, मी इकडे व टिळक तिसऱ्याच कोठे ! एका गावात असून संध्याकाळ झाली तरी आमच्या गाठी नाहीत.

दिवसभर टिळक आले नाहीत व रात्रीही आले नाहीत. मी सारा दिवस उपाशी होते. बहिणीकडेही दुसऱ्या दिवशी रात्री अकरापर्यंत मी गेले नाही. दोन दिवस मला आणखी उपवास घडला. रात्री अकरा वाजता पेंडशांचा शिपाई आला व मला त्यांच्याकडे घेऊन गेला.

मी पेंडशांच्या घरी गेले. घरात सर्व शांतता होती. नानासाहेब ऑफिसात बसले होते. शिपायाने त्यांना सांगितले, "आल्या." त्या सबंध दिवसात एवढा एकच शब्द मला ऐकायला मिळाला होता. पेंडशांनी उत्तर दिले, "त्यांना आत घेऊन ये." मी आत आले.

"काय, ठीक आहे ना मावशी ? मग आता पुढे काय बेत ?"

"दत्तूचे शिक्षण."

"तुलाच त्याची काळजी आहे नि आम्हाला काही नाही का ?"

"असे कसे होईल ? सर्वांनाच त्याची काळजी आहे."

"हे खरे ना ? मग तू जलालपुरास जा. मी तुला गाडीला पैसे देतो."

"मला पैसे नकोत. त्याला जलालपूरची हवा सोसत नाही. त्याच्याकरता मी आले आहे."

"हे तुझे नुसते निमित्त आहे. हवा न सोसायला काय झाले ? तेथे का कोणी माणसेच राहत नाहीत ?"

"त्यांना सोसत असेल पण दत्तूला सोसत नाही."

"पहा, विचार कर."

"विचार केला, ज्याच्या जिवावर मला आपले आयुष्य कंठायचे त्यालाच बरे नाही तर मला काय होय ?"

"फार शहाणी होऊ नको. माझे ऐकून घे. मी तुला शेती लिहून देतो. दरमहा दहा रुपये पाठवीन. वीस पुतळ्या देतो."

"तुम्ही मला काही द्यावे ह्याकरता मी आले नाही. त्याची विद्या व प्रकृती ह्या दोन गोष्टी मजपुढे आहेत. तुम्ही आपली सारी संपत्ती मला दिली तरी ती मला नको. मला तुम्ही काहीच कमी केलेले नाही, पण आता मी मुळीच परत जाणार नाही. माझे जे काही होईल ते होवो."

"बरे तर, माझे जे काही तुजजवळ असेल ते परत कर."

" ते मी येतानाच काढले होते व आल्याबरोबर ते येसूच्या स्वाधीन केले. मला कशाची आवड नाही. माणसाने दिलेले पुरत नाही व देवाने दिलेले सरत नाही हे मी पूर्णपणे जाणून आहे."

" तुझा शहाणपणा फारच वाहवत चालला आता. बरे, आता एक वाजला. नीज तू. हिला बिछाना द्या रे."

" बिछाना नाही– घोड्याचा खोगीर द्या तिला !" आतून आवाज आला. ताबडतोब घोड्याचा खोगीर गड्याने मजपुढे आणून टाकला.

आज तीन दिवस मांडा म्हणून खाण्यास कोंडाही नव्हता. तेव्हा धोंड्यापेक्षा मऊ खोगीर मला चांगला वाटला. त्यावरच मला चांगली गाढ झोप लागली.

पहाटे उठून मी बिऱ्हाडी आले. तेथे येताच आदल्या दिवशी करून ठेवलेला चहा, अन्न वगैरे भूमातेला अर्पण करून मी नवीन स्वयंपाकाला लागले. दोन दिवस मला टिळकांची किंवा दत्तूची भेट झाली नव्हती. दत्तू मावशीकडे सुखरूप होता. त्याची काळजी नव्हती. पण टिळकांचे काय झाले ? त्यांचा तपास तरी कोणी व कसा करायचा ? मी अगदी नगरात असून रानात पडल्यासारखी झाले होते. आशा-निराशेचा पिंगा माझ्याभोवती सुरू झाला तोच दोन गडी व एक बैल-गाडी घेऊन टिळक आले.

" काल तुमची किती वाट पाहिली. तुमचा पत्ता नाही. दत्तूही नाही. स्वयंपाक सर्व फुकट गेला."

" तुझ्यासाठी दुसरे घर पाहिले आहे."

" म्हणजे ? मी नाही येत."

" तू येत नसलीस तरी हा घरवाला तुला आपल्या घरात ठेवीत नाही."

" ते का ?"

" त्याची सत्ता. दुसरे घर ब्राह्मणाचेच आहे. मराठ्याची बाई भांडी घासायला ठेवली आहे व गुजराथी ब्राह्मण पाणी आणायला ठेवला आहे. इतक्या भानगडी काल दिवसभर कराव्या लागल्यामुळे मला येता आले नाही."

दत्तूला आणला. गाडीत सामान गेले. आम्ही तिघे तांग्यात गेलो. अजून बहिणीची भेट झाली नव्हती. दुसरे बिऱ्हाड थाटले. आता आत्याबाईंचे सामान उपयोगात आले. मी भात-पिठले केले व तिघांनी त्यावर सप्पाटून हात मारला. टिळक आपल्या घरी गेले. तेथून त्यांचे घर शंभर कदमांवर होते. आता आपल्याला कसलाच त्रास नाही अशा आनंदात मी व दत्तू सुखाने झोपी गेलो.

पण सकाळीच घरवालीचा निरोप आला की, "तुम्ही आमच्या पायखान्यात जायचे नाही !" पायखानेही कर्मठ झालेले !

"मग कोठे जायचे बाई ?"

"सार्वजनिक पायखान्यात जा."

अडली लक्ष्मी मालकिणीचे पाय धरी. सृष्टिनियम काही सोवळे-ओवळे पाहत नाही.

बाई एकदा भांडी घासून गेली. दुसऱ्यांदा येऊन सांगून गेली, की भांडी घासता येणार नाहीत. मला जातीबाहेर पडावे लागेल. गुजराथ्याचे तर लोकांनी पाणीच बंद केले. तो त्यांना सांगू लागला, बाई सोवळे नेसते, देवपूजा करते, तुम्ही काय म्हणून माझे पाणी बंद करता ? त्याला उत्तर मिळाले, तिचा नवरा ख्रिस्ती आहे. तू आता प्रायश्चित्त घे. त्याला बिचाऱ्याला प्रायश्चित्त घ्यावे लागले व त्यापायी चार-पाच रुपये दंडाचा माझ्यामुळे रिकामा भुर्दंड पडला.

आता पाणी कोठून आणायचे ? ही तीन अपरिहार्य संकटे आली. आता पुन्हा बिऱ्हाड बदलण्याखेरीज उपाय राहिला नाही.

"आता आपण फर्ग्युसन गेटच्या कंपाउंडात जाऊ."

"ते कुठेसे आहे ?"

"येथून जवळच आहे. तेथे ख्रिस्ती लोक राहतात."

"मी त्यांच्या शेजारी येणार नाही."

"नाही तर कुठे जायचे ? आता तूच पाहिलेस ना ब्राह्मणांचे ब्राह्मणत्व ? 'ब्रह्म जानाति ब्राह्मणः!' हेच ह्यांचे ब्रह्म. मी तुला काहीच त्रास देत नाही. तुझेच लोक तुला सोडीत आहेत, त्याला मी तरी काय करू ?"

डॉ. ह्यूमसाहेबांना माझ्या घराची परवड कळली. तसेच मी ख्रिस्ती लोकांशेजारी राहण्यास तयार नसल्याचेही कळले. पावसाळ्याचे दिवस. फर्ग्युसन गेटमधील बिऱ्हाडे काढून त्यांना कोठे ठेवायचे ? एकेकाच्या घरी पाच-पाच सात-सात मुले. तरी बिचारे सगळे लोक दुसरीकडे राहायला गेले. सर्व कंपाउंड माझ्याकरता मोकळे केले.

तेथे एकंदर घरे तीन होती. एकेका घराला चार-चार खोल्या. ती सर्व आमच्या ताब्यात दिली. टिळकांना आता बाहेर कुठे राहायला जाण्याचे कारण उरले नाही व ख्रिस्ती लोकांनी– मला आवडत नाही म्हणून– आमच्या कंपाउंडात येण्याचे थांबविले. आम्ही बैलगाड्या करून ह्या नवीन घरात गेलो. एका गावात एका महिन्याच्या आत तीन घरे झाली. दत्तू व मी दोन घरांत राहू लागलो. टिळकांनी तिसरे घर घेतले.

ह्याच घरात डॉ. ज्युलिया बिसेल व मिस एमेली बिसेल ह्या मला भेटायला आल्या. इतक्या सुंदर मराठी बोलणाऱ्या मडमा मी कधीच पाहिल्या नव्हत्या. तशी मिस हार्वेखेरीज अजूनपर्यंत मी एकही मडम पाहिलेली नव्हती. ख्रिस्ती लोकांना टिळकांनी सांगून ठेवलेले असल्याने कोणी मजकडे येत नसत.

पण हळूहळू टिळकांच्या घरी लोक येऊ-जाऊ लागले. टिळकांच्या घरात रोज प्रार्थना, भजन, शास्त्रवाचन दोन्ही सांज होत असे. माझ्या घरात माझे सारे देव, देवी, गणपती, तुळशी ह्यांचे पूजन झपाट्याने चाललेले असे. त्यांच्याकडे चाकरनोकर होते. माझ्याकडे कोणी नव्हते. मराठे मिळेनात व दुसरे खपेनात. मला सगळे हाताने करावे लागे. टिळक जेवायला माझ्या घरी येत.

त्या वाडीत पाणी नव्हते. मला कमेटीच्या बागेत जाऊन पाणी आणावे लागे. तेथला नळ खरा खरा सार्वजनिक होता; किंवा पूर्णपणे ब्राह्मणेतरांचा होता म्हटले तर अधिक शोभेल. एक दिवस मी तेथे पाणी भरायला गेले असता दोन बाया नळावर होत्या. त्या परजातीच्या व त्यातील एकीच्या अंगावर बरीचशी पिसे इतस्ततः लागलेली दिसत होती.

मी म्हटले, " बाई, जरा दूर हो, मला एवढी घागर भरू दे. "

तिने लागलीच मला उत्तर दिले, " अग, चल व्ह तिकडं ! लय बाम्हनीन असलीस तर आम्हाला काय ? बाम्हनीन झाली तर गंग आली कशाला ह्या नळावर ?"

बाया गेल्या. मग मी घागर भरून घरी आले. घरी चटणी वाटून ठेवली होती. तिच्यावर वाऱ्याने दोन पिसे येऊन पडली होती. ही पिसे पाहून मला खरे खरे पिसे लागण्याची वेळ आली. पुन्हा गंगा-यमुनांचे आगमन झाले. टिळक आले. त्यांनी कारण विचारले. नळापासून तो चटणीपर्यंत मी त्यांना सर्व प्रकार सांगितला.

ते म्हणाले, " मी काय करू ? ती वाऱ्याने उडाली असतील !"

झाले. मी गप्प बसले व आणखी रडले.

टिळक दर रविवारी चर्चला जात असत. त्यांच्याबरोबर दत्तूही जाई. एकदा असाच चर्चनंतर तो त्यांच्याबरोबर मालनबाई कुकडे ह्यांच्याकडे गेला. तेथे एक ब्राह्मण गृहस्थही होते. चहा-बिस्किटांवर ह्या गृहस्थांनी खूप ताव मारला. दत्तूलाही त्यांनी आग्रह केला. पण दत्तूने तेथे काही खाल्ले नाही. पुढे एकदा दत्तू पेंडशांच्या घरी असता तेथे हेच गृहस्थ आले. चहा आला. बसणावरून उठून तो स्वारीने दूर जाऊन मटकावला व तोंड पुशीत पुशीत दत्तूला म्हटले, " काय रे, तुझा बाप बाटला ना ?"

दत्तूने चटकन उत्तर दिले, " तुमच्यापेक्षा त्यांचे बाटणे बरे. ते अगदी उघड उघड तरी चहा घेतात व खातात. तुम्ही चोरून खाता. "

" केव्हा रे लबाडा खाल्ले मी ?"

" आदितवारी त्या बाईंच्या घरी नाही का चहा घेऊन काहीसे खाल्लेत ते ! मला आग्रह करीत होता ! मी खाल्ले नाही !"

ह्यावर नानासाहेबांनी त्याला चूप केले.

भिकूताईने मी आल्यापासून अंथरूण धरले होते. त्यांचा पुतण्या त्यांना भेटायला आला होता. नंतर तो मजकडेही आला. मी सोवळे नेसून स्वयंपाक करीत होते. देवाजवळ समई लावली होती. त्यांच्यावरील फुले, गंध त्याला दिसली. तो हसला.

मी विचारले, "का हसतोस ?"

तो म्हणाला, "तिकडे तुझी बहीण तू ख्रिस्ती झालीस म्हणून आजारी पडली आहे आणि इथे पाहतो तो निराळाच प्रकार."

काही काही बाबतींत त्रास जरी होत होता तरी एकंदरीत महिना सुखाचा गेला. आता कोणी ब्राह्मण त्रास देण्यास येण्याची धास्ती राहिली नाही.

ब्राह्मण जरी घर सोडा म्हणण्यास आले नाहीत तरी घरात विघ्नहर्ता गणपती होताच. त्याने आपल्या वाहनास आज्ञा केली, की ह्यांना आता पुन्हा येथून हलवा. एक दिवस दत्तू व मी जेवत बसलो असता एक मोठा उंदीर येथून दत्तूच्या ताटाजवळील चित्रावती खाऊ लागला.

नगरचे उंदीर भीत नाहीत बरं का, असे म्हणून आम्ही उठलो तर दुसरा आला व तोही चित्रावती खाऊ लागला. थोडक्यातच दोन्ही उंदीर गरगर फिरू लागले व पटकन मेले. हा प्रकार ऐकिवात पुष्कळ होता पण असा प्रत्यक्ष त्याच दिवशी प्रथम पाहिला. टिळक आले. त्यांनी उंदीर पाहताच सांगितले, की हा प्लेगचा उंदीर. परीक्षा करण्यास ते पाठविले व तिकडून उत्तर आले की प्लेगचेच उंदीर आहेत.

डॉ. ह्यूम ह्यांना ही हकीगत कळताच ते उभ्या उभ्याने येऊन गेले. त्यांनी आम्हा सगळ्यांनाच आपल्या बंगल्यात राहण्यास बोलावले. पण मी तेथे त्यांच्या बंगल्यात माझे सोवळेओवळे कसे काय सांभाळणार ? तेव्हा टिळक गेले त्यांच्याकडे राहायला व मी दत्तूला घेऊन मालनबाई कुकडे ह्यांच्याकडे राहण्यास गेले.

मालनबाई ज्या वाडीत राहत तेथे सर्व स्त्रियाच होत्या. मला एका बाजूला एक खोली देण्यात आली व तीत मी राहू लागले. तेथेच राजसबाई होत्या. आम्हाला एकमेकींना पाहून गाडीतील आठवण झाली व खूप गम्मत वाटली.

## ४२ : दानावर दक्षिणा

आम्ही एकत्र आल्याबरोबर प्लेगोबाने आम्हाला पुन्हा विभक्त केले. टिळक डॉ. ह्यूमकडे राहत असत व मी मालनबाई कुकडे ह्यांच्या कंपाउंडात दत्तूला घेऊन राहू लागले. ह्या ठिकाणी सर्व स्त्रीसाम्राज्य असल्याने पुरुषांना आत येण्याची सक्त मनाई होती. संध्याकाळी चार ते पाच फक्त टिळकांना भेटायला येण्याची परवानगी होती. लिहिण्याच्या नाही तर बोलण्याच्या नादात जर का ते गुंतले व वेळ चुकली, की मग चोवीस तासांनंतर भेटीचा योग यायचा.

तेथे एक अशिक्षित ख्रिस्ती बाई होती. तिला दोन मुली होत्या. ह्या सर्वांचा देवावर फार विश्वास असे. दुसऱ्यांची मने न दुखतील असे वागण्याची त्या फार खबरदारी घेत. ह्यांनी मला सोबतीचे फार साह्य केले. तिच्या गोड वाणीमुळे मला ती सुशिक्षितापेक्षा अधिक आवडे. मी माझ्या नातलगांकरता रडे तेव्हा ती माझी समजूत करी.

वाडीत तऱ्हेतऱ्हेची झाडे होती. त्यावर पक्षीही पुष्कळ येऊन बसत. हे पक्षी धरण्यासाठी दत्तू त्यांच्यामागे लागे. राजसबाईंनी दत्तूला सांगितले की, तू पक्ष्याच्या शेपटीवर मूठभर मीठ टाकलेस की तो पुढे जागचा हलणारसुद्धा नाही. अर्थात शेपटीवर मूठभर मीठ पडेपर्यंत पक्षी उडून जाणार हे दत्तूच्या ध्यानात येत नसे. त्याने आपले रोजच्यारोज घरातील मीठ लांबवावे व साऱ्या बागेत ते पेरावे. पण बिचाऱ्याच्या हाती पक्षी कधीच लागला नाही.

नगरास प्लेगचा जोर अतिशय वाढला. राहुरीचे मिशनरी रे. बालैंटाईन हे एम. डी. असून त्या वेळेस चांगले नावाजलेले डॉक्टर होते. त्यांना प्लेग ड्यूटीवर नगरास आणण्यात आले व टिळकांची त्यांच्या जागी राहुरीस नेमणूक झाली.

आता मी अगदी पूर्णपणे ख्रिस्ती लोकांत राहण्यास आले. राहु-

रीस गावाच्या पश्चिमेस ख्रिस्ती लोकांची वस्ती आहे. वस्तीच्या पलीकडे पश्चिमेस अर्ध्या फर्लांगावर डॉ. बालैंटाईनसाहेबांचा बंगला आहे. ह्या बंगल्यात आम्ही सर्व एकत्र राहू लागलो. कंपाउंडात एक निराळी स्वतंत्र खोली होती. ह्या खोलीत मी माझा स्वयंपाक व देव देव करायची. माझे सोवळेओवळे अगदी नेहमीसारखे अगदी कडकडीत होते.

ह्या खोलीच्या शेजारच्या खोलीत बालैंटाईनसाहेबांच्या मुलांची आया राहत असे. हिला सगळेजण आयाबाई म्हणत. आयाबाई अशिक्षित होती; पण दुसऱ्यांच्या सोयीगैरसोयीकडे पाहण्याचे वळण हिला इतके होते, की आत्ता मला त्याची किंमत कळते आहे. नारायणराव गोखल्यांची मी मुलगी. माझे सोवळेओवळे केवढे कडक असेल ह्याची कल्पना करण्यास ती तेवढी आठवण पुरे आहे.

अशी ही कडक सोवळी बाई अगदी ओवळ्या बाईच्या शेजाराला. तेव्हा साधारणतः खटके उडायला पाहिजेत. परंतु तसे कधी झाले नाही. तिने आपले खाणेपिणे मुळीच सोडले नाही; पण सर्व काही फार युक्तीने चाले. कधी कधी ती टिळकांना जेवायला बोलवी. पण हे काय खातात ह्याची मला कधी कल्पनाही होत नसे.

त्यांना जेवायला बोलावले म्हणजे मला ती शिधा देई. ती आपल्या खोलीत दोरीवर नेहमी काही वाळत घाली. तिला विचारले, काय आहे, तर म्हणे, बाई, प्लेगचे दिवस, तेव्हा कपड्यांना हवा पाहिजे ना लागायला. जेवताना ती दार लावून घेई. त्याचेही मला आश्चर्य वाटे.

"का हो, आयाबाई तुम्ही दार लावून का जेवता ?"

ती म्हणे, "अहो बाई, आमची रीतच अशी."

कधी कधी जेवायला बसली म्हणजे आत ठोकल्याचा दण दण आवाज येई.

मी विचारी, "आयाबाई, तुम्ही जेवताना ठोकता हो काय ?"

तेव्हा तिने उत्तर द्यावे, "अहो बाई, घुशीची बिळे बुजविते. ह्या घुशींनी लै त्रास दिला आहे"

एकदा तर दार बंद होते व आयाबाईंच्या घरातून चमत्कारिकच काही भाषण ऐकू येऊ लागले. कोणी म्हणे, मी पाय घेईन. कोणी

म्हणे मी मुंडके घेईन.

हे आहे तरी काय ? मला मोठी चुटपूट लागून राहिली.

मी म्हटले, "आयाबाई, हे काय हो चमत्कारिक तुमच्या घरातून बोलणे येते ?"

तिने चटकन उत्तर केले, "अहो बाई, काय सांगू, राखेसाची गोठ लावली होती, त्यातले ते बोलणे."

मला कामाला बाई वगैरे कोणी नव्हते. आयाबाईंनी हळूहळू सारी कोरडी कामे करायला सुरुवात केली. "केर काढला तर काय होते हो बाई ?" मला तिने हळूच विचारावे. तिच्या गोड स्वभावामुळे मीही तिला ते करू देऊ लागले. पाणी, स्वयंपाक ही मात्र माझी मी करी.

ह्याच ठिकाणी माझ्या पहिल्या ख्रिस्ती बंधूची माझी गाठ पडली. त्यांचे वागणे, कपडे वगैरे अगदी शूचिर्भूत ब्राह्मणासारखे असे. ह्यांचे नाव बापू नामाजी आढाव. मी टिळकांना विचारले, "हे कोण ब्राह्मण आहेत हो ?"

टिळकांनी सांगितले, "हे गुडशस्त ब्राह्मण आहेत !"

मी देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे वगैरे ब्राह्मणांच्या पोटजाती ऐकल्या होत्या, पण गुडशस्त ही जात मात्र कधी ऐकली नव्हती. मला त्यांचे म्हणणे पटले. पुढे कित्येक वर्षांनी गुडशस्त ब्राह्मणाचा अर्थ कळला.

बापूराव आमच्याकडे दोन-तीन दिवस होते. मला माझ्या नातेवाइकांची आठवण होऊन मी नेहमी रडे. इतके दिवस टिळकांकरता रडले, आता नातेवाइकांकरिता रडू लागले. बापूरावांनी माझी पुष्कळ समजूत करावी–"तुम्ही रडू नका. मला तुमचा भाऊ समजा." आणि शेवटपर्यंत ते माझ्याशी भावाप्रमाणे वागलेही.

नगर सोडून राहुरीस येण्याच्या आधीची एक गोष्ट सांगितली पाहिजे. टिळकांकडे एक गृहस्थ आला. त्याला ख्रिस्ती व्हायचे होते. तो टिळकांना पपा व मला आई म्हणू लागला. टिळक त्याच्यावर फारच प्रेम करीत व त्याला आपल्या मुलाप्रमाणे मानीत. आणि टिळकांनी कोणावर प्रेम केले नाही ? जो कोणी त्यांना भेटे त्याच्यावर त्यांचा

चटकन विश्वास बसे. माणसाची खरी परीक्षा मला आहे, असे त्यांना वाटे.

उलट मला वाटे, माणसाची खरी परीक्षा मला आहे. हा माणूस मला एक लफंगा वाटे तर टिळकांना तो एक देवदूत वाटे.

ते मला म्हणत, " तुला सायकॉलॉजी कळत नाही."

मी म्हणे, " मला नसेल कळत, पण मला व्यवहारज्ञान आहे व हा माणूस लफंगा आहे हे मी त्याच्या जोरावरच तुम्हाला सांगते."

ते म्हणत, " तू दुराग्रही फार. हा माणूस देवाचा मोठा सेवक होणार आहे. तू पाहशील."

मी त्यांना सांगितले, " मी सांगते, हा काही होणार नाही. एक दिवस डोक्यावर चांगला हात फिरवून निघून मात्र जाईल."

आमच्याबरोबर तो राहुरीलाही आला. तेथे त्याचा बाप्तिस्मा झाला. पुढे थोड्या दिवसांनी टिळकांनी त्याला विसापूरला कसलेसे काम लावून दिले. त्याला मी पाणी प्यायचे भांडे, काही फराळाचे व अंथरूण-पांघरूण देऊन वाटेला लावले. गेल्यावर त्याची नियमाने पत्रेही येत. बिचाऱ्याला जगात आपल्यावाचून कोण आहे, असे म्हणून टिळक मधून-मधून मोसंब्यांची पार्सले पाठवीत.

एक दिवस टिळक काही कामाकरता नगरास गेले. ते गेल्यावर दुसऱ्याच दिवशी त्यांचे पत्र आले की, आपल्या घरची चोरी झाली आहे. नवल वाटते, की घर कोठेच फोडलेले नाही. कुलपे जशीच्या तशीच आहेत. दारे सर्व बंद आहेत. पण पायखान्यातल्या टिनपाटापासून एकूण एक सर्व सामान गेले आहे.' अंथरूण-पांघरूण, चांदीची बटणे, शर्ट, कोट, मधाची बाटली ह्यांपैकी काहीही जागेवर नाही !

पत्र वाचताच मला टिळकांच्या मानसपुत्राचा संशय आला. हे काम दुसऱ्या-तिसऱ्या कोणाचे नसून ह्याच भामट्याचे आहे, असे मी मनाशी ठरविले. टिळक लौकरच परत आले. त्यांनी प्रास्ताविक अशा बऱ्याच लोणकढ्या थापा दिल्यानंतर हळूच म्हटले, " शेवटी चोर सापडला."

मी आशाळभूताप्रमाणे विचारले, " सामान सापडले का ?"

" तू अशी उतावीळ करू नको. मी सर्व काही तुला सांगतो."

" बरं, सांगा."

" अग, तो आपला मुलगा विसापुरात आहे ना ? तो होता म्हणून सर्व काही मिळाले. नाही तर एक फुटका तांब्या हाती लागला नसता."

" म्हणजे तो काही पोलीसबिलीस झाला आहे की काय ?"

" नाही ग. चोराने केली चोरी आणि आपल्या नावाचे भांडे घेऊन गेला बेटा बाजारात विकायला. तेथे ते ह्याने ओळखले. धरला त्याचा हात आणि दिला नेऊन पोलिसात न् काय ! किती हुशार माणूस !"

" तुम्ही काही म्हणा. पण चोर पोळपाट-लाटणे आणि टिनपाट नेऊन काय करणार ? हा कोणीतरी माहितीतला भामटा असला पाहिजे. ह्या जिनसा चोराला काय करायच्या ?"

" तुला काय ठाऊक. चोर ह्यांचेसुद्धा पैसे करतात."

" बरं मग, पुढे काय झाले ?"

" पुढे काय ? त्याचे पत्र आले आहे, की दहा रुपये पाठवा. सामान माझ्या ताब्यात घेतले आहे. पैसे येताच घेऊन येतो."

" मग त्याला का आता पैसे पाठवायचे ?"

" तर ! ही कामे का कुठे पैशावाचून होतात ? चल, नाही तर मीच जाऊन सामान आणतो. दे पैसे."

मी पैसे आणण्यास आतल्या खोलीत गेले. टिळकांचा हाच विषय चालू होता. आमच्या घरात नेहमी बाहेरची माणसे बसलेली असत आणि घरातल्या गोष्टी वेगळ्या व बाहेरच्या वेगळ्या असे कधी नसे. मी आत आल्यावरचे टिळकांचे बोलणे मला स्पष्ट आत ऐकू येत होते.

" चोरी त्यानेच केली. डॉक्टर ह्यूमकडून किल्ल्या आणल्या. चार गाड्या आणून त्यांत सर्व सामान भरले. लोहारणीने विचारले, सामान कोठे चालले ? तर तिला सांगितले, टिळकांनी मला मुद्दाम राहुरीहून सामान आणण्यास पाठविले आहे."

मी सगळे ऐकत होते, पण व्यवहारज्ञानाचा मजजवळ पुष्कळ साठा असल्याने मनात म्हटले, हरकत नाही. एवढे मोठे सामान दहा

रुपयांत परत मिळते आहे ना ? जाऊ द्या दहा रुपये गेले तर. मी बाहेर येऊन टिळकांच्या हातात दहा रुपये ठेवले.

टिळकांनी ते दहा रुपये नेऊन त्याच्या स्वाधीन केले व त्याला सांगितले, " मी पुढे जातो. तू सामान घेऊन ये."

टिळक परत आले.

मी म्हणाले, " सामान ?"

ते म्हणाले, " येते आहे मागून."

मी म्हणाले, " तुम्ही सारा संसार त्याला दान केला. त्याची दक्षिणा राहिली होती ती आता देऊन आला वाटतं ?"

पण टिळकांना तो आपले सामान घेऊन येणार अशीच पुष्कळ दिवस खात्री वाटत होती. आला नाही कधी तो !

## ४३ : घोट विषाचा की अमृताचा ?

चार-पाच महिन्यांनी प्लेगचे मान कमी झाले व डॉ. बालैंटाईन राहुरीस परत आले. ख्रिस्ती झाल्यापासून टिळक उन्हाळ्यात महाबळेश्वरला जाऊन तेथे युरोपियन व अमेरिकन मिशनरींना मराठी शिकवीत असत. ह्या शिकविण्याचे त्यांना बरेच उत्पन्न होत असे. वर्षातून तीन महिने महाबळेश्वरला व नऊ महिने नगरला ते असत. डॉ. बालैंटाईन राहुरीला आले त्या वेळी टिळकांची महाबळेश्वरला जाण्याची तयारीच होती. ह्या वर्षी त्यांच्याबरोबर मी व दत्तू होतो.

टिळकांनी वाईस आपल्या आईला– म्हणजे आशम्माबाईंना– आम्ही येतो म्हणून लिहिले व त्यांनाही आमच्याबरोबर महाबळेश्वरला येण्याचे आमंत्रण दिले. आशम्माबाईंनी ते आमंत्रण ताबडतोब स्वीकारले. वाईस त्यांना कोणी म्हणत " तुम्ही जाऊ नका. टिळकांच्या बायकोचे व तुमचे पटणार नाही. पटले नाही तर तुम्ही काय कराल ?"

आशम्माबाई त्यांना म्हणाल्या, " नाही पटले तर मी परत येईन.

मी तेथे राहिलेच पाहिजे असा माझा काही त्यांच्याशी करार झालेला नाही."

पुण्यास रे. गणपतराव मल्हार ह्यांच्याही घरी टिळकांचे पत्र गेले होते. मथुराबाई मल्हार ह्यांना सोवळ्याओवळ्याची सर्व चांगली माहिती होती. त्यांचे घर पाहून व ती टापटीप, स्वच्छता वगैरे पाहून मी थक्कच झाले. मथुराबाईंनी मजकरता एका बाजूला सर्व काही निराळा संसार मांडून ठेवला होता. दोन दिवस आम्ही पुण्यास मोठ्या सुखात काढले.

वाईसही आमची व्यवस्था होती. दत्तूसाठी पेढे, आंबे, माझ्यासाठी निराळी स्वयंपाकाची सोय. येथेही मी आपल्या हातांनी स्वयंपाक केला व आम्ही सगळे जेवलो. नंतर आक्कम्माबाईंनी आपले घर आवरून सर्व बांधाबांध केली व आम्ही बैलगाडीने महाबळेश्वरला जायला निघालो.

आम्ही सर्वांनी टोचून घेतलेले होते, तरी बैलगाडीतील प्रवाशांना प्लेगचे भय अधिक असल्याने त्यांना मध्येच दहा दिवस दांडेगरास झोपड्यात मुक्काम करावा लागत असे. आम्हीही तेथे मुक्काम केला. माझे सोवळे, माझे देव, हे सारे बरोबरच होते.

आसपासच्या झोपड्यांतील लोक आश्चर्य करीत, की हे आहे तरी कसले कुटुंब ? हा मनुष्य दिसतो आहे मुसलमान, बरोबरची म्हातारी दिसते आहे ख्रिस्ती, ही तरणी बाई दिसते ब्राह्मण, आणि पोरगा तर गळ्यात जानवे घालून फिरतो आहे.

येथे पाण्याची अडचण भासू लागली. पाणी दूर होते. पखालीने पाणी मिळे, पण ते कातड्याच्या पखालीत आणि मुसलमानाने आणलेले ! मी स्वतः कमरेवर कळशी घेऊन आमच्यापुरते पाणी आणी. बाकी पाणी पखालीचे चालू लागले.

एक दिवस काही अन्न उरले होते. ते एका मांगणीला मी देऊ लागले.

ती ते घेईना. ती म्हणे, " बाई, आमी किरिस्ती लोकांच्या हातचे खात नाही."

स्मृ... १७

मला ते ऐकून फारच वाईट वाटले. मी ढसढसा रडले. टिळक, आशम्माबाई यांनी माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण माझे आपले तेच, "हेही लोक माझ्या हातचे घेत नाहीत तर माझे नातलग माझी सावलीही घेणार नाहीत !"

आशम्माबाई म्हणाल्या, "लक्ष्मीबाई, तुम्ही काही रडू नका. सगळे काही होईल. तुमचे नातलग तुमच्याकडे येतील, तुम्ही त्यांच्याकडे जाल. पण तुम्ही दोन दिवस सोसले पाहिजे."

ह्या गोड बोलण्याला उत्तर म्हणजे माझे त्यांना तडातड बोलणे. पण ती माऊली बिचारी चांगल्या स्वभावाची म्हणून तिने माझे सगळे बोलणे निमूटपणे ऐकून घेतले.

दहा दिवस भरल्यावर जाण्याची परवानगी मिळाली. पुन्हा बैल-गाड्या जुंपून संसारासह व पाव्हण्या-रावळ्यांसह निघून महाबळेश्वरी येऊन पोचलो.

टिळकांचे नोकर-चाकर, घरवाला वगैरे कधी बदलत नसत. ते महाबळेश्वरला येऊ लागल्यापासून सैदू मिस्तरींचे घर घेत. ह्याही वेळेस त्याला त्यांनी आधी पत्र लिहून ठेवले होते. त्याने सर्व तयारी अगदी जय्यत करून ठेवली होती. बाडबिछाना, दूध, तूप, दही, लोणी, भाजी-पाला, सरपण, इतकेच नाही, तर ह्या दाढीदीक्षितांनी पाणीसुद्धा भरून ठेवले होते ! काय तो स्वयंपाकच करायचा राहिला होता.

दहाच्या सुमाराला आम्ही महाबळेश्वरास बिऱ्हाडी जाऊन पोचलो. घरवाल्याने घर उघडून दिले. सामानसुमान गाड्यातून काढले. जो तो आपल्या कामाला लागला. दत्तू खेळण्यास, टिळक लिहिण्यास, आशम्मा-बाई ड्रॉइंगरूम सजविण्यास व मी स्वयंपाक करण्यास.

विहीर घरापासून बाहेर चार हातांवर सडकेच्या बाजूलाच होती. पाण्याची सोय पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटले. मी पाणी शेंदले. गार पाणी, थंड हवा व गोड अन्न, मनही शांत, तेव्हा आम्ही मोठ्या आनंदाने जेवायला बसलो. टिळक व आशम्माबाई एका पंक्तीला बसली. त्यांना मी वाढून दिले व मग मी आणि दत्तू त्यांच्यासमोर दुसऱ्या पंक्तीला बसलो.

बोलताना मी विहिरीबद्दल माझा आनंद व्यक्त केला. हा विषय निघेपर्यंत आमचे जेवण मोठ्या सुखासमाधानाने चालले होते. पण पाण्याचा विषय निघताच डोळ्याला पाणी व अन्नात विष अशी स्थिती झाली.

टिळक म्हणाले, "तू स्वत: पाणी शेंदून आणायचं नाही. ते मला शोभत नाही. मी ब्राह्मण पाण्याला ठेवतो."

माझ्या पोटात धस्स झाले. नगरचा अनुभव अगदी ताजा होता. त्या बिचाऱ्या ब्राह्मणाला माझ्यासाठी भुर्दंड भरावा लागून जातीबाहेर पडायची वेळ आली होती. आमचा थोडासा वाद झाला, पण अगदीच थोडा. पुढे सर्व जेवण संपेपर्यंत दोन्हीकडे गुपचिप.

सभोवताली सारी वस्ती धावड मुसलमानांची होती. 'आम्ही जातीचे ब्राह्मण। आमचे सोयरे मुसलमान।' अशी आमची स्थिती होती. उद्या ब्राह्मण कोठला मिळायला! आणि टिळकांना तेथे ब्राह्मण शोधीत बसायला वेळ तरी कोठे होता? पहाटे सहापासून संध्याकाळी सहापर्यंत त्यांना काम होते.

तरी मला अजून आधार वाटत होता. मजजवळ अजून दोन घागरी भरलेल्या होत्या. रात्रीची जेवणे झाली. दीड घागर पाणी उरले. रात्री माझी झोप पाणी शोधण्यास गेली ती पहाटे चारला घरी आली. जागी झाल्यावर पुढे पाण्याची दीड घागर दिसू लागली. सारा दिवस मोठ्या कृपणासारखे वागूनही संध्याकाळला दत्तूला व मला पुरेल इतकेच पाणी राहिले. आता मात्र माझी पांचावर धारण बसली. डोळ्यांचे पाणी पुष्कळ वाहत होते, पण त्याचा काय उपयोग?

टिळक म्हणत, "आज तू हे पाणी पी. मी उद्यापासून दुसरी व्यवस्था करतो."

मी म्हणे, "एखादा प्याले म्हणजे प्याले. मग काय राहिले?"

नेहमीप्रमाणे जेवण्यास बसले. कंठ दाटून येतच होता. कसेतरी अर्धे जेवण उरकले. घास घशात अडकला.

टिळक म्हणाले, "शरीर रक्षी तो धर्म. शिवाय पाणी चार हात वाहिले की त्याचा विटाळ जातो, असे हिंदुधर्म सांगतो. तू हे पाणी पी."

मी मुसलमानाच्या हातचे पाणी तोंडाजवळ नेले. हो-नाही करता करता डोळे घट्ट मिटून एक घोट घेतला. तो आत फार वेळ घुटमळलाच नाही. ताबडतोब पोटात होते नव्हते ते घेऊन जोराने बाहेर आला. माझ्या वांतीमुळे सर्वांची जेवणे तेथेच आटोपली.

मी तेथेच पडले. मला सडकून ताप भरला. टिळकांना आता आपल्या हट्टाचे फार वाईट वाटू लागले. हिला समोरून पाणी आणू दिले असते तर काही बिघडत नव्हते, असे आशम्माबाई त्यांना म्हणू लागल्या व त्यांनीही आपली चूक कबूल केली.

## ४४ : परिवर्तन

मी अंथरुणावर पडल्या पडल्या उशीला न्हाऊ घालीत होते. तीन वाजेपर्यंत मजकडे कोणी आले नाही. टिळकांना आता फार चोरट्या-सारखे झाले होते. मी मनातल्या मनात टाहो फोडून देवाला म्हणत होते, देवा, आज मी हे काय केले ? आज माझे पूर्वज मला स्वर्गात काय म्हणत असतील ? ह्या पापाचे मला कोणते प्रायश्चित्त भोगावे लागणार आहे ? अशा एक ना दोन, हजारो विचारांनी माझे मन व्यग्र होऊन गेले होते.

त्या वेळी माझे डोळे मिटलेले होते, परंतु एकदम प्रकाश पडल्या-सारखा मला भास झाला. प्रकाश पडला म्हणजे मी काही अलंकारिक भाषेत सांगत नाही. खरोखरच सूर्यप्रकाशासारखा चक्क प्रकाश पडल्या-सारखा मला भास झाला. माझी तळमळ नाहीशी झाली व पूर्वी कधी डोक्यात आले नव्हते असे विचार आता माझ्या डोक्यात थैमान घालू लागले.

टिळकांचा देवावर फार भाव. ते एकसारखे माझ्यासाठी प्रार्थना करीत होते. दत्तूला घरातील ह्या भीषण शांततेचा अर्थ कळेना. पण

थोड्या वेळाने त्याने आपला धंदा– म्हणजे खेळण्याचा– सुरू केला व तो आम्हाला पूर्णपणे विसरला.

टिळकांच्या प्रार्थनेला उत्तर आले. माझ्या मनाला जखडून टाकणाऱ्या जातिभेदाच्या साखळ्या खळाखळ तुटून पडल्या. एका चुटकीसरसे हे झाले. त्या वेळेस माझ्या मनात आलेले विचार इतके स्पष्ट होते, की ते मला आता जवळजवळ आले तसे येथे टिपून काढता येतील.

देवाने जाती केल्या का माणसाने ? देवाने केल्या असत्या तर माणसामाणसात काही फरक ठेवला असता ना ? जन्म-मरण, हाड-मांस, बुद्धी, बरे-वाईट जाणण्याचे सामर्थ्य, सुख-दुःख ही सर्व सर्व मानवजातीला सारखीच आहेत ना ? आणि मनुष्यप्राण्यात जर देवाने जाती केल्या तर त्याच देवाने प्राणिसृष्टीत का निरनिराळ्या जाती केल्या नाहीत ? ब्राह्मण बैल, शूद्र बैल, वैश्य कावळा, अतिशूद्र कावळा, असले भेद पशुपक्ष्यांत कोठे आहेत ? ब्राह्मण व शूद्र ह्यांत कोठे फरक आहे ? शूद्राच्या शिरी नंदीचे शिंग नाही की ब्राह्मणाच्या कपाळी महादेवाचे लिंग नाही. स्त्री व पुरुष ह्या दोन जाती निरनिराळ्या असल्या तर आहेत.

बस. माझा जातिभेद गेला. आजपासून मी कोणाला हलके मानणार नाही. ह्यापुढे मला सर्व सारखे आहेत. आजपासून माझ्यातला जातिभेद समूळ गेला. ह्यापुढे मी सर्वांच्या हातचे खाईन, सर्वांच्या हातचे पिईन.

माझी ही विचारमाला सुरू होतीच. इतक्यात आशम्माबाई येऊन माझी समजूत करू लागल्या. "तुम्ही आता उठा, पाणी भरा व स्वयंपाकाला लागा" असे त्या म्हणाल्या.

मी म्हणाले, "मी पाणी आणणार नाही, स्वयंपाक करणार नाही. तुम्ही स्वयंपाक करा. मी जेवीन." त्यांना माझ्या बोलण्याचा आशय कळेना. त्यांनी जाऊन टिळकांना सांगितले.

टिळक येऊन तेही मला पाणी आणून स्वयंपाक करण्याविषयी सांगू लागले. पण मी त्यांना स्पष्ट सांगितले, की मी स्वयंपाक करणार नाही.

ते म्हणाले, " तू व्यर्थ स्वतःला त्रास करून घेतेस. मी तुला ह्यापुढे पाण्याबद्दल किंवा स्वयंपाकाबद्दल एक अवाक्षर बोलणार नाही. तू आपली तुला वाटेल तशी वाग. "

पण माझे म्हणणे अगदी निश्चयाचे होते. मी त्यांना म्हटले, " मी अगदी मनापासून सांगते आहे. रागाने सांगत नाही. "

टिळकांची जेव्हा खात्री पटली, की मी खरोखरच मनापासून सांगत आहे तेव्हा त्यांना फार आनंद झाला. ते म्हणाले, " थँक गॉड. " तेथेच टिळकांनी प्रार्थना केली.

आशम्माबाईंनी स्वयंपाक केला व आम्ही सर्व मोठ्या आनंदाने जेवलो. परजातीच्या हातचे अन्न खाण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग होता. पाणी प्याले तेव्हा माझी जी स्थिती झाली ती अन्नसेवनाने झाली नाही.

आशम्माबाई काही दिवस राहून परत वाईस आपल्या कामावर गेल्या. त्या गेल्या तेव्हा मला फार वाईट वाटले. खऱ्या सासूबाईंच्या हाताखाली मी कधी वागले नाही. कारण माझ्या लग्नाच्या आधीच त्या गेल्या होत्या. राजनांदगावाला एक सासू मिळाली होती. तिने माझी कशी परवड केली ते मी मागे लिहिलेच आहे. पण आशम्माबाई मात्र सासू म्हणण्यापेक्षा आई म्हणणेच अधिक शोभेल.

टिळकांचा संसार पुन्हा नव्याने सुरू झाला. आता खाण्यापिण्याचा प्रश्नच राहिला नव्हता. मी जरी ख्रिस्ती झाले नव्हते, किंवा ख्रिस्ती होण्याचा माझा बेतही नव्हता, तरी माझ्यातला जातिभेद सर्व लयाला गेला. त्यामुळे आमचे दोन निरनिराळे संसार जे इतके दिवस होते ते जाऊन दोघांचा एक संसार झाला. माझ्या मूर्तिपूजेला टिळक अडथळा करीत नसत व त्यांच्या प्रार्थनेच्या वेळी मी तेथे जाऊन नियमाने बसत असे.

नवीन संसार सुरू झाला तेव्हा पैसे पाहिजेत म्हणून टिळक मिळेल तेवढे काम घेऊ लागले. त्यांना दर तासाला वीस-पंचवीस रुपये मिळत व आठ-नऊ तास काम ते सहज करीत.

टिळकांची हौस कधी लाजली नाही, कधी एका बाजूला बसली

नाही. पैसे असले, की लगेच चहूकडे ती बागडायला लागे. त्यांनी लग्नाच्या वेळी फिकिरीची माळ माझ्या गळ्यात घातली होती व मी बेफिकिरीची माळ त्यांच्या गळ्यात घातली होती. ज्याप्रमाणे मुं तला पैसा मुंबईत राहतो किंवा लंकेतल्या सोन्याच्या विटा हिंदुस्थानात येत नाहीत त्याप्रमाणे महाबळेश्वरात मिळविलेला पैसा महाबळेश्वरातच खलास करण्याची टिळकांच्या वृत्तीत पूर्वचिन्हे दिसू लागली.

बाजार करण्याची त्यांना एखादवेळेस फार हौस वाटे. आपल्या-सारखे व्यवहारज्ञ कोणी नाही असे त्यांना वाटे, व ह्यांना कोणीही फस-वावे इतका व्यवहारज्ञानाचा ह्यांचे ठायी अभाव आहे, असे मला वाटे. मी खरेदी चांगली करतो, मला कोणी फसवीत नाही असे ते म्हणत तर तुम्हाला खरेदी मुळीच करता येत नाही. तुम्हाला सारे फसवितात असे मी म्हणे.

बायको-मुलगा आलेली. पैसाही हातात मुबलक खेळतो आहे. तेव्हा टिळकांनी खरेदी करण्यास सुरुवात केली. आधी संसारोपयोगी सामान आले. कपबशा, चमचे, काटे, सुऱ्या, शुगर पॉट, मिल्क पॉट, बटर पॉट, कैटल्या, सूट प्लेटी, डिनर प्लेटी, फ्लॉवर पॉट, तोंड धुण्याच्या गिंडया ! सर्व थाट नव्या तऱ्हेचा ! तसेच पुष्कळसे वेताचे सामान त्यांनी घेतले.

मला कोणत्या सामानाचा काय उपयोग करायचा हेही ठाऊक नव्हते व त्यांनीही त्या गोष्टींचा विचार केला नाही. मला ही विचित्र भांडी दृष्टीसमोर आवडत नसत.

मी म्हणे, " ही काच कशाला घरात भरून ठेवता ?"

पण त्यांना माझ्या बोलण्याचा राग येई. तुला 'ॲप्रिसिएशन' नाही असे ते म्हणत.

संसार मांडल्यानंतर त्यांची दृष्टी कपडयांकडे वळली. स्वतःला नवीन चार सूट केले. मलाही दोन गाऊन केले.

मी म्हणे, " अहो, हे काय करता ? दोन लुगडी का नाही आणली यापेक्षा ?"

" तुला सायकॉलॉजी कळत नाही. मनुष्याने काही हौसेने केले,

की त्या वेळेस तरी त्याचा हिरमोड करू नये. तुझे-माझे पटत नाही ते ह्यामुळेच. कधी मी काही केले आहे आणि ते तुला पसंत पडले आहे असे व्हायचेच नाही. "

प्रत्येकाला बुटाचे तीन तीन जोड करविले. माझ्या एकटीच्या बुटाचे बिल चोवीस रुपये झाले ! मी जन्मात कधी साधा जोडाही पायात घातलेला नव्हता. दोन-तीन लेक्चरे 'सायकॉलॉजी 'बद्दल व 'ॲप्रिसिएशन 'बद्दल मिळाली असूनही मी म्हटलेच, " काय हा व्यर्थ खर्च ! ह्यापेक्षा घरात सोने आणले असते तर ते अडीअडचणीला उपयोगी तरी पडले असते. "

मला तिसरे लेक्चर मिळाले. त्याचा गोषवारा :–

" तुझ्या मूर्खपणाची कमाल आहे. सोने अंगावर घालून उन्हात काट्यात अनवाणी फिरणे बरे, का ते नसून बूट छत्री ह्यांचा उपयोग करून शरीरताप कमी करणे बरे ?" वगैरे.

असो. निघेपर्यंत मिळालेला सर्व पैसा खर्च झाला होता. आणलेल्या सर्व सामानाचे निघताना सैदू मिस्त्रीला दान करण्यात आले. त्याचे घर पुढच्या वर्षासाठी आयते 'फर्निश्ड्' झाले, व 'फर्निश्ड्' म्हणून पुढच्या खेपेपासून आम्हाला त्या घराचे भाडेही अधिक द्यावे लागले हे निराळे !

असो. महाबळेश्वरचे दिवस फार सुखाचे गेले, गमतीचे गेले. रोटचा कशा करायच्या ह्याचे शिक्षण मी तेथे घेतले. कोणाकडून तरी फुगवण्यासाठी हाण्याचा पाला आणून ठेवला होता. मला पोटदुखीची व्यथा फार वर्षांपासून आहे. एक दिवस माझे दुखू लागले. टिळकांना पहाटेच कामाला जायचे. शेजारपाजार उपयोगी पडण्यासारखा कोणाचा नव्हता. त्यांनी विचारले, " तुला काय देऊ ?"

मी कपाटातून सोनामुखीचा पाला घेऊन त्याचा काढा करून द्या म्हणून सांगितले. त्यांनी स्वतः चहा करून घेतला व मला काढा करून दिला. नंतर ते कामाला गेले.

इकडे माझे पोट फुगायला लागले. काय करावे काही सुचेना. जीव कासावीस होऊ लागला. दुपार होऊ लागली तसतसा प्राण जाईल असे वाटू लागले. दत्तू व मी असे दोघेच घरी !

शेवटी दत्तू म्हणाला, "मी डॉक्टर जुलिया बिसेल ह्यांना घेऊन येतो."

तो कधी कधी टिळकांबरोबर जात असे. त्यामुळे त्याला डॉ. बिसेल ह्यांचे घर ठाऊक होते. त्याने जाऊन डॉ. बिसेल ह्यांना आणले.

डॉ. जुलियाबाईंनी माझ्या खाण्यापिण्याची चौकशी केली. सोनामुखीने पोट अधिक कसे दुखेल? त्या मोठ्या विचारात पडल्या. शेवटी उठून स्वयंपाकघरात गेल्या. चुलीजवळ सगळा पसारा पडला होता. तेथेच चहाचे व काढ्याचे भांडे होते. त्यांनी काढ्याचे भांडे मजकडे आणले व म्हटले, "अहो लक्ष्मीबाई, तुमच्या पोटात फुगवण गेले आहे. हा हाफचा पाला! ही सोनामुखी नाही!"

त्यांच्या औषधाने मला ताबडतोब गुण आला.

आम्ही महाबळेश्वर सोडले तेव्हा सर्व सामान अगदी खुटखुटीत व बेताबाताचे होते. दोन ट्रंका, दोन ब्यागा व एक बिछाना. जाताना नुसत्या सामानाला एक वेगळी बैलगाडी लागली होती तर येताना एका टांग्यात आम्ही सर्व व आमचे सर्व सामान अगदी व्यवस्थितपणे मावले! महाबळेश्वरची हवा मानवली असली तर फक्त शरीराला व मनालाच, सामानाला नाही, इतके ते रोडावले होते.

वाईस आशम्माबाई आमची वाटच पाहत होत्या. त्यांनी आमची सर्व तयारी अगदी जय्यत व्यवस्था करून ठेवली होती. तसा आदरातिथ्यात त्यांचा नेहमीच हातखंडा होता. टापटीप, वगैरे सगळे जेथल्या तेथे असे. आमचे सामान पाहून त्यांना आश्चर्य वाटले. मी कुरकूर केली.

टिळक म्हणाले, "ह्या सामानाला जेवढे भाडे लागले असते तेवढ्यात नगरास मला नवे सामान आणता येईल."

त्यांचेही म्हणणे बरोबर होते. पण चूक जी होती ती कोठे व कोणाची हे मात्र कळत नाही.

वाईच्या गणपतीपुढे ख्रिस्ती धर्मावर टिळकांचे व्याख्यान झाले. फार गर्दी जमली होती. नंतर पुष्कळ प्रश्नोत्तरे झाली. टिळकांचा हजरजबाबीपणा अशा वेळी त्यांच्या कसा उपयोगी पडे ह्याचे एक उदाहरण सांगते.

तेथे एकाने त्यांना विचारले, " काय हो, तुमच्यात बाप तीस व मा एक असते, नाही का ?"

ही बाप्तिस्मा म्हणजे ख्रिस्ती धर्माच्या दीक्षेच्या विधीच्या शब्दावर कोटी होती. असले काही वात्रट व अश्लील प्रश्न विचारले म्हणजे इतर ख्रिस्ती उपदेशक गांगरून जात. पण टिळकांनी तेथे त्यांना विचारण्यात आलेल्या प्रत्येक खऱ्याखोटया शंकेला उत्तर दिले होते.

टिळक म्हणाले, " ख्रिस्ती माणसालाच का, सर्व मनुष्यमात्राला तीस बाप असून ह्या बापांची एक आई म्हणजे तुमची आमची आजी आहे ! मोजा तीस बाप.

पंच महाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश)
पंच प्राण (प्राण, अपान, व्यान, उदान व समान)
पंच ज्ञानेंद्रिये (जिव्हा, कर्ण, नेत्र, नासिका व त्वचा)
पंच कर्मेन्द्रिये (हात, पाय वगैरे)
चार अंतःकरणे (मन, बुद्धी, अहंकार व चित्त)
एक आत्मा.

झाले हे पंचवीस, आता तुमच्याच शास्त्र्यांनी सांगितलेले, " जनिता चोपनेता च यश्च विद्यां प्रयच्छति । अन्नदाता भयत्राता पंचैते पितरः स्मृताः– " हे पाच बाप यात आणखी मिळवा. झाले ना तीस बाप ? पण ह्या सर्वांची जननी ईश्वरी कृपा आहे. म्हणून ही ह्या तीस बापांची आई व तुमची-आमची आजी आहे."

शंकित गार झाला ! बाप्तिस्म्याचा टिळकांचा हा अर्थ मुळीच नव्हता, पण वाईच्या उपदेशकांच्या मागची ही एक कुटाळकी टिळकांनी सदाची बंद केली. एक-दोन दिवसांनी आम्ही वाई सोडली.

## ४५ : हौशी

आम्ही बोलत विचार करीत बेत ठरवीत वाठारजवळ आलो. वाठार तीन-चार मैल राहिले. तेथे एक पूल आहे. खाली पाणी असून

तेथे बैलगाड्या, तांगे सुटतात. जवळचे खेडे पिपुरडे म्हणून ओळखले जाते.

आम्ही तेथे उतरून फराळाचे सोडले. पोटभर फराळ केल्यावर टिळक दत्तूला घेऊन इकडे-तिकडे फिरू लागले. माझ्या मनात नगरचे पुढचे बेत येत जात होते. मध्येच वाटेने पुण्यास दोन दिवस मुक्काम करण्याचे ठरले होते.

माझ्यापुढे अन्नाच्या दोन-तीन टोपल्या पाहून हळूहळू भिकारी जमू लागले. मीही धोरणी. नगद माल बाजूला काढून ठेवून बाकीच्या अन्नाचा मी दानधर्म सुरू केला. त्या भिकाऱ्यांत काही मुली होत्या. माझ्या स्वभावाप्रमाणे मला बोलायला पुष्कळ हवे असते. मी त्यांच्याशी बोलत होते. त्यांच्या घरची माहिती विचारीत होते.

एकीला मी विचारले, " का ग, तू भीक का मागतेस ?"

ती म्हणाली, " बाई, मला कोणी नाही. "

" चल, येतेस का माझ्याबरोबर ?"

आमंत्रण मिळताच ती तयार झाली. जेवढी भीक जमली होती तेवढी सोबतिणीला देऊन टाकून व तिच्या कानात काही सांगून ती मजजवळ येऊन बसली.

" तू रडणार नाहीस ना ?"

" नाही. "

" तर अंग धू. तुझे धोतर दे टाकून नि हे लुगडे नेस. ही चोळी घे. "

तिने माझ्या सांगण्याप्रमाणे केल्यावर तिच्यात कितीतरी फरक दिसू लागला. मुलगी काळीसावळी पण नाकडोळे नीटस असल्याने ही पाच मिनिटांपूर्वी येथेच भीक मागत असेल असे कोणी म्हटले नसते. तिचे वय बारा-तेरा वर्षांचे असेल.

" तुम्हाला मी काय म्हणत जाऊ ?"

" माझे नाव लक्ष्मी आहे. माझा मुलगा मला बाई म्हणतो. तुला वाटेल ते मला म्हण. "

तीही मला बाई म्हणू लागली.

मी ख्रिस्ती नव्हते तरी जवळच टिळकांचे बायबल पडले होते ते हातात घेऊन मनातल्या मनात प्रार्थना केली की, देवा, मी हे काय करीत आहे ते बरोबर आहे किंवा नाही तू मला सांग. नंतर मी बायबल उघडून एके ठिकाणी ते वाचले. तो मजकूर असा होता – " जे (झाड) पाण्याच्या ओघाजवळ लाविले असता आपले फल सुकाळी देते व त्याचे पान कोमत नाही. "

माझ्या मनात जर काही शंकाकुशंका आल्या असतील तर त्या ह्या वाक्याने नाहीशा झाल्या. माझी खात्री झाली, की देवच मला हे करायला सांगत आहे. मुलीच्या जातीसंबंधाने मी चौकशी केली नाही. कारण माझ्या जातिभेद व सोवळेओवळे महाबळेश्वरीच हवा खात पडले होते.

" तुझे नाव काय ग ?"

" माझे नाव नकोशी. "

" तू मला हवेशी आहेस. तुला मी हौशी म्हणत जाईन. " हा नामकरण प्रसंग होईपर्यंत टिळक दत्तूला घेऊन परत आले. आम्ही दोघी मायलेकी बोलत बसलो होतो. त्या बाप-लेकांना वाटले, ही कोणी वाटसरू असेल.

पण माझेच लुगडे तिच्या अंगावर पाहून व बोलण्याच्या धोरणा-वरून टिळकांनी विचारले, " ही कोण ?"

मी त्यांना " ही मुलगी आहे," म्हणून सांगितले.

" ते समजले. पण ही मुलगी कोणाची ?"

" आपली. "

" आपली ? आपली म्हणजे काय ? हा काय गोंधळ आहे ?"

" हिला कोणी नाही. दुष्काळाने हिची फार वाईट स्थिती झाली आहे. अशीच भीक मागून ही कोणाच्या तरी वळचणीला पडते. तिची इच्छा आपल्याबरोबर येण्याची आहे. मी तिला घेतली."

" बरं, काही हरकत नाही. "

अर्थात ते अशा कामाला कधीच नाही म्हणाले नसते अशी माझी खात्री होती; दर वेळेस नसले तरी असल्या परोपकाराच्या कामात

आमचे दोघांचे नेहमी एकमत होत असे.

आम्ही पिपुरड्याहून निघालो. सामानसुमान तांग्यात ठेवले. आम्ही तांग्यात बसलो. पण मुलगी तांग्यात बसायला तयार होईना. ती तशीच तांग्याच्या मागे पळू लागली. आम्हाला फार वाईट वाटले. तांगा हळू हळू चालविला. जोडा खाली टाकला. तो ती पायांत घालीना. शेवटी अनवाणी तीन मैल तांग्यामागे पळत पळत ती आमच्याबरोबर स्टेशनपर्यंत आली. आम्ही स्टेशनात पाय टाकताच गाडी सुटल्याची घंटा झाली. टिळकांनी घाईघाईने सर्वांची तिकिटे काढली.

इतक्यात एक म्हातारा आला. हौशी त्याच्याकडे गेली व त्याच्याशी काही बोलू लागली. तो म्हणू लागला, " माझी मुलगी तुम्ही नेता तर मला काही पैसे द्या."

टिळक म्हणाले, " मी काही माणसे खरेदी करायला आलो नाही. तू आपली मुलगी घेऊन जा. "

तो म्हणाला, " मला हिला परत नेता यायचे नाही. हिने तुमच्या हातचे खाल्ले, तुमचे कपडे ही नेसली. आता मला हिला परत कशी घेता येईल ?"

टिळक म्हणाले, " नसली घेता येत तर राहू दे. आम्ही चाललो."

इतक्यात गाडी आली व हौशी बापाला सोडून आमच्या डब्यात येऊन बसली. गाडी चालू झाल्यावर मी तिला म्हटले,

" का ग तू मला खोटे सांगितलेस ?"

" मी त्या मुलीला सांगून बापाला भेटायला बोलविले. त्याने उगाच पैसे मागितले. मी सांगितले नाही. मला सावत्र आई आहे. तिची लहान लहान मुले आहेत. गावात महागाई आहे व माझे फार हाल होतात. म्हणून मी खोटे बोलले. "

" बरं, काही हरकत नाही. तू दुष्काळी मुलगी आहेस. एकदम फार खा-खा करू नको. आरंभी थोडे थोडे खा."

मुलगी फारच चांगली होती. तिने माझे बोलणे ध्यानात ठेवावे व त्याप्रमाणे वागावे.

गाडी चालली तशी माझी विचारमालिकाही वाढत होती. ही

मुलगी घेतली खरी, पण ही कशी वागेल, खरकटे अंगाला लावील का घरात कोठे पिंकी टाकील, का थुंकेल ? –एक ना दोन, हजारो विचारांनी मन व्यग्र झाले. एकदा मनात आले, की कोठे बोर्डिंगात हिला टाकून द्यावे. पुन्हा तेच मन सांगे, पुण्याच्या स्टेशनवर द्यावी हिला सोडून. पण मग वाटे, तसे काही केले तर हिचा केवढा विश्वासघात केल्यासारखे होईल ! ही माझी म्हणून माझ्यावर विसंबून मजबरोबर आली, माझ्या मुलाप्रमाणे मला बाई म्हणून हाक मारू लागली आणि हिला दूर लोटू ? शेवटी विचार ठाम ठरला की, काय होईल ते होवो. हिला दूर लोटायचे नाही.

ठरल्याप्रमाणे आम्ही पुण्यास दोन दिवस मुक्कामाला म्हणून एका गृहस्थांच्या घरी येऊन् उतरलो. रात्रीपर्यंत सर्व ठीक होते; पण निजायच्या वेळेस त्या रात्री माझी झोप उडण्याचे कारण घडले.

सद्गृहस्थांनी व बाईसाहेबांनी मला सांगितले की, "मुलीला घरात नाही घेता येणार."

टिळकांना हे ठाऊक नव्हते व मीही सांगितले नाही. टिळक संतापी व एखाद वेळेस त्यांच्या कानावर हा दुजाभाव गेला तर ते काय बोलून जातील ह्याची मला खात्री नसल्याने मी ते मनातल्या मनात ठेवले. मी आपली दोन लुगडी तिला देऊन बाहेर निजायला सांगितले व मी निजले. निजले म्हणते नुसती पडले. मला झोप आली नाही.

मला वाटे, दत्तूला जर कोणी असे बाहेर निजविले असते तर मी ह्या घरात पाणी तरी प्यायला राहिले असते का ? दुसऱ्याचे मूल विश्वासाने आपले म्हणून आपल्याबरोबर आलेले. त्याला असे बाहेर टाकणे कसे होते माझ्या हातून ! दुसऱ्याचे मूल आपले म्हणून सांभाळता येत नाही तर ते घ्यायचे तरी होते कशाला ? पण मग वाटे, हे घर दुसऱ्याचे. आपण परस्वाधीन. येथे हे विचार मनात आणण्यात काय अर्थ आहे ? पुन्हा वाटे, हे घरही ख्रिस्ती कुटुंबाचेच ना ? मग ह्यांनी असा दुजाभाव का बाळगावा ?

मी निजले होते त्याच खोलीच्या बाहेर हौशी निजली होती. मी मी वरचेवर खिडकीत उभी राहून तिच्याकडे डोकावून पाही. तिच्या

मनाला काहीच त्रास होत नव्हता. ती अगदी शांतपणे झोपी गेली होती. मला मात्र ती रात्र फारच फार लांब वाटत होती. काही केल्या रात्र सरेना व दिवस उजाडेना.

मी आपल्या मनाशी ठरविले, सकाळीच आपली दोन्ही मुले घेऊन नगरला निघून जायचे. टिळक काही नाही म्हणणार नाहीत. रात्रीचा प्रकार मात्र त्यांना कळवायचा नाही. नाहीतर ते त्यांना काहीतरी बोलून जायचे.

मी सकाळी चहाच्या वेळी टिळकांना म्हटले, "मी मुलांना घेऊन पुढे जाते. तुम्ही मागून या."

टिळकांनी ते ताबडतोब कबूल केले. आम्हीबरोबर थोडेसेच पैसे आणले होते. कारण मिळालेले सगळे महाबळेश्वरास कपडेवाल्याकडे, बूटवाल्याकडे वगैरे ठेवून दिले होते. आता आमच्या भाड्यापुरते व वर एक रुपया इतकाच खजिना आमच्याजवळ होता. मी टिळकांचे भाडे ठेवले व आमचे भाडे व वरचा एक रुपया घेऊन मुलांसह नगरच्या गाडीत बसले.

हौशीच्या हातांत बांगड्या नव्हत्या. ती फार मागे लागली, की बाई मला बांगड्या भरा. मी तो रुपया देऊन तिला मोलकरणीबरोबर बाजारात पाठविली. हौशी बांगड्या भरून हसत हसत घरी आली व मोठ्या कौतुकाने त्या मला दाखवू लागली.

" अग हौशे, इतक्या हलक्या बांगड्या का भरल्यास ?"

" मग आपल्या खर्चाला पैसे नको का ग ? "

मला तिचे मोठे कौतुक वाटले. पण हौशीने ओटीत ठेवलेले सर्व पैसे वाटेने कोठे पडले होते ! पैसे इकडेतिकडे चाचपून ते गेले अशी खात्री होताच ती ओक्साबोक्शी रडू लागली.

मला वाटले, हिने पैसे हरवले त्याऐवजी चांगल्या बांगड्या भरल्या असत्या तर बरे झाले असते. पैशांबद्दल मला वाईट वाटले नाही. कारण टिळक येताच त्यांनी 'आगाऊ' बँकेतून पैसे आणलेच असते. ही 'आगाऊ' बँक डॉक्टर ह्यूमच्या बंगल्यात होती व बहुतेक दर महिन्याला तिच्यातून पैसे येत असत. टिळक दुसऱ्या दिवशी येताच त्यांनी पंधरा रुपये आगाऊ आणले.

टिळकांची बहुतेक माणसे ठरलेली होती. एक न्हावी, एक धोबी, एक शिंपी. तशीच दुकानेही कधी त्यांनी बदलली नाहीत. आपल्याला कधी कोणी फसवीत नाही अशी त्यांची अगदी खात्री होती. आम्ही महाबळेश्वराहून उतरलो तेव्हा अशाच एका नेहमीच्या कापडाच्या दुकानातून बरेचसे कापड टिळकांच्या नावावर उधार आणले होते. हा हिशोब शेटजींनी टिळकांना दाखवून हळूच पैशाची गोष्ट काढली. टिळकांनी पैसे पाठवून देतो म्हणून सांगितले.

घरी येऊन हौशीकरता मी काही उधार आणले का म्हणून विचारले. मी काहीच आणले नव्हते तेव्हा नोकराचा संशय आला. आम्ही आल्यापासून तो आलाच नव्हता. आजाराचे सोंग घेऊन घरी बसला होता. टिळक त्याच्या घरी गेले.

त्याला पश्चात्ताप झाला, तो रडला, टिळकांची त्याने क्षमा मागितली. झाले. टिळकांनी घरी येऊन माझी समजूत केली, " मी त्याला खूप धाक घातला आहे, की जर का पुन्हा असे केलेस तर तुरुंगातच घालीन ! पुन्हा माझ्या कानांवर असे काही आले तर याद राख, माझ्याशी गाठ आहे. "

" का, मी सांगत होते ना, ह्या लोकांवर इतका विश्वास टाकू नये म्हणून ! त्याला पोलीसच्या स्वाधीन का नाही केला ?"

" गरिबीमुळे त्याला मोह पडणे साहजिकच आहे. शिवाय त्याला आता मी चांगली धमकीही दिली आहे. पोलिसाच्या हवाली त्याला करून आपला कोणता फायदा आहे ? उगीच खर्च आणि वेळेचा व्यय. नाहीतर आपले पैसे कुठे खर्चतच नांहीत ? त्या बिचाऱ्याला कुठे उगीच गुंतवून टाकायचे ? शिवाय ते सारे विकून तो खाऊनही बसला आहे. मी त्याला चांगली धमकी दिली आहे."

मी त्याला धमकी दिली आहे हे पालुपद चालूच होते. पण हे उगीच दाखविण्यापुरते होते. खरी गोष्ट म्हणजे तो रडला आणि हे विरघळले.

आमची बाळूबाई धोबीण महाबळेश्वराहून आल्यानंतर पहिलीच खेप घेऊन गेली होती. ह्या खेपेत महाबळेश्वरातील सर्व नवे कपडे

धुण्याला दिले होते. ती आली एक दिवस रडत, ऊर बडवीत. तिच्या हातात एक शर्ट होता. "साहेब, माझे सारे गेले. सारी भांडी गेली. सारे सोने-नाणे गेले. त्यात तुमचे सारे कपडेही गेले."

आम्हाला सर्वांना फार वाईट वाटले. टिळकांना ती म्हणू लागली, "तुम्ही चला आणि माझी कोठे दाद लावा."

टिळक म्हणाले, "बाळूताई, आता ते सापडणार नाही. गेले सारे ते."

ती म्हणे, "तुमचे नुकसान मी भरून देईन."

तिला होता सारा एक रुपया पगार. त्यातून ती काय नुकसान भरून देणार ?

टिळक म्हणाले, "बाळूताई, तू सारा जन्म जरी फुकट काम करीत राहिलीस तरी हे पैसे फिटणार नाहीत. तू काही काळजी करू नको. माझे गेले त्याबरोबर तुझेही गेले आहे. आता पुढच्या महिन्यापासून तुला दोन रुपये पगार देऊ. जा. रडू नको."

आणि त्यानंतर पुढे पुन्हा पगार वाढेपर्यंत बाळूबाईला दोन रुपये पगार झाला.

## ४६ : कुळकर्णी

माझ्या आतापर्यंतच्या माहितीत जलालपूरसंबंधी यावी तितकी माहिती आलेली नाही. शहरातील लोकांची दृष्टी अधिक व्यापक बनते असे म्हणतात. पण माझे मत थोडे निराळे आहे. पुण्यास हौशीच्या बाबतीत मला त्या सद्‌गृहस्थांचा जो अनुभव आला तो लिहिता लिहिता जलालपूरच्या कुळकर्ण्यांची आठवण झाली व हा मजकूर जरी गेल्या भागात येऊन जायला हवा होता तरी तो त्या पुण्याच्या चित्राशेजारी

चांगला खुलून दिसेल म्हणून येथे देते.

खेड्याची राहणी फारच मजेची. सर्व गाव एक मोठे कुटुंबच बनते. प्रत्येक माणसाला गावातील प्रत्येकाबद्दल कुतूहल व काळजी, कळकळही वाटते. एकमेकांबद्दल आत्यंतिक सहानुभूती वाटत असल्याने जातिभेद तेथे भासमान होत नाही. वरिष्ठ जातीच्या सोवळ्या-ओवळ्यांमुळे कनिष्ठ जातीचा अपमान होत नाही की कनिष्ठ जातीं-बद्दल वरिष्ठ जातीच्यांना तुच्छपणा वाटत नाही. जातिभेदामुळे ह्या ग्रामकुटुंबांत कधीच आदळआपट होताना दिसत नाही. अडीअडचणी, रोगसंकटे व एकमेकांची सुखदुःखे ह्यांत ते एकमेकांचे वाटाडे बनतात. निदान माझा तरी तसा अनुभव आहे. आज तशी स्थिती नसेल कदा-चित. मी हे तीसपस्तीस वर्षांपूर्वीचे लिहीत आहे. आज खेडी ही आग-गाड्या-मोटारींनी शहरांची अंगणेओसऱ्या बनविली आहेत.

ज्येष्ठ उजाडला. एक दिवस एक बाई खबर घेऊन आली, की कुळकर्ण्यांच्या घरी चोरी झाली व उमाकाकू धाय मोकलून रडत आहेत. चोरी केव्हा झाली, काय झाली हे मात्र कळले नाही.

चोरीची बातमी कळताच मी भावजयांना विचारून तिकडे गेले. तेथे जाते तो काकू खरोखरच ओक्साबोक्शी रडत आहेत.

" काय ग काकू, काय झाले ?"

" काय सांगू ! तुझा भाऊ नाशिकला गेला. त्याने काढले लग्न बाबाचे ! आणि आज घरात पाच-सात हजारांची चोरी झाली. अगदी मणि-मंगळसूत्राला देखील घरात सोने उरले नाही."

कुळकर्ण्यांचे घर हे दहाजणांचे कुटुंब. दोन मुलांची लग्ने झालेली. तिसरा लहान.

" चोरी झाली ? केव्हा ? लग्न कोणाचे ? काकू, तू काय सांग-तेस काही कळत नाही."

उमाकाकूंनी मला हात धरून आत माडीवर नेले व जेथून चोरी झाली ते ठिकाण दाखविले. आजपर्यंत तेथे मी शेकडो वेळा गेलेली, पण ह्या जागी ह्यांची ठेव असेल अशी मला कधी कल्पनाही आली नाही. एका भिंतीत कपाट. दिसायला अगदी लहान पण आत साधारण माण-

साला ओणवून उभे राहता येईल एवढी जागा. ह्या कपाटात काही विशेष असेल असा कोणाला कधी संशयही आला नसता.

आम्ही लहानपणापासून शंभर-हजार वेळेला त्या खोलीत खेळलो होतो. आत कपाटात उभे राहिले म्हणजे वर फळ्यांची तक्तपोशी. त्यात बोटे मावतील अशी चंद्रकोरीसारखी फट. तीत बोट घालून फळी सरकविली म्हणजे वर उडी मारून आत पोटावर पडून सरपटत जायचे. मग पुढे सात-आठ हातांवर रांजण. त्यात घरातील सारे सोनेनाणे ठेवून दिलेले होते.

काकूनी मला त्या कपाटात सोडले व सांगितले," आता ती फळी बाजूला लोट. वर हात टेकून आत हो. मग पालथी निजून पुढे सरक. पहा तुला काही सापडले तर."

मी तिच्या सांगण्याप्रमाणे केले. माझा जीव घामाघूम झाला. आत थोडा प्रकाश होता. रांजणात दोन-तीन चांदीची भांडी तेवढी दिसली.

मी म्हणाले, " काही नाही ग बाई. दोन भांडी तेवढी आहेत."

दुष्काळ होता. गावात चोऱ्या बऱ्याच होत होत्या. पण ही चोरी बाहेरचा कोणी करणे शक्य नव्हते. चोरांच्या भीतीने घरात असलेले दोघीतिघींचे दागिने बिंदी-पट्ट्यांपासून कानांतील सुंकल्यांपर्यंत सर्व काही त्या रांजणाच्या पोटात भरले होते. नथादेखील रांजणाच्या स्वाधीन केल्या होत्या. आपल्या भावांना काही मिळू नये म्हणून चोरी दादानेच केली आहे, असे माझे ठाम मत झाले व आपला संशय येऊ नये म्हणून लग्नाचे निमित्त करून नाशकास चालता झाला. दादाचा मधला भाऊ बाबा ह्याचे दुसरे लग्न दादाने काढले होते.

दुसऱ्या दिवशी दादा व वहिनी अक्षत घेऊन आमच्याकडे आली. त्या दोघींनी लग्नाला येण्याची मला फारच गळ घातली. ते म्हणाले, " येथे तू रडतच बसणार. त्र्यंबकला काही मनाला विरंगुळा तरी पडेल."

हो-नाही करता करता मी व दत्तू निघालो. सात कोसांची मजल. वऱ्हाडी सर्व बैलगाड्यांतच होते. काही गाड्यांना तट्टे होते तर काही अशाच होत्या. वाटेने आम्हाला पाऊस लागला. शिध्याची गाडी न्हाली, कणकेची पोती तिंबली, साखरेचे पोते विरघळू लागले. पण आमच्या

दादाचे मन खंबीर. घरी चोरीचा कहर व दारी पावसाचा वर्षाव झाला तरी ते विरघळले नाही की खिन्न झाले नाही.

आम्ही पाचपंचवीस वऱ्हाडी होतो. मी जरी लग्नाला आले होते तरी मला प्रशस्त वाटत नव्हते. ह्या लग्नाच्या मी विरुद्ध होते. कारण बाबाच्या पहिल्या बायकोत मला काहीच वैगुण्य दिसत नव्हते. रूपात, गुणात, कामात नाव ठेवण्यासारखे तिच्यात काहीच नव्हते. ती कधी वर मान करायची नाही. ती मला मावशी म्हणे व तिचा नवरा मला ताई म्हणे. म्हणजे माझे असे दुहेरी नाते होते. आम्ही जरी देशस्थ-कोकणस्थ होतो तरी आम्हाला आप्तपणा वाटे. तेव्हा ह्या सद्‌गुणी पोरीला सवत आणलेली मला काही आवडली नाही.

दादांनी कंबर बांधून दोन दिवसांत लग्न पार पाडले. वऱ्हाडणीचे दागिने गोळा करून आपल्या नव्या भावजयीचा पोवळा साजरा केला. सोयऱ्यांकडे गडबड झाली, की बिंदी-पट्ट्याचे जागी निदान घरातली नथ तरी !

हे दादाच्या कानांवर गेले तरी तो आपला शांतच ! हे पाहून माझा संशय अधिक बळकट झाला.

मी त्याला म्हणाले, " दादा, मला नाही वाटत चोरी झाली आहे असे."

तो म्हणाला, " रामाला आणि गंगेला ठाऊक काय झाले ते."

मी म्हणाले, " कशाला रामाचे नाव घेतोस ? मी म्हणते, दादाला आणि गीतालाच ठाऊक काय झाले ते."

ह्यावर त्याने एवढेच उत्तर दिले की, " तसे का होईना ! "

सोमवारी प्रयोजनाची मंडळी जेवणास येऊ लागली. आमच्याच गावचे विश्वनाथ भट व त्यांची मुलगी सुंदरी त्र्यंबकेश्वराची पालखी पाहण्यास निघाली. सुंदरी मला म्हणाली, " ताई, तुला येता येत नाही तर दत्तूला नेऊ का पालखी पाहायला ? "

मी म्हणाले, " ने, पण त्याला संभाळ." ती दत्तूला घेऊन गेली.

इकडे पंगत बसली. पहिला भात झाला असेल नसेल तोच मंडळी आपोष्णी घेऊन उठली. घरात चहूकडे पाहता पाहता शुकशुकाट

झाला. आम्ही दोघी-चौघीच काय त्या घरात राहिलो. उमाकाकू स्वयंपाकघरात, भीमाकाकू कोठीवर आणि गीतावहिनी व मी माडीवर. घरात सारा पसारा पडलेला. मला मोठे चमत्कारिक वाटू लागले.

मी म्हटले, " वहिनी, जेवणी कशी ग इतक्या लौकर आटपली ?"

ती म्हणाली, " रोज गोड खाऊन मंडळी कंटाळली आता."

थोड्याच वेळात खालून 'लक्ष्मीबाई टिळक' म्हणून हाक आली. मला लक्ष्मीबाई टिळक म्हणून कोणीच हाक मारीत नसत. तेव्हा ती आरोळी ऐकून माझा अगदी थरकाप झाला. अंगावर काटा उभा राहिला. मला वाटले, टिळकांनी पकडवॉरंट काढले.

इतक्यात पुन्हा तीच आरोळी आली. माझ्या काळजाने अगदी ठाव सोडला. खाली एक शिपाई उभा होता. त्याने खाली बोलावले. माझ्या मागोमाग गीतावहिनी खाली आली. शिपायाने विचारले, " तुमचा मुलगा कोठे आहे ?"

" त्याच्याशी काय काम आहे तुमचे ? मी तर आहे ना ?"

" असे नाही– तो कोठे चुकला आहे का ?"

हे ऐकताच गीतावहिनी पुढे झाली व म्हणाली, " हो. चुकला आहे. कोठे आहे तो ?"

" त्याच्या अंगावर दागिने होते का ?"

" काही नव्हते."

मग त्याने बाहेर दत्तूला उभा केला होता. त्याला आत आणला. आत्ता माझा जीव शांत झाला. कुशावर्तावर तो चुकला होता. सुंदरीचा हात मध्येच सुटला व या गर्दीत जी तांबड्या लुगड्याची व धोतर पांघरलेली बाई दिसेल तिचा तो हात धरू लागला. पण कोणीच बाई त्याचा हात धरण्यास तयार होईना. असे करता करता तो त्या गर्दी-तून निघून थेट नाशिक नाक्याकडे गेला. तेथे शिपायाचे व त्याचे थोडेसे बोलणे झाले. दत्तू म्हणाला, " माझ्या मामांकडे घेऊन चला. माझ्या मामांच्या घरी फार लाडू केले आहेत. ते तुम्हाला एक पाटीभर लाडू देतील." नावे विचारता त्याने वडलांचे नाव 'नाना' व आईचे नाव 'लक्ष्मीबाई टिळक' सांगितले. गावात दोनच लग्ने उतरली होती. एक

जलालपूरचे व एक नाशिकचे. तेव्हा माझा शोध काढण्यास शिपायाला फारसा वेळ लागला नाही.

आता माझ्या ध्यानात आले, की हा जो जेवणाचा गोंधळ झाला तो दत्तूमुळेच. मागे तेथे असाच एक एका श्रीमंताचा एकुलता एक मुलगा हरवला होता व पुढे तो किल्ल्यावरून पडून मेलेला सापडला.

दत्तू आल्यावर घों घों घों घों सारी मंडळी जमली. सुंदरीचे काळीज सुपाएवढे झाले. दादा, मामा पीतांबर नेसूनच इकडेतिकडे फिरत होते. ते हताश होऊन परत आले, तो त्यांना हा प्रकार कळला. दादाने लागलीच आत जाऊन तीन पायल्यांची लाडवाची पाटी शिपायापुढे आणून ठेवली व कनवटीचे पाच रुपये काढून तो म्हणाला, " बाबा, आज तुम्ही माझ्या तोंडचे काळे पुसले व माझ्या बहिणीचे धन तिला आणून दिले."

जे आमचे दादा चोरी झाली, पोती भिजली तेव्हा डगमगले नाहीत ते दत्तू हरवला तेव्हा घाबरून गेले. गोविंदाग्रजांच्या महाराष्ट्रगीतातील 'देशस्थांच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी' ही ओळ आज माझ्या डोळ्यांपुढे उभी राहते. माझ्या अनुभवावरून मी हे म्हणते, की कोकणस्थांपेक्षा देशस्थांची मने अधिक प्रेमळ व अधिक उदार असतात.

हवालदाराने लाडवाच्या एका कणाला किंवा पाचातील एका पैला स्पर्श केला नाही. दादाने त्याला मग माझी सर्व हकीकत सांगितली. गोविंदरावमामांचा हा नातू हे कळल्यावर त्याला आणखी आनंद झाला. दुसऱ्या दिवशी शिपायाच्या सर्व कुटुंबाला जेवायला बोलावले.

आम्ही जलालपुरास परत आलो. येताना गंगेवर बाबाच्या पहिल्या बायकोने हाक मारून विचारले, " मावशी, आणली का दुसरी भाची ?" हे शब्द माझ्या हृदयात रुतले. मी काहीच बोलले नाही. बिचारीच्या प्राक्तनाचा विचार करीत घरी आले.

गृहप्रवेश होताच नवी नवरी माहेरी गेली व जुनी घरी आणली. आता चोरीची कसून तपासणी सुरू झाली.

" आम्ही नागनारांबळीकरता गेलो असता तू आमच्या मागे

माहेराहून येथे कशाला आली होतीस ?"

" मला मनूमावशीने बोलावले होते."

मी खरेच तिला बोलावले होते. मी तिच्यावर एक मोठे हृदयद्रावक गाणे रचले होते व ते तिला शिकवण्याकरता बोलावले होते.

मावशीने बोलावले होते हे ऐकताच तिचा नवरा मला बोलवायला आला. त्याचे ओठ थरथर कापत होते, डोळे लालबुंद दिसत होते. त्याला संताप आला होता. तो म्हणाला, " ताई, तुला दादांनी बोलाविले."

" का रे बाबा ? काय काम आहे ?"

" तू ये. मग तुला कळेल."

त्यांच्या घरी तपासणी चालली असल्याचे आम्हाला ठाऊक होते. मला कडकडीत शुक्रवार. मी जावे असे माझ्या भावजयांना वाटेना. माझे दोघे भाऊ घरी नव्हते.

त्या म्हणाल्या, " पहा बाई, नाहीतर तुमच्यावर येईल काही !"

मी म्हणाले, " काय येणार ? सत्याचा वाली देव आहे."

मी गेले तेव्हा दादा, उमाकाकू ही ओसरीवरच होती. मी विचारले, " काय ग काकू, मला का बोलावले ?"

ती म्हणाली, " पहा बाई, ती तुझी भाची काय सांगते ते."

मी आत गेले. तिला पोटाशी घेऊन खूप रडले. " काय ग बाई तुझी ही परवड ? जशी माझी धारू तशी तू मला आहेस. तुला आई नाही. तुझे कसे होणार ?"

दुःखाला दुःख भेटले. हृदय हलू लागले, अश्रू गळू लागले. तिलाही माझ्याकरता वाईट वाटत होते. तिने माझ्या गळ्याला मिठी मारली व म्हटले,

" मी तुझे नाव उगीच सांगितले ग."

" मग तुझ्याजवळ हे सर्व खरेच आहे का ? अन् तूच नेलेस का ? तर मग दे पाहू सारे."

" येथे नाही. गंगापूरला आहे."

"काकू, आहे ग सगळे. मी जाते आता," असे म्हणून निघाले.

" नको ग बाई. आता तेवढे घेऊन ये."

आम्ही दोघी जलालपूरहून गंगापूरला निघालो. गंगेला गुडघ्या-एवढे पाणी होते. पाण्याची धार दोघींना ओढीत होती. मनाला वाटे ही गंगामाई आताच पोटात घेवो. पण लागलीच वाटे दत्तूचे कसे होईल ?

आम्ही गंगापूरला गेलो. तिने ते दोन डबे मला काढून दिले. तोच अंधाऱ्या खोलीतून आवाज आला, " टवळे, कशाला कबूल झालीस ?"

" माझ्यामुळे त्या मावशीला उगीच त्रास म्हणून."

मी व ती निघालो. इतक्यात दादा आले. मी म्हणाले, " आहे रे बाबा सगळे."

" ते तू उघडून पाहिलेस का ?"

" नाही."

" अहा वेडे ! त्यात दगड कशावरून नसतील ?" डबे उघडून पाहिले तो सर्व दागिने होते. मात्र मोडून तोडून ठेवलेले व चेचलेले होते. डबे घेऊन आम्ही रात्री आठाला आलो.

काकूला आनंद झाला. ती म्हणाली, " मने, तू खरीच लक्ष्मी आहेस. माझी गेलेली लक्ष्मी तू परत आणलीस. गीता, मनूची ओटी भर. मग तिला जाऊ द्या."

## ४७ : एक संस्मरणीय गोष्ट

महाबळेश्वराहून आम्ही परत आल्यावर एक-दोन महिन्यांनी डॉ. बालैंटाईनसाहेबांच्या आमंत्रणावरून चार दिवस राहुरीस गेलो होतो. राहुरीस आम्हाला एक लहानसे घर चार दिवसांसाठी दिले होते. जेवण डॉ. बालैंटाईनसाहेबांकडून वाढून येत असे.

रोज सकाळ-संध्याकाळ आमच्या घरी शास्त्रवाचन, पोथीप्रार्थना, भजन ही होत. भजनात टिळक आपली प्रेमळ पद्ये तयार करून म्हणत.

प्रार्थनेला नेहमीच शेजारपाजारची मंडळी जमत. जमलेली मंडळी आपल्याला आवडत असेल ते शास्त्रवाचन म्हणजे ' बायबल व्हर्स ' म्हणे.

राहुरीला आल्यावरही हा नियम चुकला नाही. मी व दत्तू हिंदू होतो तरी आम्ही नियमाने टिळकांच्या प्रार्थनेला बसत होतो. मला प्रार्थना आवडू लागली. आपण आपल्या हृदयस्थ परमेश्वराशी बोलणे म्हणजे एक नवा आल्हादजनक अनुभव मला वाटू लागला. बायबलचीही ऐकून ऐकून मला पुष्कळ माहिती झाली.

दिवस शनिवारचा होता. अशीच प्रार्थनेला मंडळी जमली होती. जमलेल्या सर्व ख्रिस्ती लोकांनी शास्त्रवचने म्हटली. दत्तूवर पाळी आली आणि त्याने ' देव प्रीती आहे ' हे शास्त्रवचन म्हटले. मजवर पाळी आली तेव्हा मी ' हे देवा, मज पाप्यावर दया कर ' हे शास्त्रवचन म्हणाले.

टिळक म्हणाले,

" तुझ्यावर देव कधीच दया करणार नाही."

" का नाही करणार ?"

" तू मला वचनबद्ध असून दूर राहू लागलीस तर मला तुजबद्दल काय वाटेल ? तसेच, तुझी जर ख्रिस्ताच्याठायी भक्ती असेल आणि ती असून तू त्याच्यापासून दूर राहू लागलीस तर ती प्रतारणा देवाला कशी आवडेल ? तो तुजवर कशी दया करील ?"

प्रार्थना झाल्यावर मी उठले व बाहेर गेले. कुठे जाते हे घरात कोणाला मी सांगितले नाही. जी उठले ती थेट बालैंटाईनसाहेबांच्या बंगल्यावर गेले व त्यांचे दार ठोठावले. मला पाहून साहेब चकित झाले.

" का लक्ष्मीबाई, तुम्ही एकट्याच आल्या ?"

" साहेब, माझा उद्या बाप्तिस्मा करा."

" आता बाई, तुम्हाला अजून शास्त्राचे ज्ञान नाही. तुम्ही निदान पाच-सहा महिने तरी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास करायला पाहिजे."

" मला ख्रिस्ती धर्माची आता चांगली माहिती झाली आहे. मला उद्याच्या उद्या बाप्तिस्मा पाहिजे."

" पण बाई, अशी घाई का ?"

" ते काही नाही. तुम्हाला मला बाप्तिस्मा द्यायचा नसेल तर तसे स्पष्ट सांगा."

" पण तुमची परीक्षा घेतील त्या वेळी उत्तरे द्यावी लागतील."

" मला ते काही माहीत नाही. तुम्ही बाप्तिस्मा देणार की नाही ते सांगा. नाहीतर मी चालले."

" तुम्ही आता जा. मला ह्या वेळेस उत्तर देता येणार नाही."

" साहेब, उद्या आहे रविवार. माझा, दत्तूचा आणि हौशीचा उद्याच्या उद्या बाप्तिस्मा झाला पाहिजे. शास्त्राच्या परीक्षेत मी उतरले नाही तरी माझा ख्रिस्तावर भाव आहे. मी का खोटे बोलते आहे ?" साहेबांनी व मी तेथेच प्रार्थना केली व दुसऱ्या दिवशी आमचा बाप्तिस्मा होण्याचे ठरले.

मला त्यांनी त्या वेळेस एक गोष्ट सांगितली. ती मला अगदी संपूर्ण आठवत नाही; पण तिचा आशय असा होता, की एक माणूस होता. त्याच्या घरी रात्रीचा एक अतिथी आला. त्याला खायला देण्याला घरधन्याजवळ काही नव्हते. तेव्हा त्याने शेजाऱ्याकडून त्याला खायला आणून दिले. ह्या गोष्टीचा उलगडा मला त्या वेळी झाला नाही. पुढे मी ती विसरूनही गेले होते. पण आज हे लिहिताना मला ह्या गोष्टीचा उलगडा होत आहे.

दुसऱ्या दिवशी बाप्तिस्म्याचे ठरले. मी त्या आनंदात घरी आले. बरोबर कंदील देऊन बालेंटाईनसाहेबांनी आपला माणूस पाठविला होता. परत आल्यावर टिळकांनी कोठे गेले होते म्हणून विचारले. त्यांना माझ्या तोंडून सर्व हकीगत ऐकून मोठा आनंद झाला.

बाप्तिस्म्याच्या आधी माझी परीक्षा झाली. दुसरीकडचे एक पाहुणे पाळक राहुरीला आले होते. त्यांचे नाव रेव्हरेंड आनाजी क्षीरसागर असे होते. हे गृहस्थ अत्यंत प्रेमळ व वयाने मला वडिलांसारखे होते. ते माझ्याजवळ बसून शास्त्रांतील प्रश्नांची उत्तरे मला सुचवीत होते व मी त्यांची उत्तरे परीक्षकाला देत होते.

बाप्तिस्मा मी परदेशीय मिशनरीच्या हातून घेण्याचे नाकारले.

मंडळीचे पाळक रेव्हरेंड वणिरामजी बापूजी ओहोळ ह्यांच्याच हातून तो व्हावा अशी इच्छा मी प्रगट केली. माझ्या त्याही इच्छेला मान मिळून मी, दत्तू व हौशी ह्यांचा बाप्तिस्मा राहुरीच्या देवळात (चर्च-मध्ये) झाला.

त्याच दिवशी मला मंडळीतही घेण्यात आले व प्रभुभोजनात भाग घेण्यास मला मोकळीक झाली. सोमवारी आम्ही नगरास परत आलो. आमचा बाप्तिस्मा झालेला ऐकून नगरच्या लोकांना फार आनंद वाटला. मात्र राहुरीस न होता तो नगरास व्हावा, असे पुष्कळांना वाटत होते. त्यामुळे त्यांची थोडीशी निराशा झाली.

त्याच वर्षीची आणखी एक संस्मरणीय गोष्ट म्हणजे माझे भाषण. अहमदनगरास दर दिवाळीत ऐक्यसभा म्हणून एक मोठी सभा भरत असे. ह्या सभेला नगर, सातारा, सोलापूर वगैरे जिल्ह्यांतून ख्रिस्ती लोक जमत व तिला एक प्रकारचे यात्रेचे स्वरूप येत असे. खुद्द नगरचे दीडएक हजार स्त्री-पुरुष व बाहेरचे चारपाचशे असा दोन हजार समाज सहज जमे. नगरचे जुने देऊळ अगदी गच्च भरून जायचे.

त्या दिवशी तर अगदी दाराखिडक्यांतूनही लोक होते. टिळकांची बायको बोलणार म्हणून ज्याला त्याला कुतूहल वाटत होते. टिळकांना फार हौस, की आपल्या बायकोने कोणी तरी मोठ्ठे व्हावे. लेखिका, कवयित्री, वक्ती तिने बनावे. व ह्या दिशेने ते नेहमी प्रयत्न करीत. आधी आधी त्यांना त्यापैकी पहिल्या दोन बाबतींत अगदीच निराश व्हावे लागले. पण मग त्यांना माझ्याबद्दल फार आशा वाटू लागली. असो. पण वक्ती बनण्याचा माझ्यावर हा पहिलाच प्रसंग होता. ज्या बाईने दिवा लावला नाही ती आवा पाहण्यास जाणार. ह्यापूर्वी भाषण करणे तर बाजूलाच राहिले, पण मी ते ऐकलेही नव्हते. एक राजनांदगावला वक्तृत्वसमारंभ झालेला मला प्रत्यक्ष माहीत, पण त्यात मजकडे काम होते स्वयंपाकिणीचे व वाढपीचे!

मला टिळकांनी भाषण लिहून दिले होते व ते पाठही करून घेतले होते. कितीतरी वेळा त्याची संथा दिली. रानात दोघांनीच जाऊन मी त्यांच्यापुढे ते मोठ्या स्वरात पाठ म्हणून दाखविले होते. अशा रीतीने

तयारी तर अगदी अवाढव्य झाली होती.

प्रत्येक वक्त्याला दहा मिनिटे देण्यात आली होती. माझ्या आधी दोन-चार भाषणे झाली होती. माझे नाव निघताच मीही पुलपिटवर मोठ्या ऐटीत जाऊन उभी राहिले. पुढे लोकांचा अफाट समुदाय पसरला होता. अगदी पुढे पहिल्याच बाकावर डॉ. ह्यूम व टिळक बसले होते. माझा पोशाख अगदी होता तोच होता. म्हणजे नथ, बुगड्या, कुंकू, कासोट्याचे लुगडे असा थाट होता. ख्रिस्ती लोकांत स्त्रियांचा पोशाख ठरून गेलेला आहे. तेव्हा त्यांच्या डोळ्यांना हे एक निराळेच दृश्य होते. तशात मी नुकतीच ख्रिस्ती झालेली.

असो. मी मोठ्या ऐटीत पुलपिटवर जाऊन उभी राहिले खरी, पण दहा मिनिटांतील नऊ मिनिटे माझ्या तोंडातून एक शब्द उमटेना. एखाद्या ओंडयाप्रमाणे मी उभी होते व एखाद्या चित्राप्रमाणे श्रोतृसमूह बसला होता. माझ्यासाठी कित्येकजण प्रार्थना करीत होते, की देवा, हिच्या तोंडून चार शब्द तरी निघू दे. कोणी पाण्याचा पेला आणून ठेवला, कोणी लवंगा आणून ठेवल्या– पण मला मुळी कोरडच पडली नव्हती तर मी ह्यांचा उपयोग तरी कसा काय करणार ?

कोणी मनात म्हणत, हिच्या हातात कागद आहेत तर हिला वाचण्याची तरी बुद्धी होवो. दुसऱ्या हातात रुमाल होता. पण तोही तोंडाकडे जाईना. रुमालाची सवय नाही व कागद वाचण्याची आठवण नाही.

माझ्यामागून आणखी बरीच भाषणे व्हायची होती. तेव्हा डॉ. ह्यूम माझे आभार मानण्यासाठी उठले.

इतक्यात मला वाचा फुटली व मी इतकी धडाधड व अस्खलित बोलू लागले, की माझे भाषण ऐकून सर्व लोक चकित झाले. भाषण संपले. पण माझे मन म्हणे, काहीतरी चुकून राहिले. कागदावर डाग पडला होता तेथले भाषण राहिल्यासारखे वाटते. शेवटी पाठ केल्याच्या बाहेरचे मी बोलले ! मोठे प्रसंगावधान राखले !

मी म्हणाले, " मला जे सांगायचे ते मी सांगून टाकले. आता ह्यातील जे काही सांगायचे राहिले असेल ते आपले प्रिय मिस्टर टिळक सांगतील ! "

आमचा भ्रमाचा भोपळा फुटला. मी जागेवर येऊन बसले. माझ्या जागी पुलपिटवर टिळक दिसू लागले. ते म्हणाले, "मला सांगायचे हिने काहीच ठेवले नाही."

घरी आल्यावर मी त्यांच्यावर फार रागावले.

ते म्हणाले, "पाण्यात उडी टाकल्यावाचून पोहता येत नाही."

मी त्यांना सांगितले, "इतःपर मी कोठे बोलावे असे तुम्हाला वाटत असेल तर मी पाठ करून बोलणार नाही. मला माझ्या मनाला वाटेल तसे बोलेन. दुसऱ्याच्या लिहिण्याने माझ्या मनाचा गोंधळ होतो."

त्यानंतर आतापर्यंत मी पुष्कळ वेळेला सभांमधून भाषणे केली, पण कधी लिहून पाठ करून केली नाहीत.

मला सभाधीट जर कोणी केले असेल तर ते ख्रिस्ती श्रोत्यांनी. त्या दिवशी माझ्या पहिल्या भाषणात नऊ मिनिटे हा एवढा मोठा समाज जो इतका शांतपणे बसला त्यानेच माझी भीड चेपली. ह्या समाजातील श्रोत्यांची सभेतील वागण्याची शिस्त कमालीची सहानुभूतीची व शांततेची असते.

ख्रिस्ती झाल्यानंतर; किंबहुना ख्रिस्ती होण्याचे वेध लागताच महाराची मुलगी मी माझ्या घरात अगदी स्वतःची मुलगी म्हणून घेतली. ह्यानंतर नगरास आल्यानंतर टिळकांनी भिक्या नावाच्या एका महाराचा मुलगा घेतला. एक दिवस टिळक एका खेडेगावी गेले असता झाडाखाली एक वर्ष दीड वर्षाचा मुलगा भुकेने व्याकूळ होऊन पडला होता. टिळकांनी गावात त्याच्या नातलगांचा खूप शोध केला. कोणी नातलग पुढे येईना. पाटलाला बोलावून त्याची व्यवस्था करायला सांगितले तर तोही दाद लागू देईना.

शेवटी तेथेच दोन दिवस त्यांनी त्या पोरासाठी मुक्काम केला व आसपासच्या खेड्यापाड्यात तपास केला. पण जेव्हा कोठेही तपास लागेना तेव्हा त्यांनी त्याला घरी आणला.

घरी आल्यावर भिक्याचे फार लाड होऊ लागले. ह्या अनाथ मुलाचा मी मोठा शास्त्री करून दाखवीन, असे टिळक म्हणत व रोज भिक्याला संस्कृत संथा देत. तेव्हा भिक्याचे नावच शास्त्रीबोवा पडून गेले.

देवाने माझी आणखी एक हौस पुरविली. माझ्या शेवटच्या मुलानंतर दहा वर्षे घरात तान्हे मूल नव्हते. भावांच्या येथे बालगोपालांची हौस फिटत होती, पण अगदी स्वतःचे म्हणायला देवाने आता लहान मूल दिले. हिचे नाव तारा ठेवले.

तारावर आम्हा दोघांचे प्राणापलीकडे प्रेम. तिच्या बाळपणी आम्ही दोघांनी तिच्या खस्ता खाऊन तिला वाचविली. आल्यानंतर चौथ्या-पाचव्या दिवशीच पोटातले होऊन ती आम्हाला सोडून चालली होती. त्यातून बाहेर पडल्यावर आमची महाबळेश्वरला जाण्याची वेळ आली.

पण ह्याही खेपेला टिळकांची महाबळेश्वरला जाण्याची वारी चुकली. तारा तीन आठवड्यांची. तिला महाबळेश्वरची थंडी सोसणार नाही व नगरचे ऊन सोसणार नाही म्हणून आम्ही वाईस जाण्याचे ठरविले.

ह्या दिवसांत पुण्यापासून वाठारपर्यंत गाडीत अतिशय गर्दी असे. आम्ही सेकंड क्लासची तिकिटे काढली. डॉ. ह्यूमही महाबळेश्वरला चालले होते. ते त्याच गाडीत होते. प्रत्येक स्टेशनवर उतरून ते आमच्या डब्यात डोकावत व कसे काय आहे ह्याची चौकशी करीत. आमच्या डब्यात दत्तू, मी, दीड वर्षाचा भिक्या, बेबी (तारा), टिळक, इतके होतो. मुलगी तान्ही व हा एवढा पसारा.

तेव्हा डॉ. ह्यूमनी आमच्यासाठी डबा रिझर्व करून घेतला होता. आम्ही सारे आपापल्या जागी बसलो होतो. टिळक मात्र ह्या बाकावरून त्या बाकावर, तेथून वरती बर्थवर, असे करीत होते.

मी त्यांना म्हणे, "अहो, एका जागी बसा." पण त्यांना मी फार 'ओल्ड फॅशन्ड' वाटे. आगगाडीत बसले म्हणजे बसल्या जागेवरून हलू

नये, स्टेशनवर गाडी चुकेल म्हणून चार तास आधी येऊन बसावे, कोणी आसन्नमरण असेल तरच तारा कराव्या, एरवी करू नये, ही माझी तत्त्वे, व ह्या तत्त्वाप्रमाणे गाडीत टिळकांनी एका ठिकाणी बसून राहावें, असे मला वाटे. पण ते ऐकेनात.

शेवटी एका बर्थवरून दुसऱ्या बर्थवर उडी मारायला गेले तो त्यांच्या गुळगुळीत डोक्याची, मधल्या तुळतुळीत कंदिलाशी गाठ पडून दोन्हींचा मोक्ष झाला. त्यांच्या डोक्यातून रक्ताची धार लागली. कंदिलाचा अगदी चक्काचूर झाला. पोरे खाली निजली होती. त्यांच्या तोंडावर काचेचे बारीक बारीक तुकडे पडले. पोरे जागी होऊन त्यांनी डोळे उघडताच डोळ्यांत काचा जायच्या, असे मला भय पडले, तर इकडे टिळक रक्ताने न्हाऊ लागले. ते मात्र शांत उभे होते. जसे, जसे काही काही झालेच नाही.

नंतर त्यांनी बाथरूममध्ये जाऊन डोक्यावर थंड पाण्याची धार धरली. रक्त थांबले, पण जखम पुष्कळ मोठी झाली होती. मी हळूहळू पोरांच्या तोंडावरील काचा वेचून झटकून काढल्या. मग लुगड्याने डब्यात पडलेले रक्त पुसून काढले.

"कसे वाटते तुम्हाला ?"

"मला काय झाले आहे ?"

"म्हणजे ? हे काय ?"

"अग, असं झालंच पाहिजे. संसारात हीच तर मजा आहे."

"आता बत्ती फोडल्याबद्दल दंड होईल."

"होईल तर देता येईल. त्याची काळजी करीत बसल्याने दंड द्यायचा असला तर तो टळणार थोडाच आहे ? आणि काळजीमुळे जखम थोडीच भरून येणार आहे ?"

पुढच्या स्टेशनावर डॉ. ह्यूम पुन्हा डोकावले. त्यांना फार वाईट वाटले.

टिळक म्हणाले, "मला काही इजा झाली नाही. मी चांगला बरा आहे. हे चालायचेच." आम्हाला दंड वगैरे काही भरावा लागला नाही. टिळकांचे मन जितके बळकट होते तितकेच शरीरही काटक होते.

आम्ही वाईस पोचलो. तेथे आशम्माबाई होत्याच. तसेच हरिबा गायकवाड पाळक होते. ह्या दोघांनी आमच्यासाठी आधीच सारी व्यवस्था करून ठेवली होती. तेथेही टिळकांना स्वस्थ वेळ कोठली? त्यांची व्याख्याने, उपदेश, संभाषणे व लेखन ही चालूच होती.

एक दिवस एक बाई आली. ख्रिस्ती लोकांत आता मी एक वर्षा-वर दिवस काढले असल्याने त्या समाजातील पुष्कळ रीतिरिवाज माझ्या ध्यानात आले होते. बाई आल्याबरोबर मी उठून तिचे स्वागत केले. शेकहँड करण्यासाठी हात पुढे केला, खुर्ची पुढे सारली– पण बाईने आपला हात पुढे केला नाही की ती घरात आली नाही. तिने विचारले, "साहेब कोठे आहेत ?"

मी म्हणाले, "ते बाहेर गेले आहेत."

"त्यांनी मला कामाला बोलविले आहे."

मी म्हणाले, "आमच्या येथे काही काम नाही."

मला मनात मोठे आश्चर्य वाटले. ही बाई काय काम करणार ? घरातील कामाला दोन माणसे आम्ही नगराहूनच आणली होती. बाई गेली.

मला फार आश्चर्य वाटले. बाई काय विचित्र आहे! घरात आली नाही, शेकहँड केला नाही. हिच्या अंगावर दागिने किती! सरी, पाटल्या, पुतळ्यांची माळ, नाकाकानातले, नेसू लुगडे चांगले पंधरा-वीस रुपयांचे! ही बाई आमच्या घरी काम तरी काय करणार ? असेल काही लिहिण्याचे काम, अशी मी मनाची समजूत करून घेतली.

संध्याकाळी टिळक आल्यावर विचारू लागले, "भंगीण आली होती का ? मुलीचे मळीण कपडे धुवायला तिला मी उद्यापासून बोला-वले आहे. आली होती का ती ?" माझ्या भ्रमाचा भोपळा फुटला.

"ती भंगीण का होती ?"

"हो. का ?"

"मी तिला बसायला खुर्ची दिली अन् शेकहँडकरता हात पुढे केला. पण ती आपली गप्पच. मोकळे लुगडे नेसली असल्यामुळे ती कोणी ख्रिस्तीच बाई असावी, असे मला वाटले. बरे हातात मोहोरेची

अंगठी पाहून बाई हिंदू वाटे. म्हणून माझा असा घोटाळा झाला.

"तुला असे का वाटते की फक्त तुझेच लोक तेवढे स्वच्छ राहतात !"

दुसऱ्या दिवसापासून ती कामाला येऊ लागली. अंगण झाडणे, मुलांचे मळीण कपडे धुऊन आणणे वगैरे कामेही ती करू लागली. मी एक दिवस तिला विचारले,

"काय ग, तू इतकी स्वच्छ अन् नीटनेटकी दिसतेस, तसे तुझे घर आहे का स्वच्छ ?"

"बाई, अशाच चलता का माझ्या घरी ? नाहीतर तुम्ही म्हणाल, मी आधी झाडून-सारवून मग तुम्हाला दाखविते. चला अशाच्या अशाच."

मी तिला घेऊन तिच्या घरी गेले.

ती वस्ती कोणत्या लोकांची होती ह्याची मी चौकशी केली नाही. पण तेथील घरेदारे व रस्ता अगदी स्वच्छ होता. तिच्या घराचे दरवाजे मोठे होते. आतमध्ये ताटवाटचा, पाणी पिण्याची भांडी अगदी चकचकीत होती. घरात केरपोतेरे केलेले, भांड्यांची बुडे घेतलेली, अंगणात सडा टाकलेला, दारी तुळशीवृंदावन. हे सारे पाहून मी आश्चर्याने थक्कच झाले. स्वच्छता व टापटीप ही जातीपेक्षा व्यक्तीवर आहेत असे माझे मत होते ते आता अधिक दृढ झाले.

ह्या क्षेत्राच्या ठिकाणी कोयना-कृष्णांचा संगम होतो तसे माझे झाले. मी त्या भंगणीच्या गळ्यात मिठी मारून विचारले, "का ग, तुम्ही आमच्या हातचे का खात नाही ?"

ती म्हणाली, "बाई, आमची जात नावे ठेवते."

मी म्हणाले, "आता तू माझे घर पाहिले आहेस, मलाही पाहिले आहेस, आता हरकत नाही."

ती म्हणाली, "बाई, माझ्या हातचे खाल तुम्ही ?"

मी म्हणाले, "हो ! काय झाले ?"

झाले ! म्हटल्याप्रमाणे त्या भंगणीने फराळाचे करून आणले. टिळक महाबळेश्वरला डॉ. ह्यूमला भेटायला गेले होते. मी ते फराळाचे घेतले.

स्मृ... १९

घरातील चाकरनोकर कुरकुरू लागले. मी त्यांना सांगितले, " तुम्हाला नको असेल तर माझा काही आग्रह नाही. मी न् माझी मुले खाऊ."

आणि दत्तू, हौशी व मी, आम्ही तिघांनी ते फराळाचे खाल्ले. आपल्या हातचे ह्या बाईने इतक्या प्रेमाने खाल्ले म्हणून भंगणीलाही फार आनंद झाला.

टिळक दुसऱ्या दिवशी परत आले. त्यांना हे कळले तेव्हा ते म्हणाले, " तू तर माझ्याही पुढे गेलीस ! "

## ४९ : आमची शिल्लक

एक दिवस पाऊस पडत होता. दत्तू व हौशी आपापल्या शाळांना गेली होती. टिळक ईश्वरविद्येच्या वर्गात शिकवायला गेले होते. घरी मी एकटीच होते. दाराशीच काही निवडीत बसले होते.

तो दाराशी एक मुलगी भीक मागायला आली. तिचा नुसता हाडांचा सापळा राहिला होता. मुलीचे डोके पाटीएवढे, अंगात काही त्राण उरलेले नाही. डोळ्यांत प्राण आलेला आहे. अंगावर एक जीर्ण फाटके असे लज्जारक्षणापुरते हातभर कापड, हातात टिनपाट, अशी येऊन ती दारात पावसात उभी राहिली. तिच्या तोंडावर डाग दिल्याचे ताजे वण दिसत होते. प्रथम मी तिला घरात घेतले व तिची विचार-पूस करू लागले.

" तुला भीक मागायला आवडते का घरात राहायला आवडते ?"

" भीक मागायला."

" तू माझ्याजवळ राहतेस का ?"

" हो."

" तुला कोण कोण आहेत ?"

" कोणी नाहीत. सर्वांनी मला सोडून दिले आहे. माझे गावही

फार लांब आहे. "

अशा तऱ्हेने बोलणे-चालणे झाल्यावर मी आपल्या मनाशी तिला ठेवून घेण्याचे ठरविले. तिला न्हाऊ घातले व हौशीचे एक लुगडे नेसायला दिले. पण एवढ्यानेच तिचे स्वरूप किती पालटले !

संध्याकाळी मुले व टिळक घरी आल्यावर ही मुलगी पाहून त्यांना कुतूहल वाटले.

" हे काय आहे ?"

" हे दुष्काळाचे चित्र आहे. मी हिला घेतली. "

" कशाला ? आपल्याला हौशी आहे, देवाने ही तारा दिली, आणखी–"

" आणखी ही 'दया' दिली. मला हिची दया आली व देवानेही हिच्यावर दया केली. "

" बरं, काही हरकत नाही. "

तिचे नाव दया ठेवले.

थोड्याच वेळाने शेजारीपाजारी कित्येक ख्रिस्ती बाया आमच्याकडे आल्या.

" अहो साहेब, ही मुलगी कोणाची आहे ठाऊक आहे का ?"

" नाही ! का ?"

" अहो, ती मांगाची आहे ना ?"

" मग ?"

" तुम्हाला काही नाही वाटत त्याचे ?"

" काही नाही. का ? आम्हाला मांग, महार, ब्राह्मण वगैरे सगळे सारखेच आहेत. "

" तुम्ही आमच्या पुढे गेलात. आम्हाला नाही चालायचे हे !" असे म्हणून त्या बाया गेल्या व पुढे कित्येक दिवस त्यांनी आमचे घर वर्ज्य केले.

टिळकांनी मात्र त्यापुढे घरात महार, मांग वगैरे सर्व जातींचे कामगार ठेवण्यास सुरुवात केली.

दया आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी एक पोक्त वयाची मांगीण

टिळकांशी भांडायला आली.

तिच्या बडबडीतून खालील माहिती गोळा करता आली. दया भीक मागत मागत ह्या म्हातारीकडे गेली. म्हातारीने तिला आसरा दिला. दया भीक मागून आणायची व म्हातारी तिला घरात राहू द्यायची. दोघींचे पोट दयेच्या भिक्षेवर चालायचे.

" तुझ्या घरी येऊन तिला किती दिवस झाले ?"

" आठ दिवस. "

" तेवढ्यावर तिजवर मालकी हक्क स्थापन करतेस काय ? अन् हे डाग कोणी दिले तिच्या गालावर ?"

" मला ठाऊक नाही."

" खोटे बोलतेस थेरडे ? डाग दोन-तीन दिवसांचे दिसतात. खरे सांग, नाही तर पाठवतो तुला हरबरे भरडायला !"

हो-ना करता करता ती कबूल झाली, " पोरगी भरपूर भीक आणीना तेव्हा तिच्या गालाला ' उलीसक ' कोलीत लावलं."

मग मात्र टिळक फारच संतापले व म्हातारी पळून गेली. पुन्हा तिने कधी तोंड दाखविले नाही.

ती गेल्यावर तिच्यासंबंधी आणखी तपास लागला. तरण्याताठ्या पोरी गोळा करून ती विकते असे समजले. खरोखरच देवाने दयावर मोठी दया करून तिला आमच्याकडे पाठविली.

दोन्ही मुली शाळेत जाऊ लागल्या. दोघींनाही एकाच वर्गात घातले. त्या मराठी तिसरीत हळूहळू गेल्या. आम्हाला ह्या मुलींकडून काडीचाही त्रास झाला नाही. त्यांनी चोरीलबाडी वगैरे कधीच काही केली नाही. घरात अगदी घरच्यासारखे त्या वागत. शाळेत जायच्या त्या सरळ शाळेत जाऊन सरळ घरी परत यायच्या. मध्ये कधी कोणा-कडे गेल्या नाहीत की कसलाच चघळपणा त्यांनी केला नाही. घरात थुंकतील, उष्टे-खरकटे जिकडेतिकडे टाकतील असा जो मला धाक होता, तो अगदी अनाठायी ठरला. त्या आम्हाला जसे वागताना पाहत तशाच वागत. शेण लावणे, खरकटे हात धुणे वगैरे गोष्टी न सांगता त्या शिकल्या. चटण्या, कोशिंबरी, लोणची, पापड त्यांना करता येऊ

लागली. स्वैपाकातसुद्धा त्या हुशार झाल्या.

पुढे पुढे दुष्काळाचे स्वरूप फारच उग्र भासू लागले. त्यातच मिशनला काही तूट आली का काही झाले, पण त्यांनी बोर्डिंगमधून काही मुले काढून टाकली. गावात जिकडेतिकडे खळबळ उडाली. मुलांना कोठेच काही आधार नव्हता. रा. सुगंधराव करमरकरांनी टिळकांना ही बातमी येऊन सांगितली. टिळकांना आधी ह्याबद्दल काही माहिती नव्हती. ही बातमी ऐकून टिळकांना फारच वाईट वाटले.

ते मजकडे आले व म्हणाले, "अशी अशी बावीस मुले मिशनने एकाएकी आपल्या शाळेतून काढून टाकली आहेत. ती अन्नान्न करून मरतील. आता काय करायचे ?"

त्या दिवशी आमच्याजवळ शिल्लक सव्वा रुपया व घरात साठवणीत सव्वाशेर ज्वारी होती. पण आमची मोठ्यात मोठी शिल्लक म्हणजे देवावरचा विश्वास ही अगदी भरपूर होती. आम्ही दोघांनी जमिनीवर आपली मस्तके ठेवून मनोभावे परमेश्वराची प्रार्थना केली. नंतर दोघांनी एकमेकांना वचन दिले की, "आपले अन्न व ह्या मुलांचे अन्न ह्यात काहीच फरक करायचा नाही. जी काय ज्वारी-बाजरीची भाकरी मुलांना मिळेल तीच आपणही खायची."

दत्तूला बोलावून आम्ही आमच्या जवळ घेतला. त्याला सांगितले, "बाळ, पहा, तुझे भाऊ आज उपाशी रानावनात फिरत आहेत. आम्ही त्यांना आपल्या घरी आणणार आहो. ते जे खातील ते तुला खावे लागेल. खाशील ना ?"

दत्तू म्हणाला, "हो, मी त्यांच्यावरोबर जेवीन-खाईन. भांडणार नाही."

आणि पुढे मुले आणल्यावर ती जाईपर्यंत ती खात तेच अन्न दत्तूने खाल्ले व आपले वचन पाळले.

टिळकांनी करमरकरांना मुले घेऊन येण्यास सांगितले. आता आमच्यापुढे मोठा प्रश्न येऊन उभा राहिला तो हौशी व दया ह्यांचा. कोठे ठेवायचे ? पुण्यास टिळकांनी सुंदराबाई पोवार ह्यांना मुली शाळेत घेता का, म्हणून विचारले व त्यांनी ताबडतोब मुलींना पाठवून देण्याचे

उलट डाकेने कळविले. दोन्ही मुली ताबडतोब पुण्यास रवाना झाल्या व मुलगे घरी आले. ह्याच सुमाराला खारे करजुण्याला भिक्याला टिळकांनी घेतले. ह्या शास्त्रीबोवासंबंधी मागे मी लिहिलेच आहे.

## ५० : आमचा वाढता संसार

दुष्काळाचे स्वरूप आता अधिकच भीषण दिसू लागले. खायला अन्न नाही तर नाही, पण पिण्यास पाणी मिळण्याची पंचाईत पडू लागली. १८९५ पासून टिळकांच्या ठरलेल्या नोकरमाणसांपैकीच एक पखालावाला भिस्ती होता. त्याने सांगितले, मी बाजारात रुपयाला एक पखाल विकतो, तरी तुम्हाला नेहमीच्या भावाने देईन. मात्र मला सवडीप्रमाणे पाणी देण्याची सवलत द्या. तो रात्री एक-दोनला पाणी आणू लागला. मागील दाराला कुलूप लावून त्याची किल्ली आम्ही पखालवाल्याला देऊन ठेवली होती. तो अगदी विश्वासाने दोन पखाली अगदी तोंडोतोंड भरून आणून घरात पाणी साठवून ठेवी. घरातील भांडी बहुतेक कुंभाराच्याच घरची होती. ती आणखी इतर सारी भांडी– अगदी पाणी पिण्याच्या भांड्यापर्यंत– तो भरून ठेवी. उधार खात्यामुळे, ह्या पखालीच्या सुखसोयीमुळे व टिळकांच्या उदार अंतःकरणामुळे बाहेरचा एवढा मोठा दुष्काळ घरात कधीच कोणाला भासला नाही.

मुलांना उधार कापड आणून कपडे शिवले. कोट, पाटलोणी, टोप्या, शर्ट वगैरे सर्व सरंजाम जिथल्या तिथे केला होता. इतकेच नाही, तर पुष्कळसा काथ्या मागवून बावीस गाद्या शिवल्या. अर्थात त्यांना तितक्याच सतरंज्या, उशा, ब्लांकिटे ही सारी मंडळी आलीच. प्रत्येकाची जेवणाची व पाणी पिण्याची भांडी वेगळी घेतली. भिक्याशास्त्रीबोवांनाही हे सर्व सामान अगदी त्यांच्या शरीराच्या प्रमाणात घेतले. भिक्या सर्वांना फार आवडे. पण तो अत्यंत मठ्ठ असल्याने टिळक त्याला

चांगला बडवीत. कारण ह्याला शास्त्रीबोवा बनवायचा, असा त्यांचा संकल्प; आणि त्याला तर ' रामः रामौ 'ही येईना !

त्याला रोज पहाटे चार-पाचला उठवून टिळकांनी संथा द्यावी; पण तो कधी ' रामः रामौ 'च्या पलीकडे गेला नाही. तेव्हा रोजच्या रोज तोंड धुण्याच्या अगोदरच त्याचा फराळ होत असे. आधी संस्कृत, मग भिक्याचे सुरेल गाणे व टिळकांचा त्रागा व शेवटला प्रवेश म्हणजे आम्ही सगळ्यांनी मिळून केलेली दोघांची समजूत. अशा रीतीने हा साग्रसंगीत फराळाचा प्रयोग म्हणजे एक रोजची करमणूकच होऊन बसली होती सगळ्यांची.

टिळकांनी ह्या बावीस मुलांपैकी काहींना शाळेत घातले, काहींना छापखान्यात लावून दिले व काहींना असेच दुसरीकडे काही कामे शिकण्यासाठी पाठविले. मुले आता त्यांच्या नवीन परिस्थितीत अधिक आनंदात व समाधानात राहू लागल्याने चांगली दिसू लागली. ही मुले आमच्याकडे फारच चांगली राहिली. त्यांनी कधी चोरीलबाडी केली नाही. त्यांच्यातच दत्तू होता.

कामाला दोन बाया होत्या, पण त्यांना सारे काम आटपत नसे. मी त्यांच्या बरोबरीने काम करी. पण दळणाचा फार त्रास होऊ लागला. बाहेर दळण्यास द्यावे तर तितका खर्च वाढतो.

तेव्हा आमच्या मुलांची मी सभा बोलावली व तिच्यापुढे हा प्रश्न ठेवला– " आणखी एक बाई कामाला ठेवावी लागेल, म्हणजे तुमच्यातला एक मुलगा काढावा लागेल. दळण तर आम्हाला आटपत नाही. आपल्याला रोजचे तीन पायल्यांचे पीठ लागते. तेव्हा बाई ठेवायची नसली तर लहान मुलांनी दोन पायल्या दळावे व मोठ्या मुलांनी आम्हाला दोन पायल्या दळू लागावे."

हे म्हणणे मुलांना पटले. तितकाच आमचा खर्च वाचला. कधी मुले आजारी पडली तर त्यांचे मळीण कपडे धुण्याचे काम मी करी. कारण भंगीण आणली तर तिला पैसा द्यावा लागणार. तोच आमच्या भाजीला झाला.

मुलांचा व आमचा संसार अशा रीतीने फार प्रेमाचा व सुखा-

समाधानाचा चालला असता मध्येच एक संकट आले. माझी जशी टिळकांच्या बाबतीत पैशासंबंधी तक्रार होती, तशी डॉ. ह्यूम ह्यांची आम्हा दोघांसंबंधी व विशेषत: माझ्यासंबंधी होती. त्यांना वाटे, मी व्यर्थ पैसे उडविते. व टिळकांच्या संसारासंबंधी मला जशी इतके दिवस काळजी, कळकळ वाटे तशी आता आमच्या दोघांच्या संसारासंबंधी डॉ. ह्यूम ह्यांना वाटू लागली. आम्ही मुले संभाळलेली त्यांना मुळीच आवडली नाहीत.

त्यांचेही बरोबरच होते. दर महिन्याला अगदी पहिल्या तारखेलाच पुढच्याही महिन्याचा पगार संपलेला असे. इतकी पैशाची ओढाताण करून आम्ही परोपकार करीत बसणे म्हणजे शेवटी आपल्याकडे अडचणी घेऊन येणे असे त्यांना वाटे. अर्थात हे सर्व त्यांच्या टिळकांवरील निष्कपट प्रेमामुळे होते. तेव्हा आम्हाला त्यांचा आमच्या संसारात त्यांनी केलेल्या काही काही ढवळाढवळींबद्दल कधी राग आला तरी तो फार वेळ टिकत नसे. डॉ. ह्यूमच्या तोंडात 'आता भावा' असे शब्द फार असत. अगदी हताश होऊन बोलण्याचा प्रसंग आला म्हणजे 'आता भावा'ने बहुतकरून त्यांच्या बोलण्यास सुरुवात होत असे.

त्यांचे टुमणे सुरू झाले की, "ही मुले सोडून द्या. तुमचा पगारच तुम्हाला तुमच्या संसाराला पुरत नाही."

आम्ही म्हणावे, "आम्ही सोडणार नाही. जोपर्यंत त्यांची व्यवस्था लागत नाही तोपर्यंत आम्ही त्यांना संभाळणार."

"तुम्हाला आई-पपा म्हणवून घेण्याची हौस असली तर मी नगरातल्या सर्व बोर्डिंगमधल्या मुलांना तुम्हाला आई-पपा म्हणण्यास सांगतो."

आता मात्र आम्हाला फार राग आला. आम्ही त्यांना जितके खडखडीत बजावता येईल तितके खडखडीतपणे बजावून सांगितले की, "आई-पपा म्हणायला देवाने आम्हाला मुले दिली आहेत. असल्या भलत्याच हौशीसाठी आम्ही ह्या खस्ता खात नाही. मुलांची अनावस्था पाहून आम्ही त्यांच्या खस्ता खात आहोत. जोपर्यंत त्यांची काही सोय होत नाही तोपर्यंत आम्ही त्यांना सोडीत नाही."

" आता भावा– पण तुम्हाला खर्च फार होतो आहे. "

" आम्हाला जो पैसा मिळतो तो आमचेच चोचले करून घेण्यासाठी मिळत नाही. देवाने त्यात पुष्कळांचा वाटा ठेवला आहे. "

" पण भावा, तुमची अडचण होईल. "

मी म्हटले, " साहेब, असे कसे हो तुम्ही म्हणता ? आई खाऊ देईना न् बाप भीक मागू देईना ! "

" आता बहिणी, तुम्ही काय म्हणता ते मला समजले नाही. "

" मी म्हणते, तुम्ही त्यांची व्यवस्था करीत नाही व आम्हाला त्यांना संभाळू देत नाही, हा काय न्याय झाला ? "

" बरं भावा– आता मी जातो. तुम्ही ह्या गोष्टीचा चांगला विचार करा. मीही करतो, " असे म्हणून ह्यूमसाहेब निघून गेले.

आम्ही खूप विचार केला. टिळक म्हणाले, " आमचे लोक ह्या मिशनरींनी किती दुबळे करून ठेवले आहेत ! जसा काही साह्य करण्याचा मक्ता मिशनरींनीच घेतला आहे. कोणाला साह्य करायचे झाले की दाखीव मिशनरीचा बंगला. संपले ! तितकेच आपल्या ह्या ख्रिस्ती लोकांचे साह्य. ही त्यांना सवयच लागून गेली आहे. काही झाले तरी मुलांची चांगली सोय होईपर्यंत त्यांना सोडायचे नाही. "

हो–नाही करता करता अकरा महिने आम्ही ती मुले संभाळली. मला आता मुले संभाळण्याचे जसे काही वेडच लागले होते. मी ह्या मोठ्या मुलांच्या गडबडीत एक दोन महिन्यांचा मुलगा व एक पंधरा दिवसांचा मुलगा संभाळला. बेबी लहानच होती. ह्या तीन मुलांच्या पाळण्याच्या दोऱ्या व दुधाच्या बाटल्या सारख्या माझ्या हातात असत.

डॉ. ह्यूम येऊन माझ्यापुढे उलथी टोपी घेऊन उभे राहत. " आता बहिणी, माझ्या ह्या टोपीत तुमची मुले टाका. मला भीक घाला. "

मी म्हणावे, " देत नाही. "

हा रोजचा फार्स व्हायचा. कंपाउंडच्या बाहेरूनच " भय काय तया ज्याचा प्रभू रे " असे शब्दांची उलटापालट केलेले टिळकांनी रचलेले भजन ऐकू आले, की मी समजे, साहेब आले. ते यायचे ते अगदी गात

गातच यायचे.

एक दिवस अगदी कंटाळून डॉ. ह्यूम म्हणाले, "पहा भावा, तुम्ही अशी मुले संभाळता, तुमची पैशाची अडचण होते. शेवटी ह्यावरून तुमचे भांडण होईल नि मग माझ्या बंगल्यावर याल ते घेऊन."

मी म्हणाले, "साहेब, आमचे लग्न नाही तुमच्या बंगल्यावर ठरले. तेव्हा भांडणही तोडण्याची यातायात आम्ही तुम्हाला देणार नाही."

"आता बहिणी, मी तुमच्यासाठी काय करू ?"

"साहेब, आमच्यासाठी परमेश्वराजवळ प्रार्थना करा."

ही मुले मुलांच्या डॉर्मेटरीतून निघाली होती. एक दिवस डॉ. ह्यूमसाहेबांचे पत्र आले की, 'तुमच्या साऱ्या मुलांची मी माझ्या बोर्डिंगमध्ये व्यवस्था केली आहे. ती डॉर्मेटरीमध्ये जाणार नाहीत व पुन्हा तेथून त्यांना निघण्याचे भय नाही, व माझ्या येथून मी त्यांना काढणार नाही.'

पत्र आले तेव्हा आम्हा दोघांना फार वाईट वाटले. आनंदही झाला होता. मुले जाणार म्हणून दुःख व त्यांची चांगली व्यवस्था लागणार म्हणून आनंद. तेवढ्यातल्या तेवढ्यात आनंदाची आणखी एक गोष्ट म्हणजे ज्या बोर्डिंगात ही मुले जाणार ते आमच्या घराच्या अगदी नजीक होते.

त्या दिवशी मुले जाणार म्हणून त्यांच्यासाठी केशरी भात केला. मध्यरात्र उलटून जाईपर्यंत आम्ही सगळी बोलत बसलो होतो. बोलता बोलता आमच्या सगळ्यांच्याच भेटीला गंगा-यमुना येत होत्या. शेवटी टिळकांनी प्रार्थना केली व आम्ही सगळे आपापल्या बिछान्यावर जाऊन पडलो. आमचे हे एक मोठे थोरले कुटुंब दुसऱ्या दिवशी मोडायचे होते. सर्वांना एकमेकांचा लळा लागला होता.

मुलांमुळे आम्हाला पाचशे रुपये कर्ज झाले होते. त्याचा हिशोब त्याच दिवशी केला होता. टिळक म्हणाले, "मुलांनो, तुमच्यासाठी पुष्कळच कर्ज झाले असेल अशी माझी कल्पना होती, पण देवाच्या दयेने काही विशेष कर्ज झाले नाही. अवघे पाचशेच रुपये कर्ज झाले. आम्ही

हे सारे अगदी निरिच्छ बुद्धीने केले आहे, व परमेश्वर खात्रीने हे फेड-ण्यात आमचे साह्य करील."

आणि खरोखरच टिळकांच्या विश्वासाप्रमाणे झाले. दुसऱ्यात्र दिवशी कोणी अमेरिकन गृहस्थाने टिळकांना ५०० रुपयांचा चेक पाठविला. मुलांचे पाऊल बाहेर पडण्याच्या आधीच कापडवाला व दाणेवाला ह्यांचे पैसे चुकते करून आम्ही ऋणमुक्त झालो. मुले गेली. कर्ज फिटले.

आता आमच्याजवळ तीन तान्ही मुले व भिक्या, एवढी मंडळी राहिली. त्या तान्ह्या मुलांपैकी एकाचा बाप येऊन त्याला घेऊन गेला. दुसरा फारच अशक्त होता. त्याला सुधारण्याचे कितीतरी प्रयत्न केले तरी तो अंग धरीना. एक रात्री तो जो निजला तो निजलाच. मला अतिशय वाईट वाटले. मी निश्चय केला, की आतापासून तान्हे मूल संभाळायचे नाही.

तीन वर्षांनी शास्त्रीबोवांच्या बापाला आपल्या मुलाचा पत्ता लागला. तो त्याचा तपास करीत आला. मुलाने बापाला ओळखले नाही तेव्हा बापाला फार वाईट वाटले. त्याने चार दिवस राहून त्याला लळा लावण्याचा प्रयत्न केला तरी जमेना. शेवटी "चार दिवस घरी घेऊन जाऊ का पोराला ?" असे त्याने टिळकांना विचारले. टिळकांनी परवानगी देताच तो त्याला घेऊन गेला.

म्हटल्याप्रमाणे बरोबर चार दिवसांनी त्याने पोराला बरोबर आणले. पण ह्या चार दिवसांत त्याने त्याला इतका लळा लावला की काही बेसुमार ! तो रोज जिलबी खायला मागू लागला. तरी टिळकांनी त्याला बजावून सांगितले होते, की पोराचे भलते लाड करू नको. आठ दिवसांत भिक्याने आम्हाला भंडावून सोडले. शेवटी आठ दिवसांनी आम्ही एक गडी केला. भिक्याचा सारा कपडालत्ता गुंडाळून त्याच्या हवाली केला. दोन रुपये दिले व भिकोबांची त्यांच्या वडिलांकडे बोळवण केली.

## ५१ : परत भेट

बाप्तिस्म्याच्या वेळेस आम्ही राहुरीला चाललो तेव्हा स्टेशनवर जाताना आमच्या तांग्यामागे दुरून एक गडी पळत येताना दिसला. टिळकांनी तिकिटे काढून आम्हाला डब्यात नेऊन बसविले व ते प्लॅट-फॉर्मवर कोणाशी बोलत उभे होते.

इतक्यात तो गडी डब्यात आला व मला म्हणाला, " बाईसाहे-बांनी सांगितले आहे, की आधी माझे दोनशे रुपये काढा आणि मग पुढे पाऊल टाका. "

हे ऐकून मला मेल्याहून मेल्यासारखे झाले. मजजवळ त्या वेळी पैसे असते वर मी ते ताबडतोब देऊन टाकले असते. पण ' दरिद्राणाम् मनोरथा:' अशी आमची नेहमीची स्थिती. मी टिळकांकडे पाहिले. टिळक नुसते हसले. गाडी हलू लागली. गड्याने खाली उडी टाकली. हो, त्याच्या धमकावणीचा उपयोग गाडीला ब्रेकासारखा थोडाच होणार होता ?

बाप्तिस्मा झाल्यावर आम्ही राहुरीहून परत नगरास आलो. टिळक नगरास ईश्वरविद्येच्या सेमिनरीमध्ये काम करीत असत. तेथील विद्यार्थी म्हणजे आमच्यासारखीच कुटुंबवत्सल माणसे असत. वीसपंच-वीस विद्यार्थी दर तीन-चार वर्षांनी सहकुटुंब येत. हा वर्ग संपून विद्यार्थी आपापल्या गावी जाण्याच्या वेळी आम्ही बहुतकरून सर्व विद्यार्थ्यांना सहकुटुंब फराळाला बोलावीत होतो.

आम्ही राहुरीहून आल्यानंतरची गोष्ट. विद्यार्थी चहाला बोलावले. त्यांच्यासाठी एक पायलीची शेव मी तळली. भूक सडकून लागली होती. इकडे कामाची गडबड. तशीच विस्तवाजवळून उठून काही खाल्ले व ढसाढसा पाणी प्याले. ताबडतोब माझे अंग लाल दिसू लागले. डोके बधिर झाले. मला काही सुचेना.

कामदारणी माझ्यासारख्याच शहाण्या. त्या म्हणत, बाई, तुम्हाला सर्दी झाली. पण मला काम करणे अशक्य झाले. ते सारे मग सौ. शहाबाई मिसाळ व त्यांची मुलगी ताराबाई ह्यांनी केले. मला सपाटून ताप भरला. डॉक्टरीणबाई आल्या व त्यांनी सांगितले, की हा गोवर आहे. मला त्यांनी बाजूला ठेवण्यास सांगितले व त्याप्रमाणे मला दुसऱ्या निराळ्या खोलीत निजविले.

आईच्या मागे माझी बहीण मला माझ्या आईच्या जागी होती. पण ती स्वभावाने जितकी प्रेमळ तितकीच अभिमानी होती. गावातल्या गावात ती असून तिची-माझी गाठ नव्हती. दत्तूच्या मुंजीत तिला पाहिली तेवढीच. 'तिला खोगीर द्या निजायला' हे जे नगरास आल्यावर तिच्या तोंडचे शब्द ऐकले तेवढेच. आम्ही आल्यावर ती आजारी पडली व आमच्या बाप्तिस्म्याचे वृत्त ऐकून अंथरुणालाच खिळली.

तिच्या मानी स्वभावाची व प्रेमळ स्वभावाची सांगड घालणे मोठे कठीण होते. ह्या दोन वृत्तींचेच तिच्यात अंतस्थ तुमुल युद्ध चालून तिला हे दुखणे आले होते. नानासाहेबांचेही मजवर मुलीप्रमाणे प्रेम होते. परंतु बायकोमुळे त्यांनीही आमचे नाव सोडून दिले होते.

पण मला गोवर आला हे कळताच नानासाहेबांना राहवेना. ते कोणाला न सांगताच चोरून मला भेटायला आले. एकमेकांना पाहताच आम्हा दोघांनाही सुखदुःखाचे खूप हुंदके आले. ते बराच वेळ बसले.

मी त्यांना म्हटले, " माझी व माझ्या बहिणीची भेट करवा."

" मावशी, ते शक्य नाही. तुझ्याविषयीच्या दुःखात घारूमाईच्या चितेची सुपारी पडली आहे."

माझ्या आठवणीत त्या वेळेपर्यंत माझ्या बहिणीच्या आयुष्यात चिंता-काळज्या कधी कराव्या लागल्या नव्हत्या; पण आता एकसे दो भले असे झाले. पाठची बहीण व पोटची मुलगी. पण ह्याच दोन सुऱ्या तिच्या गळ्यावर ठेवण्यात आल्या होत्या.

जावयाने घरात एक बाई आणली. पैसा कलालाच्या दुकानी

जाऊ लागला. नोकरी गेली. घारूला अत्यंत जाच होऊ लागला आणि त्यांच्या उदरभरणासाठी नानासाहेबांना दरमहा बरीचशी ठराविक रक्कम पाठविणे भाग पडू लागले. इतके करून पुन्हा मुलीला सुख नाही ते नाहीच.

ह्या साऱ्या संकटाच्या भोवऱ्यात सापडून माझी बहीण अगदी भांबावून गेली. मी ख्रिस्ती होण्यापूर्वी ती घरातल्या घरात फिरत तरी होती; पण माझ्या बाप्तिस्म्याचे वृत्त कानी पडताच तिने अगदीच अंथरूण धरले. तिच्या आजारामुळे नानासाहेबांनी हवापालट तरी व्हावा म्हणून स्टेशनजवळ बंगला घेतला होता. आम्ही राहुरीस जाताना स्टेशनवर वळलेला तांगा तिच्या नजरेस त्या बंगल्यातून पडला व लागलीच तिने तो गडी मजकडे दोनशे रुपये मागण्यास स्टेशनवर पाठविला होता.

नानासाहेब घरी गेले. गोवरातून उठल्यावर एक दिवस मला नेण्यासाठी त्यांच्याकडून तांगा आला. मी गेले. घारूमाई माझी वाटच पाहत बसली होती. आमच्या भेटीत उन्हापावसास पूर्ण भरती आली. आमचे प्रेमच तसे होते. मी मावशी व ती भाची, ह्या नात्याच्या प्रेमात मैत्रीची भर पडली होती व तिच्या दुःखाने तर तिला आता कोणीतरी अगदी जवळचे पाहिजेच होते. माझ्यावाचून पोटातले बोलण्यास तिला दुसरे कोणी नव्हते. पण हसण्यावाचून व रडण्यावाचून त्या दिवशी आम्हाला दुसरे काहीच करता येईना.

अशा स्थितीत पुष्कळ वेळ गेल्यावर ती आतल्या खोलीत आपल्या आईकडे गेली व मी आल्याचे तिने तिला सांगितले. मी आल्याचे कळताच भिकूताईने भिंतीकडे तोंड फिरविले. घारूमाईने तिची फार मनधरणी केली, पण ती काही बोलेना.

ती निजली होती त्या माडीवर दुसऱ्या दालनात घारूने मला नेले. मी तेथून डोकावून पाहिले. मी काय पाहत होते! नानासाहेबांनी सांगितले ते खरेच होते! 'तिचे उद्याचे मरण तू आजला ओढवून घेशील.' त्यांचे हे शब्द मला सारखे भेडसावू लागले. मी पाऊल न वाजवता तिच्याजवळ गेले व हळूच तिच्याकडे डोकावून पाहू लागले.

घारू तिला म्हणाली, " मावशी आली आहे. "

पण तिने तोंड वळविले नाही. नुसते जाताना एवढे म्हणाली, " त्या महारणीच्या पदरात टाका काहीतरी. "

ते दिवाळीचे दिवस होते, आणि आईने सांगण्याच्या आधीच पाटीभर फटाके व बरेचसे फराळाचे माझ्याबरोबर देण्यासाठी घारूने काढून ठेवले होते. तिने परात भरून हे सारे माझ्या ओटीत टाकले. मायेला लाज नसते. जिने दोनशे रुपये मागण्यासाठी स्टेशनवर गडी पाठविला होता तिनेच महारणीला वाढायचा हुकूम केला होता.

आता दर सणावाराला वाढून येऊ लागले व मी जवळजवळ दररोज भिकूताईकडे जाऊ लागले. दत्तूही माझ्याबरोबर येत असे. हौशीही कधी कधी येई. एक दिवस दत्तू एकटाच तिच्या खोलीत होता. तिने आपले आमच्यावरील प्रेम उडाले असल्याचे दाखविण्याचे आटोकाट प्रयत्न केले तरी शेवटी खरे ते त्या वेळी बाहेर आले.

त्याला एकटचाला पाहून ती म्हणाली, " ये बाळ माझ्या जवळ. "

तो जवळ गेला.

" आणखी जवळ ये. "

तिने आपले पांघरूण वर केले व म्हटले, " ये, माझ्या पोटाशी चिटकून नीज. "

" पण मावशी तुला माझा विटाळ होईल. "

" होऊ दे झाला तर, " असे म्हणून तिने त्याला आपल्या पोटाशी घट्ट धरले. मी मधल्या दारातून हे पाहत होते. आम्ही दोघीही ढसढसा रडलो, पण तिने मला पाहिले नाही.

" दत्तू, तू आणि हौशी मला रोज भेटायला येत जा. तुझी आई नाही आली तरी चालेल."

" येऊ बरं मावशी. "

आणि त्यानंतर ही दोघे रोज तिला भेटायला जाऊ लागली.

पुढे पुढे मीही तिला डोळ्यांपुढे खपू लागले. आणखी काही दिवसांनी तर मी आले नाही म्हणजे तिचा जीव कासावीस होई. पडल्या पडल्या मनी केव्हा येईल म्हणून खिडकीतून ती सारखी बाहेर पाहत

राही. मी आता कधी कधी रात्रंदिवससुद्धा तिच्याकडे राहू लागले. टिळकही रोज येऊन तिला भेटत.

ज्या बहिणीला खोगीर देण्यास तिने सांगितले होते त्याच बहिणीला आता कोणी नुसते जाजम निजायला दिले तर ते तिला खपेनासे झाले. ती म्हणे, " का ? ती का वाटेवरची चोर आहे ? तिला चांगला बिछाना द्या निजायला."

माझ्याविषयी कोणी काही बोलले तर तिला फार वाईट वाटे. ती त्याची चांगली खरमरीत हजेरी घेई.

एक बाई एक दिवस म्हणाली, " का, इतके करून शेवटी बहीण निघून गेली ना ?"

तिने चटकन तिला गप्प केले. " निघून गेली म्हणजे कोणाचा हात धरून गेली का काय माझी बहीण ?"

बेबीला मी तिच्याकडे घेऊन जात असे. तिचेही ती कौतुक करी. एक दिवस तिला तिने उचलून घेतले." किती ग जड आहे तुझी पोरगी ! मला उचलत नाही. "

पण खरी गोष्ट म्हणजे तीच फार क्षीण झाली होती. तिला पोरीला उचलून घेणे तिच्या शक्तीबाहेरचे काम होते. माझ्याबद्दल पुढे पुढे तिच्या मनात काहीही किल्मिष राहिले नाही. ती म्हणे, " मने, फार उत्तम झाले तू गेलीस. आता माझी एक मोठी काळजी दूर झाली."

टिळक आता पहिल्यासारखे अस्थिर राहिले नव्हते. तेव्हा तिला आमच्या नव्या संसाराकडे पाहून आनंद होई. माझ्याबद्दल मनात आता काही राहिले नाही.

तरी एक गोष्ट मात्र परत मिळाली नाही; ती तिची सुदृढ प्रकृती. ती अधिकाधिक क्षीण होत चालली. शेवटी तिला आपल्या जन्मभूमीला तरी बरे वाटेल, म्हणून तिला नाशकास नेण्याचे ठरले. मी स्टेशनवर तिला पोचवायला गेले होते. तेव्हाही तिने हेच उद्गार काढले की, " मने, फार चांगले केलेस तू आपल्या नवऱ्याकडे गेलीस."

उन्हाळा आला. टिळकांच्या महाबळेश्वरच्या वारीचे दिवस आले. परंतु ह्या वर्षी महाबळेश्वराला न जाण्याचे त्यांनी ठरविले. कारण

त्यांच्यापुढे कामाचे डोंगर पडले होते. काम मिशनचे नव्हते तर लोकांचे होते. दुष्काळामुळे लोकांचे धंदे अजिबात बुडाले होते. त्यांना साह्य करण्याच्या खटपटीत ते गुंतले होते. कोणाला तगाई मिळवून दे, कोणाला माग घेऊन दे, कोणाला कपडा वाट. आणि हा सर्व पैसा त्यांनी स्वतः दारोदार हिंडून मिळविला होता. त्यांचे काम पाहून सरकारातूनही त्यांना काही साह्य मिळाले होते.

कोमटी, भाजीवाल्या वगैरेंना चार, सहा, दहापर्यंत रुपये देऊन त्यांचे धंदे त्यांनी उभे केले. त्यांच्याकडे लुगडी वाटण्याचेही काम होते. ह्यात एक एक बाई रोज रोज निरनिराळ्या पेहरावाने येऊन चार चार लुगडी उपटू लागल्याचे निदर्शनास आल्याने बायांची जुनी लुगडी ठेवून घेण्याचे काम मजकडे आले. पैशाचे व कपड्याचे हे जोखमीचे काम टिळकांच्या अंगावर पडल्याने व त्यांना पैसा नीट संभाळता येत नाही अशी माझी ठाम समजूत असल्याने मी बनले होते खजिनदार व त्यामुळे मलाही घर सोडता येईनासे झाले.

ह्या भयंकर दिव्यातून बाहेर पडायला तीन-चार महिने लागले. ह्या अवधीत मला बहिणीकडे जाण्यास मुळीच झाले नाही. पुढे ती नाशकास गेली असे कळले, पण त्यापुढे काही कळेना. दुष्काळ मवाळ होऊ लागताच माझ्या बहिणीची काळजी माझ्या मनात जहाल होऊ लागली. टिळकांकडून मी पत्रावर पत्रे टाकू लागले, पण पेंडशांचे काही उत्तर येईना. जो भेटेल त्याला मी वेड्यासारखे माझ्या बहिणीसंबंधी विचारी.

एक दिवस एक गृहस्थ सहज आमच्याकडे आले असता अशीच विचारपूस केली. तो म्हणाला, " तुम्हाला माहीत नाही का ?"

" नाही. काय आहे ? मला तिची फार काळजी लागून राहिली आहे."

" अहो, त्यांना तर दहा-बारा दिवस झाले आता !"

माझे हातपाय गळाले. मजवर वज्राघात झाला. माझ्यामुळे तिला कष्ट, आजार व शेवटी मृत्यू आला; तेव्हा मला ती बातमी ऐकून काय

स्मृ... २०

वाटले असेल ह्याची शब्दापेक्षा कल्पनेनेच चांगली जाणीव होईल.

टिळकांनी तार केली. तिचे उत्तर पत्राने आले, की माझी रजा संपली. मी दोन-तीन दिवसांत येतो. नाशकास कर्मठपणा अधिक, म्हणून मुद्दाम मला आधी त्यांनी कळविले नव्हते. आपण कळविले आणि ही उठून नाशकास आली म्हणजे त्या दुःखाच्या प्रसंगात हिच्या शिवाशिवीचा आणखी गोंधळ, असे त्यांना वाटले.

पेंडसे आले. त्यांना मी भेटायला गेले. एकमेकांना पाहून आम्हाला जे काय वाटले ते वर्णन करून सांगताच येणे शक्य नाही.

पेंडशांना जेवायला दुसरीकडे जायचे होते, पण ते मला जेवल्यावाचून घरी जाऊ देईनात. " मावशी, तुझा मेव्हणा वारला व बहीण जिवंत आहे असे समज. मी तुला मुळीच अंतर देणार नाही, " असे म्हणून ते माझे जेवण होईपर्यंत मजजवळ बसून राहिले.

## ५२ : परमेश्वरी योजना

काहीतरी शिकावे असे मला वाटले. म्हणजे टिळकांच्या इच्छेप्रमाणे विद्वान व्हावे असे नसे वाटत, पण असे काही शिकावे, की त्याचा अडीअडचणीत उपयोग व्हावा. शिवाय त्या शिक्षणाने दुसऱ्यांच्याही उपयोगी पडता येईल.

डॉ. ज्युलिया बिसेल ह्या फारच प्रेमळ डॉक्टरीणबाई होत्या. त्यांचे मराठी बोलणेही अगदी आपल्या इकडच्यासारखे असे. अगदी एखादी ब्राह्मणाची बाई बोलते आहे असे वाटे. त्यांची-माझी चांगली दोस्ती झाली होती, व त्यांच्या उत्तेजनाने मी नर्सिंग शिकण्याचे ठरविले. माझे थोडेसे शिक्षण त्यांच्याजवळ झालेही. पण इतक्यात त्यांची अमेरिकेला जाण्याची वेळ आली.

डॉ. ज्युलियाबाई अमेरिकेला गेल्या, पण त्यांच्या जागी अमेरिके-

हून दोन तरुण व उत्साही डॉक्टर आले. ह्यांची नावे डॉ. वील्स व डॉ. हार्डिंग अशी होती.

डॉ. हार्डिंग यांनी नगरास येताच नर्सेसचा वर्ग सुरू केला. मला धड मराठीही लिहिता-वाचता येत नसे, तेव्हा इंग्रजी कोठून येणार? पण माझे धैर्य मोठे. मी डॉ. हार्डिंगकडे जाऊन आपल्याला नर्सिंगचे शिक्षण द्यावे अशी विनंती केली. टिळकांची बायको. ती हुशार असणारच, अशा समजुतीने डॉक्टरसाहेबांनी मला ताबडतोब रुकार दिला.

क्लास जोरात सुरू झाला. मी माझी वही व पेन्सिल घेऊन क्लासाला जाऊ लागले. पण वही-पेन्सिल हातात असली की आपोआप हलू थोडीच लागतात? माझे आठवून आठवून एखाद-दुसरे अक्षर झाले की त्यांच्या एक-दोन ओळीही संपून जायच्या. आणि माझ्या दोन ओळी संपल्या, की त्यांचा दोन पॅरेग्राफ मजकूर सांगून होई. पुढे पुढे माझे सारे लेखन क्लास सुटल्यावर एखाद्या विद्यार्थिनीच्या साहाय्याने व्हायचे. डॉ. हार्डिंग इंग्रजीमध्ये शिकवायचे! म्हणजे माझ्या ह्या शिक्षणाचा पुरा आनंद होता म्हटले तरी चालेल.

ईश्वरी योजना काही अगाध असतात. तीन महिन्यांची परीक्षा झाली. तीत मी पास झाले! का डॉक्टरांनी करून घेतले देव जाणे! मला पहिल्यापासून हा नादच. देशी औषधांचा मजजवळ मोठा साठा असायचा, आणि कोणी असा औषधांचा शोकी भेटला, की आम्ही एकमेकांना आपली औषधे सांगायची, असे माझे वैदूज्ञान बरेच वाढले होते. वैद्यज्ञान मात्र बेताचेच होते. माझ्या ह्या वैदूज्ञानात आता इंग्रजी औषधांची भर पडली.

माझे ज्ञानही केवळ पुस्तकी नसे. ते पुस्तकात बंद पडून न राहता अगदी बाहेर हवा खायला निघे. तसे एक दिवस होऊन मी ताराच्या डोळ्यांवर प्रयोग केला. त्या वेळी सगुणाबाई नावाची नावाप्रमाणे सद्गुणी बाई दुष्काळात आमच्याकडे आली होती. तिला व तिच्या आठ वर्षांच्या मुलीला आम्ही पोशीत होतो व कपडालत्ता करीत होतो, आणि वरती कामाबद्दल महिन्याचे सबंध आठ आणे देत होतो.

ताराच्या डोळ्यांत खुपऱ्या झाल्या होत्या. ती त्यामुळे फार कुर-

कूर करी. मी आता पहिली परीक्षा पास झालेली नर्स होते! सगुणाबाईला मुलीच्या खुपऱ्या उघडायला लावून त्यावर मी जोराने मोरचुदाचा खडा फिरविला. ताराने रडून भलताच आकांत केला.

टिळक घरी आले. त्यांनी माझ्या शहाणपणाची खूपच तारीफ केली.

"तू डॉक्टर होतीस का? आता पोरीचे डोळे फुटले तर तू तिला हाती धरून वागवशील का?"

मी म्हणे, "देवा, माझे डोळे फुटू दे पण पोरीचे बरे होऊ दे."

सकाळी आठ वाजता माझी डॉक्टरी झाली आणि संध्याकाळी पाच झाले तरी पोरगी डोळे उघडीना. आता बरीक माझ्या काळजाने ठाव सोडला.

टिळक बाहेर गेले होते. ते परत आल्यावर त्यांनी तिचे डोळे उघडून पाहण्याचा प्रयत्न केला, तो डोळ्यातून रक्ताचे थेंब गळू लागले. टिळक बोलले ते खरे झाले! हिचे डोळे फुटले. आता कसे होणार?

मी बोरीक लोशन घेऊन बळेच डोळे उघडून कापसाने पुसू लागले, तोच एका डोळ्यातून चिचोक्यासारखे काही बाहेर पडले. झाले, डोळा बाहेर पडला. दुसरा तरी पाहावा, असे म्हणून दुसरा धुतला तो त्यातूनही तसेच काही बाहेर पडले. भांड्याचा आवाज केला तो तिने डोळे उघडून तिकडे पाहिले. माझा आनंद गगनात मावेना. डोळे चांगले होते. खुपऱ्या कापून निघाल्या होत्या! टिळकांना फार आनंद झाला. पण तिला बरे नव्हतेच. तिला बरेच दिवस थोडा थोडा ताप येत होता.

नगरातील तो दुसरा प्लेग. उंदराने जाहिरनामे फडकाविले. टोचणी सुरू झाली. पेत्रस विठ्ठल हिवाळे नावाचा एक तरुण मुलगा आमच्याकडे होता. तो आपल्या गावाला गेला. लोक नगर सोडू लागले. टिळकांनी दत्तूला राहुरीस नेऊन एका गृहस्थाकडे ठेवले. ताराचा नाच चालूच होता.

डॉ. हार्डिगला तिला पाहण्यास आणले. त्यांनी तपासून सांगितले, "भिण्याचे कारण नाही. ताप साधाच आहे."

मी म्हणाले, "पण डॉक्टर, ह्या गरसा कशाच्या आहेत?"

त्यांनी त्या तपासून सांगितले, " मुलांना अशाच गरसा असतात."

मी म्हटले, " प्लेग तर नाही ना ?"

ते म्हणाले, " नाही. पण तुम्ही सर्वजण टोचून घ्या."

टिळक राहुरीस दत्तूला भेटायला गेले होते. ते टोचण्याच्या विरुद्ध होते. त्यांना दोन-चार वेळा विचारले तर त्यांनी टोचायचे नाही म्हणून सांगितले. म्हणूनच मी दत्तूला राहुरीला पाठविले. मला ते म्हणाले, " दत्तूला मुद्दाम राहुरीला पाठविला आहे. बेबीला टोचायचे नाही व मलाही टोचायचे नाही. तुला पाहिजे तर तू टोचून घे. मी काहीच सांगत नाही." असे सांगून ते राहुरीस निघून गेले होते.

दया काही दिवसांसाठी नगरास आली होती. संतकाका नावाचे एक ब्राह्मण ख्रिस्ती झाले होते. त्यांचे पत्र आले की, मला प्लेग झाला आहे. तरी पत्र पाहताच पंचवीस रुपये पाठवा. टिळक गावाला गेलेले आणि नेहमीच्या सरावाप्रमाणे मजजवळ पैसे नसायचे हे ठरलेले.

तेव्हा ते पत्र तसेच बाजूला ठेवले. मी, दया, सगुणाबाई व तिची मुलगी– इतकी माणसे डॉ. हार्डिगकडे जाऊन आम्ही टिळकांच्या गैर-हजेरीत टोचून घेतले. टोचणी झाल्यावर डॉ. हार्डिग काही ऑपरेशन करण्यास वडाळच्याला गेले. टिळक राहुरीहून परत आले. त्यांना संत-काकांचे पत्र मिळाले. त्यांनी लागलीच बेबीची बिंदी मोडून त्यांना तारेने पैसे पाठविले.

इकडे वडाळच्यास ऑपरेशन करताना डॉ. हार्डिग ह्यांना ब्लड पॉइझन झाल्याची बातमी हां हां म्हणता साऱ्या नगरात पसरली.

टोचणी नवीनच होती. लोकांना सवय नव्हती. आमचे सर्वांचे हात सुजून आम्हाला तापही आला होता. त्यातच बिन टोचलेली तारा होती. तिचे खाणे-पिणे सगळे आमच्यातच होत असे. इतक्यात एक दिवस तिच्या बिछान्यावर एक प्लेगचा उंदीर फिरू लागला व तेथेच उशागती पडून तो मेला.

घरात आम्ही सर्व आजारी. मुलगी लहान. कामाला एक गडी ठेवलेला. तो नवीन. असा सारा थाट होता. इतक्यात एक माणूस निरोप घेऊन आला, की डॉ. हार्डिग ह्यांनी आपल्या क्लासमधील सर्व विद्या-

थ्यांना भेटायला बोलाविले आहे. मुलीला टाकून मला जाववेना. इकडे डॉक्टरांना ब्लड पॉइझन झालेले, तेव्हा तिकडेही मन ओढू लागले.

शेवटी ताराला दयाच्या व सगुणाबाईंच्या अंगावर टाकून मी निघाले. डॉक्टरांची ती शेवटची भेट होती. आम्ही सर्वजणी आलेल्या पाहून त्यांना फार आनंद झाला. ते म्हणाले, "मी आता दुसरीकडे जातो. माझे येथले काम संपले. तुम्ही आपले शिकणे सोडू नका. हे काम फार चांगले आहे. तुम्ही सगळ्याजणी फार चांगल्या शिकला व पुढेही शिका."

त्यांना ताप फार आला होता. शेवटी ते गुडबाय म्हणाले. आम्ही कोणी त्यांना गुडबाय म्हणालो नाही.

आम्ही म्हणालो, "साहेब, आम्ही काय करावे ?"

"प्रार्थना."

एवढे म्हणून त्यांनी पाठ फिरविली. जवळ त्यांची बायको होती. दुसरे कोणी नव्हते. तिला दिवस गेलेले होते. वयही फार नव्हते. आम्ही तिला म्हणालो, "आमची काही गरज लागली तर आम्हाला बोलवा." तेथून आम्ही उपासनामंदिरात जाऊन परमेश्वराची प्रार्थना केली व मग घरोघर गेलो.

घरी आले तो सगुणाबाई सांगू लागली की, "तारा धावत सुटते व म्हणते, मला देवळात न्या व चांगले कपडे घाला."

पाहते तो तिला भयंकर ताप भरलेला ! काही विचारावे तो ती बोलेना.

टिळक सगुणाबाईवर संतापले. "तूच हिला घेऊन फिरतेस. त्यामुळे हा ताप आला. आता काही झाले तर भरून देशील का माझी मुलगी ?"

सगुणाबाई बिचारी एक अक्षर न बोलता स्वस्थ बसली. तिला त्यांचा स्वभाव माहीत होता. शेजारी नानाजी भोसले राहत होते. त्यांना बोलावून आणले. त्यांनी काही देशी उपाय सांगितले ते केले. रात्रभर पोरीला मांडीवर घेऊन बसलो होतो. ती काही शुद्धीत नव्हती.

सकाळी गाडी पाठवून डॉ. सोराबजीला बोलावून आणले. त्यांनी

सांगितले, " भिण्याचे कारण नाही. मी औषध पाठवून देतो."

इतक्यात डॉ. हार्डिंग वारल्याची बातमी आली.

सहा महिन्यांत गावातील सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांत ते किती लोकप्रिय झाले होते ते त्यांच्या प्रेतयात्रेला जमलेल्या अफाट जनसमूहावरून दिसून आले. सगळा दिवस गावात तांगा मिळण्याची मारामार पडली. टिळक तिकडेच गेले होते. माझी जाण्याची धडपड होती, पण बेबी अशा किंकाळ्या फोडू लागली की मला बाहेर पडणे शक्यच राहिले नाही.

डॉक्टरने तर अशी परीक्षा केली. सर्वांचे हात दुखत होते. गडी औषधाला गेला तो तिकडेच पळून गेला. घरात पैसे मुळीच नाहीत. नानाजी भोसल्यांना शेजारून बोलावून त्यांच्याजवळ मोहोरेची अंगठी मोडण्यास दिली. ते परत आले व सांगू लागले की, दुकाने सर्व बंद. कोणाला म्हटले तर म्हणतात, आमचा सोन्यासारखा जीव सांभाळायचा का सोने खरेदी करायचे ? झाले ! सरड्याची धाव कुंपणापर्यंत. काय करावे काही सुचेना. बोर्डिंगच्या मुलांनी येऊन दळले. आम्ही एकेका हाताने स्वैपाक केला. मुलीला काय झाले होते हे निश्चितपणे ठरेना.

इतक्यात डॉ. उमराव आले. त्यांनी तिला पाहताच सांगितले, की हा प्लेग आहे.

बारा वाजता टिळक परत आले. त्यांना ही हकीगत समजल्यावर ते म्हणाले, " कोणी आपल्याला येथून जा म्हणायच्या आधी आपणच गेलेले बरे."

आम्ही प्रार्थना केली.

टिळक म्हणाले, " ह्यातही परमेश्वराची काही विशेष योजना असेल."

आता मोठी काळजी येऊन पडली. घरात पैसे तर मुळीच नव्हते. डॉ. ह्यूमजवळ त्या दिवशी पैसे मागणे शक्य नव्हते. टिळक पुन्हा डॉ. हार्डिंगच्या बंगल्यावर गेले. आम्ही सारी माणसे तशी आजारीच. पोरीच्या किंकाळ्या बेसुमार वाढल्या. गाड्या करायला पैसा नाही व त्या शोधून आणायला पुरुष माणूस नाही.

इतक्यात दारावरून झपझप पावले टाकीत एक माणूस चाललेला दिसला. ताराला प्लेग झाल्याचे जिकडेतिकडे झाले होते. त्यामुळे आमच्या घरी कोणी फिरकत नव्हते. ह्या गृहस्थाला मी कधी तीन रुपये उसने दिले होते. मी धावत धावत कंपाउंडच्या भिंतीला येऊन त्याला थांबविले. त्याला आत बोलविले नाही. कारण आत येण्याची त्याची इच्छा नव्हती हे त्याच्या वागण्यावरून दिसत होते.

मी त्याच्याजवळ माझे तीन रुपये मागितले. त्याने चटकन पाचाची एक नोट काढून माझ्या हवाली केली व तो तेथून चटकन निघून गेला. मला तरी दुसरे काय पाहिजे होते ? त्या वेळी प्लेगला लोक फार भीत असत.

मी जशी काही कोठे परगावीच हवा बदलायला निघाले होते. पाटचा-वरवंटचापासून सर्व सामानाची एक गाडी भरून सेग्रिगेशन कँपवर ती पाठवून दिली. इतके करता करता चाराचा सुमार झाला. सगुणाबाईला तांगा आणण्यास पाठविले, पण तांगा काही मिळेना. सर्व तांगे डॉ. हार्डिंगच्या प्रेतयात्रेसाठी थोपवून धरलेले.

इतक्यात सामानाची गाडी परत आली ! इतके सामान तेथे ठेवू देत नाहीत. बेताचे काढून घेतले व बाकीचे परत पाठविले. पुन्हा सामान उतरून आवरून ठेवावे लागले.

अंधार पडला. टिळक कंदील लावून काही लिहीत बसले. आम्ही गाडचांची वाट पाहत होतो. सगुणाबाईला मी म्हटले, " सगुणाबाई, गडी पळून गेला आहे. तुला जर भीती वाटत असली तर तू आपली जा."

ती म्हणाली, " बाई, मरण काही कोणाला चुकत नाही. पण दुष्काळात तुम्ही जो मला आणि माझ्या मुलीला आसरा दिला तो माझ्या स्मरणातून जाणार नाही. मी कशी बरं बेइमान होईन ?"

एका अडाणी बाईचे केवढे मोठे मन हे ! आम्ही सांभाळलेल्या मुलांच्या कानावर जेव्हा आमची अडचण गेली तेव्हा ती म्हणाली, " दुष्काळात ज्यांनी आपला तोंडचा घास आपल्याला काढून दिला त्यांच्यावर हा प्रसंग आहे. आपण त्यांच्या साह्याला धावून गेले पाहिजे." असे ठरवून ते बोर्डिंग मास्तरकडे परवानगी मागावयाला गेले.

मास्तर म्हणाले, "तुमचे करणे अगदी बरोबर आहे, ह्याबद्दल काही वाद नाही, पण अशा परिस्थितीत मला तुम्हाला परवानगी देता येत नाही. तुम्ही उद्या साहेबांना विचारा."

मुले म्हणाली, "त्यांना आज गरज आहे न् उद्या साहेबांना विचारून काय करायचे ?"

मास्तरांनी सांगितले, "तुम्हाला वाटेल ते करा. मी मात्र परवानगी देत नाही."

उलट मुलांनी म्हटले, "आम्हाला जरी बोर्डिंगात परत घेतले नाही तरी चालेल. आम्ही जाणार." असे सांगून मुले आमच्या साह्याला निघून आली.

"का रे बाबांनो, का आला ?"

"तुम्हाला साह्य करायला."

"जर तुम्हाला उद्या काढून दिले तर ?"

"देव आमच्याबरोबर आहे."

"बरं तर, आता काही टांगा, गाडी पहा." एकाने बैलगाडी आणली. त्याची बोली होती, की प्लेगचा रोगी गाडीत घ्यायचा नाही.

थोडी थंड हवा लागताच बेबी बोलू लागली. गाडीवाल्याचा समज झाला, की रोगी पुढे गेला. ती सर्व मुलांशी त्यांची नावे घेऊन बोलू लागली. मला वाटले, आपण उगीच हिला घेऊन चाललो. ही तर चांगली धडाधड बोलते आहे. ती काही बोलायची, मुले उत्तर करायची, अशा रीतीने आम्ही मजेत चाललो होतो.

अंधार गुडुप पडला होता. जवळ कंदील नव्हता. गाडीची खडखड, मुलीची बडबड व माझ्या उरातील धडधड, अशा थाटात खाचखळग्यांतून आम्ही पुढे दिसणाऱ्या कंदिलाच्या धोरणाने कँप गाठला. आमचे स्वागत करण्यास एका झोपडीतून लिहिता लिहिता टिळक उठून सामोरे आले.

"आपल्याला तीन झोपड्या मिळाल्या. एका स्वैंपाकाला, एक ताराला व एक मला लिहिण्यासाठी" असे त्यांनी सांगितले.

डॉक्टरने येऊन ताराला तपासले. तिला १०५ डिग्री ताप होता.

ते म्हणाले, "बाई, तुम्ही मुलीजवळ राहू नका. तुम्हाला प्लेग होईल. ही बाई बसेल."

मी म्हणाले, "का ? ती कोणाजवळ बसली होती म्हणून तिला प्लेग झाला ? आणि दुसरीकडे मी राहिले तर मला कशावरून होणार नाही ? आणि मी जर हिला सोडून दूर राहावयाचे तर ह्या कामाच्या बाईनें काय म्हणून तिच्याजवळ राहावे ?"

डॉक्टर गप्प झाले. मुले व दया गेली. झोपडीत मी, सगुणाबाई व तारा होतो. टिळकांनी त्या मंडळीला खाण्यास नेऊन दिले व काही आम्हाला आणून दिले. पण कशाचे ते खाणे आणि कशाचे पिणे ! पौषाचा महिना. कडाक्याची थंडी. सकाळची वाळलेली ज्वारीची भाकरी व तेथील खापराच्या घागरीतील बर्फासारखे थंडगार पाणी. मनात नाना प्रकारच्या काळज्या. गाडीला दोन रुपये दिले. आता जवळ एक कवडी नाही.

झोपडीच्या खाली व वर हात हात जागा मोकळी. कारण काय म्हणे, तर व्हेंटिलेशन ! त्या झोपड्या सर्व पत्र्याच्या होत्या. त्या रात्रीतून इतक्या थंडगार व्हायच्या की आतील सर्वांनाच खरोखरचे थंड होण्याची पाळी यायची.

तीन बाजूंस आजारी लोक. त्यांचे ओरडणे, पत्रे वाजविणे. इतकेच नाही तर एखादा रोगी पत्र्यावर चढून धपकन दुसऱ्या खोलीत उडी मारायचा. खाली जमीन केलेली नाही. जमिनीवर गाटेगोटे पायाला बोचायचे. पोटात अन्न नाही, डोळ्याला झोप नाही. मुलीच्या आरोळ्या चाललेल्या. मला वाटले, खरोखर जर यमपुरी कोठे असेल तर ती येथेच आहे. ती जागा भेसूर, ती रात्र भेसूर, भोवतालची परिस्थिती भेसूर आणि तिने बनविलेले स्वतःचे मन भेसूर !

रोग्यांबरोबर त्यांची माणसेही ओरडत व भांडत. "अहो, तुमचा रोगी फार ओरडतो. त्याला गप करा. आमच्या रोग्याचा आत्ताशा कोठे डोळा लागला आहे." कोणी खरेच आजारी तर कोणी घाबरूनच ओरडायला लागलेले !

दुसऱ्या दिवशी डॉक्टर आले तेव्हा मी त्यांना म्हणाले, "अहो

डॉक्टर, तुम्ही आपले रात्री स्वस्थ घरी जाऊन निजता–पण येथे काय चाललेले असते त्याची तुम्हाला काही कल्पना आहे का ?"

त्यांना मी सर्व चित्र वर्णन करून दाखविले व काहीतरी झोपेचे औषध द्या म्हणून सुचविले. डॉक्टरांनी माझ्या ह्या सूचनेप्रमाणे दुसऱ्या दिवसापासून औषधात काही बदल केला व रात्री शांत जाऊ लागल्या.

दवाखाना तेथल्या तेथेच होता. औषध म्हणजे बेलाडोना असे. ते औषध, थर्मामीटर व औषधाचा ग्लास ही साऱ्यांची एकच असत. मी मात्र बेबीसाठी ही सारी निराळी ठेवली होती, व स्वतः जाऊन औषधे आणीत असे. झोपडीत शेगडी ठेवली होती व मी तिला गरम कपड्याने फोमेंट करीत असे. सगुणाबाई नाही तर मी तिला एकसारख्या मांडीवर घेऊन बसलो होतो.

तेथे दहा दिवस रोग्यांना व त्यांच्या बरोबरच्या माणसाला तेथलेच खाणे मिळत असे. आम्हाला शिधा मिळे व दया स्वयंपाक करी. आम्ही चांगली दहा माणसे होतो. त्या सगळ्यांचा ती एकटी स्वयंपाक करी. आमच्याकडे येण्याची कोणाला परवानगी नव्हती. पण मुले कोणी नाही असे पाहून हळूच तारेतून आत येत व भेटून जात.

टिळकांचे लेखनवाचन व प्रार्थना सुरूच होत्या. ते म्हणत, " देवा, हे संकट तू का आणले हे अजून माझ्या ध्यानात येत नाही. पण ह्यात तुझा काहीतरी हेतू आहे, एवढे कळते. तो हेतू समजण्याची मला बुद्धी दे. तुझा ह्यात काही हेतू नसता तर आम्हा दोघांपैकी एकालाही प्लेग न होता तो ह्या लहान मुलीलाच का झाला असता ?"

टिळकांनी टोचून घेतले नव्हते, पण डॉक्टरांनी त्यांना बळे बळे टोचून घेण्यास लावले. त्यांना ते बरेच जड गेले व त्रास झाला. तेथे आधी आधी अगदी व्यवस्था नसे. शंभरांत दहा रोगी जगत.

चौदा दिवस झाले. सिव्हिल सर्जन आले. त्यांनी व दुसऱ्या डॉक्टरांनी मुलीला तपासले व सांगितले की, " आता हिची आशा नाही."

टिळकांना भडभडून आले. देवाने आपल्याला एक मुलगी दिली. तिला आनंदीबाई जोशांप्रमाणे आपण शिकवू, अशी मोठी आशा मनात धरली आणि ती मुलगी देवाने नेली. आता ही चालली.

सगुणाबाई दूर जाऊन रडत बसली. तिला बेबीचा फार लळा लागला होता. इतके दिवस माझ्याबरोबर तिने तिच्या खस्ता खाल्ल्या होत्या.

माझी वृत्ती भरपुरीची आहे. कपडे करायचे झाले तरी मी ते अगदी वाढत्या अंगाचे करविते. कोल्हयाच्या शिकारीला जायचे झाले तर मी वाघाच्या शिकारीची तयारी करते. घरून निघताना मी एक शेर जवसाचे पीठ, कॅस्टर ऑईल, कोळसे अशा बऱ्याच उपयोगी जिनसा बांधून आणल्या होत्या.

मीही निराश झाले. दहा-पंधरा दिवसांत बेबीची पाठ जमिनीला लागली नव्हती. आज तिला मी खाली निजविले. ती शांत पडली होती. शेगडी पेटलेलीच होती. मी ते सारे जवसाचे पीठ शिजविले. गळ्या-पासून सर्व छाती- पोटावर ते पोटीस घातले. एरंडेल, दूध, साखर गरम करून कसेतरी तिच्या पोटात घातले. पायाशी शेगडी ठेवली. ब्लँकिटाने तिला चांगले गुंडाळून घेतले. मग तिला सांगितले, "आता तू खुशाल मर. माझ्या मनाला अमुक एक केले नाही असे वाटायला नको."

मग दार लावून तिला एकटीलाच आत टाकून मी दूर रानात निघून गेले. अगदी एकांत मिळाल्यावर गुडघे टेकून मोठ्याने आरोळी मारून देवाजवळ प्रार्थना केली की, "देवा बापा, ही पोर जगू दे. ही माझी नाही, तुझी आहे. तूच ती मला दिली होतीस व मी तिचे लालन-पालन केले. तुझी इच्छा असेल तर तू तिला नेशीलच. हिला जर आराम पडला तर मी येथे आजाऱ्याचे काम करीन." असे म्हणून मी गळा काढून मनमुक्त रडले.

थोड्या वेळाने मी परत आले. खोलीचे दार उघडण्यास मला धीर होईना. गुडघे टेकून अशी प्रार्थना मी कधीच केली नव्हती. उरात धडकी भरली होती. मोठ्या जुलमाने मी दार उघडले.

पण मी दार उघडताच तिने हाका मारून विचारले, "ममा, तू कोठे होतीस ? पपा कुठे आहेत ?"

लहानपणी ती मला ममा म्हणत असे व त्यांना पपा म्हणत असे. मला इतका आनंद झाला, की तिला उचलून घ्यावी असे वाटले. पण

तिच्या हार्टवर एखाद वेळेस वाईट परिणाम होईल हे चटकन ध्यानात येऊन मी तशीच दार लावून धावतच टिळकांच्या खोलीकडे गेले. तेथे टिळक इतर मंडळींबरोबर प्रार्थना करीत बसले होते.

मला पाहून त्यांना वाटले, मुलगी आटोपल्याची बातमी सांगायला ही आली असावी. मी त्यांना हसत हसत सांगितले, " बेबी तुम्हाला बोलावते आहे." पण त्यांना ते खरे वाटेना. माझे हसणे व बोलणे त्यांना वेडयासारखे वाटले. मी पुष्कळच हसत होते व पुन्हा पुन्हा सांगत होते, की बेबी बोलावते आहे. शेवटी आम्ही दोघे ताराच्या झोपडीत गेलो. त्यांना पाहताच ती म्हणाली, " पपा, तुम्ही मला टाकून कोठे गेला होता ? मला आंबे आणा."

टिळकांनी एक रुपया देऊन मुलांना बाजारात मोसंबी आणण्यास पाठविले. पण बाजारात सारा शुकशुकाट होता. मोठ्या पंचाइतीने त्यांना अगदी बारीक बारीक वाळलेली अशी पाच-सात मोसंबी मिळाली.

दुसऱ्या दिवशी डॉक्टर आले. त्यांनाही फार नवल वाटले.

अठरा दिवसांनी ती झोपडी सोडली. देवाने मुलीला प्लेग का आणला ह्याचे उत्तर टिळकांना मिळाले ते असे :–

एक दिवस कँपमध्ये दुधावरून काही तक्रार झाली. ती गडबड ऐकून टिळक तेथे गेले. ते म्हणाले " पाहू वही !"

त्यांना उत्तर मिळाले, " साहेब, तुम्हाला समजणार नाही."

तशीच त्यांनी वही हिसकावून घेतली आणि पाहतात तो वहीत आकडा मोठा. प्रत्यक्ष दूध कमी !

टिळक मला येऊन म्हणाले, " माझ्या प्रार्थनेचे उत्तर मिळाले. ताराला का प्लेग झाला ते समजले. आपल्या इकडे विश्वासू माणसेच कमी. दोन रुपयांपासून शंभर रुपयांपर्यंत एकावर देखरेख ठेवायला दुसरा लागतो. तसेच येथे आहे. रोग्यांची उत्तम व्यवस्था झाली. त्यांचे खाण्यापिण्याचे हाल झाले नाहीत, तर रोगी दगावणार नाहीत, आताच पाहिले. दूध कागदी तिप्पट तर प्रत्यक्ष एकपट, न्हाव्याभटांची सिंहस्थाची पर्वणी तशी ह्या गुलामांची ही प्लेगची पर्वणी आली आहे. माझा झाला निश्चय, की येथे राहून रोग्यांचे पडेल ते काम करायचे !

तुझी आहे तयारी ?"

मी म्हणाले, "हो, माझी आहे तयारी."

देवाने आम्हा दोघांना त्या प्रसंगी फारच धैर्य दिले व मोठे मन दिले. ज्याला कोणत्याच रोगाचे भय नाही, कसल्याच घाणीची पर्वा नाही अशाचे– म्हणजे भंग्यांचे– मन त्याने आम्हाला त्या वेळी दिले. आईदेखील जे काम करण्याचा कंटाळा करील ते हा गरीब मनुष्यप्राणी आपल्या कृतघ्न बांधवांसाठी करीत असतो.

आम्ही दोघांनी आपल्या कामाला मनापासून सुरुवात केली.

## ५३ : हे तुझे लाड !

कँपाजवळच आम्हाला एक झोपडी बांधून देण्यात आली होती. पण आता शिधा बंद झाला होता. पाण्याची पखाल चालूच होती. मुले साहेबांनी परत नेली. सगुणाबाई आपल्या मुलीला भेटायला आपल्या खेडेगावी गेली. टिळकांनी तिला जाताना लुगडे-चोळी घेतली, खर्चाला चार रुपये दिले, पगार आठ आणे होता तो दोन रुपये केला व चार महिने भरपगारी रजा दिली.

आता आम्ही चार माणसे कुटुंबात उरलो. पण तेथेही नाही नाही म्हणता दोन मुली मी सांभाळण्यास घेतल्या. दोघींच्याही आया तेथेच प्लेगला बळी पडल्या होत्या.

आम्ही दोघेही रोग्यांची पडेल ती सेवा करीत होतो. त्याचे खाणेपिणे, औषधपाणी, त्यांची तोंडे धुणे, त्यांना स्पंजबाथ देणे, व वेळ पडली म्हणजे त्यांचा शेणगोठा करणे, ही सारी कामे आमच्याकडे होती. तेथे सर्व धर्मांचे व सर्व जातींचे लोक येत; व आम्ही तेथे आहो हे समजल्यावर त्या कँपची भीती लोकांत कमी होऊन अधिकाधिक रोगी येऊ लागले. ते आमच्याच नावावर रात्री कोणत्याही वेळेस येऊ लागले. शिद्धीकशेटनी आम्हाला गरम कपडे करून पाठविले. आम्ही मागितले नव्हते, पण स्वतःच त्यांनी ते पाठविले.

तेथे कँपात एक तेली अगदी कुलपात बंद करून ठेवलेला होता. त्याला जाऊन नुसते पाणी पाजायलासुद्धा कोणाला धैर्य होत नसे. आम्ही आमच्या हातात व्यवस्था आल्याबरोबर एक नवीन नर्स आणविली. ही ख्रिस्ती होती व अगदी मनापासून काम करी.

पहिल्या दिवशी मी व जाईबाई त्या तेल्याच्या झोपडीकडे जाऊ लागलो. तो तेथे दारातच एक शिपाई! तो म्हणे, "बाई, आत जाऊ नका. तो माणूस फार भयंकर आहे."

आम्ही म्हटले, "भयंकर असो की कसाही असो, त्याला दूध देणे, औषध देणे हे आमचे काम आहे. कुलूप उघडा." सांगितल्याप्रमाणे त्याने कुलूप उघडले.

"सांभाळा बरं. तो अंगावर धावून येतो."

आणि दार उघडल्यावर खरोखरच तो आमच्या अंगावर धावून आला. तो तसा येताच मी खाडकन त्याच्या तोंडात लगावली. काय झाले कोणास ठाऊक, पण तो चटकन पाया पडू लागला. दूध घे म्हण-ताच त्याने मुकाट्याने दूध घेतले. औषध देताच औषध प्याला.

एक नाना सोनार म्हणून होता. तो म्हणे, "आई, मला बरं वाटू दे, तुला मी सोन्याने मढवून काढीन. आम्ही बोलूनचालून सोनार. आमचा एक हात सोन्याचा तर दुसरा हात चांदीचा."

मी म्हणे, "बरं बाबा, काढ मला सोन्याने मढवून. पण सध्या तू सोन्याने मढवलेल्या भिंती मात्र मला धुऊन काढायला लावतो आहेस."

अडचणीच्या वेळी चाकरांना अडवून धरता येते. पगार वाढ-वावा म्हणून एक दिवस भंग्यांनी एकदम संप पुकारला. बसले ते आपले स्वस्थ हात जोडून. दोन दिवस टिळकांनी व मी भंग्यांचे काम सांभा-ळले. तसे त्या सोनाराने आम्हाला ते 'ट्रेनिंग' देऊन ठेवलेच होते.

तिसऱ्या दिवशी प्रेते उचलण्याची पाळी आली. टिळकांनी आपली कंबर बांधली. मीही पदर खोचला. दोन प्रेते उचलून आम्ही गाडीत घातली.

आता मात्र भंगी लोक चपापले. ते लागलीच धावून आले व म्हणू लागले, "साहेब, आमच्या पाठीवर मारा पण पोटावर मारू नका."

टिळक म्हणाले, "तुम्हाला अधिक पगार मिळू नये असे माझे मुळीच म्हणणे नाही. मात्र तुम्ही अशा आणीबाणीच्या वेळी रोग्यांना अडचणीत पाडणे तुमच्या माणुसकीला शोभत नाही. आम्ही तुमचा पगार वाढावा म्हणून अगदी जरूर प्रयत्न करू. हे तुमचे भाऊ मरताहेत आणि तुम्ही ह्या वेळेस अडविता हे बरे नाही. आता तुमच्या पगाराची मी खटपट करीन, पण जर का पुन्हा असे केले तर मात्र माझ्याकडून काही मदत होणार नाही हे पक्के लक्षात ठेवा."

टिळक प्लेगच्या रोग्याचे काम करू लागले तेव्हा कोणी म्हणू लागले, लेकीचा प्लेग टिळकांच्या फायद्यावर पडला. आता ते खोऱ्याने पैसे ओढीत आहेत. तर कोणी म्हणे, पहा बिचारा लोकांसाठी कसा झिजत आहे. टिळक म्हणत,

**" निंदास्तुतिचा जगी तमाशा । फंदी तू त्या पडू नको**
**मान घडो अपमान घडो तव । हसू नको तू रडू नको. "**

रोगी चांगले बरे होऊ लागले. मृत्युसंख्या लागणीच्या शेकडा दहावर आली. सर्व मंडळीचा फोटो काढला. कर्नल कॉर्करीने टिळकांना एक सर्टिफिकेट दिले.

टिळक म्हणाले, "मला काय करायचे तुमचे सर्टिफिकेट ?"

पण त्यांनी तोंडीही फार आभार मानून बळे बळे त्यांच्या हातात ते ठेवले. टिळकांनी ते पत्राच्या तारेला लावून ठेवले होते, पण रद्दी पत्रांबरोबरच त्याचीही कुठे वासलात लागली.

दोन महिने झाल्यावर मुलीसाठी म्हणून मुद्दाम ह्या वर्षी महाबळेश्वरला जाण्याचे ठरले. राहुरीस दत्तू होता. त्याला नगरच्या स्टेशनवर बोलावले. हौशी व दया पुण्यास भेटणार होत्या. आम्ही इकडून निघालो. बरोबर आमच्या बावीस मुलांपैकी आनंदाला घेतले होते व पेत्रसही होता. कँप सोडताना नवीन घेतलेल्या दोन मुलींपैकी एकीला तिच्या बापाच्या हवाली केली व दुसरी देवाने नेली.

टिळकांनी जरी एवढी मुले संभाळली तरी केवळ त्या मुलांचे होणारे हाल वाचावे व ती सन्मार्गाला लागावी एवढ्या एकाच

N R.P.

हेतूने ती सांभाळली. त्यांनी मुलांच्या नावाने कोणाजवळून पैसा उकळला नाही की कोणाची मुले ते बळकावून बसले नाहीत. ते म्हणत, "जर मुले संभाळली तर त्यांचा पुढचा पल्ला गाठता आला पाहिजे. त्यांचे नुकसान होऊ देता उपयोगी नाही."

टिळकांच्या चरित्रात मला एक गोष्ट आढळून आली की, कामाच्या आवडीपुढे त्यांना मानापानाची पर्वा नसे, तशीच कीर्तीचीही पर्वा नसे. माझे चरित्र घडले तसे लिहा हे सांगताना त्यांना हेच सांगायचे होते की, माझ्या दोषांवर मुळीच पांघरूण घालू नका.

आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांच्या ध्येयाने परिपूर्ण अशा चरित्राचा परिणाम दुसऱ्यावर फार चटकन होत असे. नाहीतर नारायणराव गोखल्यांची मुलगी भंग्याचे काम इतक्या आनंदाने व उत्साहाने करण्यास तयार होणे शक्यच नव्हते. महाराचा नुसता कोठे शितोडा अंगावर उडाल्याचा भास झाला तर साऱ्या जन्मभर स्वतःला व घरातील सगळ्यांना माझ्या वडिलांनी घासूनपुसून घेतले होते. त्याच पित्याची मी कन्या वाईस भंग्याच्या घरचे अन्न खाते काय नि नगरच्या दवाखान्यात हलकी समजलेली कामे करायला धावते काय ! पण ह्यात वाणायचे झाले तर ते टिळकांनाच वाणले पाहिजे. ते माझे ह्या बाबतीत गुरू होते. त्यांनी मार्ग दाखविला की त्या मार्गाने डोळे झाकून बेधडक पळण्याचे काम मात्र माझे असे. मला जर काही यशाचा वाटा असेल तर तो त्यांनी मार्ग दाखविल्यानंतर न कचरता त्यावरून बेधडक जाण्यात आहे, एवढेच.

असो. मी मोठी संसारी व माझी संग्राहक बुद्धीही मोठी अजब होती, व अजूनही त्या सद्गुणाने माझा त्याग केलेला नाही. टिळकांना जिकडेतिकडे अगदी स्वच्छ हवे असे. इतके, की पैशाची पिशवी व पेटीदेखील ते झाडूनपुसून ठेवीत, तर मला सारा पसारा जतन करावासा वाटे. मी मालावरच्या सापासारखी नेहमी घरात बसलेली.

मी कधी बाहेर जाते व आपण कधी घरसफाईचे काम सुरू करतो असे टिळकांना होऊन जाई. मी बाहेर गेले की त्यांची दिवाळी उगवा-

स्मृ... २१

यची ! नंतर माझा शिमगा सुरू व्हायचा.

माझे 'स्टोअर'च असायचे. त्यात काय काय सामान सापडेल ह्याचा नियमच नसे. कोमटचासारखी चिंध्यांची गाठोडी, बाटल्या, फाटका जोडा, तुटक्या वाहणा, मोडके सूप, उंदराने करंडलेले टोपले, गंजलेले टिनाचे डबे, तुटके सुतळीचे तुकडे, चऱ्हाटे, तुटकी शिंकी, मोडका पाट, तुटकी नवार, लहान गाड्यांची चाके, विळे, खिळे, इतकेच नाही तर फुटका माठ व त्याची खापरेसुद्धा त्या स्टोअरमध्ये साप-डायची.

मुलगी प्लेगातून उठली. आता आपण तीन महिने महाबळेश्वरला जाणार. तेव्हा मी उठले व गावातील ओळखीच्या मंडळीला भेटण्यास गेले. आधी मी कधी बाहेर जायची नाही. पण गेलेच तर मात्र घरोघर बेल घालीत साऱ्या गावभर फिरायची.

मी ह्या जिनसा ठेवायची त्या काही त्या विकून पैसा मिळविण्या-साठी नाही, तर कधी अडीअडचणीत माणसाला कशाची गरज लागेल ह्याचा काय नियम नाही म्हणून ठेवी. मुले गेली. नंतर त्यांच्या गाद्या उसवल्या. त्यातील काथ्याचा डोंगर पुढे पडला होता. हा डोंगर आपल्या कोठारात कसा साठवायचा ह्याचा विचार करीत मी कमरेवर हात देऊन त्याच्याकडे पाहत उभी होते. भोवताली शेजारीपाजारी जमा झाले होते.

इतक्यात टिळकांनी लिलाव पुकारला ! दोन हातांनी दोन वेळा जितका काथ्या नेता येईल तितका हवा असेल त्याने न्यावा ! पाहता पाहता एवढे मोठे ढिगार जमीनदोस्त होऊ लागले ! आपले काम झाले असे पाहून हात झटकून टिळक आपल्या ऑफिसमध्ये जाऊन लिहायला बसले.

खळ्यावरील माल हलविल्यानंतर भिकाऱ्यांनी उरलीसुरली कणसे गोळा करावी तसा मी काथ्याचा आवा लुटल्यावर थोडा जो हाती लागला तो काथ्या गोळा केला. खोळी धोबणीला दिल्या व ह्या काथ्याची गठडी बांधून माझ्या स्टोअरमध्ये टाकून ठेवली. पण त्या दिवशी मी बाहेर गेले तेव्हा माझ्या इतर काही मालाबरोबर ही गठ-डीही कमी झालेली मला आढळून आली.

महाबळेश्वरास घरवाला तोच, सर्व काही तेच. मात्र ह्या वेळेस त्यांनी भरून ठेवलेले पाणी व करून ठेवलेला स्वयंपाक मला व दत्तूला चालला. तेथे आमची सर्व व्यवस्था होती. कामाला बाईही ठेवावी लागली नाही. सर्व आपापल्या कामात गढून गेलो. तेथे बेबीसाठी एक ढकलगाडी भाड्याने घेतली होती. दत्तू व आनंदा तिला त्या गाडीत घालून फिरायला नेत.

एकदा दया म्हणाली, "आई, येथे ताज्या नारळाचे खोबरे चांगले मिळते. आणीव ना प्रत्येकासाठी एक-एक तुकडा."

मी पेत्रसला खोबरे आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने ते आणले व दयाच्यापुढे एक तुकडा करून तो म्हणाला, "बाईसाहेब, तुम्ही घ्या आधी."

झाले बाई! तेवढ्यात दयाला जो काही फणकारा आला तो अजबच! ती फाटके लुगडे नेसली, फाटकी चोळी तिने अंगात घातली, कामाला कोणाला हात लावू देईना, सकाळी जेवायच्या वेळेस ताटात जेवीना, पोळी व मिरची जमिनीवर ठेवून तिने ती खाल्ली.

इकडे काही कारणावरून आनंदाही रुसला होता. मी व माझ्या बरोबर इतरांनी त्या दोघांची खूप समजूत केली, पण ती होईना. मी त्याच दिवशी पाच-सहा रुपयांचे लोणी कढवून ते पातेले तसेच पलंगाखाली सरकवून ठेवले होते. दुपारी ही मुले जेवली नाहीत. मी सांगून सांगून दमले. टिळकांच्या कानावर मला हे घालायला नको होते. ते जितके प्रेमळ होते तितकेच रागीटही होते. त्यामुळे त्यांना सांगायला माझा जीव होईना. आनंदा सडकेवर जाऊन बसला, दया काम संपवून मागील दारी जाऊन उभी राहिली.

मी पेत्रसला म्हणाले, "पेत्रस, जा बाबा त्यांना जाऊन तरी सांग."

टिळक ह्या वर्षी शिकवण्या करीत नसत. त्यांची इंग्रजीमध्ये बरीच व्याख्याने झाली व त्या व्याख्यांनाला तिकिटे होती. ते आपले त्यासंबंधी वाचीत किंवा विचार करीत बसत.

तिनाचा सुमार. मी बेबीला घेऊन पलंगावर बसले होते. टिळकांना ही बातमी कळली. ते आले.

" कुठे आहेत ती ?"

" एक मागील दारी, दुसरा सडकेवर. "

" दया, चल आत ये. हा काय हटवाद घेतला आहेस ? चल, नेस लौकर चांगले लुगडे. अन् काय रे मूर्खा ! आण ती छडी इकडे. नीट उभा रहा. कर हात पुढे आणि मोज छड्या. "

आनंदाने दोन-तीन छड्या खाताच मोठा आ करून रडत रडत मला येऊन मिठी मारली. मजजवळ तारा होती. आनंदाच्या पाठीवर छड्या बसू लागल्या. मी माझी मिठी सोडविली. आनंदाच्या हातावर आता सपासप छड्या बसू लागल्या. तो पलंगाखाली जाऊन बसला.

" चल बाहेर ये ! तोंड धू आणि सगळेजण ताबडतोब फिरायला जा."

ही सारी मंडळी फिरायला गेली. थोडे गेले नाहीत तो आनंदाचा हात सहज मागे गेला तो त्याचा हात बरबटला.

" पेत्रसराव ! मी पलंगाखाली तुपाच्या पातेल्यात बसलो ! आता आई काय म्हणेल ! दत्तूभाऊ, मी तुपाच्या पातेल्यात बसलो वाटते !"

" काही आता होणार नाही. तू आता मुकाट्याने घरी चल आणि धोतर बदल."

सारी मंडळी घरी आली तो टिळक मला उपदेशाचे घुटके पाजीत होते– " तू ही सारी पोरं आपल्याभोवती जमा करून बसतेस. त्यांना शिस्त कशी लागणार ? तुझ्याच लाडाने ती बिघडली आहेत !"

## ५४ : माझे शिक्षण

महाबळेश्वरास त्या वर्षी त्या आमच्या घराच्या मागेच एक माणूस तापाने मेला. महाबळेश्वरची एकंदर व्यवस्थाच अशी असते, की तेथे काही रोगाचा शिरकाव व्हायचा नाही. अशा स्थितीत ही संशया-

स्पद केस झाल्यावर टिळक म्हणाले, "पेत्रस, तू ह्या दोन मुलींना आणि आनंदाला घेऊन परत जा कसा! हा माणूस कशाने वारला ठाऊक नाही. येथले नियम मोठे कडक. उगीच पुढे-मागे आपल्याला त्रास नको. पोरींना पुण्यास पोचवून दे आणि तुम्ही पुढे नगरला जा." अशा रीतीने हे चौघे गेले व आम्ही चौघे मागे राहिलो.

पण टिळकांचा असा गुणच होता, की ते जिवंत असेपर्यंत त्यांचे घर कधीच पाहुण्यावाचून राहिले नाही. संतकाकांना प्लेग झाला होता. ते बरे होऊन हवा बदलण्यास आले. आता बाजारहाटाचे काम त्यांच्याकडेच आले. संत आमच्याकडे कधीही आले, की ते आमचे बाजारमास्तर होत असत.

पेत्रस आपल्या मंडळीसह सुखरूप पोचल्याचे त्यांचे पत्र आले. ह्याच पत्रात त्याने हौशीला मागणी घातली होती व आपल्या कामाची कोठे सोय करा म्हणूनही लिहिले होते. टिळकांनी त्याच्या कामाची सांगलीस सोय केली.

पावसाळा लौकर सुरू झाला. मागे एकदा खूप स्वस्त मिळालेल्या मोळ्या मी साठवून ठेवल्या होत्या आणि निघताना त्या साऱ्या घरवालीला दान केल्या होत्या. ह्या वेळेस अशी चूक मुळीच करायची नाही असे ठरवून एक मोळी संपली की बाजारात जाऊन दुसरी आणायची, असे माझे चालले होते. पण हा पाऊस पडल्यावर बाजारात मोळी मिळेना. शेजारीपाजारी मोळ्यांचे ढीग लागले होते, पण ते म्हणत, "आम्हाला दहा रुपये दिले तरी आम्ही एक लाकूड तुम्हाला देणार नाही, आमची ही पावसाळ्याची बेगमी आहे!"

टिळक मला 'पेनी वाईज पाऊंड फूलीश' म्हणत. ती आठवण त्यांनी पुन्हा दिली. मग मात्र आम्ही ताबडतोब बांधाबांध करायला लागलो. अजून टिळकांच्या कामाला सुरुवात होण्यास वेळ होता तेव्हा नीट नगरकडे न जाता आम्ही आमचा मोर्चा सांगली-मिरजकडे वळविला. सांगलीस दोन दिवस राहून पेत्रसची व्यवस्था कशी काय लागली आहे ते पाहून आम्ही मिरजेस गेलो.

येथे डॉ. भास्करराव गोवंडे व त्यांच्या पत्नी रमाबाई ही दोघेही

शिकत होती. टिळकांची व ह्यांची चांगली ओळख असल्याने त्यांच्याकडेच आम्ही उतरलो. तो दवाखाना, तेथील व्यवस्था व ह्या प्रेमळ जोडप्याचे उत्तेजन, ह्यामुळे माझ्या शिकण्याच्या हौशीने पुन्हा उचल खाल्ली. पण घर, टिळक व माझी 'स्टोअर' ह्यांच्या मोहामुळे माझे मन थोडेसे कांकूच करीत होते.

तशात बेबी लहान आणि नुकतीच आजारातून उठलेली. दत्तूही बराच अशक्त दिसत होता.

पण टिळकांचा बेत ठरला. ते म्हणाले, "तू काही काळजी करू नको. मी सर्व संभाळीन. तुला नियमाने दहा रुपये पाठवीन."

डॉ. वॉन्लेस ह्यांना टिळक भेटले व त्यांनी संमती देताच सगळा बेत अगदी कायम झाला. वॉन्लेससाहेबांनी एक खोली दिली. परत जायला भाड्याला पैसे नव्हते. अंगठी मोडली. दत्तू, बेबी व टिळक नगरला गेले. माझा नर्सिंगचा अभ्यास पुन्हा सुरू झाला.

तेथे क्लास नव्हता. जे काम पडेल ते करायचे. हेच 'प्रॅक्टिकल वर्क'. पेत्रस दर आठ दिवसांनी सांगलीहून येऊन बाजार करून देत असे. जाईबाईचा मुलगा येथे डॉक्टरकीचा अभ्यास करीत असे. तो मला इंग्रजीचे धडे देऊ लागला. कारण बाटल्यांवरील लेबले कळायला इंग्रजीचे थोडे तरी ज्ञान आवश्यक होते. नगरचे बरेच विद्यार्थी आले होते. त्यांचेही साहाय्य होत असे.

चार महिने झाले. मुलांची आठवण झाली व एक दिवस उठून त्यांना भेटायला नगरास आले. डॉ. व मिसेस गोवंडे ह्या दोघांचा कोर्स संपून ती केडगावात पंडिता रमाबाईकडे कामाला गेली होती.

मी घरी पोचले तेव्हा संध्याकाळचे चार वाजले असतील. तारा खेळत होती. दत्तू शाळेला गेला होता. टिळकही बाहेर गेले होते. मला पाहताच तारा धावत आली व मला बिलगली.

**"आई आली, आई आली, माझी आई आली**
**खेळ संपला, गोष्ट राहिली, माझी आई आली!"**

ह्या कवितेच्या ओळी गुणगुणत ती येऊन मला बिलगली. तिला

पाहून मलाही फार आनंद झाला होता. मी तिला पोटाशी धरले. टिळक व दत्तू घरी नव्हते. तशी मी एकाच दिवसासाठी आले होते. हे दोघे आले तेव्हा त्यांनाही फार आनंद झाला. डॉ. ह्यूमही थोड्या वेळाने आले. त्यांनी आम्हा सर्वांना आपल्या घरी जेवायला बोलाविले. जेवणी झाल्यानंतर आम्ही सगळे बोलत बसलो.

डॉ. ह्यूम म्हणाले,

"आता बाई, तुमचे खरे शिक्षण म्हणजे आपल्या नवऱ्याचा व मुलांचा संभाळ करणे. मला वाटते, तुम्ही मिरजेस जाऊ नये."

"साहेब, तुम्ही म्हणता ते मला पटते. ह्यांना सोडून मिरजेस राहण्यात मला का आनंद वाटतो ? पण कोणती वेळ कशी येईल ह्याचा नेम नसतो. म्हणून माणसाने सर्व प्रकारच्या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी करून ठेवलेली असावी."

"आता भावा, तुमचे काय मत आहे ?"

"माझेही मत तिच्याप्रमाणे आहे."

"साहेब, मला नाही विद्या. तेव्हा मजजवळ पोट भरण्याचे व जनसेवा करण्याचे काही साधन नको का ?"

"बरे भावा– नीट विचार करा. तुमची पैशाची नेहमी अडचण असते. मुले बरी दिसत नाहीत." आणखी पुष्कळ बोलणी झाल्यावर आम्ही घरी आलो.

सकाळी साताच्या गाडीने मी जाणार होते. स्टेशनवर आमच्या आधीच डॉ. ह्यूम येऊन बसले होते. गाडी निघता निघता त्यांनी माझ्या हातात दहा रुपयांची नोट ठेवली.

"तुम्ही चांगल्या शिका. शिकल्यावर आपल्या नवऱ्याचा व मुलांचा चांगला संभाळ करा. ही माझ्याकडून फूल नाही फुलाची पाकळी."

"पण साहेब, मजजवळ आहेत पैसे. मला नकोत हे. मला लागले तर मी मागेन."

"पण बाई– ही भावाची चोळी-बांगडी." मुले जरी अशक्त दिसत होती तरी टिळकांचा व माझा पुरा निश्चय झाला होता की

माझे शिक्षण पुरे करायचे. स्टेशनवर टिळक मला पोचवायला आले. मला रडू येऊ लागले.

टिळक म्हणाले, "तू काही काळजी करू नको. तू मुलांची आई असलीस तर तितकाच प्रेमळ मी त्यांचा बाप आहे. मी त्यांची चांगली काळजी घेईन."

गाडी हलली. मी मिरजेस गेले.

मिरजेस पोचल्यावर दोन दिवस सर्व काही अगदी सुरळीत चालले. तिसऱ्या दिवशी डॉ. वॉन्लेससाहेबांनी सांगितले, "बाई, आम्हाला खोली पाहिजे. खाली करून द्या व तुम्ही नगरास परत जा. तुम्हाला मोठाले रोगी उचलता येत नाहीत."

"पण डॉक्टर, मला शिकायला पाहिजे."

"नाही, तुम्हाला हे काम येणार नाही."

"का नाही ? मी माणूस आहे."

"मला वेळ नाही तुमच्याशी बोलायला. आजच्या आज खोली खाली करा."

माझी स्थिती फारच विलक्षण झाली. काय करावे काही सुचेना. मी आपले सामान खोलीच्या बाहेर काढून कंपाउंडमध्ये ठेवले व त्यावर बसले. नगरचे रा. प्रसादराव वाघचौरे येथेच शेजारी होते. ते बाहेरून आले. त्यांनी हा प्रकार पाहून विचारले, "अहो मामी, हे काय ? सामान का काढले ? ढेकूण झाले वाटते ?"

"नाही बाबा, साहेबांनी मला बाहेर काढले."

"का ? तुम्ही पदरचे पैसे खर्च करून शिकता. मग साहेबांनी काढण्याचे काय कारण ?"

"कारण समजत नाही. मी त्यांचा एक थर्मामीटर फोडला होता. पण मी कधीच आणून दिला. ते म्हणतात, तुम्हाला काम करता येणार नाही अशी माझी खात्री झाली आहे. तुम्हाला मोठाले रोगी उचलता येत नाहीत."

मी एकसारखी रडत होते. मी म्हणे, रोगी उचलता येत नाहीत ह्यात माझा काय दोष ? प्रसादरावांनी मला जेवणाबद्दल फार आग्रह

केला. मी म्हटले, " मला नाही जेवायचे. मला माझा खरा काय दोष आहे ते कळले पाहिजे मी येथेच बसून राहीन."

प्रसादराव डॉक्टरकडे गेले. ते त्यांना एकसारखे तेच सांगत होते की, " बाईला काम करता येणार नाही."

प्रसादराव म्हणाले, " बाई म्हणते, मला माझा खरा दोष कळल्या-शिवाय मी येथून हलणार नाही."

तेव्हा डॉ. वॉन्लेससाहेबांनी डॉ. ह्यूमचे पत्र काढून प्रसादरावांना दाखविले, " हे पहा, डॉक्टर ह्यूम म्हणतात की बाईला ताबडतोब परत पाठवून द्या. इकडे तिच्या नवऱ्याचे व मुलाचे हाल होतात. बाईकडे काही दोष नाही. वर डॉक्टर ह्यूमने हे पहा लिहिले आहे, की माझे पत्र आल्याचे बाईला कळवू नका. आता मी काय करू ?"

प्रसादरावांनी मला हे सारे बोलणे येऊन सांगितले. आता माझ्या डोक्यात डॉ. ह्यूमने दिलेल्या दहा रुपयांचा आवाज खणदिशी झाला. हे दहा रुपये माझ्या परतभाड्यासाठी त्या गृहस्थांनी देऊन ठेवले होते. मला मरणप्राय दुःख झाले. आता नगरास मी कोणत्या तोंडाने जाऊ ? लोक काय म्हणतील ? करावी नाही तर एखादी आडविहीर. नगरच्या विद्यार्थ्यांच्या बायकांनी माझी समजूत केली. माझे त्यांनी बरेच साहाय्यही केले व मला गाडीत बसवून दिले.

नगरास पोचेपर्यंत साऱ्या वाटेने प्रत्येक स्टेशनवर वाटे, की येथे उतरून जावे कोठेतरी. डॉक्टर ह्यूम मिरजेच्या दवाखान्यात ढवळाढवळ करतील, पण माझे मन तर माझेच आहे ना ? पण शेवटपर्यंत हे मनातले विचार कृतीत मात्र उतरले नाहीत.

टिळक नुकतेच चहा घेऊन बाहेर येऊन बसले होते. इतक्यात माझा टांगा दाराशी येऊन उभा राहिला.

" का ग ? कशी आलीस ?"

" मला शिकता येणार नाही म्हणून !" मी त्यांना सर्व हकीगत सांगितली.

" विद्यार्थी नापास झाले म्हणजे जीव देतात ते का, हे आता मला कळले. परीक्षा, शिक्षण वगैरे काय असतात हे आता समजले."

मी आल्याचे डॉ. ह्यूमसाहेबांना कळले, पण ते भेटायला आले नाहीत.

## ५५ : राहुरी

घरी आल्यावर मी आमच्या घरापुढे सुंदरसा बगीचा केला. पन्नास कुंड्या आणविल्या. झाडे लावली. आमची बाग मोठी डौलदार दिसू लागली. पण आमचा डौल कधीच टिकणारा नसल्याने लौकरच टिळकांनी ह्या सर्व कुंड्यांची खैरात करून टाकली. राहुरीचे मिशनरी डॉ. बालैंटाईन रजेवर जायला निघाले होते. त्यांच्या कामावर टिळकांची नेमणूक झाली व जायच्या आधी टिळकांनी दारापुढच्या सर्व कुंड्या देऊन टाकल्या.

राहुरी गाव आम्हाला फार आवडले. टिळक म्हणत, "अशा गावी लांब रानात मला जर एकांतस्थळी घर बांधून राहता आले तर मी कितीतरी ग्रंथ लिहीन."

डॉ. हेन्री फेअरबँक नावाचे मिशनरी येथे आमच्याकडे आले असता टिळकांनी आपल्या घराची कुरकूर त्यांच्याजवळही केली.

फेअरबँकसाहेब म्हणाले, " टिळक, मला काही पैसे मिळायचे होते, पण ते काही मिळत नाहीत असे दिसते. मी त्यांची आशा सोडून दिली आहे. पण जर हे पैसे मिळाले तर मी तुम्हाला तुम्ही म्हणता तसे रानात घर बांधून देईन. मग तुम्हाला पाहिजे तेवढी ग्रंथरचना तुम्ही करीत बसा."

टिळकांनी व डॉ. फेअरबँकसाहेबांनी नंतर एकत्र बसून देवाची प्रार्थना केली व तो विषय तेवढ्यावरच राहिला.

तिसऱ्याच दिवशी साहेब आले व सांगू लागले, " टिळक, झाले तुमचे झोपडे तयार. मला आज पैसे आले. चला, तुम्हाला कोठे जागा

पाहिजे ?" दोघेजण राहुरीपासून मैल दीड मैलावर गेले. तेथे डॉ. बालैंटाईनचे एक शेत होते. ते ठरविले. डॉ. बालैंटाईनची संमती मिळविली व ते शेत २००–२५० रुपयांना खरेदी केले.

मला जेव्हा हे समजले तेव्हा आमचा मोठा खटका उडाला. घर बांधून बांधायचे, मग ते गावात बांधायचे का दूर रानात ? तेथे सोबत नाही, शेजार नाही, पाणी नाही, अडीअडचणीला हाका मारली तर ओ द्यायला कोणी माणूस नाही.

टिळक म्हणत, "तुला काही कळत नाही व मी काही करायला घेतले की तू तेथे हटकून मोडा घालणार हे ठरलेले. पाणी वाहून आणता येईल, सोबतीला कुत्री ठेवता येतील. आणि माणसांना काय करायचे ? तू मला हाक मार, मी तुला हाका मारीन."

इकडे घर बांधायला सुरुवातही झाली. साहेबांनी स्वतः हातांनी ह्या घराचे काम इतर मजुरांबरोबर केले ! पाण्याची मसक, खाण्यासाठी ब्रेड, डोक्यावर सावलीसाठी छत्री अशा थाटात फेअरबँकसाहेब तेथे येऊन काम करीत. त्यांनी एक मिनिट फुकट घालविला नाही. तेथे पाण्याचा टिपूस नाही की झाडाची छाया नाही. ऊन म्हणते मी. छत्री तीही वाऱ्याने उलटायची.

मी म्हणे, "साहेब, काय हा तुम्हाला त्रास !"

ते म्हणत, "बाई, काही हरकत नाही. हे सारे मलाच केले पाहिजे. टिळकांना काही समजत नाही."

पाचशे रुपयांच्या जागी हजार रुपये खर्च झाला व घर स्वतः मेहनतीने बांधले असल्याने दोन हजारांचे झाले.

ज्याचे काम त्यानेच करावे हे खरे. एक महिन्यात घर तयार झाले; पण घरभरणीसाठी आमच्याजवळ कुठे काय होते ? घर साहेबांनी तयार करून आमच्या स्वाधीन केले. मग उसने पैसे आणून आम्ही घरभरणी करून नवीन घरात राहू लागलो.

येथे आमची श्री. राजारामजी चांद्रेकर ह्यांच्याशी ओळख झाली. ते येथे मास्तर होते. दत्तूचे शाळेतील पहिले महत्त्वाचे मास्तर हेच. अगदी इंग्रजी पहिलीपासून इंग्रजी सातवीपर्यंत त्यांनी दत्तूला शिकविले

व उत्तेजन दिले. ते नेहमी टिळकांकडे येऊन कुरकूर करीत, की दत्तू कधी अभ्यास करत नाही. परीक्षेच्या वेळी कसा तरी पास होतो एवढेच. पुन्हा काही नाही. मी मास्तरांच्या मागे लागे, की तुम्ही कसेतरी दत्तूला धाकदपटशा दाखवून शिकवा. टिळक नुसते हूं करीत व गप्प बसत.

दत्तू पहिली पास झाला. मग टिळकांनी त्याला पुण्यास रा भास्कर नानजी कोटक ह्यांच्याकडे शिकायला ठेवला. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयातला हा पहिलाच ख्रिस्ती विद्यार्थी.

रानात राहायला आल्यावर डॉ बालैंटाईनसाहेबांच्या कामाव्यतिरिक्त उरलेला वेळ लेखनात घालवायचा हा मूळ हेतू, पण तो टिळक विसरले. आता त्यांची शेती सुरू झाली.

मी शेतकऱ्याची मुलगी. मला शेतीची माहिती; पण मला टिळक बसवीत धाब्यावर कल्पनेची पाखरे हाकलायला, व स्वतःच शेती करीत.

जमीन नांगरून घेतली. एकाने सांगितले, " साहेब, येथे कपाशी फार चांगली येईल. "

" कपाशी पेरली. वीत वीत झाडे आली. "

चार दिवस पाऊस पडला नाही. दुसरा म्हणाला,

" अहो साहेब, हे काय केलेत ! पाऊस नाही, पाणी नाही. कपाशी कशी होणार ? ह्यात हरबरा करा. "

झाले ! दुसऱ्या दिवशी गडी लावून कपाशी उपटून टाकली व पुन्हा जमीन नांगरली ! तेथे दोन पायल्या हरबरे पेरले.

हरबरा चांगला आला. त्याला घाटे आले. मंडळी टिळकांना भेटायला येऊ लागली. जो कोणी येई तो म्हणे, " साहेब, काय सुंदर हरबरा आला आहे ! थोडा टहाळ घेऊ का ?"

साहेबांनी मोठ्या आनंदाने परवानगी द्यावी व कवळभर हरबरा जावा. बरे झाले, गड्यांचा, सौंगणीचा त्रास वाचला. बहुतेक सौंगणी कधीच होऊन गेली होती. दोन पायल्या हरबऱ्याचे दोन शेर हरबरे घरात आले.

ह्या घरात आल्यापासून टिळकांना वाटू लागले, की मिशनचे

पगारी काम सोडून द्यावे. देवाचे काम पगार घेऊन करायचे नाही, असे त्यांनी ठरविले. आता ' व्हालंटियर्स ' जमा करून एक संघ स्थापण्याचे त्यांचे ठरले. त्यांनी मिशनच्या कामाचा राजीनामा दिला व त्यांच्या भोवती व्हालंटियर्स जमा होऊ लागले.

एका व्हालंटियरने सहकुटुंबच आमच्या घरी तळ दिला. कुटुंब सहाच माणसांचे होते. शेतीवरील चार गडी, राखणदार व त्याचे तीन बायकांचे कुटुंब, असा त्या रानात मोठा जनसमूह गोळा झाला होता.

दत्तू बाहेरगावी. त्याला दहा रुपये पाठवावे लागत. डॉ. ह्यूम-साहेबांनी टिळकांच्या ह्या नव्या वृत्तीला आळा घातला नाही; पण बुवाचे तुरे लाल, बाईचे बुरे हाल ही स्थिती त्यांना माहीत असल्याने त्यांनी परस्पर ट्रॅक्ट सोसायटीकडे खटपट करून त्या सोसायटीचे १०० रुपयांचे काम त्यांना देवविले.

म्हणजे इकडे ते फुकट काम करीत. चरितार्थासाठी ट्रॅक्ट सोसा-यटीच्या कामाबद्दल त्यांना शंभर रुपये मिळत. पुन्हा जरा सुरळीत चालू लागले.

पण शंभर रुपयांना शंभर वाटा ह्या होत्याच. टिळकांनी आपल्या व्हालंटियर्सची एक तातडीची मीटिंग बोलावली. एकदा नगरच्या चार व्हालंटियर्सची गाडी चुकली. का चुकवली देव जाणे. त्यांनी चार भाड्याच्या सायकली ताशी चार आणे प्रमाणे करून ते सायकलवर राहुरीला आले व जाताना मजजवळ पगारातले जे पंधरा-वीस रुपये उरले होते ते सगळे सायकल भाडे म्हणून घेऊन गेले.

घरी सहकुटुंब राहिलेला व्हॉलंटियर टिळकांची हजामत करी. त्याबद्दल टिळक त्याला चार आणे देत. पुढे पुढे तो आपल्याच मुलांच्या हजामतीचेही पैसे टिळकांजवळ मागू लागला व टिळक त्याला ते देऊही लागले.

एक दिवस मी त्यांना साफ सांगितले की, " मी हे पैसे देणार नाही. हा कसला असला व्हालंटियर, की आपल्या स्वतःच्या मुलांच्या हजामतीचे पैसे तुमच्याकडून उकळतो ! "

त्यावरून आमची खूपच खडाजंगी उडाली.

ते म्हणत, " तुला अक्कल नाही. अशा तुझ्या कृपणपणानेच चांगल्या कामाला तू अडथळे आणतेस. सारे जग तुला नावे ठेवते ते तुला कळत नाही."

मी म्हणाले, " मला नावे ठेवली तर ठेवू द्या, पण मी तुमच्या-सारखी ह्या भोंदूंना फसणार नाही. त्या माणसाच्या अंगात खंडीभर आळस. चार मुले पोसायची ऐपत नसता जो पहिली बायको मेल्या-बरोबर दुसरे लग्न करतो, थापा मारण्यात ज्याचा पहिला नंबर, तो तुम्हाला सांगतो आणि तुम्ही त्याचे ऐकता !"

आमची ती रात्र फार वाईट गेली. टिळक लिहीत होते. मी रडत होते. सकाळचा चहाही मुकाट्यानेच झाला व टिळक सायकल घेऊन बाहेर पडले. गावात गेल्यावर त्यांनी घरोघर जाऊन बायांना माझ्या नावाने चहाला आमंत्रणे दिली व पुढे ते तसेच कोठे निघून गेले.

मी दुपारी निजले तो बाहेर चार वाजेपर्यंत एक एक एक एक पाहुणी जमू लागली. मी आपली आत घोरतेच आहे. थोड्या वेळाने बाहेर आले तो बाहेर बायांचा घोळका. बाया माझ्या तोंडाकडे पाहता-हेत, मी त्यांच्या तोंडाकडे पाहत आहे. दोन्हीही आपापल्यापरी आश्च-र्यात गढून गेल्या आहेत. असा तो अजब देखावा होता.

माझे बंधू बापू नामाजी आढाव ह्यांच्या पत्नी सावित्रीबाई व मुली सरू व वारू ह्याही आल्या होत्या. त्या हळूच माझ्या कानाशी येऊन म्हणाल्या, " वन्सं, हा काय प्रकार आहे ? आम्हाला तर साहेबांनी चहाला बोलावले आहे आणि येथे तर सर्व शांत दिसते आहे."

आत्ता माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी म्हणाले, " वहिनी, आता तुम्ही सरूवारूला हाताशी घेऊन करा चहा."

सावित्रीबाईंनी चहाला आधण ठेवले. सरू-वारूंनी चहाची तयारी केली. गूळ घालून हारोळचा केल्या. जवळ असलेला एकुलता एक रुपया देऊन नोकराला गावात पाठविले. त्याने टरबुजे-खरबुजे आणली व आमची ती पार्टी साजरी झाली. बाया गेल्या. टिळक आले.

" का हो बायांना बोलावले ?"

" मग तू अबोला धरलास तर तुला बोलायला कसे लावायचे ?"

आमचा अबोला सुटला.

## ५६ : दीक्षा

टिळक रा. रा. होते ते रेव्हरेंड झाले. ती गोष्ट अशी :– ' व्हालंटियर्स ' चळवळ त्यांनी सुरू केल्यानंतर त्यांच्याकडे पुष्कळ धर्मसमीक्षक येऊ लागले. टिळक म्हणू लागले, कोणाचा बाप्तिस्मा करायचा झाला तर ज्याला परमेश्वरी संदेश असेल त्याने तो खुशाल करावा. तेवढ्यासाठी बाप्तिस्मा करणाऱ्याची दीक्षाच झालेली असली पाहिजे असे नाही व त्यांनी रेव्हरेंड– म्हणजे दीक्षित– नसतानाही काही बाप्तिस्मे केले.

टिळकांच्या ह्या कृत्यामुळे काही लोकांना मोठा ' शॉक ' बसला. बरे, आपल्या मनाची खात्री झाल्यावर एखाद्या गोष्टीपासून त्यांना परावृत्त करण्याची ब्रह्मदेवाचीही प्राज्ञा नव्हती. तेव्हा आता काय करावे असा पुष्कळांना मोठा पेच येऊन पडला. लोकांना काय वाटेल ह्याची टिळक थोडीच पर्वा करताहेत ! कोणी बाप्तिस्मा घेण्यास आला की ते त्याला एखाद्या रेव्हरेंडकडे पाठविण्याऐवजी स्वत: त्याचा बाप्तिस्मा करून मोकळे होत. बरे, इतक्यावरही ते स्वस्थ बसत नसत. ते ह्याबद्दल वादविवादही करीत. राहुरीस त्यांच्या हातून अशा रीतीने दोन-तीन बाप्तिस्मे झाले. मग दीक्षितमंडळींत काय ठरले कोणास ठाऊक, पण टिळकांचीच दीक्षा होणार असे ऐकू आले.

राहुरीस त्या वर्षी सभा होणार होती व त्या सभेतच टिळकांची दीक्षा होण्याचे ठरले.

तारीख पहिली होती. दीक्षा पुढे पंधरा दिवसांनी असेल. आता डॉ. ह्यूमचा पगार नव्हता. वाटेल तेव्हा त्यांच्याकडे जाऊन पैसे आणता येत. ते आमच्या उधळपट्टीवर रागावले तरी दोन दोन महिने अगाऊ पगार देत. पण आता पहिली तारीख उलटून गेली तरी पाच-पाच, सहा-

सहा दिवस पगार येत नसे. सभेला बाहेरगावची जेवढी मंडळी आली होती तेवढ्यांना टिळकांनी तीन वेळचे जेवणाचे व चहाचे आमंत्रण देऊन ठेवले. मला नुसती वर्दी दिली.

मला काळजी येऊन पडली, आता ह्यांची व्यवस्था कशी करायची ? मजजवळ तर काही नव्हते. नाणाजींचा पत्ता नसल्यावर अन्नाजी कसे येणार ? टिळकांनी मला आमंत्रणाची वर्दी देताच मी एखाद्या कृपणासारखी बोलू लागले.

" पण पैसे ?"

" हं ! त्याचे काय घेऊन बसली आहेस ? सारे ठीक होईल."

" तुमचे ठीक आहे. पाहावं लागेल मला."

" तुझी फारच घाई. अजून आठ-दहा दिवस आहेत. पुढे पाहता येईल."

" तुमचे हे असेच. गाडी आली तरी पाहता येईल अन् ती निघून गेली तरी पाहता येईल. मग पाहून काय उपयोग ?"

" जगात मला काय मान आहे ! पण तुला त्याचे काही वाटत नाही."

" मला वाटत नाही कसे ? नाहीतर मी पाहुण्यांच्या खाण्यापिण्याची काळजी कशाला करीत बसले असते ? सर्व असेच म्हणतील, की बाबा चांगला, बाई वाईट. पुरेसे पाणीदेखील पिण्याला नाही. मी पहिल्यापासून म्हणतच होते, रानात घर बांधू नका."

" पाण्याचे काय घेऊन बसली आहेस ? एकीच्या जागी दहा पखाली लाव."

" पण ह्या दहा पखालींतले पाणी साठवायचे कशात ?"

" मला वेळ नाही तुझ्याशी वादविवाद करीत बसायला. वेळेला सारे काही होईल."

असे म्हणून टिळक गेले आपल्या कामाला निघून. संध्याकाळी सहा-सात दिवसांकरता ते सोलापुरास निघून गेले ! त्यांच्यामागे चोरांनी अगदी पिसाळून सोडले. चोरी मात्र काही झाली नाही. मी राजारामजी चांदेकर व भास्करराव भांबळ ह्यांच्याकडे जाऊन त्यांना म्हटले, " पहा

बाबांनो, आता माझी वेळ तुम्ही सांभाळा. तुमचे काय पैसे खर्च होतील ते मी पगाराला देईन. सर्व स्थिती ही अशी आहे. "

त्यांनी सांगितले, " बाई, तुम्ही काही काळजी करू नका. आम्ही सर्व व्यवस्था करतो." व त्यांनी खरोखरच म्हटल्याप्रमाणे सर्व काही व्यवस्था केली.

टिळकांच्या मागे गोसावी, बैरागी, बोकेसंन्यासी नेहमी गोळा होत. टिळकांना ते आपल्या अडचणी सांगत व त्यांचा त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसे. पण ह्यांच्यापैकी बहुतेक ढोंगी व लबाड असत. हे लोक काही दिवस राहत, खात, पीत, लत्ताकपडा उपटीत व मग हळूच आपला मार्ग सुधारीत.

काही हे सर्व करून मला व मुलांना त्रास देत. तरीही टिळकांच्या लक्षात ते काही येत नसे. ते नेहमी ह्या गणांचीच कड घेऊन माझ्याशी भांडत. असाच एक बोवा आला. टिळकांनी त्याला आश्रय दिला. त्याचा पुढे त्यांनी बाप्तिस्माही केला. त्याला कोठेसा कामालाही लावून दिला.

टिळकांच्या दीक्षेच्या वेळी हे महाराज बरोबर आणखी चार साधू घेऊन आले होते. बरोबर एक बाटलीही आणली होती. ती मजजवळ देऊन बुवा म्हणाले, " मां, ये मेरा दवा है. अच्छी तरहसे रख देव. " मी ती बाटली कुलपात ठेवून दिली.

टिळक चर्चमध्ये होते. पोरीसोरी लहानाली कामे उरकीत होत्या. बाया स्वयंपाक करीत होत्या. मी कमरेला किल्ल्यांचा जुडगा खोवून इकडेतिकडे पडेल ते काम उरकीत होते. एकाचा सुमार. बुवांची दवा घेण्याची वेळ झाली. " मां, जरा कुंजी देव. "

मी किल्ली दिली. दवा घेऊन बुवा चुलीकडे गेले. तेथे बसून तिबलेल्या कणकेचे कवठाएवढाले गोळे करून ते चुलीत पिंडदान करू लागले. बाया मोठमोठ्याने ओरडू लागल्या, मुली घाबरल्या. बुवा उठून मुलींच्या अंगावर धावून गेले.

इतक्यात निळकंठराव माटेगावकर मामा चर्चमधून घरी आले. त्यांचा आज बाप्तिस्मा होणार होता. टिळकांच्या दीक्षेनंतर तेच त्यांचा

स्मृ... २२

बाप्तिस्मा करणार होते. बुवांचा हा गोंधळ माझ्या ध्यानात यायला व निळकंठराव घरी यायला एकच गाठ पडली.

मी म्हणाले, "मामा, हा काय दंगा! तुम्ही तरी त्याला बाहेर काढा."

मामा जो त्याला आणायला गेले तो तो त्यांच्याच मागे सुरी घेऊन लागला.

"तू बदमाश आहेस. पाहतो आज तुझा कसा बाप्तिस्मा होतो तेच," असे म्हणताच दोघांची झटापट सुरू झाली. जर का मामांच्या पोटात सुरी गेली असती तर भलतेच काही झाले असते.

मी हळूच बुवांच्या हातातून सुरी काढून घेतली. मग मामांना एका खोलीत जा म्हणून खूण केली. त्यांनी त्याप्रमाणे करून आतून कडी लावून घेतली. मी बुवांना म्हटले, "बुवा, माझाही त्यांच्यावर विश्वास नाही. फार वाईट माणूस आहे तो. चला, तुम्हाला दवा पाहिजे ना?"

बुवा खुलले. त्यांना दवा असलेल्या खोलीत नेले व अशा दोन थोबाडीत लगावल्या, की बुवांच्या डोळ्यांपुढे काजवेच चमकू लागले असतील.

तो चटकन पाया पडायला लागला. त्याची दारू खाडकन उतरली.

"मां, पाव पडता हूं! पपा को मत बोलो," असे म्हणून तो माझ्या पाया पडू लागला.

तो नमलेला पाहून मला अधिकच अवसान आले. मी त्याला एका कोपऱ्यात बसायला सांगितले व तो निमूटपणे तसा बसलेला पाहून बाहेर चटकन येऊन दाराला बाहेरून कडी लावून घेतली. बाहेर येऊन मामांची मुक्तता केली.

चर्चमधील सर्व दीक्षाविधी वगैरे आटोपून टिळक घरी आले. जेवणाच्या वेळी त्यांना बुवांची आठवण झाली. मी त्यांना सर्व प्रकार सांगितला. टिळकांच्या पायात अगदी नव्या कोऱ्या वहाणा होत्या. त्यांनीच टिळकांनी त्याची यथेच्छ पूजा केली व ताबडतोब त्याला टांग्यात घालून त्याच्या शिष्यगणांसह स्टेशनवर रवाना केले. दोन

वर्षांनी बुवाचे पत्र आले. त्यात आपली आता फार सुधारणा झाली असल्याचे त्याने लिहिले होते. मात्र पुढे कधी त्याचे वृत्त ऐकू आले नाही.

दीक्षेच्या पाहुणेमंडळीची व्यवस्था टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी इतकीही काळजी न करता पार पडली. संतकाका आले होते. त्यांनी बरोबर तीस रुपये आणले होते. सामान साठवून न ठेवता लागेल तसतसे आणून देण्याचा त्यांचा क्रम होता. ते म्हणत, " ताई, तुम्ही काही काळजी करू नका. मी बाजारात जायला चांगला खंबीर आहे. सामान संपले की मला सांगत चला. "

आणि त्यांच्या खरोखरच बाजारात एकसारख्या खेपा होत होत्या. राजारामजी व भास्करराव ह्यांची मदत पहिल्यापासून होतीच. बापू नामाजी आढावांचे सर्वच कुटुंब आमच्या घरी मदत करीत होते. तरी ह्या सर्व पाहुणचारात बापू नामाजींच्या काही बोलण्यावरून काही मंडळी रुसली !

मला फार राग आला होता. ही मंडळी रुसून नदीकाठी जाऊन बसली होती. त्यांची समजूत करायला मी गडबडीने तिकडे चालले होते. इतक्यात समोरून डॉ. फेअरबँक आले.

त्यांनी विचारले, " बाई, कोठे चाललात इतक्यात गडबडीने ? "

मी म्हटले, " माझे व्याही-जावयी रुसले आहेत त्यांची समजूत करायला जाते ! "

साहेब म्हणाले, " बरं, तुम्ही जाऊ नका. मी आणतो त्यांची समजूत करून. "

रात्री आठाच्या सुमाराला शेवटली जेवणी झाली. राजारामजी चांदेकर, कांबळे वगैरे मंडळी वाढायला होती. जेवणी झाल्यावर मी पदर खोवला व पाहुणेमंडळीला थांबवून म्हणाले, " तुम्ही सर्व मंडळीचे पुढारी आहा. पुढारीपण असे नसते. ख्रिस्त सेवा करायास आला आहे, सेवा करून घेण्यास नाही, असे तुम्ही पुलपिटवरून सांगता ; आणि येथे विनाकारण माझ्यावर रुसलात ! उलट तुम्ही माझे साह्य करायला हवे होते. आपल्या भाषणात सांगता, आपण सर्व देवाची लेकरे आहो, सर्व

एकमेकांची बहीणभावंडे आहो. मी तुमच्या घरी पाहुणी आले तर घरात जाऊन माझ्या भावजयीचे साहच करीन. काय करू, काय नाही असे तिला विचारीन आणि आज तुम्ही मला तुमच्या मागे धावायला लावले!"

माझे श्रोते म्हणाले, "बाई, आम्ही तुमच्यावर रुसलो नव्हतो."

"मग बापूराव आढावांवर रुसला होता ना? काय हो, त्यांनी असे काय म्हटले होते, की तुम्ही त्यांच्यावर एवढे रुसावे? स्वस्थ आंघोळी करून या, एवढेच ना? मग आता जेवताना स्वस्थ होऊ द्या असे म्हटले तेव्हा नाही तुम्ही रुसला? ह्यात राग येण्यासारखे काय होते? आता तुमचा राग गेला ना? मग ज्यांचा राग गेला असेल ते हात वर करा पाहू!"

सर्वांनी हात वर केले.

इकडे माझे लेक्चर होत होते तो तिकडे उरलेले अन्न चोरीस जात होते. पाहुणेमंडळी गेल्यावर आम्ही उरलेली माणसे पाहतो तो भात चोरीस गेलेला! आम्ही थंडा फराळ केला.

रानात घर बांधल्याबद्दल दुसऱ्या दिवशी टिळकांचा व माझा पुन्हा खटका उडाला.

"आधीपासून व्यवस्था नसली म्हणजे हा असा त्रास होतो पहा."

"कोणता त्रास? मला तर नाही काही त्रास वाटत विशेष."

"तुम्हाला नाहीच हो त्रास झाला! पण आम्हाला पहा ना किती त्रास झाला तो!"

"तू त्रास करून घेतेस त्याला काय इलाज? पण त्रास न करून घेतला तर काही राहते का? वेळेला सर्व काही होते!"

"सर्व काय होते? पाण्याची देखील सोय नव्हती. केवढी पाण्याची तूट पडली! मी आधीपासून सांगत होते, अशा जागी घर बांधू नका म्हणून; चोरांचा त्रास, माणसांची वाण, पाण्याचा दुष्काळ!"

"पाण्याचा दुष्काळ? चिमबावा, आण रे टिकाव-फावडे. आपण विहीर खणू!"

चिमबावा आधीच म्हातारा, त्यात तीन जागी वाकडा. तो कमरे-

वर हात देऊन त्यांच्यापुढे आ वासून उभा राहिला.

" साहेब, ह्या जागी पाणी लागत नाही. "

" लागत नाही म्हणजे काय ? चल, मी सांगतो तेथे टाक टिकाव ! "

चिमबाबा काय, नोकरमाणूस, हुकमाचा ताबेदार ! त्याने टिकाव-फावडे आणले व टिळक त्याला घेऊन विहीर खणण्याला निघाले. घरापासून तीन-चारशे हातांवर विहीर खणण्यास सुरुवात झाली.

टिळक व चिमबाबा खणीत. मी, दत्तू, तारा– आम्ही माती वाहू लागलो. पाहुणेराहुणे कमरेवर हात देऊन आमची मजा पाहत. रोज थोडे थोडे करता कमरेइतकी विहीर खणली. आमच्या विहिरीची बातमी हां हां म्हणता चहूकडे पसरली.

एक दिवस बेलदार आले. त्यांच्याशी टिळकांनी दहा आणे रुमालाची बोली केली व पुढे ते काम करू लागले.

चांदेकरांना हे कळताच ते धावपळ करीत आले. त्यांनी टिळकांना सांगितले, "तुम्ही फसता आहा. असा भलताच ठराव करू नका."

पण टिळकांनी त्यांचे ऐकले नाही. भास्करराव भांबळ आजारी होते. त्यांना हे कळताच ते तसे ताप अंगात असताच येऊन त्यांनी माणसे कामावरून बसविली. तेवढ्या वेळात त्यांची गुडघ्याइतकी विहीर खणूनही झाली होती. पण त्या तेवढ्याची खोदाई रुमालाच्या हिशोबाने जेव्हा काढण्यात आली तेव्हा टिळकांच्या ध्यानात आपली चूक आली. त्यांना वाटले होते, की सर्व विहीर एक रुमालभर खोल गेली की १० आणे झाले. पण एक रुमाल म्हणजे एक घनफूट, असा तो हिशोब होता.

त्या हिशोबाने भलतीच रक्कम होऊ लागली. त्याच दिवशी पगार आला होता. ह्या बेलदारांची कशीतरी समजूत करण्यात आली. तरी त्यांनी चार तासांत पंचेचाळीस रुपये नेले !

मग भास्कररावांनी दुसरी माणसे आणून दिली. विहीर एक पुरुष झाली की १० रुपये, दोन पुरुष झाली की १५ रुपये असा त्यांचा चढता पण आटोक्यातला हिशोब होता. पाच पुरुष खोल गेल्यावर विहिरीला पाणी लागले व ते अगदी भरपूर व गोड होते.

॥ भाग तिसरा ॥

## ५७ : टिळकांचे अंतरंग

विहीर खणून झाली. टिळकांना व आम्हा सर्वांना फार आनंद वाटला. आता विहीर बांधायची ! तेथे एक वडारी होता. त्याने पाचशे रुपये घेऊन ती बांधून देण्याचे कबूल केले. दरमहा त्याला पन्नास रुपये द्यायचे. टिळकांना ट्रॅक्ट सोसायटीचा शंभर रुपये पगार होता. त्यातून पन्नास रुपये गेले. खाली राहिलेल्या पन्नास रुपयांत बावीस रुपये चाकरानोकरांना जात. उरलेल्या अठ्ठावीस रुपयांत दत्तूला दहा रुपये पाठवावे लागत. अठरांत आम्हाला संसार करायचा होता.

आमच्या घरी चार नोकर होते व पाचवा राखणदार भिल्ल होता. भिल्लाला ठेवायलाच पाहिजे. तो जरी हजर नसला तरी चाले. त्याचा पगार चालू झाला, की आमची हजेरी घेण्यास चोर कधी येत नसत.

ह्याच गडबडीत दोन पत्रे आली. एक हौशीचे व दुसरे सुगंधराव करमरकरांचे. हौशीला बाळंतपणासाठी यायचे होते. हे तिचे पहिले बाळंतपण ! सुगंधराव करमरकर हवा बदलण्यासाठी येतो म्हणत होते.

टिळकांचा स्वभाव असा होता, की कधी कोणाला नाही म्हणायचे नाहीत. आग्रहही करायचे नाहीत. कोणी येतो म्हटले तर ते या म्हणायचे, जातो म्हटले तर जा म्हणायचे. त्यांनी दोघांना या म्हणून पत्रे पाठविली. माणसे आली. हौशी, हौशीचा नवरा, तिची सासू, सुगंधराव करमरकर, त्यांचे कुटुंब व चार मुले; माटेगावकर, टिळक व मी अशी बारा माणसे आम्ही झालो व एवढ्यांचे अठरा रुपयांत करायचे !

शेतात कांदे, बटाटे, पुदिना, कोथिंबीर, टमाटू, हिरवी मिरची हा माल आम्हाला पुरेल इतका भरपूर होता. तसेच घरच्या गाईचे

दूध, तूप, लोणी, ताक हीही भरपूर होती. विहिरीचे गोड पाणी व सर्व मंडळीचे गोड स्वभाव ह्यामुळे कधी कोणी कंटाळले नाही. बाजरी, ज्वारी जे असेल ते सारे आनंदाने खात. विडी, काडी, तेल, मीठ, चहा, साखर, घासलेट, काड्याच्या पेट्या वगैरे सामानाखेरीज बाजारातून त्या दहा महिन्यांत दुसरे सामान आणावे लागले नाही.

पण आमच्या ह्याही संसारात गमतींना काही तोटा नव्हता. एक दिवस रात्रीचे आम्ही जेवायला बसलो असता काहीतरी जळाल्याची घाण येऊ लागली. बाहेरच्या खोलीत सायकलचा दिवा पेटलेलाच पुस्तकांच्या कपाटावर ठेवला होता. तो भडकून मोठा जाळ झाला होता. आम्ही सर्व धावून गेलो. त्याच दिवशी दत्तू आला होता.

मी म्हणे, " दिव्यावर राख टाका."

ते म्हणत, " नाही, पाणी टाका."

तिकडे भडका अधिकच होऊ लागला.

ते मोठमोठ्याने ओरडू लागले, " ही जिथे तिथे माझा असा पाणउतारा करते."

इतक्यात दत्तूने काठीने दिवा खाली पाडला व वर राख टाकली.

ह्या वादात बराच वेळ गेला.

" दत्तू, तू जिथे तिथे माझा अपमान करतोस. तुला माझी किंमत कळली नाही."

" मला किंमत कळली आहे, पण ही वेळ किमतीची नाही. वारा सुटला आहे. पाण्याने आणखी भडका होईल."

" होऊ दे. तुला काय त्याचे ? माझे घर जळेल. मी मालक आहे."

पण राख टाकताच दिवा विझला होता. टिळकांचा रागही शांत झाला होता. ते आपल्या ऑफिसमध्ये गेले व थोड्या वेळाने एक कविता घेऊन बाहेर आले. टिळकांना आपले दोष कळू लागले होते व ते घालविण्याचा ते आटोकाट प्रयत्न करीत. ही कविता म्हणजे त्यांचे पिळवटून निघालेले हृदयच आहे.

तोवरि संताप, संताप
जोवरि पदरी पाप—ध्रु०
अभिमाने आकळिले
जोवरि क्रोधपिशाच्चे पिळिले——१
हार फुलांचा दिसशी
अवचित साप भयंकर होशी——२
ज्ञानतरंगी तरशी
गरगर मोहावर्ती फिरशी——३
ख्रिस्ताला वश आता
पुनरपि वश होशी निजचित्ता——४
म्हण अपणा तरलेला
जा कर बोध समस्त जगाला——५
मीपण जोवर मेले
नाही, खांबावरती खिळिले——६

राहुरीसच टिळकांनी पुष्कळ भजने व अभंग लिहिले. एक दिवस टिळक काही ख्रिस्ती मंडळींसह फिरायला गेले असता तिकडून एक दिंडी आली. ख्रिस्ती उपासनापद्धतीत पाश्चात्त्य संगीताला व पद्धतीला मिळालेले प्राधान्य कमी झाले पाहिजे, असे टिळकांना वाटून त्यांनी त्याच दिवशी– 'तुज सोडून ख्रिस्ता, जाऊ कुठे,' 'ख्रिस्ती गुरुमाऊली' वगैरे पुष्कळशी प्रसिद्ध भजनगीते रचली. भक्तिभावाने ओथंबलेले त्यांचे पुष्कळसे अभंगही येथेच लिहिले गेले.

१९०५ व १९०६ साली त्यांनी धार्मिक स्वरूपाची कविता फार लिहिली. उपासनासंगीतात ६८२ पैकी २५४ गीते त्यांची आहेत. ह्याशिवाय प्रभूची प्रार्थना व भजनसंग्रह ही त्यांची दोन पुस्तके ह्याच स्वरूपाची आहेत. ह्यांपैकी बहुतेक ह्या काळातील आहे. ह्या कविता वाचल्यास त्या वेळी टिळकांची मन:स्थिती कशी होती हे दिसून येते.

आपण बुद्धीने प्रथम ख्रिस्ती झालो, परंतु मनाने ख्रिस्ती होण्यास पुढे दहा-बारा वर्षांचा काळ लागला, असे टिळक म्हणत; व ह्या सुमारास तो दुसरा बदल त्यांच्यात होऊ लागला होता, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांच्या अंतरीची तळमळ ह्यावेळच्या कवितांतून दिसून येते. त्यांच्या अंगी असलेला अभिमान लयाला जाऊन ईश्वराच्या ठायी शरणवृत्ती अधिकाधिक दिसून येऊ लागली. १९०६ साली त्यांनी लिहिलेले हे गीत म्हणताना त्यांच्या डोळ्यांना पाणी येत असे व आम्हालाही ते म्हणताना अजून काहीतरी निराळेच वाटते.

चाल (आरती ज्ञानराजा)

**शेवटी प्रभुराया । बिलगलो तुझिया पाया**
**गेले रे गेले माझे ! आजवरी जन्म वाया !**

**तुझा मी शिष्य थोर । शिष्यधर्मी धुरंधर**
**वाटले अभिमाने । आता लाज वाटे फार**

**मीपणे फसविले । तुला मला दूर केले**
**सर्वथा स्वमनाचे । तुझ्या नावे दास्य केले**

**मजला बुद्धि नाही । बळ नाही, ज्ञान नाही**
**तूच रे तूच माझे । आता ख्रिस्ता सर्व काही !**

**मजला दृढ धरी । नको जाऊ देऊ दूरी**
**येवढी भीक घाली । वाट पाहातो मी दारी ।**

## ५८ : गोपाजी

टिळकांच्या मेंदूभोवती एकदा विचाराचे कुंपण पडले की त्यांना बाहेरच्या वातावरणाची दाद नसे. ते विद्वान, मी विनोदी. पण त्यांची

विद्वत्ता माझ्या विनोदाच्या आड येत नसे व माझा विनोद त्यांना त्रास देत नसे.

माझी मुलगी हौशी बाळंतपणाला आली होती. सुगंधराव करमरकर सहकुटुंब आमच्याकडे होते. त्यांचे कुटुंब व्हर्जिनियाबाई ह्या उत्तर हिंदुस्थानी होत्या. त्यांना मराठी कळे, पण त्या बोलत हिंदुस्थानी. म्हणजे आम्ही रानात होतो तरी आमच्या घरच्या चार माणसांबरोबर आठ-दहा पाहुणे सहज जमत असत.

ज्वरबिंदूचे डॉ. भास्करराव गोवंडे त्या दिवशी पाहुणे आले होते. डॉ. गोवंडे दिसण्यात धिप्पाड, गोरे, घाऱ्या डोळ्यांचे व भरपूर दाढी-मिशा असलेले रुबाबदार गृहस्थ होते. सुगंधरावांची बायको त्यांची बहीण म्हणून संपादून जाण्यासारखी होती.

सकाळी आठ-नवाचा सुमार होता. चहा व इतर जिन्नस ह्यांचा भरपूर समाचार घेऊन आम्ही आपापल्या कामाला लागलो होतो. म्हणजे टिळक लिहायला, हौशी व व्हर्जिनियाबाई स्वैपाकाला, डॉक्टर गोवंडे व सुगंधराव करमरकर बाहेरच्या ओसरीवर पडल्या पडल्या गप्पा मारायला व मी जाळीला टेकून टेहळणी करायला. आमच्या घराच्या ओसरीला लोखंडी पट्ट्यांची जाळी असे. तिला टेकून बसले की घरात काय चालले आहे व बाहेर काय चालले आहे ते एकाच वेळी सर्व दिसे.

मला उपचाराची बाधा बहुतकरून कधीच होत नाही. माझे पाहुणे मला घरचेच वाटत व मी कधी कोणाच्या घरी गेले, की क्षणामध्ये घरची बनते. बालकवी ठोंबरे मला नेहमी म्हणायचा, " लक्ष्मीबाई, तुमच्याकडे पंचम जॉर्ज आले तरी त्यांना तुम्ही सांगाल, की बाबा रे, येताना तेवढे फाटक लोटून घे."

मी बसले होते तेथे जवळच डॉ. गोवंडे व करमरकर लोळत होते. त्यांचे डोळे बंद होते, पण कान उघडे होते. इतक्यात मला सडकेवरून एक माणूस लगबगीने येताना दिसला. त्याच्या पाठीवर काहीसेसे होते. मी चालण्यावरून त्याला ओळखले. तो तर आमचा गोपा ! टिळकांनी ह्याला बराच रंगारूपाला आणला होता. आता जवळच्याच

खेड्यात तो एक मास्तर होता व गोपाचा गोपाळराव झाला होता. आम्हाला तो आमच्या घरच्यासारखाच वाटे. त्याचे डोळे जरा अधू होते.

तो जसजसा जवळ येऊ लागला तसतसा माझा नेहमीचा स्वभाव उसळी मारू लागला. मला पाहून तो झपाझप पावले टाकू लागला. शेवटी जवळ येऊन त्याने आपल्या पाठीवरील गाठोडे खाली ठेवले व पाहुण्यांकडे हात करून 'हे कोण ?' म्हणून खुणेने विचारले. पण त्याच्या खुणेच्या प्रश्नाला मी सरळ मराठीत मोठ्याने उत्तर दिले–

"काय करू रे गोपा, मला अगदी कंटाळा आला आहे ! तूच पाहतोस ना, किती हे पाहुणे ! हा एक असाच आला आहे. ह्याला आमची भाषा समजेना नि आम्हाला ह्याची समजेना. आहे एक खायला काळ भुईला भार. धड वेडा ना धड शहाणा !"

मी गोपाशी हे हितगुज करीत आहे तो डॉ. गोवंड्यांनी करमरकरांकडे किलकिले डोळे करून पाहिले. करमरकरांनी त्यांच्याकडे पाहून डोळे मिचकावले.

माझे बोलणे इतके मोठ्याने होते, की आतून व्हर्जिनियाबाईने ते ऐकले व बाहेर येऊन माझ्यापुढे हातवारे करीत ती बोलू लागली, "आप ये क्या कहती हैं ? आप इनको पहचानते नहीं ? ए जनाब मेरे भाइजान है, और तंजावरके आगे दिल्ली नगरके रहनेवाले है. वहाँ इनका आँखोंका बहोत बडा दवाखाना है." इतके बोलून ती पुन्हा स्वैपाकघरात गेली.

इकडे डॉ. गोवंडे आपल्या पथारीवर उठून बसले होते. मांडी घालून अगदी निर्विकार मुद्रेने ते आम्हा दोघांकडे पाहत होते. व्हर्जिनियाबाईनी पुन्हा बाहेर येऊन आपल्या भावाबद्दल आणखी माहिती सांगितली–

"हमारे भाई बोहत आसानी से आँखोंकी आपरेशन करते है. इनकी तरकीब ऐसी उमदी है के दोनों आँखोंको निकालकर मेझपर रख देते है. फिर उनकी व्हो उनकी खाक वो मिट्टी निकालकर अच्छी तरहसे धोकर चष्मखानेमें बिठा देते है. मेरी शादी होने के पहिले मैं

इन्हीके दवाखानेमें नर्स थी."

"मला काय ग हे ठाऊक ? मग माझ्या गोपाचे डोळे घे ना तपासून !"

"अच्छा, अब तो नही. लेकीन खाना खाये बाद उनसे कहे देऊंगी."

डॉक्टरांची ही नवीन वहीण त्या दिवशी पाठच्या बहिणीहून अधिक जवळची झाली. त्यांचा पाहुणचार करण्याचा सर्व मक्ता त्या दिवशी तिनेच घेतला होता.

दुपारच्या जेवणाच्या वेळी सर्व एका पंक्तीला बसले. मी व गोपाजी मात्र समोर बसलो होतो. वाढण्याचे काम व्हर्जिनियाबाईकडे होते. जेवताना कोणीच कोणाशी बोलत नव्हते. टिळक विचारात व डॉक्टरांनी मौन व्रत घेतलेले. त्यांना काही लागले म्हणजे त्यांनी 'दत्तू' म्हणावे, ताटात तो पदार्थ वाढलेला असेल तेथे बोट आपटावे. मी गोपाला हळूच डाव्या हाताने डवचून डॉक्टरकडे पाहण्यास सांगे. डॉक्टर त्याच्याकडे मोठ्या चमत्कारिक नजरेने पाहत. तसा तो मला म्हणे,

"लई गिन्हेबाज पाखरू ! लोटण कबूतर ! कुठं गवसलं कुणास ठाऊक! बाई, माझ्या तावडीत येऊ द्या त्याला, अशी गोफण मारीन, की ज्याला म्हणतात तशी."

टिळक म्हणत, "काय रे वेड्यासारखी बडबड लावली आहेस गोपा ? वेड तर नाही लागले तुला ? नीट मुकाट्याने जेव."

गोपा डॉक्टरांना इतके बोलत होता तरी आपल्याला त्यातले काही कळते आहे असे डॉक्टरांच्या चेहऱ्यावर मुळीच दिसत नव्हते. जेवणी झाल्यावर टिळक आपल्या खोलीत गेले व बाकी आम्ही सर्वजण दंगल करायला मोकळे झालो.

मी पुन्हा गोपाच्या डोळ्यांचा प्रश्न काढला. "पैसे काही मिळणार नाहीत. तो आहे गरीब." मी वकिलीला सुरुवात केली.

व्हर्जिनियाबाई व डॉक्टर ह्यांचे अबकडच्या भाषेत थोडा वेळ बोलणे झाले व बहिणीने उर्दूत आम्हाला सांगितले की, "माझा भाऊ हे काम फुकट करायला तयार आहे."

झाले ! ऑपरेशनची तयारी झाली ! नर्सबाईंनी घरातून सामान आणले. मेजाऐवजी तीन पाट आणून व्यवस्थेने मांडले, पाण्याची घागर, परात, घंगाळ, दोन रुमाल, एक नवी दोन वीत लांबीची चकाकणारी सुरी, एक चमचा ! चमचा पाहून मी विचारले, "काय ग, चमचा कशाला ?"

"व्हो तो चष्मखानेमें पानी डालकर उनको धुलानेके लिये है."

"म्हणजे बुबुळं बाहेर काढून त्या खाचेत पळीसारखे ढवळणार की काय ?"

नंतर डॉक्टरांनी खुणेने पेशंटला जवळ बोलावले. वीरासन घालून उजव्या हातात त्यांनी सुरी धरली. पेशंटच्या मागे आधाराला नर्स उभी राहिली. सुरीचे टोक डोळ्याच्या कोपऱ्याजवळ येताच पेशंटने डॉक्टच्या हाताला झटका दिला व तो झटक्यासारखा उभा राहून पळू लागला. पण ती ब्रह्महत्या त्याच्या पाठीमागे लागली.

गोपा पुढे, त्याच्यामागे डॉक्टर व त्यांच्या मागे नर्स. सगळ्या घरभर व घराभोवती ही धावपळ सुरू झाली. डॉक्टरांना त्याला पकडता आले असते, पण ते मुद्दामच थोडे अंतर मध्ये ठेवीत होते. आम्ही प्रेक्षकही ह्या लोळकांड्यामागे होतोच.

मी म्हणे, "पुरे ग बाई तुझ्या भावाचे हे ! ह्यापेक्षा एखादे प्रिस्क्रिप्शन नाही तर चष्मा का नाही देत ?"

व्हर्जिनियाबाई म्हणे, "मेरे भाईजान इतने आच्छे डॉक्टर है, के अगर वे एक वख्त कोई हमदरदी उनके कब्झेमें आया तो उसकू तनदुरुस्त करे बगैर छोडतेही नही."

शेवटी अतीच झाले तेव्हा सुगंधरावांनी डॉक्टरांच्या कमरेला विळखा घालून त्यांना खाली बसविले व हौशीच्या नवऱ्याने गोपाला शांत केले. घरातील सर्व मंडळी हसून हसून बेजार झाली. आम्ही सर्व पूर्ववत आपापल्या जागी बसलो.

मी पुन्हा नर्सबाईच्या तर्फे डॉक्टरांना प्रश्न टाकला की, "एखादे प्रिस्क्रिपशन किंवा चष्मा का नाही देत ?"

पुन्हा कुडबुड सुरू झाली. डॉक्टर डोलू लागले. त्यांनी आपल्या

डोळ्यांचा चष्मा काढून गोपाच्या डोळ्याला लावला. त्याला त्या चष्म्याने अगदी स्पष्ट दिसले. गोपा खूष झाला. डॉक्टरांनी चष्म्याचा नंबर त्याला लिहून दिला. मग प्रिस्क्रिप्शन लिहिले. त्यात पेशंटचे नाव लिहिले होते : Go-paji !

झाले ! भ्रमाचा भोपळा फुटला. पुन्हा एकदा हास्याचा फार मोठा स्फोट झाला. गोपा आता भयंकर रागावला. डॉक्टरांनी त्याला मिठी मारली.

" गोपाळराव, तुम्ही खरंच रागावलात की हो ! अहो, ही सारी गंमत होती. तुमच्या कसे ध्यानात आले नाही ?"

पण गोपाचा ज्वालामुखी आता संपूर्ण जागा झाला होता. त्याची बडबड बंद होईना. डॉक्टरांनी त्याला एक रुपया दिला, तरी तो शांत होईना.

" मी तुमच्यासाठी हुरडा आणला होता. तो तुम्हाला गरमागरम भाजून देणार होतो."

" अरे गोपा, तुला पाहताच आम्ही तुझा हुरडा मुळी शिजायलाच टाकला. तो इतका वेळ खदखदत होता. त्यापुढे तुझ्या भाजलेल्या हुरड्याची काय कथा ?"

आम्ही सर्व हसलो. गोपाही हसू लागला. शेवटी टिळक बाहेर आले. त्यांना हा सगळा प्रकार समजल्यावर ते आम्हाला खूप रागे भरले.

* * *

## ५९ : पुनर्जन्म

राहुरीचीच गोष्ट. टिळक कसल्याशा ख्रिस्ती संमेलनासाठी जालन्यास गेले होते. घरची पाहुणेमंडळीही पांगली होती. मात्र दत्तू पुण्याहून सुट्टीला घरी आला होता. निळकंठरावमामा, त्यांचे कुटुंब, दोन मुले

चिमबाबा, बेबी व मी, इतकीच माणसे घरी होतों.

टिळक जाण्याच्या अगोदर शहाजी भिल्लाला कामावरून काढून टाकले होते. पण तो कामावरून दूर होताच वरावर दगड येऊ लागले. एक दिवस चोर अगदी घराजवळ आले.

निळकंठरावमामा त्यांच्या मागे लागले. जोंधळा गळ्याइतका वाढला होता. हे लोळकांडे जात जात कुठल्याकुठे कोनाकोपऱ्याला गेले होते. आम्ही सगळे कंदील, काठ्या वगैरे आयुधे घेऊन त्यांच्यामागे चालल्लो होतो.

पलीकडे जोंधळ्याच्या ताटांचा सळसळ आवाज येत होता. त्या अनुरोधाने आम्ही चालल्लो. चोर मामांच्या हातचा बेदम मार खाऊन पडलेला आढळला. छान झाले. आम्हाला वाटले, आता चांगली दहशत बसेल. आम्हीही धीर करून त्याला मारायला काठ्या उगारल्या.

तो मामा कण्हून सांगू लागले, " मी चोर नाही. चोर पळाला. मी मामा आहे ! खरेच मामा ! "

सर्वांनी मिळून त्यांना उठवून घरात आणले. मामा फार म्हणत असत, की माझ्या तावडीतून कधी चोर सुटणार नाही. पण त्या दिवशी मात्र आम्हाला अनुभव वेगळा आला. पुन्हा शहाजी भिल्लाची राखणदार म्हणून स्थापना झाली व नंतर मात्र चोरांचा त्रास कधीच झाला नाही.

ह्या ठिकाणी आल्यावर माझ्या प्रकृतीत फारच सुधारणा झाली. मी इतकी फुगायला लागले की काहीच्या बाहीच. हातांत बांगड्या व गळ्यात गळसऱ्या तटाटू लागल्या. थोडक्यात म्हणजे राहुरीस गेल्यावर मी चांगलीच वजनदार बायको झाले होते. का नाही होणार ? स्वतःचे सत्तेचे घर, मनाप्रमाणे सर्व काही जेथल्या तेथे व्यवस्था.

दारी एक सुंदर बगीचा केला होता. त्यात काही एरंडाचीही झाडे होती. एरंड्या निघाल्यावर त्यांचे मडके भरून ठेवले. नंतर त्या एरंडाचे माझ्या डोक्यात गुऱ्हाळ सुरू झाले. प्रत्येक गोष्टीचा काहीतरी उपयोग झालाच पाहिजे. तसे तेथे सर्व काही स्वतः करायचे व सगळ्या गोष्टींचा उपयोग करून घ्यायचा हे माझे चालले होते. त्यात अगदी

गाड्याच वृत्तीचा चिमवाबा मला मिळाला होता. आम्ही दोघांनी मोटांचे नाडे, सैंदर वगैरे जिन्नस उरलेल्या काथ्याचे बनविले होते. औषधे वगैरेही तयार करण्याचा नाद मला होताच.

मडकेभर एरंडया पाहून त्यांचा सदुपयोग करून घेण्याचे माझ्या डोक्यात आले. मी चिमबाबाला म्हटले, "चिमबाबा, एक कपभर एरंडया सोल बघू."

त्याने त्या सोलल्यावर त्या बारीक वाटून त्यात दालचिनी व सुंठ घातली व गाईच्या तुपात त्या भाजल्या. मग साखरेचा पाक करून एरंडयाची बर्फी बनविली. ती फारच छान लागत होती. एखादा जिन्नस एकटीने खायचे माझ्याच्याने कधीच होत नाही. पण ही बर्फी तयार होईपर्यंत सारी माणसे झोपी गेली होती. दत्तू तेवढा जागा होता. दत्तूने थोडा भुगा खाल्ला. मीही उरलेल्या भुग्याचा चट्टामट्टा केला. बेबी घेईना. तिला खूप झोप येत होती. मग आम्ही निजलो.

पहाटे दत्तूला अभ्यासाला उठवून बसविले, पण तो काही बसेना. माझी सरबत्ती सुरू झाली– "तू कधी **अभ्यास** करीत नाहीस. पुढे भीक मागायची का? चांदेकर नेहमी म्हणतात, तू कधी अभ्यास करीत नाहीस."

दत्तू म्हणाला, "आई, मी खरंच सांगतो. माझं डोकं फिरतं आहे."

"अभ्यासाच्याच वेळेला कसं तुझं नेहमी डोकं फिरत असतं?"

माझे हे बोलणे ऐकून तो जुलमाने उठून बसला तो धपकन खाली पडला. मी त्याला उठवायला गेले तर मलाही सारे फिरते आहे असे वाटू लागले. आणि मग आमच्या दोघांच्या हालाला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत आमची कॉलरा झालेल्या माणसासारखी स्थिती झाली. चिमबाबा घाबरला. तो टिळकांना तार करू म्हणत होता. शेवटी मी त्याला डॉ. बालैंटाईनकडे पाठविले. चिमबाबाने डॉ. बालैंटाईनसाहेबांना सर्व प्रकार सांगितला. साहेब फार रागावले. ते म्हणाले–

"अरे बाबा! ती बाई फार वाईट आहे. ती नेहमी असेच भलतेसलते करून खाते, नवऱ्याला देते. मुलाला देते, मला पाठविते. नवऱ्याचे डोळे तिनेच असे त्याला काही काही खायला घालून बिघडून टाकले."

बालेंटाईनसाहेबांची कल्पना झाली, की मी काहीतरी पक्वान्न करून खाल्ले. नुकतेच एक-दोनदा त्यांना मी पुरणाच्या पोळ्या व लाडू पाठविले होते. त्यांचे तेव्हापासून असे मत झाले होते, की मी रोज पक्वान्ने खाते व दुसऱ्यांना खायला घालते.

असो. पण हे साहेब भडकले होते तरी फार सहृदय होते. त्यांनी ताबडतोब आम्हाला औषधे दिली व नुसत्या मोसंब्यावर आम्हाला ठेवले. मग आम्हाला आराम पडला. हा प्रकार शुक्रवारी झाला. मी रविवारी चर्चला येते तो माझ्यात इतका फरक पडलेला दिसून आला की मला कोणी ओळखलेसुद्धा नाही.

जे ते मला विचारू लागले की, बाई, "तुम्ही काय उपाय केला सांगा." पण मी कधी कोणाला माझा उपाय सांगितला नाही व तो बर्फी-सुद्धा कोणाच्या हाती लागू दिली नाही. चिमबाबाने अगदी विश्वासाने ती खोल पुरून टाकली.

टिळक जालन्याहून आल्यानंतर माझा शारीरिक फरक पाहून त्यांना मोठे आश्चर्य वाटले. मात्र अघोरी म्हणून त्यांनी शेरा मारलाच.

आम्ही राहुरीस आलो तसे सखारामभाऊजीही राहुरीस येऊन तेथे वकिली करू लागले होते. टिळक जालन्याला जाताना त्यांच्या घरी भेटायला गेले होते. त्यांच्या भावजयीने त्यांना तवा, कढई वगैरे जिनसा आणण्यास सांगितल्या होत्या. टिळकांनी त्या अगदी न विसरता आणल्या व स्वतः त्यांच्या घरी नेऊन दिल्या.

त्या वेळी रखमाबाईने टिळकांना त्या जिनसांची किंमत विचारली. टिळकांना आपल्या भावजयीचा त्यामुळे फार राग आला व दोघांचे काही भांडण झाले. नंतर टिळक घरी आले व ते भांडण विसरून गेले.

रात्री जेवणीखाणी संपून टिळक जाऊन निजले, इतक्यात दाराशी एक टांगा येऊन उभा राहिला. आतून भाऊजी उतरले. ते अगदी घामाघूम झाले होते. त्यांच्या तोंडावर सहा महिन्यांच्या दुखणेकऱ्याची कळा आली होती. त्यांना पाहून मी घाबरून गेले.

स्मृ... २३

मी म्हटले, "भाऊजी, काय झाले? घरी सगळी बरी आहेत ना?"

"हो ! पण नाना कसा आहे ?"

"म्हणजे ? ते जेवून आताच निजले. चांगले आहेत ते."

"हे पहा त्यांचे पत्र. मी घरी आलो तो हे हाती आले.

ते म्हणतात, "हेच तुला माझे शेवटचे पत्र. ह्यापुढे तुला माझे तोंड दृष्टीस पडणार नाही."

आता माझ्या ध्यानात सर्व प्रकार आला. मी त्यांना सर्व काही सांगितले. भाऊजींचा जीव खाली पडला व ते घरी गेले.

* * *

राहुरीस असताना आमच्याकडे एक कवी आले होते. त्यांनी नुकताच पोलीसच्या नोकरीस रामराम ठोकला होता. पुढे काय करायचे हे त्यांचे ठरले नव्हते, पण त्यांनी खूप कविता रचल्या होत्या, व आणखी खूप रचण्याचा त्यांचा मानस होता. त्यांच्या कवितांतील एक कवितेचा आरंभ 'नको ही पोलिसची चाकरी' असा होत होता. पोलीस खात्यातील आपले गमतीगमतीचे अनुभवही ते पुष्कळ सांगत.

आता नाटके रचून पुढचा काळ घालवावा असे त्यांच्या मनात आले व त्यांनी ताबडतोब नाटक लिहिण्यास घेतले. त्यांचा कारकून दत्तू. त्यांनी सांगावे व ह्याने भराभर उतरून घ्यावे. ते कविता तर जणू काही पाठ म्हणून दाखविल्याप्रमाणे बोलता बोलता करीत. नाटक प्राचीन हिंदुस्थानातील काही ऐतिहासिक कथानकावर होते. त्यात "कोणि कोणि चंदनाचि उटणि लाविती" असे एक गाणे होते.

हे नाटक एखादा अंक लिहून झाल्यावर संपले. कविराज आपल्या बरोबर एक बायकोही घेऊन आले होते. अर्थात ब्राह्मणाची बायको आमच्या घरात कशी राहील ? ती राही शेजारच्या विरोबाच्या देवळात-तिकडेच स्वैपाक करी. फारशी आमच्यासमोर येतच नसे.

मी म्हणे, "कविराज, ही ब्राह्मणाची बायको, आणि हिच्या गळयात मंगळसूत्र कसे नाही ?"

ते म्हणत, "अहो बाई, हिला लहानपणापासून मराठ्यांचा सह-

वास, म्हणून नसेल घालीत."

बायकोला आपला जाच आहे व आपण तिला खूप छळतो असे दाखविण्यासाठी त्यांनी आत जाऊन तिला मारण्याचे नाटक करावे, तिने खोटेच रडावे. पण रडता रडता मधूनच दोघांचाही हसण्याचा आवाज एखाद्या वेळी येई. तेव्हा मी ओळखले होते की हे सारे नाटक आहे म्हणून. पण ओळख मात्र कधी दिली नाही.

असो. ह्या कवींची ही त्यावेळची माहिती काहीही असली तरी पुढे ते एक भगवद्भक्त म्हणून फार प्रसिद्धीला आले व त्यांची ती प्रसिद्धी यथायोग्यही आहे.

* * *

टिळकांना पुन्हा नगरचे आमंत्रण आले. नगरास डॉ. ह्यूम ह्यांचा ईश्वरविद्येचा वर्ग होता. त्यात शिकविण्याचे काम टिळकांना होते. पण मध्यंतरी त्यांनी मिशनचे काम सोडून देऊन राहुरीस वास्तव्य केले होते. आता डॉ. ह्यूमसाहेबांनी त्यांना पुन्हा मोठ्या आग्रहाने नगरला बोलावले व टिळकांनी ते कबूल केले. पुन्हा नगरास आमच्या जुन्या घरी राहायला आलो. राहुरीचे घर, शेत, विहीर वगैरे सारे शहाजी भिल्लाच्या ताब्यात देऊन आम्ही सारे परत नगरला आलो.

## ६० : जळगावचे कविसंमेलन

भास्करराव कोटक हे टिळकांचे दोस्त होते. टिळकांचे हे मोठे चाहते होते. ख्रिस्ती समाजात आल्यावर येथील पुढाऱ्यांना टिळक पुष्कळ दिवस पचले नाहीत. पुष्कळ बाबतीत कानामागून आला न् तिखट झाला अशी त्यांच्याबद्दल ह्या पुढाऱ्यांची भावना होत असे. आणि टिळकही ह्या 'पुढाऱ्यांना' पुरून उरणारे होते. त्यांच्यावर टिळकांनी काही काही कविता केल्या आहेत, त्यांत मोठी खोच आहे.

एका गृहस्थांनी टिळकांच्या विरुद्ध पुष्कळ खोटयानाटया गोष्टी सांगून लोकमत दूषित करण्याचा विडाच उचलला होता. त्यांना अनुलक्षून टिळकांनी आपली 'टिमकीवाला' ही कविता लिहिली. शेवटली ओळ "जाळ वार्तेला की जाळ अशा तोंडाला" इतकी संतापून लिहिली आहे की, शेवटी शेवटी ही कविता आपणच उगीच लिहिली म्हणून त्यांना वाईट वाटे.

दुसरी एक कविता 'तो आम्हाला भ्याला' म्हणून अशाच टीकाकारांवर लिहिली होती. तीत चंद्र उगवला आहे, तो हसत हसत रात्रभर आपले मार्गक्रमण करीत आहे. शेवटी प्रभाती सृष्टिनियमाप्रमाणे तो मावळतो, परंतु रात्रभर कुत्र्यांनी ऊर फुटेपर्यंत भुंकून भुंकून जिवाचा आटापिटा केला व सकाळी चंद्र आम्हाला भिऊन पळाला म्हणून समाधान मानून घेतले, अशा आशयाची ही कविता आहे.

आणखी एक कविता 'दानीएल आणि ग्रामसिंह' म्हणून आहे. बायबलमध्ये ही गोष्ट आहे. दानीएल हा एक मोठा इब्री भगवद्भक्त होऊन गेला. त्याच्या छळवाद्यांनी त्याला सिंहाच्या गुहेत नेऊन टाकले, पण तेथे सिंहाने त्याला काही केले नाही अशी ही कथा आहे. टिळकांच्या ह्या कवितेत ग्रामसिंहांना त्यांनी म्हटले आहे की, "सिंहाच्याही गुहेमध्ये जो निर्भय हो राहुनी। तयावर अर्थ काय भुंकुनी ॥"

असो. कोटकांना मराठी कविता फार समजे व विशेषत: वर सांगितल्या तसल्या तऱ्हेच्या कविता ते मिटक्या मारून वाचीत, व आपल्या समाजातील अहंमन्य पुढाऱ्यांना टिळकच वठणीवर आणतील अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. ते एक विभूतिपूजक होते, पण त्याच वेळी ते टिळकांचे मित्रही होते.

एकदा टिळकांना कोटकांची तार आली: "आय ॲम डाईंग कम ॲट वन्स." टिळक उसने पैसे काढून पुण्यास गेले. कोटकांनी हसत हसत त्यांचे स्वागत केले ! टिळक कोटकांवर फार संतापले. पण कोटकांना टिळकांना भेटण्याची व त्यांची चेष्टा करण्याची लहर आली होती.

ते म्हणाले, "तुम्ही एवढे पंडित आणि तुम्हाला माझ्या तारेचा अर्थ कळला नाही ! "आय ॲम डाइंग टू सी यू" असा त्या तारेचा

अर्थ. खरोखरच मी मरत असतो तर मीच कशी तुम्हाला तार पाठविली असती ? दुसरी कोणी पाठविली असती !"

त्या दोघांच्या मध्ये पुष्कळच अंतर होते, पण दोघांना एकमेक फार आवडत.

टिळकांना आपल्या हातात वर्तमानपत्र असावे असे फार वाटे. तेव्हा त्यांनी 'ख्रिस्ती' नावाचे पत्र काढले. त्या पत्रात ख्रिस्ती धर्माचा उपदेश ख्रिस्तीतरांना व हिंदी संस्कृतीचा उपदेश ख्रिस्ती लोकांना असे. हे पत्र आमच्या घरातील बऱ्याचशा पैशांचा चट्टामट्टा करून गत झाले. पण टिळकांची वर्तमानपत्राची खुमखुम मात्र कमी झाली नव्हती.

शेवटी नगरास आल्यावर कोटकांचा व टिळकांचा पत्रव्यवहार खूपच खूप वाढलेला आढळून आला. दोघांच्या गाठीभेटी पुष्कळ होऊ लागल्या. टिळक ऊठ–पळ पुण्यास पळू लागले. आणि १५ डिसेंबर १९०४ ला 'ख्रिस्ती नागरिक' पत्राचा जन्म झाला. भास्करराव कोटक ह्या पत्राचे मॅनेजिंग प्रोप्रायटर झाले. प्रसिद्ध वैय्याकरणी रे. गणपतराव नवलकर इंग्रजी भागाचे संपादक झाले व टिळक मराठी भागाचे संपादक झाले.

ही तिन्ही डोकी मोठी निर्भीड व हृदये मोठी सडेतोड. त्यामुळे ह्या पत्राने ख्रिस्ती समाजात मोठी खळबळ उडवून दिली. पत्राने तीन वर्षे चालून, ख्रिस्ती समाजात मोठी जागृती करून व भास्करराव कोटकांच्या डोक्यावर मोठे कर्ज ठेवून आपली अवतारसमाप्ती केली.

ह्या पत्रात टिळकांनी ज्या ज्या गोष्टी सुरू केल्या होत्या व ह्याचे जे धोरण त्यांनी आखले होते, त्याच गोष्टी व तेच धोरण त्यांनी पुढे १९१२ साली 'ज्ञानोदय' त्यांच्या हाती आल्यावर शेवटपर्यंत त्या पत्रातही कायम ठेवले.

ख्रिस्ती नागरिक व १९१२ ते १९१९ चे ज्ञानोदयाचे अंक चाळून पाहिले तर त्यातून पुष्कळ आश्चर्ये दिसून येतील.

जळगावास पहिले कविसंमेलन भरले. त्याची कल्पना मूळ टिळकांच्या डोक्यातील असली पाहिजे हे १६ फे. १९०७ च्या ख्रिस्ती नागरिकाच्या अंकावरून दिसून येते. ह्या संमेलनाचा मूळ हेतूही ह्या

अंकातील पत्रात दिसून येईल. ते पत्र असे :—

वि. वि. ईश्वराच्या कृपेने जळगाव येथे मार्च ता. २ व ३ असे दोन दिवस आधुनिक मराठी कवींचे संमेलन व्हावे असे ठरले आहे. हिंदुस्तानच्या इतिहासात कवी आणि कविता यांची जागा, त्या जागेवरून आमचे आजचे कवी ढळले आहेत का, ढळले असतील तर त्यांना पुन्हा त्या पदावर आरूढ होता येईल का, एकोणिसाव्या व विसाव्या शतकातलेच असे एखादे मराठी महाकाव्य का नाही, असे एखादे काव्य होणार नाही का, काव्यरत्नावलीसारखे आधुनिक कवितेचे मासिक पुस्तक सोळा-सतरा वर्षे अस्तित्वात असून इतके विपन्नावस्थेत का आहे, आधुनिक कवितेला ब्रिटिश सरकारांकडून व एतद्देशीय संस्थानिकांकडून प्रत्यक्ष आश्रय मिळणे शक्य आहे का, शेवटी आधुनिक कवींचेच एखादे कार्यकारी मंडळ स्थापन झाले तर त्यापासून काही प्रत्यक्ष फायदा होण्यासारखा आहे का, इत्यादी महत्त्वाच्या प्रश्नांचा खल होऊन निकाल लागावा, व हे होत असता मधूनमधून सकल कवींनी वाग्देवीपुढे बसून परस्परांस रंगवावे, प्रोत्साहित करावे, स्नेहरज्जूंनी आपलेसे करून घ्यावे इत्यादी हेतूंनी हे संमेलन भरविण्यात येत आहे. तरी आपणांकडून व आपल्या वाचकांकडून या कार्यास योग्य प्रोत्साहन मिळेल, अशी आशा आहे.

व्यवस्थापक मंडळीच्या तर्फेने
आपले नम्र सेवक

नारायण वामन टिळक
माधवराव लक्ष्मण खांबेटे
यशवंत गंगाधर दीक्षित
नारायण नरसिंह फडणीस

जळगाव
२४–२–०७

वरील पत्रात टिळकांची सही पहिली व भाषाशैली त्यांची आहे. शिवाय काव्यरत्नावलीचा अशा तऱ्हेने उल्लेख नानासाहेब फडणीसांनी

स्वतः लिहिलेल्या पत्रात केला नसता. तसेच घरातील गडबडीवरून जणू काय टिळकांच्या मुलाचे लग्न होते असे एखाद्याला वाटले असते. नानासाहेब फडणीसांनी पुढे बहुतेक सर्व खरकटे काढले– पण ते करून ठेवले टिळकांनी. ह्या संमेलनातूनच बालकवी ठोंबऱ्यांचा वाङमयिक जन्म झाला, आणि माझ्यासारखी अडाणी बाईही जरा अधिक जोराने तेथूनच गाऊ लागली.

जळगावला जाण्याचा टिळक मला आग्रह करू लागले, पण माझे पोट दुखत होते. तशात घरात म्हशी होत्या ! त्यांच्याकडे माझे अर्धे लक्ष. तेव्हा मी कशी जाणार ? पण मी एक कविता लिहून जळगावच्या संमेलनात पाठवून दिली. अर्थात तिच्यावरून टिळकांचा हात फिरला होता. पण ज्या ओळीमुळे ती सर्वांना इतकी आवडली तिला मात्र त्यांचा हात लागला नव्हता. ती ओळ म्हणजे "कवि तुम्ही, भिकारिण मी हो तुमच्या दारी" सबंध कविता अशी आहे.–

हो काव्यतरूची छाया शीतल भारी
तुम्हि कवी फुले हो ह्या तरुवरची सारी ।।धृ०।।

तुम्हि हसता हसती सृष्टि, सर्व नरनारी
तुम्हि कोमुन जाता जगी खिन्नता सारी
हा सुगंध तुमचा व्यापि दिशांना चारी
मग वाटे भरले सुखच जगामाझारी

हे रसज्ञ मंजुळ गीते, गाउनी
हे तुमच्या मधुर रसाते, प्राशुनि
हे तुमच्या भोते भोते हिंडुनी

म्हणतात जगाला ह्याच फुलांमाझारी
अम्हि जन्म घालवू ! सौख्य हेच संसारी––१

हे त्याच फुलांचे संमेलन हो झाले !
हा हार पाहुनी नाथ जगाचा डोले !

ह्या पुण्यसंगमा येउन असते नमिले,
परि दैव आडवे मज दीनेला झाले !

घ्या, नमस्कार मम घ्या हो, मानुनी
तरि हाच मला हो लाहो ! जन्मुनी
संबंध कवींनो राहो, ह्या जनी

मी बहीण, आपण भाउ सखे कैवारी !
कवि तुम्हो, भिकारीण मी हो तुमच्या दारी ! २

मला त्या वेळी दोनच चाली येत होत्या. माझी ' करंज्यांतील मोदक ' ही कविता ह्याच चालीवर आहे. ती बरीक अगदीच माझी कविता आहे. असो. जळगावच्या संमेलनातील माझ्या ह्या कवितेवर रा. तिवारी व कै. रा. अनन्ततनय ह्यांनीही आपले विचार काव्यरूपाने म्हणून दाखविले. अनन्ततनयांची ही कविता १५ मार्च १९०७ च्या ' ख्रिस्ती नागरिका'त छापली आहे. हो, ह्याच वेळेस तेथे जमलेल्या मंडळींत टिळक ख्रिस्ती म्हणून कोणी त्यांची हेटाळणी केली वाटते. त्या वेळी अनन्ततनयांनी संतापून खाली दिलेली कविता लिहिली आहे–

तू दहनभूमितील पुष्प जयाला गणिशी
ते त्याज्य कसे ते सांग एकदा मजशी
गुण अन्य फुलांचे ह्यात न का वद वसती
जे रसिका भ्रमरा दास करोनी घेती

नवनीत–मृदुल हे स्पर्शी । नाहि का
हा मोहक सौरभराशी । नाहि का
हा आश्रय रसविभवाशी । नाहि का

हे अंतरंग वद भुलवीना कवणाशी ?
वद हरी न नेत्रां कवणाच्या हृदयाशी ?

## ६१ : बालकवी ठोंबरे

टिळकांचे एक कविमित्र होते. त्याचे नाव कर्नल कीर्तीकर. जळगावच्या कविसंमेलनाचे तेच अध्यक्ष होते. हे डॉक्टर असून पुष्कळशा लढायांवर जाऊन आलेले होते. कर्नल कीर्तीकर माझ्याबद्दल 'एव्हर डाइंग वाईफ ऑफ युवर्स' असा टिळकांच्या पत्रात नेहमी उल्लेख करायचे. कारण मला काही ना काहीतरी नेहमी होत असे व नेहमी मी अंथरूण धरलेले असे. अंथरूण म्हणण्यापेक्षा जमीन म्हटली तर अधिक शोभेल. कारण माझी लोळणफुगडी जमिनीवरच चाले. मात्र भूमिशय्या असली तरी नुसता भुजच तेवढा मात्र उशाला पुरत असे. उशाला मी काय घेईन ह्याचा कधी नियम नसे. आठवा, जात्याचा खुंटा, तपकिरीची डबी– थोडक्यात म्हणजे जे काही हाताला लागेल ते माझ्या उशाखाली जायचे. असो.

१५ मार्च १९०७ च्या ख्रिस्ती नागरिकात टिळकांनी ह्या २६ कवींच्या संमेलनाविषयी एक मोठा बातमीपत्रवजा लेख लिहिला आहे. त्यात ते ठोंबऱ्याविषयी लिहितात की–

"त्यांतच कुमार त्र्यंबक बापूजी ठोंबरे नावाच्या केवळ तेरा वर्षांच्या बालकवीचे शीघ्रकवित्व जमलेल्या मंडळीस पाहावयास मिळाले. ह्याची शुद्ध, सुगम, रसाळ कविता ऐकून कवित्वशक्ती ही ईश्वरी देणगी आहे असे कोणाला वाटले नसेल ? हिंदुस्थानात असे किती बालकवी, किती बालसाधू, किती बालवीर उत्पन्न होत असतील आणि पुढे फुकट जात असतील, ह्याचा शोध करून ह्यांना प्रगल्भदशेला आणण्याचे काम कोणी करावयाचे ? आम्हीच हिंदपुत्रांनी ना ? असो. ईश्वर ह्या मुलाकडून आमच्या देशाची पूर्णपणे सेवा करून घेवो ! आम्ही तर सध्या तोंडपाटिलकी आणि कलमबहादुरी करण्यात गुंतलो आहो !"

शेवटी आधुनिक मराठी कवींची व कवितेची काहीतरी पद्धतवार सेवा घडावी म्हणून खाली दिलेले कार्यकारी मंडळ नेमण्यात आले.

अध्यक्ष– लेफ्टनंट कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तीकर. आय. एम. एस. पेन्शनर.

उपाध्यक्ष– रावसाहेब विष्णू मोरेश्वर महाजनी, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, वऱ्हाड प्रांत.

मंत्री– नारायण वामन टिळक.

उपमंत्री– रा. नारायण नरसिंह फडणीस.

सभासद– रा. मोरो गणेश लोंढे, रा. चंद्रशेखर गोरे, रा. काशीनाथ हरी मोडक (माधवानुज), रा. नारायण सिद्धेश्वर जोशी.

ह्या संमेलनाचे काम येथे आटोपले. परंतु ह्या संमेलनाने महाराष्ट्र-सारस्वतासाठी दोन फार मोठाल्या गोष्टी केल्या. एक बालकवी ठोंबरे ह्यांना उदयाला आणले, व दुसरे अभिनवकाव्यमालेची कल्पना येथून जन्माला आली. पुढे पुण्यास टिळक गेले व तेथे प. वा. लक्ष्मण-शास्त्री लेले, प. वा. रावसाहेब कानिटकर, प. वा. वासुदेवराव आपटे, रा. न. चिं. केळकर वगैरे मंडळींच्या सहकार्याने अभिनव– काव्यमाला सुरू करण्यात आली.

ठोंबऱ्यांबद्दल टिळकांना चैन पडेना. हा मुलगा कोठेतरी शाळेत गेला पाहिजे व ह्याचे काही शिक्षण झाले पाहिजे. ह्याच्या काव्य-शक्तीला ओहोटी लागेल असे काही होता कामा नये. म्हणून त्यांनी कर्नल कीर्तीकरांशी जोराचा पत्रव्यवहार सुरू केला. कर्नल कीर्तीकर श्रीमंत होते व टिळकांचे मित्रही होते. त्यांनी ठोंबऱ्यांना दरमहा दहा रुपये देण्याचे कबूल केले. मात्र एक अट घातली, की ठोंबऱ्यांनी नगरास येऊन टिळकांच्या देखरेखीखाली राहावे. त्याप्रमाणे झाले व ठोंबरे नगरास आले.

ठोंबरे एकटेच आले. आधल्याच दिवशी नेहमीच्या रिवाजाप्रमाणे टिळक बाहेरगावी गेले होते. मी वर सांगितल्याप्रमाणे आजारी होते. जाताना टिळकांनी मला सांगून ठेवले होते की, बालकवी येणार आहेत. त्यांची नीट व्यवस्था ठेवा.

नाताळाचा दिवस होता. दहाचा सुमार. मी निजलेली, मुले देवळाला (चर्चला) गेलेली. घरात कोणाचा पत्ता नाही. चाकर-नोकर, शेजारीपाजारी– झाडून सारे देवळाला गेले होते. इतक्यात ठोंबरे आले.

मी विचारले, " तुम्हीच का ठोंबरे ?"

त्यांनी म्हटले, " हो."

" बसा. मुले बाहेर गेली आहेत. ती आल्यावर तुम्हाला खाणावळीत घेऊन जातील. दूध, केळी वगैरे आमच्या घरचे तुम्हाला चालत असेल तर देते."

ठोंबऱ्यांनी काही आढेवेढे न घेता दूध व केळी घेतली.

थोड्या वेळाने दत्तू आला. त्याच्याबरोबर त्याचे मित्र मुळे व पारनाईक हेही आले. त्यांनी ठोंबऱ्यांना खाणावळीत नेले. तेथे ते पुढे जाऊ लागले. राहणे आमच्याकडेच होते. एक-दोन दिवसांत टिळक आले. त्यांनी बाजारात जाऊन कॉडलिव्हर ऑईल आणले व ठोंबऱ्यांना सशक्त करण्याचे ठरविले.

ठोंबरे आला तेव्हा तेवढ्यापुरते एकदाच मी त्याला अहो-जाहो म्हटले; परंतु लागलीच आमच्यातला परकेपणा नाहीसा झाला. मी त्याला अरेतुरे करू लागले व त्याचाही खिन्नपणा एका दिवसात मावळला. आपण कोठे जाऊन पडतो आहो कोणास ठाऊक, असे त्याला झाले होते. ख्रिस्ती माणसे म्हणजे कोणी राक्षस किंवा भुते असावीत अशी त्याची भावना होती, आणि त्याने पुढे तसे कित्येक वेळेला आम्हाला सांगितलेही.

पण एक-दोन दिवसांतच आम्ही माणसे आहो व चांगली त्याला आवडतील अशी माणसे आहो अशी त्याची खात्री झाली. दत्तूची व त्याची ताबडतोब गट्टी जमली. तशीच दत्तूच्या मित्रांची व त्याचीही तितकीच गट्टी जमली. ठोंबरे घरातील मुलांप्रमाणेच वागू लागला.

तो आला तेव्हा मी लोळंतच होते. त्यालाच सांगितले, " बाळ, ते कपाट उघड नि त्यातून दूध काढून घे."

नंतर बाळाने दूध घेतल्यावर कप तेथेच ठेवला तेव्हा पुन्हा सांगितले, " बाळ, तेवढा कप उचलून ठेव बरं."

ह्यावरून तो पुढे माझी नेहमी चेष्टा करायचा की, " लक्ष्मीबाई, पंचम जॉर्ज तुमच्याकडे कधी आले तर त्यांनासुद्धा तुम्ही सांगाल की, " बाळ, तेवढे फाटक लावून घे बरं येताना. "

पण माझ्या एकेरी नावाने त्याला हाका मारण्याने एकदा मोठा अनर्थ झाला. भाऊजीही त्याला माझ्याप्रमाणेच एकेरी नावाने हाका मारू लागले. ठोंबरे दत्तूबरोबरचा. मोठा कवी झाला तरी बालकवीच. त्याला एकेरी नावाने हाका मारायला काय हरकत आहे, असे त्यांना वाटले. एक दिवस ते बाहेर आले. तेथे ठोंबरे होता. त्यांनी त्याला 'ठोंबरे, इकडे ये,'– का काही म्हटले वाटते. तो त्यांचे न ऐकता तडक घरात माझ्याकडे आला. मी स्वयंपाक करीत होते. तो माझ्यापुढे बसला.

" लक्ष्मीबाई, मला तुमच्या दिराचे वागणे अगदी पसंत नाही. हे कोण एवढे मोठे ? मला सारे मान देतात. टिळकसुद्धा मला अरे-तुरे म्हणत नाहीत आणि ह्यांनी का मला अरे-तुरे म्हणावे ? मी त्यांना आता जाऊन चांगले समजावतो."

" अरे बाबा, त्यांना काही बोलू नको. मी नाही का तुला अरे-तुरे म्हणत ?"

" तुमची गोष्ट वेगळी. तुम्ही माझ्या आईच्या जागी आहा. तुम्ही माझ्या खस्ता खाल्ल्या आहेत. माझ्या आजारात हे आले होते का काम करायला ? हे कोण ?"

" ते माझे दीर. माझ्यासाठी त्यांना काही बोलू नको."

हे बोलणे चालले आहे तोच भाऊजी घरात माझ्याकडे आले. आपल्या भावजयीशी ठोंबरे भांडत आहेत व ती त्यांची समजूत करीत आहे हे काय प्रकरण आहे त्यांना कळेना. त्यांनी ठोंबऱ्यांना विचारले, " काय झाले ?" तों तो आणखी उसळला. भाऊजी म्हणाले,

" ठोंबरे, मी अगदी सहज अरे-तुरे म्हणत होतो. पुन्हा नाही कधी म्हणणार. माझी चूक झाली. मला नाही वाटले, तुम्हाला इतका राग येईल." आणि त्या दिवसापासून ते त्याला अहो म्हणू लागले. मीही त्याला अहो-जाहो म्हणू लागले.

पण मला ते साधेना आणि ठोंबऱ्याला ते आवडेना. तो एक दिवस

माझ्याजवळ येऊन बसला, "लक्ष्मीबाई, आता किती दिवस हे असे चालायचे ? मला एकदा तुम्ही दिलेल्या नावाने हाक मारा पाहू !"

मी म्हटले, "चल मूर्खा !" मग तो हसला आणि मीही हसले. मी त्याला फार प्रेमाने बोलायचे झाले म्हणजे मूर्खा म्हणे व त्याने त्या दिवशी मी दिलेल्या पदवीचा उच्चार करून घेतला तेव्हा त्याचे समाधान झाले.

ठोंबरे आमच्या घरी आल्यावर त्याला विषमज्वर झाला होता. चाळीस दिवस तो एकसारखा तळमळत होता. त्या वेळी टिळकांचा पैसा व माझे व रामभाऊ धर्माधिकाऱ्यांचे श्रम, सोराबजीचे औषध व देवाची दया ह्यांमुळे तो वाचला व महाराष्ट्राला त्याचा इतका उपयोग झाला. त्या वेळी मला रात्र रात्र झोप नसे. त्याचे सर्वच मला करावे लागे व म्हणून त्याला व त्याच्या आईला माझ्याबद्दल एक निराळाच स्नेहभाव वाटे. त्याची आई म्हणे, "लक्ष्मीबाई, नाना माझा नाही, तुमचा आहे. तुम्ही होता म्हणून त्याचा पुनर्जन्म झाला."

घरात तो अगदी घरच्यासारखा– दत्तूप्रमाणे वागे. टिळकांच्यापेक्षा तो माझ्याच मागे मागे असायचा. टिळकांच्या समोर आला म्हणजे मात्र मोठा गंभीरपणाचा आव आणण्याचा प्रयत्न करायचा.

कविता केली म्हणजे त्याची पहिली श्रोती मी. मी इकडे कामदारणीला काही सांगत असले किंवा कोणाशी काही बोलत असले म्हणजे तर त्याची कविता वाचून दाखविण्याची घाई व्हायची, आणि माझे दुर्लक्ष आहेसे दिसले म्हणजे त्याने ती कविता रागाने माझ्यापुढे टरकावून फाडून टाकायची. मग दत्तू-बेबीने त्याला चिडवायचे,

**–"अरसिक किती हा मेला**
**हा कविता फाडून बाहिर गेला"–**

मग त्याने हसायचे व पुन्हा ती लिहून काढायची. ठोंबऱ्याला कविता फाडण्याचा बराच नाद असावा. कारण नगरला येण्यापूर्वीच्या त्याच्या बहुतेक कविता अशाच गेलेल्या आहेत. तो काही पाठ म्हणून दाखवी. एक किनरीवाला म्हणून कविता होती. एकीत दगडावर चांदणे

पडले होते ते हरिणबालके दूध म्हणून चाटीत आहेत अशी कल्पना होती.

ठोंबरे नगरास आल्यावर हायस्कूलमध्ये जाऊ लागला. तिसरीत किंवा चौथीत असेल तो. त्यावेळची ही गोष्ट. तेव्हा दत्तूही हायस्कूलमध्येच होता. ठोंबरे शाळेतून आला की लक्ष्मीबाई, गोष्ट सांगा म्हणून माझ्यामागे लागायचा. मी त्याला गोष्टी सांगून दमून गेले. ह्याचा आपला रोजचा लकडा. " लक्ष्मीबाई, गोष्ट सांगा."

एक दिवस माझी विहीण– म्हणजे हौशीची सासू– आली होती. तिला जडीबुटीच्या औषधांची चांगली माहिती असल्याने तिची-माझी मोठी गट्टी असे. तिला गोष्टीही पुष्कळ माहीत होत्या. शिवाय एकदा तिची ती गोष्ट सुरू झाली म्हणजे चार चार तास ती सहज चाले.

ठोंबरे शाळेतून आल्यावर म्हणाला, " लक्ष्मीबाई, गोष्ट सांगा ना."

" हे बघ, आज आली आहे माझी विहीण. तिला चांगल्या चांगल्या, मोठ्या मोठ्या, लांब लांब गोष्टी येतात. ती सांगणार आहे आज तुला गोष्ट !"

माझ्या ह्या बातमीने ठोंबऱ्याला खूप आनंद झाला.

जेवणी होऊन निजायला जाण्याच्या वेळेपर्यंत त्याने बाहेरून आत व आतून बाहेर कितीतरी खेपा घातल्या.

नेहमीप्रमाणे आम्ही सारे एका दंडाळीला निजलो. भास्कर, दत्तू, बेबी, मी, माझी विहीण, ठोंबरे वगैरे. मुलांना माझ्या विहिणीच्या गोष्टींचा चांगला परिचय असल्याने ती सारी तोंडावर पांघरुणे घेऊन ठोंबऱ्याला हसत पडली होती. इकडे आज आपल्याला मोठी गोष्ट ऐकायला मिळणार म्हणून ठोंबरे आनंदात होता. त्याने माझ्या विहिणीशेजारी जागा पटकाविली. अंथरुणावर खुरमांड्या घालून, कान टवकारून तो गोष्ट ऐकू लागला. गोष्टीला सुरुवात झाली. ती गोष्ट अशी–

" हे बघा भाऊ ! एक उज्जनीचा राजा होता. त्याच्या अस्तुरीला होती एक कार, एक पुत्र. ती त्याची पहिली अस्तुरी गमावली. त्याने केली दुसरी अस्तुरी. त्या दुसऱ्या अस्तुरीला सवतीची पोरं नको

होती. तिनं केलं ढोंग, की आपले डोळे लई बिघडले. ती म्हणाली, " मला एका जोशाने सांगितले आहे की दोन्ही मुलांनी मिळून वनात जाऊन त्रासाचं काळीज आणावं व मला खायला द्यावं. मग माझे डोळे बरे होतील."

" त्रासाचं काळीज ? त्रासाला कसं काळीज असणार ?" ठोंबरे म्हणाला.

" त्रासाचं नाही भाऊ, तारसाचं. राजानं अस्तुरीचं ऐकून दोन्ही पोरं वनात सोडली. ते निघाले. एक वन वलांडलं, दोन वनं वलांडली, तीन वनं वलांडली, चार वनं वलांडली, पाच–

" अहो बाई, त्यांनी हजार वनं वलांडली. पुढे काय झालं ते सांगा." ठोंबरे म्हणाला.

" थांबा ना भाऊ. अशी घाई करू नका. पाच वनं वलांडली, सहा वनं वलांडली, सात वनं वलांडली. त्यांना भेटला एक राजहंस. त्याने त्यांच्यावर साया केली. त्यानं बसविलं त्यांना एका रिक्षाखाली. आणि त्यानं घर बांधण्याचा विचार केला. एक समिंद्र वलांडला, दोन समिंद्र वलांडले, तीन समिंद्र वलांडले–"

" बाई, त्यांनी सात समिंद्र ओलांडले, कबूल. पण पुढे काय झाले त्या मुलांचे ते सांगा ना !"

" थांबा ना भाऊ, अशी घाई नका करू. त्या पक्षिराजाने एक काडी आणली, त्यानं दोन काड्या आणल्या, तीन काड्या आणल्या, चार..."

" बाई, त्या पक्ष्याने पर्वतप्राय काड्यांचा ढीग केला. पुढे काय झाले त्या मुलांचे ते सांगा."

" थांबा ना भाऊ ! असं काय करता ? मग तो पक्षिराज दगड गोळा करू लागला. त्यानं एक दगड आणला, दोन दगड आणले, तीन दगड आणले..."

" त्याने मेरुपर्वताएवढी दगडांची रास घातली. कबूल आहे मला. पण त्या मुलांचे काय झाले ते सांगा ना."

विहीण म्हणाली, " हे काय बरं भाऊ असं करता ? मला सांगू द्या ना."

टोंबरे कंटाळला. त्याला झोप येऊ लागली. पण माझ्या विहि-णीला गोष्टीचे फारच स्फुरण चढले. ती जी पडल्या पडल्या गोष्ट सांगत होती ती आता उठून बसली.

" भाऊ, उठा ना ! आता काय, अगदी उलीशी राहिली. उठून बसा ना."

आमच्या सर्वांच्या हसून हसून मुरकुंडया वळल्या. शेवटी ठोंबरे म्हणाला,

" बाई, मी तुमच्या पाया पडतो, पण आता मला झोपू द्या." पण तिने त्याला तीन वाजेपर्यंत झोप येऊ दिली नाही. तो निजला की ती त्याला हलवून उठवायची, व अशा रीतीने तिने आपली गोष्ट पुरी केली. पहाटे आम्ही उठलो पण ही दोघे बराच वेळ निजून राहिली. मी स्वयंपाकघरात होते. ठोंबरे उठल्याबरोबर तेथे आला व त्याने मला अगदी खरा साष्टांग नमस्कार घातला.

" लक्ष्मीबाई, अगदी हात जोडून, साष्टांग नमस्कार करतो तुम्हाला, तुमच्या विहिणीला आणि तिच्या गोष्टीला. ही तुमची विहीण मोठी कादंबरीकर्त्री बनणार होती, पण कोठे माशी शिंकली कोण जाणे ! "

आम्हाला मात्र त्या रात्रीचे हे बिनपैशाचे नाटक पुढे कित्येक महिने पुरले.

## ६२ : घर गेले, म्हैस आली

गेल्या दोन प्रकरणांत कविसंमेलन व ठोंबरे ह्यांच्याविषयी सांगि-तले. पण ठोंबऱ्यांच्या गोष्टींचा ओघ चालू असताच आमच्या संसारा-तील मौजाही चालू होत्याच.

राहुरी सोडून आम्ही नगरास आलो ते फर्ग्युसन गेटच्या त्याच जुन्या घरात राहू लागलो. बरोबर आम्ही आमच्या चिमबाबाला आणले

होते. मोठा सज्जन, सरळ आणि विश्वासू माणूस होता तो. शहाजी भिल्ल सहा रुपये दरमहा घेऊन राहुरीला आमचे घर संभाळीतच होता.

नगरास येताच टिळकांनी प्रथम आपले ऑफिस थाटले. राहुरीहून असतील-नसतील ती बहुतेक पुस्तके बरोबर आणली होती. थोडी मागे राहिली होती. आढ्यापर्यंत उंच पुस्तकांची कपाटे लावून शिडीवर चढून टिळक पुस्तके व्यवस्थितपणे ठेवीत होते. खाली दत्तू व रामभाऊ धर्माधिकारी त्यांच्या हाताशी करीत होते. पुस्तके ठेवता ठेवता त्यांना वेब्स्टरच्या डिक्शनरीची आठवण झाली.

सारे हपीस उलटेपालटे करून पाहिले, पण डिक्शनरी सापडेना. त्यांना कोठे आठवण झाली की दत्तूच्या हातांत ती पाहिली होती. त्यांनी दत्तूला विचारले,

" काय रे दत्तू, तू एक दिवस माझी डिक्शनरी घेतली होतीस ना?"

" नाही पपा, मी नाही घेतली."

" तू खोटे बोलतोस."

" नाही मी कधीच खोटे बोलत नाही."

" मी ती तुझ्या हातात पाहिली."

" नाही, ती राहुरीसच राहिली."

" का हो रामभाऊ, तुम्ही डिक्शनरी येथे पाहिली होती ना ?"

रामभाऊ गडबडले. होय म्हणावे तरी पंचाईत, नाही म्हणावे तरी पंचाईत ! त्यांना काहीच कळेना. टिळकांनी आरडाओरड करायला सुरुवात केली तेव्हा रामभाऊंचा निश्चय ठरला व त्यांना ती नगरासच पाहिली असल्याचे आठवले.

" दत्तू ! तू कोणापुढे उभा आहेस ? काय ते लवकर खरे सांग."

" पण पपा मी ती राहुरीलाच पाहिली."

" तू खरे सांग. मी तुला मारणार नाही. भिऊ नको, खरं सांग."

" ती राहुरीला आहे."

आता मात्र धीर धरणे टिळकांना अशक्य झाले. त्यांनी शिडीवरूनच धबाधब त्याच्या पाठीत पुस्तके फेकण्यास सुरुवात केली. एकी-

स्मृ... २४

कडे ते बोलतच होते–

" मी–तुझ्या–हातात–डिक्शनरी–पाहिली–होती ! मला खोटे ठरवितोस ? तुम्ही सर्वांनी मिळून विचारच केला आहे का, की माझा पाणउतारा करायचा ! "

पण दत्तूचे आपले तेच. इकडे जहाल व मवाळ मंजुळाबाई मला सांगू लागल्या, " तुम्ही जाऊन त्याला सोडवा. "

मी म्हणे, " मी नाही मध्ये पडणार. "

थोड्या वेळाने आपोआपच ज्वालामुखी शांत झाला.

दोन महिन्यांनंतरची गोष्ट. टिळक राहुरीला जाऊन आले. आल्याबरोबर त्यांनी दत्तूला बोलावले,

" दत्तू, मला क्षमा कर. "

दत्तू अगदीच विसरून गेला होता.

" पपा, तुम्ही काय केलेत ? "

त्याला पोटाशी धरून ते म्हणाले–

" मी त्या दिवशी तुला उगीचच्या उगीच मारले. डिक्शनरी तुझ्या म्हणण्याप्रमाणे राहुरीलाच होती. माझ्या रागीटपणाबद्दल मला फार वाईट वाटते. मला क्षमा केलीस ना ? तुझ्याप्रमाणे माझीही बालवृत्ती होईल तर किती चांगले होईल ! "

ह्यानंतर टिळकांनी दत्तूच्या अंगाला शेवटपर्यंत कधी बोट लावले नाही.

नगरास पोचल्यावर आमच्याकडे एक गोसावी आला. तो आमच्या घरी राहू लागला. त्याचे बोलणे नेहमी विरक्तीचे असे. " देव सच्चिदानंद आहे. तोच एक आहे. बाकी सारे मिथ्या आहे. संसार ही माया आहे. त्यात प्राणी बुडतो आहे. आपण कोठून आलो व कोठे चाललो याची त्याला जाणीव नाही. हा सारा भास, पण ह्या भासालाच भुलून माणूस देवाला सोडून फिरत आहे. कोणाची बायको, कोणाची मुले, पैसा कोणाचा-- घर कोणाचे– सर्वसंगपरित्याग करायला पाहिजे."

" गुरुजी, आपण दोघे मिळून काही सेवा करू. आपल्यामागे काही व्याप नको. काही उपाधी नको, मला वाटते, आपले राहुरीचे घर विकून

जो काही पैसा येईल त्या भांडवलावर एक दुकान काढू आणि दुकानात जो फायदा होईल तो जनसेवेसाठी खर्च करू. मग कोणी गरजू आला तरी त्याला अडचण पडणार नाही."

साधुबोवांच्या ह्या असल्या गप्पा चालत. त्या मी लक्ष लावून ऐकत असे. टिळकांनाही घराची घिरघिर वाटत होतीच. तेही म्हणू लागले की, घर जर विकले तर आलेल्या रकमेतून आपल्याला पुष्कळशा लोकोपयोगी कार्यांस हातभार लावता येईल व पुष्कळ कामे करता येतील.

एक दिवस घरात पाण्याचा ठणठणाट झाला. नगरात त्या वेळी पाण्याचा आधीच दुष्काळ. टिळक निजले होते. त्यांच्याजवळ बुवा बसले होते. मी तेथे त्यांच्यापुढे एक भला मोठा पाण्याचा रिकामा हंडा नेऊन ठेवला.

" हं, घ्या बुवा ! तुम्हाला सेवा करायला पाहिजे ना ? आज घरात पाण्याचा थेंब नाही. चला, तुम्ही, दत्तू व बेबी आज पाणी भरा. हे सर्व स्वप्न आहे, माया आहे. तेव्हा त्याचे मनावर घेण्याचे कारण नाही."

बुवा पाणी आणण्याची कांकू करू लागले. मी दुसरा डोस दिला—

" हे पहा बुवा, मी भाकरी भाजायला बसले व हात पोळले म्हणजे माझ्या हाताला येणारे फोड काही मला मायेचे फोड वाटत नाहीत. मला त्या वेदना सहन होत नाहीत. पण तुमची सर्व माया असल्याने तुम्हाला काही हरकत नाही. तुम्हाला हो कसला त्यात विधिनिषेध वाटायला हवा ?"

माझे बोलणे टिळकांनाही पटलेले दिसताच बुवा पाणी आणण्यास उठले. कण्हत—कुंथत एक-दोन हंडे पाणी भरल्यावर मी त्यांना स्पष्ट सांगितले की, " तुमची ही माया केवळ आमच्या राहुरीच्या घरावर आहे. ही खोटी माया आहे. तेव्हा उद्यापासून तुम्ही आपला रस्ता सुधरा !"

दुसऱ्या दिवशी बुवा गेले. पण तेवढ्याने घरामागची ग्रहदशा आटोपली नाही.

एक ख्रिस्ती माणूस कर्जाने अगदी गांजला होता. साधारणत: कर्जबाजारी माणसाला कामावर ठेवू नये, असा एक अमेरिकन मिशनचा नियम होता. ह्या माणसाचे काम गेले असते तर बिचाऱ्याची फारच वाईट स्थिती झाली असती. टिळकांच्या पोटात तुटू लागले. पण पोटात तुटून उपयोग काय ? घरात त्याला द्यायला काय होते ? राहुरीचे घर त्यांच्या डोळ्यांपुढे पुन्हा नाचू लागले. पण मी !

शेवटी एक दिवस मी राहुरीस जाणार आहे असे सांगून टिळक गेले. दोन-तीन दिवसांनी ते परत आले. आल्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी मजजवळ सहाशे रुपये ठेवायला दिले आणि सांगितले," हे पैसे ह्यूमसाहेबांचे आहेत. उद्या अमूक अमूक गृहस्थ येणार आहेत, त्यांच्यापासून कर्जरोखा लिहून घेऊन पाचशे रुपये त्यांना द्यायचे." मी पक्की होते.

मी म्हटले, " ह्यूमसाहेबांचे पैसे आणि आपण कर्जरोखा लिहून घ्यायचा, म्हणजे हे काय प्रकरण आहे ?"

" हे बघ साहेबांना हे पैसे मिसेस ह्यूमच्या न कळत द्यायचे आहेत." हे बोलणे मला पटले. मला वाटले, ज्याप्रमाणे टिळकांना माझे भय वाटते त्याचप्रमाणे मिसेस ह्यूमचे भय ह्यूमसाहेबांना वाटत असेल !

दुसऱ्या दिवशी गृहस्थ आले. त्यांना पैसे दिले व रोखा लिहून घेतला. उरलेले पैसे बाजूला ठेवून दिले.

हळू हळू घर विकल्याची बातमी माझ्या कानांवर आली ! आणि ते अगदी सालंकृत कन्यादान ! घर, घरातील सामान, खुर्च्या, बाक, फळ्या, घडवंच्या, दिवे, पलंग, पाळणा, चिमबाबाने आणि मी मिळून वळलेली काथ्याची दोरखंडे...ह्या वेळेस ताटाबरोबर काठही गेला.

नुसत्या विहिरीलाच पाचशे रुपये खर्च आला होता. पण विहिरीबरोबर शेत गेले आणि शेताबरोबर घरही गेले ! पण शंभर रुपये वर आले ! शिवाय दरमहा शहाजीला द्यावे लागत होते ते सहा रुपये वाचले ! हा का कमी लाभ झाला ?

मी टिळकांना म्हटले,

" घर विकले त्याचे पैसे कोठे आहेत ?"

" चांगले सुरक्षित आहेत. डॉक्टर ह्यूमजवळ ठेवले आहेत. उगाच त्रास देऊ नकोस."

" त्यातील सामान ?"

" अग, घर गेल्यावर सामान कोठे ठेवायचे ?"

" म्हणजे पाळणा, दिवे हे विकण्यापर्यंत पाळी आली होती का ? ते काही नाही. दिवा न् पाळणा मला पाहिजेत. हे काय असे अशुभ !"

" किती खुळचट कल्पना आहेत तुझ्या !"

" पण हे सारे विकायला काय कोठे अडले होते ?"

" मी काय म्हणतो हे तुला कळत नाही. विनाकारण सहा रुपये महिना द्यावा लागत होता ना ?"

दोन-तीन दिवसांनी मिसेस ह्यूम मजकडे भेटायला आल्या. त्यांना मी विचारले,

" काय हो मडमसाहेब, आमचे सहाशे रुपये तुमच्याकडे ठेवले आहेत ना ?"

" कशाचे ?"

" राहुरीच्या घराचे ?"

" नाही काही ! ते तर टिळकांनी त्या गृहस्थाला कर्ज फेडायला दिले."

माझे तोंड अगदी पाहण्यासारखे झाले. टिळक घरी आल्यावर मी त्यांना विचारले. ते म्हणाले, " हो, दिले मी ते त्या माणसाला ! काय म्हणणे आहे तुझे ?"

" पण हे मला तुम्ही अगोदर का नाही सांगितले ?"

" हो, सांगितले असते, पण मग तू मला पैसे देऊ दिले असते का ?"

घर गेले. घर बांधून देणारे गेले. घेणारे गेले. डोळ्यांचे पाणी गेले. आठवणी मात्र पाणीदार अजून आहेत.

पाचशे रुपये गेले. रोखा तेवढा अगदी आतापर्यंत कायम होता. उरलेले शंभर रुपये काही दिवस बँकेत टाकले. नंतर त्यात आणखी

वीस रुपये घालून एक म्हैस घेतली. म्हैस दिसायला फार सुंदर होती; पण दूध बेताचे द्यायची व दर खेपेला तिला टोणगे व्हायचे. तेव्हा तिच्या मालकाने ती आमच्या गळ्यात बांधली. पण मागाहून तो पस्तावला. कारण आमच्याकडे आल्यापासून तिला साऱ्या पारड्या झाल्या. त्या लौकर लौकर झाल्या आणि म्हैस दूधही भरपूर देऊ लागली.

ह्या म्हशीचे टिळक पुष्कळ करीत. एक दिवस ते म्हशीला धूत होते. इतक्यात कोणी श्रीमंत विद्वान त्यांना भेटण्यास आले. म्हशीचे प्रदर्शन पुढच्याच दारी होते. त्या गृहस्थांना टिळकांना भेटायचे होते. तेव्हा त्यांनी म्हशीच्या ह्या गड्याला आत जाऊन निरोप सांगायला सांगितले. टिळकांनी आत येऊन हात वगैरे धुऊन बाहेर जाऊन गृहस्थांचे स्वागत केले.

ह्या म्हशीवरूनही आमची मधूनमधून भांडणे होत. एक दिवस मी म्हटले, " काय करावे, गोवऱ्या वाळत घातल्या की चोरीस जातात."

टिळकांनी विचार करून गोवऱ्या चोरीस न जाण्यालायक एक नामी युक्ती काढली. जवळच दत्तू आणि बेबी बसली होती. टिळक म्हणाले, " आपण गडी ठेवून त्याच्याकडून ह्या गोवऱ्या भाजवूनच घेत जाऊ. एक मोठे चुलंगण करावे. त्यावर पत्रा ठेवून वर गोवऱ्या भाजून घेतल्या व रचून ठेवल्या म्हणजे झाले काम."

टिळकांची ही युक्ती ऐकून आम्ही तिघेही हसू लागलो.

" मला का तुम्ही सर्वजण इतका मूर्ख समजता ? मला काहीच ज्ञान नाही असे तुमचे म्हणणे आहे का ?"

" तुम्हाला पुष्कळ ज्ञान आहे. त्याबद्दल माझा काही वाद नाही. पण माझे एवढेच म्हणणे आहे की त्या गोवऱ्या भाजायला खर्च जो लागणार तो गोवऱ्यांच्या किमतीच्या तिप्पट. शिवाय तापल्या तव्यावर टाकलेल्या गोवरीची राख होऊन जाणार ती वेगळीच."

" हे पहा, असाच तू माझा जेथे तेथे पाणउतारा करतेस. काय दत्तू, तुला काय वाटते ?"

" खरेच पपा ! मलाही आईप्रमाणेच वाटते, की एवढ्या खर्चात आपल्याला लाकडेच वापरता येतील."

आता तर टिळक फारच रागावले. त्यांनी मंजुळाबाईंना हाक मारून सांगितले, की चूल पेटवून तव्यावर एक गोवरी थापून त्यांना आणून दाखवा. मंजुळाबाई हो म्हणून दुसऱ्या दाराने निघून गेली व टिळक आपल्या कामाला गेल्यावर हे गोवऱ्या प्रकरण विझून गेले.

एकदा मी ठोंबऱ्यांना सांगितले, " ठोंबरे, पारडाला पाणी पाज बरं. " ठोंबऱ्यांनी पाणी पाजले. पाणी पाजल्यावर परत पारडू जागेवर आणून बांधायच्याऐवजी त्यांच्या मनात थोडी गंमत करायचे आले. त्यांनी पारडाच्या दोरखंडाचे एक टोक दिले आपल्या कंबरेला बांधून.

पारडू भरपूर दूध पीत असे. त्यामूळे खूप सशक्त झाले होते. ते लागले ठोंबऱ्यांना ओढायला, आणि होता होता पारडू पुढे व ठोंबरे मागे असे मारे घराभोवती घिरट्या घालू लागले.

मला वाटले, ठोंबरे पारडाला फिरवीत आहेत. पण मग पाहिले तो प्रकार निराळाच. पारडू त्यांना ओढीत होते व ते हसत होते. पण हे हसणे लौकरच थांबले. कारण तें खाली पडून आडवे झाले तरी पारडू त्यांना ओढीतच होते व ते जमिनीवर फरफटत लाकडाच्या ओंडक्याप्रमाणे चाललेच होते. आता बरीक ते रडू लागले.

तेव्हा मी धावले व पारडाच्या गळ्यातील दोरखंड सोडून ठोंबऱ्यांना मोकळे केले. ते एकीकडे हसत होते, एकीकडे रडत होते व एकीकडे माझ्याशी भांडत होते–

" तुम्हीच हे केले. "

मी म्हटले, " मी काय केले ? मी पारडू तुझ्या कंबरेला बांधले ? अन् पारडू तुला ओढायला लागले तेव्हा मला हाका का नाही मारल्या ? "

मग हळद लावून शेकून दोन-तीन दिवसांनी हा पारडूप्रताप नाहीसा केला.

एकदा कल्याणी (म्हैस) सुटली व उधळली. टिळक त्या वेळेस लेक्चर हॉलमध्ये वर्ग घेत होते. फर्ग्युसन गेटपासून कल्याणीबाईंचा दौरा जो निघाला तो लेक्चर हॉलवरून पुढे गेला. शिकवता शिकवता टिळकांचे लक्ष म्हशीकडे गेले व ते तसेच वर्ग सोडून बाहेर पडले व म्हशीच्या मागे धावू लागले. कोट, पँट, डोक्यात हॅट, हातात एक वेळूची लांबलचक काठी अशा अवतारात टिळक तिच्या मागे पळत होते. त्या दिवशी म्हशीने फारच त्रास दिला. ती काही केल्या त्यांचे ऐकेना. शेवटी एकदाची कशीतरी तिला घरी आणली.

घरी आल्यावर टिळक म्हणाले, "अग, म्हशी वळणेसुद्धा सोपे काम नसते. गुराख्याला किती श्रम पडत असतील बिचाऱ्याला ? आपण गुराख्याला उद्यापासून राखोळीचे पैसे दुप्पट द्यायची सुरुवात करू. हे गरीब लोक असतात. बोलत नाहीत म्हणून आपण त्यांना थोडक्या पैशांत राबवून घेतो." टिळकांच्या इच्छेप्रमाणे आम्ही जादा राखोळी देऊ लागलो.

मिशन हायस्कूलमध्ये गॅदरिंग करण्याचे ठरले. गॅदरिंग म्हणजे नाटक आलेच. स्त्रीपार्टाखेरीज नाटक कराल तरच नाटकाला परवानगी मिळेल अशी अट मुलांना घालण्यात आली. पण स्त्रीपार्टाखेरीज नाटक मिळेना. तेव्हा नाटक लिहून देण्याचे टिळकांनी अंगावर घेतले. तसेच ते शिकवायचेही त्यांनी ठरविले. नाटकाचा प्लॉट वगैरे काही ठरला नव्हता व नाटक लिहिण्यास वेळही नव्हता. कारण त्यांचा सारा वेळ लष्करच्या कितीतरी भाकरी भाजण्यात जाई.

पण मुले कसली ती ! शाळा सुटली की येऊनच बसायची. पहिल्याच दिवशी नाटकाला नाव ठेवण्यात आले– 'शीलं परं भूषणम्,' वेळ रोज पाचाच्या पुढचा ठरला. पण प्रॅक्टिस कशाची करायची ?

मुलांनी येऊन बसावे तो कोणीतरी भेटायला हटकून यावे. मग टिळकांनी त्या पाहुण्याशी बोलत बसावे. कोणी नसेल तर काहीतरी लिहीत बसावे नाहीतर वाचीत बसावे. कधी कधी एखादा गहन विषय काढून मुलांशीच वादविवाद करू लागावे. इकडे मुलांना वाटे, की हे आम्हाला कधी नाटक लिहून देतात आणि आम्ही कधी पाठ करून टाकतो !

त्यातल्या त्यात चहाची गर्दी असायची. मध्ये स्टो, केटली, कपसॉसर, दूधसाखर, दऊत, कागद, टाक, चमचे, जवळच पोपटाचा पिंजरा जमिनीवर ठेवलेला, मांजर, दारात कुत्रा आणि ह्या सर्वांभोवती हायस्कूलची मुले. आपल्यासारखा सायंटिफिक चहा कोणाला येत नाही अशी त्यांची खात्री असल्याने चहाचे सर्व कंट्राट त्यांच्याचकडे असे. असो. एक दिवस नाटकाचे नाव झाल्यानंतर चार-सहा दिवसांनी पुढे बसलेल्या मुलांना नाटकातली नावे दिली– " तू बाळासाहेब, तू रे ! तू पिल्या, तू देवदत्त, तू चारुदत्त."

" पण पपा, आम्हाला पाठ करायला काही देता की नाही ?"

" अरे, मला चहाबिहा तर घेऊ देता की नाही ?"

" घ्या ना, पण इतक्यात कोणी आले तर सारेच राहून जाईल."

मग एक दिवस एकेकाला काही काही पार्ट लिहून द्यावा. दुसऱ्या दिवशी मुलांची पुन्हा निकड लागली म्हणजे पुन्हा द्यावे, अशा रीतीने अगदी ग्यादरिंगच्या वेळेला नाटक लिहून व बसवून पुरे झाले. मुले अगदी अधीर झाली होती. हे पुरे होते की नाही असे त्यांना वाटे.

टिळक म्हणत, " अरे, काळजी का करता ? होईल पुरे. "

ती म्हणत, " आम्ही लिहून घेतो. तुम्ही सांगा. "

पण ते काही त्यांच्याने कधी झाले नाही. नाटक इतके सुंदर वठले की काही दिवस नगरास तो एक चर्चेचा विषयच होऊन राहिला होता.

ह्या नाटकातील दोनतीन जण पुढे निरनिराळ्या क्षेत्रांत प्रसिद्धीला आले. नाशिकच्या कॉलेजात आता प्रोफेसरचे काम करीत असलेले प्रोफेसर भा. ल. पाटणकर देवदत्त झाले होते. नगरचे रेवरेंड रामकृष्णपंत मोडक, एम. एल. सी. ह्यांचा एक प्रमुख भाग होता. प्रसिद्ध

नट रा. पेंढारकर चारुदत्त झाले होते.

पेंढारकराचा आवाज त्या वेळेस अत्यंत मधुर होता व माधवराव पाटणकरांनी त्याच वेळेस टिळकांच्या जवळ उद्गार काढले होते की, " हा मुलगा जर पुढेमागे नाटकात गेला तर नाव काढील."

आणि पुढे तसेच झाले.

* * *

ह्या वेळेस टिळक सोंगट्या फार खेळत असत, व ह्या सोंगट्यांवरून सपाटून भांडणे होत. टिळक कवड्या जुळवून टाकीत. तेव्हा त्यांच्याशी पुढे पुढे खेळण्याचेही सर्वांनी सोडून दिले होते. तेव्हा ते एकटेच रागारागाने खेळायला बसत व एक डाव उजव्या हाताने खेळत व दुसरा डाव्या हाताने खेळत. असा त्यांचा नेहमीचा क्रम होऊन बसला.

एक दिवस आम्ही सगळ्यांनी त्यांच्याशी खेळायचे ठरविले. त्यांनाही मोठा आनंद झाला. मात्र अट एवढी होती, की कवड्या पाणी प्यायच्या भांड्यात घालून हलवून मग टाकायच्या. आम्ही खेळायला बसलो. एका बाजूला टिळक, ठोंबरे आणि तारा, व दुसऱ्या बाजूला मी, दत्तू आणि भास्कर कृष्ण उजगरे.

पहिल्याच डावाला टिळकांची सरशी झाली. फक्त एकच नरद आत जायची राहिली होती. तिला दोनच पडायला हवे होते, म्हणजे आमच्यावर बिनतोड झाली असती. आणि जर का दहा पडते तर तिने उलट खाऊन आपल्या शत्रूच्या समोर प्रस्थान ठोकले असते व मग खात्रीने तिच्या प्राणावर बेतली असती. कवड्या हातांनी टाकायच्या असत्या तर एवढी धास्ती नव्हती. पण त्या पाणी प्यायच्या भांड्यात घेऊन टाकायच्या म्हणजे जरा कठीणच काम होते.

टिळकांनी दान टाकले. त्यात एक कवडी पडली उताणी व एक पडली कुशीवर! एकीकडून पाहिले तर दोन दिसावे, दुसरीकडून पाहिले तर दहा दिसावे.

टिळक एकदम ओरडले " दोन ! "

तशी आम्ही ओरडलो, " दहा ! "

ते म्हणत, " दहा कसे होतील ? "

आम्ही म्हणालो, " दोन कसे होतील ?"

ते जमिनीवर जोरजोराने बुक्क्या आपटून आमच्या गळी उतरवू लागले की, " नारायण वामन टिळक सांगतो, की ते दोन होते."

तशी मीही सांगू लागले, " दोन कसे ? मी लक्ष्मी नारायण टिळक सांगते, ते दहा होते."

शेवटी ते ठोंबऱ्यांना व ताराला विचारू लागले, काय आहेत रे हे ? ठोंबरे म्हणाले, " हे दोनही नाहीत आणि दहाही नाहीत. दीड आहे ! "

टिळक म्हणाले, " म्हणजेच दोन." आम्ही सारे रागावत होतो व हसतही होतो. शेवटी पुन्हा टाका डाव असा आम्ही आग्रह धरला. पण टिळकांना पुन्हा डाव, टाकायला नको होता. कारण पुन्हा दोनच खात्रीने कशावरून पडतील? शेवटी त्यांनी सोंगट्या, पट, कवड्या ही सारी समोरच्या कंपाउंडात फेकून दिली व वर त्यांच्यामागे धावत जाऊन समोरच्या लोहाराकडे जमलेल्या माणसांना सांगितले, " हे सामान वेचून घेऊन जा." त्यांना काय ! त्यांनी सारे मोठ्या आनंदाने गोळा करून नेले.

* * *

टिळकांच्या चीजवस्तू नेहमी हरवत. हरवत म्हणजे काय, ते स्वत: ठरल्या ठिकाणी त्या ठेवीत नसत, ठेवल्या ठिकाणी पाहत नसत व स्वत:बरोबर दुसऱ्यालाही पाहू देत नसत. दात, आगपेटी, टोपी, चष्मा, पट्टा ह्या चार-पाच जिनसा नेहमीच त्यांच्या हातातून निसटत. विशेषत: क्लासला जायच्या वेळेस किंवा एखाद्या गावाला किंवा लेक्चरला निघायच्या वेळेस बूट, कोट, टोपी, कॉलर, पट्टा, छत्री, वहाणा ही सारी त्यांच्याशी लपंडाव करीत व त्यांच्याबरोबर आमच्या साऱ्यांच्या फुगड्या सुरू होत.

कित्येक वेळेस त्यांना टोपीवाचून जावे लागे, नाहीतर पट्ट्याऐवजी पारडू सोडून त्याचे दोरखंड कमरेला गुंडाळावे लागे ! " माझी व्यवस्था कोणीच ठेवीत नाही. जे ते आपल्याच व्यवसायात दंग ! माझी कोणाला पर्वाच नाही ! " असे ते म्हणत आणि मग आम्ही सर्वच त्यांची पर्वा करण्यास धावून येत असू.

एकदा असेच दात हरवले. केवढा गोंधळ ! म्हणे, " ह्या कुत्र्यानेच

माझे दात लांबविले. नाहीतर ह्या खोलीत तू खंडीभर सरपण साठवून ठेवले आहेस त्याच्याच खाली उंदरांनी ते नेऊन टाकले. उपसा रे ते सारे सरपण आणि द्या बाहेर फेकून. हिला संसाराचा फार अटाट. !"

झाले. सारे सरपण बाहेर कंपाऊंडभर धावू लागले आणि त्याच वेळेस दातांचा डबा सापडला टेबलावर !

एकदा हरवली टोपी. ती होती खुंटीवर व तिच्यावर ठेवला होता कोट. टिळकांना जायचे होते बाहेर. त्यांनी गडबडीत दुसराच कोट अंगावर घातला व ते टोपी शोधू लागले. प्रथम त्यांनी पहिला कोट रागाने जमिनीवर खाली आपटला. त्याबरोबर त्याच्याखालची टोपीही तशीच खाली आदळली. मग काय, सर्पयज्ञात सर्पांची वेटोळींच्या वेटोळी येऊन अग्निकुंडात पडू लागली तशी आमच्या घरातील कपड्यांच्या चुंभळी भराभर त्या ढिगाऱ्यावर येऊन पडू लागल्या. बिछाने, सतरंज्या, ब्लँकिटे– झाडून सारी मंडळी त्या ढिगारात गोळा झाली.

"जा जा. त्या मंजुळाबाईला बोलवा ! काय करते ती ? माझी टोपी शोधून काढा."

मंजुळाबाई आली. हा कपड्याचा ढिगार पाहून ती थक्कच झाली.

"मंजुळाबाई ! काय तुम्ही माणसे असून उपयोग ? भाजी करायची की काय तुमची ? माझी टोपी आत्ताच्या आत्ता शोधून काढा !"

"पण पपा, त्या ढिगाराखालीच असेल ती."

पण ह्यानंतर कोणी बोलणेच अशक्यच होते. मंजुळाबाई टोपी शोधायला त्यांच्या ऑफिसमध्ये जाऊन बसली ती खिडकीतून तिला टिळक तसेच बोडके निघून गेलेले दिसल्यावर खाली आली.

टिळक गेल्यावर आम्ही ते कपडे उचलले तेव्हा साऱ्या ढिगाखाली कोटात अडकलेली टोपी सापडली. टिळकांना हे कळले तेव्हा ते म्हणाले, "खरंच की. मी ती काल कोटाखाली ठेवली होती."

* * *

एखादे वेळेस टिळक आपल्या क्लासात शिकविण्यासाठी मला पाठवीत. अगदी पहिल्यांदा जेव्हा मी क्लास घेण्यास गेले तेव्हाची एक गमतीची आठवण होते. ते म्हणाले, "तू जाऊन क्लास घे."

मी म्हणाले, " मी काय त्यांना लोणची कशी घालायची, मेतकूट कसे करायचे हे शिकवू ?"

" नाही ग. हिंदू चालीरीतीसंबंधी त्यांना काही सांग, म्हणजे झाले."

क्लासात तीस-चाळीस विद्यार्थी होते. हे विद्यार्थी म्हणजे लहान लहान मुले नसत तर आमच्या एवढालीच मोठी माणसे असत. मला पाहताच विद्यार्थ्यांनी माझे स्वागत केले.

" का गुरुमाउली, आज तुम्ही शिकविणार का काय आम्हाला ?"

" हो. मी तुमच्या गुरुजींच्या बदली आले आहे आज."

मी काही तरी पोपटपंची करून त्यांना त्या वेळेस शिकविले तर खरे. माझे लेक्चर संपताच एकजण म्हणाला,

" गुरुमाऊली, एक विचारू का ?"

" हो. खुशाल विचारा."

" आमच्या गुरुजींना तुम्ही मारता असे ते म्हणत होते हे खरे का ?"

" तसे कधी होईल का ? बोलंण्याच्या भरात त्यांनी तुम्हाला काहीतरी सांगितले असेल. बायका कधी आपल्या नवऱ्यांना मारतात का ? आता शहाण्याला शब्दाचा मार त्या अर्थाने मी मारते कधी कधी त्यांना."

अशी काहीतरी वेळ मारून मी घरी आले. टिळक आपल्या चहाच्या प्रकरणात त्या वेळी गुंग होते.

" काय, कसे काय झाले तुझे लेक्चर ? कोणता विषय घेतला होतास ?"

" वा ! आजचा विषय तर फार बहारीचा होता !"

" कोणता ?"

" बायका आपल्या नवऱ्यांना का मारतात ? त्यांनी तसे करणे बरे किंवा वाईट !"

" म्हणजे ? तू काय बरळते आहेस ?"

" बरळत नाही. खरंच माझा हा आजचा विषय होता."

" मग ते काय म्हणाले ?"

" ते म्हणाले, तरीच गुरुजी सांगत होते, की गुरुमाऊली आपल्याला मारतात म्हणून."

" मग तू काय बोललीस ?"

" मी ? खरे होते ते सांगितले."

" काय ?"

" मी सांगितले ; की ज्या ज्या वेळेस ते माझे ऐकत नाहीत, पैसा नाहीसा करतात, विनाकारण संतापतात, कधी वेळेवर घरी येत नाहीत त्या त्या वेळी मी त्यांना चांगला ठोक देते."

टिळकांना माझे सारे बोलणे खरे वाटले. ते म्हणाले,

" मी तुला फार शहाणी समजत होतो. पण आज माझी खात्री झाली, की तू फार मूर्ख आहेस. एखाद्या वेळेस तू माझी अब्रू घालवशील."

## ६४ : माझे व्याही-जावई

कोणी चालत असेल तर त्याला उचलून कडेवर घेण्याची आम्हाला सवयच होती. त्यांतलेच हे काही प्रकार सांगते. अर्थात ह्या बाबतीत आम्हाला दोघांनाही कधी कंटाळा येत नसे. उलट असे काही नसले तर आम्हाला चुकल्याचुकल्यासारखे वाटे.

एक दिवस संध्याकाळी आमच्या येथे एक पांगळा आला. त्याला अर्धांगवायूसारखे झाले होते. त्याला आम्ही घरात ठेवून घेतले. मी आणि रामभाऊंनी त्याच्या बऱ्याच खस्ता खाल्ल्या. त्याची शेकशेगडी करायची, त्याला खायला-प्यायला द्यायचे व कधी कधी भरवायचे, त्याचा शेणगोळा करायचा, ही सर्व कामे आम्ही करीत होतो. त्याची गुइरीही मला धुवावी लागत.

रामभाऊ एक फार मोठा सज्जन माणूस होता. तो ख्रिस्ती होण्या-

पूर्वी आमच्याकडे आला व पुढे कितीतरी वर्षे आमच्या आश्रयाला येऊन-जाऊन होता. परंतु बाता मारण्यात मोठा पटाईत. तसेच कर्ज करण्यातही त्याचा हातखंडा होता. त्याचे धर्मांतर, लग्न, पुढे बायको मेल्यानंतर नऊ महिन्यांच्या चिकीचा सांभाळ, हे सारे आमच्याच घरी झाले. कोठेही कामाला राहिला तर फार सुंदर काम करी; पण वरील दोन दुर्गुणांमुळे कोठे टिकत नसे.

पण आमच्या स्वभावधर्माप्रमाणेच त्याचाही असल्याने असल्या कामात तो अगदी मनापासून मला साह्य करी. असो. रामभाऊने व आम्ही आमच्या तैमुर्लंगाला मेहनत करून बराचसा सुधारला.

त्याला रोज दोन आण्यांच्या विड्या लागत. तीन वेळेला चहा लागे. तेही सारे यथास्थितपणे त्याला मिळे. बरे वाटू लागल्यावर तो आमच्याच घरी चिकटून राहिला व काही दिवसांनी तो ख्रिस्ती झाल्यावर मात्र त्याने आपला नूर पालटला. आपले हात स्वर्गाला पोचल्याचा त्याला भास होऊ लागला. त्याला पर फुटले.

आज काय चहा चांगला झाला नाही, उद्या काय मला वेळेवर विड्या दिल्या नाहीत, परवा काय माझे जेवणच थंड होते, तेरवा काय बेबी फार गडबड करते, तिला आईने मुळी वळणच लावले नाही. बेबीवरून तर रोज कुरबूर होई.

टिळक त्याची समजूत घालीत, पण त्याचेच आपले खरे. एकदा टिळक मुलीला रागे भरले म्हणजे त्याचे समाधान होई. एक दिवस टिळक कशालासे गावाला गेले होते. त्यांच्या गैरहजेरीत आमचा गोपा– साठे मास्तर– आला होता. त्याला जडीबुटीची फार चांगली माहिती होती. अर्धांगवायूवरही त्याच्याजवळ औषध होते.

मी म्हटले, "गोपा, तू जा ह्याला तुझ्या गावी घेऊन. औषध, वैद्य आणि रोगी एकाच गावी असले म्हणजे बरे."

मी त्याला खर्चाला पाच रुपये दिले व ते दोघे गेले. टिळक परत आल्यावर त्यांच्याच गाडीने गोपाजींचे पत्र आले, की आमचा पेशंट पळून गेला! टिळकांना त्याच्याविषयी फार वाईट वाटले.

* * *

हे पात्र गेल्यानंतर दुसऱ्याने प्रवेश केला. आपला सकाळचा चहा नित्याप्रमाणे आपल्या हातांनी करून घेऊन व घरातील सर्व चहाबाजांना अंथरुणातून उठवून तो पाजल्यावर टिळक बाहेर येऊन उभे राहिले तो त्यांच्यापुढे एक लांब-रुंद व्यक्ती दत्त म्हणून उभी. वर्ण निमगोरा, बसकट तोंड, घारे डोळे, चेहरा रुंद, डोक्यावर जटांचा मुगुट, संन्याशाच्या डोक्याप्रमाणे ओठ व हनुवटी गुळगुळीत, अंगात घोटयापर्यंत भगवी कफनी, डोक्याला भगवा फेटा, हातात भगव्या छाटीचे एक लहान गाठोडे, अशा थाटात टिळकांच्यापुढे उभे राहून " आपणच का टिळक ?" म्हणून त्याने त्यांना प्रश्न केला.

" हो, मीच टिळक, " हे टिळकांच्या तोंडचे शब्द कानी पडताच त्याने आपल्या हातातील गाठोडे खाली ठेवून त्यातून एक भला मोठा फुलांचा हार बाहेर काढला व तो टिळकांच्या गळयात घातला.

" मी आज धन्य झालो. माझ्या जन्माचे सार्थक झाले. "

माळ काढीत टिळक म्हणाले, " बुवा, माझ्या पाया नका पडू. सारा मानमहिमा खिस्ताचा आहे. मी काय, यःकश्चित प्राणी. "

बुवा आमच्या घरी राहू लागले. टिळकांच्या तोंडून निघणारा प्रत्येक शब्द ऐकण्यासाठी चातकाप्रमाणे टपून बसू लागले. टिळकांचे त्यांच्यावर फार प्रेम बसले. ते दोघे कधी एकमेकांपासून दूर होत नसत. टिळक यांना खिस्ती धर्माविषयी सांगत. बुवा लक्ष लावून ऐकत. ऐकता ऐकता त्यांचा कंठ दाटून येई. डोळयांतून अश्रुधारा वाहत.

टिळक मला म्हणत, " हा माणूस काही साधा नाही. हा पुढे पौल पेत्रस ह्यांच्या पंक्तीला बसण्यासारखा खिस्तशिष्य होईल. कारण त्याच्या डोळयांतून अश्रू गळतात ते डोळयांच्या कानाच्या बाजूच्या कोपऱ्याने गळतात. खऱ्या भक्तिभावाचे व प्रेमाचे हे लक्षण आहे."

बेबीही म्हणे, " खरंच आई, त्याच्या डोळयांतून पाणी येते ते डोळयांच्या बाहेरच्या कोपऱ्यातून बाहेर पडते. आणि मी देखील पपा म्हणतात तसे कोठे वाचले आहे. "

पण मला काही ह्यांचे बोलणे पटत नसे. मला त्या पुराणिकबोवांच्या गोष्टीची व बोकड हरवलेल्या रडणाऱ्या धनगराची आठवण होई.

बोवा येथेच थांबले नाहीत. त्यांनी हळूहळू आमच्याप्रमाणे घरात कामे करण्यास सुरुवात केली. कधी अपशब्द नाही, कधी धुसफूस नाही. अत्यंत सालस, गरीब व प्रेमळ गृहस्थ होता तो. टिळकांबरोबर म्हशी धुणे, म्हशी वळायला नेणे, वगैरे सारे अगदी घरच्या माणसांप्रमाणे तो करी. टिळकांची सेवा तर तो अगदी मन लावून करी. अगदी एखाद्या जुन्या शिष्याने गुरुगृही करावी तशी.

पुष्कळांचा असा समज असतो, की कोणी ख्रिस्ती झाला की त्याला खूप पैसा मिळतो. पण ख्रिस्ती झाल्यामुळे पैसा मिळाल्याचे मला एकही उदाहरण ठाऊक नाही. मिशनरी किंवा ख्रिस्ती लोक गरिबांना साहाय्य करतात त्याचा हा असा अर्थ करण्यात येतो. पण साहाय्य करणे हा ख्रिस्ती धर्माचा एक महत्त्वाचा भाग आहे.

आमच्या बोवांचाही असाच समज होता. एक दिवस संध्याकाळची प्रार्थना झाल्यावर बोवांनी हळूच चौकशी करण्यास सुरुवात केली–

" आपल्याला किती मुले आहेत ?"

" तुम्हाला माहीतच आहे. "

" त्यांची विद्या आपण कोठवर करणार ?"

" शिकतील तितकी !"

" पण काही बेत ठरला असेल ना ?"

" बी. ए. पर्यंत किंवा पाहिजे तर इंग्लंड-अमेरिकेला जातील."

बुवांच्या तोंडाला पाणी सुटले. त्यांनी हळूच पिल्लू सोडून दिले–

" पहा महाराज, एक गरीब बाई आहे. तिला दोन मुली आहेत. त्यांची शिकण्याची फार इच्छा आहे. मी आजपर्यंत तिचे बरेच साहाय्य केले. आता मी त्या मुली एका संस्थेत ठेवल्या आहेत. मुली फारच हुशार आहेत. ह्या दोघींना कमीत कमी पन्नास रुपये महिना खर्च येतो. मी दहा रुपयांची व्यवस्था केली आहे. आता तुम्ही चाळीस रुपये महिना द्या. दोन मुलांची इंग्लंड-अमेरिकेच्या प्रवासाची व खर्चाची तुम्हाला सोय करता येते, तर तीन मुले आहेत असे समजा व एवढे कराच. "

टिळक म्हणाले, " बुवा, दोन मुलांच्याच शिक्षणाची मला पंचा-

स्मृ... २५

ईत पडली आहे तर मी आणखी कशी व्यवस्था करू ? त्या मुलींना इकडे पाहिजे तर आणून ठेवा. मग काहीतरी सोय पाहता येईल. पण पैसे उचलून द्यायला मजजवळ नाहीत."

"पण मला नकोच आहे काही ! मी त्या मुलींचा पत्ता देतो त्यांना परस्पर पाठवीत जा. दोन मुलांचा खर्च जर तुम्हाला करवतो तर आणखी एकीचा करायला काय हरकत आहे ? नाहीतर चाळीस रुपये दरमहा व्याज मिळेल इतकी रक्कम त्यांच्या नावे करून द्या !"

पुढे बोवासाहेब निराश होऊन गेले ते टिळकांच्यानंतर १९२० साली मला मुद्दाम भेटायला आले होते. त्या वेळी त्यांच्या डोक्यावर पगडी होती आणि त्यांनी त्या दोन मुलींपैकी एकीशी लग्न केले असून त्यांना दोन-चार मुलांचे पितृत्वही प्राप्त झाले होते. लोकमान्य टिळकांनी आपले लग्न लावून दिले, असे त्यांनी सांगितले. खरे-खोटे देव जाणे.

* * *

एकदा मुंबईच्या स्टेशनवर टिळकांना एक तरुण ब्राह्मण आढळला. ह्याला कोणी नव्हते. बुद्धी चलाख असून बाकी अवतार मात्र भडभुंजालाही लाजविण्यासारखा होता.

टिळकांनी बाबाला घरी आणला व माझ्या स्वाधीन केला. त्याचे जानवे काळभैरवाच्या गंडचासारखे दिसत होते, विडीच्या धुराने दात काळे किट्ट पडले होते, साऱ्या अंगाला खरूज होती. मी पाणी तापवून कामदारांकडून ह्या अवताराला चांगला घासूनपुसून लख्ख केला. नंतर टिळकांचे कपडे घालायला दिले व माणसाचे स्वरूप आणले.

टिळक ह्याचे फारच लाड करीत. तो त्यांना पपा व व मला ममा म्हणे. तो ब्राह्मण. आम्ही ख्रिस्ती. जेवताना त्याच्या मनात नाना कल्पना येत. वडचावांग्याची भाजी असली, की त्याने म्हणावे, मटण आहे व जेवताना उठून जावे.

जवसाची चटणी वाढली की त्याने म्हणावे, बोंबलाची चटणी आहे, आणि ताट बाजूस सारावे.

मग टिळकांनी त्याला चार-सहा आणे द्यावे व त्याने बाजारात जाऊन काही खाऊन यावे. पुढे पुढे टिळक म्हणत, "ह्याला माझ्या हपि-

सात माझ्या देखत जेवायला वाढ."

मी ते कबूल करून त्याला त्यांच्या हपिसात वाढू लागले. त्याला दिवसातून कमीत कमी पाच-सहा वेळेस चहा लागे. तोही मी देई. शिवाय टिळकांजवळून पैसे घेऊन तो बाहेरून चहा पिऊन येई तो निराळाच. टिळक आपल्या पगाराच्या खजिन्यातून डॉ. ह्यूमसाहेबांकडून पैसे आणून अशांची भरती करीत.

एखाद्या वेळेस डॉ. ह्यूमही पैसे देत नसत. कारण टिळकांनी बहुतेक सारा पगार आगाऊ आणलेला असे. मग गुपचूप रद्दी विकून ते पैसे ते ह्या अतिथीसाठी खर्च करीत. सात-आठ दिवसांची सारी वर्तमानपत्रे विकली की सहज चार-सहा आणे येत.

असो. हे नवीन चिरंजीव अतिशय भित्रे होते. आमची घरे सारी बिनभाडयाची होती. ती म्हणजे एक एक ब्लॉक मिळून तीन ब्लॉकची चाळच होती. त्यातील एका ब्लॉकमध्ये मागल्या खोलीत ह्या चिरंजिवांची व्यवस्था करण्यात आली होती. तिच्या पलीकडच्या खोलीत लाकडे साठवून ठेविली होती. ती जाऊन आणण्याचे कामदाराच्या जिवावर येई. कारण एक तर हे आल्यापासून तीत घाण येऊ लागली होती व आत शिरताच पाय रपरप भिजत. ह्यांनी तेथे दारातच मोरी केली होती व त्या मोरीचा नळ लाकडांखाली गेला होता.

टिळकांना सांगितले की ते म्हणत, " तुम्हाला माणूस खपत नाही. " आता काय करावे ? मोठी पंचाईत झाली होती. शेवटी एक दिवस मी त्याला म्हणाले,

" दादा, तुम्हाला रात्री भय वाटते तर राणूला उठवीत जा. तो तुमच्या जवळच निजतो. जवळ कंदील जळत असतो तो नेत जा. पण हा काय आळस ? आणि पुन्हा जरा काही झाले की तुम्ही वर चहाडया करायला तयार !"

माझ्या ह्या बोलण्याने दादा संतापले. त्यांचा अपमान झाला. दुसऱ्या दिवशी त्यांनी दाराला कुलूप घातले. टिळक बाहेर गेले होते. लाकडे नाहीत ! तो बसला दाराशी भांडत. तो कुलूप उघडू देईना.

तो म्हणे, " तुम्ही मला मुलगा म्हणता आणि किती पक्षपात

करता ! दत्तूला कपडे-बूट कितीतरी आहेत. मला काही नाही."

"अरे बाबा, त्याला शाळेला जायचे असते. तू तसा जा– मग तुलाही मिळतील तसे कपडे."

"ते काही नाही. त्याला नवा बूट आणला तसा मला आणायला पाहिजे. असे कोठे असतात का आई-बाप ?"

"मुळीच नाही. असे आईबाप मुळीच नसतात आणि असे चिरंजीवही कोठे नसतात. दत्तूच्या मी उद्या तोंडात मारली तर तो मला एक शब्द उलटून बोलणार नाही आणि तुम्ही मलाच एक शब्द तोंडावाटे काढू देत नाही. नुसते हूं म्हटले की तुमचा अपमान होतो. चांगले इंग्रजी सातवी इयत्ता झाली म्हणता आणि इतके कसे ज्ञान नाही तुम्हाला ? चला द्या किल्ली."

"मी देत नाही किल्ली. मी तुम्हाला ओळखत नाही."

"बरे तर, मीही तुम्हाला ओळखत नाही. तुम्ही जेवायला येऊ नका."

"मी जेवायला येणार नाही. माझे जेवण मला येथेच मिळेल."

"बरे, पाहते कसे जेवण येथेच मिळते ते !"

"पहा."

टिळक घरी आल्यावर त्यांच्या कानावर सर्व कागाळ्या गेल्या. तो टिळकांना म्हणाला,

"तुमच्याकडे पाहून मी गय केली. असला अपमान मी कोणाचाही सहन केला नसता. मी आपल्या आईला सुद्धा जोड्याने मारले असते, मग ह्यांची काय कथा !"

टिळकांना त्या दिवशी मुंबईस जायचे होते. त्यांनी त्याला मुंबईची तयारी करायला सांगितली. तेथे कोठे सोय लावून देण्याचे त्यांनी ठरविले.

चिरंजीवांनी आपले कपडे, बिछाना– सारे काही– जे आम्ही केले होते अर्थात तेच सारे– लोकांना वाटून टाकले. रात्री बाराच्या गाडीने जायचे होते, पण फंडात पैसे नव्हते. पगाराची बँक बंद झाली होती. झाडून सारे पैसे गोळा झालेले एका माणसाला मुंबईला पोचण्याइतके.

पण टिळक भयंकर आशावादी होते. आपणास स्टेशनवर पैसे

मिळणार, अशी त्यांची खात्री होती. टिळकांचे परमपूज्य स्नेही रावसाहेब साठे स्टेशनवर त्यांना भेटले. त्यांनाही मुंबईलाच जायचे होते. रात्री बारा-साडेबाराचा वेळ. टिळकांनी रावसाहेबांजवळ याचना केली. राव-साहेबांनी सांगितले, "मजजवळ माझ्यापुरतेच पैसे आहेत."

रावसाहेबांना कवितांचा खूप नाद लागला होता. पण कवितेने पैसे थोडेच उत्पन्न होतात !

शेवटी गाडी प्लॅटफॉर्मवर येऊन उभी राहिली. टिळक व राव-साहेब गाडीत बसले. चिरंजीव खालीच राहिले. गाडी हलू लागली. टिळकांनी त्याला परत जाण्यास सांगितले. त्या गडबडीत स्वारी टांग्याचे पैसेसुद्धा मागून घेण्यास विसरली.

थंडीचे दिवस, रात्र बरीच झालेली, तीही अंधेरी. सोबत कोणी नाही. टांगे येत पण झरकन निघून जात. पुलाखाली नदीत एखादी चिता जळत असलेली दिसे. आधीच बाबा भित्रा, त्यात उरात धडकी भरलेली. कसाबसा फर्ग्युसन गेटच्या फाटकात येऊन उभा राहिला तो कुत्रा अंगावर धावून गेला. राणू ओसरीवर निजला होता. त्याला वाटले, चोरबीर आला. तो काठीच घेऊन धावून गेला, तो चिरंजीव !

"का हो आला ?"

"आलो बाबा ! आईला उठवू नका."

दुसऱ्या दिवशी राणूने सांगितले, "पाहुणे परत आले."

मी म्हणाले, "येऊ द्या. त्यांच्याशी तुम्ही कोणी काही बोलू नका."

सर्वांनी नियमाप्रमाणे आपापली कामे उरकली व फराळ करून घेतले. त्याला कोणी हाका मारली नाही तेव्हा तोच आत आला.

"ममा, मी आलो !"

"आलात ? बरे झाले ! आता मी घराची मालकीण आहे. टिळक घरात नाहीत. तुम्ही काही माझे व्याही-जावई नाही. मी तुमची मिजास चालू देणार नाही !"

त्याने माझा तोफखाना गुपचीप ऐकून घेतला.

"हा पाण्याचा बॉयलर आहे, तो चहाचा डबा, तो साखरेचा डबा. तुम्ही आपल्या अंथरुणाजवळ ठेवा हे सारे. तो बॉयलर पेटवा

आणि त्यात टाका सारे. चहाची हुक्की आली म्हणजे नळ तोंडात पडल्या पडल्या सोडून देत जा. मी तुमच्या पुढे पुढे करणार नाही.

आजपासून तुम्हाला घरातले सारे काम केले पाहिजे. मीच आता पाहुण्यासारखी वागणार आहे. कारण मी काही केले तरी तुमच्या मनास येत नाही.

वड्यावांग्याच्या भाजीत तुम्हाला मटणाचे तुकडे दिसतात आणि लसणाच्या चटणीचा तुम्हाला बोंबलासारखा वास येतो. मला वाटते, तुम्ही मुळी ब्राह्मणच नाही. कारण ह्या जिनसांचा संशयच ब्राह्मणाला येणार नाही. ह्याची चव घेणाऱ्यांपैकी तुम्ही कोणीतरी असला पाहिजे.

तुमचा असा समज झालेला दिसतो, की आम्ही वाटेल ते खातो. व दुसरा असा समज दिसतो, की आपण सांगू ते टिळक ऐकतात. पण तुम्ही अजून टिळकांना ओळखले नाही. जर का ते रागावले तर तुमची हड्डी मोकळी करतील."

माझ्या ह्या दत्तक चिरंजीवांना एवढी गोळी प्रमाणाबाहेर लागू पडली. त्याने चटकन माझे पाय धरले.

"लक्ष्मीबाई, पाया पडतो. आता माझी माफी करा."

आणि तेव्हापासून तो खरोखरच घरच्यासारखा वागू लागला. पुढे त्याला चांगले काम लागले. टिळकांनी त्याचा बाप्तिस्मा केला. त्याचे लग्नही लावले. त्याच्या बायकोचे बाळंतपण मी केले. त्याला बायको फार सुशील मिळाली व मुलेबाळेही गुणी निघाली.

## ६५ : करंज्यांतला मोदक

मासिक मनोरंजनाच्या दिवाळीच्या अंकात 'करंज्यांतील मोदक' नावाची माझी एक कविता प्रसिद्ध झाली होती. ती कविता पुष्कळांना फार आवडली होती. करंज्या केल्या म्हणजे त्याबरोबर एक लहानसा

मोदक केलाच पाहिजे, पुरणाच्या किंवा गुळाच्या पोळ्या केल्या की त्यात एक कानवला आलाच; पापड झाले की त्यात एक लाटी तशीच राखून ठेवलीच, ही जी हिंदू स्त्रियांची चाल आहे, तिचा अर्थ ह्या कवितेत सांगितला आहे.

नरनारीसंगम जिकडे तिकडे पाही
बघ वरी खालती ! पहा जगी कोठेही ।।ध्रु०।।

वर सूर्य एकला; नाही ! क्षणभर नाही !
ही प्रभा नित्य त्या आलिंगुनिया राही.
हा चंद्र एकला; नाही ! हाही नाही !
ह्यासवे चंद्रिका सदैव रमलेली ही !

सप्तर्षी हे आभाळी, यांजला,
ही अरुंधती सांभाळी, प्रेमला,
पति बंधू यांही केली, निश्चला,

नभ नटले तारा तारे ह्या उभयाही
जे वरती दिसते तेच दिसे खालीही !–१

ह्या नद्या सागरा जाउनि अवध्या मिळती,
ह्या लता तरूंना सावरुनीया धरिती,
ह्या जीवकुडीचा योग न हो जरि झाला,
तरि प्राणी कोठुन मिळे जगी बघण्याला !

कवि आणि स्फूर्ती दोघे, भेटती,
परिणिली मती अनुरागे, शोभती !
तेव्हाच गायने ओघे साधती !

नरनारीसंगम हीच संस्कृती बाई !
विश्वात एकले कुठेच नाही काही २

का वदे करंजी मोदक कोठे गेला ?
का पोळ्या म्हणती करा बघू कानवला ?
का लाटीवाचुन पापड करि रुदनाला ?
मज नको वाटते कुणास शिकवायाला !

" किती हिंदकन्यका वेड्या या !" म्हणा,
" ह्या किती पावल्या थोड्या शिक्षणा "
" ह्यांकरवी रचवी माड्या कल्पना ; "

जगि राहू वेड्या अशाच आम्ही बाई !
करु वेड्या इतरा ! यांत न संशय काही ३

मी पापड लाटीत होते व दत्तू जाता-येता लाट्या लाटीत होता. शेवटी सर्व पापड लाटून झाल्यावर एक लाटी उरली. त्याचा तिच्यावर डोळा होता. मी ती त्याला घेऊ देईना. तेव्हा त्याला हा सर्व शास्त्रार्थ सांगितला व ही कविता झाली. अर्थात ह्रिच्यावर टिळकांचा सफाईदार हात फिरलेला आहेच. ही कविता प्रसिद्ध झाल्यानंतर मला पंढरपूरहून एका बाईचे पत्र आले. त्यात असा प्रश्न केला होता की–

मोदक बहु गोड असे आकारहि सुबक साधला बाई !
तव भर्त्याचे त्याला साह्य नसे का कथी मला ताई ?

ही कविता वाचल्यावर मला प्रथम टिळकांचा मोठा राग आला. हे मला उगीचच प्रसिद्धी देत बसतात नि माझी अशी फजिती होते ! पण माझ्या त्या कोपाग्नीची आच लागण्यास टिळक मजजवळ होते कोठे ? दूर कोठेतरी बसून आपण एक महाकाव्य लिहावे असे त्यांनी ठरविले होते व ते नुकतेच वाईजवळ भुइंज येथे जाऊन ख्रिस्तायन लिहू लागले होते.

मला कवितेने भंडावून सोडले. पंढरपूरच्या पत्राला कवितेत उत्तर देण्याचे माझ्या मनाने घेतले व माझी सर्वांत मोठी प्रसिद्ध झालेली कविता 'पतिपत्नी' ही मी त्या वेळी लिहिली. ही कविता विशेषत: रात्री

अंधारात सुचायची. ओळीच्या ओळी डोक्यात यायच्या. त्या मी खडूने जमिनीवर उतरून ठेवायच्या. एखादवेळेस जवळ टाक नसला की आग-पेटीची काडीच दौतीत बुडवून टाकाची भूक काडीवर मी भागवी. सकाळी ठोंबऱ्यांनी ही रात्रीची बिगार कागदावर नोंदवून ठेवावी. असे करता करता पावणेतीनशे ओळींची कविता तयार झाली.

ती कविता व एक खरमरीत पत्र टिळकांना पाठवून दिले. ही पत्रे अजून दत्तूने संभाळून ठेवली आहेत.

आमच्या घरदारात त्या वेळी सारे कविता करत असत. त्यासंबंधी 'माझ्या' पतिपत्नी– कवितेत मी म्हटले आहे.

**" न मी एकली, या वायूच्या साह्ये वंशच अवघा**
**गातो माझा ! ईश्वर डुलतो ! म्हणतो आम्हा गा ! गा !**

**बघ इकडे हा कुमार ताई ! तारुण्याच्या दारी**
**उभा राहुनी गाई, स्फूर्ती यास कुणाची सारी ?**

**पहा पोर ही नववर्षांची नवगीतांना रचिते,**
**जवळ येउनी पहा कोण गे ! साह्य इयेचे करिते ?**

**पाकागारी चल तू माझ्या, नवगीते स्वैंपाकी**
**रचितो ! गातो ! असे मराठी भाषा याची परकी**

**वर्षे झाली साठ वयाला सखा पतीच्या माझ्या**
**गाउ लागला, वृद्धपणी हा होतो कविंचा राजा**

**ही कविरत्ने अजुन झाकली पहा आणखी दोन**
**ये ! ये जवळी ! तर्क न करणे बरवे ताई दुरुन**

ह्या कवितेत "वर्षे झाली साठ वयाला सखा पतीचा माझ्या गाउ लागला" म्हणून जो उल्लेख आहे तो रावसाहेब विनायकराव साठ्यांसंबंधी आहे. रावसाहेब साठे पेन्शनर होते. ते नगरास येऊन राहिले व नंतर कविता करू लागले. त्यांचा मुलगा वामन हा फार चांगला चित्रकार होता. तो जर जगता-वाचता तर त्याचे नाव चहूकडे

गाजले असते. परंतु वयाच्या तेवीस-चोविसाव्या वर्षीच त्याच्यावर काळाने घाला घातला. टिळकांनी 'बापाचे अश्रू' हे काव्य पुन्हा लिहिले.

१८८८ साली त्यांनी विद्यानंदावर पहिले 'बापाचे अश्रू' लिहिले. ह्याच्यावर ते लिहिताना त्यांनी म्हटले आहे की--

**" माझा पुत्रक जाय सोडुन मला त्याचेच हे ये रडू "**

पण १९०९ सालचे बापाचे अश्रू वामनावर लिहिले आहे. ह्या वेळी ते म्हणतात-

**" जसे सिंधुचे तसेच त्याही जनकाचे सच्छील**
**परंतु झाला दुःखाचा हा कळस कसा सोशील "**

रावसाहेब दररोज आमच्याकडे यायचे. दररोज त्यांचे काव्य-गायन व्हायचे. ठोंबऱ्यांप्रमाणे त्यांचीही मी श्रोत्री असे.

एक दिवस रावसाहेब आले. त्या वेळी टिळक भुइंजला होते. त्यांना टिळकांना काही जरुरीचे पत्र लिहावयाचे होते. दत्तूने त्यांना दऊत-टाक दिली व जवळच तो व ठोंबरे बसले. रावसाहेब पत्र लिहू लागले. पत्र लिहिता लिहिता ते काय लिहीत ते वाचीत व प्रत्येक वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्हार्थी ऊं म्हणत. मला हूं म्हणावे लागे. पत्र खूप मोठे होते. दत्तू व ठोंबरे हसत. शेवटी त्यांना हसू आवरेना म्हणून ते दोघे उठून बाहेर गेले.

रावसाहेबांच्या काही हे ध्यानात आले नाही, पण माझ्या ध्यानात आले. त्यांनी ऊं म्हटले की मला हूं म्हणावे लागे व मग पोरे गेल्याने मलाही हसू येई. पत्र संपले. आता पत्ता !

मी दत्तूला व ठोंबऱ्यांना आत बोलावले, " अरे बाबांनो, तेवढा पत्ता लिहून द्या रे." आणि बाबा बसले. एकाने पत्ता लिहिण्यास सुरुवात केली-

" रेव्हरेंड. ऊं ?"

दुसऱ्याने म्हटले, " हूं."

" नारायण. ऊं ?"

" हूं."
" वामन. ऊं ?"
" हूं."
" अमेरिकन मिशन. ऊं ?"
" हूं."
" भुइंज. ऊं ?"
" हूं."
" जिल्हा सातारा. ऊं ?"
" हूं."

पत्ता लिहिला. रावसाहेब पत्र खिशात टाकून निघून गेले.

रात्री ही ऊं, हूंची गम्मत आठवून माझे मलाच हसू येत होते. पण मग फार वाईट वाटले. रावसाहेब वयाने, विद्येने आमच्यापेक्षा किती श्रेष्ठ, आणि आम्ही त्यांची चेष्टा करावी !

दुसऱ्या दिवशी असाच प्रकार घडला. ठोंबरे व दत्तू वरावर चढून बसले होते. खाली भास्कर व बेबी होती. रावसाहेब आले. घरावर चढल्याबद्दल ते त्या दोघांना बोलू लागले. ठोंबरे त्यांची थट्टा करू लागले. त्यांना दुसरी मुले साथ देऊ लागली. रावसाहेबांना फार राग आला व त्यांनी आत येऊन मजजवळ हा सारा प्रकार सांगितला.

मी बाहेर आले व ठोंबऱ्याला खाली बोलावू लागले. पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. मग रावसाहेबांच्या त्या दिवसाच्या कविता ऐकण्यास मी बसले. इकडे ठोंबरे खानावळीत जेवण्यास निघून गेले.

दत्तू–बेबीला मी खूप रागावले. " रावसाहेबांची थट्टा केलेली मला मुळीच खपणार नाही. पुन्हा असं झालं तर मार मिळेल. मी ठोंबऱ्याला सांगणार आहे तो जेवून आल्यावर. त्याच्याशी मुळीच कोणी बोलायचं नाही."

रात्री जे ते आपापल्या बिछान्यावर गुपचीप पडले होते. नऊ वाजता ठोंबरे जेवून आला. आज जिकडेतिकडे चिडेचिप झालेली पाहून आजचे वातावरण काही निराळेच असल्याचे त्याने ओळखले. तरी तो प्रत्येक बिछान्याजवळ गेला. प्रत्येकाजवळ बोलण्याचा त्याने प्रयत्न

केला. मोठमोठ्याने हसून पाहिले. पण कोणी त्याच्याकडे पाहीनासुद्धा. तो खिन्न झाला. त्याला हा प्रकार काय आहे ते काही कळेना.

मग माझ्यापुढे तो येऊन बसला.

" लक्ष्मीबाई, हा काय प्रकार आहे ? मला हे कळतच नाही."

" बाबा रे, आम्ही असा बेत केला आहे, की जोपर्यंत तू आपली चूक कबूल करीत नाहीस तोपर्यंत तुझ्याशी बोलायचे नाही."

" माझी काय चूक झाली ?"

" मोठ्या माणसांची थट्टा करण्याची. थट्टा करायची झाली तर बरोबरीच्या माणसांची करावी. तू आम्हाला किती आवडतोस ! तुला कोणी नावे ठेवली म्हणजे आम्हाला किती वाईट वाटते ह्याची तुला जाणीव नसेल. तू रावसाहेबांची थट्टा केल्यावर ते तुला चांगला मुलगा म्हणतील का ? त्यांनी तुला वाईट म्हटले तर ते मला आवडेल का ? आणि तू आम्हाला जितका आवडतोस तितकेच रावसाहेबही आवडतात. तेव्हा जोपर्यंत तू कबूल करणार नाहीस की मोठ्या माणसांची थट्टा करणार नाही, तोपर्यंत आम्ही कोणी तुझ्याशी बोलणार नाही."

ठोंबरे बालकवी होता, पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता. माझे बोलणे ऐकून त्याला इतके वाईट वाटले, की त्याचे प्रतिबिंब त्याच्या तोंडावर व डोळ्यांत वठले. त्याच्या डोळ्यांतून अश्रू ठिपकू लागले.

" लक्ष्मीबाई, तुमच्या पायाची शपथ मी आजपासून कोणत्याही वडील माणसांचा उपमर्द करणार नाही."

मग मी त्याला पोटाशी धरले. मलाही हुंदका आला. आणि बालवृत्तीचा ठोंबरे पुन्हा हसू-खेळू लागला.

मात्र त्या दिवसापासून त्याने कधी कोणाचा उपमर्द केला नाही.

## ६६ : ती आठ वर्षे थांबले

दत्तू परीक्षेत पास झाला. त्याला अतिशय श्रम पडले होते, कारण ड्रॉइंगच्या टीचर्सच्या परीक्षेचा व स्कूल फायनलचा, असे दोन्ही अभ्यास तो एकाच वेळी करीत होता. ड्रॉइंगची थर्ड ग्रेड झाल्यानंतर मी दत्तू-संबंधी रा. राजारामजी चांदेकरांचा सल्ला घेतला.

ते म्हणाले, "त्याला टीचर्सच्या परीक्षेला व स्कूल फायनलला जाऊ द्या. कारण उद्या टिळकांनी कामबीम सोडून दिले तर ह्याला चटकन एखादी नोकरी लागेल."

राजारामजींच्या सल्ल्याप्रमाणे दत्तूच्या शिक्षणाच्या बाबतीत माझे प्रोग्राम होत. त्याप्रमाणे ठरले. टीचर्सच्या परीक्षेस नगरहून एक डझन विद्यार्थी मुंबईला गेले. ते सगळे पहिल्या भागात पास होऊन दुसऱ्या भागाच्या वाटाण्याच्या अक्षता घेऊन परत आले. आता दत्तू ड्रॉइंग मास्तर होण्याची आशा संपली. आता स्कूल फायनल **होऊन** कोठे सरकारी नोकरीत तो जाणार असे बहुतेक माझे ठरल्यासारखे झाले.

परीक्षेला मुलगा जायचा पुण्याला, तेव्हा त्याला तेथे कोणाकडे पाठवावा हा प्रश्न आला. शेवटी घारूमाईकडे जाण्याचे ठरले. घारूमाईचे यजमान बर्वे हे एक मोठे सुखवस्तू गृहस्थ होते. सुखवस्तू म्हणजे सुखात वाढलेली ते एक वस्तू होते. त्यांचे पत्र आले की दत्तूबरोबर मावशी-लाही धाडून द्यावे. त्याप्रमाणे मीही दत्तूबरोबर गेले.

तेथे दत्तूला आंघोळीला गरम पाणी रोज काढून देण्याचा मक्ता नानासाहेब बर्व्यांनी घेतला. घरात चाकरनोकर नव्हते असे नाही. पण दत्तू त्यांना फार आवडत असे. पाणी देताना त्यांनी म्हणावे, "बाबा, एकदा परीक्षेत पास हो म्हणजे गंगेत घोडे न्हाले."

दत्तूने म्हणावे, "आधी मला न्हाऊ तर द्या, मग घोडे न्हातील."

आणि ह्यांचे हे संभाषण ऐकून घारूमाईने मला हळूच म्हणावे,

" जसे काही ह्याच्या विद्येचे पैसे ह्यांनाच खर्च करावे लागले आहेत ! "

दत्तू स्कूल फायनल परीक्षा पास झाला. टिळक ते ऐकून रागावले ! " मला विचारल्यावाचून हे धंदे करता ! आता ह्याला कॉलेजात कसे जाता येईल ? तुम्ही नेहमी आपल्या मतानेच वागता. माझी इच्छा ह्याला कॉलेजात पाठविण्याची होती. आता ह्याला मॅट्रिकसाठी आणखी एक वर्ष घालवावे लागणार व पुन्हा नापासबिपास झाला तर आणखी एक वर्ष जाणार ! "

मला अगदी चोरट्यासारखे झाले. पुन्हा चांदेकरांना बोलावले. ते म्हणाले, " मी सांगतो एक उपाय. ह्याला नागपूरला पाठवा. अलाहाबाद युनिव्हर्सिटीत स्कूल फायनल पास झालेल्याला कॉलेजात घेतात."

टिळकांनी डॉक्टर रॉबर्टसाहेबांना विचारले व त्यांनी दत्तूला कॉलेजात घेण्याचे ताबडतोब कबूल केले. खर्चाचा आकडा आमच्या आवाक्यातला होता. तेव्हा अचानक रीतीने दत्तूचा उच्च शिक्षणाचा मार्ग खुला झाला.

ज्या दिवशी दत्तू जायचा त्या दिवशी आम्ही सर्वजण स्टेशनवर त्याला पोचवायला गेलो होतो. मुलगा पहिल्यांदाच इतका दूर जाणार म्हणून टिळकांना फार वाईट वाटले. मला व बेबीला दोन दिवस चैन पडले नाही.

दत्तू सतरा-अठरा वर्षांचा होता. मला सुखस्वप्ने पडू लागली होती. साऱ्या जगात माझा मुलगा मोठा विद्वान झाला आहे असे मला वाटू लागले. तो कॉलेजात गेलेला आणि इतका चांगला– आईच मी– मला त्याच्यात काही दोष दिसत नसत.

मला वाटे, माझा मुलगा इतका चांगला असून ह्याला मुली का सांगून येत नाहीत ? ख्रिस्ती लोकांत मुली सांगून येत नाहीत. मुलाकडून मुलीला ' मागणी घालावी ' लागते. पण प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळे मी हे विसरून जाई.

तेथे नगरास रखमाबाई कुकास नावाच्या एक मेट्रन होत्या. त्यांचे व आमचे येणे-जाणे असे. त्यांना मी आपल्या पोटातले सांगे.

त्या माझी समजूत करीत, " अहो बाई, इकडे मुलगी मागावी लागते. आणि तुमचा मुलगा कोठे अजून एवढा मोठा झाला आहे ? "

पण मला काही ते पटत नसे. मी म्हणे, "मुलगा मोठा झाला नाही म्हणजे काय ? तो शिकेल की कॉलेजमध्ये. मुलगी राहील मज-जवळ."

त्या वर्षी उन्हाळ्यात आम्ही नाशकास जाण्याचे ठरविले. तेथे रखमाबाईंचे बंधू रा. कृष्णराव सरोदेही मुंबईहून हवा बदलण्यास आले होते. आम्ही जवळ जवळच राहत होतो. आणि जेवणाची व्यवस्था एका बाईकडे दोघांनीही केली होती. म्हणजे स्वयंपाक, बाजारहाट ही दगदग ते दोन महिने आम्हाला मुळीच राहिली नव्हती.

रोज दोन्ही सांज सरोद्यांची व आमची जेवणाच्या वेळी गाठ पडायची. कारण ती बाई आमच्या घरी जेवण आणून आमच्या घरी आम्हाला वाढीत असे. ह्याशिवाय सरोदे मंडळीला मराठीचा मोठा अभिमान असल्याने त्यांचे व टिळकांचे मोठे जमत असे. ही माणसे मोठी सज्जन व माणुसकीला चांगली असल्याने त्या थोडक्या काळात आमची खूप गट्टी जमली.

दत्तूचे लग्न व्हावे, नाही तर निदान ठरावे तरी, अशी माझ्या मनात सारखी तळमळ लागलेली होती. हिंदू असते तर इतक्या अवधीत एखादी लहानशी सून हाताशी आली असती; पण येथे ते शक्य दिसेना. मुली सांगून येत नाहीत तर नाही, आपणच कोठे खडे टाकून पाहावे असे वाटू लागले व तसे टिळकांना न कळत एक-दोन ठिकाणी मी खडे टाकलेही.

पण मला उत्तर मिळे, "अहो बाई, मुलगा अजून शिकतो आहे. आताच काय त्याच्या लग्नाचे घेऊन बसला ?"

पण माझ्या मनाला ते पटतच नसे.

इकडे शरणपुरात (नाशकात) दत्तू व सरोद्यांची मुलगी रूथ ह्यांचे चांगलेच सख्य जमले. मला वाटू लागले, हीच सून आपल्याला मिळेल तर बरे होईल. मुलगी चांगली सद्‌गुणी व बुद्धिमान. तेव्हा हे ठीक आहे. ती दोघे एकमेकांना आवडत आहेत हे अगदी सहज दिसून येत होते. रूथ त्या वेळी इंग्रजी पाचवीत होती आणि वय केवळ चौदा वर्षांचे होते. हे वय ख्रिस्ती लोकांत लग्नाचे मुळीच नाही. लग्नाच्या

कल्पनेचेही नाही. आता तर हिंदूंतही हे वय लहान वय ठरले आहे. असो.

मी रूथला एकटीला एका बाजूला गाठून विचारले, तू माझी सून होतेस का म्हणून !

ती म्हणाली, " मी काय सांगू ? तुम्ही पाहिजे तर माझ्या वडलांना विचारा."

मी टिळकांच्या मागे भुणभुण लावली. लग्न तर होणे शक्यच नव्हते, पण निदान मागणी होण्यास काय अडचण आहे ? शेवटी टिळक कबूल झाले व त्यांनी कृष्णरावांस विचारले.

कृष्णराव म्हणाले, " मी माझ्या बहिणीचा विचार घेऊन कळवीन."

अर्थात माझे मन पुन्हा अस्वस्थ झाले. आता हे मुंबईला जाणार. मग बहिणीचा विचार घेणार व मग आम्हाला लिहिणार ! इतका दम मला कोठे होता ?

उन्हाळा संपला. आम्ही परत नगरला आलो. दत्तू कॉलेजला गेला, पण कृष्णरावांचे पत्र आले नाही ! एक-दोन महिने वाट पाहून टिळकांनी त्यांना पत्र घातले. अर्थात माझ्या सांगण्यावरून ते घातले. कारण त्यांना काही माझ्यासारखी घाई झाली नव्हती. मला मात्र सूनमुख केव्हा पाहीन असे झाले होते.

शेवटी सरोद्यांचे उत्तर आले की, आम्ही मुलगी देण्यास कबूल आहो— पण एका अटीवर. तिची मॅट्रिकची परीक्षा पास होईपर्यंत लग्नाची गोष्ट काढायची नाही. टिळकांनी लिहिले की, मुलगा बी. ए. होईपर्यंत मलाही लग्नाची घाई नाही.

अशा रीतीने लग्न जरी नाही व हाताशी लहानशी सून जरी नाही तरी चार वर्षांनंतर कोणती सून येणार हे कळले व मी आनंदात गढून गेले.

लग्नाच्या विचाराने मुलांचे अभ्यास होत नाहीत असे म्हणतात. मला तरी काय माहीत ? लोक असे म्हणतात. पण ह्या मुलांच्या बाबतीत तसे काही झाले नाही. मुलगी मॅट्रिक झाली. मॅट्रिकमध्ये साऱ्या युनिव्हर्सिटीत इंग्रजीत पहिली आली. स्कॉलरशिप मिळाली.

इकडे मुलगाही बी. ए. झाला, आणि तो बी. ए. व ती मॅट्रिक झाल्यावर लग्न करायचे ठरले होते ते बाजूस राहून दोघांचा विद्याभ्यास अगदी पूर्ण होऊन म्हणजे रूथही बी. ए. होऊन मग लग्न झाले. जी मी आठ महिने मुलाचे लग्न लांबविण्यास तयार नव्हते ती आठ वर्षे मागणीनंतर थांबले.

* * *

आम्ही शरणपुरास होतो तेव्हा टिळक अभिनवकाव्यमालेच्या दुसऱ्या भागाची जुळवाजुळव करीत होते. पुष्कळ निरनिराळ्या कवींच्या कविता त्यांनी जमविल्या होत्या. त्याच वेळी पहिल्यांदा आम्हाला तांबे कवींची पुष्कळशी अप्रसिद्ध कविता वाचायला मिळाली. दुपारचा सारा वेळ कविता वाचण्यात जाई.

## ६७ : नवा संसार

दत्तू आता बी. ए. च्या क्लासात होता. तो सुटीहून नागपूरला जाण्याच्या चार दिवस आधीची गोष्ट. दिव्याची आवस होती. रात्री आम्ही प्रार्थना करून नंतर बोलत बसलो होतो. दहाचा सुमार झाला होता. समोरील रंगूबाई लोहारणीने हाका मारून सांगितले की, " बाई, कोणीतरी घराची टेहळणी करून गेले आहे. सावध रहा."

आमच्याकडे मिशनचे तीन ब्लॉक एकाला एक लागून चाळीसारखे होते. त्यांतील एका घरात दत्तू निजे. मधल्या घरात आतमध्ये मी व रामभाऊंची मुलगी चिकी व कामदारीण निजे. बाहेरच्या खोलीत टिळक निजत व व्हरांड्यावर रामभाऊ निजत. शेवटच्या घरात आमचा स्वयंपाक, कोठी, जेवणाची खोली वगैरे होते.

रामभाऊ आमच्याच घरी असत. त्यांची बायको मेल्यावर म्हणजे

स्मृ... २६

चिकी नऊ महिन्यांची होती तेव्हापासून ते व चिकी आमच्या घरचीच झाली होती.

माझ्याजवळ फक्त माझाच संसार नव्हता. त्या वेळी असे तीन संसार माझ्याकडे राखोळीला आलेले होते. मी म्हणे, " देवा, माझे सामान हरवू दे, चोरीस जाऊ दे, मोडतोड होऊ दे– पण दुसऱ्याचे सुरक्षित राहू दे."

टिळक मला नेहमी रागावत की, " तुला सांगितले आहे कुणी हे दुसऱ्याचे ललाट ? "

असो. त्या रात्री बारापर्यंत आम्ही जागे होतो. पहाटे मी उठले ती पुढील दाराने नीट मागील दारापर्यंत गेले. मागील दारी पाण्याची ओल दिसली. मी म्हटले, " पाहिले ? बाया असे पाणी नासतात. मग पाण्याची अडचण पडते. "

आणखी थोडी पुढे झाले तो कोणी पाळणा पालथा घालून टाकलेला दिसला. पाळणा पालथा पाहून माझ्या पोटात धस्स झाले. मला ते मोठे अशुभ चिन्ह वाटले. माझ्या दाराशी कोणी हे चिन्ह मुद्दामच केले, असे वाटून आणखी पुढे झाले तो तो पाळणा नसून चौकटीसुद्धा भिंतीतून खिडकी उकरून तेथे टाकलेली आढळली.

त्याच्यापुढे डोकावले तो मागले दार सताड उघडे व आत घर अगदी स्वच्छ ! पाणी साठवावयाची सारी भांडी, पाणी सर्व ओतून नेली होती. तांब्यापितळेची सर्व भांडी अगदी पळीपासून तो पायखान्यातल्या तांब्यापर्यंत गेले होते.

रामभाऊकडे जाऊन मी त्यांना उठवू सागले.

" रामभाऊ उठा उठा ! चोरी झाली. आता घरात तुपाची वाटीसुद्धा राहिली नाही. "

रामभाऊ, रात्री पुष्कळ जागले असल्याने चटकन जागे होईनात. त्यांना हलवून जागे केले.

" काय ? घर फोडले ? आणि ते कोणी ?"

" चोरांनी. "

" कुठे आहेत ते ?"

" तुम्ही नीट जागे व्हा, म्हणजे दाखविते. "

रामभाऊ नीट जागे होताच त्यांचा मोर्चा टिळकांकडे वळला.

" पपा, उठा उठा ! चोरी झाली. चोरांनी सारे घर धुऊन नेले."

" काय ? चोरी ? बरं झालं. आता तरी काही दिवस कुलपे लावण्याचा त्रास चुकला."

टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे झाले तसेच माझ्याही म्हणण्याप्रमाणे झाले. कारण सामान चोरीला गेले ते सारे आमचे गेले. लोकांच्या सामानापैकी कोणत्याही सामानाला चोरांनी हात लावला नाही. ते सामान दुसऱ्या घरात होते. त्या रात्री मी किल्ल्याही त्याच खोलीत विसरल्याने चोरांनी तोही जुडगा लांबविला.

दुधाचे पातेले दुधासकट नेले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी आम्हाला काहीही खायला राहिले नाही. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी आमची चहाची व्यवस्था केली. थोड्या वेळाने चोरीची बातमी डॉ. ह्यूमसाहेबांना कळून ते समजूत घालायला आले.

पण दत्तू, टिळक किंवा मी ह्यांतील कोणालाच वाईट वाटले नव्हते. मला आधी धस्स झाले ते पाळणा पालथा घातला असे अनपेक्षितपणे वाटून.

साहेब म्हणाले, " बाई, वाईट वाटू देऊ नका. मी तुम्हाला एक भांडे आणून देतो ! " अर्थात आम्ही ती देणगी साभार नाकारली.

आमची कल्याणी आल्यापासून मी दुधाचा व्यापार सुरू केला होता व त्या दुधावर मला बराच पैसा मिळे. ह्यावर मी आपला संसार पुन्हा मांडायची हिंमत धरली. दत्तूला बरोबर देण्यासाठी फराळाचे केले होते व त्याच्या सामानात त्याचा डबा ठेवला होता. तो चोरांच्या हातून सुटला; पण त्यांनी घरात ठेवलेले फराळाचे मात्र लांबविले.

दुसऱ्या दिवशी एक रुपया खर्च करून कुंभाराकडून भरपूर भांडी आणली. ही चोरीस जाण्याचे भय नव्हते.

दत्तू कॉलेजला गेला. तो गेल्यावर त्याच्या पाठोपाठ बर्व्यांचे व पेंडशांचे पत्र आले, की घारूमाई फार आजारी आहे, तरी मावशीला पाठवून द्यावे. घारूमाई मला स्वतःच्या मुलीसारखी होती. तिच्याकडे

जाणे म्हणजे मी आपले कर्तव्य समजत होते; तर इकडे संसारात जीव गुंतला होता.

त्यात चोरीचा पोलीसतपास चालू होता. टिळक म्हणत, " जाऊ द्या गेले तर. मला काही त्याची जरूर नाही."

पण पोलीस ऐकेनात. त्यांचा तपास आणि जाबजबान्या ह्यांचा जोर होता. शेवटी पोलीसच्या तपासात एक चहाचा चमचा सापडला. तो आमचाच म्हणून आम्ही ओळखला आणि संपला तेथेच तपास! पुढे आणखी काही पत्ता लागला नाही! आणि आमचा गळा मोकळा झाला.

टिळकांनी चोरासाठी प्रार्थना केली. ती त्यांनी ज्ञानोदयात छापली. ती प्रार्थना ६ जुलै १९६६ च्या अंकातून खाली दिली आहे :—

" इष्ट आणि अनिष्ट, सुख आणि दुःख हे, माझ्या परमप्रिय माऊली, ईश्वरेच्छे, तुझेच दोन स्तन आहेत. तू आमच्या मुखात हे दोन्ही स्तन आळीपाळीने देतेस आणि आमचे परिपोषण करित्येस. आज मला काही प्राप्ती झाली असती तर मी तुझा जितका ऋणी झालो असतो तितकाच ह्या हानीवरून होतो. आज माझ्या घरचा पाचपन्नास रुपयांचा माल गेला, तो न जाता माझ्या शेजारीपाजारी राहणाऱ्या गरीब लोकांतून कोणाचा जर जाता, तर ते फार वाईट झाले असते. तसे झाले नाही म्हणून मी तुझे आभार मानतो. या लहानशा चोरीवरून बेलजिअम, आर्मिनिआ येथील लोकांच्या सर्वस्वाची आणि त्याबरोबर हजारो निरापराध लोकांच्या प्राणांची हानी म्हणजे काय हे मला पुष्कळच अधिक विशद होत आहे, व त्यांच्या प्रीत्यर्थ माझा कंठ वारंवार भरून येत आहे, ह्याबद्दलही मी तुझा ऋणी आहे.

हे अविनाशी ईश्वरेच्छे, " पृथ्वीवर कसर व कलंक नाश करितात व चोर फोडून चोरी करितात तेथे आपणाकरिता संपत्ती साठवू नका, तर स्वर्गामध्ये कसर व कलंक नाश करीत नाहीत, चोर फोडून चोरी करीत नाहीत तेथे आपणाकरिता संपत्ती साठवा. कारण जेथे तुमची संपत्ती आहे, तेथे तुमचे चित्तही लागेल, " या प्रभू येशू ख्रिस्ताच्या म्हणण्याचा अर्थ मला कितीही समजला, तरी त्याची मनोमय साक्ष पटून त्या

मनाला सारे वेड अविनाशी संपत्तीचे लागायला आजच्यासारख्या अनुभवांची गरज आहे.

ही गरज तू अंशतः भागविलीस म्हणून मी तुझा ऋणी आहे. हे ईश्वरेच्छे, तुला सर्वथा मान्य असा माझा प्रभू, गुरू, माझा तारक, माझे जीवन, माझा सखा येशू निरंतर माझ्याबरोबर आहे. तुझी केवढी अगाध कृपा ! तोच मला सांगत आहे की, ह्या अज्ञान चोरांना क्षमा कर आणि त्यांनी अनुतप्त होऊन तुला शरण यावे म्हणून प्रार्थना करा

ही क्षमा करिताना मी या चोरांना उत्तेजन येण्याला कारण होऊन आपल्या शहरातल्या लोकांची हानी होऊ देऊ काय ? नको ! नको ! हे जगाचे संरक्षण करणाऱ्या ईश्वरेच्छे, तू असे म्हणत नाहीस. राज्य, न्याय, कायदे, पुलीस ही सर्व योजना तुझी आहे. हिचा अव्हेर करून तुझा अपमान करणे आणि आपल्या शेजाऱ्याच्या हानीस कारण होणे हे मोठे पाप आहे. हे माझ्याकडून होऊ देऊ नको.

हे चोर पुलिसला सापडोत, कायद्याप्रमाणे त्यांचा निवाडा होवो, पण मला त्यांना क्षमा करू दे. मी यांचा हितचिंतक आहे, खरा साह्य करणारा आहे, असाच यांना अनुभव येऊ दे. स्वतः माझ्याठायी हे सामर्थ्य नाही; विशेषतः असल्या प्रसंगी मला माझ्या प्रभूला आलिंगन देऊन राहू दे. तो आणि मी एकत्र असलो म्हणजे मी सारे काही तुझ्या सांगीप्रमाणे करीन. अशा प्रसंगी मला आनंदी, शांत, स्वतःला अधिक बिलगणारा ठेवले आहेस. म्हणून हे पवित्र ईश्वरेच्छे, मी तुला शतशः वंदने करितो."

* * *

चोरीमुळे टिळकांच्या मनावर काय परिणाम झाला हे वरील प्रार्थनेवरून चांगले व्यक्त होते. असो.

इकडे घारूमाईची पत्रांवर पत्रे येत होती. टिळक म्हणत, "तू जा. मी तुला नेऊन पोचवितो. मी येथे सर्व संसार संभाळीन."

पण माझा जीव घरातील जीवजंजाळात अडकलेला. धरले तर डसते, सोडले तर पळते अशी माझी स्थिती झाली. शेवटी एकदाचा जाण्याचा निश्चय ठरला. मी आपली सामानाची कडेकोट व्यवस्था केली.

बाकी चोराने बहुतेक वाहून नेलेच होते; पण बाकी राहिलेल्या चिंध्यांचा भारा, टिनाचे डबेडाबे वगैरेंना कुलपे लावून वर चिठ्ठ्या चिकटवून मी तयार झाले.

जीवजनावरांची काळजी वाटतच होती. पण त्यांना थोडेच मोहोरबंद करून टाकता येते! ती उघड्या मैदानातील संपत्ती उघड्यावर टाकून मी पुण्यास निघाले. टिळक माझ्याबरोबर आले. घरात रामभाऊ, ठोंबरे वगैरे मंडळी होती. दत्तू कॉलेजात व बेबी हुजूरपागेत होती.

पुण्यास येऊन पाहते तर तेथे फारच भयंकर स्थिती होती. नवराबायको दोघेही अंथरुणाला खिळलेली! घारूमाईला कॅन्सर झालेला व बव्यींना काळपुळी झालेली!

टिळकांनी सांगितले, "तू ह्यांना सोडून येऊ नको. मी घरची सर्व व्यवस्था नीटपणे ठेवीन. तेथली तू काळजी करू नको."

टिळकांचाही पाय निघेना. माय मरो नि मावशी जगो तसे येथे अक्षरशः झाले.

मी दोन महिने भाचीजवळ राहिले. दोन महिन्यांनी त्या दोघांना जरा बरे वाटल्यावर मी नगरास जायला निघाले. मी जाते असे पाहून घारूमाईला फारच वाईट वाटले. ह्या दोन महिन्यांत कागदी घोडेस्वार पुण्याहून नगरास जात. राज्याचा बंदोबस्त कसा आहे म्हणून चौकशी करीत.

दुसरे कागदी घोडेस्वार नगराहून पुण्याला येऊन सांगत, राज्यात सर्वत्र आबादीआबाद आहे. पण माझे संशयी मन त्यावर फारसा विश्वास ठेवीत नसे.

आणि घरी येऊन पाहते तो सीलबंद सामान जरी 'अन्‌टच्ड्' होते तरी जीवजीवाणू, त्यांच्यासाठी साठवून ठेवलेल्या कडब्यासह व कडबा कापण्याच्या यंत्रासह गुडूप झालेले! मला तर सारे स्वप्नच वाटले.

पण थोड्या वेळाने भानावर आल्यानंतर कळले, की म्हशी विकल्या. रानात राखोळीला गेलेली कल्याणीची पारडी सोनी तेवढी

चुकून राहिली. माझ्या कोंबड्या होत्या त्याही विकल्या. मला दूध व अंडी विकून संसाराला फार मोठा आधार देता येत होता, पण हे सारे शेखअल्लीच्या काचेच्या हाऱ्याप्रमाणे फुटून गेले होते.

मी हिशोब घेण्यात मोठी पटाईत होते. त्यांच्यापासून दमडी न् दमडीचा हिशोब मी घेतला आणि त्यांनी कवडी न् कवडीचा हिशोब दिला. कर्जदारांचे सारे पैसे देऊन टाकले असे त्यांनी सांगितले. मलाही बरे वाटले. आता काय, एक लग्नाच्या खर्चाचाच प्रश्न होता. कर्ज फिटले त्यामुळे तर चांगलेच झाले असे मी आपल्या मनाचे समाधान करून घेतले.

म्हशी गेल्या, कोंबड्या गेल्या, पोपट होता तो उडून गेला. आता राहता राहिला ब्लॅकी कुत्रा व त्याची बायको. ब्लॅकी आमच्याकडे तेरा वर्षे होता. एक कुत्री राहुरीस आमच्या घरी व्याली व त्यातील एक पिलू आम्ही ठेवून घेतले होते. चार वर्षे एक कुत्री ब्लॅकीजवळ राहिली. शेवटी तो मेल्यावर तीही अन्नपाणी सोडून मरून गेली ! ती रात्रंदिवस आमच्या वाडीत राहत असे.

ब्लॅकी म्हातारा झाला तेव्हा त्याला शारीरिक पीडा फारच होऊ लागली. पण चंपी मात्र त्याला सोडून कोठेच जात नसे. ब्लॅकीकरता खाट, शेगडी आणविली होती. त्याच्या अंगाला मी औषधे चोळी. लोक हसत. पण कुत्राही सारे माणसासारखे करून घेत असे. डोळयांत औषध घालणे, पोटात घेणे, खाटेवर पडून राहणे हे सर्व सोपस्कार तो करून घेई. दुःख फार झाले म्हणजे तो कुंथे. तशी चंपी धावत धावत घरात येऊन माझा पदर ओढून मला त्याच्याकडे घेऊन जाई.

एक दिवस दुपारच्या दोनाच्या सुमाराला चंपी आली व मला बाहेर घेऊन गेली. मी जाऊन पाहते तो तो फारच कण्हत होता. मला पाहताच तो खाटेखाली उतरला. त्याने माझे पाय चाटले व तेथेच पडून प्राण सोडला. त्याची चार लहान पिल्ले त्याच्या अंगावर उड्या मारू लागली. चंपी मोठमोठ्याने गळा काढून रडू लागली.

टिळकांना व मला हा देखावा पाहवेना. आम्ही तिला आतल्या खोलीत कोंडले व ब्लॅकीला तेथेच कंपाउंडात पुरले. पण चंपी सुटताच

तिने ती जागा शोधून काढली व पुढे महिनाभर तेथे बसून ती रडत असे. तिने अन्नपाणी वर्ज्य करून शेवटी दुःखाने प्राण सोडला. धन्य बिचारी.

## ६८ : कहाणी

मी एक सामाजिक कादंबरी लिहिण्यास घेतली होती. मला लिहिता लिहिता एखादे जोडाक्षर मध्येच अडवी; मग पुस्तकांची उलटापालट करून तो शब्द कोठे आढळला म्हणजे माझी गाडी रुळावर येई. एक दिवस असेच माझे कादंबरीलेखन अगदी जोरात चालले असता मध्येच घोडे अडले.

मला मनुष्य काही काढता येईना. मी हातांशी होती नव्हती तेवढी पुस्तके उलथीपालथी केली, पण मनुष्य कोठे सापडेना. मी चिंतातुर होऊन बसले आहे, सभोवार पुस्तके अस्ताव्यस्त पडलेली आहेत, घरात काम हाका मारीत आहे, अशा वेळी ठोंबरे घरात आले. हा सारा देखावा पाहून ते म्हणाले,

"लक्ष्मीबाई, तुम्ही अशा का बसला ? काही हवे आहे का तुम्हाला ?"

"काय करू रे ! मला हवा मनुष्य. इतकी उलथापालथ केली पण तो कुठे सापडत नाही."

ठोंबरे माझ्यापुढे छातीवर हात ठेवून उभा राहिला.

"कशाला एवढी उलथापालथ करता ? हा पहा इथे आहे मनुष्य. आणखी हवे असतील तर जरा बाहेर या. हवी तितकी मनुष्ये दाखवितो. काही तोटा नाही. अहो, साऱ्या जगात मनुष्येच मनुष्ये. माणसांना काय तोटा ?"

"अरे, मला जगातली नकोत रे माणसे, मला पुस्तकातला मनुष्य

पाहिजे."

मग आम्ही दोघे खूप हसलो. ठोंबऱ्यांनी मला मनुष्य काढून दिला.

एक दिवस माझी ती कादंबरी ठोंबऱ्यांना वाचायला सांगितली. त्यांनी ती वाचून तिच्यावर खाली दिलेला अभिप्राय लिहून ठेवला.

अभिप्राय :– सदर कांदबरी
मी संप्रुण वाचली. आशी
कांदबरी समंध माराष्ट्र
भाशेत दूस्री दीसणार नाही.

त्रिंबक बापुजीं टोंबरें

आहामंद नग्र

तारीख. पंदरा. ज्यून येकोणीशचउदा

जाइरात

नावे नोंदवा नावे नोंदवा नावे नोंदवा

अप्रतिम गंथ्र अप्रतिम गंथ्र अप्रतिम गंथ्र

ही संधीपू न्हायेणा रनाही

वरील अभिप्रायाचे पान अजून मजजवळ आहे. कादंबरीला नाव ठेवले नव्हते, पण वर ठोंबऱ्यांनी मोठ्या अक्षरात 'लक्षुम्बाईची कादंबरी' असे ठेवले होते. ते पान काळाच्या उदरात गडप झालेले आहे. त्या गोष्टीला आता एकवीस वर्षे झाली. आता मला पुष्कळच चांगले लिहिता येते. पण तेव्हाचे माझे लिखाण म्हणजे पोरांच्या थट्टेचा एक विषय होता.

एक दिवस बेबीचे पत्र आले, की मला तुमचे लांबलचक पत्र आले नाही. तरी लांब पत्र पाठवा. त्या वेळी ठोंबरे व मीच घरी होतो. त्या पत्राला ठोमऱ्यांनी उत्तर लिहिले. पत्र होते चार-सहा बोटे रुंद. कागदाला कागद चिकटवून ते इतके लांब केले होते की ते उघडले म्हणजे तिच्या डोक्यापासून पायांपर्यंत पुरावे. ते पत्र हे :–

## कहाणी

अहमदनगर फर्ग्युसन गेट
टिळकांची वाडी
मधले घर
माठानजीक, जात्याशेजारी, लहानसे
अंथरूण, त्यावर निजलेल्या लक्ष्मी-
बाईंच्या उशानजीक ता. ३-३-१४

अनेकोत्तम आशीर्वाद विशेष. आटपाट नगर होते. तेथे एक गृहस्थ होते. त्यांना एक मुलगी होती. तिचे म्हणणे, मला लांब पत्र पाठवा ! लांबलचक पत्र ! लिहू नये लिहिले; कसे लिहावे, काय लिहावे, मार्च महिना, तिसरी तारीख. खिचडी करावी, साध्या पोळ्या, लोणकढं तूप, जेवण करावे, चाकराला भांडी घासायला द्यावी. कोठीच्या खोलीला कुलूप लावावं, फाटकंसं अंथरावं, तुटकंसं पांघरावं. एक वाजायला आला. जरा आडवं व्हावं. असं केल्यानं काय होतं, देहमन निचिंत होतं, लांबलचक पत्र लिहिलं जातं.

ऐका ऐका ताराबाई, तुमची कहाणी, पुणे शहर हुजूरपागा हायस्कूल, बोर्डिंगमध्ये थोडीशी मंगोलियन, थोडीशी बर्मी, थोडीशी जपानी, थोडीशी इंडियन. अर्धी भाकर. सगळा कांदा भिकारणीला वाढला, ताराबाईचा अवतार घडला. अरबांचा मुल्ला, तुर्कांचा काजी, ग्रीकमधला शिपाई, रशियातला रशियन कोकणात गेला, भुरका झाला. अंगणात आला, खुडखुडत पडला. मोठ्याने रडला. सगळ्यांनी पाहिला. न्हाणलं धुणलं. ऊठ बाबा, मोठा हो ! बाबा मोठा झाला !

नागपूर शहर हिस्लॉप कॉलेज इंटर क्लासात शिकायला गेला. असली बहीण असला भाऊ त्रिखंड शोधून गेलं पाहू,

थकलाभागला निराश झाला, घरचं खावं लष्कराच्या भाकरी भाजाव्या असलं काम कोण करी ? काम नाही धाम नाही तोच असलं काम करी.

इंजिनियर खात्यात मांजर व्याली. तिला तीन पिलं झाली. एक कुत्र्यानं खाल्लं, एक मांजरानं नेलं, ऊठ भाऊ, प्रधानाला सांग, 'ताराराणीला मांजर पाहिजे ! ताराराणीला मांजर पाहिजे !' कसं पाहिजे काय पाहिजे ? रोगी कष्टी मिच मिच दृष्टी, रोडके पाय तणतण करीत नाचत जाय! प्रधानानं दिलं शिपायां हाती. हाकारे नगारे पिटवारे नगरामध्ये ताराराणीचं मांजर आलं. ताराराणीचं मांजर आलं. आता बाई ठेवू कुठं, नेऊ कुठं, राहू कुठं, माझी मांजर. मांजर डोक्यावर घेऊ का खांद्यावर घेऊ ? पलंगावर घेऊन निजायला जाऊ ? दोन सासर दूध पिते. दोन बचक मांस खाते. दूध काढायचे वेळी त्रास देते. दुधाच्या बालदीत जीव देते. पण उंदीर पाहून पळून जाते. गरीब झुरळांचा जीव घेते. माझी मांजर, माझी मांजर, बन्या बाबाचा हात फोडते, चंपीवर दात काढते, व्ल्याकीवर फुस् करते. हडहड पाप्या चांडाळा, माझं मांजरीचं खाद्य तू कुठं घेऊन चाललास ? म्यांव म्यांव, बन्यानं दिलं, बनीनं खाल्लं तरी पुरत नाही. दरिद्र काही फिटत नाही. हावरेपणा मिटत नाही.

आमच्या हाताची शिकार करते. लुगड्या-धोतराचे सोगे धरते. सोंगट्या उडवून घरभर भरते. आता बाई सांगू किती लिहू किती. गूण काही संपत नाही. वर्णन केल्यावाचून राहवत नाही. आताच प्हा पत्र फाडलं, नवं जोडलं तेव्हा पुढचं लिहिणं घडलं. बबीपुराण लिहू नाही लिहिलं. कसं लिहावं काय लिहावं ? फाल्गुन मास पहिला पक्ष पहिल्या मंगळवारी लिहिणं लिहिलं. कहाणीचं एवढं फळ, पत्राचं काय फळ. ते पत्र मला सांग. गुडगुड गुपित किल्ला

कुपित, काय तुझ्या मनात सांग माझ्या कानात. तुझ्या मनोतलं मी जाणलं लांबचलांब पत्र आणलं. पत्राच्या मिषे दौत भेटली लेखण भेटली– लांब पत्र लिहिण्याची हौस फिटली.

(बेबी ! तुझा कान पुढे कर. हे बघ, फाल्गुन महिना लागलाच आहे. वेड्यासारखी बाजा वाजविण्याची परवानगी कशाला मागायला पाहिजे ? दररोज मनसोक्त बाजा वाजवीत जा. सर्व मंडळीची सदर परवानगी आहे.)

**कार्ला पुराण**

**शंख पुराणी कथा पवित्र**
**कार्ल्याची महती विचित्र**
**ती करून लांब दोन्ही श्रोत्र**
**श्रवण कीजे सादरे**

**कलीयुगींचा तीर्थराज**
**तोच वर्णिन सादर आज**
**श्रोते सज्जन महाराज**
**कथाभाग परसा की**

**साक्रेटीसाचा शिष्य परम**
**तखपीरखाँ तया नाम**
**तये उपदेशून नेम**
**धोंडभटजीस सांगितला**

**की या कार्लीयांची महती**
**तिन्ही त्रिकाळी मुली गाती**
**कलीयुगी विशुद्ध कीर्ती**
**तीर्थराज हा एक**

होता कार्लीयाचे दर्शन
शहाणेपणाचा मळ धुऊन
गाढवाचे अवतार पूर्ण
भाविक जन होती पै

मुलींचा हट्ट चलिला
पैशियांचा खर्च मांडिला
किती पडती मिळवायाला
कष्ट तयांना न कळेची

म्हणती नरजन्माचा लाहो
त्यातही स्वतंत्रपणाचा प्रभावो
चला चलां जाउन पाहो
याहो कार्ले क्षेत्रांतरी

लांगूल नसेल जयाते
सत्वरी ते उपजे तेथे
भाविक वदती कितेकांते
शिंगे आली तया स्थळी

कितेक जाहाले चतुष्पाद
ऐसा कालियाचा प्रसाद
नाही नाही मिथ्या
प्रचीती आली कितेका

आम्ही तर दुबळे जन
आम्हा न घडे तीर्थदर्शन
आपण परी अवश्य जाउन
तीर्थ पाहून येईजे

या तीर्थाचा महिमा प्रसिद्ध
साच न मानी जयाचे चित्त
तोचि दुरात्मा मतिमंद
गाढवाचा अवतार

कार्लीयासी तरी जाईजे
श्रद्धाळुपणे दर्शन घेईजे
रुपये येतिल आता सहजे
टपालमार्गेंकरोनी

श्रोते म्हणती यास आधार
शंखपुराणी असे सादर
फत्तरेश्वर अति पवित्र
ग्रंथ लिहिला तयांनी

त्रिभुवनात डंका गाजिला
फत्तरेश्वराची अगाध लीला
ग्रंथ सादर संपविला
एक तासामाझारी

पहिले ते तारापुराण
मग दत्तोपंत जन्म निवेदन
त्यावरी सुंदर सगुण
मार्जारीचे पै केले

त्यावरी बाजा वाजवायाला
दिली परवानगी तुम्हाला
कार्ला पुराणही अवलीला
संपविणे क्षणार्धी

शंख पुराण ग्रंथ प्रचंड
लांब पत्र रचना उदंड
कर्ण लांबवोनी प्रचंड
अती आदरे परिसावे

– त्र्यं. बा. ठोंबरे

ताराने एक कविता केली होती. तिची पहिली ओळ "माझी मांजर माझी मांजर" अशी होती. ही मांजर इंजिनियर खात्यातून दत्तूच्या प्रधान नावाच्या एका मित्राने बेबीला आणून दिली होती.

## ६९ : मी भित्री

भित्री म्हणजे अगदी घाबरट नव्हे व तशी साधारणत: पाहिले तर भित्रीही नव्हे. पण टिळकांची माझी तुलना केली तर मी मात्र फारच भित्री ठरेन. टिळकांना भय हा शब्दच त्यांच्या डिक्शनरीत कधी सापडला नाही. सभा असो, साप असो, साहेब असो, त्यांना कधी भय वाटले नाही.

नगरास एकदा आमच्याकडे मोठी जेवणावळ होती. दोन मास्तरणी आमच्याकडे जेवायला आल्या होत्या. ह्या होत्या एका मडमेच्या ताब्यातल्या. म्हणजे तिच्या बोर्डिंगमधल्या. तिच्या हुकमतीतल्या. ती मडम चांगली होती बिचारी. पण मोठी कडक आणि शिस्तीची भोक्ती! शिस्त म्हणजे तिला परीटघडीचा कपडाच वाटायचा. जरा एखादी सुरकुती पडली की झालीच ब्रह्महत्या!

ह्या मास्तरणींना आमच्याकडे रात्री आठपर्यंत राहण्याची परवानगी मिळाली होती. पण आपल्याकडच्या जेवणावळी त्या. त्या का ठरलेल्या वेळी होणार? तशात ह्या मास्तरणींना मी वाढायचे काम दिले होते. म्हणजे दोन पंक्ती होऊन मग त्या परत जाणार. आठाच्या ठिकाणी

दहा-अकरा होणारच. पण साडेआठ-पाऊणेनऊ होताच ती मडम आली व मास्तरणींना का परत पाठवले नाही म्हणून टिळकांशी हुज्जत घाल-ण्यास तिने सुरुवात केली. टिळक आधी शांतपणे म्हणाले, " अजून जेवणी झाली नाहीत. जेवणी झाली म्हणजे त्यांना आणून पोचवितो. "

ती ह्यावर संतापली, " तुम्ही काय समजता ? अशाने आमच्या शाळेचे डिसिप्लीन कसे राहील ? आत्ताच्या आत्ता मास्तरणींना पाठवा. एक मिनिटभर आणखी त्या येथे राहता कामा नाही. "

टिळक म्हणाले, " आत्ताच्या आत्ता तुम्ही माझ्या घरातून चालत्या व्हा. ही काही चावडी नाही येथे येऊन भांडत बसायला. आणि जात नसाल तर मला तुम्हाला हात धरून घालवून द्यावे लागेल. मास्तरणींना त्यांची जेवणी झाल्याखेरीज मी पाठवीत नाही. तुम्हाला काय करायचे असेल ते तुमच्या बंगल्यावरून करा. "

त्या गेल्या. पुढे प्रकरण काही वाढले नाही, पण टिळकांच्या त्या कृत्याचे सर्व पाहुणेमंडळीला मोठे आश्चर्य वाटले.

ह्याच मडमेने अमेरिकेहून येताना वाटेत जपानहून जिनरिक्षेचे एक खूळ आणले होते. ती जिनरिक्षेत बसून हिंडे व ती जिनरिक्षा शाळेतील गरीब पोरे ओढीत.

टिळकांना हे मुळीच खपत नसे. ते म्हणत, " ही आमची रीत नाही. पूर्वी देवभोळे लोक देवांना रथात घालून ओढीत किंवा राजेरज-वाड्यांचे रथ त्यांना मान देण्यासाठी ओढण्यात येत. तुम्ही काही देव नाही की राजे नाही. आमच्या येथे येऊन तुम्ही हा जुलूम करणे शोभत नाही. ही मुले गरिबाची झाली व तुम्ही त्यांना साह्य करीत असला तरी ती तुमची गुलाम नाहीत. ही रिक्षा एकदम बंद करा, नाहीतर पाहा."

ती म्हणाली, " काय पाहायचे आहे ? माझा पाय दुखतो. मला चालवत नाही. मी रिक्षा बंद करणार नाही. "

" चालवत नाही तर तांगे नाहीत ?"

त्या वेळेस मोटारी प्रचारात नव्हत्या. टिळकांचे बोलणे तिने मनावर घेतले नाही. टिळकांना तिचा आता फारच राग आला. त्यांनी जिनरिक्षा नावाची एक कविता केली व ती दिली मुलांना शिकवून.

मग काय, भुताच्या हाती कोलीत झाले. हां हां म्हणता कविता ज्याच्या त्याच्या तोंडी झाली. तिची जिनरिक्षा निघाली की मागे पोरांचा घोळका ती कविता म्हणत निघायचा.

शेवटी डॉ. ह्यूमकडे गाऱ्हाणे गेले. डॉ. ह्यूमनी टिळकांना पाचारण केले. तेथे मोठा वादविवाद होऊन जिनरिक्षेची रक्षा झाली व तेव्हापासून नगरास कोणी हे खूळ पुन्हा आणले नाही.

नगरास असलेल्या मिशनरीत बिसल घराणे फार प्रसिद्ध होते. रे. एच. बिसल व त्यांच्या दोघी बहिणी डॉ. ज्युलिया बिसल व डॉ. एमिली बिसल ह्यांचा लौकिक फारच मोठा आहे. ह्यांचे मराठी भाषेवर इतके प्रभुत्व होते, की पडद्याआडून त्यांचे बोलणे ऐकले तर कोणीही म्हणेल, की ही पुण्यातील कोणी उच्चवर्णीय मंडळी बोलते आहे.

एकदा रे. मि. बिसल व टिळक ह्यांचे असेच भांडण झाले. कारण टिळकांनी त्यांना काही पत्र लिहिले होते त्याच्याखाली शेवट करताना शेवट अगदी औपचारिक केला होता. पण पुढे ते भांडण लौकरच मिटून टिळकांनी बिसलसाहेबांना कवितेत उत्तर दिले.

तसेच डॉ. एमिलीबाई बिसल ह्यांनी टिळकांची एक कविता कोठे नीट चालीवर म्हणता येईना म्हणून कानामात्रा बदलून म्हटली. त्यावर टिळकांना राग येऊन त्यांनी 'कवीची विनवणी' ही कविता लिहिली.

"कोमल कौशल्ये नटला कर तुमचा जरि किती असला, तरी तयाने माझी कवने जरा स्पर्शणे सहन न होणे कधि मजला। ह्याहुन जीव बरा गेला" हे बिचाऱ्या डॉ. एमिलीबाईंनाच त्यांनी बजावले आहे. परंतु डॉ. एमिलीबाई मात्र कधी त्यांच्यावर रुसून बसल्या नाहीत. त्यांनी टिळकांकडून कितीतरी काम करवून घेतले.

उपासनासंगीत हे सबंध पुस्तक त्यांनी टिळकांकडून, रोज येऊन त्यांच्याजवळ बसून सुधरून घेतले. बालबोध मेव्यात टिळकांची मुलावरची जेवढी कविता प्रसिद्ध झालेली आहे तेवढीचे श्रेय मिस हॅटी ब्रूस (मिसेस कूपर) व डॉ. एमिलीबाई बिसल ह्यांना आहे. ही कविता

स्मृ... २७

पुस्तकरूपाने लोकांपुढे नसल्याने टिळकांनी लिहिलेल्या मुलांवर व मुलांना उपयोगी पडतील अशा कवितेची कोणाला माहितीही नाही. परंतु टिळकांच्या कवितेचे हे एक निराळे ऐश्वर्यवान दालनच आहे.

टिळकांना साप-उंदीर म्हटले म्हणजे मोठी वीरश्री चढत असे. त्यांनी मोठाले साप मारले आहेत; पण उंदीर मात्र बहुतकरून त्यांच्या हातावर तुरी देत. एकदा एक साप उंदीर गिळून वेटोळे घालून बसला होता. टिळकांनी हळूच त्याच्यावर पातेले नेऊन पालथे घातले व भोवताली गोवऱ्या रचून पेटवून दिल्या.

वणीस असताना एकदा एक मोठा साप माडीवर चढून आला. टिळक बसले होते त्यांच्या मागच्या खिडकीतून तो आला. त्यांचा एक विद्यार्थी पुढे बसला होता. त्याने सांगितले, "गुरुजी, फार मोठा साप आला आहे." साप दोन पेट्यांच्या मागे गेला. टिळकांनी दोन बाजूंनी दोन दिवे लावून ठेवले व मध्ये आपण पेटीवर उभे राहून मुसळाने तो साप दाबून धरला व मारला. सवा पुरुष लांबीचा तो साप होता.

असे साप त्यांनी व दत्तूने कितीतरी वेळेला मारले, पण उंदीर मात्र त्यांना सापडत नसत. रात्री कोठे खुट्ट झाले की टिळक जागे व्हायचे; आणि मग झोप येणे फार कठीण होई. हा खुट्ट आवाज बहुतेक उंदराचाच असे. मग काय, साऱ्या घरभर गोंधळ. दिवे लागायचे! काठ्या गोळा व्हायच्या! निजलेली माणसे सारी जागी व्हायची! दारे-खिडक्या बंद व्हायची!

एका दारात मुलगा, एका दारात मुलगी, खिडकीत ठोंबरे, पलीकडे बायको आणि मध्ये टिळक काठीने रपाटे घालताहेत. मी घाबरायची. "अहो, कोणाच्या डोक्यात काठी पडेल.."

ते म्हणायचे, "हो, मला काय वेडच लागले आहे!"

शिकार अगदी रंगात आली व उंदीर दाराजवळ आला की त्यांच्या मुलांनी हळूच दार किलकिले करून त्याला पळवाट करून द्यायची. मग हातातून शिकार निसटलेल्या शिकाऱ्याची जशी स्थिती होते तशी त्यांची व्हायची.

"दत्त्या, तू सोडला उंदीर."

" नाही पपा. तो आता त्या दारात दिसत होता. "

अशा तऱ्हेचा वादविवाद आणि थोडी आदळआपट होऊन मग उरलेली रात्र झालेल्या श्रमाने झोप यायची.

आमच्या फर्ग्युसन गेट कंपाउंडच्या– म्हणजे आमच्या घरांच्या पाठीमागे लगतच गावकूस होते. ही भित थेट प्रत्यक्ष चांदबिबीची ओळख सांगणारी होती व तिच्यातून निजामशाहीचा इतिहास पाहिलेले सर्प बाहेर पडायचे.

एक दिवस माझ्या उशाखाली काहीतरी हलत असल्याचा भास झाला. मी टिळकांना एकसारखी म्हणे, " अहो, माझे डोके कोणी उचलीत आहे. मला काड्याची पेटी द्या पाहू."

पेट्यांचे कोठार टिळकांच्या जवळ असे. ते म्हणत, " गप्प नीज. तू फार भ्रांतिष्ट आहेस. तुझे डोके उचलणार तूच आहेस. " ह्या वादात आम्हाला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी टिळक आपल्या विद्यार्थिगणाला व दत्तूला घेऊन डोंगरगणाला गेले. घरात मी व बेबीच होतो. बेबीला कोणी कडाका खेळायला दिला होता. ती त्याच्याच नादात होती. दुसरे काही काम नसल्याने मी घराची साफसफाई करायला लागले होते.

आम्ही निजत होतो तेथेच पायगती एक पेटी होती व उशाला मोठे पुस्तकाचे कपाट होते. आम्ही जमिनीवरच निजत होतो ती खोली साफ करायला लागले तेव्हा पेटीमागे एक भल्ला मोठा साप! त्याचे तोंड माझ्या पायाच्या अंगठ्याजवळ! मी ती पेटी बाजूस सारली व चुलीजवळ मंजुळाबाईजवळ जाऊन बसले. माझ्या तोंडातून शब्द निघेना. मी आपले डोके दाबून बसले. मोठा साप निघाला आहे असे तिला मी सांगू लागले. तिला वाटले, मी काही गोष्ट सांगते आहे. ती आपली खुशाल हुंकार देत होती.

थोड्या वेळाने टिळक, दत्तू, भास्कर हे डोंगरगणाहून परत आले. त्यांना मी सापाबद्दल सांगू लागले. जे ते मला बेबीचा कडाका दाखवून हसू लागले. मी जीव तोडतोडून सांगतच होते.

तेव्हा टिळक उठले व म्हणाले, " दाखव पाहू तुझा साप कोठे

आहे तो!"

टिळकांच्या मागे दत्तू उठला व त्यांनी दोघांनी तपास चालविला, तो कपाटाच्या मागे तो दत्तूला दिसला. "हा पहा पपा, केवढा मोठा साप!" दत्तू म्हणाला.

मग सर्वच धावपळ सुरू झाली. काठ्या, छत्र्या, दिवे– जे जे सापडेल ते ते घेऊन मंडळी जमा झाली. भास्कर आपला चष्मा सावरीत सर्व मंडळीच्या खांद्यावरून सूचना देत होता. हा साप पुरुषभर लांब होता. तोच रात्री माझ्या उशीखाली असावा.

आमच्या घरी आधीच आनंद व खेळाडूपणा पुष्कळ. त्यात ठोंबरे, दत्तू व त्यांची मित्रमंडळी ह्यांची भर. मग त्या आनंदीआनंदाला काय विचारायला पाहिजे!

सुट्टीचे दिवस असले म्हणजे दत्तू व बेबी घरी यायची. त्यांची मित्रमंडळी जमायची. घरात सारा दिवसभर धुडगूस असायचा. दुपारी जादूचे खेळ होत. संध्याकाळी व्याख्याने होत. प्रेक्षकांनाही काही तोटा नसे. टिळक, टिळकांना भेटायला आलेली मंडळी, मी, मजकडे बसायला आलेल्या बाया, ही सारी प्रेक्षक बनत. मुख्य भाग असायचा दत्तू, ठोंबरे व बेबी ह्यांचा.

प्रेक्षक जमायच्या आधी काय काय करायचे हे ह्यांचे ठरत असे. ठोंबरे व दत्तू व्हायचे जादूगार व प्रयोग व्हायचे बेबीवर. मागे एका प्रकरणात सांगितलेले आमचे दत्तक चिरंजीव हेही त्यात सामील असत. पण ते बाहेर कोणाला ठाऊक नसे. ते बसायचे विरोधकांत आणि शंका-कुशंका काढायचे. मात्र खेळ सुरू झाला म्हणजे त्यांचा विडी ओढण्याचा सपाटा सुरू व्हायचा.

ह्या मंडळीने एक पिशवी शिवली होती. तिच्या आत एक उलटा कप्पा शिवला होता. ह्या पिशवीत टाकलेले जिन्नस उलटचा कप्प्यात पडून ते प्रेक्षकांच्या दृष्टीने नाहीसे होत व जादूगारांना टाळ्या मिळत.

दुसरा खेळ म्हणजे अधांतरी चेंडू नाचविणे. खेळाच्या जागेत उतरते छप्पर होते व त्याच्या दोन कामटचा सहज पुढे आलेल्या होत्या. त्या खालून दिसत नसत, पण त्यांचा स्प्रिंगसारखा उपयोग होई. मुलांनी

चेंडू त्या कामटयांच्या पुढे ठेवून द्यायचा व मागे त्यांपैकी एका कामटीला बारीक दोरी बांधून ती शेजारच्या खोलीत नेली होती. ती ढिली सोडली की टिचकी मारल्याप्रमाणे मागून चेंडूला धक्का मिळायचा व तो खाली पडायचा. प्रेक्षकांच्यापैकी कोणीही चेंडूला खाली पडण्याची आज्ञा केली तरी तो जागा सोडीत नसे, पण ठोंबऱ्यांनी सांगताच तो टुणकन खाली उडी मारून यावयाचा ! मंडळीला अचंबा वाटे.

भास्करराव उजगरे म्हणत, "ही सारी लबाडी आहे. काहीतरी युक्ती आहे."

त्यावर ठोंबऱ्यांनी म्हणावे, "भास्करराव, तुम्ही असे मधोमध उभे रहा. मी तुमच्या चष्म्याची काच बरोबर मधोमध फोडून देतो. अगदी हात लावणार नाही. नुसते मी म्हटल्याबरोबर टचकन दोन चिरा पडतील." अर्थात हा नुसताच धाक असे.

पण भास्करराव म्हणत, "जादूचे खेळ कोणाचे नुकसान करणारे नसावेत. काय करायचे ते तुमच्या चेंडूला नि पिशवीला करा."

आणखी एक गमतीचा खेळ असे तो एखादी मनात ठेवलेली जिन्नस बेबीला ओळखायला लावणे. दत्तू व ठोंबरे तिला ठराविक खुणा करीत. एकदा प्रेक्षकांनी ह्या दोघांनाही बाहेर लावले, तरी बेबीने जिन्नस बरोबर ओळखली. हे आमच्या दत्तक चिरंजिवांचे काम होते.

ठरलेल्या जिनसेला तिचा हात लागताच त्यांनी विडी पेटवायला फर्रकन काडी ओढावी. पण त्या काडीचाही मंडळीला संशय येऊन त्यांची आगपेटी कोणी उचलून ठेवली. तरी जिन्नस बरोबर ओळखला गेला. पण बेबीचा हात ठरलेल्या जिनसेला लागताच चिरंजीवांच्या विडीच्या धुराचा फवारा बाहेर पडे, हे मात्र बेबीवाचून कोणाच्या लक्षात आले नाही.

ठोंबरे मला नेहमी म्हणे, "लक्ष्मीबाई, अहो माझी जादू काही हलकीसलकी नाही. मी जादूने काय पाहिजे ते आणू शकतो. तुम्ही म्हणाल तर आत्ता दत्तोपंतांना नागपूरहून आणून तुमच्यापुढे उभे करतो."

मी म्हणे, "ठाऊक आहे तुझी जादू. उगाच बाता झोकू नकोस."

दत्तूला एकदा कॉलेजला जाऊन आठ-दहा दिवस झाले होते. संध्याकाळी नेहमीप्रमाणे गप्पा मारायला टिळकांकडे मंडळी जमली होती. मुळे, पारनाईक, ठोंबरे हेही आले होते. आधी ठोंबऱ्यांचा धाकटा भाऊ बाबू काही तरी चाचरत चाचरत बोलून गेला होता. मुळ्यांची बहीणही येऊन गेली होती.

ठोंबरे मध्येच उठून बाहेर गेला व परत घाबऱ्या घाबऱ्या आत आला. त्याच्या अंगाचा लटकाप झाला होता. कपाळावर दरदरून घाम आला होता. तोंडाने 'मो मो मो मो ठा सा सा सा सा साप फुस फुस करतो' असे तो बोलत होता. मी म्हटले, "तुला कंदील घेऊन जायला काय होते ? असाच धांदल्या तू !"

ठोंबरे घाबरलेले पाहून टिळकांनी आपली बंदूक उचलली. राहुरीच्या घरासाठी ही बंदूक घेतली होती. तिचा उपयोग कधीच होत नसे. वाडीत नेहमीच साप निघत, पण आजची शिकार फारच मोठी होती. कंदील, काठ्या, छत्र्या, केरसुण्या वगैरे आयुधे घेऊन आम्ही सर्व ठोंबऱ्याच्या मागे निघालो.

हा गोंधळ पाहून शेजारीपाजारी धावून आले. वीस-पंचवीस माणसांचा घोळका हळूहळू पावले टाकीत पायखान्याकडे चालला. टिळक म्हणाले " कोठे आहे साप ?"

ठोंबरे म्हणाला, " मधल्या पायखान्यात."

पायखाना खडबड वाजू लागला. पत्र्याचे पायखाने होते.

सापाच्या चळवळीने पायखाना वाजू लागलेला पाहून काही मंडळी एकमेकांना बिलगली, काही मागे सरू लागली. टिळकांनी आपली बंदूक उचलली. इतक्यात खाडकन दरवाजा उघडला व आतून दत्तू बाहेर आला.

ठोंबरे म्हणाला, " लक्ष्मीबाई, काढले की नाही दत्तोपंतांना जादूने बाहेर ?"

" चल ! चावट कुठला ! आंता बंदूक उडून भलतेच झाले असते ते !"

" अहो लक्ष्मीबाई, आम्ही भलतेच होऊ दिले कसे असते ?"

खूप हशा पिकला व रात्री बारा वाजले. सारी मंडळी घरोघर जायला निघाली.

दत्तू कॉलेजला गेला खरा, पण तेथे प्लेगमुळे कॉलेज गेल्यावरोबर बंद झाले. त्याने आपल्या मित्रमंडळीला कळविले होते व अशी काही गंमत करण्याचे त्यांचे आधीच ठरले होते.

संध्याकाळी तो आला तसाच मुळचांकडे सामानासह गेला. तेथे जेवण वगैरे उरकून घरी येऊन जादूने त्याला बाहेर काढण्याचे ठरले. पण हे बाबू ठोंबऱ्याच्या पोटात राहिले नाही. तो आमच्याकडे आला व काही अडखळत अडखळत बोलला. "आज चांगला स्वैंपाक करा. भाऊ येतील."

मीच विचारले, "कशावरून रे?"

"ते नाही मला माहीत. पण मला वाटते."

इतका प्रताप करून तो तिकडे मुलांत गेला, तेव्हा ठोंबऱ्यांनी आपल्या भावाने केलेला प्रताप ओळखला. "बाब्या, टिळकांच्या घरी गेला होतास ना? कशाला रे गेला होतास?"

नंतर मुळचांच्या बहिणीला त्यांनी शोध घेऊन येण्यास सांगितले. तिने सांगितले, की टिळकांच्या घरी दत्तोपंत येणार असल्याचा संशय आलेला दिसत नाही. तरी पण बाबूरावांच्या शहाणपणामुळे आपल्याला पूर्ण गंमत करता येणार नाही. म्हणून दत्तूला जादूने बाहेर काढण्याचा बेत आयत्या वेळी बदलून वरील सापाची बतावणी करण्यात आली.

## ७० : बालकवी ठोंबऱ्यांच्या आठवणी

आमच्या घरी असताना ठोंबरे नेहमी आनंदी, खेळाडू, आशावादी असा असावयाचा. पण नगर सोडून गेल्यावर त्याची ही वृत्ती नेहमी

बदले. पुन्हा परत आल्यावर त्याची बालवृत्तीही परतायची. बाहेर जायचा म्हणजे खानदेशात नाही तर पुण्याला. पुढे पुढे कामानिमित्त तो महाबळेश्वरला जाऊ लागला. पण त्या वेळपर्यंत त्याची वृत्ती स्थिर झाली होती. तो महाबळेश्वरला जाऊ लागला तेव्हा ही आंदोली वृत्ती राहिली नव्हती.

एक दिवस खानदेशातून आल्यानंतर आल्याबरोबर त्याने माझ्याशी भांडायला सुरुवात केली,

"तुम्ही सर्वजण माझ्यावर प्रेम का करता ह्याचे मला कारण सांगा."

"मला नाही तुझे बोलणे कळत !"

"ते नाहीच कळणार. कारण त्यात तसेच गूढ आहे."

"ठोंबरे, मला तुझे गूढबीढ काही कळत नाही. कोणी प्रेम कर म्हणून करीत नाही. नको करू म्हटल्याने थांबत नाही."

"नाही. त्या प्रेमाच्या बुडाशी दुसराच हेतू आहे."

"कोणता बाबा हेतू ? मला तर काहीच दिसत नाही."

"नाही ना ? नाही ना ? मग तुम्ही मला दूध का प्यायला देता ?"

"ठोंबरे, मला बाबा तुझे बोलणे काही कळत नाही !"

"कळते. हे सारे मी ख्रिस्ती व्हावे म्हणून चालले आहे !"

"ठोंबरे, तू ख्रिस्ती झालास तर मला आनंदच होईल. कारण मी ख्रिस्ती आहे व ख्रिस्ती झाल्याने आत्मिक उन्नती होते, असा माझा भरंवसा आहे. पण तेवढ्यासाठी मी किंवा टिळक तुजवर प्रेम करतो असे म्हणणे मात्र चुकीचे आहे. कारण प्रेम कोणत्या हेतूने करायचे म्हटले तर ते प्रेमच नाही. ते नाटक झाले. व तुझ्यासाठी ज्या खस्ता आम्ही खाल्ल्या व खातो ते नाटक आहे असे तुलाच वाटत असेल तर गोष्ट निराळी. वाटते का तुला हे सगळे नाटक आहे म्हणून ? कोणी तुझ्या मनांत हे वेड भरवून दिले ?"

ठोंबरे शांत झाला, व पहिल्याप्रमाणे वागू लागला. ह्या वेळेस ठोंबऱ्यांबरोबर त्यांचा धाकटा भाऊ बाबू आला होता. तोही शाळेत जाऊ लागला. दोघेही खाणावळीत जात व आमच्याकडे राहत. हे आले

तेव्हा टिळक घरी नव्हते. माझी पाठ फार दुखत होती व पाठीवर ओढा घातला होता. तो ओढा फार तडतडू लागला व मला त्रास होऊ लागला.

दुसऱ्या दिवशी पहाटे मी मंजुळाबाईला हाक मारून सांगितले. " पहा, ह्याने मला किती त्रास दिला आहे ! पाणी तापीव." ती गेली. शेजारच्या खोलीत ठोंबरे व बाबू निजले होते. ठोंबरे आला व जोरजोराने दाराला धक्के देऊ लागला. मी दार उघडले. तो माझ्यापुढे कमरेवर हात ठेवून उभा राहिला.

" सांगा मी काय त्रास दिला तुम्हाला ?"

" कशाचा बाबा त्रास ? कोण म्हणते त्रास दिला ?"

" तुम्ही म्हणता !"

" मी ? आणि कुणाला म्हणाले ?"

" कुणाला ? मवाळ मंजुळाबाईला."

" तिने सांगितले तुला ?"

" सांगायला कशाला पाहिजे ? मी– मी माझ्या ह्या कानाने ऐकले."

" काय ऐकलेस ?"

" ह्याने मला किती त्रास दिला आहे !"

" हे पहा ठोंबरे, नीट ऐकत जा आणि मग भांडत जा. हा पहा, माझ्या पाठीवर ओढा दिला आहे. मी मंजुळाबाईला सांगितले, की ह्याने मला फार त्रास दिला आहे, पाणी तापव. मी येथेच आहे. आपले बोलणे मंजुळाबाईला ठाऊक नाही. तू जा. परस्पर मागील दारी जाऊन तिला विचार."

ठोंबरे चटकन मंजुळाबाईकडे गेले. तेथे मी सांगितले, तेच बाहेर आले. तेव्हा ते जे इतके जहाल झाले होते ते चटकन मवाळ झाले.

आमच्याकडे मंजुळाबाई नावाच्या दोन बाया एकाच वेळेस कामाला होत्या व त्या पुष्कळ वर्षे कामाला होत्या. जहाल-मवाळ पक्ष त्या वेळेस प्रसिद्ध होते. त्यावरून आमच्या मुलांनी ह्या बायांना जहाल मंजुळाबाई व मवाळ मंजुळाबाई अशी नावे ठेवली होती. वर त्यांपैकी मवाळ मंजुळाबाईचा उल्लेख आहे.

तिची आठवण जन्मभर राहील अशी मजजवळ आहे. एक दिवस त्याच दिवसांत तिच्या मुलीचा खून करून कोणी तिची खांडे खांडे करून विहिरीत टाकली, अशी बातमी तिला येऊन सांगितली. ती ऐकताच तिने गळा काढला व मी जवळच होते तो मला धसका बसून तरुणपणातच माझी मान हलायला लागली ती अजून हलतेच आहे. तिचे मात्र रडे ताबडतोब थांबले. कारण तिची मुलगी जिवंत असून ती लगेच आईला भेटायलादेखील आली.

एकदा ठोंबरे असेच पुण्याहून आले होते. आमच्या माजघरात दोरीचा झोका बांधला होता. त्यावर ते येऊन बसले. मी येथेच स्वैंपाकणींना काही सांगत होते. ठोंबरे झोक्यावर बसून झोक्याला पीळ देत होते. पीळ बसला म्हणजे त्यांच्यासह झोका गरगर फिरे. पीळ निघे व पुन्हा पीळ बसू लागे. अशाच पिळाचे त्यांचे भाषण होते.

" कुऱ्हाडीचा दांडा मुळाला गोता !"

" म्हणजे रे काय ?"

" म्हणजे दांडा असतो तो झाडालाच, पण तो कुऱ्हाडीत असला म्हणजे त्याने झाडाची मुळेदेखील तोडता येतात."

" म्हणजे काय ?"

" म्हणजे तुम्ही."

जसा त्या हिंदोळ्याला पीळ बसला होता तसाच ठोंबऱ्याच्या मनालाही बसलेला होता. मी म्हटले,

" ठोंबरे, तुझ्या मताने आम्ही दांडा, नाही का ?"

" होय. अलबत."

" आणि मुळे तुम्ही ना ? आणि कुऱ्हाड रे बाबा ? ती तुमची रूढी ! तिची आम्ही पायमल्ली केली. तुम्हाला ती कशी सहन होणार ?"

पण मी बोलत होते ते माझ्या स्वभावाप्रमाणे सारे हसत हसत. तो तो त्याचा संताप अधिकाधिक वाढत होता. तो म्हणे, " मी इतका रागावतो आणि तुम्हाला त्याचे काहीच कसे नाही ? तुम्ही हसता ?"

मी म्हटले, " अरे बाबा, तो झोका आहे ना – तू जितका त्याला पीळ देतो आहेस तितका तो बसतो आहे. तो उकलणेही तुझ्याच हातात आहे. माझ्या मनात काही पीळ नाही म्हणून मी हसते आहे. तू पीळ उकल म्हणजे तूही हसायला लागशील."

ठोंबरे आम्हाला आमच्या मुलाइतका प्रिय वाटायचा व त्यालाही आमच्याबद्दल तेच प्रेम वाटायचे. पुढे पुढे त्याने शाळा सोडली व तो पंडिताचे म्हणजे युरोपियन लोकांना मराठी शिकविण्याचे काम करू लागला. त्यामुळे त्याला कधी पुण्याला तर कधी नगरला राहावे लागे. उन्हाळ्यात तो नेहमी महाबळेश्वरला जाऊ लागला.

एका उन्हाळ्यात जेव्हा तो प्रथमच महाबळेश्वरला गेला तेव्हा त्याच्याबरोबर दत्तू व बेबी होती. त्यांनी तिघांनी मिळून एकच घर घेतले होते व ते तेथे हातांनी स्वयंपाक करून राहत. त्या तीन महिन्यांत त्यांनी तिघांनी मिळून सारे महाबळेश्वर पालथे घातले. प्रतापगडला पायरस्त्याने गेले. तेथे दऱ्याखोऱ्यांत बसून कविता म्हटल्या. ठोंबऱ्यांची निःश्वास कविता येथेच १९१३ साली लिहिली गेली व तेथे त्यांनी ती दऱ्याखोऱ्यांत बसून म्हटली म्हणजे तिला एक अपूर्वत्व येत असे, असे पोरे सांगत.

ठोंबरे जे पैसे मिळवी ते मजजवळ ठेवी. एकदा नगरास असताना मी त्या पैशातून थोडे थोडे मागे टाकून पन्नास रुपये साचविले. पण मध्येच टिळकांच्या काही खर्चिकपणामुळे मला हे पन्नास रुपये भर घालून तो खड्डा बुजवावा लागला होता. टिळकांना कर्ज करण्याची चिंता असे व मला ते फेडण्याची असे. मी ठोंबऱ्यांना म्हटले,

" ठोंबरे, मी तुझे पन्नास रुपये साचवले आहेत. ते मी खर्च करू का ? मला कर्ज फेडायला ते हवे आहेत. "

" खुशाल खर्च करा. "

" मी ते परत कधी करीन हे सांगता येत नाही. देईन हे मात्र नक्की. आणि मी जर मेलेबिले तर दत्तूजवळून घे. आणि तुला जर ते फार निकडीने हवे असले तर मला निदान एक महिना आधी कळीव. मी त्याची तजवीज करीन."

" आता तर तुम्ही ते घ्या. मग परत कसे घ्यावयाचे ते पाहू."

ह्यानंतर ठोंबरे पुण्यास गेले. थोडया दिवसांनी पुण्याहून बाबू आला व पैसे मागू लागला. " मला खानदेशला जायचे आहे व मला आत्ताच्या आत्ता पैसे पाहिजेत."

मी म्हटले, " टिळक घरी नाहीत. पगार झाला नाही. पगार झाला की पैसे पाठवून देईन."

पण बाबू ऐकेना. तो म्हणे, " मला अमृतरावांनी पाठविले आहे व लौकर पैसे घेऊन यायला सांगितले आहे."

मी म्हणे, " बाबू, मजजवळ पैसे असते तर मी ठेविले असते का?" ह्यावर बाबू रागारागाने निघून गेला.

बाबू सकाळी आला होता तो दुपारी गेला. संध्याकाळच्या गाडीने ठोंबरे आला. तो साऱ्या वाटेने रडतच आला. दत्तू फिरायला चालला होता. त्याला ठोंबरे खाली मान घालून स्टेशनच्या रस्त्याने पायी येत असताना दिसला तसा दत्तूही परत फिरला.

ठोंबऱ्याला पाहताच मी म्हणाले, " ठोंबरे, मी पैसे टिळक आल्याबरोबर पाठवून देईन."

ठोंबरे स्फुंदत स्फुंदत म्हणाला, " लक्ष्मीबाई, मी ह्या बाबूला पैसे आणायला पाठविलेच नव्हते. मला नकळत हे कारभार त्याने केले. मी तुमची समजूत करायला आलो आहे. मला हे समजल्यावर पुण्यास एक क्षणभर राहवेना. मला पैशाची मुळीच अडचण नाही."

ठोंबऱ्याला बाबूच्या ह्या वागण्याने फारच वाईट वाटले होते.

पुढे टिळक आल्यावर आम्ही ते पैसे ताबडतोब मनीऑर्डर करून पाठविले. ठोंबऱ्यांची आई फारच गोड स्वभावाची बाई होती. ठोंबऱ्यांचा स्वभाव आपल्या आईसारखाच होता म्हटले तरी चालेल. तिचा साधा सरळ निष्कपट स्वभाव पाहिला की ठोंबऱ्यांची आठवण होई व ठोंबऱ्यांना पाहिले की तिची आठवण होई. ठोंबरे ज्याप्रमाणे आमची सर्व मंडळी आपलीच समजे तशीच त्याची आईही समजे.

ती मला म्हणे, " लक्ष्मीबाई, तुम्ही होतात म्हणून नाना आम्हाला दिसला. तुम्हीच त्याची आई आहा."

पुण्याला ही मंडळी गेली तेव्हा त्यांची सारी चीजवस्तू, दाग-दागिने त्यांनी मजजवळ ठेवले होते. कारण तेथून महाबळेश्वरला जाऊन पुन्हा नगरला यायचे होते. पण ह्या गडबडीत ठुशी कोठे गेली हे कळेना. पुढे कळले की ती अमृतरावांच्या बायकोबरोबर गेली होती. पण मला काही कोणी कळविले नाही. मी आपली काळजीतच होते. ठोंबरे पत्र लिहिण्याच्या बाबतीत फारच आळशी होता. ठुशीबद्दल चार पत्रे टाकली तरी त्याचे उत्तर नाही.

शेवटी महाबळेश्वरला दत्तूने त्याला एक जोडकार्ड पाठविले. त्याच्या कार्डावर मोठ्या अक्षरात "ठुशी ?" असा प्रश्नचिन्हांकित एकच शब्द लिहिला व उत्तराच्या कार्डात एकाखाली एक "सापडली, हरवली" असे दोन शब्द लिहिले होते व खाली ताजा कलम होता की, एक शब्द खोडून कार्ड पोस्टात टाकणे.

ही मात्रा अगदी बरोबर लागू पडून ताबडतोब ठोंबऱ्यांचे एक लांबलचक पत्र आले. "ठुशी हरवली" हा शब्द खोडून "ठुशी सापडली" असल्याची बातमी दत्तूच्या जोडकार्डाने आधीच एक दिवस आणली होती.

ठोंबरे स्वतःच्या कविता जितक्या प्रेमळपणाने म्हणत तितक्याच दुसऱ्यांच्या म्हणत. त्यांना एखादी कविता आवडली म्हणजे तिच्या बाबतीत त्यांना आपपरभाव कधी वाटत नसे व त्यांच्या कवित्वाची हीच खरी मजा होती. काही काही कवी असे असतात, की दुसऱ्याची कविता म्हटली की त्यांच्या नाकाला मुरड पडते.

ठोंबऱ्यांना टिळकांची कविता फार आवडे, व वनवासी फूल तर ते इतके उत्तम समजून सांगत, की त्याची मजा प्रत्यक्ष ते त्यांच्या तोंडून ऐकले असेल त्यांनाच सांगता येईल. एकदा टिळकांच्या वर्गाला त्यांनी वनवासी फूल शिकविले व विद्यार्थ्यांत खुद्द टिळक बसले होते. प्रवृत्ती व निवृत्ती ह्या दोन मार्गांविषयी ठोंबऱ्यांचे भाषण ऐकून टिळक इतके खूष झाले की त्यांचे व्याख्यान संपताच ठोंबऱ्यांना त्यांनी पोटाशी धरले.

एकदा टिळक फिरतीवर गेले होते. दत्तू कॉलेजात व बेबी पुण्याला होती. ठोंबऱ्यांना भेटला कोणी ज्योतिषी. त्याने त्यांना सांगितले की, तुम्ही अपघाताने मरणार व ते आजच मरणार ! तो आला तो थेट चुली-

पाशी येऊन बसला.

" लक्ष्मीबाई, मला ज्योतिष्याने आज अपघाताने मी मरणार असे सांगितले आहे. "

" अरे, ज्योतिषी लबाड असतात. काहीतरी सांगतात झाले. तू आता कोठे बाहेर जाऊच नकोस. "

" पण मला गेलेच पाहिजे. ते भविष्य खोटे कसे ठरणार ? "

भविष्य खरे करण्याचा जेव्हा बेत बाहेर पडला तेव्हा मी माझे हातातले काम तसेच टाकून दिले व त्याच्याजवळ बसून राहिले. दत्तूच्या मित्रमंडळीला बोलावून आणले व त्यांना आमच्या घरीच निजायला या म्हणून सांगितले. दोन रुपयांची मिठाई आणून ती सारी रात्र काही करमणूक, काही गाणे, काही गप्पा ह्यांत जागून घालविली व तो दिवस व ती रात्र टळेपर्यंत ठोंबऱ्यांना दृष्टीपुढून हालू दिले नाही. भविष्य त्या वेळेस खोटे ठरले, पण पुढे पाच वर्षांनी खरे ठरले.

आमच्या घरी नाना प्रकारची माणसे आली आणि गेली– पण ठोंबऱ्यांसारखे कोणीच नव्हते. तो मधूनमधून भांडे तरी त्याच्यात कपट नव्हते, द्वेष नव्हता, स्वार्थ नव्हता. तो प्रेमळ, मनमिळाऊ, आनंदी, थट्टेखोर आणि थोडासा खोडकरही होता. निदान आमच्या घरी त्याचे बाळपण कायम राहिले होते.

तो आला म्हणजे नेहमी काहीतरी गमती व्हायच्या. दंगामस्ती, झाडावर चढणे, घरावर उड्या मारणे, भांडणे, कागद घरभर करणे, कविता लिहिणे, त्या वाचून दाखविणे, त्या कोणी मन लावून ऐकल्या नाहीत तर चिडून फाडून टाकणे, पुन्हा हसणे, गोष्टी लिहिणे, त्या वाचून दाखविणे, दुसऱ्यांच्या कविता आपल्या कवितांइतक्याच उत्साहाने म्हणणे, काही गमतीच्या कविता असल्या म्हणजे त्यांची टर उडविणे, घरात सभा भरविणे, जादूचे खेळ करणे, भास्कररावांच्या चष्म्यावर डोळा ठेवणे, माझ्या लिहिण्याची चेष्टा करणे, रात्री अंगणात निजले म्हणजे चांदण्यांची मोजदाद करणे, त्या वाटून घेणे, वाटणी बरोबर झाली नाही म्हणजे भांडणे, घरात पसारा करून ठेवणे, मी रागावले म्हणजे तो आवरू लागणे, टिळकांच्या पुढे गंभीर तोंड करून बसणे...वगैरे

कितीतरी बारीकसारीक गोष्टी डोळ्यांपुढे उभ्या राहतात व मन उद्विग्न होते.

**ये आता घे शेवटचे हे**
**अश्रू दोन पिऊन**
**पाखरा येशील का परतून ?**

## ७१ : देवाचा दरबार

नगरास कॉंग्रिगेशनल चर्च आहे. आम्ही ह्याच चर्चचे सभासद आहो. जे ख्रिस्ती उपासक ख्रिस्ताला मात्र चर्चचा एकटाच खरा अधिपती समजून सिद्धान्तासंबंधाने किंवा चर्चच्या नियमासंबंधाने कोणत्याही एका विशेष व्यक्तीचा अगर अनेक व्यक्तींच्या बनलेल्या विशेष संस्थेचा अधिकार मानीत नाहीत; परंतु हे अधिकार प्रत्येक स्थानिक चर्चच्या स्वाधीन असावे असे समजतात असे लोक कॉंग्रिगेशन्यालिस्ट.

ह्या शब्दाला मराठी प्रतिशब्द दोन-तीन सुचविण्यात आले. टिळकांनी एका व्याख्यानात 'ख्रिस्ताचा दरबार' असे मराठी प्रतिरूप सुचविले. कारण दरबार ह्या शब्दात राजा आणि त्याचे लोक असा बोध होतो. म्हणून ख्रिस्ताचा दरबार म्हणताक्षणीच ख्रिस्तावाचून जेथे राजा किंवा अधिकारी नाही, व त्याच्या अनुज्ञेने जेथे त्याचेच लोक सर्व कामे पाहत आहेत अशी संस्था, हा बोध होतो.

त्याचे असेही म्हणणे होते, की दुर्दैवाने चर्च हा शब्द ऐक्यापेक्षा विग्रहाचाच अधिक व्यंजक झाला असून त्याच्या योगाने मानवी अधिकार, कार्यापेक्षा संस्थेचा आणि कायद्याचा अधिक बडेजाव, इत्यादी अनिष्टे ध्वनित होतात तशी 'दरबार' ह्या शब्दाने होत नाहीत, म्हणून 'ख्रिस्ताचा दरबार' हे शब्द वापरण्यास कोणती हरकत आहे ?

ह्या वर्षी टिळकांच्या अंतःकरणात मोठी खळबळ उडून राहिली

होती असे दिसते. त्यांनी 'कीर्तनकलाप' लिहिण्यास सुरुवात केली होती. मजकडून ती पाठ करवून घेऊन कीर्तन कसे करावे ह्याची मला ते संथा देत होते. माझ्यामागे माणसेही जमविली होती. तसेच भजनाचा प्रचार व्हावा म्हणून त्यांनी ह्याच वर्षी आपली सुप्रसिद्ध अभंगांजली लिहिण्यास सुरुवात केली. भजन, कीर्तन व पुराण ह्या त्रैंनी ख्रिस्ती धर्माचा परकीयपणा अगदी काढून टाकता येईल, अशी त्यांची पूर्ण खात्री होती. अभंगांजलीसंबंधी ते म्हणतात–

"भजन, कीर्तन, प्रवचन किंवा पुराण यांचे धर्मोपासनेत व धर्म-प्रचारात निदान या देशात तरी केवढे महत्त्व आहे हे आम्ही आपल्या ख्रिस्ती बंधुभगिनींच्या लक्षात वारंवार आणून दिले आहे. आम्ही अत्यानंदपूर्वक ईश्वराचे उपकार मानतो, की ख्रिस्तविलीन रे. हॅरी बिसल यांनी प्रथमतः हातांत चिपळ्या घेऊन भजनाचा प्रचार पाडल्यापासून केवळ सात-आठ वर्षांच्या अवधीत महाराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांत शेकडो भजनी मेळे होऊन त्यांच्या योगाने त्यांच्यामधली भक्तिमत्ता एकसारखी उद्दीप्त होत आहे. तथापि या मेळ्याच्या हाती जुन्या-नव्या मिळून दोन-अडीचशे भजनपर पद्यांवाचून काही नाही. ही अडचण अंशतः तरी दूर व्हावी म्हणून आम्ही ज्ञानोदयातून जसा कीर्तनकलाप तशीच अभंगाञ्जली प्रसिद्ध करू लागलो आहो. यांचा उपयोग करणारे पुष्कळ आहेत. त्यांचे आम्ही उपकार मानतो."

देवाचा दरबार म्हणून त्यांनी ह्याच वर्षी एक चळवळ काढली. हिचा उगम ह्या व्याख्यानात व त्यांच्या मनात ह्या वर्षी उडालेल्या खळबळीत असावा. ह्या खळबळीची तयारी वीस वर्षे चालली होती हे त्यांच्या निरनिराळ्या काव्यांवरून व उद्गारांवरून दाखविता येणे शक्य आहे. परंतु ह्या वर्षी ह्या सर्व कल्पना केंद्रित झाल्या असे म्हणण्यास हरकत नाही. कीर्तनकलाप, अभंगांजली व ह्यांच्याबरोबर आपले ख्रिस्तायन पुरे करावयाचे, असे टिळकांनी ठरविले.

ही झाली काव्याची बाजू. परंतु त्यांच्या स्वभावाला एवढे पुरेसे खाद्य नव्हते. त्यांचे विचार केवळ कागदावरच पडून राहणारे नव्हते, त्यामुळे देवाच्या दरबाराला सुरुवात झाली. नगरास त्यांना पुष्कळ

दरबारी मिळाले. त्यांनी निराळी दरबार गीते रचली. ही दरबारी मंडळी बहुतेक नव्या पिढीतली होती. प. वा. डॉ. हिरालाल गायकवाड, रा. चिंतामणराव गायकवाड, रा. हिवाळे, रा. रामभाऊ धर्माधिकारी वगैरेंनी आपले भजनाचे काम फार उत्साहाने चालविले. टिळकांनी दरबारचा संकल्प छापून काढला व साऱ्या महाराष्ट्रातील ख्रिस्ती लोकांत ही चळवळ सुरू केली. टिळकांनी प्रसिद्ध केलेली योजना खाली दिली आहे.

## देवाचा दरबार

**१ नाव**– प्रभू येशू ख्रिस्त मनुष्याच्या अंतःकरणात व तदनुषंगाने मनुष्याच्या जगात स्वाराज्य स्थापीत आहे. स्वाराज्य म्हणजे "स्वर्गाचे राज्य", "देवाचे राज्य". हे स्वाराज्य किंवा देवाचे राज्य ज्यांच्या अंतःकरणात स्थापित झाले त्यांच्या संघाचे नाव देवाचा दरबार.

**२ हेतू**– ख्रिस्ती मिशनांचा, चर्चांचा, इतर ख्रिस्ती संस्थांचा अगदी विरोध न करिता, बाप्तिस्मा पावलेल्या किंवा न पावलेल्या ख्रिस्तशिष्यांना प्रेमाच्या व सेवेच्या अनुबंधांनी संयुक्त करून त्यांचा बंधुवर्ग करावा, त्यांच्या अंतःकरणात आपला पिता ईश्वर आहे म्हणून मनुष्यमात्राचे आपण बंधू किंवा भगिनी असून 'मनुष्याचा पुत्र' जो प्रभू येशू ख्रिस्त आपला गुरू, त्याने जशी खांबाला खिळला गेला तरी मनुष्याची प्रेमपुरस्सर सेवा केली तशीच आपण करावी, व त्या 'देवाच्या पुत्रा'चे खरे बंधू व भगिनी ठरावे, ही उत्कंठा अद्भुत व्हावी. त्यांनी खरे खरे जगन्मित्र, खरे खरे स्वदेशभक्त ठरावे. हा बंधुवर्ग म्हणजे खरे खरे विश्वकुटुंब व्हावे, याच्यामधून जगाला पुन्हा प्रभू येशू ख्रिस्त पाहायाला सापडावा, याच्या योगाने मूळचा पौरस्त्य ख्रिस्त पुन्हा पौरस्त्य ठरावा. ख्रिस्ती प्रेम, ख्रिस्ती स्वातंत्र्य, मनुष्याला त्याच्या परिस्थितीचा स्वामी करणारे ख्रिस्ती सामर्थ्य, इत्यादी जगाच्या प्रत्ययास यावे. ख्रिश्चिअॅनिटीचा परकेपणा जाऊन ती होत होत पूर्णपणे हिंदी व्हावी. आमच्या ख्रिस्ती लोकांना आम्ही सांभाळू व आमचेच ठेवू, असा बाणा

स्मृ... २८

बाळगण्याची सद्बुद्धी आपल्या देशबंधूंच्या ठायी जेणेकरून उत्पन्न होईल, असे या बंधुवर्गाचे शील बनावे, अशा स्वरूपाचे या संस्थेचे हेतू आहेत.

**३ दरबारी–** सरकारी कायद्याप्रमाणे वयात आलेल्या ज्या पुरुषाला किंवा स्त्रीला शेवटी दिलेला संकल्प मान्य आहे व ज्याची किंवा जिची दोन दरबाऱ्यांनी शिफारस केली आहे त्याला किंवा तिला वडील सेवकाची संमती असेल तर संकल्पपत्रिकेवर सही करून किंवा लिहिता येत नसेल तर अंगठ्याची निशाणी करून देवाच्या दरबाराचा दरबारी होता येते, मग त्या पुरुषाचा किंवा स्त्रीचा बाप्तिस्मा झालेला असो वा नसो.

**अपवाद (अ)–** मनुष्याला एखादे विशिष्ट पाप केल्याबद्दल जर त्याच्या चर्चने बहिष्कृत केले असेल, किंवा सरकारने गुन्हेगार ठरवून दंडावाचून शिक्षा केली असेल, तर त्याला देवाच्या दरबाराचा दरबारी होता येत नाही. त्याला दरबाराचा संकल्प मान्य असेल तर अनुक्रमे त्याच्या चर्चच्या व सरकारच्या सल्ल्याने त्याला देवाच्या दरबाराचा आश्रित करून घेता येईल. अशा मनुष्याला दरबाराचा आश्रित करून घेण्याला सरकारी कायदा आड येत नसेल, तर तोच सरकारचा सल्ला समजावा.

**अपवाद (ब)–** देवाच्या दरबाराच्या संकल्पाची सारी कलमे ज्याला मान्य नाहीत त्याला दरबारी होता येत नाही. त्याची इच्छा असल्यास व दरबाराच्या वडील सेवकाची संमती असल्यास त्याला आश्रित होता येईल.

**आश्रित–** आश्रिताला मत देण्याचा अधिकार नाही.

**४ आश्रयदाता–** दरबारी किंवा आश्रित नसून दरबारचे अभीष्ट चिंतिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दरबाराचा आश्रयदाता समजण्यात येईल.

**५ स्थानिक दरबार–** एखाद्या गावी पाच किंवा त्याहून अधिक दरबारी असतील, तर त्यांनी ईश्वरोपासनेकरिता व जनसेवेकरिता

सोईप्रमाणे आपला एक किंवा अधिक संघ स्थापावे. या संघांची ते वाटेल ती नावे ठेवोत, हे सारे स्थानिक दरबार आहेत. या दरबाराचा बिन-पगारी किंवा पगारी सेवक असावा. त्याने कोणती कामे करावी व त्याला विशेष अधिकार असावा किंवा मुळीच नसावा, हे स्थानिक दरबारने ठरवावे. स्थानिक दरबार हा तो जेथला असेल तेथल्या सर्व चर्चांचा, इतर कायदेशीर, लोकोपयोगी संस्थांचा व आपल्या गावाची सेवा करणारा आहे, तसाच तो प्रभू येशू ख्रिस्ताचा प्रतिनिधी असून स्वाराज्याचा– देवाच्या राज्याचा– प्रचार करणारा आहे. स्थानिक दरबार म्हणजे चर्च नव्हे. सर्व चर्चांचा संग्रह करणारे ' देवाचे राज्य–स्वाराज्य ' स्थानिक दरबार संघशः व व्यक्तिशः देवाच्या दरबाराचा दरबारी आहे. एखाद्या ठिकाणी बरेच दरबारी असून त्यांना काही कारणांमुळे स्थानिक दरबार स्थापिता येत नसला तरी ते व्यक्तिशः देवाच्या दरबाराचे दरबारी आहेत. देवाचा दरबार व स्थानिक दरबार कोणत्याही ख्रिस्ती संस्थेची व कायदेशीर अशा इतर लोकोपयोगी संस्थांची सेवा करणारे असल्यामुळे यांचा कोणताही विरोध करणार नाही. कोणी केलाच, तर याचे ब्रीद ' बऱ्याने वाईटाला जिंक ' हेच असले पाहिजे.

६ **स्वाराज्यप्रचारक–** म्हणजे जगाला स्वाराज्याची– देवाच्या राज्याची व देवाच्या दरबारची ओळख पटवून देणारे दरबारचे खास उपदेशक. या उपदेशकांची निवड करणारा देव आहे. ज्याला उपदेशाकरिता कोठूनही पगार न घेता, अंशतः आपल्या हातांनी काम करून व अंशतः आपली ख्रिस्ती व ख्रिस्तीतर बंधुभगिनी स्वतःच्या प्रेरणेप्रमाणे जे देतील ते घेऊन आपला चरितार्थ चालवावयाचा आहे. ज्याला संन्यास वृत्तीला साजेल अशीच राहणी प्रिय आहे, ज्याने ख्रिस्ताला असे वचन दिले आहे की–

१ मी तुझ्यासारखा दरिद्री राहीन.

२ तुझ्यासारखी सेवा करीन.

३ तुझ्यासारखा निर्वैर असेन.

४ तुझ्यासारखा खांबाला खिळला जाण्याला सिद्ध राहीन.

५ तुझ्यासारखा देवाच्या इच्छेची परिपूर्ती करायला झटेन.

६ तुझ्यासारखे मनुष्यमात्रावर प्रेम करीन.

७ मी श्रद्धेच्या बलाने तुझ्या समीप असेन, तुझे-माझे जग एक करीन, तुझे-माझे रूप सारखे व्हावे म्हणून झटेन व शेवटी तुझ्याशी युक्त होऊन 'तुम्ही मेला आहा, व तुमचे जीवित ख्रिस्तासह देवाचे ठायी प्रच्छन्न आहे' हे साधुवर्य पौल यांचे म्हणणे स्वानुभवाने खरे करीन.

असा पुरुष किंवा स्त्री देवाच्या दरबारचे स्वाराज्यप्रचारक होतील. यांच्याकरिता प्रार्थना करणे व यांना साह्य करणे हे प्रत्येक दरबारीचे कर्तव्य आहे.

**७ दरबारचे आदिपीठ किंवा संस्थान–** देवाच्या दरबारचे आद्यप्रवर्तक किंवा वडील सेवक यांचे नेहमी राहण्याचे ठिकाण. येथे पुढे दिलेली कामे होतील–

१ सर्व दरबारींच्या व आश्रितांच्या नावाची नोंद ठेवण्यात येईल.

२ स्थानिक दरबाराशी व व्यक्तिशः कोणत्याही दरबाराशी पत्र-व्यवहार करण्यात येईल.

३ स्वाराज्यप्रचारकांच्या शिक्षणाची व कामाची व्यवस्था लावण्यात येईल.

४ देवाच्या दरबारासंबंधी वाङ्मय तयार करवून प्रसिद्ध करण्यात येईल.

५ दरबारासंबंधी प्रश्नांचा विचार होईल.

स्थानिक दरबाराचे सेवक हे वडील सेवकाचे सल्लागार होत.

**८ वडील सेवक–** देवाच्या दरबाराचा आद्यप्रवर्तक हाच अर्थात त्याचा पहिला वडील सेवक असून ह्याला सध्या असलेल्या दरबारी लोकांनी वडील सेवक म्हणून मान्य केला आहे.

## देवाच्या दरबाराचा संकल्प

जसा बाप लेकराकडून त्याला सर्वस्वी साह्य करून कार्य करवून घेतो, त्याप्रमाणे तू हे ईश्वरा बापा, मज दुर्बलाकडून तुझ्या नावाने मी संकल्प करीत आहे ते पुरे करून घे.

१) मी प्रभू येशू ख्रिस्ताला आपला गुरू केला आहे. यास्तव मी त्याच्या चरित्राचे, शीलाचे, हेतूंचे आणि उपदेशांचे मनन करीन.

२) हे मनन योग्य रीतीने करिता यावे म्हणून मी बायबलचा व या विषयावरील इतर ग्रंथांचा नित्यनेमाने अभ्यास करीन (१ पेत्रस २:२).

३) प्रभू येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना म्हणत आहे, की मी तुमचे जीवन आहे; तरी मी त्याला आपले जीवन समजून त्याला घेऊन विचार करीन व त्याला घेऊन सारी कामे करीन (योहान्न १५ : ४).

४) मी आपल्या दिनचर्येच्या आरंभी, मध्ये व अंती म्हणजे सकाळी, दुपारी व रात्री निजायाला जाण्यापूर्वी एकच पवित्र, प्रेमस्वरूप माझा पिता जो परमेश्वर, त्याची प्रार्थना करीन

(मात्थी ७ : ७ ८).

५) मी देवाच्या दरबारात प्रत्येक दरबाऱ्याला आपला बंधू किंवा भगिनी समजेन. त्याचे किंवा तिचे निरंतर अभीष्ट चिंतीन, संकटाच्या समयी त्यांचे साह्य करीन, ती दु:खी असता त्यांचे सांत्वन करीन, त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मान देईन, त्यांची जी अब्रू ती माझी, असे समजेन. सारांश, देवाच्या दरबाराच्या दरबाऱ्यांचे बंधुप्रेम पाहून जगाने आश्चर्यभरित होऊन देवाचे गौरव करावे हेच माझे यापुढे ब्रीद असेल. (मात्थी १२:४७–५०, योहान्न १७:२१).

६) मी राहतो त्या ठिकाणी आणखी एक किंवा अधिक दरबारी असतील, तर त्यांच्याबरोबर उरलेल्या दिवशी ठरलेल्या वेळेस आठवड्यातून एकदा ईश्वरोपासनेला हजर राहीन व उपासना करीन.

७) माझा गुरू जसा स्वतःला ' देवाचा पुत्र ' म्हणत आहे तसाच ' मनुष्याचा पुत्र 'ही म्हणत आहे व मनुष्याच्या सेवेवाचून देवसेवा पुरी होत नाही, असे मला शिकवीत आहे. म्हणून मी नियमाने मनुष्याची कोणती तरी निष्काम सेवा करीन.

८) मी ईश्वराची प्रार्थना करून तो बुद्धी देईल त्याप्रमाणे दरबाराच्या सर्व जबाबदाऱ्या स्वतःच्या समजून दरबाराला नित्यनैमित्तिक रीतीने द्रव्यदान करीन.

९) मी दर बारा महिन्यांच्या अवकाशात निदान एक तरी नवा

दरबारी मिळवून देईन.

खिस्तायनाश्रम, नारायण वामन टिळक,
सातारा, एस. एम. सी. वडील सेवक
देवाचा दरबार

देवाच्या दरबाराला सुरुवात झाली. पुष्कळ सभासद मिळू लागले, परंतु त्यास विरोधही फार होऊ लागला. कोणतीही नवीन गोष्ट आली म्हणजे तिच्याकडे संशयी दृष्टीने पाहण्याचा मनुष्यस्वभावच आहे.

ह्याच परिस्थितीत खिस्तायन लिहिण्यास शांतपणा मिळावा म्हणून त्यांनी आपले नगरचे बिऱ्हाड हलवून साताऱ्यास नेण्याचे निश्चित केले.

## ७२ : सातारा

१९१६ साली रूथ इंटर पास झाली. तिचा रिझल्ट लागल्यावर आठ दिवसांनी दत्तू बी. ए. झाल्याची तार आली. बी. ए. झाल्याबरोबर दत्तूला नगराच्या मिशन हायस्कुलात मास्तरचे काम लागले. मुलगा पगार मिळवता झाला म्हणून मलाही आनंद वाटला. पण नगरात त्याने तीन-चार महिनेच काम केले. त्याच्या मनात फार होते की आपण एम. ए. व्हावे. त्याप्रमाणे आपल्या पोटापुरती व फी-पुस्तकांपुरती व्यवस्था झाली तर नागपुरास जाण्याची त्याची धडपड होती. तिला यश येऊन तो नागपूरला गेला. तेथे त्याला हॉस्टेलमध्ये राहायला एक फुकट खोली व त्यावर देखरेख करण्याच्या कामासाठी १५ रुपये महिना असे त्याच्या बेतापुरते काम मिळाले. शिवाय एक शिकवणी मिळाली. त्याने तेथे जाऊन एम. ए. व एलएल. बी. च्या वर्गात नावे घातली.

इकडे टिळकांच्या वृत्तीत अधिकाधिक बदल होऊ लागला व तो

अगदी झपाटयाने होऊ लागला. अगदी बाळपणापासून त्यांच्या मनाची एकसारखी तळमळ व धडपड चाललेली असे. आपण आहो ते व तसे असता उपयोगी नाही. काहीतरी अधिक चांगले व्हावे अशी शेवटल्या घटकेपर्यंत त्यांची इच्छा असे; व शेवटी त्यांच्यातील मोठमोठाल्या दुर्गुणांवर त्यांनी जय मिळविला. मनुष्याचा स्वभाव तरुणपणात पूर्णपणे जो बनायचा असतो तो बनतो असे म्हणतात. परंतु टिळकांच्या बाबतीत तरी ते खोटे ठरले. कारण त्यांची वाढ अगदी शेवटपर्यंत होत चालली होती.

दत्तू नागपूरला गेल्यानंतर थोडयाच दिवसांत टिळकांनी आपली बदली साताऱ्याला करून घेतली. कित्येक वर्षांपूर्वी सुरू केलेले महाकाव्य ख्रिस्तायन हे कोठेतरी बसून पुरे करावे, असे त्यांच्या मनात फार होते; पण जन्म-स्वभावाप्रमाणे त्यांना कधी स्वस्थ बसून ते काम उरकता आले नाही. नगरास ते इतक्या लोकांना माहीत होते. व शिवाय ते नगरास आहेत हेही इतक्या लोकांना माहीत होते की घरी भेटायला येणाऱ्या माणसांची संख्या फार वाढू लागली होती. व ह्यांच्याशी एखाद्या आवडत्या विषयावर वादविवाद सुरू झाला की मग तासच्या तास निर्चितीच व्हायची.

तेव्हा एखाद्या शांत स्थली जाऊन ख्रिस्तायन पुरे करण्याचे ठरले. डॉ. ह्यूमसाहेब होता होईल तितके त्यांना संभाळून घेत. त्यांनी तावडतोब सातारला आपल्या मुलीला लिहून तेथे आमची व्यवस्था केली. तेथला एक मोठा बंगला आम्हाला राहण्यास मिळाला. ह्या बंगल्याचे नाव टिळकांनी ख्रिस्तायनाश्रम असे ठेवून तेथे जाताच एक पाटी करवून ती त्या बंगल्यावर ठोकून दिली.

साताऱ्यास आम्ही पोचलो तेव्हा डॉ. ह्यूमच्या कन्या मिसेस ली ह्यांनी आमचे स्वागत केले. त्या दिवशी आम्ही सारी त्यांच्याकडे राहिलो. त्यांचे पती मिस्टर ली नुकतेच वारले होते. त्यांची दोन गोजिरवाणी मुले व त्या, इतकीच माणसे त्यांच्या घरी होती.

दुसऱ्या दिवशी आम्ही आपल्या बंगल्यात राहायला गेलो. राहणी दरवेशाचीच होती; पण ती मोठ्या थोरल्या बंगल्यात होती एवढेच.

कोठे सामान नाही, सुमान नाही. सारे चक्क गोसाव्याच्या मठीप्रमाणे. बारा द्वारे मोकळी. कोणी यावे, कोणी जावे, अशी व्यवस्था होती. आमच्याबरोबर दत्तूच्या भावी पत्नीचा आतेभाऊ बेंजी होता. रामभाऊ धर्माधिकाऱ्यांची चिकी होती. चिकीची आई वारल्यापासून ती आमच्याच घरी वाढली होती.

मी म्हणे, "बंगल्यात कशाला राहायला पाहिजे? बंगल्यात राहायचे म्हणजे सोबतीचा प्रश्न आहे. बेंजी काही नेहमी राहणार नाही. बंगला हा असा वस्तीपासून दूर!"

ते म्हणत, "करायची काय सोबत? चिकी आहे, टॉमी आहे." चिकी बिचारी आठ-नऊ वर्षांची होती. टॉमी कुत्रा होता.

पण टिळकांची पुण्याई मोठी. येथे आल्यावर टिळकांना ख्रिस्तायन लिहिण्यास म्हणून डॉ. ह्यूमसाहेबांनी एक कारकून पाठविला. टिळक आता ख्रिस्तायनाचे काम करीत होते, शिवाय ज्ञानोदयाचे काम तर १९१२ पासून ते फुकटच करीत होते. तेव्हा टिळकांना कामाचा बोजा पडू नये म्हणून ज्ञानोदयाच्या कामात हातभार लावायला व ख्रिस्तायनाच्या नकला करायला ह्या गृहस्थाची योजना झाली. ह्यांचे कुटुंब चांगले होते. दोन मुलांपैकी एक गवई होता. त्याच्याकडून टिळकांनी मला सा री ग मचे पाठ देण्यास सुरुवात केली. कधी कधी तेही धडे घेण्यास बसत. कारण पुढेमागे कीर्तन करीत हिंडण्याचा आमचा बेत होता.

आमच्या कीर्तनात साहाय्य करण्यासाठी टिळकांनी मुंबईहून मिस मिलार्ड ह्यांच्या आंधळ्यांच्या शाळेतून लिंबाजी नावाचा एक आंधळा तरुण बोलाविला होता. तो आंधळा, त्याची बायको एक डोळ्याची. पण चार डोळ्यांऐवजी ह्या एकाच डोळ्यात त्यांची प्रेमामुळे फार चांगली गुजराण होत होती. आम्ही त्याला दहा रुपये व घर दिले होते. पण आता परवा मी ऐकले की त्याला दहा रुपयांच्या ठिकाणी आता चाळीस रुपये पगार मिळतो व एक डोळ्याच्या जागी त्याच्या घरात आता नऊ डोळे आहेत!

वांबोरीस एक गरीब ख्रिस्ती मनुष्य होता. त्याचे नाव रामभाऊ

ससाणे. ह्याला साहाय्य म्हणून टिळक कित्येक वर्षे दरमहा दोन रुपये पाठवीत असत. पण सातारच्या ह्या गडबडीत दोन महिने पैसे पाठवायचे राहून गेले होते. शिवाय आता पैसेही नव्हते म्हटले तरी शोभले असते.

आम्ही साताऱ्यास पोचल्यावर एक-दोन आठवड्यांतच ससाण्यांची स्वारी आपले गाठोडे व काठी सावरीत सावरीत बंगल्यात शिरली.

"सलाम साहेब !"

"ससाणे ? तुम्ही कसे आला ?"

"आगगाडीने !"

"का आलात ?"

"पैशासाठी."

"अहो ससाणे, दोन दिडक्यांत मला पत्र आले नसते का ?"

"म्हटलं आठवण राहते न राहते. म्हटले जावे झाले स्वतःच."

"अहो, ते खरे. पण खर्च किती झाला ह्याची काही कल्पना ?"

"नाही म्हटले, आपण ते द्यालच ! मी उसने आणले ते पैसे."

"वा ससाणे ! मोठा शहाणपणा केलात ! आता उशीर झाला तर असे येऊ नका. आलात तर मी पैसे बंद करीन."

असे म्हणून त्याचे जाता-येताचे भाडे दहा रुपये व मागच्या दोन महिन्यांचे चार रुपये असे चौदा रुपये, त्या म्हाताऱ्याला देऊन वाटेला लावले. दहा रुपयांचा धडा घेतला. मग मात्र शेवटपर्यंत टिळक कधी ते दोन रुपये पाठवायला विसरले नाहीत.

टिळकांनी साताऱ्याला आल्यावर कंपाऊंडमध्ये बाग लावण्यास सुरुवात केली. मी त्यात काही मन घालीत नसे म्हणून ते माझ्यावर संतापत. मी म्हणे," आजपर्यंत इतके वेळा बाग लावली ती तुम्ही कोठेच टिकू दिली नाही. आता मी काही बाग लावायला तयार नाही."

तेव्हा ते आपले एकटेच पाणी घालून बागेची जोपासना करीत. काय असेल ते असो, पण माझे मनच होईना बागबगीचा करायला. एरवी मी किती हौशी ! पण तेथे ते काही जमेना.

ख्रिस्तायन लिहायला म्हणून टिळक साताऱ्यास आले, पण येथे

आल्यावर त्यांचे ते काव्य पुन्हा मागे पडले. मी म्हणे, " अहो, तुम्ही मुद्दाम ख्रिस्तायन लिहायला सातारला आला आणि येथे काही लिहीत नाही."

ते म्हणत, " तुला काय समजते आहे त्यात ? हे काम स्फूर्तीचे आहे. करा काव्य म्हटल्याने काव्य होत असते का ?"

आणि त्यांना इतर कामे का थोडी होती ? देवाचा दरबार होता व त्याच्या जोडीला डेक्कनरयत समाज नावाचा एक समाज त्यांनी व कोठारी वगैरेंनी नुकताच सुरू केला होता. प्रांतिक कार्यकारी मंडळात त्यांचे नाव पहिले होते, व ह्या डेक्कनरयत समाजाच्या निमित्ताने त्याचे एकसारखे पुण्याला जाणे-येणे सुरू होते. विशेषतः ख्रिस्ती लोकांत देवाचा दरबार व ख्रिस्तीतर मागासलेल्या लोकांत डेक्कनरयत समाज ह्या दोन्हींमध्ये ख्रिस्तायनाची ओढाताण सुरू झाली होती.

## ७३ : संन्यास

परंतु सातान्यास आलो तरी टिळकांची फिरती कमी झाली नव्हती. मात्र ह्या फिरतीत फार महत्त्वाचे प्रसंग घडून आले. मद्रास इलाख्यात दिंदिगल येथे त्यांना आमंत्रण आल्यावरून तेथील ख्रिस्ती लोकांना त्यांनी जाऊन व्याख्याने दिली. महाराष्ट्रात ख्रिस्ती लोकांत दिसून न येणारी एक विचित्र गोष्ट टिळकांच्या पाहण्यात आली– हे लोक ख्रिस्ती होताना स्पृश्यास्पृश्यतेचे गाठोडे झटकून न टाकता तसेच आपल्या ते उराशी बाळगून त्यांनी आपल्याबरोबर आणले आहे. काही लोक चर्चमध्ये आत बसत तर काही अस्पृश्य ख्रिस्ती (?) लोक बाहेर बसत !

टिळकांच्या वृत्तीला हे सहन होणे शक्य नव्हते. एक दिवस ते आले ते बाहेरच्या लोकांत जाऊन बसले. आतल्या मंडळींकडे ढुकून

पाहीनात. बाहेरच त्यांनी बोलण्यास सुरुवात केली. तेव्हा आतल्या मंडळीला लाज वाटून एक-एक बाहेर येऊन बसू लागला. टिळकांनी नंतर तेथे असा नियमच केला, की असा भेदभाव ज्या ठिकाणी असेल तेथे आपण बोलणार नाही. व त्याचा इतका चांगला परिणाम झाला की त्यांना त्या फेरीत कधी भेदभाव दिसून आला नाही.

ह्याच सुमाराला राहुरीस ख्रिस्ती व्यवसायी मंडळाचे संमेलन होते त्यात टिळकांना आमंत्रण असून तेथे ते गेले होते.

जवळजवळ ख्रिस्ती झाल्यापासूनच आपण मिशनचे पगारी नोकर राहू नये असे त्यांना वाटे. मागे एक-दोन वेळेस त्यांनी पगार घेण्याचे थांबविले व मिशनचे पूर्वी होते तेच काम विनावेतन केले. परंतु आता त्यांना एक फार मोठे व निराळे कार्य अंगावर घ्यायचे होते व घेण्यासाठी पूर्वतयारी म्हणजे मिशनची नोकरी सोडून देणे. राहुरीहून १ सप्टेंबर १९१७ रोजी त्यांनी हे पत्र प्रसिद्ध केले–

**विज्ञापन**

शनिवार १ सप्टेंबर १९१७

" माझ्या देशाप्रीत्यर्थ, ख्रिस्ताच्या दरबाराप्रीत्यर्थ, स्वतःप्रीत्यर्थ मला यापुढे प्रेम आणि सेवा यांचे अनुबंध शिवाय करून अन्य रीतीने कोणत्याही मानवी संस्थेचा बांधलेला राहता येत नाही. माझा यापुढे सर्व हेतुस्तव सारा संबंध ख्रिस्ताशी व शुभवर्तमानाशी मात्र असला पाहिजे. म्हणून देवाच्या वाणीला मान देऊन मी आजपासून मिशनचा किंवा दुसऱ्या कोणत्याही मानवी संस्थेचा आश्रित किंवा वेतन घेऊन काम करणारा चाकर नाही. मी एक ख्रिस्ती संन्यासी म्हणजे विरागाच्या नव्हे– तर अनुरागाच्या मागे जाणारा संन्यासी आहे. मला आजपासून देव जो आत्मा तो सांगेल तसा होण्याचे व तो सांगेल ते करण्याचे प्रयत्न करायचे आहेत.

ज्यांचे ख्रिस्तावर, हिंदिस्तानावर, मजवर प्रेम आहे, त्यांनी आपणा सर्वांचा पिता जो परमेश्वर त्याच्या दयासनासमोर मजकरिता मध्यस्थी करावी, हे साह्य मी मागत आहे.

नारायण वामन टिळक."

ह्याखाली ' काही गोष्टींचा खुलासा ' दिलेला आहे तो असा–
१ माझा निश्चय प्रसिद्ध करण्याची कारणे तीन आहेत.

(अ) मला पुन्हा माणसांवर अवलंबून राहण्याचा मोह झालाच तर हे प्रसिद्धीकरण माझ्यापुढे उभे राहील व मला पुष्कळ अंशी आवरून धरील.

(ब) माझे उदाहरण पाहून हिंदी ख्रिस्ती समाजात जे लोक असेच करायाला पाहत असतील त्यांना उत्तेजन येईल.

(क) हा निश्चय तडीस जायाला मला पुष्कळांच्या प्रार्थनांची गरज आहे.

२ मी करीत आहे या कामाचे काय होणार ?

(अ) अमेरिकन मराठी मिशन मला प्रत्यक्ष माझ्या आईच्या ठिकाणी झालेले आहे. माझ्या मनात कृतज्ञतेचा नुसता लवलेश जरी असेल, तरी मी माझ्या मातृतुल्य मिशनला अडचणीत पाडणार नाही. यापुढे मला याचा पगार मात्र नको. याचें प्रेम, सहानुभूती, प्रार्थना हे सारे पाहिजे आहे. मी याची जी कामे करीत आहे ती अशीच करीत राहणार. माझ्या ह्या नवीन स्थित्यंतरांतसुद्धा मला याचे साह्य पाहिजे आहे, आणि ते होणार आहे.

(ब) मी ' जनसेवा ही ईश्वरसेवा ! ' समजणारा मनुष्य आहे, एवढ्यावरून माझ्या शुभवर्तमानाच्या सेवेविषयींच्या समजुतीत कोणकोणत्या कामाचा समावेश होतो हे लक्षात येण्यासारखे आहे.

ना. वा. टिळक

टिळकांनी पगार घेणे सोडले. एक प्रकारचा संन्यास घेतला. ते अंगात कफनी घालू लागले. त्यांच्या दोनच कफन्या असत व त्या ते स्वतः हातांनी धूत. घरातसुद्धा आता चाकरनोकर कोणी नव्हते. अगदी चूल-पोतेऱ्यापासून ते स्वतः करीत.

"तुम्ही संन्यास घेतला म्हणजे कुटुंबाचा त्याग केला काय ?" असा त्यांना एका ख्रिस्ती गृहस्थांनी प्रश्न केला. ह्यांनाही टिळकांप्रमाणे आपण लोकसेवा करावी असे वाटत होते, परंतु त्यांच्यावर कुटुंबभरणाचा मोठा बोजा होता. टिळकांनी ह्यांना जे उत्तर पाठविले ते व आपल्या झोळी-संबंधी जे त्याचे म्हणणे होते ते त्यांनी प्रसिद्ध केले होते ते खाली दिले आहे.

## एक मननीय पत्र

जयख्रिस्त वि. वि. आपले पत्र येऊन बरेच दिवस झाले. त्याबद्दल उपकार मानतो. त्याचे उत्तर देताना जर मजकडून एखादा शब्द, एखादे वाक्य, एखादे विधान आपणास अप्रियच वाटण्यासारखे माझ्या लेखणीतून बाहेर पडले, तर त्याबद्दल मला क्षमा करावी.

ख्रिस्ती संन्यास म्हणजे पत्नीचा त्याग नव्हे. तिचे आपणावर व आपले तिच्यावर निष्काम प्रेम असणे, परस्परांनी परस्पराला इहलोकीच प्रभू ख्रिस्ताच्या इच्छेप्रमाणे व उपदेशाप्रमाणे स्वर्गात नेऊन अधिष्ठित करणे. आपल्या सामर्थ्याच्या बाहेर आपल्या कुटुंबाची वाढ होणे ही भयंकर आपत्ती होय. हिला मी भयंकर म्हणतो याचे कारण ही प्रत्यक्ष मातापितरांकडून स्वतःच्या संततीच्या शरीराचा, मनाचा आत्म्याचा नाश करविणारी आपत्ती होय. फाजील संतती ही ईश्वराची देणगी नव्हे. ईश्वराचे संदेश जगाला देणारा साधुवर्य पौलस इंद्रियदमनाची गणना पवित्र आत्म्याच्या फळांमध्ये करीत आहे. (गलती ५:२२, २३) याचा अर्थ इतकाच, की देवाचा आत्मा—पवित्र आत्मा—देव जो आत्मा तोच पतिपत्नीला इंद्रियदमन करून असा असे सांगत आहे, म्हणजे तुम्हाला तुमच्या आवाक्याच्या बाहेर संतती होऊ नये असे म्हणत आहे. ख्रिस्ती संन्यास पतीला आपल्या पत्नीचा त्याग कर असे सांगत नाही. या बाबतीत "जे देवाने जोडिले ते माणसांनी तोडू नये" अशी प्रभूची स्पष्ट आज्ञा आहे.

सारांश, जर आपल्या कुटुंबाचा आजचाच आटोक्याबाहेर झालेला विस्तार आणखी अधिक व्हावयाचा असेल तर आपण मजप्रमाणे संन्यास न घेता घरातल्या घरातच देवाचे साह्य घेऊन क्रमाक्रमाने किंवा एकदम आपल्या पत्नीविषयक प्रेमाशी संबद्ध असलेल्या कामाचा त्याग करा. हा

पहिला संन्यास होय. हा पूर्णपणे व्हायला पती व पत्नी या उभयतांचे सहकारित्व पाहिजे. आपण उभयता देवाच्या चिंतनात, प्रार्थनेत, जितकी जितकी अधिक निमग्न व्हाल तितका तितका आपणांस हा संन्यास सुलभ होईल.

आपण इतपत संन्यास घेतला तरी आपण गृहत्याग करू नये. आपले काम किंवा वेतन सोडू नये. आपले कुटुंब मोठे आहे. आपण आपल्याच संततीला अन्नान्नदशेला लावाल तर ते महापाप होय. देव आपल्या भक्तांचा योगक्षेम चालवितो. त्यांनी त्याबद्दल चिंता करू नये, या अर्थाचे आदेश व उपदेश पवित्र शास्त्रात पुष्कळ ठिकाणी सापडतील. पण त्यांपैकी एकाचाही अर्थ अजून जगाला कळावा तसा कळत नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे या सर्वांचा खरा सारांश "कामकरी मजुरीस योग्य आहे," हा ख्रिस्ताच्या एका वचनात आला आहे. प्रभू आपल्या शिष्यांना संग्रह करू देत नाही, पोटासाठी कोणाची चाकरी करू देत नाही, आपल्या कार्यांची परंपरा सोडून इतर धंदा करू देत नाही, "तुम्ही स्वाराज्य जवळ आले आहे, अशी घोषणा करीत संचार करा, रोग्यांना निरोगी करा, महाव्याधिग्रस्तांना स्वच्छ करा, मृतांना उठवा, भुते काढा, तुम्हाला फुकट मिळाले आहे– तुम्ही फुकट द्या," ही आज्ञा देऊन जगात पाठवीत आहे; तरी तो त्यांना म्हणत आहे की "कामकरी मजुरीला योग्य आहे!"

या कामकऱ्यांची मजुरी देणारा याचा मालक कोण? अर्थात प्रभू. पण तो ही मजुरी कोणाकडून देवविणार? ज्याचे हे मजूर काम करतील त्या जगाकडून! किती? कामाच्या महत्त्वाप्रमाणे. यावरून आपल्या लक्षात येईल, की नुसते ईश्वरचिंतन करून नव्हे, ते जो तो स्वतःच्या अध्यात्मलाभासाठी करीत असतो. तर जगाची सेवा करणाऱ्या ख्रिस्ती संन्याशाने जगापुढे आपल्या मजुरीकरिता झोळी पसरणे ही भिक्षावृत्ती नव्हे. "भिक्षापात्र अवलंबिणे! जळो जिणे लाजीरवाणे!" ख्रिस्ती संन्यासी ते कदापि करणार नाही.

मी झोळी घेतली आहे, कारण मी हिंदिस्तानची सेवा करायला तयार आहे. मला माझ्या सेवेची मजुरी पाहिजे आहे, ती माझ्या

सेवेपुरती पाहिजे आहे. माझ्या कुटुंबाकडे पाहून त्याची दया येते म्हणून कोणी माझ्यापुढे लाख रुपये ठेविले, तरी मला ते नको आहेत. माझ्या सेवेची किंमत जगाने माझ्या एकट्याच्याच पोटापुरती ठरविली, तर मी उपाशी राहून ते अन्न आपल्या कुटुंबापुढे ठेवीन.

जर ती अशी दहा कुटुंबे पोसण्याइतकी ठरली, तर मीही आपल्या कुटुंबाच्या पंक्तीला बसून दोन घास खाईन, व बाकी उरेल ते जगाचे जगाला परत देईन. आपल्या देशाच्यामागे आता २१ वर्षे लागलेला प्लेग आपणास भयंकर वाटतो, पण त्यापेक्षा भयंकर अशी एक साथ या देशाच्या मागे निरंतर लागलेली आहे. या साथीचे नाव भिक्षांदेही ! हिचा घरबसल्या अगर चोहोंकडे हिंडून प्रसार करणे हाच आपला धर्म, वडिलोपार्जित धंदा असे समजणारे लोक ह्या देशात असंख्य आहेत. यात आणखी ख्रिस्ती संन्याशांची भर पडायला नको.

तथापि पौलसाने ज्याप्रमाणे आपल्या हातांनी काम करून स्वतःचा व स्वतःबरोबर शुभवर्तमानाची सेवा करणारांचा चरितार्थ चालविला, (प्रे. कृ. २०:३३–३५) त्याप्रमाणे आपल्या वैद्यकीच्या धंद्यावर आणि तोही आपल्या देवसेवेच्या व देशसेवेच्या आड येणार नाही इतपतच करून जर आपणांस आपला व आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविता येईल, तर आपण खुशाल वेतन सोडून स्वतंत्र व्हावे.

पुढे दिलेल्या स्थलांचा विचार करा :–

१. कलस्सै. ३:३– याचा ज्याला अनुभव आला आहे,

२. प्रे. कृ. २:४– याप्रमाणे जो संपन्न झाला आहे,

३. रोम. ८:३५–३९– इतकी ज्याची ख्रिस्ताशी मैत्री आहे,

४. फिलिप्पै. १:२१– या योगाची ज्याला नित्य प्रचीती आहे,

५. मात्थी ५:११, १२– ही ज्याची धन्यता आहे,

६. मात्थी २५:३४–४०– याप्रमाणे ज्याला मनुष्यमात्र देवाचा प्रतिनिधी दिसत आहे.

७. १ करिंथ. १३– येथपर्यंत ज्याचे प्रेम जाऊन पोहोचले आहे,

८. १ करिंथ. ११:१– इतका ज्याला अधिकार प्राप्त झाला आहे त्याला मात्र हा संन्यास साध्य आहे. आपण करीत आहा तेच

काम करीत राहा व शास्त्रवाचन, मनन, प्रार्थना, सेवा यांचा आश्रय करून देव काय सांगतो याची वाट पाहा. माझा अगर कोणत्याही माणसाचा सल्ला घेत बसू नका. हा सल्ला घेणे हेच आपण अजून देवावर नव्हे, तर माणसावर अवलंबून आहात याचे चिन्ह आहे.

आणखी एक लक्षात ठेवा. " ज्याला हे घेववेल तोच हे घेवो, " (मात्थी १९–२०) ही ख्रिस्ताची सूचना नुसती ब्रह्मचर्यापुरतीच नसून, असल्या कोणत्याही महात्यागाला लागू आहे. शिवाय १ करिंथ. १२:४–२० या भागाचा नीट विचार केला, तर दिसून येईल, की ज्यांना असले महात्याग करवत नाहीत ते ज्यांनी हे केले आहेत त्यांच्याहून किमपि कमी नाहीत. आपण आपल्या आहे त्याच स्थितीत आपल्या असेल तितक्याच सामर्थ्याचा व साधनांचा देवाप्रीत्यर्थ व मनुष्यांप्रीत्यर्थ उपयोग केला म्हणजे पुरे. मग आपली योग्यता व आपला उपभोग हे महात्याग करणाऱ्यांच्यापेक्षा कमी नाहीत.

आपण आणखी दोन प्रश्न केले आहेत, त्यांची उत्तरे मी देत नाही. कारण ही उत्तरे दे अशी ख्रिस्ताची मला आज्ञा नसून, ही देण्याने आपल्या मनाचेही समाधान होणार नाही. तथापि या प्रश्नासंबंधाने आपणांस माझा एकच अनुभव सांगून मी हे पत्र पुरे करितो. आपण किंवा दुसरे कित्येक लोक ज्याला माझा अस्थिरपणा म्हणतात ते मी ईश्वरी कृपादान समजून त्याबद्दल त्याचे किती वेळा तरी उपकार मानिले आहेत !

अधिकोत्तराबद्दल पुन्हा एकदा आपली क्षमा मागून मी आपली रजा घेतो.

आपला नम्र सेवक.
नारायण वामन टिळक,

* * *

## विज्ञापन

" कामकऱ्याला त्याचे अन्न मिळावे हे वाजवी आहे, " (मात्थी १०:१०) हे अन्न देणारा देव आहे, आणि हे तो कामकऱ्याने ज्यांचे काम केले त्यांच्याकडून देववितो (मात्थी १०:११–१४).

यास्तव खाली सही करणारा ख्रिस्ती व ख्रिस्तीवर बंधुभगिनींस याप्रमाणे सविनय सूचना करीत आहे.

१. मी ज्यांची सेवा करीन, त्यांच्यापुढे मला गरज असल्यास आपली झोळी करीन. तीत देवाच्या प्रेरणेने ते जे टाकतील त्याचा मी देवाचे व त्यांचे उपकार मानून स्वीकार करीन. माझ्या गरजेपेक्षा हे दान अधिक भरल्यास बहुतकरून मी त्याचा तेथल्या तेथेच जनसेवे-प्रीत्यर्थ उपयोग करीन.

उदाहरणार्थ, मी नुकताच एके ठिकाणी गेलो असता निरनिराळ्या पाच जनसंघांकरिता माझी व्याख्याने झाली; या पाचही प्रसंगी मला आपली झोळी पुढे करण्याचा हक्क होता. पण तेथे असतानाच देवाने अन्य मार्गाने माझ्या गरजा भागविल्या. म्हणून पुन्हा गरज लागेपर्यंत मला या हक्काचा उपयोग करणे न्याय्य वाटले नाही, व मी तो केला नाही.

२. या वृत्तीला मी भिक्षा समजत नाही. मला भिक्षा मागायची नाही. किंवा भिक्षुकीला उत्तेजन द्यावयाचे नाही. मी संन्यासी आहे. मी ख्रिस्ती संन्यासी असल्यामुळे मला आपल्या कुटुंबाला हे पूर्वजन्मीचे लागेबांधे म्हणून दूर करता येत नाही. " स्वर्गात लग्न करून देत नाहीत आणि घेत नाहीत " ही प्रभूची उक्ती येथेच खरी झालेली अनुभविणारी आम्ही नवराबायको येथे आहोत तोपावेतो एकत्रच राहणार. मुलेही तशीच, यामुळे माझी नाही तर माझ्या कुटुंबाची दया येऊन मला काही पाठवू नये. आधी आपले किंवा आपल्यातर्फे दुसऱ्या कोणाचे काम सांगावे. ते मी केले तर झोळीत जे टाकावेसे वाटते ते टाकावे. उगीच कोणी काही दिल्यास ते मी घेणार नाही. कारण " कामकऱ्याला त्याचे अन्न मिळावे हे योग्य आहे."

नारायण वामन टिळक.

स्मृ... २९

सातारला जाऊन दहा महिने झाले नाहीत तोंच टिळकांनी काम सोडले. ते सोडण्याचा निश्चय जाहीर करण्यासाठी ज्या डाकेने त्यांनी ज्ञानोदयाकडे पाठविला त्याच डाकेने दत्तूकडे रवाना झाला. दत्तूची प्रीव्हियस एम. ए. ची परीक्षा तोंडाशी आलेली आणि त्यातच ही बातमी त्याला जाऊन पोचली.

त्याने ताबडतोब वडलांना पत्र लिहिले की आपण काम सोडू नका असे मी म्हणत नाही– पण मी येतो आहे तेथपर्यंत हे प्रसिद्ध करू नका.

वडलांची तार गेली की, मी पुण्यास रा. कोठारींकडे भेटेन. तेथे ये. दत्तू तेथे गेला तो त्याला कळले की बातमी प्रसिद्धही झाली ! अर्थात त्याला काय बोलायचे होते ते तेवढ्यावरच राहिले.

त्याचे म्हणणे एवढेच होते, की बेबीची काय व्यवस्था करायची ती करून, मागचा-पुढचा विचार व व्यवस्था करून मग काम सोडावे. पण आता तो प्रश्नच राहिला नव्हता. आता एम. ए. ही राहिली; कारण आता आपल्याला संसाराकडे पाहावे लागणार हे त्याने ओळखले. मात्र पुढे काय करायचे हे त्याने ठरवून टाकले. मुंबईस येऊन इकडच्या एलएल. बी. च्या टर्म्स भरायच्या असे त्याने ठरविले. पण टिळक ऐकेनात.

ते म्हणत, " वकिलीच्या धंद्यात माझ्या मुलाने पडावे असे मला मुळीच वाटत नाही. दुसरा कोणताही धंदा तू कर."

" दुसरा कोणता करता येईल ? डॉक्टर तर आता होता येणे शक्य नाही. राहता राहिला मास्तरचा धंदा. तो करतो पाहिजे तर."

शेवटी मुंबईस जाऊन मास्तरकी मिळवावी व उरल्या वेळेस एल-एल. बी. च्या टर्म्स भराव्या असे ठरले व तो मुंबईस काम शोधायला

गेला.

त्याला कामही चटकन लागले व भायखळ्याच्या मिशन हायस्कूलमध्ये तो मास्तर झाला! ह्या गडबडीत प्रीव्हियस एम. ए. मध्ये दत्तू नापास झाला व पुढे मुंबई युनिव्हर्सिटीत एकदोनदा प्रयत्न केला असता येथे त्याला परीक्षेला बसण्याची परवानगी न मिळाल्याने एम. ए. ची आशा आजिबात सोडून द्यावी लागली.

पुण्याहून टिळक नगरला जाऊन आले. कल्याणीची एक पारडी सोनी तेवढी राहिली होती ती येताना ते विकून आले. पन्नास रुपयांना विकली असे म्हणाले. मला काय, सोनी गेली एवढे खरे. विकली असो वा दिली असो– ते पैसे काही हाती आले नाहीत.

येताना नाम्या नावाचा एक टोणगा मात्र घेऊन आले. नाम्या अत्यंत भोळा, बोबडा व कामसू होता. कामाचा कंटाळा असा त्याला नसे. त्याला जेवून-खाऊन एक रुपया पगार व कपडे ही बोली होती. टिळक नाम्यावर आपला वेळ खर्च करू लागले. त्याला ते रोज प्रभूच्या प्रार्थनेच्या संथा देत. त्यांनी म्हणावे, "हे आमच्या आकाशातील बापा–" तर त्याने हटकून म्हणावे, "हे माझ्या आईच्या बापा". पण टिळकांनी कधी कंटाळून त्याला शिकवण्याचे सोडले नाही.

एकदा आमच्याकडे बॅरिस्टर आठवले व त्यांच्या पत्नी सौ. मीनाबाई पाहुणी आली होती. नाम्याने मला विचारले, "हे कोण आहेत?"

मी सांगितले, "ही माझी मुलगी आहे व ते जावई."

"जावयाला कोण कोण आहेत?" नाम्याने पुन्हा विचारले.

"त्यांना एक भाऊ आहे." मी म्हटले.

"ते काय कलतात?"

नाम्या बोबडा बोलत असे.

मी म्हटले, "त्यांनाच विचार जा."

नाम्या हातात केरसुणी घेऊन जावईबुवांकडे गेला.

"काय हो जावईबुवा, तुम्ही काय काम कलता?"

"हजामतीचे."

" अन तुमचा भाऊ ?"

" बट्‌लचं."

नाम्या हे ऐकून हतबुद्धच झाला. टिळकांनी आपली मुलगी हजा-माला दिली त्याचे त्याला मोठे कोडे पडले. तो पुन्हा माझ्याकडे आला आणि निषेधात्मक स्वराने म्हणाला,

" अहाहा ! काय जावई पाहिला आहे ! एक हजाम तर त्याचा भाऊ बटरल ! भाऊला मुलगी कुठली पाहिली तल मुंबईची ! त्याच्या-पेक्षा माझ्या शलावनमामाची मुलगी किती चांगली ! ती का नाही केलीत भाऊला ?"

ह्या वेडया गोळयाचे आमच्या घरात फार कौतुक होई. चिकीचे व त्याचे नेहमी भांडण होई. चिकीने केलेले त्याला पसंत पडत नसे. एकदा ती परातीत पाणी त्यात घेऊन मडके ठेवून ते धूत होती. नाम्याला तिच्या कामात काहीतरी खोड काढायची होती. पण काय काढावी ? तो तिच्यापुढे थोडा उभा राहिला. मग त्याच्या डोक्यात कल्पना आली. तो म्हणाला, " चिके, सांगू का आईला ? ते मलकं पाण्यात ठेवलंस ! बुलल ना पलातीत !"

आतमध्ये आमची हसून मुरकुंडी वळली.

एकदा नाम्याला मी एका आजारी बाईकडे निजायला धाडले होते. ती दुसऱ्या दिवशी पहाटे पहाटे मेली. पहाटेच नाम्या घरी येऊन निजला. टिळकांचा चहा झाला. त्यांनी एक कप बेबीजवळ देऊन नाम्याला द्यायला सांगितला. बेबी जवळ जाते तो नाम्या ताठ ! टुळु-टुळु पाहत होता, पण हलेना की बोलेना.

" नाम्या ! नाम्या ! अरे असे काय करतोस ? हा चहा घे !"

पण नाम्याचे हूं नाही की चूं नाही. शेवटी आम्ही त्याच्याभोवती जमा झालो तेव्हा त्याने सांगितले,

" मी बोलू कसा ? त्या बाईसारखी माझी दातखीळ बसली आहे ना ?"

दत्तू बी. ए. होऊन वर्ष दीड वर्ष होत आले होते. रूथ बी. ए. ला बसणार होती. त्याला कामही पोटापुरते लागले होते. आता त्याचे लग्न

करण्याचे घाटू लागले. पण लग्नाला पैसे कोठून आणायचे ? पैशावाचून लग्न कसे होणार ? काहीतरी पैसे पाहिजेतच. मी मिसेस हेजनला मराठी शिकवीत असे व त्या शिकवणीचे पैसे त्यांच्याजवळच साचविले होते. दत्तूच्या लग्नापर्यंत शंभर रुपये होणार होते. पण आणखी पैसे पाहिजे होते. आणि ह्या पैशाची तीव्र जाणीव आम्हाला आता होऊ लागली.

टिळकांनी दत्तूच्या लग्नाची जय्यत तयारी सुरू केली. म्हणजे त्यांनी एक विवाहपद्धती लिहून काढली व त्या पद्धतीने त्याचे लग्न लावायचे असे ठरविले. ह्या विवाहपद्धतीच्या नकला करायचे काम आमच्या घरात धुमधडाक्याने सुरू झाले. टिळकांना अधिक काळजी करण्याची आणि तयारी करण्याची जरूरच नव्हती.

मी मिसेस हेजनला मराठी शिकवीत असे. मला इंग्रजी येत नव्हते. पण मराठीतून मराठी शिकवी. आम्ही सम्राट अशोक हे पुस्तक वाचीत होतो. त्यात आमच्या पुष्कळ गमती होत.

एकदा वाचता वाचता अंगवंगकलिंगमगधादी हा शब्द आला. मिसेस हेजनला ह्यातील लालित्य इतके आवडले की त्या बेहद्द खूप झाल्या व मला म्हणू लागल्या, "मी आता मिस्टर हेजनचे हेच नाव ठेवणार व त्यांना अंगवंगकलिंगमधादी म्हणून हाक मारणार !"

नको नको म्हणता म्हणता मला हसू येत होते. मग ही देशांची नावे आहेत असे सांगितल्यावर त्याही हसू लागल्या.

१९१७ च्या जून-जुलैमध्ये ज्ञानोदयात जाहिरात आली की ख्रिस्ती समाजनिदर्शक अशी स्वतंत्र मराठी कादंबरी लिहिणारासाठी १५० व ५० रुपयांचे, अशी दोन बक्षिसे लावण्यात आली आहेत. वाङ्मय कमिटीची ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर टिळकांनी पुढच्याच ज्ञानोदयात प्रसिद्ध केले की,

इकडे लक्ष द्या !

एका गृहस्थाने विचारल्यावरून मी आपल्या सर्व होतकरू ख्रिस्ती लेखकबंधूंना जाहीरपणे सांगून ठेवतो की, वाङ्मयकमिटीने लावलेल्या बक्षिसांकरिता कादंबरी लिहिण्याचा माझा विचार नसून ती बक्षिसे

इतरांच्या उत्तेजनार्थ व्हावी हीच माझी इच्छा आहे.

—नारायण वामन टिळक

हे विचारणारे गृहस्थ म्हणजे दत्तूच होता. त्याच्या मनात आपण कादंबरी लिहून पाहण्याचे होते. त्यावेळपर्यंत लहान लहान गोष्टी, मधूनमधून कविता असे लिखाण लिहिले होते; परंतु मोठे पुस्तक लिहिण्याचा त्याने कधी प्रयत्न केला नव्हता.

टिळकांनी आपल्या चिरंजीवांना अगदी छापील उत्तर दिले, तेव्हा त्याने कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली व ती दहा-बारा दिवसांत लिहून पुरी केली. पुढे दिवाळीच्या सुटीत तो साताऱ्यात आपले बाड घेऊन आला.

आपली कादंबरी आपल्या वडिलांच्या नजरेखालून जावी अशी त्याची फार इच्छा होती, पण ते काही जमेना. टिळक नेहमी काही ना काहीतरी कामात असायचे.

शेवटी एकदाचा योग आला. एक दिवस दुपारचे जेवण झाल्यावर टिळक खाटेवर जाऊन पडले. अगदी निवांत वेळ होता. कोणी माणसे जवळ नव्हती. दत्तू त्यांच्याजवळ खुर्ची टाकून बसला.

" पपा, आता तुम्हाला निवांत वेळ आहे. मी माझी गोष्ट वाचून दाखवितो."

" हं, वाच, " असे म्हणून टिळक डोळे झाकून ऐकू लागले. चार-पाच पाने वाचली असतील- नसतील तर टिळकांना गेली झोप लागून. दत्तूला फार वाईट वाटले. तो मजकडे आला.

" आई, पपा आता झोपी गेले ! ह्यांचे लिखाण हे वाचू लागले नि आपण दुर्लक्ष केले म्हणजे ह्यांना किती राग येतो ! मला कधी हे उत्तेजन देत नाहीत."

" अरे बाबा, ते दमले असतील. मग वाचून दाखीव."

पण दत्तूला फारच घुस्सा आला होता. तो म्हणाला, " मी आता कधीही वाचून दाखविणार नाही की ह्या पुस्तकाचे काय होईल ते कळविणार नाही."

पुढे पाच-सहा महिन्यांनी एक दिवस टिळक टपाल आल्यानंतर

दोन-तीन तास ऑफिसातच बसून राहिले. त्यांची नेहमीप्रमाणे काहीच गडबड ऐकू येईना; तेव्हा मी ऑफिसमध्ये गेले तो ते एक पुस्तक वाचण्यात गुंग होऊन गेलेले.

" हे पाहिलेस का ? दत्तूने मोठी गंमत केली. हे घे तुझे पुस्तक, हे दत्तूचे पुस्तक– त्याने लिहिलेले. आणि तुला आणि मला अर्पण केले आहे !"

मला पुस्तकाची साधारण कल्पना आली होती, पण टिळक अजिबात विसरून गेले होते.

" त्याला दीडशे रुपयांचे बक्षीसही मिळाले. आणखी काय सुंदर पुस्तक लिहिले आहे ! मला अगदी हातातून खाली ठेववत नाही."

" पण तो तुम्हाला ते वाचवून दाखवीत होता तेव्हा तुम्हाला झोप लागली होती !"

टिळकांना ते आठवले. ते पुढे काही बोलले नाहीत. हसले आणि त्यांनी पुढे वाचन सुरू केले. त्या दिवशी पुस्तक संपविल्यावर मग ते जेवायला उठले. त्यांना पुस्तकाचा इतका आनंद झाला की काही विचारता सोय नाही. दत्तूला ताबडतोब पत्र गेलेच, पण शिवाय डॉ. बिसल वगैरे आणखी पाच-सहा जणांना त्या पुस्तकाबद्दल त्यांनी लिहिले.

जुन्या मराठी पुस्तकांतील मुक्या व बहिऱ्या आईला आपले तान्हे मूलही मुके आणि बहिरे असावे असे वाटून तिने त्याच्या उशाशी एक मोठा थोरला दगड नेऊन आपटला व ते पोर रडायला लागल्यावर तिला मूल बहिरे व मुके नाही म्हणून जो आनंद झाला तो मला आज झाला आहे, असे टिळक ज्याला त्याला सांगू लागले.

## ७५ : अभंगांजली

टिळक साताऱ्यास येण्याचे मुख्य कारण ख्रिस्तायन. पण तो काव्यौघ अभंगांजलीत जाऊन मिळाला, व हे अभंग रचण्यास साता-

ऱ्यास आल्यावर कारणेही तशीच मिळाली.

काम सोडल्यानंतर एक दिवस मिसेस लींनी टिळकांना म्हटले, "आता तुमचे कसे होईल ?" त्यावर हा अभंग लिहिला–

**पोरक्या पोराच्या कराव्या चौकशा । जगी माझ्या तैशा चालल्ेल्या ।।**
**अशाने शेवटी होईल की काय । बुद्धिभेद भय वाटे मला ।।**
**दुर्बलता माझी मजला भोववी । भुते नवी नवी नाचवून ।।**
**राहि राहि बापा माझीयाजवळ । नाही बरा काळ सांगतो मी ।।**
**कळे तेच पुन्हा कळेनासे होय । दिसतो अपाय मला पुढे ।।**
**कर्णि तुझी वाणी भरलेली राहो । ऐकू नच येवो दुजे काही ।।**
**ऐकू आले तरी तूच दे उत्तर । मज अवसर देऊ नको ।।**
**दास म्हणे बापा कर काही तरी । दिलेस ते करी राहो माझ्या ।।**

मिसेस लींची नुसती शाब्दिक सहानुभूती नव्हती. चौकशी झाल्यानंतर पुढे एक दिवस हळूच त्यांनी टिळकांच्या पुढे पन्नास रुपये आणून ठेवले. टिळकांनी ते साभार परत केले. टिळक ते घेईनात तेव्हा मिसेस लींनी ते मजजवळ दिले तेव्हा टिळकांनी हा अभंग म्हटला,

**नको तेच का रे लावीशी पाठीशी । सांग अर्थ मशी याचा आधी ।।**
**का रे याला त्याला मज ओढू देशी । त्रेधा उडवीशी का रे माझी ।।**
**कोंबुनी कोटरी ठेवायाचे होते । तरी का पंखांते वाढू दिले ।।**
**आपूल्याच हस्ते फोडी हे नयन । बसू हे झाकून कोठवरी ।।**
**सदा पुढे पुढे जीव ओढा घेई । अवजड पायी बीडी परी ।।**
**कधी रे मला सोडवीशी देवा । सोसवेना जीवा त्रास आता ।।**
**दास म्हणे बापा माझि कूरकूर । एकदाची दूर करीनास ।।**

मिसेस् ली, रे. मि. हेजन, मिसेस हेजन वगैरे प्रेमळ मिशनरींची सहानुभूती होती व साह्य होते तरी तेथे आणखी एक मिशनरी बाई होती. तिला टिळकांचे काहीच पसंत नसे. हीच ती जिनरिक्षेवाली बाई. दोघांची गाठ पुन्हा येथे पडली.

बाई दुष्ट होती असे मी म्हणत नाही; पण तिला टिळकांचे कोणतेच करणे पसंत नसे. ती डिसिप्लिनची मोठी भोक्ती होती. इतकी, की ठराविक वेळेचे काम व ठराविक पद्धतीने व्हायचे. काम जरा निराळे किंवा निराळ्या प्रकारचे दिसले की तिच्या जिवाचा तडफडाट व्हायचा व हिच्या ह्या वृत्तीमुळे टिळकांचे व तिचे जवळजवळ रोजच्या रोज खटके उडायचे.

टिळक रोज सकाळ-संध्याकाळ भजन करीत. पायांत चाळ, हातात झांज-चिपळा, मागे तबला नाहीतर पखवाज अशा रीतीने त्याचे भजन चाले व त्यात 'ब्रह्मानंदी लागली टाळी कोण देहाते संभाळी' अशी त्यांची स्थिती व्हायची.

ते भजन करता करता नाचत, पण पाश्चात्त्य उपासनापद्धतीला आदर्श उपासनापद्धती समजणाऱ्या ह्या मिशनरी बाईला हे मुळीच खपत नसे. तिने आपल्या कामदारांना आमच्या येथे येऊन भजनात भाग घेण्याची बंदी केली. ते ऐकत ना. बंदी झाली तरी ते तसेच येत. त्यावरून तिचे व कामदारांचे खटके उडत. तिने एकदोघांना कामावरून काढून टाकले, तसे टिळकांनी त्यांना ताबडतोब कामे लावून दिली. ह्या बाईच्या जाचावर त्यांनी खालील अभंग लिहिला—

**मरताना सात वेळ । जरि देहाला येईल ॥**
**तरी हा मी सिद्ध देवा । एक अनुग्रह व्हावा ॥**
**तुझ्या नावे आरेरावी । तुझ्या राज्यात नसावी ॥**
**तुझी पाहणे लेकरे । नको झाली जनावरे ॥**
**दास म्हणे डोळे फोड । नको दर्शन हे द्वाड ॥**

त्याच मिशनरी बाईला उद्देशून हा आणखी एक अभंग आहे—

मलाही भेटला मंबाजी दयाळा । धन्य तुझी कळा मायबापा ।।
कुठे का असेना मंबाजीवाचून । तुझे राज्य शूर देवराया ।।
मंबाजी भेटला जीव माझा धाला । संस्तवी तुजला आनंदाने ।।
भला निवडला पंतोजी तापट । देईल चापट ती ती खरी ।।
इथे नाही मीचे काही चालायाचे । पाहीजे देहाचे विसर्जन ।।
शहाण्याचे नोहे मूर्खाचे गाढव । व्हावे तेव्हा देव कळे येथे ।।
इथेच चढणे पुढली पायरी । इथेच ईश्वरी कृपा भेटे ।।
दास म्हणे नाही म्हणणार छळ । सोहळा केवळ सुखाचा हा ।।

टिळक घराला कड्या लावू देत नसत. कुलूप तर नाहीच नाही. मी म्हणे, " असे कसे करता ?" ते म्हणत,

" खरोखर परमेश्वरावर आपला इतका भाव असला पाहिजे की आपल्याला काही साठवून ठेवण्याची इच्छाच होता कामा नये व आपले जे असेल ते साऱ्यांचे असले पाहिजे. तुझे- माझे हा भेदभाव काही उपयोगी नाही." ह्यावर त्यांचे खालील अभंग आहेत–

या रे या रे या रे लुटा सारे धन । तरीच संपन्न होईन मी ।।
या रे या रे या रे करा विडंबन । हाच माझा मान मला व्हावा ।।
या रे टाका मज खांबाला खिळून । तरीच होईन चिरंजीवी ।।
दास म्हणे द्या रे एवढेच दान । जाऊ द्या म्हणून 'पूर्ण झाले' ।।
त्याग करवीशी तरी होवो पुरा । नाहि तरी बरा न झालेला ।।
त्रिशंकूसारीखा ठेवणे लोंबत । जिवाची गंमत नको ऐशी ।।
आपटून खाली चुराडा जहाला । तरी पूरवला याच्यापेक्षा ।।
दास म्हणे बापा लाव रे निकाल । जहाले ते हाल पुरे झाले ।।
घरोघर बाप घरोघर आई । घरोघर ताई भाई माझे ।।
माझिया ममत्वे व्यापियेले नाही । असे न एकही स्थान कोठे ।।

**प्रेम आणि देव एक हा विश्वास । कसा तो विश्वास दूर मानी ।।**
**विश्व दूर तरी विश्वनाथ दूरी । काय सांगू वैरी मीच त्याचा ।।**
**स्वप्नातही मज नसो दुजा भाव । हीच एक ठेव दे दे देवा ।।**
**दास म्हणे बापा माझे भाऊपण । करी संरक्षण तूच त्याचे ।।**

टिळकांचा तापट स्वभाव, राग वगैरे जवळजवळ नाहीसे झाले होते. आता रागाची जागा कीव घेई. कोणी काही विरुद्ध बोलले किंवा छळ होऊ लागला तर ते म्हणत, " वा: ! ह्या गोष्टी तर मला माझ्या कामात स्फूर्ती देतात– ह्यावर त्यांनी खालील अभंग रचले आहेत.

**जो जो जगाला मी होईन अप्रिय । तो तो माझे ध्येय माझे झाले ।।**
**जो जो निंदा छळ तो तो वाढे बळ । उज्ज्वळ उज्ज्वळ आत्मनिष्ठा ।।**
**जो जो जग कोपे दूर दूर जाई । तो तो तेच येई हारी माझ्या ।।**
**भय काय आम्हा जगज्जेता गुरू । आमुचे तो करू पाहिजे ते ।।**
**आमुचे कशाचे कुठे त्याचा पत्ता । विराजली सत्ता सारी त्याची ।।**
**दास म्हणे खिस्त अवघाच खिस्त । हळू हळू अस्त पावलो मी ।।**

मात्र त्यांना सात्त्विक संताप अतिशय येई. स्वत:चा अपमान झाला म्हणून ते रागवत नसले तरी हिंदी खिस्ती लोकांतील कित्येक दुर्गुणांची, तसेच मिशनरींनी त्यांना आणलेल्या पांगळेपणाची त्यांना अत्यंत चीड येई.

एकदा तर वाईच्या चर्चमध्ये उपदेश करताना त्यांचा आवेश इतका परमावधीला गेला, की त्यांनी बोलता बोलता पुढे असलेल्या टेबलावर बुक्की मारली आणि एका बुक्कीसरशी ते टेबल ताडकन फुटून गेले.

खालील तीन अभंग काही काही मिशनरींना उद्देशून आहेत–

**निंदावया अन्या तोंडे सवकली । जळे पायांखाली काय पहा ।।**

सतरा पिढ्याही प्रभू अलिंगीला । तरी नाही झाला भेद दूरी ।।
जातिभेद पाप अन्य भेद पुण्य । पढविले ज्ञान कोणी सांगा ।।
काय देवराया तुला अशांवीण । सेवक न अन्य गवसले ।।
दास म्हणे बापा घे रे घे रे छडी । आधी यास झोडी
नीट करी ।।

मारुनी स्वार्थाला लाथ येथे आला । घेउनी ख्रिस्ताला
आम्हांसाठी ।।
आम्हांसाठी देह जीव सर्व काही । ऋणाला ह्या नाही
सीमा कोठे ।।
तरी एक आता लहानशी अर्जी । ऐकाल का माझी गरीबाची ।।
तुम्ही मायबाप आम्ही पंगु बाळे । आता पुरे झाले नाते ऐसे ।।
देव दूर येथे तुम्हीच दैवते । कधी पातकाते त्यजाल ह्या ।।

स्वये उभारून राज्य गुलामांचे । राज्य हे देवाचे म्हणू नका ।।
आम्ही नाचणारे तुम्ही सूत्रधार । नाटच कोठवर चालेल हे ।।
कोठवर आम्हा ठेवाल मेलेले । ईश्वराला डोळे नाहीत का ।।
पोहू द्या बुडू द्या मरू द्या आम्हाला । पोहण्याची कला
देणे तरी ।।
गुंडाळून ठेवा अवघे सिद्धान्त । आधी आम्हा ख्रिस्त
सापडू द्या ।।
नका येऊ रागा निरोप्या मी दीन । आले तिकडून तेच बोले ।।
दास म्हणे बंधू-भगिनी व्हा पाहू । मग सारे घेऊ सावरोनी ।।

जिथे प्रेम नाही तेथला विचार । क्रूर निशाचर बोकाळला ।।
जिथे प्रेम नाही तेथली कल्पना । डाकिनी नर्तना करी स्वैर ।।
जिथे प्रेम नाही तेथली वासना । महाविषानना खवळली ।।
दास म्हणे माझा देवबाप प्रेम । प्रेम हाच धर्म शर्म मुक्ती ।।

आणि कित्येक ख्रिस्ती लोकांना हा आहेर आहे–

आम्ही टाकीले टाकीले । अरे नंदी तूझे झाले ।।
नको भीती नको कोप । ये रे घे घे हे आटोप ।।
वेड्याऐसे नको करू । नको शिंगांना ऊगारू ।।
आम्हापाशी काठी नाही । न तो घेणे आम्हालाही ।।
तरी तूला दंडिणार । आम्हामागे निरंतर ।।
दास म्हणे वाटे दुःख । आत्मघात करी मूर्ख ।।१।।

पट्टासाखळीची आवड जयांना । होवोत ती त्यांना लखलाभ ।।
असोत लोहाची सोन्याची असोत । मौक्तिके गुंफोत कोणी त्यांना ।।
नावे तयांवर अधिकार कीर्ती । सन्मान श्रीमंती काही कोरा ।।
नकोत ती आम्हा नरकयातना । कोणता शहाणा आलिंगील ।।
दास म्हणे देवा तुवा सोडवीले । पाहिजे राखीले तूच आता ।।२।।

काही नव्हते जोवरी । खेळगडीच तोवरी ।।
घार उडाली वरोनी । गेली हाडूक टाकोनी ।।
गूरगूर डसाडसी । सुरू फाडाफाडी खाशी ।।
संधिविग्रह विग्रहसंधी । मौज सारी सारी धुंदी ।।
दास म्हणे तुझ्या तुला । अरे स्वार्थी साध्य लीला ।।३।।

नव्हे हिंदुस्तान लेकुराच्या चेष्टा । नव्हेत प्रतिष्ठा भंडांच्या या ।।
इथेच जाहाले महाधर्मवीर । जया थरथर विश्व कापे ।।
इथेच जहाले मुनी योगीश्वर । अहो आजवर प्रभा ज्यांची ।।
श्रद्धा हेच ज्यांचे जीवितसर्वस्व । आपुलेच विश्व घर ज्यांचे ।।
असे भक्तराज इथेच जन्मले । हृदी विराजले ज्याच्या त्याच्या ।।
इथे नाचवून भलतीच सोंगे । करुनिया ढोंगे अर्थ काय ?

**मिळवाल तेही घालवाल अंती । घालील फजीती माळ कंठी ।।**
**दास म्हणे येथे प्रभू येशू ख्रिस्त । पाहिजे संतत उभा केला ।।**

नाम्याला मुंबईला जाण्याची फार हौस. पण आम्ही काही ना काहीतरी समजूत करून त्याचा बेत नेहमी बदलवीत असू. पण एक दिवस तो रिक्रूटात भरती होऊन पळून गेला. त्याला तेथे पंखा ओढायला जायचे म्हणून कोणी सांगून नेले. पुढे तेथे ऑफिसरची व त्याची गमतीदार मुलाखत झाल्यानंतर तेथून त्याला हाकलून दिला. पण नाम्या गेल्यानंतर आमच्या येथे कोणी चाकर-नोकर राहिले नाहीत.

केरपोतेऱ्यापासून टिळक आता घरातले सर्व काम माझ्या बरोबरीने करीत.

ते म्हणत, "ख्रिस्ताला कुठे चाकरनोकर होते ? त्याला कुठे घरेमाडचा होत्या ? त्याला डोके टेकायलासुद्धा जागा नव्हती, मग आपल्यालाच कशाला हे चोचले पाहिजेत ?" त्यावर त्यांनी खाली दिलेले दोन अतिशय प्रसिद्ध असलेले अभंग रचले–

**तुला कोठे होते चाकर नोकर । मला हा जोजार कशाला रे ।।**
**तुझीया पुढारा वाढीले कदन्न । मजला पक्वान्न कशाला रे ।।**
**तुला नाही जागा डोके टेकायाला । मला रे कशाला**
**घरे माडचा ।।**
**कोण हा जुलूम गरीबावरती । का रे ही फजीती मांडीयेली ।।**
**नको ते लादीले माझ्या डोईवर । प्रेमाचा सागर धन्य तूच ।।**
**बोलतो रागाने काय करू तरी । ऐकशीना जरी तूच माझे ।।**
**दास म्हणे ख्रिस्ता तुझ्या कंथेवरी । मला जागा करी**
**थोडकीशी ।।**
**तुझ्या तोंडावर थुंकले दुर्जन । मग मीच कोण मोठा आलो ।।**
**तुझ्या पाठीवर ओढीयेले वेत । मग ते नकोत मलाच का ।।**
**लागे उचलावा तुझा तुला खांब । मग मला थांब कोण म्हणे ।।**

**तुझीया मस्तकी कंटककिरीट । माझा थाटमाट हाच अंती ।**
**तुजला खांबाला खिळून मारीले । मरण निराळे मला कैचे ।।**
**दास म्हणे सारा सुखाचा सोहळा । तुझिया निराळा होऊ न दे ।।**

## ७६ : नगरास शेवटली भेट

असे करता करता १९१८ साल उजाडले. रूथ बी. ए. च्या परीक्षेला ह्या वर्षी बसली. दत्तूला बी. ए. होऊन दोन वर्षे झाली होती व मुंबईस राहून तो युनिव्हर्सिटीच्या क्लासमध्ये जाऊन पुन्हा एम. ए. चा अभ्यास करू लागला होता. मुंबईकडल्या एल. एल. बी. च्या टर्म्सही तो पुन्हा भरू लागला. पण त्याचे हे नुसते हौशीचे काम होते. मुख्य काम मुंबईच्या हायस्कूलमध्ये शिक्षकाचे. आता त्याला पगार मिळत होता. त्याने थोडेसे पैसे साठविले होते. तेव्हा त्याला लग्न करण्यास कोणतीच हरकत नव्हती.

त्याप्रमाणे मी टिळकांच्या मागे लकडा लावून तारीख-महिना ठरविला. हा महिना व ही तारीख मला पसंत नव्हती. मी म्हणे, चैत्रात लग्न करू नये. व्याही म्हणत, चैत्रातच व्हायला पाहिजे. कारण लग्नानंतर पुढे उन्हाळ्याचा एक सबंध महिना सर्वांना मोकळा मिळतो.

तसेच गावाबद्दलही माझे काही चालले नाही. मी म्हणे, सातारला लग्न व्हावे. ते म्हणत, नाही, मुलीच्याच गावी ते व्हायला पाहिजे. तसे पाहिले तर सातारा आमचे स्वतःचे गाव नव्हते की मुंबई त्यांचे स्वतःचे गाव नव्हते. पण आपल्या समजुती झाले.

आम्हाला साताऱ्याला लग्न व्हायला हवे होते, ह्याचे कारण आमचे एवढे मोठे वऱ्हाड मुंबईस कोठे ठेवणार ? पण त्याची व्यवस्था आम्ही करू असा व्याहयांचा निरोप आला. तेथेही मी नमते घेतले.

व्याह्यांनी दत्तूला खूप मदत केली. मुंबईस त्या वेळी तरी बऱ्या-

पैकी भाड्याचे घर मिळवणे कठीण असे. पण भायखळ्याला त्यांनी आपल्या व आपल्या बहिणीच्या चाळीच्या मधल्या एका चाळीत दत्तूसाठी घर भाड्याने घेतले.

माझा संसार सारा चोरीस गेला होता. पण माझ्याकडे दोन-तीन राखोळी घातलेले पाहुणे संसार होते. माझ्या डोक्यात एक कल्पना आली. बेंजीचे संसारोपयोगी सामान मजजवळ होते, हेच दत्तूच्या येथे मांडून द्यावे व मग त्याने आपले सामान गोळा केल्यावर हळूहळू हे सामान बेंजीच्या स्वाधीन करावे. कारण बेंजी संसारात पडायला अजून दोन-तीन वर्षांचा तरी अवधी होता.

बेंजी हा रखमाबाईंचा म्हणजे माझ्या व्याहयांच्या बहिणीचा मुलगा. तेच त्याचे अज्ञानपालक होते. तेव्हा त्याची मी संमती घेऊन सर्व जिनसा मुंबईस पाठवून दिल्या व मुंबईस दत्तूचे– भाड्याचेच का होईना, पण स्वतःचे घर थाटले. माझा आनंद गगनात मावेना.

उन्हाळ्यात लग्न व्हायचे ठरले. दिवाळीच्या सुट्टीत व पुढे नाताळा-तही दत्तू घरी आला होता. तो काळ मोठा आनंदात व मजेत गेला.

एक दिवस टिळकांची व दत्तूची पैज लागली, की सातारहून वाईला पायी जायचे व परत पायी सातारला यायचे. टिळक दिसण्यात अशक्त तरी अतिशय काटक होते. उलट दत्तू दिसण्यात सशक्त असला तरी काटकपणात टिळकांच्या मागे मैलोगणती पडेल असा आहे. साऱ्या जन्मात टिळकांनी कधी दोन दिवस अंथरूण धरले आहे असे मला फारसे आठवत नाही. त्यांना आजारी पडण्याची सवयच नव्हती. असो.

बाप-लेकांत पैज ठरली व दुसऱ्या दिवशी बाराला जाण्याचा बेत मुक्रर झाला. दुसऱ्या दिवशी बाराच्या सुमाराला कोणीतरी येऊन टिळ-कांशी बोलत बसले व बाहेर पावसाला सुरुवात झाली.

टिळक काही वाईस जाण्याची चिन्हे दाखविनात. दत्तू हसू लागला- "पपा, पाऊस पडतो आहे. आपला वाईस जाण्याचा बेत रहित ना?"

ते म्हणाले, "अरे, मी पावसाला डरणार नाही."

ह्यावर दत्तू म्हणाला, "पण तुमची निघण्याची काही तयारी दिसत नाही ती?"

टिळकांना काय तयारी करायची होती ? अंगात कफनी होतीच, शेजारी घोंगडी होती, कोपऱ्यात काठी होती व उंबऱ्यात वहाणा होत्या.

" चल निघू," एवढे शब्द तोंडातून पुरे बाहेर पडताहेत तोच ते ही सारी आयुधे घेऊन बाहेर पावसात जाऊन दत्तूची वाट पाहत उभेही राहिले.

दत्तूही पाच मिनिटांत तयार होऊन निघाला. मी म्हटले, " अहो, एवढ्या पावसात जायचे सांगितले आहे कोणी ?"

दोघेही माझ्या बोलण्याला हसून बाहेर पडले.

टिळक व दत्तू शिळंधार पावसात पायी वाईला गेले. तेथे पोचताच दत्तूला हॉस्पिटलमध्ये पोचता केला व टिळक गावात एक फेरफटका मारून आले.

" काय दत्तू, परत चलायचे ना ?"

दत्तूला ताप भरला होता. त्याने पडल्या पडल्या हात जोडून सांगितले, " मी हरलो. " दुसऱ्या दिवशी दोघेही मोटारमधून परत आले.

माझी कीर्तनाची तयारी उत्तम झाली होती. टिळकांनी मला खूप संथा दिल्या होत्या. मी आता कीर्तने करू लागले व माझ्या कीर्तनांचा थोडा बोलबालाही होऊ लागला. मला नगरास कीर्तनाचे आमंत्रण आले. टिळकांनाही नगरास वर्गासाठी जायचे होते.

आम्ही दोघे निघालो. आम्ही नगरास डॉ. ह्यूमसाहेबांच्याच बंगल्यात उतरलो. पुण्याहून येता येता बरोबर बेबीलाही दोन दिवसांसाठी घेतले होते.

नगरास आम्ही सर्वांनी यावे व एकदा पोटभर बोलावे, म्हणून खरोखर डॉ. ह्यूमची ही योजना होती. टिळकही नगरास येण्यास उतावीळ झाले होते, पण ते देवाच्या दरबारींना भेटण्यासाठी. ह्या संस्थेचा पाया नगरासच घातला गेला असल्याने त्यांना नगरची ओढ लागणे साहजिकच होते. तेथे गेल्यावर माझे कीर्तन राहिले बाजूला, त्याऐवजी साहेबांनीच आपले कीर्तन सुरू केले.

स्मृ... ३०

ते म्हणाले–

" तारा फार हुशार व शहाणी मुलगी आहे. मला वाटते, तिने आता काम धरावे. कारण आपल्या बापाला मदत करण्याजोगी ती आता झाली आहे. मी तिला मिस ब्रूसच्या शाळेत काम लावून देतो. तिला सहज सवाशे रुपये पगार मिळेल ! "

टिळकांना सवाशे रुपये पगार होता. त्यांनी काम सोडले तरी ते केवळ पैसे घेण्याच्या बाबतीत. बाकी सारे पूर्वीचे काम ते करीतच असत. ज्ञानोदयाचे काम तर ते पहिल्यापासूनच फुकट करीत; पण ज्या कामाबद्दल त्यांना पगार मिळे तेही काम आता ते फुकट करू लागले. पण पैशावाचून ह्यांचे कसे होणार ह्याविषयी डॉ. ह्यूमना पहिल्यापासून काळजी लागून राहिली होती व त्यांनी ही एक युक्ती काढली. बेबीला कामाला लावावयाचे व तिला टिळकांचा पगार द्यायचा ! टिळकांचीही समजूत पटली. शिवाय त्यांची अडचणही दूर झाली. पण ही युक्ती मात्र टिळकांच्या ध्यानात आली नाही. त्यांना डॉ. ह्यूमचे बोलणे पटले. पण मी म्हटले,

" साहेब, हा पगार तिला नेहमी मिळेल का ? शिवाय आज तिच्या अभ्यासात व्यत्यय आणला म्हणजे पुढे तो तिच्याच्याने होईल का ? मला वाटते, एकदा अभ्यासातून लक्ष उडाले म्हणजे पुढे ते लागणे कठीण होईल. "

ह्यावर साहेबांनी माझी समजूत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण मी म्हणे–

" आज तिची योग्यता १५–२० रुपये मिळविण्याची आहे– ह्यापलीकडे नाही, हे मला स्पष्ट दिसते आहे."

साहेब म्हणाले, " लक्ष्मीबाई, तुमच्या मुलीची योग्यता तुम्हाला कळत नाही. आम्हाला ती कळते. "

" साहेब, आज तुम्ही तिला सवाशे नाही– दोनशे रुपये पगार द्याल. पण पुढे टिळकांच्या मागे किंवा तुमच्या मागे तिची तुम्हाला वाटते आहे तीच किंमत इतरांना वाटेल का ? मला नाही वाटत की तिच्या शिकण्यात इतक्यात खो आणावा. "

" बरे, पण तुम्ही तिचे शिक्षण तरी किती करणार ? आणि कसे करणार ?"

" मी हवे ते करीन. तिला बी. ए. पर्यंत शिक्षण देण्याचे मी ठरविले आहे."

" मग मी तिच्यासाठी काय करू ?"

" प्रार्थना."

टिळक हा सारा संवाद गुपचीप ऐकत होते, त्यांनी मुळीच मध्ये तोंड घातले नाही. पण जेवणाचे टेबल सोडून आम्ही आपल्या खोलीत आल्यावर टिळक मला म्हणाले,

" अग, तुला बेबीची योग्यता माहीत नाही."

" मला माहीत आहे तिची योग्यता. तुमचाच पगार ते तिला देणार ! मग तुम्हीच करा ना पगारी काम ! साहेबांनी ह्याच कामासाठी आपल्याला साताऱ्याहून बोलावलेले दिसते."

साहेबांचे हे काम असले तरी टिळकांचे मात्र काम दुसरेच होते. टिळक आल्यापासून बरेच दरबारी त्यांना येऊन भेटले. देवाच्या दरबाराच्या विरुद्ध असे काही लोक उभे राहिले होते. ते जाऊन मिशनरींची मने कलुषित करीत. त्यांनी असा समज पसरवून दिला की, ह्या निमित्ताने आपल्या कामात काहीतरी घोटाळा घालण्याचा टिळकांचा बेत आहे.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही जेवायला बसलो तोच विरुद्ध पक्षाचे लोक बाहेर येऊन बसले. टिळकांना हे माहीत नव्हते. जेवण झाल्यावर टिळक व साहेब साहेबांच्या ऑफिसमध्ये गेले. तेथे गेल्यावर साहेब म्हणाले,

" आता भावा ! तुम्ही हे काय काढले आहे ? सारे लोक काय म्हणत आहेत ?"

" कोणते सारे लोक ? कोण काय म्हणते आहे ? मी त्यांना चोऱ्या करायला सांगतो ? दरोडा टाका म्हणतो ? खून करायला उत्तेजन देतो ? काय करतो मी सांगा !"

" आता भावा—"

" कोणता काय सांगतो, आणा त्याला माझ्यापुढे. "

हे बोलणे इतके मोठ्याने होत होते की दुसऱ्या खोलीत आम्हाला ते स्पष्ट ऐकू येत होते. शेवटली गर्जना तर एवढी मोठी होती, की मिसेस ह्यूमनी बंगल्याची दारे बंद केली व मला घेऊन त्या दूर एका खोलीत जाऊन बसल्या.

मी म्हटले, मला जाऊ द्या. पण त्या जाऊ देईनात. त्यांना असला प्रसंग कधीच ठाऊक नव्हता. मला ते रोजचेच ठाऊक होते. मी त्यांची समजूत घातली की, " मॅडमसाहेब, मला जाऊ द्या. मला त्यांचा स्वभाव ठाऊक आहे. "

साहेबांनी "भावा, भावा" म्हणून टिळकांना मिठी घातली. टिळक जरा शांत झाले. बाहेरची मंडळी आत आली. टिळकांनी त्यांच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला व देवाच्या दरबाराची सर्व योजना सर्वांना समजावून सांगून त्यांची समजूत घातली.

आम्ही नगरास आलो हे कळताच ठोंबरे धावतच आला. तो आपल्या सर्व मंडळींसह त्या वेळी नगरासच होता. तो मला व टिळकांना कडकडून भेटला व म्हणाला, " आज इतक्या दिवसांनी मला माझे हितचिंतक पुन्हा भेटले. तुम्ही येथे नव्हता तेव्हा मला किती चुकल्याचुकल्यासारखे वाटत होते ! "

आम्ही शेवटल्या दिवशी त्याच्या घरी जेवायला गेलो होतो. त्या वेळी त्याच्या आईने माझे व टिळकांचे किती किती आभार मानले. त्या म्हणाल्या, " त्र्यंबक माझा नाही. त्र्यंबक तुमचा आहे. तुम्ही त्याच्यासाठी किती तरी त्रास सोसला, त्याचा आजार काढला. "

ठोंबऱ्याला दत्तूच्या लग्नासाठी ये म्हणून मी आग्रह केला व त्यानेही येण्याचे वचन दिले.

टिळकांनी काम सोडले असल्याने ठोंबऱ्याने पैशाविषयी चौकशी केली. ' लग्नाला पैसे आहेत का ? नाही तर तुम्हाला दोनशे रुपयापर्यंत मी पैसे देतो. ' असे म्हणून तो ते रुपये देऊही लागला. मी म्हटले, " आत्ताच नकोत. लागले तर घेईन. तू हे पैसे बरोबर घेऊन ये. मी उगाच खर्च करून टाकीन. "

" बरे तर. देण्याघेण्याला खण लागतील ते तरी घेऊन जा. ते मी बरोबर देतो."

"आज नको. तेही तूच घेऊन ये."

रात्री आम्ही त्यांच्याच घरी राहिलो. सारी रात्र बोलण्यात कशी निघून गेली ते कळलेसुद्धा नाही.

दुसऱ्या दिवशी तो आम्हाला पोचवायला स्टेशनवर आला होता. गाडी सुटता सुटता त्याच्या डोळ्यांना पाणी आले. मीही डोळ्यांना पदर लावला. टिळकांच्याही डोळ्यांतून अश्रू पडले. अश्रूंच्या बाबतीत टिळक तसे फार कंजूष होते. ते सारे कंट्राट मला दिलेले आहे. पण त्या दिवशी टिळकांचेसुद्धा डोळे ओले झाले.

ठोंबऱ्यांची सर्वच मंडळी आमच्या परिचयाची होती. त्याची एकच थोरली बहीण कोणी पाहिली नव्हती. ठोंबरे नेहमी सांगे, " मला कवितेचा नाद तिच्यामुळे लागला व तीही कविता करते."

तेव्हा मी म्हणे, " ठोंबरे, कसेही कर आणि माझी अन् तुझ्या जिजीची एकदा भेट करवून दे."

त्याने पुष्कळदा आपल्या मनात किल्ले बांधले, मी तुम्हाला नेईन. मग आपण असे करू. नि तसे करू पण ते सारे ढासळून पडले.

सच्छील माता, सुशील पत्नी, सद्गुणी बहिणी, प्रेमळ भाऊ व जिवलग मित्र ह्या सर्वांना दुःखसागरात लोटून शांतस्थळी काव्य रचण्यासाठी बालकवी निघून गेले. टिळकांनी त्यांना अश्रूंनी न्हाणले. दत्तू-तारा त्याच्याबरोबर खेळली-बागडली. अजून आठवण झाली म्हणजे आम्ही अश्रू ढाळतो.

**ये आता घे शेवटले हे अश्रू दोन पिऊन**
**पाखरा येशिल का परतून ?**

देवाच्या दयेने मला बरेच मानसपुत्र व मानसकन्या आहेत. साताऱ्यास असाच एक मानसपुत्र होता, त्याचे नाव अर्नेस्ट. त्याची बायको डॉक्टरीण होती. तेव्हा त्याला डॉक्टर अर्नेस्ट म्हणत. आता दत्तूच्या लग्नाची तिथिवार, गाव ही ठरली. आम्हाला वऱ्हाड व वऱ्हाडाचा प्रवासखर्च पाहिजे होता. वऱ्हाड घरीच होते बहुतेक, व पैसा मी गोळा करायला लागले. डॉक्टर अर्नेस्टजवळ मी दोनशे रुपये मागितले. कर्जरोखा तोंडी.

रोख्याच्या अटी येणेप्रमाणे– " बाबा रे, तू मला पैसे दिले त्याला साक्षीदार फक्त देव. जसे तू मला अंधारात पैसे दिलेस तसे मी अंधारात परत करीन. मुदतीचा प्रश्न नाही. मी मेले गेले तर दत्तूपासून पैसे घ्यावे. विश्वास असेल तर पैसे दे, नाहीतर नाही म्हणून सांग. मला काही वाटणार नाही. व्याज मजजवळ काही मिळणार नाही. "

माझ्या कर्जदाराने ह्या सर्व अटी कबूल करून माझ्या शब्दाच्या तारणावर दोनशे रुपये मला दिले.

टिळकांचीही तयारी होत आली. घरी हाताशी एक कारकून होताच. त्याच्याकडून व काही स्वतः लिहून ' विवाह-पद्धती ' च्या नकला करण्याचा सपाटा लावला. ही विवाह-पद्धती पुढे त्यांनी ज्ञानोदयात छापून काढली.

दत्तू मुंबईसच होता. तेथे तो कामावर होता. उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली तरी तो आला नाही. कारण त्याला आपल्या सासूसासऱ्यांच्या मदतीने घराची व्यवस्था करायची होती, आमच्याकरता जानोसघर पाहायचे होते व कोठूनतरी भांडीकुंडी मिळवायची होती. टिळकांचे मित्र डॉ. गोवंडे ह्यांनी भांडीकुंडी देण्याचे कबूल केले होते, पण आयत्या वेळी त्यांची व आमच्या व्याह्यांची काही कुरबूर झाली व

पुढे ते लग्नालाही आले नाहीत. दोन्हीकडच्या मूळचिठ्ठ्या एकाच कागदावर छापल्या होत्या. त्याही मुंबईसच छापवून घेतल्या होत्या.

माझ्या घरचे हे पहिलेच कार्य होते. नातलग कोणी येणार नाहीत हे ठरलेलेच होते. मला हौस, की बरेच वऱ्हाडी बरोबर यावे. पण इकडून वऱ्हाडी मुंबईला जाणार आणि वर मुंबईसच अडकून पडलेला. तरी माझे वऱ्हाड तयार झाले. अर्नेस्ट, त्याची बायको, मुलगी, नागपूरहून जहाल मंजुळाबाई व तिची मुलगी, बाबू पाटणकर, माझ्या भावाचा मुलगा वासुदेव, बेंजी व आम्ही तिघे आणि चिकी. पैकी मला फक्त पाटणकरांचे भाडे द्यावे लागले नाही. लढाईचे दिवस. भाडी वाढलेली. त्यामुळे ह्या ट्रिपमध्ये बराच पैसा गेला.

सामानाचेही भाडे पडलेच असते म्हणून धान्य व जो काही किरकोळ बाजार भरला होता त्याचा बाजार भरविला नाही. म्हणजे ह्यात जो पैसा अडकवून टाकला तो तेथेच अडकून पडला. टिळकांच्यापेक्षा मला व्यवहारज्ञान अधिक, ही घमेंड एखादवेळेस सपाटून उतरे व असे घोटाळे उडून राहत.

आम्ही सर्व मंडळी म्हणजे वऱ्हाड निघालो. अर्नेस्ट आमचा अधिकारी. वऱ्हाडाबरोबर वर पाहिजे म्हणून दत्तूला आधी लिहून ठेवले होते की मुंबईच्या एखाद्या मधल्याच स्टेशनावर तू येऊन आम्हाला मीळ.

अर्नेस्ट मोठा डोक्याचा मुलगा. त्याने सातारला आम्हाला डबा रिझर्व करून दिला. आम्ही सर्व ऐसपैस बसलो. गाडीत गर्दी म्हणते मी ! लग्न दोन दिवसांवर आलेले. पण आम्ही सुखाने पुण्याच्या स्टेशनपर्यंत आलो. गाडी स्टेशनात पोचताच अर्नेस्टने सामान भराभर बाहेर फेकण्यास सुरुवात केली.

मी म्हटले, " असे ग का हा करतो ?"

त्याची बायको म्हणाली, " डबा रिझर्व करण्याची काही भानगड आहे."

पुण्याहून मुंबईस जाताना पुन्हा गर्दीचा तोच त्रास झाला. पण पुन्हा अर्नेस्टचे डोके चालू लागले. पुन्हा त्याने डबा रिझर्व केला. आता

डबा आमच्या बापाचाच. आम्ही सर्वांनी आपापल्या पथाऱ्या सोडून पांघरुणे घेऊन पसरलो. अर्नेस्ट मात्र एका कोपऱ्याला बसून होता.

पुणे सोडले. पुढच्याच स्टेशनवर एक जण जाणता आला. त्याने अर्नेस्टचे खरे स्वरूप ओळखले. जाणत्याच्या मागोमाग माणसांची रीघ लागली ! डबा तोंडोतोंड भरला. आमचे सामान गुंडाळता गुंडाळता आमची पुरेवाट झाली. कशा तरी वळकट्या गुंडाळून ठेवून आम्ही पहाटेपहाटेपर्यंत वेळ मारून नेली. मुंबईजवळ आल्यावर दुधाच्या कावडी आत शिरू लागल्या. मला हसू लोटले. डॉक्टरचे तोंड पाहण्यासारखे झाले.

दत्तूला सांगितल्याप्रमाणे तो आम्हाला गाठण्यासाठी आला. बरोबर भास्करराव उजगरे होते. दोघांनी ठरविले की मुंबईच्या शिवेपासून आपण ह्यांच्याबरोबर असलेले बरे. म्हणून हे शीव स्टेशनवर येऊन आमच्या गाडीची वाट पाहत उभे राहिले. पण गृहस्थांनी टाइमटेबल पाहण्याचे श्रम घेतले नाहीत. त्यामुळे आमची गाडी शीव स्टेशनवर न थांबता सुळकन पुढे निघून गेली.

तेव्हा त्या दोघांची पाहण्यासारखी तोंडे आम्हाला गाडीतून पाहण्यास मिळाली. म्हणजे आता वराच्या अगोदर वऱ्हाडी पोचले. भायखळ्यावर माझ्या सांगण्याप्रमाणे आमचे व्याही आम्हाला सामोरे आले होते– पण दत्तू बरोबर नसल्याने माझे मन खट्टू झाले होते.

आम्हाला मेथाडिस्ट मिशनच्या मुलींच्या शाळेत जागा मिळाली होती. ही शाळा जेकब सर्कलकडे आहे. व्याही बेलासीस रोडला राहत होते. आम्ही मुंबईस पोचल्यावर पुष्कळ लोक भेटायला आले.

माझे व्याही व विहीण दोघेही सुज्ञ. जेवणाचा व टी-पार्टीचा खर्च आम्ही दोघांनी मिळून करायचा ठरले. एकेकाला दीडशे दीडशे रुपये खर्च आला. तोही त्यांच्याच जवळून उसना घेतला. ते पैसे पुढे लौकरच मी फेडले.

नवऱ्या मुलीचे आई-बाप आमच्याकडे राहण्यास आले. मुलगी मात्र आपल्या घरी होती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळचे लग्न. मुलीचे आई-बाप लग्नाच्या दिवशी आपल्या घरी गेले. लग्नाच्या वेळी मुलगी वेळेवर

देवळात आली. आम्हीही वेळेवर निघालो, पण ट्रॅम मिळेना तेव्हा पायीच निघालो. गाडीही लवकर मिळेना.

शेवटी नवरा मुलगा पळत पळत पुढे गेला ! कारण ठरलेली घटका भरत आली होती. आम्ही मागाहून पोचलो. टिळकांनी आपल्या नवीन विवाहपद्धतीप्रमाणे लग्न लावले. त्यांनी केलेली मंगलाष्टके म्हणण्यात आली. ती म्हणायला पाटणकर, जाई, माझा भाचा, भास्करराव उजगरे वगैरे निरनिराळ्या प्रकारची माणसे होती.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी नवरानवरी हनीमूनसाठी माथेरानला गेली. व्याही विहीणही हवा बदलण्यासाठी निघून गेली. जाताना त्यांनी आपले सामानसुमानही नेले. आता आम्ही बारा-चाळीमध्ये आमच्या वऱ्हाडासह बसून राहिलो. सकाळी चहासंध्येची वेळ झाली तेव्हा आम्हाला सातारा आठवला. शेळीचे कान बोवाजीच्या हाती, ही म्हण आम्हाला आता आठवली. मुलाच्या बिऱ्हाडाकडे थोडीबहुत पंधरा दिवसांची तरतूद केलेली होती. पण उपयोग काय ? मुलाचे घर भायखळ्याला आणि घराची किल्ली माथेरानला.

कालच येथे वऱ्हाड्यांना लाडू, साखरभात आणि आज पळीभर चहाचे पाणी नाही ! मी दगदगीने अंथरूण धरले होते, पण मनातल्या मनात प्रार्थना करीत होते. डॉ. गोवंड्यांनी मला लुगड्यासाठी पंधरा रुपये पाठविले. त्याच पैशांतून मी भटाऱ्याच्या रोट्या मागविल्या. लाडू व भजी होतीच उरलेली. अशा रीतीने आमचा फराळ झाला. निम्मे-अर्धे भाडे देऊन काही वऱ्हाड लावून दिले, बाकी राहिले ते तीन दिवस मुंबईत मुक्काम करून राहिले. मुंबईच्या वस्तीच्या दहा-बारा माणसांना दोन वेळेस चहा व दोन वेळेस जेवण म्हणजे काही सोपी गोष्ट नाही.

पण तेथे बारा-चाळीत सदाशिवराव देठे ड्रॉइंगमास्तर राहत होते. ते, त्यांची बायको, पदरी चार मुलेबाळे. त्यांचे घर आमच्या जानोसघराजवळच होते. ज्या गृहस्थांनी माझा आणि दत्तूचा बाप्तिस्मा केला होता त्यांचे हे जावई. त्यांचे घर फारच लहान पण मन फारच मोठे आहे. त्यांनी आमचा पाहुणचार अंगावर घेतला. बायकोने करावे व त्यांनी ते आम्हाला आणून वाढावे. सदाशिवरावांचे व कृपाबाईंचे जे

माझ्यावर उपकार झाले ते मी जन्मभर विसरणार नाही.

काना नावाच्या गावी एका लग्नसमारंभात येशूने द्राक्षारस संपला असता चमत्कार करून नवीन द्राक्षारस तयार केला तसे माझे झाले. दत्तूने बेंजीला सांगून ठेवले होते, की परत निघताना आईला बँकेतून पन्नास रुपये आणून दे. त्याने थोडे आढेवेढे घेतले पण शेवटी ते आणून दिले. आम्ही देवाच्या दयेचा भरपूर साठा घेऊन सातारा गाठला.

मी स्वतः अडचणीत पडून दुसऱ्यास कशी खर्चात घालते ह्याचा आणखी एक दाखला खाली देते. लग्नाची केक मी महाबळेश्वरला मिसेस ह्यूम ह्यांच्याकडे पाठवून दिली व सांगितले की तेथे जमलेल्या सर्व मिशनरींना व ओळखीच्या इतरांसही द्या! खिरापतीसारखी ती थोडी थोडी वाटायची अशा समजुतीने मी एक स्लाईस त्यांच्याकडे पाठवून दिला. पण तशी रीत नाही. मिसेस ह्यूम ह्यांनी स्वतःच्या खर्चाने तेथे एक पार्टी दिली व त्यात माझा हा 'वेडिंग केक' चा स्लाईस वाटला.

असो. आम्ही सातारला येण्याच्या अगोदरच तेथे एक पाहुणे सहकुटुंब आमची वाट पाहत बसले होते. हे रे. मि. मलेलू व त्यांची बायकोमुले. उन्हाळ्यासाठी हवा बदलायला म्हणून ते आमच्या घरी आले होते. रे. मलेलू हे माझ्या सुनेच्या आतेचे यजमान. त्यांची सात माणसे, त्यांची नोकरीण व आमची तीन-चार माणसे व नाम्या अशी घर भरून आम्ही माणसे झालो. लग्नासाठी जो बाजार भरून ठेवला होता त्याचा चांगला उपयोग झाला. पाहुणेमंडळींचे करायलाही मी, बेबी, चिकी व नाम्या चांगले दणदणीत, खणखणीत होतो. नाम्या एकसारखी भांडी घाशी व दळू लागे व मी एकसारखी चुलीशी लागे.

ग्रेस, मनू, चिकी, बेबी ह्या मधूनमधून हातभार लावीत. असो. पण आमचे हे दिवस सुखात, आनंदात गेले. टिपातले धान्य बुडाला चिटकले; पावसाळा डोकावू लागला; सुट्टया संपल्या; पाहुणे ओसरले. हनीमूनहून मुंबईस जाण्यापूर्वी रूथ व दत्तू एक दिवस सातारला आले. त्यांना पाहून आम्हाला अतिशय आनंद झाला.

माझी सून बी. ए. झाली, पण तिला घरकामाचा मुळीच कंटाळा नाही. आपल्या आईसारखीच तीही कामसू व व्यवहारदक्ष असल्याचे

पाहून आम्हाला फार आनंद वाटला.

नाम्याने मुंबई प्रथम दत्तूच्या लग्नातच पाहिली. त्याला वाटू लागले– आपण पुन्हा जावे मुंबईला. दत्तू व रूथ जायला निघाले तेव्हा तो हटून बसला. मग त्याची कशीतरी समजूत केली. त्याने जे जे मागितले ते ते त्याला कबूल केले.

" अंगठी पाठवाल ? बूट पाठवाल ? आणि रिस्ट-वॉच ? टोपी ?"

" हो, मी हे सर्व तुला मुंबईस गेल्याबरोबर पाठवीन."

हे सारे पाठविणे कठीण नव्हते. दोन-चार आण्यांत सारे सामान येण्यासारखे होते ! दत्तू गेल्यावर नाम्याला मोठी काळजी पडली. तो म्हणे, " भाऊ ह्या जिनसा पाठवितील त्या साऱ्या मधल्यामध्ये पोस्टाच्या शिपायाने घेतल्या तर ?"

त्याची कितीही समजूत केली तरी त्याचे आपले तेच खरे असे. तो काहीतरी भांडण काढी. मुंबईस जायला काहीतरी निमित्त काढायला त्याला पाहिजे होते.

एक दिवस चिकी परातीत मडके ठेवून ते धूत होती. त्याने तिच्याकडे पाहून काही विचार केला. मग मान तुकवून म्हटले,

" काय कलतेस ? मलके बुलेल ना पाण्यात !"

मी म्हटले, " बुडू दे. पपा आता गावाहून पुष्कळ मडकी आणतील !"

" खलं ? किती आणतील ?"

" गाडाभर मडकी आणतील."

" मग मी जातो शेशनवल ! ती मलकी घली कोण आणील जपून ?"

हो हो करता करता मला पुरेवाट झाली. शेवटी नाम्याला त्या मडक्यांची एवढी काळजी वाटू लागली की तो उपाशीच उठून स्टेशनवर चालता झाला.

त्या वेळेस रिक्रूटभरती होती. त्यात नामा लढाई करण्यासाठी भरून निघून गेला. हा वेडा आहे, ह्याला काही कळत नाही असे टिळकांनी पुष्कळ सांगून पाहिले; पण काही उपयोग झाला नाही.

मुंबईस गेल्यावर मात्र "आपल्याला लढाईचे काही सांगितले नाही– साहेबाचा पंखा ओढायचे काम आहे म्हणून सांगितले," असा त्याने जबाब दिला व तेथून त्याला हाकलून देण्यात आले. नाम्याची गोष्ट येथेच संपली. पुढे जनसमुद्रात हा बिंदू कोठे गडप झाला काही कळले नाही.

## ७८ : चिकी

रामभाऊ धर्माधिकाऱ्याविषयी मी मागे वेळोवेळी सांगितलेच आहे. रामभाऊचे लग्न झाले. नंतर तो आमच्याकडे जवळजवळ येईनासा झाला. त्याला एक मुलगी झाली. ती मुलगीही कधी त्याने आमच्याकडे आणली नाही.

रामभाऊला आमच्याबद्दल फार प्रेम व आदर वाटे, पण त्याच्या बायकोला ते खपत नसे. ती म्हणे, हे कोण आपल्या प्रेमाचे वाटेकरी ? हे काही आपल्या नवऱ्याचे नातलग नाहीत की कोणी नाहीत. मग ह्यांच्याकडे त्याने एवढे जाणे येणे कशाला ठेवावे ?

पण ईश्वरी योजना काही वेगळ्याच असतात. रामभाऊची ती बायको वारली. ज्या मुलीचे नख आमच्या दृष्टीस पडू नये अशी तिची खटपट असे त्याच तिच्या मुलीला आमच्यावाचून आधार राहिला नाही. चिकीला रामभाऊने आमच्या घरी आणून सोडले व तोही आमच्याकडे राहू लागला.

चिकी आमच्याकडे आली तेव्हा अगदी लहान होती. तिला आमच्या सगळ्यांचा फार लळा होता. स्वभावाने ती आपल्या बापाप्रमाणेच प्रेमळ व त्याच्याचप्रमाणे थोडी बढाईखोर होती. मनात दुष्टपणा इतकाही नसे. हौस फार, पण तिची हौस कोणी चालू देत नसत. कित्येक तिला हिडीसफिडीस करीत. कोणी तिच्याकडे दुर्लक्ष करीत.

पण एवढ्यामुळे तिला फार वाईट वाटे. ती टिळकांना नाहीतर मला चिकटून चिकटून राही.

तिला शाळेत घातले होते, पण वर्गात तिचा नंबर नेहमी शेवटचा राही. तिचे सारे लक्ष घरात व खेळण्यात असे. टापटीप करावी, तोंड चक्क धुवावे, जरा जमेल तेथे नखरे करावे व साऱ्यांशी अतिशय प्रेमळ-पणाने वागावे असा तिचा स्वभाव होता.

आम्ही साताऱ्याला आलो तेव्हा तीही आमच्याबरोबर साता-ऱ्याला आली; येथेही ती शाळेत जात असे. पण उरलेला वेळ ती माझ्या मागे मागे राहून मला साहाय्य करायची.

चिकीला आपल्या आजाआजीचा थोरपणा दाखविण्याला फार आवडे. तिला कोणी विचारले की चिके जेवलीस का ग? काय केले होते आज जेवायला? तर लागलीच तिने थोरामोठ्यांच्या घरी शोभ-णाऱ्या पदार्थांची जंत्री द्यावी. बाकी इकडे आम्ही भाजीभाकर का खाल्लेली असेना.

एकदा मी सहज पशाचे पुरण घातले. चिकीने जाऊन साऱ्या मास्तरणींना आमंत्रण दिले! माझ्यावर तिचा फारच जीव होता.

एकदा तिला मास्तरणींनी सांगितले, "अग चिके, तुझी आजी मेली."

ती इतकी भोळी होती, की मी मेल्याचे ऐकताच पाटीदप्तर शाळेतच टाकून ती ओक्साबोक्सी रडत घरी आली.

मी विचारले, "चिके, का रडतेस? घरी का आलीस?"

तेव्हा तिने सांगितले, "आजी, तू मेलीस म्हणून रडते. मला मास्तरणींनी असे सांगितले."

एकदा ती कविता पाठ करीत होती, "नीज न ये तर गीत म्हणावे– कोण करी हे जीवे भावे ती माझी आई." ती ही कविता आळ-वून आळवून म्हणत होती तसतशा माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा पडत होत्या. तिने ते पाहताच धावत येऊन माझ्या गळ्याला मिठी मारली,

"आजी, तू का ग रडतेस?"

"बाई, तुला आई नाही म्हणून रडते."

" आजी, तूच नाहीस का माझी आई ? तू नसतीस तर मी कुठे असते ?"

तिच्या ह्या गोडपणाने माझे अश्रू थांबले नाहीत. अधिक जोराने वाहू लागले.

साताऱ्यास एक सुखवस्तू आया एका मिशनरी बाईंच्या कृपेने राहत असे. तिला त्या मिशनरी बाई पेन्शन देत असत. ही म्हातारी माझ्या फारच उपयोगी पडे. काम नसल्यामुळे तिने आमच्याकडे बराच वेळ घालवावा. माझ्या जन्मस्वभावाप्रमाणे मीही तिला हाताशी घेऊन तिच्याकडून शिवण, टिपण, निसण ही कामे करून घ्यावीत. तीही चहा तर कधी जेवण आमच्याकडे उरकीत असे. मधूनमधून पैसेही तिला आमच्याकडून मिळत.

मातृदिनाच्या दिवशी काही तळणे तळले होते. त्या दिवशी तो पदार्थ तिला दिलाही होता. कढई मात्र तशीच चिंच घालून उकळत ठेवली होती. आतमध्ये एकीकडे मी भाजणी भाजीत बसले होते, तर बाहेर आयाबाई व चिकी निवडीत बसल्या होत्या.

आयाबाईने चिकीला विचारले, " आजी काय करते ग ?"

चिकी फुकट मिजासी ! तिने सांगितले, " माझा दत्तूकाका येणार आहे, त्याच्याकरिता आजी लाडू, अनारसे, करंज्या, शंकरपाळे वगैरे फराळाचे करते आहे. "

चिकीने तिच्या हातात हे कोलीत देताच त्याची उष्णता तिच्या एका ढिल्या स्क्रूमधून डोक्यात शिरली. तिच्या डोक्याने घेतले की ही बाई हे फराळाचे आपल्याला चोरून करीत आहे.

इतक्यात टिळकांच्या चहाची वेळ होऊन ते आपल्या तयारीला लागले. त्यांची चहाची तयारी म्हणजे ते एक बडे प्रकरण असे. मात्र ते तो बहुतकरून स्वतःच करून घेत. मी स्वयंपाकघरात भाजणी भाजीतच होते. इतक्यात आयाबाई आत आल्या,

" काय करता बाई ?"

" काही नाही. दत्तू येणार म्हणून भाजणी भाजून ठेवते. त्याला थालीपीठ फार आवडते. "

" नाही म्हटले, तुम्ही जरी काही केले तरी आम्हाला थोडाच पैसा द्यावा लागतो ! तुमचा मुलगा ! पैसा तुमचाच ! करणार तुम्हीच ! ह्या कढईत काय आहे ?"

" काही नाही. परवा भजी तळली तीच आहे. ती अजून तुम्हाला घासायला दिली नाही."

" वा ! मी तर घासली ती त्या दिसी. "

" नाही हो. मी ती उकळत ठेवली आहे. तुम्हाला चोरून काय करायचे ? तुम्ही का थोडेच उचलून नेता ?"

" नाही हो ! मुलं कधी खोटं बोलत नसतात. बाकी माझे काय हो ! पण मुलांची साक्ष सरकारातही बरोबर धरतात."

" म्हणजे तुम्ही काय म्हणता मला नाही कळत !"

" नाहीच कळणार ! पण लेकरूच ते. त्याला काय कळते ? कोणत्या गोष्टी सांगाव्या, कोणत्या गोष्टी सांगू नये ह्याचा काही मुलांना सुमार का असतो ?"

" म्हणजे चिकीने काही सांगितले की काय ?"

" चाललेच आहे ! तिचा तरी काय दोष ? जे खरे तेच लेकरू बोलणार ! तिला बिचारीला तुम्ही सांगून ठेवायला हवे होते, की असल्या गोष्टी बोलू नये."

" कोणत्या गोष्टी ? तुम्ही काय म्हणता ?"

" काही नाही. तुमचा मुलगा येणार त्यासाठी तुम्ही जे जे पदार्थ केले ते ते तिने सांगितले. त्यात तिचा काय दोष ?"

" अहो, दोष कोणाचाच नाही ! पण तुमच्या खोपडीत हे काय शिरले कळत नाही. "

" नाहीच कळणार. पोरीचा काय दोष ! ती खरेच बोलणार !"

इतका वेळ टिळक शांत होते. आमचे हे बोलणे त्यांना ऐकू जात होते. त्यांनी चिकीला हाक मारली.

" तू हे काय सांगितलेस ?"

चिकी काही बोलेना. मी म्हणाले,

" तिला आपल्या घरातील थोरवी गायला आवडते. ती असा

मोठेपणा नेहमी सांगत फिरते. त्याचे काय मनावर घ्यायचे?"

"म्हणजे? उद्या ती सांगत फिरेल की आजोबांनी कोणाचे डबोले चोरून आणले."

चिकीचा हात पकडून टिळकांनी तिला ठोक देण्यास सुरुवात केली. आयाबाईंचे गाणे सुरू झाले.

"जाऊ द्या साहेब! ती का खोटे बोलते? मुले नेहमी खरे बोलतात."

"बाई, तुम्हाला काही अक्कल नाही. उद्या ती माझ्यावर काही नसती तोहमत घेईल."

"त्यात काय साहेब? आधी लेकरांना बोलू नको म्हणून सांगून ठेवले म्हणजे मग ती थोडीच बाहेर बोलतात?"

जो जो टिळकांचा रागाचा अग्नी भडकू लागे तो तो ती बाई आपल्या शहाणपणाचे एक-एक दांडूक आत टाकी. त्या आगीवर मधल्या-मध्ये चिकीच्या पाठीचे धिरडे मात्र चांगले चुरचुरू लागले. शेवटी मी चिकीला ओढून घेतले.

"तिचा जीव घेता का काय? दुसऱ्याच्या रागावर आपले मूल का म्हणून आपटावे?"

"तुझ्या लाडानेच पोरगी बिघडली आहे."

"साहेब, का मारता बिचारीला? आणि काय झाले त्यात? तुमचा मुलगा येणार तेव्हा केले फराळाचे! माझे का काही म्हणणे आहे त्यात?"

"बाई महामूर्ख आहे!" असे म्हणून टिळकांनी चिकीला मोरी-वर नेऊन तिचे तोंड धुतले व तिला जवळ बसवून तिच्या पाठीवरून हात फिरवीत तिला चहा दिला व आयाबाईच्या पुढेही एक कप ठेवला.

## ७९ : नव्हे ख्रिस्ती ख्रिस्ती । परि ख्रिस्त ख्रिस्त ।।

टिळकांच्या आयुष्याचे हे शेवटले वर्ष. परंतु हे एकच वर्ष पुष्कळ दृष्टीने दहा वर्षांच्या किमतीचे होते. ते म्हणत, आपल्या देशाची खरी उन्नती ख्रिस्ताचे शिक्षण आचरणात आणल्याशिवाय होणार नाही, व हिंदुस्तान ग्रंथापेक्षा किंवा पंथापेक्षा व्यक्तीकडे अधिक लक्ष देतो.

**" नव्हे ख्रिस्ती ख्रिस्ती परी ख्रिस्त ख्रिस्त !**
**पाहिजे संतत उभा केला "**

असे ते आता आपल्या धर्मबांधवांना सांगू लागले व ख्रिस्ताला त्यांची अशी प्रार्थना असे की,

**" माझा आत्मा जसा आरसा पाहो जन त्यामाजि तुला ।**
**रहा विचारी, मम उच्चारी, आचारी तू रम विमला ! "**

ह्या विचारसरणीमुळे त्यांचे व त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचे पटेनासे होई. ख्रिस्ती माणूस ख्रिस्तासारखा पाहिजे व हिंदी ख्रिस्ती माणूस पौर्वात्य ख्रिस्तासारखा असायला पाहिजे, असे ते म्हणत ; व प्रथम तसे होण्याचा स्वतः आपणच आटोकाट प्रयत्न त्यांनी सुरू केला. ह्या वर्षाची त्यांच्या जीवनक्रमाची तयारी आधी दहा वर्षांपासून चालली होती.

त्यांनी दहा-बारा वर्षांपूर्वी म्हटले होते–

**" पुष्कळ अजुनी उणा प्रभू मी पुष्कळ अजुनी उणा**
**खंडीतुन रति नाहि फेडिले बंधुभगिनिंच्या ऋणा ।**
**तुझा ऋणी तर सदाच राहिन अगा पतितपावना ! "**

हे उणेपण नाहीसे करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केलेला होता. त्यांनी जन्मतःच आणलेले कित्येक दोष ह्या काळात हळूहळू

स्मृ... ३१

नाहीसे होत होत ह्या शेवटल्या वर्षांत अगदी नाहीसे झाले होते, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. त्यांचा रागीट स्वभावच उदाहरणार्थ घेतल्यास ते स्वतःचा अपमान झाला म्हणून पूर्वीसारखे एकदाही रागावलेले दिसले नाहीत. मात्र ह्या रागाचे रूपांतर सात्त्विक संतापात कित्येक वेळेला होत असे.

टिळकांना आता पगारी काम नव्हते. लिहिण्यावर थोडेसे पैसे कधी कधी मिळत तेवढेच. गरिबी आमची पहिल्यापासूनच असे. तशीच ती आताही होती. मात्र आताच्या गरिबीत व पूर्वीच्या गरिबीत एवढे अंतर होते की आता आम्हाला कर्ज नव्हते. देवाच्या कृपेने माणसे पूर्वीप्रमाणेच आताही भरपूर होती. भिन्न जातींचे, भिन्न धर्मांचे, भिन्न विचारांचे व एका दिलाचे संमेलन आमच्या घरी होते. त्यात कोणी धर्माचा विचार करणारे, कोणी केलेले तर कोणी ख्रिस्ती झालेले असत. दररोज दोन वेळेला आमच्या घरी भजन होत असे. त्यासाठी एक तास आणला होता. तो वाजला की वाडीतील माणसे जमत. कधी कधी गावातील माणसे येत. दारावरून जात असला तर तो येऊन बसे.

पैशाच्या अभावामुळे टिळक भगव्या कफन्या घालू लागले. कारण त्यामुळे धोब्याचा खर्च वाचला. त्या कफन्याही त्यांनी जुन्या धोतरांच्या बनविल्या होत्या. सर्व मंडळी बसून भजन करीत.

टिळक मात्र उभे राहत. प्रत्येकाजवळ झांज, चिपळा असत. कोणी तबला किंवा नाल वाजवी. कधी कधी टिळक पायांत चाळ बांधून तल्लीन होऊन नाचत. " ब्रह्मानंदी लागली टाळी । कोण देहाते सांभाळी " अशी त्या वेळी त्यांची व सर्व श्रोत्यांची आणि भजनीमंडळींची स्थिती होऊन जाई व हे भजन कितीतरी वेळ चाले.

आमच्याकडे जाती, वय, धर्म, अधिकार ह्यांचा भेदाभेद नसे. ब्राह्मणापासून भंग्यापर्यंत कोणीही येऊन भजनाला बसे. ख्रिस्ती लोक येत व त्यांत मिशन कामदारही असत. मिशनमध्ये काम न करणारे असेही ख्रिस्ती लोक असत. जे कोणी येतील ते सर्व आम्हाला आमचे सगेसोयरे वाटत. दुजाभाव मुळी राहतच नसे. ह्यातच एक ख्रिस्ती येत असे. तो मिशनमध्ये कामाला नव्हता. आमच्याप्रमाणेच तोही नगरहून

येथे आला होता. पुढे तो मेसेपोटेमियात लढाईवर गेला. आम्हाला त्याची नेहमी आठवण होई. मात्र त्याच्याकडून काही वृत्त कळले नाही.

एक दिवस सरकारी पत्र आले की सो अँड सो ह्याचा वारस कोण आहे हे कळवावे. पत्र वाचता वाचता टिळकांचे डोळे भरून आले. मला समजल्यावर मलाही चैन पडेना. टिळक म्हणत, तो मेला असेल. मी म्हणे, नाही. तो कोठेतरी भयाने लपला असेल. पण तो लप-णारा मुलगा नाही असे टिळकांचे ठाम मत होते.

मला तो आई म्हणे व तसाच तो माझ्याशी वागेही. त्याचे बोलणे, बसणे, वागणे वगैरे एक एक गोष्ट आठवून मी दिवसभर रडत होते व एकीकडे गृहकृत्ये करीत होते.

दुसऱ्या दिवशी कशीतरी भातभाजी केली. जिकडे-तिकडे त्रिभुव-नात तोच दिसत होता. जाताना तो येथेच जेवला होता. आज त्याची काय वाट झाली असेल ! दिडाचा सुमार. आम्ही दोघे एकमेकांची सम-जूत करीत होतो. जेवायला आम्ही बरोबरच बसलो. पुन्हा दोघांच्या डोळ्याला पाणी आले तोच दारी ' आई ' अशी हाक आली. पाहते तो तोच.

मी मोठ्याने म्हणाले, " अहो मेला होता तो आता जिवंत झाला. "

आता आम्हाला दुःखाश्रूंबरोबर गिळवत नसलेली तीच भाजी-भाकरी आनंदाश्रूंबरोबर अमृतासारखी वाटली. जाताना त्याच जागी बसून त्याने तीच भाजीभाकरी खाल्ली होती. आजही तसाच प्रसंग. मात्र आजच्या भाजीभाकरीत अमृत होते. आता हे गृहस्थ-अमृतराव त्रिभुवन– नगरास मोठे वकील झाले आहेत.

सातारला आमच्या बंगल्याजवळच मिशनरींचा बंगला होता. त्यात राहणारे मिशनरी मोठे प्रेमळ होते. पण त्यातील एका मिशनरी बाईंना डिसिप्लिनचे फार वेड असे. ठराविक वेळात ठराविक गोष्टी झाल्या पाहिजेत व त्या ठराविक पद्धतीनेच झाल्या पाहिजेत अशी काही काही मते डिसिप्लिनवाल्यांची असतात व त्यांचे आणि भावना-प्रधान लोकांचे बहुतकरून कधी पटत नाही. तसेच येथे झाले.

टिळकांकडे घंटा घंटा भजन चाले, ते ह्या बाईंना खपेना. त्यांनी आपल्या कामगारांना आतून ताकीद दिली की भजनाला जायचे नाही. पण ही मंडळी बाईंच्या ताकीदीला धाब्यावर बसवून भजनाला येऊ लागली. तशी बाई अधिक चेतली. त्यांनी एक-दोन नोकरांना घरी बसविले. टिळकांनी त्यांना ताबडतोब दुसरी कामे लावून दिली !

ह्यावरून पुढे युद्धकांडाला सुरुवात झाली. बाईला वाटे, आपले नोकरलोक आपल्यापेक्षा टिळकांना अधिक मान देतात. आपले वजन कमी झाले. टिळकांना वाटे आमच्या ख्रिस्ती लोकांना बाईने गुलाम बनविले. त्याच वेळेला टिळकांनी हा अभंग लिहिला आहे–

**नव्हे हिंदुस्तान लेकुरांच्या चेष्टा । नव्हेत प्रतिष्ठा भंडांच्या या ।**
**इथेच जहाले महाधर्मवीर । जया थराथर विश्व कापे ।**
**श्रद्धा हेच ज्यांचे जीवितसर्वस्व । आपुले विश्व घर ज्यांचे ।**
**इथे नाचवून भलतीच सोंगे । करुनीया ढोंगे अर्थ काय ।**

ह्या आगीत माझ्याकडून तेल ओतले गेले. चर्चमधील एका सभासदाला त्याच्या अयोग्य वर्तनामुळे बहिष्कृत केलेले होते. त्याने आपले वर्तन सुधारले होते व परत चर्चमध्ये यावे अशी त्यांची इच्छाही होती. पण त्याची जाहीर माफी वगैरे डिसिप्लिनला लागणारे विधी करण्यास तो तयार नव्हता; व वर उल्लेखलेल्या मिशनरी बाई काही त्याला आत येण्यास संमती देईनात व त्यामुळे त्यांच्या हाताखालचे लोक मनात असूनही त्यांच्याप्रमाणे बोलत.

एक दिवस टिळक बाहेरगावी गेले असता त्यांच्या पश्चात नगरहून डॉ. ह्यूमचे पत्र आले की लोकांची समजूत करून ह्या माणसाला परत चर्चमध्ये घेण्याची व्यवस्था करा. कारण त्याचा अशा रीतीने त्याग केल्याने तो आणखी बिघडेल.

मला डॉ. ह्यूमचे म्हणणे पटले व टिळक येण्याच्या आधीच मी ते काम माझ्या अंगावर घेतले.

एका मिशन कामगाराला विचारले तेव्हा तो म्हणाला, " बाई, आमचेही मत तुमच्यासारखेच आहे, पण बाईसाहेबांपुढे आमचे काही

चालत नाही. तुम्ही पुढाकार घेतला तर होईल हे काम.

मी बाईसाहेबांना म्हटले तर त्या म्हणाल्या, " बाई, ह्या मंडळीच्या भानगडी आपल्याला काय करायच्या ? आपण ह्यांच्यात न पडणे हेच बरे. "

मी घरी आले व पुढील मार्ग मला सुचवावा म्हणून नम्रभावे परमेश्वराची प्रार्थना केली. तो रविवार होता. संध्याकाळच्या उपासनेच्या वेळी मी पाळकांना चिठ्ठी पाठविली. पाळकांनी वाचून दाखविली.

" मला देवाचा संदेश द्यावयाचा आहे, तरी उपासना संपल्यावर पाच मिनिटे कृपा करून सर्वांनी थांबावे– आपली आजी."

बायबलमधून योहानाचा आठवा अध्याय–आरंभाचा भाग एका मुलाकडून वाचून घेतल्यावर मी आठव्या वचनापाशी थांबले.

" तुम्हांमध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिजवर दगड टाकावा. " ख्रिस्त पाप्यांस तारायला, पाप्यांस वर काढायला आला. पाप्यास तुडवायला आला नाही. तुम्हाला माणसाची किंमत आहे का आपल्या स्वतःच्या मोठेपणाची ? ह्या माणसाने तुमची लेखी माफी मागून तुम्ही तिचे प्रदर्शन करण्यात मोठेपणा आहे का ? त्याच्या पश्चात्तापाने निर्मळ झालेल्या अंतःकरणावर तुम्ही अशा रीतीने डागण्या देण्यास उठला आहा. "

सर्व म्हणायला लागले, ह्या बाईला पाच मिनिटे बोलण्यास वेळ दिला काय आणि हिने हे चालविले आहे काय ? पण परिणाम चांगला झाला. त्या माणसाला मंडळींत घेतले. टिळकांना व डॉ. ह्यूम ह्यांना फार आनंद झाला. त्या बहिष्कृताला पुढे लौकरच मी एक बायको मिळवून दिली व तो सुखाने संसार करू लागला. मात्र आमच्या डिसिप्लिन-लव्हरला माझे हे कोणतेच कृत्य पसंत पडले नाही. माझ्यावर दुहेरी राग झाला; कारण त्याला मंडळींत घेतला, इतकेच नाही तर त्याचे लग्नही मी करून दिले.

ह्या गृहस्थाच्या चार मुली बोर्डिंगात होत्या, त्या एक दिवस घरी आल्या. त्यांना बोर्डिंगमधून काढून टाकण्यात आले. टिळकांनी त्यांची ताबडतोब पुण्यास व्यवस्था केली ! आम्हाला आता हायसे

वाटले, तो त्याची पाचवी मुलगी ह्याच बाईकडे मास्तरीण होती तिला कामावरून बसविले. तिला सांगितले, "तू जा आजीबाईकडे. त्या देतील तुला काम !"

ती आली मजकडे रडत. मी तिची समजूत केली, "देव गरिबांचा वाली आहे. तू जा. काही काळजी करू नको."

मनात माझा सारखा धावा चालला होता. दुसऱ्याच दिवशी मजाकडे नगराहून एक पाहुणी आली. तिचा मुलगा शंभर रुपये मिळवता होता. त्याचे लग्न झालेले नव्हते.

बाईने मला एखादे स्थळ आहे का म्हणून विचारले. मला फार आनंद वाटला. घरबसल्या स्थळ आले. मी तिची विहिणीप्रमाणे बडदास्त ठेविली. तिला मुलगी आणून दाखविली, मुलगी पसंत पडली व लौकरच लग्नसमारंभही झाला.

अगदी पहिल्यापासून आम्हाला दोन गोष्टी मिळत गेल्या. बिनभाड्याचे घर व गावात अगदी घरच्यासारखा डॉक्टर. नगरास डॉ. सोराबजी, साताऱ्यास डॉ. केळकर, पुण्यास डॉ. गोरे, मुंबईस डॉ. दांडेकर व आता नाशकास डॉ. गुप्ते.

एक दिवस गावात माझे कीर्तन व्हावयाचे होते. पण आदल्या दिवशी मला बराच ताप आला. टिळकांनी डॉ. केळकरांना चिठ्ठी पाठविली, तिला बरे नाही–ताबडतोब या. चिठ्ठी संध्याकाळी गेली. डॉक्टर घरी नव्हते. कोठे खेड्यावर गेले होते. घरी येताच टिळकांची चिठ्ठी ! बरे काय होते काय नाही हे चिठ्ठीत काहीच नाही. रात्री दहाचा सुमार. डॉक्टरसाहेबांच्या हाताखाली त्या वेळेस माणूस नाही. पोटात कावळे कोकलत होते. बरोबर काय काय औषधे घ्यायची हे ठरविता येईना.

तेव्हा मला जेवढे रोग होणे शक्य होते तेवढ्यांची आठवून आठवून त्यांनी औषधे व आयुधे एका भल्या मोठ्या बॅगमध्ये भरली. टांगा होता पण टांगेवाला नव्हता. तेव्हा टांगा स्वतःच जोडला. ती बॅग टांग्यात ठेवली व डॉक्टरसाहेब टांगा स्वतःच हाकलीत आमच्या बंगल्यावर आले. त्या वेळेपर्यंत माझा ताप उतरला होता.

डॉ. म्हणाले, "अग थेरडे, तुला झाले होते तरी काय ? साप

डसला का कॉलरा झाला का झाले तरी काय ? मी किती घाबरून गेलो ! "

मला हसू येऊ लागले व वाईटही वाटले. मी म्हटले, "डॉक्टर, माझे आहे उद्या कीर्तन. तेव्हा म्हटले तापबीप नको उद्या यायला."

डॉक्टरने औषधाऐवजी आपल्या हातातल्या छडीचे दोन तडाखे माझ्या पाठीत लगावले. अर्थात ते प्रेमाचे असल्याने त्यावर त्यांना पुन्हा औषध चोळावे लागले नाही. मग डॉक्टरांनीच मला कंजी करून पाजली.

दुसऱ्या दिवशी माझे कीर्तन झाले व कीर्तनास दुसरीकडचीही आमंत्रणे येऊ लागली. फ्रिच्ले नावाच्या एका युरोपियन गृहस्थांचेही आमंत्रण आले. फ्रिच्ले मिशनरी नव्हते. एक शिल्पकार होते. त्यांना कोणी आमच्याबद्दल सांगितले होते. ते अत्यंत धार्मिक वृत्तीचे गृहस्थ असल्याने त्यांनी आम्हाला बोलावले.

दत्तूचे लग्न झाल्यानंतरचा हा पहिलाच नाताळ होता. दत्तूने सून-बाईसह सातारला यावे असे माझे मत होते– पण दत्तूचे पत्र आले की आम्हीच मुंबईस यावे.

टिळकांना आढेवेढे घेण्याची कधीच सवय नव्हती. त्यांनी हे म्हणणे ताबडतोब कबूल केले व आम्ही दत्तूकडे मुंबईस गेलो. आम्ही येणार म्हणून आठ दिवस बसून दत्तूने एका पुस्तकाचे भाषांतर करून पाऊणशे रुपये मिळविले होते. तीव्र जाणिवेनंतर दत्तूचा हा उद्योग पाहून टिळकांना त्याचे फार कौतुक वाटले.

आम्ही मुंबईस आलो. चिकी दत्तूकडेच होती. तारा सेंट कोलं-बियामध्ये राहत असून कॉलेजमध्ये जात होती. पहाटे आम्ही भाय-खळ्याला पोचलो. दत्तूने खाली येऊन सामान वर नेले. आत डोकावून पाहतो तो सूनबाईने पथारी धरलेली. तिला एक घोट पाणी जिरण्याची मारामार. पण मुलीचा आजार तिच्या आईबाबांना मानवलेला दिसला. आम्हालाही आनंद वाटला.

येताना मी तयारीने आले होते. तळणमळण तेवढे राहिले होते. ते बेबीने व चिकीने अंगावर घेतले. सुनेला काही येत नव्हते किंवा ती करण्याची टाळाटाळ करीत होती असे नाही; पण तिच्याच्याने काही

होतच नव्हते. तरी तिने तसेच मुलींना हाताबोटांशी धरून थोडे थोडे केलेच.

माझे कीर्तन होते तेव्हा मी त्या गडबडीत होते. हा आमचा सर्वांचा शेवटलाच नाताळ. आम्ही तो फार आनंदात घालविला. सुनेने सासऱ्याला कपबशा व केटली वगैरे चहाचे सामान नाताळचे बक्षीस दिले व मला लुगडे दिले. नाताळ झाला.

नव्या वर्षासाठी आम्ही लोणावळ्यास जाण्याचे ठरविले. येथे फ्रिच्लेसाहेबांनी आम्हाला भजन-कीर्तनासाठी बोलावले होते. पत्र-व्यवहाराने व एकदोन भेटींनीच त्यांची व माझी फार चांगली ओळख होऊन त्यांना टिळकांबद्दल अत्यंत आदर वाटू लागला होता.

लोणावळ्यास आम्ही नव्या वर्षाच्या आदल्या दिवशी गेलो. माझे कीर्तन झाले. रात्री वॉच नाईट झाली. १९१९ च्या पहिल्या दिवशी आम्ही फ्रिच्लेसाहेबांचेच पाहुणे होतो. दुसऱ्या दिवशी निघताना साहेबांनी टिळकांच्या हातात पाचशे रुपयांचा चेक ठेवला.

नंतर आम्ही पुण्यास गेलो. तेथेही माझी कीर्तने झाली. आणि आम्ही पाचशे रुपयांच्या गठडीसह साताऱ्याला पोचलो. आल्याबरोबर डॉ. अर्नेस्टचे अंधारात घेतलेले रुपये त्याला अंधारात परत केले व माझा जीव खाली पडला.

टिळक नेहमी प्रार्थना करीत की, " देवा, मला दरिद्री ठेव. मला पैसे नको."

मी प्रार्थना करी, " देवा, मला कर्ज नको." आमच्या दोघांच्या प्रार्थना देवाने ऐकल्या.

टिळकांची एक कविता आहे की, ' ह्या पैशाचे नकोत अमुच्या करांस हृदया चटके.' आमच्या दोघांच्या प्रार्थना परमेश्वराने ऐकल्या व त्याने त्या आमच्या दोघांच्या वृत्तीत फरक करवून ऐकल्या. मला पैसा हवासा वाटेना हे टिळकांच्या प्रार्थनेचे उत्तर व टिळकांनीं कर्ज करण्याचे सोडून दिले हे माझ्या प्रार्थनेचे उत्तर.

त्यांनी आता कर्ज करण्याचे अजिबात सोडून दिले. आता आम्ही कोणाचेच देणेकरी राहिलो नव्हतो व टिळकांच्या मागे मला किंवा

दत्तूला कोणाची पैही द्यावी लागली नाही.

इतके जरी झाले तरी माझा स्वभावच कुरकुऱ्या. मी म्हणे, " कोणती वेळ सांगून येत नाही. आपल्या हातापायांसाठी थोडेतरी पैसे जवळ असले पाहिजेत."

ते म्हणत, " ज्याने आमची जन्माच्या आधीपासून सोय केली आहे तो का आता करणार नाही ? काळजी करून तुला काय मिळते ?"

पाचशे रुपयांपैकी दोनशे रुपये कर्ज फेडले, शंभर रुपये देवाच्या दरबारात खर्च केले व दोनशे रुपये बाजूला टाकले व ह्या पैशाचा पुढे योग्य वेळी उपयोग झाला.

## ८० : छाया

सृष्टीने उग्र स्वरूप धारण केले. शेतकरी आपल्या काळीची मशागत करून पाळी गोपाळी करून बसले. सर्वांची दृष्टी चातकाप्रमाणे मेघमंडळाकडे लागून राहिली. 'फटाटोपो भयंकर:' ह्याप्रमाणे मेघ गर्जना करी. आकाशात चहूकडे धुराचे पोकळ फसवे ढग इकडून तिकडे सैरावैरा उनाड पोरांप्रमाणे धावत असत व ह्या पोरांना दृष्ट लागू नये म्हणून मध्येच किंचित कोठे बारीकसा तीट लावल्याप्रमाणे एखादा काळा ढग दिसे. पावसाचे पाणी नसल्याने जनतेच्या तोंडचेही पाणी पळाले.

मुसलमान ख्रिस्ती आपापल्या परीने परमेश्वराची प्रार्थना करीत होते. ब्राह्मण लोकांनी अनुष्ठाने आरंभिली. देवळातील देवांना पाण्यात कोंडले. गोरगरीब देवाला हाका मारू लागले, जनतेच्या अंत:करणाने ठाव सोडला, धारण कडकडली. आईला मूल जड झाले.

टिळकांचा सारा विश्वास प्रार्थना व उपवासांवर होता. ते आता एकच वेळेस जेवीत. कधी कधी तेही वर्ज्य करीत. जेवायला बसले की एखादवेळेस त्यांचा कंठ दाटून येई. ते म्हणत, " माझे आप्तमित्र अन्नाला महाग झालेले पाहून मी हे अन्न खाऊ तरी कसे ? ह्यापेक्षा दे ते माझ्या

भुकेल्या बंधुभगिनींना !" घरात असेल-नसेल ते पीठ-मीठ ते गरजू लोकांना वाटू लागले.

दुष्काळात तेरावा महिना. पिसा झाल्या. पिंजरे घरोघर येऊ लागले. चहूंकडे डांबर जाळल्याचा वास येऊ लागला. टोचणी सुरू झाली. लोक बाहेर पडले. आज हा तर उद्या तो, अशा बातम्या पसरू लागल्या. त्या वेळी टिळकांनी एक धुरी कोठे वाचली व ती मजकडून तयार करवून घेतली. जो कोणी येईल त्याला ते ही ओंजळ ओंजळ धुरी वाटू लागले. ह्या धुरीने उंदीर, घुशी, डांस, पिसवा जातात. देवाच्या कृपेने व माणसाच्या कर्तबगारीने प्लेगोबा थोपले तर वाघोबा कोपले. दुष्काळामागे दुखणे ही दुक्कल पाहून काळजाचे पाणी पाणी व बोलण्याची शिराणी झाली. सातार्‍यास पहिली मानमोडी झाली. हिने प्लेगावर ताण केली.

कुटुंबातील दहांपैकी एक उभा. बाकी सर्व बिछान्यावर. रानांतील जनावरे रानात व घरांतील धर्मखुटी डांबलेली. त्यांना चारावैरण देण्याकरता कोणीच नाही. खायला पैसा नाही. बत्तीला तेल नाही. पाणी देण्यास माणूस नाही.

असे त्या वेळेस ऐकले की एका माणसाने जवळ पैसा नसल्यामुळे आपली एक गाय देऊन दोन डाळिंबे खरेदी केली.

ही करुणाजनक स्थिती पाहून टिळकांनी अल्प दवाखाना व स्वल्प अन्नछत्र खुले केले. एक काढा रोज मी तीन-चार शेर कढवून ठेवी. हे औषध, दूध, साबूदाणे, साखर, घासलेट व आगपेट्या ह्या जिनसा टिळक सकाळी आठपासून बारापर्यंत वाटीत. कर्मठ, मराठे, महार ह्या सार्‍या लोकांना ह्या जिनसा वाटण्यांत येत.

टिळकांचे भजन रोज सकाळ-संध्याकाळ चालूच असे. आम्ही ज्या बिनभाड्याच्या घरात राहत होतो ते खाली करण्याच्या रोज सूचना येत. घर जरी बिनभाड्याचे होते तरी हातांत कडीतोडे नसल्याने आम्ही त्या सूचनांना दाद देत नव्हतो.

दुष्काळ व मानमोडीच्या कचाट्यातून हवालदिल झालेली जनता एकदाची बाहेर पडली. ह्या दिवसांत टिळकांनी पुष्कळ अभंग लिहिले.

दत्तूच्या लहानपणापासून मला पोटदुखीचा त्रास आहे व एखादे वेळी ही फारच उचल खाते. त्याप्रमाणे माझे पोट दुखत होते. टिळक पहाटे उठत व आधी शेगडी पेटवून माझ्या खाटेखाली ठेवीत, नंतर आपण चहा घेत. अलीकडे टिळक माझ्याजवळ फार बोलत. म्हणजे तसा त्यांचा माझ्याशी पूर्वी अबोला होता असा अर्थ नाही. आता म्हणजे त्यांना वेळ नसूनही ते वेळात वेळ काढून येऊन माझ्याशी बोलत बसत.

मला त्यांचे बोलणे मुळीच आवडत नसे. मी कधी त्यांना हुंकारे देत असे तर कधी म्हणे, "पुरे तुमचे हे चऱ्हाट! मला ते मुळीच आवडत नाही. कशी वेळ येईल ठाऊक नसते. नेहमी शुभ बोलावे. घराभोवती देवाचे दूत असतात. ते अस्तु अस्तु म्हणतात."

ते म्हणत, "मी काय वाईट बोलतो आहे? दोन प्रवासी वाटेने जातात. एकाचे स्टेशन आधी येते, एकाचे मागाहून येते. त्यात काय आहे? भिण्यासारखे काय झाले? मी आपला बोलायला काही विषय हवा म्हणून विषय काढला. आणि त्यात वाईट काय झाले? कोणती वेळ केव्हा येणार हे का ठाऊक असते? आधी तशी नोटीस थोडीच येते? लेकराला बाहेर किती वेळ राहू द्यायचे हे एक आईलाच कळते. ते खेळून दमले-थकले की ती पुढे होऊन त्याला उचलून आपल्याजवळ घेते. त्याला विसावा देते. तसेच देव करतो. आज नाही उद्या तो असाच प्रत्येकाला उचलून घेईल. आपण त्या वेळेस हातपाय झाडण्याऐवजी त्याची उत्सुकतेने वाट पाहायला हवी. मनुष्याने आपल्या परिस्थितीहून एक मूठभर मोठे व्हायला पाहिजे, नाहीतर दोघांपैकी एक गेल्यावर मागे राहणाऱ्याने रडत बसणे म्हणजे त्या परिस्थितीचे गुलाम होणे व ईश्वरी इच्छेचा अनादर करणे आहे.

एखाद्या बाईचा नवरा मेला की ती दुःखातिरेकाने मूर्ख बनते. आपल्यावर मुलाबाळांसंबंधी काही जबाबदारी आहे हे ती विसरून जाते. वाटेल त्या वेळेस व वाटेल तेथे ती रडत बसते. आपल्या शोकाचा परिणाम कोणाकोणावर होतो आहे इकडे तिचे कधी लक्षच राहत नाही. आणि दुःखाचे समाधान करण्यास ज्या आयाबाया येतात त्या तर मेलेल्या माणसाचे असतील-नसतील ते गुण आठवून तिच्या शोकाग्नीत आणखी

तेल ओतीत असतात. तिचे समाधान करण्याचे बाजूसच राहते.

मृताच्या आप्तांना कोणती गरज आहे, त्याचे साह्य कसे करता येईल, आपल्या दुःखाचा त्यांना कसा विसर पडेल, इकडे कोणाचे लक्ष नसते. जमावे त्याने तिला रडवावे, दुःखाच्या खपल्या काढाव्या, शंभर माणसांनी यावे, शंभर वेळेस तिने रडावे व घरातील वातावरण कायमचे उदास करून टाकावे. त्या बाईचे डोळे रडून रडून फुटतात व मुलाबाळांच्या शरीरप्रकृतीवर परिणाम होतो."

त्यांचे असे बोलणे ऐकून माझ्या काळजाचेच कोणी लचके तोडीत आहे, असे मला वाटे.

"ज्याप्रमाणे वैष्णवाच्या मुखावर मुद्रा असली की तो वैष्णव समजावा त्याप्रमाणे ख्रिस्ती लोकांच्या घरी मृत्यू झाला की त्याच्या ड्रेसवरून कळते. मला ते मुळीच आवडत नाही. काळी गाडी, काळा घोडा, काळी पेटी, काळे लुगडे, काळचा फिती, पत्राभोवती काळी बॉर्डर ! हे आहे काय ? देवाकडे जाणे हे का अशुभ आहे ? जी अमर, जो पवित्र त्याच्याकडे जाणे अशुभ आहे का ? पावित्र्याचे द्योतक काळे का पांढरे ? मी जर तुझ्या अगोदर गेलो तर असे काही करू नका. मला सर्व शुभ्र असू द्या."

"हे तुम्ही काय आरंभिले आहे मला कळत नाही."

"मी तुझ्या आधी जाणेच अधिक हिताचे आहे."

"त्यात कोणते हित आहे आणि कोणते अहित आहे मला कळत नाही."

"पुढे कळेल. मी मेल्यावर तू किंवा मुले मुळीच शोक करीत बसू नका. माझी खात्री आहे, की देवाकडे आपल्याला जायचे आहे व त्यात शोक करण्यासारखे काहीच नाही. तोच मला नेईल व तोच तुमची पुढे व्यवस्था करील."

टिळकांना भेटलेला 'मंबाजी' त्यांना आता अधिकच प्रतिबंध करू लागला. बंगला सोडा म्हणून तगादे येत– पण बंगला काही सुटला नाही. दोन्ही वेळेस भजने चालत. 'मंबाजी'चे कामगार दोन्ही वेळेस न चुकता व धाकांना व ताकिदींना न जुमानता भजनाला येत. मग टिळक

नेहमी चर्चमध्ये उपदेश करू लागले.

त्या वेळी चर्चची निराळी इमारत नसल्याने उपासना शाळेतच भरे व हेच देऊळ समजण्यात येई. पण शाळा मंबाजीच्या ताब्यात. तेव्हा वारंवार ती बंद करीत.

टिळक म्हणत, "शेरा-वाशाचे का होईना पण स्वतःचे, तुमच्या हातांनी बांधलेले मंदिर तुम्ही बांधा. एकभुक्त रहा, हाल सोसा– पण स्वतःचे मंदिर बांधा. दुसऱ्याच्या ओंजळीने किती दिवस पाणी पिणार? ताटाखालची मांजरे किती दिवस राहणार? एक शतक झाले तुम्हाला ख्रिस्ती होऊन, अजून रांगती बाळेच राहणार का? तुमचे वाडवडील असेच होते का? तुम्हाला त्यांचा अभिमान नको का? का तुम्ही आपली मान दुसऱ्यापुढे वाकविता?"

मिशनरींना ते सांगत, "आम्हाला तुम्ही आपल्या हातांनी किती दिवस भरविणार? आपल्या पायांवर आम्हाला उभे राहू द्या. मधे मधे येऊ नका. आम्हाला पोहू द्या, गटांगळ्या खाऊ द्या, बुडू द्या, वाहू द्या, मरू द्या. पण तिरायाला शिकू द्या."

मला ते म्हणत, "पहा, अशी वेळ येईल की हेच ख्रिस्ती लोक व मिशनरी माझ्या विरुद्ध होतील. पण मला जे ह्यांच्या हिताचे वाटते तेच मी बोलणार व करणार. मी छळ सोशीन, पण मरेपर्यंत त्यांचे हित करीत राहीन."

पण एका मंबाजीखेरीज कोणीच ख्रिस्ती माणसाने किंवा मिशनरीने टिळकांचा छळ केला नाही. उलट सगळे अगदी सगेसोयऱ्यांप्रमाणे वागले.

माघ सरता सरता किंचित उन्हाळा भासू लागला होता. सूर्यापेक्षा वाळूच अधिक ताप देऊ लागली होती. रविवारी मंबाजीने उपासनेच्या वेळी किल्ल्या दिल्या नाहीत. शाळा बंद. मंबाजीचा निश्चय, की आज काही झाले तरी किल्ल्या द्यायच्या नाहीत.

मंडळी टिळकांकडे सांगायला आली. आज स्वर्गाची द्वारे बंद झाली! टिळक म्हणाले, "होऊ द्या. देव देवळात राहत नाही. जेथे कोठे दोघे-तिघे एका दिलाने मजकरता जमाल तेथे मी आहे, असे प्रभू म्हणतो

आहे. चला, आपण मैदानात झाडाखाली मंदिर उघडू."

टिळक निघाले. त्यांच्या मागे मंडळी निघाली.

मंबाजीने दुरून हे पाहिले. लागलीच एक मुलगा धावत धावत किल्ली घेऊन ह्या मंडळींच्या मागे आला, व त्याने सर्वांस मागे फिरविले. जे बंद होते ते देवाचे मंदिर खुले झाले. त्या दिवशीच्या टिळकांच्या भाषणाने मंडळींचे डोळे ओले झाले.

त्यांच्या उपदेशाचे प्रतीक "दास म्हणे ख्रिस्ता तुझ्या कंथेवरी। मला जागा करी थोडकीशी ॥" हे होते.

भाषण संपता संपता टिळकांनी, "सांगितले आज माझा हा तुम्हाला शेवटचा उपदेश आहे. मी पुन्हा या मंदिरात पाय टाकणार नाही. मी येथून जाईन तो पुन्हा ह्या साताऱ्यात पाणी पिणार नाही."

लोक रडू लागले. टिळकांचे म्हणणे खरे झाले. तो त्यांचा त्या मंदिरातील शेवटला उपदेश ठरला. परंतु परमेश्वराची योजना किती विलक्षण असते !

ज्या साताऱ्याच्या मंडळीला उपदेशांसाठी शाळेत जमावे लागे त्याच साताऱच्या मंडळीला टिळकांच्या मृत्यूनंतर एक नवीन सुंदर मंदिर मिळाले, व त्या मंदिराचे नाव टिळक स्मारक मंदिर ठेवण्यात आले !

ज्याप्रमाणे एखादा लबाड माणूस आपले कार्य साधण्यासाठी काहीतरी कारण शोधीत असतो त्याप्रमाणे मृत्यूला काहीही कारण पुरते. ठेच, गुचकी, वगैरे वगैरे काहीही त्याला चालते. अलीकडे गुऱ्हाळे चालू झाली होती. भजन झाल्यावर उसाचा रस आणीत व इतरांबरोबर कधी कधी टिळकही तो घेत. तो त्यांना बाधला असावा. ते आजाऱ्याप्रमाणे दिसत. तरी त्यामुळे त्यांच्या व्यासंगात काही व्यत्यय आला नाही. ते रात्री हवे तेव्हा उठून लिहीत बसत.

मी त्यांच्यामागे पुन्हा भुणभुण लावली, "आजाराला, अडचणीला आपल्याजवळ एकही पैसा नाही. आपल्याला काहीच करता येऊ नये म्हणजे काय ? पैसा तुम्हाला वैऱ्यासारखा दिसतो, आता पुढे औषधपाण्याचे कसे होणार ?"

ते म्हणत, "आम्ही काय खावे व काय प्यावे हे तो जाणतो. माझी खात्री आहे की तो औषधपाण्याला काही कमी पडू देणार नाही. माझ्या अंत्यविधीलाही तो कमी पडू देणार नाही. माझ्यामागे एक महिनाभर तुम्हाला दुःखात बसून खायलाही तो देईल. पुढे मात्र तुमचे तुम्ही पाहून घेतले पाहिजे. एक महिना दुःखाला पुरे झाला."

आता डॉ. केळकर वरचेवर येऊ लागले.

एक दिवस रात्री तीन वाजता टिळक उठून माझ्या खोलीत आले. ते मला झोपेतून कधीच उठवीत नसत. कारण मला झोपेतून उठविले म्हणजे अधिकच कापरे भरते. मला उठवून ते म्हणाले, "मी तुला आजपर्यंत फार त्रास दिला. मला क्षमा कर."

"आज तुम्हाला त्याची काय आठवण झाली? तुम्हाला काही होते की काय?"

मी घाईघाईने उठून शेगडी पेटविली व शेजारी धनाजींकडे जाऊन त्यांना उठविले. आम्ही परत आलो तो टिळक लिहीत बसले होते.

"कसे वाटते गुरुजी?"

"बरे आहे."

धनाजी गेले व मीही निजले.

रात्री बसून टिळकांनी आपले मृत्युपत्र तयार केले. जवळ एक दिडकी नसताना टिळकांनी मृत्युपत्र कसले केले असे वाटेल म्हणून त्यातील काही भाग खाली दिला आहे. ह्याची एक नक्कल दत्तूकडे पाठविली, एक मिशनकडे पाठविली व एक स्वतःजवळ ठेवली.

"देवावर, ख्रिस्तावर व सौंदर्यावर (सौंदर्याची माझी स्वतःचीच काही कल्पना आहे) जर माझे खरेखुरे प्रेम नसते, येशूवर जर मी प्रेम करणारा नसतो तर मी काही वेगळाच मनुष्य झालो असतो. याचे कारण माझे जीवितासंबंधी असलेले विशिष्ट मत कीर्ती किंवा अपकीर्ती मला बुडबुड्यासारखी वाटते. माझ्या मृत्यूनंतर माझी अपकीर्ती केल्याने जर मनुष्यांचा कार्यभाग होणार असला तर त्यांनी ती खुशाल करावी; मला त्याचे काही वाटत नाही.

कालमर्यादा ही माझी जीविताची व्याख्या नाही; तर उपयुक्त

कार्यकर्तृत्व ही आहे. उपयुक्त कार्य जर माणसाच्या हातून होत नसले तर त्याने मरावे हे बरे. मला जगात जिकडे-तिकडे एक सौंदर्य किंवा कुरूपता या दोन गोष्टी मात्र दिसतात. सौंदर्यावर माझी आवड आहे, म्हणून मी त्याच्यावर प्रेम करतो. ख्रिस्तावर माझे एवढे प्रेम असण्याचे कारण तो अशा सौंदर्याचा सागर आहे– नव्हे, सौंदर्यसर्वस्व आहे. तो स्वतःच ह्या सौंदर्याचा पुतळा आहे. स्वर्गप्राप्तीच्या आशेने किंवा नरक-प्राप्तीच्या भीतीने कोणाला या सौंदर्यावर खरेखुरे प्रेम करिता येणार नाही. प्रेम निरिच्छ आहे. माझी या सौंदर्यावर आवड आहे म्हणून मी त्याच्यावर खरेखुरे प्रेम करितो. स्वर्ग व नरक या दोन अवस्था असून आत्मा या दोहोंतून एका अवस्थेप्रत जातो, असे माझे मत आहे. या मताच्या मनुष्यामधून जर ख्रिस्ताचे वास्तव्य नाहीसे झाले तर तो माणूस अगदी भयंकर बनेल.

ज्या ठिकाणी माझ्या अस्थी ठेवण्यात येतील तेथे जर एखादी कबर उभारावी अशी माझ्या आप्तमित्रांची इच्छा असली तर त्यांनी त्या कबरेवर ' पुष्कळ अजुनी उणा। प्रभु, मीं पुष्कळ अजुनी उणा ।।' हा चरण कोरावा. माझ्या नावाचे पूर्वी त्यांनी रेव्हरंड अगर मि. अगर रा. रा. यांतले कोणतेही उपपद लावू नये. त्यांनी एन. व्ही. टिळक असे इंग्रजीप्रमाणे लिहू नये, तर मराठीत नारायण वामन टिळक असे लिहावे. माझ्या आप्तमित्रांना माझे असे कळकळीचे सांगणे आहे की कवी किंवा एखादा सन्मानदर्शक शब्द माझ्या नावापूर्वी न घालण्याची त्यांनी अवश्य खबरदारी घ्यावी.

देवाज्ञा कधी होईल हे काही कुणाला सांगता येत नाही व तिचा उगाच कुणीही विचार करीत बसू नये. देवाज्ञेला मी कधीही ' मृत्यू ' म्हणणार नाही. कारण ती देवाची आज्ञा आहे, देवाचे बोलावणे आहे. ती नवजीवनजागृती आहे. या मृत्यूचा विचार माझ्या मनात आला तर तो मला कधीही निरुत्साही करीत नाही ' अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनम् ' (मरताना त्रास नाही व जिवंत असतानाही त्रास नाही) हा ख्रिस्ती मनुष्याचा हक्क आहे व हा ख्रिस्ताच्या द्वारे मी कल्पनेच्या पलीकडे अनुभवीत आहे.

मी जितकी आपल्या देशावर प्रीती करतो तितकी मी आपल्या आईबापांवर, बायकोवर, लेकरांवर, मित्रांवर, फार काय, स्वतःवरही केलेली नाही, असे मला वाटते.

हिंदी ख्रिस्ती धर्माला आपल्या चर्चेसची वृद्धी करण्याचा, त्यांना खरेखुरे स्वतंत्र, चैतन्यपूर्ण करण्याचा अगदी निदिध्यास लावावा.

आपल्या मृत्यूनंतर आपल्या शरीराचे दहन करावे, प्रेतयात्रेच्या वेळी काळा रंग वर्ज्य करावा, आपल्या अस्थी अहमदनगरच्या सिमेटरीत ठेवाव्या, व नगरच्या ईश्वरविद्येच्या वर्गात स्वतःचे व डॉ. ह्यूमचे चित्र शेजारीशेजारी लावून डॉ. ह्यूमच्या चित्राखाली 'ह्याने' व स्वतःच्या चित्राखाली 'ह्याला संभाळिले' असे शब्द लिहावे, असेही त्यांनी मृत्युपत्रात लिहून ठेवले होते.

मिसेल ली– म्हणजे डॉ. ह्यूमची मुलगी साताऱ्यासच असत. त्यांना टिळकांनी त्याच वेळी खालील पत्र टाइप केले :–

Satara,
4–12–18.

My dear Mrs. Lee,

I am suddenly become so very sick with a pain in my heart that I think I shall be called away at any moment to-night. I'm quite ready. I leave the following wishes and messages —

1. THE MISSION, I hope, will take care of my wife. She is an angel, but she has her weaknesses. Will you be her sister ?

2. CHRISTAYAN is incomplete. Help Tara and try to develop her poetical inspiration that she may finish it one day.

3. DO NOT make much of me anywhere when I am gone. I have not accomplished one thousandth part of what God made me capable of accomplishing. I wish nothing from you all or from the world but pardon.

4. Burn my remains, and then if my friends wish it take some remnant and bury it. If any monument is to be raised over it, say on it । पुष्कळ अजुनी उणा प्रभू, मी पुष्कळ अजुनी उणा रे ।

स्मृ... ३२

Write no name but only this, Somebody that in right earnest loved Jesus and his countrymen.

5. These persons are very dear to me. My wife first, Tara and Dattu, Dr. Hume, Hatty Bruce, yourself, Jaibai Gaikwad, Bhaskar Uzagare, Manohar Uzagare. Mr. Edwards, Sir Narayan Chandavarkar, Bhadrabai Madgaonkar and Dr. Macnicol. Tell them so.

My messages :-

1. To India:- Follow Jesus.
2. To my Christian Brothers and Sisters- Your life is in Christ ; your life is in Him and nothing else.
3. To Missionaries:- Cease to be fathers and mothers, be real brothers and sisters. Know how to appreciate, trust people and take the place of India's revered Saints.
4. To All :- I lived as a friend and died as a friend of all, and I am sure I am still both here and hereafter.

Yours sincerely,
N. V. Tilak.

## ८१ : "भय काय तया प्रभु ज्याचा रे"

आपल्या मृत्युपत्राच्या प्रती टिळकांनी ज्या टपालाने पाठविल्या त्याच टपालाने पुण्याच्या डॉ. दौलतराव गोऱ्यांनाही त्यांनी एक पत्र टाकले. डॉ. केळकर नेहमी येतच असत. टिळकांना ते आपल्या घरीही ठेवण्यास तयार होते. पण त्यांचे हॉस्पिटल नव्हते. डॉ. गोऱ्यांचे पत्र आले की, तुम्ही वाटेल तेव्हा पुण्यास या. तुमची सर्व प्रकारे व्यवस्था आम्ही ठेवू. आम्ही सातारा सोडला. टिळकांनी उपासनेच्या वेळेस

सांगितल्याप्रमाणे त्यांचे पाऊल पुन्हा सातारला लागले नाही.

म्हटल्याप्रमाणे डॉ. गोरे यांनी सर्व व्यवस्था उत्तम ठेवली. स्वतंत्र खोली , वॉर्डबॉय, औषधे हे सारे फुकट मिळण्याची देवाने योजना केली. तसेच भांडी, शेगड्या, आंघोळीला गरम पाणी, किरकोळ वस्तू हे सर्व पुरविण्याचा मक्ता श्रीमती मथुराबाई मल्हार ह्यांनी घेतला. येथपर्यंत सर्व ठीक झाले.

पण मुख्य गोष्ट राहिली ती दामाजीची. पण दामाजीही जणू हात जोडून पुढे उभे होते ! जहाल मंजुळाबाईंचा मुलगा गोविंदा. ह्याला टिळक आजारी असल्याचे कळताच तो आम्हाला मुद्दाम भेटायला पुण्यास आला. त्याने काही फळे व पन्नास रुपये मला आणून दिले व म्हटले, " आई, हे तुम्ही पपांसाठी खर्च करा. मी हे पगारातून साचविले आहेत."

मला आनंद वाटला व वाईटही वाटले. हा केवढा आणि मला हे देतो ! ज्याला आम्ही द्यायचे, करायचे व ज्याच्याकरता थोडेबहुत केलेही, त्याची अशी फेड घेणे मला कसेसेच वाटले. पण त्याचा हिरमोड मला करायला नको होता. मी ते पैसे घेऊन बाजूला ठेवून दिले. दुसऱ्या दिवसापासून कुठून ना कुठून पैसे येऊ लागले. दूध, सोडा, फळे, तसेच आमचा व आमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांचा खर्च जवळजवळ रोजी सहा-सात रुपये होत असे. पण इतका खर्च होऊन मजजवळ थोडीबहुत शिल्लक रोजच्या रोज उरे ! रविवार खेरीज करून एक रुपयापासून शंभर रुपयांपर्यंत पैसे येत ! कामाला बाई होती व साह्याला रामभाऊ धर्माधिकारी होते. तो बिचारा रात्रंदिवस उभाच उभा असे.

– " जगन्नाथ बाप आई। उणे मला काही नाही–" ह्या टिळकांच्या अभंगाचा प्रत्यक्ष अनुभव येऊ लागला. येथेही टिळक निजून नव्हते. इतर रोग्यांकडे ते जात. प्रार्थना भजन करीत. चिंतामणराव गायकवाड नावाचे एक दरबारी त्यांना भजन म्हणू लागत. येथेही बऱ्याच अभंगांचा जन्म झाला. कधी ते भाषणेही करीत. पण कधी कधी ते इतके कासावीस होत, की मी घाबरून जाई. मी केव्हाही डॉक्टर गोऱ्यांकडे धूम ठोकली की ते हजर असत. तोंडातला घास पानात तसाच टाकून ते उठत. ऑपरेशन रूममध्ये असले म्हणजेच तेवढे डॉक्टर हाती

लागत नसत.

आम्हाला जाईचे पत्र आले. जाई जहाल मंजुळाबाईंची मुलगी व गोविंदाची बहीण. हिच्यावर टिळकांचे मुलीप्रमाणे प्रेम होते. नागपुरास ही नर्सिंगचे काम करीत होती. तेथेच ती आजारी पडली. टिळक साताऱ्याहून निघायच्या आधी ती त्यांना भेटण्यासाठी नागपुराहून निघाली. पण मध्येच तिची स्वतःची प्रकृती अतिशय बिघडल्याने ती परत नागपुरास गेली.

आता तिचे पत्र आले की, "पपा, मी इकडे जितकी आजारी आहे तितकेच तिकडे तुम्ही आजारी आहात ! माझी तर आशा आता डॉक्टरने सोडली आहे. आपली भेट आता होणे अशक्य आहे."

गोविंदालाही तिचे पत्र आले होते की येता आले तर मला येऊन भेटून जा. तो ते पत्र घेऊन आमच्याकडे आला. आम्ही आग्रह करून त्याचे पन्नास रुपये त्याला परत घ्यायला लावून नागपुरास पाठविले.

पंडिता रमाबाईंनी मनोरमाबाईंना आमच्याकडे भेटायला पाठविले. मनोरमाबाई बरोबर फराळाचे व शंभर रुपये घेऊन आल्या. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे खूप आबादानी झाली. सुट्टी घेऊन मुंबईहून बेबी आली. दत्तूनेही काही दिवस रजा घेतली. सुनेला बरे नव्हते तरी तेवढ्यातल्या तेवढ्यात तिने काही काही जिनसा करून दत्तूबरोबर पाठविल्या.

सुनेचा आजार तिच्या आईबापांना मानवला तसाच आम्हालाही मानवला होता. आपण आजोबा होणार म्हणून टिळकांनाही त्या आजारात मधूनमधून आनंद होत असे. मी तेवढ्या गडबडीत नातवाचे शिवण काढले होते व त्यातील एक गोधडी टिळकांनी शिवली होती.

पुष्कळ वेळेस माझे हे सारे शिवण मी मिसेस गोरे ह्यांच्या अंगावर टाकावे व त्या बिचारीने मोठ्या आनंदाने ते करावे.

टिळकांना एवढा मोठा असाध्य रोग तरी कोणता झाला होता तर मूळव्याध ! पण त्या मूळव्याधीच्या दुखण्याने त्यांचा जीव मधून-मधून अतिशय कासावीस होत असे. ते डॉ. गोऱ्यांच्या मागे लागले होते की मूळव्याधीचे ऑपरेशन करून टाका. त्यांना थोडासा ब्राँकॅटिस झाला

होता. तेव्हा डॉ. गोरे म्हणत, "तुम्हाला क्लोरोफॉर्म देता येणार नाही. औषधानेच हळू हळू बरे वाटेल."

त्यांनी आणखी एक-दोघा डॉक्टरांना टिळकांची प्रकृती दाखविली व त्यांचेही म्हणणे डॉ. गोऱ्यांप्रमाणेच पडले.

टिळकांना जितका जितका त्रास होई तितके तितके त्यांनी अधिकाधिक गोड असे अभंग लिहावे. पुण्याच्या दवाखान्यात त्यांनी तीस-पस्तीस अभंग लिहिले आहेत. जाईच्या मृत्यूची बातमी येथेच आली व त्यावर त्यांनी एक अभंग लिहिला. गोविंदाग्रंज कवींच्या मृत्यूसंबंधी लिहिलेली कविता येथलीच आहे.

थोड्या दिवसांनी त्यांना बरे वाटू लागले. मुले परत मुंबईला गेली. पण बरे जरी वाटत होते तरी टिळकांचे मन त्यांना बरे सांगेना. चांगले खात, पीत, लिहीत, वाचीत, चालत, बोलत, गात– पण आपले ऑपरेशन झालेच पाहिजे, असे त्यांच्या डोक्याने पूर्णपणे घेतलेले होते.

त्याच वेळेस माझ्या व्याह्यांचे पत्र आले, की जे. जे. हॉस्पिटल-मध्ये कोणी फार चांगला सर्जन आलेला आहे. ह्याच्या मागोमाग फ्रिच्लेसाहेबांचेही पत्र आले की जे. जे. हॉस्पिटलात फार चांगला सर्जन आला असून तो माझा मित्र आहे. मी तुमची तेथे जाण्याची सर्व व्यवस्था करतो.

इकडे पुण्यातील दवाखान्यातील सर्व मंडळी त्यांच्या जाण्याच्या विरुद्ध होती. डॉ. गोऱ्यांनी टिळकांना शंभर वेळेस सांगितले की, "तुम्ही जाऊ नका. मी तुमची सर्व व्यवस्था येथेच करतो. ऑपरेशनने भलतेच होईल. माझी इच्छा नाही तुम्ही ऑपरेशन करावे अशी."

टिळक म्हणाले, "मला पुष्कळ कामे आहेत. मला चांगले बरे झाले पाहिजे. ख्रिस्तायन आहे, देवाँचा दरबार आहे. तुम्ही देवाच्या इच्छेविरुद्ध येऊ नका." ह्यावर डॉ. गोरे निरुत्तर झाले..

तिकडे सून जरा कोठे लोळूनघोळून उठते तोच दत्तू आजारी पडला. आम्हाला इतकेच कळले होते, की त्याला साधारण बरे नाही व डॉ. दांडेकरांचे औषध त्याला चालू आहे; पण त्याला झाला होता

टायफॉईड व सुनेला हाता सहावा महिना.

टिळकांचे शेवटी मुंबईला जाण्याचे ठरले. फ्रिच्लेसाहेबांनी त्यांच्यासाठी सेकंड क्लासचा डबा रिझर्व केला. टिळक निघाले तेव्हा दवाखान्यात लोकांना फार वाईट वाटले. डॉ. गोऱ्यांच्या डोळ्यांना पाणी आले. त्यांची पक्की खात्री होती की आज आपण गुरुमहाराजांची ही प्रेतयात्राच पाहत आहोत. ते व त्यांच्या पत्नी सौ. हॅरिएटबाई टिळकांना गुरुमहाराज म्हणत असत.

आम्ही रात्री पुण्यास गाडीत बसलो ते दुसऱ्या दिवशी पहाटे भायखळ्याच्या स्टेशनवर उतरलो. स्टेशनवर जे. जे. हॉस्पिटलमधून टिळकांना नेण्यासाठी स्ट्रेचर पाठविण्यात आले होते. ते पाहून टिळक हसू लागले. त्यांनी ते परत केले व स्वतः जाऊन गाडी वगैरे ठरविली. आम्ही दत्तूच्या दाराजवळ उतरलो. टिळकही वर जात होते, पण मलेलू पाळक म्हणाले, "तुम्ही आता येथे थांबू नका. एकदम दवाखान्यात जा."

"मला दत्तूला भेटू द्या. प्रार्तविधी उरकू द्या." असे ते म्हणाले.

पण उं हूं. त्यांना काळच बोलावीत होता. ते पायरीदेखील चढले नाहीत. एक कफनीनिशी स्वतः चालून ते जे. जे. त गेले. परस्वाधीन जिणे आणि पुस्तकी विद्या, असे झाले. ज्या दिवशी टिळक पायी गेले त्याच्या नवव्या दिवशी चौघांच्या खांद्यावर जे. जे. तून बाहेर आले !

टिळक जे. जे. त गेले. मी व बेबी माडीवर गेलो. भायखळ्याच्या स्टेशनवरच माझी जी कंबर खचली व जे हातपाय गळाले ते बेसुमारच. वर येऊन पाहते तो दत्तू अगदी सहा महिन्यांचा आजारी. त्याला पाहून माझ्या तोंडचे पाणी पळाले. मी जरी आजारी नव्हते तरी एकसारखी पडून राही. सुनेला दत्तूचे बरेच पाहावे लागे. टिळकांची खबर घेण्यास घरात कोणीच नाही. मुंबईत पाय पडताच आम्ही त्यांना मुकलो व ते आम्हाला मुकले.

पुढील भाकीत जाणून मी पाळकांच्या हातून निरोप पाठविला की 'डॉ. गोरे ऑपरेशनच्या विरुद्ध आहेत.' पाळकांच्या हाती परत निरोप

आला की, 'मी का हजामाचा धंदा करतो का ?' शहाण्याला कोण शिक-विणार ? तो बिचारा कोणता का धंदा करीत असेना– पण केस हाती घेतल्याच्या तिसऱ्याच दिवशी त्याने इंग्लंडला प्रयाण केले ! तेव्हा त्याच्या सर्जरीत व न्हाव्याच्या धोपटीत काही अंतर असल्यास ते माझ्यासारख्या अडाणी बाईला कसे कळणार ?

सिंहस्थाची पर्वणी व गंगापुत्रांचा सुळसुळाट, तशीच जे. जे.त ह्या वेळेस परीक्षेची पर्वणी व विद्यार्थ्यांचा सुकाळ होता. प्रत्येक रोग्याच्या अवयवागणिक होतकरू डॉक्टर रोगांची चिकित्सा करण्यास जमत. टिळकांची परीक्षा कसून जोरात चालू झाली. आमचे घर म्हणजे आता रोगांचे माहेरघर बनले होते. सून अशक्त, मुलगा बिछान्यावर पडून, मी मुंबईस पाय ठेवताच पथारी धरलेली, चिकीला मुंबईची हवा न मानवल्यामुळे ती कशी तरी दम धरून राहिलेली. देवाच्या कृपेने बेबी तेवढी बरी होती. जवळ दुसरे कोणी माणूस नव्हते.

बेबी दवाखान्यातून विचारपूस करून यायची. प्रोफेसर पाटणकर त्या वेळेस मुंबईस होते. ते आपले काम सांभाळून उरला वेळ आम्हाला मदत करण्यास येत. तो मे महिना असल्याने उन्हाळा घालविण्यास पुष्कळ ओळखीचे लोक बाहेरगावी गेलेले होते. बाकी आपल्या काम-धंद्यात. आमचे व्याही-विहीण माथेरानला गेले. आमची सून त्यांची एकुलती एक कन्या. तिची स्थिती ही अशी. तेव्हा साहजिकपणेच तिलाही बरोबर न्यावे असे त्यांना वाटत होते. पण तिचा काही पाय निघेना. ती मुंबईस राहिली.

त्या वेळी बेबी, बाबू पाटणकर व मनोहरराव उजगरे ह्यांनी जे काही केले ते अमोलच होते. पाच दिवसांनी बेबीने मला बळेच दवाखान्यात नेले. तो तेथेही टिळक पडल्या पडल्या लिहीत होतेच. ज्ञानोदयातील लेख व अभंग त्यांनी मृत्यूशी झगडत असता लिहिले.

माझे अखेरचे भाषण व ते शुद्धीत असतानाची भेट ह्या मुली-मुळेच झाली.

" मी आता बरा आहे. लौकरच बरा होईन. काळजी करू नको. मला माझी दोन मोठाली कामे अजून करावयाची आहेत. ख्रिस्तायन

व देवाचा दरबार.

माझे आवडते गाणे कोणते आहे सांग पाहू ?

शत्रु गराडा घालुन बसले
बसोत त्यांना कोण पुसे
पिता परात्पर ज्याचा त्याहुन
पर्वतशतही धीर नसे
आकाशाची कुऱ्हाड आली
कुऱ्हाड आली येऊ द्या
पिता परात्पर ज्याचा त्याला
खेळाया होइल सध्या--
आधी व्याधी उभे पुढे हे
जरा मरण पाठीमागे
पिता परात्पर ज्याचा त्याशी
शक्त न हे लढण्याजोगे

१९१९ साल हे लक्षात ठेवण्यासारखे होणार आहे."

हा मला उपदेश आहे हे मी ओळखले. माझे अंतःकरण भडभडून आले व माझे ओले डोळे त्यांच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून मी हळूच बाहेर आले व मनसोक्त रडले. त्याच दिवशी सूनबाई खबरीस गेली. तिला जवळ घेऊन त्यांनी आशीर्वाद दिला व सांगितले की, "तुला आता मुलगा होणार आहे."

दुसऱ्या दिवशी मेडिकल कॉलेजमधील दत्तूचा एक विद्यार्थी मित्र येऊन सांगू लागला, की टिळकांना ताप आला आहे. पण काळजीचे काही कारण नाही. तोच ताप १०५ पर्यन्त चढला. तिसऱ्या दिवशी बाबू पाटणकर रात्रभर त्यांच्याजवळ बसून राहिला.

शुक्रवार ता. ९ मे १९१९ दुपारी दोन वाजता बेबी जे. जे.त भेटायला गेली. मी व दत्तू निजूनच होतो. दत्तूचे मन त्याला सांगू लागले—

पपांना भेटायला जावे. तो अजून अंथरुणातून उठतसुद्धा नव्हता; पण तरी तो तसाच उठून मजकडे आला व म्हणू लागला, " चल, आपण दोघेजण जाऊन येऊ."

पण माझे धैर्य होईना. शेवटी आम्ही पायीच निघालो. तो मला व मी त्याला आवरीत चाललो. कसेतरी करून एकदाचा दवाखाना गाठला. दाराशी बेबी एका झाडाला टेकून उभी होती. आम्ही तडक त्यांच्या वार्डात गेलो. त्यांना मॉर्फियाचे इंजेक्शन देण्यात आले होते. जवळच मनोहरराव उजगरे व प. वा. काशिनाथ रघुनाथ मित्र उभे होते. आणखी एक दोघे होते.

अखेर टिळकांना आपला मुलगा भेटला. त्यांनी त्याच्याकडे डोळे भरून पाहिले. बोलवत नव्हते पण त्यांनी तोंडाकडे बोट दाखविले. दत्तूने त्यांच्या तोंडात चमचाभर पाणी घातले व त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. ते रोज सकाळी म्हणत ती भूपाळी मला आठवली,

**ऊठ ऊठ माझ्या जिवा। वंदुनि दिनरजनीच्या धवा।**
**आयुर्मार्गी आक्रम नवा। कर गौरवा देवाच्या**

बेबी बाहेर उभी होती. तिला येऊन मी मिठी मारली, " बेबी, तुझी आई गेली, बाप जिवंत आहे असे समज. मी तुला मुळीच कमी पडू देणार नाही. तुझे शिक्षण मी पुरे करीन."

आम्ही दोघी घरी आलो. थोड्या वेळाने मित्रांनी व मनोहरराव उजगऱ्यांनी दत्तूला घरी आणून पोचविले. चिकी दाराशीच आमची वाट पाहत होती. तिने विचारले,

" आजोबा कसे आहेत ?"

" आता बरे आहेत."

" मग मला का नाही नेत त्यांना भेटायला ?"

" ते तुला उद्या भेटतील."

आमच्या घरात मृत्यूने पाय टाकल्याचे चिन्हदेखील दिसत नव्हते. शेजारीपाजारी कोणाला कळलेदेखील नाही. टिळकांच्या इच्छेप्रमाणे येथवर तर पार पडले. मनोहरराव उजगरे ह्यांच्या मनाला

व शरीराला विसावा मिळाला किंवा नाही हे एक देव जाणे. पुढील सर्व व्यवस्था त्यांनी न सांगता आपल्या अंगावर घेतली. तारा करणे, टेलिफोन करणे, छापखान्यात जाणे, वेळ ठरविणे हे सारे सारे त्यांनी मलेलूंच्या संमतीने केले.

टिळकांच्या विलप्रमाणे सारे करावे अशी महाबळेश्वराहून मिशनरींची तार आली. तेव्हा आम्हाला त्या विलची आठवण झाली. मनोहरराव म्हणाले, "काय करायचे ?"

"सारे टिळकांच्या इच्छेप्रमाणे करायचे," असे आम्ही उत्तर दिले.

ज्या घरातून सहा महिन्यांपूर्वी नाताळाचा सण करून टिळक बाहेर पडले होते त्या घरात ता. १० मेला टिळकांना परत आणण्यात आले. चिकीला आता सगळा प्रकार कळला. पुष्कळ मंडळी बाहेरगावी गेली होती तरी वर्तमानपत्रे, तारा, टेलिफोन ह्यांच्यामुळे नगर, अलिबाग, पुणे, लोणावळे वगैरे ठिकाणांहून लोक जमा झाले. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे काळा रंग अजिबात वर्ज्य केला; व काळ्या किंवा पांढऱ्या गाडीचा प्रश्नच आला नाही. कारण त्यांची पेटी हातोहाती उचलून नेण्याचे मंडळीने ठरविले.

भायखळ्याचे उपासनामंदिर मंडळीने गच्च भरून गेले. त्यात हिंदूही होते व ख्रिस्तीही होते. मी रडत नव्हते तरी भानावर नव्हते. उपासना झाल्यावर मंडळीने भजन करीत ती पेटी वरळीला दहनभूमीकडे नेली व दुसऱ्या दिवशी एका लहानशा पेटीत अस्थी गोळा करून आणल्या.

भजनी मंडळीने प्रेतयात्रेत म्हणण्यासाठी निवडलेले भजन टिळकांचेच होते. त्याचे सूर व शब्द आज सोळा वर्षे झाली आहेत तरी माझ्या कानांत तसेच घुमत आहेत असे वाटते. ते भजन हे–

**भय काय तया प्रभु ज्याचा रे–ध्रु०**
**सर्व विसरली प्रभुमय झाली पूर्ण जयाची वाचा रे––१**
**जगात विचरे उपकारास्तव परि नच तो जगताचा रे––२**

येथे निर्धन परत्र ज्याचा सर्व धनाचा साचा रे--३
देह तयाचा परंतु आत्मा त्यात वसे ख्रिस्ताचा रे--४
आधि-व्याधी मरणांवरती पाय अशा पुरुषाचा रे--५

* * *

॥ भाग चौथा ॥

## ८२ : नवा मनू

टिळकांच्या अस्थी पेटीत जाताच माझे अस्तित्व जाणवू लागले. टिळकांच्या धर्मान्तराच्या वेळी जिने मला साहाय्य केले व पुढे मला सुखात सोडून जी अज्ञातवासी झाली ती आता माझे समाधान करण्यास पुढे येऊन उभी राहिली. त्यांच्या दुसऱ्याच दिवसापासून मला पुष्कळशी समाधानाची पत्रे येऊ लागली. त्या पत्रांवर माझ्या नावामागे चिकटून बसलेले नेहमीचे अक्षर जाऊन त्या जागी दुसऱ्याच अक्षराची योजना झालेली पाहून मन व्यग्र होऊन जाई. श्रीमती नाव जरी मोठे सन्मानाचे असले तरी मला ते मोठे अशुभ वाटे. माझी अज्ञातवासी सखी त्या अक्षरांना पाहून पुन्हा मजकडे माझे समाधान करण्यास आली. त्या वेळी मी ही कविता लिहिली–

श्रीमती मज नाव आले । सौभाग्य लयाला गेले ॥ध्रु॥
या माझ्या दुर्दैवाने । हा कसा साधिला दावा ॥
हा ओघ काव्यगंगेचा । निमिषांत कोरडा व्हावा
ते जीवन मम जीवाचे ; मी मत्सी त्यातिल देवा
जीवनाविणे ही बाई
देहाची झाली लाही
जीवात जीवही नाही
दिन माझे संपत आले । सौभाग्य लयाला गेले ॥१॥

मी रडते धाई धाई । मजसवे दिशा ह्या दाही
त्या शांत करू मज आल्या । सद्गदित झाल्या हृदयी
उमटे न शब्द तो काही । परि म्हणति " उगी तू राही—

हा टिळक तिलक राष्ट्राचा
तो नव्हता तुज अबलेचा ! "
बोलता पूर अश्रुंचा

अश्रुंनी त्यास न्हाणीले । सौभाग्य लयाला गेले ।।२।।

काव्यवृक्ष हा फुललेला । कितिकांनी हालविलेला
तरि बहर कमी नच झाला । अधिकाधिक देइ फळाला
मी वेचित ताजी सुमने । ती गुंफित आनंदाने

तो कसले वादळ सुटले
ग्रीष्माचे काळिज फुटले
मी तरूतळींची उठले

हा ! हाय ! काय हे झाले । सौभाग्य लयाला गेले ।।३।।

'वनवासि फूल' जन्माचे । रानात फोडिते टाहो
वनमाळी गाउनि गेला । तो फिरुनी गाईल का हो
भेटेल पुन्हा परतोनी । तो काय मला सांगा हो

तो प्रेमळ मित्रचि माझा
कवि उद्यानातील राजा
सांभाळ करुनिया माझा

जगती मज उंचावीले । सौभाग्य लयाला गेले ।।४।।

" देवाच्या दरबाराचे " । इहलोकी क्षीण उपाय
दरबार दिव्य लोकीचा । तो पसंत झाला काय ?
जी इच्छा मनिची होती । ती विलया गेली हाय

जगि ' दरबाराच्या 'साठी
संकटे मत्सरापोटी
जन्मताचि धावुनि येती
निजहाते त्या लोटीले । सौभाग्य लयाला गेले ॥५॥

ते अश्रु काय प्रेमाचे । बापाचे काय कवीचे
हे कळले नाही लोका । ते अश्रु खरे कोणाचे
वात्सल्य खरे बापाचे । कविहृदयी येउन साचे
प्रेमाचे फोडुनि पाट
वत्सलता काढी वाट
अश्रूंची उसळे लाट
रसिकांते सावध केले । सौभाग्य लयाला गेले ॥६॥

दुपारी दोनाच्या सुमाराला आम्ही पाचही जण मूढाप्रमाणे विचारमग्न होऊन बसलो होतो. दत्तू, रूथ, बेबी, चिकी आणि मी. दत्तूला अजून चांगले बरे वाटत नव्हते. जे ते आपल्यापरी शुभाशुभाच्या भोवऱ्यात गिरक्या खात व एकीकडे आढ्याचे वासे मोजीत आपापल्या जागी स्वस्थ बसलेले होते. दत्तूचे दुखणे, सुनेचे भरत आलेले दिवस, बेबीचे अपुरे राहिलेले शिक्षण, चिकीचा आजाराशी चाललेला लपंडाव ह्यांनी आता आमच्या शरीराची धावपळ तेवढी थांबलेली होती, पण मनाला मात्र वेग आलेला होता. एवढी माणसांनी गजबजलेली व धन-धान्यांनी भरगच्च भरलेली मुंबई, पण ती आम्हाला शून्यवत् वाटू लागली. दशदिशा आम्हाला खुल्या मैदानाप्रमाणे सताड मोकळ्या वाटत होत्या. आमचे म्हणण्यासारखे तेथे एकही कोणी नव्हते.

दत्तू निजला होता. त्याची बायको त्याच्याशी काही बोलत होती. मी, बेबी व चिकी भिंतीला टेकून बसलो होतो. तोच एक व्यक्ती अचानक येऊन धाडकन आमच्यापुढे पडली. त्यांचा श्वासोच्छ्वास जोराने चालला होता. तोंडाला कोरड पडली होती. अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. डोळे गच्च मिटून घेतलेले होते. हे काय वाढून आले

कोणाला कळेना.

सखारामभाऊजी टिळकांना भेटण्यासाठी पुण्याहून निघाले होते. टिळक फार आजारी असल्याची त्यांना खबर नव्हती, पण त्यांना एकदम वाटले, की आपण भावाला भेटून यावे. त्याप्रमाणे ते पुण्याहून निघाले. परंतु कर्जत आल्यावर त्यांना आपल्या बहिणीकडे वेणगावास जाऊन यावे असे वाटून ते मध्येच वेणगावास गेले. अलीकडे भाऊजी आजारीच असत. त्यात त्यांना आपल्या भावाच्या काळजीने पछाडले होते. ते जरी वेणगावास होते तरी त्यांचे सारे लक्ष आपल्या नानाकडे होते. त्यांना त्यांचे मन वेणगावास स्थिर राहू देईना. मन मनाला साक्ष देते.

बहीण म्हणे, "बाबा, तुम्ही फार अशक्त झाला आहा. काही दिवस येथे राहून जा."

पण ते काही कोणाचेच ऐकेनात. हो-नाही करता करता टिळकांच्या तिसऱ्या दिवशी चहा घेऊन ते वेणगावाहून कर्जतला येऊन गाडीची वाट पाहत बसले. तोच त्यांच्या हातात वर्तमानपत्र आले. त्यात आपल्या भावाची बातमी वाचून त्यांची स्थिती भयंकर झाली. टिळकांवर त्यांचे अतिशय प्रेम होते.

आमच्या घराचा पत्ता त्यांना माहीत नव्हता. मुंबईत तपास करता करता दुपारी तीनच्या सुमारास ते आमच्याकडे येऊन पडले. कर्जतपासून वेणगाव दोन-तीन मैल, पोटात कपभर चहावाचून काही नाही, प्रकृती क्षीण झालेली, उन्हाळा, मुंबईस आल्यानंतर उन्हात फिरावे लागलेले... भाऊजींची ही दशा पाहून आम्ही सर्वच गांगरून गेलो. आम्हाला काय करावे ते सुचेना. त्या वेळेस त्यांच्या मनाला जो धक्का बसला त्याचा परिणाम शेवटपर्यंत राहिला.

मुंबईस आमचे आप्त कोणी नव्हते खरे, पण मित्र होते. ते येऊन आमचे समाधान करीत. डॉ. भास्करराव गोवंडे व त्यांच्या पत्नी रमाबाई ह्यांनी येऊन आम्हाला सगळ्यांनाच आपल्या घरी चार दिवसांसाठी नेले. दत्तूला अजूनही बरे वाटत नव्हतेच. नाशकाहून नानासाहेबांचे पत्र आले की, तुम्ही सर्वजण नाशकास या. आम्ही नाशकास

जाण्याचे ठरविले. माझी सून मुंबईसच एकटी राहिली व आम्ही तिघे नाशकास गेलो. चिकीला डॉ. गोवंड्यांकडे ठेवले.

निघताना भास्कररावांनी मला जो उपदेश केला तो मी कधी विसरणार नाही. ते म्हणाले, " हे बघा, आता तुम्ही बाजार करण्यास निघाला आहा. तुम्हाला बरीच धक्काबुक्की सोसावी लागेल. आपल्याला कोणता माल खरेदी करायचा तिकडे अधिक लक्ष द्यायला पाहिजे. जर का तुम्ही धक्काबुक्कीकडे लक्ष देत बसाल तर तुमचा बाजार संपला असे समजा. हे माझे शब्द ध्यानात ठेवा." त्यांच्या बोलण्याचा अनुभव मी घेत आहे.

नाशकास माझे नातेवाईक पुष्कळ. त्या सर्वांच्या भेटीगाठी झाल्या. शरणपुरात दहा रुपयांचे घर भाड्याने घेतले. बहिणीच्या मुलाने व सुनेने बाकी सर्व व्यवस्था लावून दिली. विष्णूने व सौ. काशीने मला त्या वेळी काहीच उणे पडू दिले नाही. जरी आम्ही त्यांच्या घरापासून मैल दोन मैल दूर राहत होतो तरी त्यांनी आमची सारी व्यवस्था ठेविली होती. माझे दोघे भाऊ व त्यांची मुले जलालपुरास होती. ते मला मधूनमधून येऊन भेटत. पण नानासाहेब किंवा विष्णू ह्यांच्यापैकी कोणी ना कोणीतरी रोज भेटून जात.

आम्ही शरणपुरास आल्यानंतर दत्तूला बराच कल पडला. येथे आल्यावर मला दोन पत्रे आली. एक केडगावाहून पंडिता रमाबाईंचे व दुसरे मुंबईहून डॉ. एमिलीबाई बिसेलचे. पंडिताबाईंनी केडगावी आम्हाला एक महिनाभर राहण्यास बोलावले होते व डॉ बिसेल ह्यांनी मुंबईस तुमची कामाची सोय करीत आहो, तरी पहिलीपर्यंत मुंबईस या, असे लिहिले होते.

मी आजपर्यंत नोकरी कधीच केली नव्हती. मला काम कोणते मिळणार तेच आम्हाला कळेना. कीर्तनावाचून दुसरे कोणते असणार? कारण मी बोलून-चालून अशिक्षित बाई. तरी आम्ही त्याच्याबद्दल विचारच केला नाही. आमचा दुःखाचा पूर अजून ओसरला नव्हता. आमची पैशाची पुंजी संपुष्टात आलेली होती. पण बोट गच्च बांधून मग सोडावे व त्या बोटाला काही समजू नये तसे आमचे झाले होते.

आमची मने दुःखाने गोठली होती.

मुंबईच्या मिशन हायस्कूलमध्ये दत्तूला काम होते. त्याला पाऊणशे रुपये पगार होता. त्यात मुंबईसारख्या ठिकाणी आमचे कसे चालणार ?

मिशनरींमध्ये टिळकांच्या विरुद्ध एका ' मंबाजी ' खेरीज कोणीच नव्हते. मिशनरींनी आमची जुजबी व्यवस्था करण्याचे मनावर घेतले. आम्हीही कोणते काम, काय काम, ह्याचा विचार केला नाही. दत्तू बरे वाटू लागताच मुंबईस आपल्या कामावर जाऊन रुजू झाला. बेबी व मी केडगावास पंडिता रमाबाईंकडे गेलो. बाईंनी आमचे फार साहाय्य केले.

तेथे गेल्यावर जिकडेतिकडे मुलींच्या तोंडी टिळकांची गाणी ऐकू येत. ती ऐकून मनाचा अधिकच भडका उडे.

पुष्कळ स्त्रियांचा सहवास घडला. त्यांचा परमेश्वरावरील विश्वास, ख्रिस्ताचे सान्निध्य व कृपा ही जिकडेतिकडे दिसून आली. चारच दिवस पण आम्ही निराळ्या जगात आहो असा भास झाला. वृद्ध, तरुण, अनाथ, अपंग, लहान, मोठे ह्या सर्वांचा सांभाळ ईश्वर कसा करीत आहे व अडल्यानडल्याला त्याचा हात कसा सावरून धरीत आहे हे दृश्य तेथे आम्हाला पाहण्यास मिळाले. त्यामुळे आपणच तेवढे अनाथ नाही ही भावना जागृत झाली.

बाईंची इच्छा होती की आम्ही तेथेच राहावे. पण बेबीचे अपुरे शिक्षण व दत्तू मुंबईस. तेव्हा मला तेथेच राहणे रुचेना. दत्तूने एलएल. बी. चा अभ्यास करण्याचे आता नक्की ठरविले होते. शिवाय आमंत्रण आले असून आगांतुकी कशाला ? तेव्हा आम्ही केडगावला नकार दिला.

चार दिवस झाले. केडगावास आम्हाला साताऱ्याहून एका बाईचे पत्र आले. तिने आम्हाला आपल्याकडे चार दिवस राहण्यास बोलावले होते. मला पुढचे भाकीत कळले.

ह्या आमंत्रणाच्या मुळाशी कोण आहे व काय आहे ते कळले. मी पंडिताबाईंना सांगितले, " मी आता जाते. मला साताऱ्याला गेलेच पाहिजे. ते पत्र म्हणजे अप्रत्यक्ष नोटीसच आहे. आपण माझ्यासाठी प्रार्थना करा."

निघताना पंडिताबाईंनी आम्हाला चार लुगडी व जाकिटासाठी बरीचशी फ्लॅनेल दिली. शिवाय तीस रुपयेही दिले. माझी दानबुद्धी मोठी ! मी त्या तीस रुपयांतले पाच रुपये बाईंच्या कामासाठी त्यांना दिले ! म्हणजे गंगेचे पाणी घेऊन गंगेतच उदक सोडले.

मी जरी केडगावात होते तरी डोळ्यांपुढे मला सातारा दिसत होता. आपल्यापुढे कोणते ताट वाढून ठेवले आहे ते मला कळले होते. मी बाईंना म्हणाले, "मला काही शिधा द्या. मजजवळ माणूस नाही व साताराचा बाजार दूर आहे.'" बाईंनी मला लागणारे सर्व सामानही बांधून दिले व माझी बोळवण केली.

माझी प्रकृती एखाद्या मुलाप्रमाणे झाली होती. झोप तर झोपच येत राही. नाहीतर मुळीच नाही. तसेच सर्व काही खाणेपिणेही मुलांसारखेच झाले होते. लहान मुलाला आई लागते तशी आता बेबी माझी आई झाली होती. तिला माझे सर्व काही पाहावे लागे.

मृगाने धरणीमातेच्या अंगावर झेप टाकली होती. चहूंकडे अंधाराचे प्राबल्य माजलेले होते. सृष्टीत प्रकाश नव्हता. मनात प्रकाश नव्हता. नभोमंडळात इतक्या तारका, पण मेघांनी आपल्या अवाढव्य सामर्थ्याने एकही तारका दृग्गोचर होऊ न देण्याचा आटोकाट प्रयत्न चालविला होता. गाडीची खडखड, मेघांची गडगड व उरातील धडधड ही कोणाच्याने थांबविता येणार होती ? अशा परिस्थितीत रात्री एकदिडाच्या सुमारास आम्ही साताऱ्याच्या स्टेशनवर गाडीतून उतरलो.

आजपर्यंत स्टेशन ते सातारा आम्ही नेहमी मोटारने प्रवास केलेला होता. पण आता आपले अंथरूण पाहूनच आम्हाला पाय पसरायचे होते. आम्ही एक रेकलाच ठरविला. आधीच रात्र अंधेरी, त्यात ढगांचे साम्राज्य; व ही अधिक भयाण करण्यासाठी विजांचे व काजव्यांचे चमचमणे. आमच्याही डोळ्यांपुढे काजवे चमकत होते.

रेकल्यात आम्ही दुःखसंकटाचे बोचके सुखासमाधानाने सावरून बसलो होतो. मधूनमधून पावसाचे सपके बसत; पण वाऱ्यापावसाला आता पाठ द्यायची म्हणून आम्ही आपली छत्री उघडून तेवढ्यातल्या

स्मृ... ३३

तेवढ्यात आपले रक्षण करण्याचा प्रयत्न करीत होतो.

अशा स्थितीत आम्ही बंगल्याच्या फाटकाशी येऊन थांबलो. पूर्वस्मृती झाली. टिळकांची प्रतिज्ञा आठवली. मनात आले, की ज्यांनी साताऱ्याला वेशीत पाणी पिणार नाही अशी प्रतिज्ञा करून ती खरी केली त्यांचीच बायको-मुलगी दीडदमडीच्या सामानाकरता आता येथे तुकडे मोडणार !

सातारा सोडताना आम्ही दुसऱ्याजवळ घराची किल्ली देऊन ठेवली होती. पण एवढ्या रात्री कशाला एखाद्याची झोपमोड करावी म्हणून आम्ही मागल्या व्हरांड्याच्या कोपऱ्यात डोळ्याचे काम हाताने करून कोरडी जागा शोधून काढली. आमची लुगडी अंगाच्याच उबेने वाळली होती व आता तीच आमच्या गारठलेल्या शरीरांना ऊब आणीत होती. तेथेही आमच्या छत्रीने आम्हाला मोठा आधार दिला.

झोप कशी येणार ? डोळ्यांत बोट घातले तरी काही दिसणे शक्य नव्हते. तरी आम्हाला नुसत्या कल्पनेने भिंतीच्या आतील घराचा-सुद्धा कोपरा न् कोपरा दिसत होता. आम्हाला त्या अंधारात मागील छोटा इतिहासही स्पष्ट दिसू लागला. भजन, कीर्तन, प्रार्थना, लेखन, चहा, बैठकी– एक का हजार गोष्टी त्या अल्पावधीत आमच्या डोळ्यां-पुढून सरकू लागल्या. आम्ही एकमेकींना धीर देत होतो. बाकी धीर देण्याचे माझ्यात सामर्थ्य नव्हते. केवळ सोन्याच्या ताटाला कुडाचा आधार अशी मी तिला होते, व बुडत्याला काडीचा आधार अशी ती मला होती.

पहाटे उजाडताच आम्ही आल्याचे लोकांना कळले. आमच्या वाडीतील माणसे आम्हाला भेटायला आली. एका मास्तरांनी आम्हाला अल्पाहार आणून दिला. आम्ही आल्याची खबर आमच्या 'लँड लॉर्ड'ला कळली. 'लँड लॉर्ड' ताबडतोब भेटायला आल्या. त्या तीन वाक्ये बोलल्या. माझे फार समाधान झाले.

पहिले : मिस्टर टिळकांसाठी मला फार वाईट वाटते.

दुसरे : तुम्ही बंगला केव्हा मोकळा करणार ?

तिसरे : जाते ! मला आता फार काम आहे.

ह्या तीन वाक्यांपैकी पहिल्या व शेवटल्या वाक्यांच्या उत्तराची त्या अर्थात अपेक्षा करीत नव्हत्याच. मधल्या वाक्याचे उत्तर मी ताबड-तोब देऊन टाकले –

" तो रिकामाच आहे. "

दहा वाजता निरोप आला,

" सामान आवरले का ?"

" नाही. आपणाजवळ एखादे खोके असेल तर कृपा करून पाठवा."

एक खोका आला. तो इतका बेताचा होता की त्यांच्यात अर्धा डझन कपबशा मावल्या असत्या. मी तर निजूनच होते. सारे काही बेबीच करीत होती. पंडिताबाईनी दिलेला शिधा उपयोगी पडला. काही-तरी करून जठराग्नीला आहुती दिली. दुपारी तीन वाजता मडमसाहेब पुन्हा आल्या.

"अजून काहीच नाही आवरले ? मला बंगल्याची फार जरूर आहे. हे कधी आवरून होणार ?"

" आपल्याला इतकी जरूर असली तर हमाल आणून सामान सडकेवर ठेवा. राहील ते माझे, जाईल त्याची मला पर्वा नाही. सामान मिळवता येईल; पण टिळकांना काही माघारी आणता येणार नाही."

मडमसाहेब गेल्या.

सत्तेपुढे शहाणपण काय कामाचे ? कामदारांना आमच्याकडे येण्याची बंदी असावी असे वाटते. माझी पथारी घातलेलीच होती. काय करील ते बेबीच करणारी. मी विचारायला पाठविले. " काही दिवस सामान ठेवण्यासाठी एखादी खोली मिळेल का ?"

उत्तर आले, " आमचीच फार अडचण आहे. फार वाईट वाटते."

रावबहादूर जोशी आमच्या शेजारीच राहत असत. त्यांना ही सर्व तऱ्हा कळल्यावर त्यांनी आपल्या कुटुंबाला मजकडे पाठविले. त्यांनी आपली माणसे लावून घर खाली केले. माझे जातभाई– ख्रिस्ती लोक बिचारे हळहळत होते. पण ते तरी काय करणार ? त्यांच्यापुढे त्यांचे पोट होते. टिळक असताना करता येई तशी दांडगाई करणे आता त्यांना

शक्य नव्हते. त्यांच्या वेळेस इकडचे काम गेले की टिळक पटकन दुसरीकडे काम लावून देतील अशी खात्री होती.

ज्या बाईने मला विसाव्यासाठी केडगावाहून मुद्दाम बोलाविले होते ती मी आलेली कळूनही माझ्या समाचाराला आली नाही ! ती कोणाचीच ताबेदार नव्हती. पण बिचारीला माझे दुःख पाहवणार नाही असे वाटले असेल. बेबीने दत्तूला पत्र पाठविले की, आम्ही घर मोकळे करण्यास साताऱ्यास आलो आहोत.

दोन दिवसांनी बेंजीमामा आला. तो येण्याच्या आधीच काही हिंदू व ख्रिस्ती मंडळीने आम्हाला साह्य करण्याचे मनावर घेतले होते. सामान पॅक झाले. आता सामान पाठविण्याच्या भाड्याचा प्रश्न राहिला. मी एका कंट्राक्टराला बोलावून सांगितले की, "मजजवळ पैसे नाहीत. तुमचा विश्वास असेल तर हे सारे तुमच्या खर्चाने मुंबईस पाठवून द्या व सर्व हिशेब करून दत्तूला धाडा. तो पैसे देईल."

काही भारी सामान रावबहादुरांकडे ठेविले. भारी म्हणजे भारी किमतीचे नव्हे, तर जात्यापाट्यासारखे वजनदार.

टिळक गेले होते तरी ते आमच्यातच आहेत असे वाटे. मला वाटते, स्वर्गलोकी जाण्याच्या आधी काही काळ आत्मा आपल्या प्रिय मंडळीच्या सन्निध राहत असावा. आम्ही सातारा सोडताना डॉ. केळकर, रावबहादूर जोशी वगैरे मंडळीला व आमच्या बहुतेक ख्रिस्ती भावा-वहिणींना अतिशय वाईट वाटले.

## ८३ : मुंबई

वयाच्या अकराव्या वर्षापासून म्हणजे अगदी बालपणापासून माझे आयुष्य एकसारखे टिळकांच्या बरोबर व बरोबरीने चालले होते. मध्ये पाच वर्षे आम्ही विभक्त होतो, पण त्या पाच वर्षांत टिळक एकही क्षण

माझ्या पुढून हलले नाहीत, की मी त्यांच्यापुढून हलले नाही. मी जी आहे ती केवळ टिळकांमुळे. टिळकांनी आपली ध्येये ठरवावी, मी डोळे झाकून ती आचरणात आणावी. त्यांनी कविता रचाव्या मी त्या गाव्या. त्यांनी भीक मागावी व मी त्यांची झोळी धरून चालावे.

आमच्यामध्ये जे खटके उडत ते जेव्हा जेव्हा मला त्यांच्या प्रगतीचा वेग सहन होत नसे तेव्हा तेव्हा. डेक्कन क्वीनच्या मागे एखादा खटारा बांधला व ती आपल्या पूर्ण वेगात निघाली म्हणजे त्या खटाऱ्याची जी आदळआपट होईल ती माझी होत असे. त्यांचा वेग मला मानवेल इतपत असला व मला त्यांची ध्येये पटवून घेण्यास अवसर मिळाला, की मग मात्र आमचे गाडे सुरळीत चाले.

इंजिनाच्या अंगी असलेली स्वयंशक्ती ती टिळकांच्या अंगी होती तर त्या इंजिनाने दिलेला वेग तो माझ्या अंगी असे. एकदा रुळावर माझी गाडी लागली की मग मात्र ती कोणाला थांबविता यायची नाही.

पण आता माझा सूत्रधार गेला. आता नवीनच जग माझ्याभोवती उत्पन्न झाले. नवीनच आयुष्याला सुरुवात झाली.

मुंबईस मला भजनकीर्तनाचे काम नव्हते. श्रीमतीला साजेल असे काम माझ्यापुढे वाढून ठेवले होते. बहुतकरून हे काम करणाऱ्या श्रीमतीच असतात. काम मेट्रनचे होते. दरमहा पंचेचाळीस रुपये पगार व राहण्यास ऐसपैस जागा. दत्तूलाही तेथे राहता येणार. मग माझ्या आनंदाला काय विचारता ? टिळक गेले तरी मुलगा, सून व मुलगी जवळ राहणार म्हणून मला फार समाधान वाटले.

मिशनरींना सर्वांनी नावे ठेवावी व त्यांच्या चांगल्या कृत्यांचाही विपर्यास करावा हे ठरलेलें असते; पण माझा अनुभव फार निराळा आहे. ते ख्रिस्ताच्या प्रेमामुळे येथे आलेले असतात व दुसऱ्यांचे करता येईल तितके बरे करण्यासाठी तळमळत असतात. आता काहीतरी युक्ती करून आमच्या पोटापुरते कसे द्यावे ह्याबद्दल त्यांना तळमळ लागली व त्यांनी ही बोर्डिंग संभाळण्याची जागा माझ्यासाठी शोधून काढली.

मी साताऱ्याहून येताच दत्तूने मला सर्व हकीकत सांगितली. मला बरे वाटले. कारण राहण्यास निवाऱ्याची जागा, घरबसल्या काम, पंचे-

चाळीस रुपये पगार व हाताखाली हवी तेवढी माणसे. पण घी देखा लेकिन बडगा नही देखा.

मी बिगारी इयत्तेत पाऊल टाकले. श्रीमती झाले असल्यामुळे ह्या इयत्तेला 'श्री' पासूनच आरंभ केला म्हणण्यास काही हरकत नाही. आता माझ्यापुढे पाटी आली. भाकरीची पाटी, भाजीची पाटी, बाजाराची पाटी, धोब्याची पाटी, दळणाची पाटी, लिहिण्याची पाटी, कचऱ्याची पाटी, अशा नानाविध पाट्या माझ्यापुढे आल्या. मुलांच्या लहानपणी मीच त्यांची शिक्षक होते, पण आता ती माझी शिक्षक झाली. बाजाराचा हिशोब इंग्रजीत तपासावा लागे.

दत्तू कामाला जायचा, बेबी कॉलेजला जायची. रूथ माहेरी गेलेली. तेव्हा मुलांनी मला एक युक्ती सांगून ठेवली होती. त्यांनी मला इंग्रजी आकडे शिकवून ठेवले होते व शब्दांचे पहिले अक्षर पाहून व माल पाहून सह्या करण्याचे तंत्र मला सांगितले होते. C = खोबरे. S = साखर. P = बटाटे. T = चहा. अशा रीतीने मी हिशोब पाही.

मुलींची पत्रेही फोडून वाचून मग जिची तिला द्यावी असे एक काम होते. ते मी करी. इंग्रजी पत्रे असली म्हणजे ती मुलांकडून वाचून घेई. आजपर्यंत जगाने माझे फारच साह्य केले. कोणी मला कधी नाही म्हटले नाही. तसेच येथेही कामाला व साह्याला माणसे होतीच. एकंदर लहानमोठ्या अडीचशे मुली होत्या. त्यांपैकी मोठाल्या मुलींनी आपण होऊनच माझे पुष्कळसे काम आवरावे. झाडझूड करणे, धोब्याचे पाहणे, भाकरवाल्यांवर नजर ठेवणे वगैरे कामे त्यांनी आपल्या अंगावर घेतली.

मडमसाहेब रोज दोन वेळेस येत. त्या का येतात हे मला समजेना. अशा तऱ्हेचे काम करण्याची माझी ही पहिलीच वेळ होती. पण मुलींकडूनच मला कळले की, मेट्रनने रोज दोन वेळेस तरी मडमसाहेबांच्या कानाशी लागावे असा शिरस्ता आहे. ह्या कानगोष्टी म्हणजे अमकीला चोरून पत्र आले, तमकीने डोळा वाकडा केला, ती उद्धटपणे बोलली, ही तिच्याशी बोलत होती. मग ह्या कानगोष्टी झाल्यावर त्या त्या अपराधाच्या मगदुराप्रमाणे तशा तशा शिक्षा व्हायच्या.

साऱ्याच मुली चांगल्या कशा असणार? अडीचशे ठिकाणच्या अडीचशे मुली. एका गावातील, एका घरातील, एका आई-बापांची मुले असली तरी त्यांच्यातसुद्धा किती भिन्नपणा आढळून येतो! व त्यातच तर मजा आहे. नाहीतर साऱ्याच पुणेरी बाहुल्या असून उपयोग काय? वाईट नसते तर चांगले कळले नसते.

ह्या मुलींत बऱ्याच मुली खोडकर होत्या, व एकीचे पाहून दुसरी ह्या खोडचा करी. काही मुली अगदी पुरुषाप्रमाणे आवाज काढून बोलत. मला हे माहीत नव्हते. एक दिवस रात्रीच्या अभ्यासाच्या वेळेस मला माडीवर पुरुष बोलल्याचा भास झाला. वर जाऊन पाहते तर सर्व मुलीच मुली. पुन्हा खाली आले तो पुन्हा वर पुरुष बोलताहेत असे वाटले. मी पुन्हा वर गेले. मला वेड लागण्याची पाळी आली. शेवटी एका मुलीने हळूच मला ही गंमत सांगितली व पुरुषासारखे बोलून दाखविले.

मला सगळी आजीबाई म्हणत. मी अजून आजी झाले नव्हते तरी माझ्या चिकीने आधीच आजी म्हणून माझ्या घुगऱ्या वाटल्या होत्या. मुली माझ्याशी फार चांगल्या वागत; पण त्या कधी बिथरत नसत असे नाही.

एकदा एक मुलगी मला म्हणाली, "आजीबाई, मला पत्रे पाहू द्या."

तसे करणे शक्य नव्हते. मी तिला पत्रे दाखविली नाहीत. झाले, तिने पैजेचा विडा उचलला, की आता हिला त्रास द्यायचा. तिची मजल चोरून माझी लुगडी जाळण्यापर्यंत गेली. झाडाच्या पाचोळ्यात लुगड्यांची आहुती देण्यात आली. कपड्याचा वास येई. पण जळते काय व कोठे ते कळेना. पत्रे न दाखविण्याचे कारण निनावी पत्रे येत. त्यात भलतेसलते लिहिलेले असे. मी अशी पत्रे जाळून टाकी. अधिकाऱ्यांना दाखवीत नसे की मुलींना दाखवीत नसे. अधिकाऱ्यांना दाखविली की मुलींना शिक्षा होत. बरे, मुलींना दाखविली की त्यांच्या मनावर भलताच परिणाम होई. तेव्हा अशी पत्रे अग्निनारायणाला अर्पण होत. अर्थात त्याला नुसत्या कागदाच्याच आहुती मी देते हे पसंत न पडून अग्निनारायणाने

माझी लुगडी लुबाडली.

मी रोज जेवणाच्या वेळेस व प्रार्थनेच्या वेळी मुलींना सांगे, " बायांनो, मला सहीसलामत आले तशी परत जाऊ द्या. तुम्ही मी असे-पर्यंत पळापळी करू नका. "

त्या म्हणत, " आजीबाई, आम्ही तुमच्यावर काहीच आणणार नाही. "

त्यानंतर तीन वर्षांत फक्त दोनदाच तसे प्रसंग आले. पण दोन्ही वेळेस बोर्डिंगमधून कोणी पळाले नाही. एक मुलगी गेली शाळेतून व एक गेली चर्चमधून. त्या गेल्या त्या पुढे ज्यांच्याबरोबर गेल्या त्यांच्याबरोबर लग्ने करून सुखाने संसार करू लागल्या. त्यांचे ज्यांच्यावर प्रेम होते त्यांच्याशी लग्न करून देण्याचा सुज्ञपणा अधिकाऱ्यांनी आधीपासूनच केला असता तर असे काही घडले नसते. दोघीही अगदी अधिकाऱ्यांच्या हातातून गेल्या. मजवर म्हटल्याप्रमाणे कोणी काहीच आणले नाही.

टिळकांच्या इच्छेप्रमाणे झाले. ते म्हणत की, " माझ्यासाठी कोणी रडू नये. माझ्यामागे एक महिनाभर पुरेल इतके पैसे राहतील. पुढे ज्याने त्याने मिळवून खावे. " आम्ही बावकर हॉलमध्ये आलो तेव्हा एक महिना झाला होता व एकच रुपया उरला होता. पुढे दुःख करण्यास कोणाला वेळच मिळाला नाही. दिवसभर काम. रात्रीची भीती.

बावकर हॉलच्या खाली तळघर होते. आत फळ्यांच्या फटींतून कबरीसारखे दिसे. झुरळे अतिशय झालेली. ही झुरळसेना त्या फटींतून रात्रीची बाहेर पडायची व टपटप उड्या मारायची. अर्धवट झोपेत तो आवाज म्हणजे कोणी चालत येत आहे असा होई. मुलींची डोकी रिती. त्यात कोणी भुताखेतांच्या गोष्टी भरून दिल्या होत्या. त्यामुळे मुलीच मुळी भुतासारख्या वागत. तेव्हा त्या कामाच्या रगाड्यातही गमतींना काही तोटा नव्हता.

तेथे मी एक प्रयोग करून पाहिला. तो यशस्वीही झाला. मुलींना मारायला माझे हात धजत नसत. तेव्हा लहान लहान मुलींनी काही अप-राध केले तर मी त्यांना पुढे उभे करून स्वतः छड्या मारून घेत असे. त्यांना आपल्या आजीबाईंना मार बसलेला पाहून फार वाईट वाटे व

त्या खोडचा करायचे सोडीत. मोठाल्या मुलींना मी कोपऱ्यात उभे करी. एकदा असेच एका मुलीला कोपऱ्यात उभे केले. तिला माझी शिक्षा मुळीच पचली नाही. तिनेही मला शिक्षा देण्याचे ठरविले.

माझ्या संसाराला हातभार लावण्यासाठी बावकर हॉल कंपाउंडच्या कोपऱ्यात मी कोंबडचा करण्यांचे ठरविले. राहुरीहून मी बावीस रुपयांच्या कोंबडचा आणविल्या. माझ्यासारखी अशिक्षित बाई दुसरा कोणता धंदा करणार ? त्या मुलीने मला शिक्षा देण्याचे ठरविले व ती रात्रीची हळूच उठून माझ्या कोंबडचांकडे गेली. तेथे तिने एक-एक कोंबडी धरून गरगर फिरवावी व जमिनीवर आपटावी. अशा रीतीने सात-आठ कोंबडचा मारून तिने वडचाचे तेल वांग्यावर काढले.

पण दुसऱ्या दिवशी तिला फार वाईट वाटले. तिचा राग सगळा निघून गेला. तिने एक पारवा धरून आणला व माझ्या स्वाधीन केला.

" आजी, हा पहा, किती मोठा आणि सुंदर पारवा आहे ! हा घ्या तुम्हाला. "

मी तो पारवा ओळखला. त्याला पिंजऱ्यात ठेवले. त्याने एका तडाख्यात अर्धी पोळी खाल्ली, पाणी प्याला व मग त्याने वर डोके करून इकडेतिकडे पाहण्यास सुरुवात केली. किती दिवसांचा बिचारा उपाशी होता कोणास ठाऊक !

संध्याकाळी दत्तू घरी आला त्याला मी तो दाखविला.

" पहा रे दत्तू ! मला फार दिवसांची हौस होती. हा मी घेतला. टिळक मला नेहमी म्हणत, मी तुला झांजीबारचा पोपट घेऊन देईन. तो घेतला आज. "

" आई, आपली अडचण आहे ! केवढचाला घेतलास हा ?"

" साठ रुपयांना ! "

आमचे बोलणे चालले आहे तोच पोपट अगदी माणसासारखा बोलू लागला. अगदी माणसाचा आवाज, तो सुंदर शीळ वाजवू लागला. गाणे म्हणू लागला. पण ही भाषा कोणती असावी हे आम्हाला कळेना. आम्ही सर्वच चकित झालो. हा पोपट पुढे आमच्याकडे १९३२ पर्यंत होता. घरातील प्रत्येक माणसाचा आवाज काढून त्याच्याप्रमाणे तो

बोले. आता मात्र माझी पोपटाची हौस पुरी झाली.

चोर नेहमी येत. पण त्यांना कधी चोरी करायला मिळाली नाही. पण बाहेरच्या चोरांना काही मिळाले नाही तरी घरातल्या चोरांचा फार सुळसुळाट झाला.

एक दिवस दत्तूचा एक नागपूरकडील मित्र त्याला भेटायला आला. त्याचे डोळे टपोरे, चेहरा रुबाबदार व एकदम वचक बसेल असा एकंदर तो दिसे.

दत्तू त्याला म्हणाला, " बापू, तू हो तोतया. मला एक युक्ती सुचली आहे. तू बरा आहेस. येथे कोणाच्या ओळखीचा नाहीस. मी आणि माझी बहीण तुला साह्य करू. "

झाले. ठरल्याप्रमाणे दोन दिवसांनी बोर्डिंगमध्ये मेस्मॅरिझमचे प्रयोग होणार अशी बातमी उठली. मुली घाबरल्या. साहेब, मडमसाहेब, दत्तूचे श्वशूर इतकीच बाहेरची प्रेक्षकमंडळी होती. बाकी सर्व मंडळी बोर्डिंगमधली. मुली, मास्तरणी व आम्ही सारे हजर होतो.

मित्रवर्य आले. त्यांना पाहताच काही मुली घामाघूम झाल्या. त्यांनी विचारले, " बोला, कोणावर प्रयोग करू ? "

कोणीच उत्तर देईना. तारा म्हणाली, " करा माझ्यावर प्रयोग. " त्यांनी प्रयोग करण्यास सुरुवात करताच ती लाल झाली. तिने डोळे गच्च मिटून घेतले. हळूहळू तिचे ओठ हलण्यास सुरुवात झाली.

" बोल तू काय काय केलेस ! " बापू म्हणाला.

बेबी म्हणाली, " मी बरेच वेळा चोरून खाल्ले, आईचे पैसे चोरून खाऊ घेतला. एकदा एक पुस्तक चोरले. " हा पापांगीकार जसजसा तिच्या तोंडून बाहेर पडू लागला तसतशी मुलींची पाचावर धारण बसू लागली.

माझे व्याही हा प्रयोग पाहण्यासाठी मुद्दाम आले होते. ते म्हणाले, " आता ह्या मुलीला सावध करा. ती फार घाबरली आहे. आता दुसऱ्या एखाद्या मुलीवर प्रयोग करा. "

सर्व वातावरण गंभीर झाले. कोणी काही बोलेना. बेबीला जादूगाराने सावध केले. ती सावध झाली. मग साहेब म्हणाले, " आता रात्र

फार झाली आहे. आता आपण पुन्हा एखादे वेळेस या."

सर्व मंडळी गेली. नाटक उत्तम झाले. परिणामकारी झाले. कारण दुसऱ्या दिवशी सकाळीच ज्या ज्या वस्तू चोरीस गेल्या होत्या त्या त्या आपापल्या जागी आपोआप येऊन पडल्या व त्यानंतर हे चोरीचे सत्र बंदच पडले.

## ८४ : दुःखार्णवातील आनंदाच्या ऊर्मी

टिळकांना जाऊन जवळजवळ तीन महिने होत आले. आज माझ्या आनंदाला भरते आले होते. मुलींच्या साहाय्याने मी आपली कामे भराभर आटोपून घेतली. मला समजले होते, की आज मला दवाखान्यात जावे लागणार होते. बारा-एकच्या सुमारास मी दवाखान्यात गेले. तो दिवस रविवारचा होता, त्यामुळे मुलींना कामे सांगून मला जाता आले.

दवाखान्यात जाऊन पाहते तो खरेच माझी सून व तिची आई. दुःख व आनंद ह्यांच्या भोवऱ्यात मी गिरक्या घेऊ लागले. सुखदुःखाच्या उकळ्या एकसारख्या फुटत होत्या. मला रडू आवरेना. चारच्या सुमारास नातू दृष्टीस पडला. त्याच वेळेस मी ही कविता रचली :–

**दुःखार्णवि मी बुडता बुडता हळुच एक ऊठली**
**लाट ही प्रेमाची धावली**
**त्या लाटेने हळुच आणुनी तीरावर सोडिले**
**जरी मज पुरे पुरे भिजविले**
**शीतल वायू, प्रखर सूर्य हा करी मला कोरडे**
**तरी का येते मजला रडे**
**आसवे कशाची सांगा मजला कुणी**
**मी हसते रडते वेड लागले मनी**

रडविती हसविती जुन्या नव्या आठवणी
एक नयन मम गाळी अश्रू, दुःखाचे परि दुजा
म्हणे मज सौख्याश्रूंनी भिजा
सुखदुःखाचे भांडारचि हे उघडे माझ्यापुढे
पाहिले मी माझ्या प्रभुकडे
महिमा त्याचा, गौरव त्याचे, त्याने ते आपुले
उघडुनी पुढे अहा मांडिले
जरा थबकले, धावुन गेले, पायांना बिलगले
अश्रुंनी प्रभुचरणा भिजविले
तो मला म्हणे घे-' तुज व्हावे ते करी
मी तुला सांगतो सौख्याला तू धरी '
ही देवाजीची कृपा होय मजवरी
बालकवी हा जगी धाडिला देवाने मजकडे
चिमुकले बालक माझ्यापुढे
वंशवृक्ष हा माझा फुलला, बघुनी त्याच्याकडे
शिंपिले अश्रुंचे मी सडे
सुखदुःखाचा वाटेकरी मग माझ्याजवळी नसे
पाहुनी मजला स्वर्गी हसे
हसे फुलांचे सदा जयाच्या हृदयामध्ये वसे
तयाला दुःख पाहवे कसे ?
तो देवाजवळी काय विनंती करी
ही रिती जहाली जागा परतुनि भरी
जगि सेवा माझी नाहि जहाली पुरी
म्हणुन धाडिली जोड नवी ही माझ्या बाळाकडे
चिमुकले बालक माझ्यापुढे ३

**पाय गोजिरे हाणी माझ्या हृदयकपाटावरी**
**फोडुनि, दुःख तमाते हरी**
**साहुनि ऐशा अपमानाते आले मजला हसे**
**कळले नाही मज ते कसे**
**मी हसते हे पाहुनि आली आशा माझ्याकडे**
**घेउनी मज संगे वर चढे**
**ह्या आनंदाच्या उंच उंच गिरिवरी**
**मज घेउन गेली दाखविले ते दुरी**
**मम जुनेपुराणे किल्ले त्यांच्यावरी**
**हा सोन्याचा काय हिऱ्याचा कळस त्यावरी चढे**
**चिमुकले बालक माझ्यापुढे**

टिळकांच्या मागे मी रचलेली ही दुसरी कविता. मुले म्हणू लागली, " आई, बरे केलेस कविता केलीस. आता तर लोकांना म्हणता येणार नाही ना, की तुला पपाच कविता करून देत होते म्हणून ?"

मी म्हणाले, " अरे, त्यांनी हे सारे प्रसंग कल्पून आधीच कशावरून नसतील ह्या कविता रचून ठेवल्या ?"

सून दहा दिवस दवाखान्यात होती. पुढे महिनाभर माहेरी गेली व चाळिसाव्या दिवशी मुलाचा बाप्तिस्मा झाल्यावर घरी आली. मुलाचे नाव आजाचेच ठेवले, कारण मि. ब्युएल वगैरे मंडळीने ते नाव मोठ्या आग्रहाने सुचविले होते. बारशाला आम्ही काहीच केले नाही. मुलींना गुळतूप दिले व दहा रुपयांचे पेढे वाटले.

नानासंबंधी एक मोठी गमतीची गोष्ट होती. टिळकांची शेवटली यात्रा सुरू होण्याच्या आधी त्यांना दवाखान्यातून घरी आणले होते. त्या वेळी माझ्या सुनेने आठवण म्हणून त्यांच्या दाढीचे काही केस कापून ठेवले होते. हे तिने अगदी गुपचीप केले होते. पण नाना जन्माला आला तेव्हा त्याच्या गळ्याला त्याच ठिकाणी पेरभर लांबीचे केस होते. अजूनही आहेत. पण आता तो मोठा झाला आहे.

आम्ही होता होईल तो सगळे काही टिळकांच्या इच्छेप्रमाणे करण्याचा नियम ठेवला होता. टिळकांना दहन करून त्यांच्या अस्थी तीन-चार महिने एका लहानशा पेटीत घालून रे. मलेलूंच्या ताब्यात ठेवल्या होत्या. ह्या अस्थी नगरच्या कबरस्थानात नेऊन ठेवायच्या, असे त्यांचे सांगणे होते.

आता आम्हाला जरा उसंत मिळाली होती. तशात नगरास तेथील वार्षिक सभाही होती. रे. डॉ. एच. फेअरबँक ह्यांच्याशी पत्रव्यवहार करून आम्ही सगळे काही आधीच ठरवून ठेवले होते.

मी, दत्तू व बेबी टिळकांच्या अस्थी घेऊन नगरास जाण्यास निघालो. आम्ही चारच दिवस बाहेर राहणार होतो. माझ्यामागे माझ्या सुनेने बोर्डिंगचे काम करण्याचे अंगावर घेतले. तिला सोबत बेंजी व बाळूबाई ह्यांना ठेवले होते.

आम्ही निघायच्या रात्रीच मुलींनी प्रथम आरडाओरड केली. नियमाप्रमाणे साडेदहाला इलेक्ट्रिक पॉवर बंद केली होती; पण एका मास्तरणीने पॉवर बंद होताच आरोळी ठोकली. त्यासरशी झोपेतल्या, अर्धवट झोपलेल्या व जाग्याही मुली ओरडू लागल्या. शेवटी पॉवर सुरू केल्यावर सर्व काही शांत झाले. गाव करी ते राव न करी हे खरे ठरले. कारण पुष्कळ मुलींना रात्रभर दिवे पाहिजे होते व त्यांनी अशा रीतीने आपले म्हणणे खरे केले.

आम्ही नगरला पोचलो तो वार्षिक सभेचा शेवटला दिवस होता. ते दिवाळीचे दिवस असून त्या दिवशी सरस्वतीपूजनाचा दिवस होता.

देवळात टिळकांच्या अस्थींची पेटी ठेवण्यात आली व पुन्हा एकदा प्रार्थना वगैरे विधी झाले. बऱ्याच जणांनी भाषणे केली. सखाराम-भाऊजींनीही भाषण केले. टिळकांच्या अस्थी चर्चपासून कबरस्थानापर्यंत भजने म्हणत म्हणत नेण्यात आल्या.

त्यांनी रचलेला, 'तुला कोठे होते चाकरनोकर.' हा अभंग रा. हिवाळे व डॉ. हिरालाल गायकवाड वगैरे दरबारी मंडळीने फार तळमळीने आपल्या भजनीमंडळींसह म्हटला. दुतर्फा सरस्वतीपूजना-निमित्त सडा टाकून रांगोळ्या घातल्या होत्या व दिवे लावले होते. हे

पाहून कोणी कोणी म्हणाले की, सरस्वतीभक्ताचे हे आपोआप सोहळे घडून येत आहेत.

डॉ. हिरालाल ह्यांनी तो अभंग अगदी घोळून घोळून शेवटपर्यंत म्हटला, व शेवटली ओळ– ' दास म्हणे बापा तुझ्या कंथेवरी मला जागा करी थोडकीशी '– टिळकांच्या वृत्तीला व त्या प्रसंगाला अगदी साजेशीच होती.

आम्ही जाताना मुलींची झालेली आरडाओरड आम्ही गेल्यावरही पुन्हा झाली व मधूनमधून नेहमीच होऊ लागली. एकामागून एक सर्व मुली ओरडू लागल्यावर मोठा कर्ण्यासारखा आवाज होत असे. मला हसूही येई व मी घाबरूनही जाई.

दैवयोगाने जरी मी पागेत येऊन पडले होते तरी माझा मूळ स्वभाव होता तोच कायम होता. बाळपणीची वहिवाट व टिळकांचे वळण ही काही मला सोडीनात. टिळकांच्या वेळी येत्याचे घर व जात्याचे दार असेच. त्यांनी कोणाला आग्रहाने बोलावले नाही, पण कोणी आले म्हणजे त्याला ते नाही म्हणाले नाहीत.

ख्रिस्ती लोकांत शिरलेले काही काही पाश्चात्त्य रीतिरिवाज मला येतच नाहीत. सलाम करणे, उपकार मानणे, दाराशी उभे राहून दार ठोकणे, या म्हटल्यावर मगच आत जाणे, आपल्या घरी कोणी पाहुणा येणार असेल तर अधिकाऱ्यास त्याबद्दल परवानगी विचारणे हे माझ्याच्याने कधीच होत नाही. मी एक स्वतंत्रलक्ष्मी आहे.

माझ्याकडे एक म्हातारी आली. मी तिला ठेवली माझ्या घरात. पण रात्री ती फार बडबड करी व झोपेत मोठ्याने बरळे. मला दिवसभर काम पडे व रात्री झोप थोडी येई. दत्तूचे काम व अभ्यास, बेबीचेही तसेच. आम्हाला तिच्यामुळे झोपेचा त्रास होऊ लागला.

तेव्हा मी तिला म्हटले, " ताराबाई, तुम्ही आत मुलींच्या बाजूला निजा."

ऐन झोपेची वेळ. बाई बाहेरून अंधारातूनच आली व एका मुलीचे अंथरूण चाचपू लागली. नवे घर, नवी जागा, तशात म्हातारी, ऐन झोपेचा अंमल, चोरही मधूनमधून डोकावत, भुतांची कल्पना, त्यात ही

सत्रा भुते शिरल्यावर मग एका मुलीने म्हातारीचा हात लागताच सूतोवाच केले.

मोठा हॉल. त्यात लहानमोठ्या मुली, नोकरणी वगैरे साऱ्या जणी निजलेल्या. एकीचा हात दुसरीला लागला की तिने ओरडू लागावे व हाच चोर किंवा भूत म्हणून म्हणावे. जी ती आपल्या जिवाला भीत होती. कोणी कोणाचे केस ओढीत, कोणी जाकिटे ओढून ओढून त्यांच्या चिंध्या करीत, कोणी कोणाचे पदर धरून हिसकाहिसक करीत. कोणी तर भीतीने रांगतच होत्या. कोणी मोठ्याने रडत होत्या तर कोणी 'मेले-मेले धावा-धावा' म्हणत होत्या. कोणी देवाचा धावा करीत होत्या, पण तोही ओरडतच.

माशा मधाच्या पोळ्यावरून उठवाव्या व त्याही गांधीलमाशा असाव्या म्हणजे जो आवाज होईल तस्साच हा आवाज होता. मात्र त्या आवाजाच्या शेकडो पटीने मोठा होता एवढेच. मला त्या आवाजाची अजून आठवण होते व हसू येते.

मी एकदम पॉवर उघडली व आत गेले. एक बाई रांगतच मजकडे आली. ती थरथर थरथर कापत होती. तिचे केस मोकळे होते. काही झिंज्या तोंडावर लोंबत होत्या. तिच्या जाकिटाच्या वाती झाल्या होत्या व लुगड्याचे वाभारे झाले होते. तिचे डोळे रडत होते व तोंड हसत होते. ती घामाने ओलीचिंब झाली होती. तिला माझा राग आला होता. पण तिच्या त्या हसण्यारडण्यात तो विरून गेला होता. ती रांगता रांगता मागे हात करून म्हणाली, "आजीबाई, ती तुमची ताराबाई– तिला उद्यापासून जवळ घेऊन निजा."

मी ताराबाईला विचारले, "काय केलेस ?"

ती म्हणाली, "मी माझे अंथरूण चाचपीत होते. मी कुठे काय केले ?"

* * *

आपल्या ख्रिस्ती व ख्रिस्तीतर देशबांधवांना टिळक एक गोष्ट नेहमी बजावून सांगत, की धर्मान्तर म्हणजे देशान्तर नव्हे. धर्मभिन्नत्वामुळे ते कधी कोणाशी भांडले नाहीत. त्यांच्याकडे कोणत्याही धर्मांचे व कोणत्याही जातीचे लोक येत व तेही सर्वांकडे जात. आपल्याला आपले

देशबांधव कसे वागवितात ह्याचे वर्णन त्यांनी खालील अभंगात उत्तम केले आहे.

धन्य धन्य माझ्या जन्मभूची कूशी।
उपजे महर्षी संत मुनी॥
का रे ख्रिस्ती मला कोणीच पुसेना।
कोणी रागवेना सजवरी॥
भेटतो वंदितो प्रेमे आलिंगतो।
कोणी न म्हणतो विटाळलो॥
माझीया गुरूला सुखे सन्मानीती।
आप्त हा हा म्हणती आमूचाच॥
सांगतो नित्याचा माझा अनुभव
नका अवास्तव म्हणू कोणी॥
दास म्हणे माझी जननी उदार।
तिचा परिवार तिच्या ऐसा॥

(अभंगांजली १८९ अभंग)

पण आमच्या ख्रिस्ती बंधुभगिनींचा पुष्कळ वेळेस असा समज असतो, की कोणी हिंदू माणसाकडे अधिक जाणे-येणे किंवा मैत्री असली की तो ख्रिस्ती माणूस हिंदू होण्याच्या पंथाला लागला. आमच्याकडे पुष्कळ हिंदू येत; राहत. व ते मुलींचे बोर्डिंग; तशात वरील चमत्कारिक कल्पना, त्यामुळे पुष्कळ वेळेस भीक नको, कुत्रे आवर अशी आमची स्थिती होत असे.

एक दिवस दुपारी दोन-अडीचच्या सुमारास एक तरुण माणूस भेटायला आला. दत्तू त्या वेळी घरी नव्हता. त्या गृहस्थाचा पोषाक सरदारी थाटाचा होता. गुडघ्यापर्यंत कोट, घट्ट पायजमा, पायांत चढाऊ बूट, अंगठी, छडी, घडयाळ.

स्मृ... ३४

" टिळक येथेच राहतात का ?"

" होय. तुम्ही कोठून आला ?"

" इंदुराहून."

मला वाटले माझ्या रामभाऊकाकांनी टिळक वारलेले कळल्यामुळे कोणाला तरी पाठविले असावे. दत्तूच्या मुंजीत त्यांनी मला पैसे पाठविले होते. हे काका म्हणजे दिनकरशास्त्री खांबेटयाचे चिरंजीव. मी म्हटले,

" तुम्ही कोणाकडून आला ?"

" कोणाकडून नाही. माझा मीच आलो."

" कोणाला भेटायचे आहे ?"

" लक्ष्मीबाईंना व त्यांच्या मुलाला."

" बसा. मुलगा गेला कामाला–मुलगी गेली कॉलेजात. सून, नातू घरात आहेत. आणि लक्ष्मीबाई त्या मीच. खरेच मी तुम्हाला ओळखले नाही."

" कसे ओळखाल ?"

" आपले नाव-आडनाव काय ?"

" विठ्ठल दत्तात्रय घाटे."

नाव ऐकताच मला आनंदाचे भरते आले. मी त्याला पोटाशी धरले. अश्रूंचे लोट त्याच्या स्वागतार्थ बाहेर पडू लागले. मी त्याला किंवा त्याच्या माणसांना कधी पाहिले नव्हते, पण त्याचे वडील टिळकांचे प्रेमळ स्नेही होते. आम्ही नसताना त्यांचे आजोबा व आजीबाई नेहमी टिळकांचा समाचार घेत. झाल्या केल्याला त्यांना आपल्या घरी नेत. त्या वेळेस ही दोन मुले लहान लहान होती. मी सर्वांची विचारपूस केली. त्याने सांगितले, " आम्ही आता नुसते दोन भाऊ काय ते आहोत."

" काय रे तू कविता करतोस का ?"

" हो."

" मग म्हण पाहू."

त्याने इतकी सुंदर कविता म्हणून दाखविली की काही पुसू नका. मी दुसरी म्हणायला सांगितली, तेव्हा त्याने संध्याकाळी पुन्हा येण्याचे

कबूल केले. सात-आठच्या सुमारास वही घेऊन येतो व मग साऱ्या कविता म्हणून दाखवितो असे कबूल करून तो गेला.

तो गेल्यावर दत्तू, बेबी घरी आली. त्यांना हे समजल्यावर फार आनंद झाला. रात्री आठ वाजता म्हटल्याप्रमाणे तो आला. आम्ही सारे तयार होऊन त्याची वाट पाहत बसलो होतो. सारे म्हणजे घरातीलच सारे. त्याचे काव्यगायन रात्री एकपर्यंत चालले होते. ते काव्यगायन अगदी कमालीचे मनोवेधक होते. कविता सुरस, म्हणणे प्रेमळ व स्वभाव आनंदी. त्याने प्रथम म्हणून दाखविलेली कविता 'प्रेमाने ध्याऊ" ही पुढे दत्तूने ज्ञानोदयात छापली व नंतर ती आमच्या उपासनासंगीतातही प्रविष्ट झाली, दत्त कवींचा पूर्वीचा ऋणानुबंध पुन्हा अशा तऱ्हेने कायम झाला.

माझी सून जरी मुंबईस जन्मलेली व तेथेच वाढलेली तरी तिला बावकर हॉलची हवा मानवेना. नानाही फारसा बरा नसे. तेव्हा ती नगरास माझ्या बहिणीकडे म्हणजे सौ. शहाबाई मिसाळ ह्यांच्याकडे गेली. तेथे शहाबाईंनी व त्यांच्या पतींनी तिचे पुष्कळ केले. पण नानाला जास्तच बरे वाटेनासे झाल्यावर ती राहुरीला गेली. डॉ. व मिसेस बालैंटाईन ह्यांनी तेथे त्यांचे फार केले. तेथे सहा महिने राहून बेंजीच्या लग्नाला ती परत आली.

वयाच्या मानाने नाना फारच लवकर बोलू लागला होता. त्याला चित्रांचा फारच नाद. तो त्याचा खेळच होता. त्याच्या हातात खडू देऊन त्याला फळयांच्या जमिनीवर बसविले की तो 'बाग्याबुवा', 'भपभपगाई' वगैरे आवडती चित्रकला सुरू करायचा. बाग्याबुवा म्हणजे बागुल बोवा. भपभपगाई म्हणजे आगगाडी.

त्याला मुली विचारीत, "तुझी आई काय शिकली?"

तर तो म्हणे "बीये."

"बाप?"

"बीये."

"आत्या?"

"बीये."

"अन् तुझी आजी काय शिकली रे?"

तर तो म्हणे, "भोपळा."

मुलींच्या प्रार्थनेच्या वेळी तो हजर राही. न शिकविताच तो आपल्या आईच्या वडिलांना "आदा" म्हणू लागला. त्याच्या आजीला फार धन्यता वाटे.

## ८५ : विनाशकाले विपरीत बुद्धी

नाना लहान होता. रूथच्या माहेरी दारापुढे नागपंचमीचा मोठा बाजार भरे. ती आज नानाला घेऊन तो पाहावयास गेली होती. आमच्याही बोर्डिंगच्या मुलींना ती यात्रा पाहायला पाहिजे होती. पण असले हिंदू लोकांचे सण, मेळे, यात्रा पाहणे योग्य नाही असा आमच्या समाजाचा समज व अधिकाऱ्यांचे मत असल्याने बिचाऱ्या मुलींना जाता आले नाही.

अलीकडे आमच्या मडमसाहेबांना व त्यांच्या पतींना पोहण्याचा बराच नाद लागला होता. आपणासारखे करीती तात्काळ। नाही काळवेळ तयालागी। त्यांनी मुलींनाही पोहण्यास नेण्यास सुरुवात केली. आज शाळेलाही सुट्टी होती व मनातही हौस होती, तेव्हा मुलींना घेऊनच पोहण्यास जाण्याचे त्यांनी ठरविले.

साहेबांनी पोहोण्यासाठी आधीच निवांत व निर्जन अशी जागा ठरवून ठेवली होती. मुली, मास्तरणी, मी वगैरे सर्वांनी जमून निघायचे असे आदल्या रात्रीच ठरले होते. सर्व जणींनी पहाटेच उठून आपापली कामे उरकून घेतली. मोठाल्या माणसांनासुद्धा अशा वेळेस काही सुचत नाही, मग लहान लहान मुलींचा उत्साह तो काय विचारावा? आज त्यांच्या आनंदाला भरती आली होती. दोन दोन घास खाऊन जिने तिने सर्व काही व्यवस्था बिनबोभाट करून सहाला सर्वजणी तयार

होऊन उभ्या राहिल्या. रात्रीच सर्वजणींनी आपापले दागिने काढून मज-जवळ ठेवले होते. दागिने ते काय असणार—पण होते ते किडुकमिडुक मिळून बरेच झाले.

आम्ही येथून तेथून पायानेच गेलो व आलो. इतक्या जणींना मोटारी न् तांगे कसे करता येणार ? मधला प्रवास आम्ही आगगाडीने केला.

साहेब मोटारीने माहीमपर्यंत गेले. मडमसाहेब आमच्याबरोबर आगगाडीने आल्या. त्या माहिमास उतरून साहेबांबरोबर पुढे गेल्या. आम्ही चालत गेलो.

स्टेशनवर उतरताच आम्हाला एका मुलीचे वडील भेटले. आम-च्याबरोबर ते बरेच बोलले. ती त्यांची एकुलती एक मुलगी होती. तशी त्यांना मुले बरीच होती, पण ही शेवटचीच व सर्वांच्या पाठीवर पाय देऊन आलेली होती. ती फार बुद्धिमान व हुषार असल्यामुळे सर्वांना हवीहवीशी वाटे.

मी आजपर्यंत अधिकाराची कामे कधी केली नसल्याने अधिकार कसा गाजवावा तो मला कधीच गाजविता आला नाही. मुली व मी नातेवाइकांप्रमाणे वागत होतो. एखादी काकी, मावशी किंवा आजी असावी तशा त्या माझ्याशी वागत व मी त्यांच्याशी वागे. मात्र कोरडीच हो.

आम्ही सर्वजणी खेळीमेळीने चाललो होतो. सर्वजणी माझीच थट्टा करून बोलत होत्या. कोणी म्हणे, पाहू आजी कशा धावतात, तर कोणी म्हणे, अग, त्यांना चांगले झरझर चालताही येत नाही नि त्या कशाच्या धावताहेत !

एक म्हणे "काय ग, आजी पडल्या तर ग ?"

दुसरी म्हणे, "पडल्या तर मी त्यांना उचलून घेईन."

त्यावर तिसरी म्हणे, "तुला एकटीला नाही उचलली तर ?"

यावर उत्तर येई, "अग, चार माणसं आणून आजीला उचलून नेऊ. नाही तर झोळी करून नेऊ."

"अन् जखमी झाली तर ?"

" पट्टया बांधू."

" अन् बुडाली तर ?"

" पाण्यातून काढू."

" अन् मेली तर ?"

" आपण रडू."

" अग, नका ग आजीला असं बोलू."

" बायांनो, मला बोला पण तुम्ही सुखरूप असा. बोलताना नेहमी सुधे बोलावे. व्हायचे ते होतेच."

आम्ही सरासरी साडेदहाला जुहूला पोचलो. सामानसुमान लावले. कोणी आपल्या सतरंज्या अंथरल्या कोणी लोळू लागल्या. कोणी वाचीत बसल्या, कोणी इकडेतिकडे बागडू लागल्या. पोर व ढोर सारखेच. ढोराला चारा असला की चाललेच ते पुढे पुढे. पोराला गंमत दिसली की चाललेच तिच्या मागे मागे.

मडमसाहेब म्हणाल्या, " असले ठिकाण कधीच मिळाले नाही व पुढेही मिळणार नाही. हे फारच आठवणीजोगे आहे."

बाईंचे हे भाकितच ठरले.

मी गोदातटीची. माझी व सागराची जानपछान नव्हती. तशी नुसती नजरभेट झालेली होती इतकेच.

निघताना बऱ्याच जणांनी मोडा घातला होता, की आज नागपंचमी आहे. तेव्हा भरतीच्या वेळेस तुम्ही जाऊ नका. पण आमच्या साहेबांना व मडमसाहेबांना भरती दोनला येणार असे कोणी सांगितले होते व त्यावरच ते अवलंबून होते.

आम्ही गेलो तेव्हा पाणी कुठेच नव्हते. मला गंगेचे पाणी पाहण्याची सवय, तेव्हा हे सारे उघडे वाळवंट पाहून मला नवल वाटले. मी म्हणे, " येथे घोटा भिजण्याची मारामार. येथे ह्या पोहणार कशा ? "

मुली म्हणाल्या, " आता भुका लागल्या. अम्हाला काहीतरी खायला द्या." आपल्या देशाची रीत, की भुकेचे नाव काढल्यावर खाल्ल्यावाचून जाऊ द्यायचे नाही, तर जेवल्यावर आंघोळ करायची नाही अशी पाश्चात्त्य रीत. येथे माझा व मडमसाहेबांचा मतभेद होऊन

त्यांनी आधी आंघोळ व मग जेवण असे फर्मावले.

एकीमागे एक अशा सर्वच मुली निघाल्या. काही मोठ्या व मध्यम मुली शिंपा वेचीत आमच्यापासून बऱ्याच दूर गेल्या. काही मुली पोहायला शिकण्याजोग्या मडमसाहेबाजवळ होत्या व तीस-चाळीस लहान लहान मुली माझ्याजवळ होत्या. दत्तू-बेबी आली नाहीत म्हणून मला वाईट वाटत होते. ह्या मुलींत एक लहानसा डे स्कॉलर मुलगाही आला होता. तो आपल्या आईबापांचा एकुलता एक मुलगा होता. आंधळ्यांची शाळाही आली होती.

अकराचा सुमार. पाणी येऊ लागले. पाणी फारच संथ होते. आत्ताशा कोठे घोट्याचे पाणी गुडघ्याला लागू लागले. पाणी गढूळ व गरम होते. माझे डोके सुपीकच. मला वाटले, आता बाराचा सुमार झाला आहे– तेव्हा सर्व गिरण्या सुटल्या असतील व त्यांचे हे सोडलेले गरम पाणी असेल.

आता पायाखालची वाळू सरकू लागली तोच एक आरोळी ऐकू आली– "भरती आली– बाहेर व्हा."

जवळ नाही माणूस. हातात नाही काठी. पायाजवळ नाही दगड. मोकळे मैदान. कोणाचा शब्द कोणाला ऐकू येईना. मडम पोहोण्याच्या नादात, मुली शिंपांच्या नादात.

मडम म्हणाली होती की, "हीच मुलींना पोहोण्यास योग्य जागा आहे. कारण येथे पाखराचा वारा नाही की माणसाचा थारा नाही."

मला त्या बोलण्याचा अनुभव आला. एवढी बारा कोसांची मुंबई, माणसांनी गजबजलेली, पण तेथे चिटपाखरू नसावे ! असे अकाली बली घेतले गेले ह्यात ईश्वराची काय योजना असेल ती त्याची त्यालाच माहीत. घोट्याचे पाणी गुडघ्याला लागले, गुडघ्याचे कमरेला लागले– पण अगदी संथ.

माझ्या कमरेला पाणी लागले ते माझ्या बरोबरीच्या लहान लहान मुलींच्या गळ्याशी आले. पाणी संथ असल्याने व त्या परिस्थितीच्या भयानकपणाची जाणीव मला नसल्याने मला माझ्याजवळच्या सर्व मुली पाण्यातून काढता आल्या. कोणाचे केस तर कोणाचे खवाटे, कोणाची

जाकिटे तर कोणाची मनगटे धरून मी त्या मुली भराभर पाण्याच्या बाहेर काढल्या.

तोच कोळी लोक आपल्या होड्या घेऊन आले. त्यांनी आंधळ्यांच्या शाळेतील एक बुडणारा मुलगा काढला. त्यांची शाळा आमच्यापासून बऱ्याच अंतरावर उतरली होती. त्याच दिवशी त्या आंधळ्या मुलांपैकी एकजण नारळाच्या झाडावर चढून तेथून पडला होता.

आमच्याकडे सर्व स्त्रीराज्यच होते. माझ्याभोवती सर्व लहान लहान मुली होत्या; पण त्यात वीरस्वामी नावाची एकच मुलगी मोठी होती. ती अशक्त व आजारी म्हणून मागे राहिली होती. माझ्या बरोबरीच्या मुली पाण्यातून काढून त्यांना हुर्र हुर्र करीत कशी तरी हाकीत त्या मोठ्या मुलीजवळ घेऊन गेले. ती तेथे पडलेल्या सामानाजवळ बसली होती.

तेथे जाऊन पोचते तो दुसरे संकट आले. तेथील रखवालदार म्हणू लागला, " हे सामान येथून काढा." आता जवळ नाही मोठे माणूस. जेवणाची मोठमोठी भांडी, बाराजणींच्या बारा जिनसा, छत्र्या, वहाणा, लुगडी, ब्यागी, पिशव्या, पैसे– त्या वेळी मला त्रिभुवन आठवले. त्या रामोशाचा एकसारखा तगादा.

येशू ख्रिस्ताच्या बोलण्याची आठवण झाली की, " मनुष्याच्या पुत्राला डोके टेकायला जागा नाही." कसेतरी दाट बळ करून जिवाच्या अदावतीने ते सामान हलविले.

तोच ह्या मुली भोरड्याप्रमाणे इकडून तिकडे सैरावैरा धावू लागल्या. शिंपांच्या मागे गेलेल्या मुलींचे चेहरे अंधुक दिसत होते. कोणी वर हात करून आपल्याकडे बोलावीत, कोणी उंच दगडावर चढून बसत, पण कोणाचे आवाज ऐकू येईनात. आता मात्र समुद्राने उग्र स्वरूप धारण केले.

कोळी पाचशे रुपये मागू लागले. मी त्यांना म्हणाले, " पाचशे रुपये देते– पण मुली पाण्यातून काढा."

ते म्हणत, " आधी पैसे द्या. " कारण माझ्या बोलण्यावर कोण विश्वास ठेवतो ? एक नूर आदमी व दस नूर कपडा. मी तर नेहमीच

लंकेची पार्वती.

माझे कपडे चांगले नसले तरी मजजवळ त्या वेळेस विम्याचे अडीच हजार रुपये आलेले होते. माझी खात्री होती की, मी ते सारे पैसे देऊन टाकले असते तरी टिळकांनी मला कधी मना केले नसते व व दत्तूही नाही म्हणणार नाही.

पण त्या कोळ्यांना मडमसाहेबांकडून पैशाचे वचन हवे होते आणि मडमसाहेब जवळच्या मुली काढून साहेबांना टेलिफोन करण्यास गेल्या होत्या. साहेब परत गेले होते व थोड्या वेळाने येणार होते.

हा सर्व खेळ साडेअकरापर्यंत चालला. दोनाची भरती साडेदहाला आली. बाराला मुली किनाऱ्याला लागल्या. नाशिक–पंचवटीप्रमाणेच हे असेल. मुलींना दुसऱ्या तीरावर कोणी धरील. मग आपण त्यांना चांगली शिक्षा करू, असे मी म्हणत होते.

पण समुद्राला त्या मुली पचविणे अशक्य झाले. त्याने ताबडतोब स्वत: होऊनच त्या किनाऱ्याला आणून टाकल्या.

साडेबारा झाले. सकाळपासून सगळे उपाशी. लहान लहान मुली कळो कळो भुकेने व्याकूळ झाल्या. साहेब आले. त्यांनी आपली शिदोरी सोडली व पाण्याला आधार केला.

तोच आसपासच्या बंगल्यातून लोक हळू हळू जमून आमच्या-भोवती कडे करून उभे राहिले व आम्हाला प्रश्न विचारू लागले, "मुली होत्या किती ? बुडाल्या किती ? त्यांना कोण कोण आहे ? का साऱ्याच ऑर्फन ? तुम्ही आज आलात हेच मुळी चुकले. आज धादांत नाग-पंचमी. देवाला हे रुचणार कसे ? आणि तुम्ही खात तरी कसे बसला आहा ?"

शेवटले वाक्य ऐकताच बिचाऱ्या साहेब–मडमेने आपल्या तोंडा-तले घास तसेच टाकले.

माझा पदर बांधलेलाच होता. मी त्या कड्यात उभी राहून कमरेवर हात देऊन एक खणखणीत व्याख्यान दिले–

"ह्यात तुम्ही आम्हाला एक बोट तरी लावता आहा का ? तुम्ही सर्व नुसता तमाशा पाहायला जमला आहा. चला सारे बाजूला

व्हा. आमचे आम्हालाच ओझे वाहिले पाहिजे. ''

आता ते कडे तुटले व सर्व पांगापांग झाली. पहिली जी मुलगी आली ती इंग्रजी सहावीतली. ह्या मुलीचा जन्म माझ्याच हातचा. हिला मीच न्हाऊ घातलेले. तिची आई बाळपणीच वारलेली. त्यानंतर तिच्या बापाने व बहिणीने तिला जतन केलेले. काल तिचा वाढदिवस होता. काल जी तिच्या डोक्यात फुलांची वेणी घातली होती ती अजून तशीच तिच्या डोक्यात ! तिच्या हातातील बांगड्या तीनच दिवसांपूर्वी मीच भरल्या होत्या. एकामागे एक अशा अकरा मुली व बारावा मुलगा बाहेर आला.

हे सारे खरे का स्वप्न ? मी हाताला चिमटा घेऊन पाहिला. स्वप्न नव्हते. एक खटारा भरून त्यात ह्या मोळ्या भरून जे. जे. त पाठविल्या. माझी अक्कल माझ्याच पुरती. मला वाटले, की ह्यांना कुंभाराच्या चाकावर घालून पोटातले पाणी काढतील आणि त्या बऱ्या होतील.

साहेबांना विचारले, " ह्या बऱ्या होतील का ? "

त्यांनी म्हटले, " होतील."

एक गाडी भरून चार-पाच मुली उरल्या. त्या साहेबांनी आपल्या मोटारीत भरल्या. मला ते म्हणाले, " आजी, आता तुम्ही थकला असाल. मोटारमध्ये या. "

मी म्हणाले, " बसणार नाही. ज्यांच्या जिवावर मी पोट भरते आहे त्या दुःखात पायी आणि मी मोटारमध्ये ? मला हे पसंत नाही."

पुढे पोलिसांनी मोटार अडविली. साहेब असो नाहीतर राजा असो, त्यांना काय ? तेथून साहेब सहीसलामत सुटून पुढे गेले. आम्ही सारी पायदळच परत आलो. पण येतानाचा तो हुरूप, तो उल्हास, तो आनंद हे आता चटसारे नाहीसे झाले होते. त्यांची जागा आता भेसूर अंधकाराने व्यापिली होती. पायांचा गळाठा, उरात धडपड, मनात चिंता !

आता आमचे पाय मात्र चालत होते. तोंड उघडून बोलण्याची इच्छा होत नव्हती. साऱ्या वाटेने त्या मुली दिसत होत्या. अमकी असे

बोलली, तमकीने तिला तसे उत्तर दिले, एक ना दोन. वैऱ्यावर असा प्रसंग येऊ नये.

आम्ही स्टेशनवर आलो. पुन्हा तीच व्यक्ती. त्याने विचारले, माझी मुलगी कुठे आहे ? आम्ही स्टेशनवर पोचवण्याच्या आधीच टेलिफोनने जिकडेतिकडे ही अशुभ वार्ता पसरली होती.

तो जिला तिला विचारी. सर्वजणींनी माझ्याकडे बोट दाखविले. मी वरिष्ठ. त्या आपल्या मोकळ्या झाल्या. माझ्या पोटात मोठी धोंड उभी राहिली.

" का बाई ? बोलत नाही ? काय झाले ? माझी मुलगी कुठेच दिसत नाही ? सांगा ! चोरून नका ठेवू."

मी काय बोलणार ? आपला केवढाही वैरी असला तरी त्यालाही असली अशुभ वार्ता सांगण्यास धीर होणार नाही. प्रिय वाचकहो, माझ्यावर केवढे हे मोठे संकट आले होते ! खरे बोलू का खोटे बोलू हेच मला कळेना. खरे बोलले तरीही पाप आणि खोटे बोलले तरीही पाप ! जे आहे ते पुढे येणारच.

मी सांगितले, " मला काही बरोबर माहीत नाही. कदाचित ती मागे असेल, कदाचित पुढेही गेली असेल." आम्ही कशीतरी गाडी गाठली.

सात वाजता आम्ही आपल्या व साहेब आपल्या ठिकाणी पोचलो.

बंगल्यावरून साहेबांचा निरोप आला की, " फाटक बंद करा, कोणाला आत येऊ देऊ नका व परवानगीवाचून कोणा मुलीला जाऊ देऊ नका."

डॉ. गुरुबाई करमरकर व मि. ब्युएल भेटून गेली. माझे व्याही व विहीण येऊन गेली. काही म्हणाले, बरे झाले हे अधिकाऱ्यांच्या समक्ष झाले; नाहीतर तुमच्यावर केवढी ही तोहमत आली असती ! डॉ. ह्यूमकडे एक मुलगा शाळेत शिकत होता. तो आता मोठा झाला होता. त्याच्या मेहनतीने मुंबईस वडाळ्यानजीक एक चांगली शाळा स्थापन झाली होती. त्याला ही बातमी कळताच तो माझ्या साह्यार्थ धावून आला. तो मला आई मानीत असे. त्याचे नाव नारायणराव देशमुख.

आम्ही हुकमाचे बंदे गुलाम ! आम्ही फाटक बंद केले. चौकीवर जहागीरदार मांडा ठोकून बसले. जहागीरदाराच्या हातात एक सोटा होता. त्याची जात मुसलमान आहे. ह्या गृहस्थाने चाळीस वर्षे ह्या ठिकाणी इमानेइतबारे चौकीदाराचे काम केले आहे.

गेटच्या बाहेरच्या बाजूने लोकांची झुंबड उठलेली. बाहेर काठ्यांचे आवाज एकसारखे होत होते. भिंतीवरून दगडांचा वर्षाव होत होता. जो तो म्हणे, "दार उघडा, नाहीतर आम्ही ते मोडू. मग काय होईल ते सांगवत नाही. मेलो तरी बेहेत्तर. सरकार काही कुठे गेले नाही. आमच्या मुली आम्हाला दाखवा नाहीतर खून पडतील."

घरात चहूंकडे रडारड व बाहेर हे काहूर. दे माय धरणी ठाय, असे होऊन गेले. पृथ्वी दुभंग होऊन आता पोटात घेईल तर बरे होईल, असे वाटू लागले. आतमध्ये धीर देणारे तिघेच पुरुष. दत्तू, नारायण देशमुख व जहागीरदार.

कामदारीण बायांपैकी एकीची गेलेली बहीण, एकीची मानलेली मुलगी. तेव्हा त्या आपापल्याच दुःखात चूर.

घरात अन्न पुष्कळ होते पण ते घेण्यास कोणाचा हात उचलेना व खाण्यास तोंड उघडेना. जागोजागी मोटकुळी पडल्याप्रमाणे मोठाल्या मुली पडल्या होत्या व लहान लहान मुली मास्तरणीच्या आश्रयाला पडल्या होत्या. मोठी माणसेही असल्या हलकल्लोळात गांगरतात, मग त्यांची बिचाऱ्यांची काय कथा !

रडारड, आरडाओरड ही चाललीच होती. मी फाटकापाशी गेले व मोठ्याने ओरडून बाहेरच्या माणसांना सांगितले–

"मी दार उघडते, तुम्ही माझे हवे ते करा. मी भीत नाही. पण तुम्ही असा दंगा करू नका. मला कोणत्याच मुली ओळखून दाखविता येणार नाहीत. पण मी चोहोंकडची पॉवर उघडते. तुम्ही आत येऊन आपापल्या मुली ओळखा."

इतके बोलून मी कुलूप काढले. घो घो घो घो माणसे आत शिरली. जितक्या मुली होत्या तितक्यांचे नातलग आले. त्यांच्याबरोबर माझाही तपास करण्यास शेवंताबाई कोटक आली.

प्रत्येकाने मला व माझ्या अधिकाऱ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली. कित्येकांनी आपल्या मुली त्याच वेळेस नेल्या. मी म्हणाले–

"अधिकाऱ्यांचा हुकूम नाही. तुम्ही त्यांना विचारून मुली न्या."

"आम्ही तुला आणि तुझ्या त्या अधिकाऱ्याला भीक घालीत नाही. तुम्ही आपल्या अधिकारावर घासलेट ओता आणि काडी लावा, एवढ्या मुली मेल्या आणि तुम्ही ग कशा वाचलात ?"

ती रात्र म्हणजेच वैऱ्याचीच. दत्तू, बेबी, मी व नारायणराव रात्रभर उभेचे उभेच. बाहेर जहागीरदार उभा. मुंबई व आसपासची गावे इकडून माणसे मुलींच्या तपासाला येऊ लागली. लहान मुली घाबरून गेलेल्या. कोणी पहिल्याच आजारी, तर कोणी आजारी झालेल्या.

अशा एक ना दोन, कितीतरी भानगडी. कोणाला चहा तर कोणाला कॉफी, कोणाला सोडा तर कोणाला मोहोऱ्या, शेंगड्या, गरम पाणी, रोटी, लोणी–काय लागेल त्याचा नियम नव्हता. माडीवरून खाली व खालून वर पुन्हा पाहुण्यांची मनधरणी. कोणाचे समाधान करणे, कोणाला धीर देणे, कोणाला बाबापुता म्हणून परत लावणे. एका रात्रीत माझे वीस-पंचवीस रुपये वरच्यावर खर्च होऊन गेले. पुन्हा पोटात धडकी. लहान मुली राहून राहून मोठ्याने ओरडत,

"आजी चमिंद्र, चमिंद्र."

तेथे श्रीधरराव गायकवाड मॅनेजर होते. एखाद्या लग्नाच्या वेळेस वडील माणसाला विचारावे, की मुलीला अमके अमके मागताहेत. द्यायची का तेथे ? त्याप्रमाणे मला वडीलकीचा मान द्यायला ते आले, "पेट्या किती लागतील ? त्यांची लांबी-रुंदी-उंची किती धरावी ?" वगैरे. मला तरी काय दगड कळत होते ? मी नुसती होस हो करीत होते.

सकाळीच साहेब आले.

"आजीबाई, तुम्ही मुली ओळखाल का ?"

"हो."

"त्यांची नावे सांगाल का ?"

"हो. पण कोणापुढे ?"

पण माझ्या प्रश्नाचे काही उत्तर न देता साहेब निघून गेले. माझ्या उरात धडकी भरली. डोक्यात चक्र सुरू झाले. आता जर का नावे बरोबर न सांगितली तर काय होईल ? पहिल्यांदा साहेबच माझ्याबरोबर होते. त्यांनीच मला नावे सांगितली. मला एकही मुलगी ओळखू आली नाही, मग नावे कसली मी सांगणार ? पण नावे सांगण्याचा प्रसंगच आला नाही.

माझ्या जीवाने सर्व अनुभव घेतले आहेत– पण अद्याप कधी कोर्टाची पायरी चढण्याचा मजवर प्रसंगच आला नव्हता. पण अकराच्या सुमारास कोर्टाची– व टिळक गेल्यानंतर पहिल्यांदाच जे. जे. ची पायरी चढले. तेथे लोकगंगेला भरती आलेली होती. दाराशी मोटारी व बग्या यांची गर्दी उसळली होती. सायकली असंख्य होत्या व पायदळाची तर काही गणतीच नव्हती.

मला कोणी आळशी म्हणा किंवा गचाळ म्हणा– पण माझ्या अंगावर समुद्रावर अंग धुताना जे लुगडे होते तेच अजून होते. माझा त्या वेळेस जसा पदर बांधलेला होता तसाच अजून होता. ते लुगडे तसेच ओले अंगावर वाळले होते. माझ्या शरीराचे घुसळण चालूच होते. आधीच माझी मान हलते त्यात हे वारे. मग काय, सारे शरीर ताजाचा कळस बनले.

मी तांग्यातून उतरले व चिकीच्या बापाने मला उचलून आत ज्युरीपुढे उभे केले. त्या गर्दीत मला माझ्या जिवाभावाची एक व्यक्ती दिसली. ती म्हणजे डॉ. गुरुबाई करमरकर. त्यांच्याजवळ मी जाऊन बसले.

माझे नाव पुकारताच ही थरथरणारी मैना पिंजऱ्यात अडकली. आता जबानीला सुरुवात झाली. तेच लुगडे व तोच पदर. दोन्ही हात कठड्यावर टेकलेले. जणू काय, लक्ष्मीबाई डेराच घुसळण्यास उभ्या आहेत. सर्व अंग हलते आहे, पाठीवर मोकळे केस लोळत आहेत, पुढे कठड्यावर मान आपटत आहे. आता ऊद-कापराचाच उशीर, की वारे लागणार बोलायला. जबानीला सुरुवात झाली, पण त्या थाटात तोंडातून शब्दच निघेना.

इतक्यात डॉ. गुरुबाई उभ्या राहिल्या. त्या म्हणाल्या, "मला ज्युरीला एक विनंती करायची आहे. कृपा करून मला ह्या बाईच्या पाठीमागे उभे राहू द्या. मी तिला कोणतीच सूचना करणार नाही. पण मागे उभी राहून तिची मान धरली तर ती बोलेल." त्याप्रमाणे त्यांना परवानगी मिळून त्यांनी माझी पाठराखण केली.

पुढे पाहतो तो रावबहादूर आठवले. मला थोडा धीर आला. आमची प्रश्नोत्तरे येणेप्रमाणे झाली–

"तुम्ही गेलात तेव्हा पाणी किती होते?"

"मुळीच नव्हते."

"मुलींजवळ कोण कोण होते?"

"आम्ही दोघी."

"तुम्ही कशा बुडाला नाही?"

"ते मी काय सांगू?"

"पाणी कोणीकडून आले व कोणीकडे गेले?"

"मला भूगोल येत नाही. पण डावीकडून आले व उजवीकडे गेले."

झाली माझी जबानी. मुलींचे पुढील सोहोळे पाहण्यास मी गेले नाही. जे. जे. तील देखावा वर्णन करणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. आयाबहिणी दगडाच्या जमिनीवर धडाधड अंग टाकीत होत्या. नको. ती आठवणसुद्धा असह्य होते.

जुहूची पिकनिक येथे संपली, पण तिचे प्रायश्चित्त बरेच दिवस भोगावे लागले. रडणे व ओरडाओरड हे पुढे दोन महिने चालले होते.

## ८६ : मृत्युच्छायेच्या खिडीतून

आमच्या घरी सुरू असलेल्या ह्या मृत्युसत्रातील पहिली आहुती ठोंबऱ्यांची. नंतर टिळक. त्यांच्यानंतर लागोपाठच माझे वडील बंधू केशवरावमामा. आम्ही बोर्डिंगमध्ये येऊन स्थिरस्थावर होतो न होतो

तो केशवरावमामांची अशुभ बातमी कानी पडली. त्यानंतर आमची चिकी, मग भाऊजी, मग माझ्या व्याह्यांची बहीण, मग ज्यांना मी मुलीनाती समजत होते त्या अकरा मुली, रा. मित्र, रेंदाळकर, काकासाहेब मिरीकर, पंडिता रमाबाई, माझे व्याही– अशी एकंदर वीस-बावीस माणसे त्या वीस-बावीस महिन्यांत काळाने हिरावून नेली. मृत्युच्छायेच्या खिडीतून आम्ही चाललो होतो. मधल्यामधे कोण उचलले जाईल ह्याचा नियम नव्हता.

एक दिवस भाऊजींचे पत्र आले– मी येतो. मला स्टेशनवरून घेऊन जा. दत्तू त्यांना स्टेशनवरून घेऊन आला. टिळकांच्या मृत्यूनंतर भाऊजींच्या मेंदूला धक्का बसला हे मी मागे लिहिलेलेच आहे.

ते आता पूर्वीप्रमाणे राहिले नाहीत. ते वाटेल त्याला वाटेल ते बोलू लागले. आपल्या भावाच्या मृत्यूस आपली भावजयच कारणीभूत झाली असे त्यांच्या मनाने पक्के घेतले होते. आपण आता एक उत्तम कवी होणार, असेही त्यांना वाटू लागले होते व कविता करण्यात ते रात्र रात्र जागून काढू लागले.

दत्तू, बेबी व रूथ त्यांच्या मर्जीप्रमाणे वागून त्यांना आनंदित ठेवण्याचा प्रयत्न करीत. त्यांनी काही म्हटले तरी त्याला होस हो करीत.

जे भाऊजी उभ्या आयुष्यात एका शब्दाने मला कधी काही बोलले नव्हते ते आता माझ्याशी भांडू लागले. मुलांना तर ती जवळ असली म्हणजे ते उभी धरीत. त्यांना रागवायला कारणच लागत नसे.

एकदा बाजारातून त्यांनी काही खाण्याचे जिन्नस आणून माझ्यापुढे आदळले व म्हणू लागले, "घ्या खा. माझ्या भावाला मरण्यास तुम्हीच कारण झाला." असं म्हणून ते रागारागाने स्टेशनवर निघून गेले.

त्यांच्या पाठोपाठ मी जहागीरदाराला स्टेशनवर पाठविले व त्याने त्यांची कशीतरी समजूत करून त्यांना घरी परत आणले.

घरी आल्यावर तो मला एका बाजूस घेऊन सांगू लागला की, "काकांनी स्टेशनवर नोटांचे दुकानच मांडले होते."

मी त्यांना विचारले, "तुमच्याजवळ किती पैसे आहेत ? त्या सर्व नोटा मजजवळ ठेवायला द्या." ह्यावरून ते पुन्हा रुसले व निघून गेले.

आमच्या दीरभावजयांचे हे पहिले व शेवटलेच भांडण. ह्यानंतर त्यांची-माझी गाठ पडली नाही. लौकरच ते वारल्याची बातमी आली.

पुढे माझे व्याही हवा बदलायला वाईस गेले. तिकडे ते बरेच आजारी पडले. डॉक्टरांचे पत्र आले की, रा. कृष्णरावांची प्रकृती अतिशयच बिघडली असून त्यांच्याजवळ त्यांच्या मुलीने असलेले बरे. त्याप्रमाणे रूथ, दत्तू व नाना वाईस गेले. तिकडे रूथला व नानाला ठेवून दत्तू परत आला.

नंतर वृत्त आले की रा. सरोदे वारले. टिळकांच्या नंतर लागो-पाठ आमच्या घरातील तीन माणसे गेली. रा. सरोदे, सखारामभाऊजी व माझे वडील बंधू केशवरावमामा. टिळकांचा घास मिळताच मृत्यू जणू काय सवकला.

वाईहून रूथ परतली. ती आल्यानंतर तीन-चार महिन्यांनी रूथ पुन्हा दवाखान्यात गेली. दिवस रविवारचाच होता. संध्याकाळी सहाच्या सुमारास दुसरा नातू माझ्या दृष्टीस पडला. मी दवाखान्यातून परत येताना मला बेंजी भेटला, त्याला मी म्हणू लागले, "अरे बेंजी बेंजी, तुला दुसरा मामा झाला."

तो हसू लागला. पण मी माझ्या आनंदात इतकी काही गर्क होते की, बराच वेळ तो का हसतो हे माझ्या लक्षात येईना.

नानाच्या जन्माआधी आमच्या घरात चमचमीत फोडणीचे पदार्थ, निरनिराळे मसाले वगैरे प्राबल्य होते. पण नंतर हा सारा मेनू बद-लला. आम्ही होता होईल तो बिनफोडणीचे व बिनमसाल्याचे अन्न खाऊ लागलो. कच्चे अन्नसुद्धा आमच्या आहारात असे. मोड आलेली कड-धान्ये तर रूथ गर्भारपणात व पुढे बाळंतपणातही खाई. त्यामुळे नाना जितका अशक्त व किडका तितकाच हा दुसरा मुलगा सशक्त व धडका निघाला.

स्मृ... ३५

देवदयेने माझ्या घरात आता बाळगोपाळ खेळू लागले. नाना-सोनाची जोडी भीमार्जुनाप्रमाणे शोभू लागली. नाना अशक्त, सोना सशक्त. पण त्याचे नाव सोना नाही. माझ्या हाताखाली हरणाबाई नावाची एक बाई होती. तिने ह्याला सोन्या म्हणण्यास सुरुवात केली. पण पुढे त्याने स्वतःच सत्याग्रह करून त्या नावाच्या ऐवजी त्याचे खरे-खुरे नाव अशोक हे आम्हाला उपयोगात आणण्यास भाग पाडले.

अशोक तीन महिन्यांचा झाला नाही तोच उपडा पडून समोरचे सामान भराभर ओढू लागला. रूथ पुन्हा राहुरीस गेली. तेथे डॉ. बालैं-टाईनसाहेबांनी प्रार्थना करून त्याचे नाव अशोक ठेवले. तो खरोखरच अशोक आहे. राहुरीहून परत आल्यावर एक दिवस रूथ लोणच्याचे आंबे चिरीत बसली होती. जवळच मी लोणच्याचा मसाला करीत होते. तोच अशोक ओकू लागला.

मी रूथला म्हटले, " पाहिलेस, तू आंबे चिरायला घेतलेस म्हणून त्याला सर्दी झाली. "

रूथ म्हणे, " त्याला अजून मी हातसुद्धा लावला नाही. त्याला सर्दी होईल कशी ?"

नाना त्याच्या जवळच बसला होता. तो एकसारखा म्हणे, " बाळ आजीची पावडर लावतो. "

नाना सारा दीड वर्षांचा. आम्ही दोघी आपापल्या नादात. अशोक शिकतो आहे, ओकतो आहे, नाना बडबडतो आहे.

शेवटी नाना ओरडून म्हणाला, " आजीची काळी पावडर बाळाने खाल्ली. "

आता आमच्या ध्यानात आले. आजीची पावडर कसली कर्माची ! जन्मात तिला पावडर माहीत नाही. पण काळी पावडर म्हटल्यावर आमचे लक्ष गेले. अशोक तपकिरीच्या पुड्याशी खेळत होता व तपकीर खात होता.

हे बाळ बाळपणापासूनच खोडकर. हाही नवव्या महिन्यातच चालू-बोलू लागला. नाना बैठा तर हा फिरंग्या. रात्री रडणे ठाऊक नाही. दिवा असला म्हणजे पुरे. हे उंदीरमामा चोहींकडे कारभार कर-

ण्यास निघत. रात्री पिंजरा उघडून एक-दोन केळी सोलून त्यांचा चट्टा-मट्टा झाल्यावर कोणापुढे तरी जाऊन निजत.

एक दिवस दुपारी मी निजले होते. माझ्या तोंडावर रुमाल येऊन पडला. डोळे उघडून पाहते तो कोठे कोणी नाही. पुन्हा निजले. पुन्हा तोच प्रकार. दोन दारांत भिंतीला लागून माझा पलंग होता. एका दारात पाहावे तो दुसऱ्या दाराने तो पळून जाई. दुसरीकडे पाहावे तो पहिल्याने निसटे. शेवटी उठलेच.

टिळक जाण्याच्या आधीपासूनच चिकीला फारसे बरे नव्हते; पण त्या गडबडीत चिकीकडे फारच दुर्लक्ष झाले व त्याचे मला एकसारखे वाईट वाटते. माझ्यामागे काम धावत होते व पुढे पोट धावत होते. दिवाळीच्या सुट्टीत मुली आपापल्या घरी जाण्यास निघाल्या. आपणही जावे असे चिकीला वाटू लागले. तशी चिकी फार हौशी मुलगी होती. फिरावयाला जाणे, वनभोजन करणे, चांदण्यात बसणे, गावाला जाणे... पण ह्या साऱ्या गोष्टी तिच्या मनासारख्या तिला कोणी करू देत नसे.

तिच्यासाठी आणि तेवढ्यातल्या तेवढ्यात असल्या धुमधडाक्यात पैसा व वेळ कोण खर्च करते? तिचा बाप इकडेतिकडे कोठेतरी कामाची धरसोड करीत फिरत होता. त्याने दुसरे लग्न केले होते. त्या आईकडे मला पुण्यास पाठीव म्हणून ती एकसारखी माझ्यामागे लागली.

ह्या माय-लेकींनी कधी एकमेकींची तोंडेही पाहिली नव्हती. तेव्हा अनायासेच मुलीची सोबत होती म्हणून मी तिला पुण्यास पाठविले, पण तिची चांगलीच हवापालट झाली. पुण्याहून जी आली ती अधिकच आजारी होऊन. आता बरीक माझे लक्ष तिच्याकडे गेले. डॉ. दांडेकरांचे औषध तिला सुरू केले.

पण बैल गेला नि झोपा केला याप्रमाणे ते झाले. दत्तू, बेबी, रूथ ह्यांनी तिची बरीच काळजी घेतली. डॉक्टर रोज येत. तशी ती काही निजून नव्हती. एक दिवस ती मला म्हणाली,

"आजी, रोमन कॅथालिक लोकांचे मरण किती चांगले! मेण-बत्त्या, उदबत्त्या, तशीच कितीतरी फुले! मला तसे मरण फार आवडते."

"चिके, तू मरूबिरू नकोस हं. बघ, तू मेलीस तर आजोबा

तुला चांगला ठोक देतील." बेबी म्हणाली,

"खरं का ग आजी ? स्वर्गात ते कसे मारतील ? ते मारायला लागले तर मी टेबलाखाली लपेन."

मरायच्या आधी तिने फार नाद घेतला की, "आजी, तू आपल्या हाताने मला न्हाऊ घाल."

मला काम होते. मी म्हणाले, "चिके, असे काय करतेस ? तुला आत्या घालील न्हायला. नाहीतर बाई घालील."

पण ती ऐकेना. ती म्हणे, "आजी, तुला काम असते ग– पण मला तुझ्याच हाताने न्हाऊ घाल. तुझ्याच हाताने मला आवडते."

मी तिला रागारागाने न्हाऊ घातले.

कामाच्या बाईला तिने एका बाजूला सांगितले, "हे बघ, माझ्या आजीचा बिछाना घालून ठेवीत जा आणि तिचे पाणी पिण्याचे भांडे घासून ठेवीत जा. ती कामामुळे दमून जाते आणि तशीच काहीतरी खाते-पिते नि कशीतरी निजते."

चिकी माझी फारच काळजी घेत असे. माझीच असे नाही– घरातील सर्वांच्याच ती फार उपयोगी पडे. इतर मुलींच्याही ती खस्ता खाई. ती फारच प्रेमळ मुलगी होती.

लवकरच आपल्या गोड आवाजाने "आजी, येते हं. आजी, मी लौकरच येईन," असे म्हणत म्हणत तिने प्राण सोडला. तिचे ते शब्द अजून कधी कधी माझ्या कानांत घुमतात. त्यामुळे दुःख होते.

औषधाचे बिल चाळीस रुपये झाले. ते मी डॉ. दांडेकरांना देण्यासाठी गेले– पण त्यांनी त्यांतील एका रुपयाला हात लावला नाही. ते म्हणाले, "आई, तुम्ही तिच्यासाठी इतकी वर्षे इतके केले. मी तिला थोडेसे औषध दिले, त्यात काय झाले ?"

नऊ महिन्यांची सांभाळलेली माझी चिकी बारा वर्षे सुख देऊन गेली.

तिच्याबद्दल १५ जुलै १९२० च्या ज्ञानोदयात खाली दिलेला लहानसा मृत्युलेख आलेला आहे.

– एका लहान प्रेमळ मुलीला ता. ११ जुलै रोजी देवाज्ञा झाली.

लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत ज्या ज्या व्यक्तींचा ह्या बाळाशी संबंध आला, त्या त्या व्यक्तीला ही बातमी ऐकून चुकल्यासारखे वाटल्यावाचून राहणार नाही. जगाच्या थोड्या दिवसांच्या ह्या मुशाफिराचे नाव सुभद्रा रामभाऊ धर्माधिकारी.

## ८७ : पाहुणे

मुली रात्री भीत. दिवसा मात्र त्यांनी कधीच आरडाओरड केली नव्हती. पण असाही एक दिवस उगवला, की दिवसासुद्धा त्यांनी आरडाओरडीला सुरुवात केली.

दोन माकडे अकल्पित अवतरली. लहानपणापासून पक्षी, प्राणी व मुले ह्यांची दत्तूला फार आवड. माकडे आली. त्यांनी बरीच नासधूस करण्याचा सपाटा लावला. त्यांना प्रेमाने जिंकण्याचे दत्तूचे प्रयत्न सुरू झाले, पण शेजारच्या साहेबाला प्रेमबीम कुछ मालूम नव्हते. त्याने गोळी घालून एक माकड मारून टाकले.

पत्नी अशा रीतीने अचानक नाहीशी झाल्यामुळे तिचे पती एकदम कोठे गडप झाले. पण अशौचाचे तीन दिवस संपल्यावर ते पुन्हा अवतरले. दत्तूने त्यांना केळे व पोळी दिली. पुढे रोज जेवणाच्या वेळेस ते खिडकीत येऊन बसत व हळूहळू पुढे पुढे सरकत. हळूच पुढे हात करून दत्तूजवळून पोळी घेऊन जात. पण मुली भीत. त्या ओरडत. व अशा रीतीने आमच्या येथे दिवसांच्या शांतिपाठास सुरुवात झाली.

एक दिवस दत्तू शाळेला गेला असता, एका माकडवाल्याला आठ आणे देऊन, मी त्याच्याकडून आमच्या ह्या पाहुण्यांना पकडले व बांधून टाकले. तरी त्याच्याजवळ जाण्यास कोणाला धीर होईना.

दत्तू आल्यावर त्याच्याकडे पाहून ते पटापट सलाम करू लागले. तो जवळ गेला तसे ते खाली मान घालून त्याच्या पोटरीला धरून बसले.

दत्तूने त्याला उचलून घेतले, थापटले थोपटले व कंपाउंडाच्या भिंतीजवळ नेऊन झाडाला बांधून टाकले.

माकडच ते. त्याच्या चेष्टा काय सांगाव्या ? ती भिंत होती कंपाउंडची. भिंतीवर बसले की पलीकडल्या फूटपाथवरून जाणाऱ्या-येणाऱ्याच्या डोक्यावरून आमच्या माकडाला सहज हात फिरविता येत असे. डोक्यावरून माल नेणाऱ्यांकडून त्यांच्या नकळत ते नाके वसूल करी. काकड्या, कणसे, भाजीपाला, फळफळावळ—जे मिळेल ते वरच्यावर उचलले जाई.

तशात जर का एखादा आपला माल डोक्यावर घेऊन तेथेच जरा कोणाशी बोलत उभा राहिला तर त्याचे अर्धे बोलणे संपायच्या आधीच त्याच्या डोक्यावरील सबंध टोपली संपायची. आमच्या पठ्ठ्याने वेळ-प्रसंग पाहून भराभर माल भिंतीच्या आत फेकायला सुरुवात करायची. डोक्यावरील भार उतरला म्हणजे आश्चर्यचकित होऊन, त्याने परमेश्वराचा धावा करण्यास वर पाहावे तो वरती हे बुवा किचकिच करून त्याची चेष्टा करायला तयार. जहागीरदाराला हे एक रोजचे कामच झाले. माकडाने माल आत फेकावा व जहागीरदाराने तो बाहेर नेऊन द्यावा.

एकदा रात्री अकराच्या सुमाराला समोर आग लागली. रस्त्यात माणसांची ठेलाठेल. ती गर्दी भिंतीसरशी. मग काय विचारता ? " किती शस्त्रे कुंडले आणि कटके "च्या ऐवजी " किती टोप्या, मंदिले आणि फेटे " म्हणावयाची पाळी आली.

आत टोप्याफेटयांचा पाऊस पडू लागला. जो तो आपले डोके चाचपून पाहू लागला. कोणाच्या हातांत शेंडी तर कोणाच्या हातांत गोटे. कारण टोप्या-फेटे होते माकडाच्या हातांत. आपल्या डोक्यावरून कोणी हात फिरविला हे त्या बिचाऱ्यांना काय माहीत ? आगीचा डोंब शमविण्यास पाण्याचे सपके बसत होते, पण गरम झालेली डोकी थंड करण्याचा सोपा उपाय कोणाच्या लक्षात येत नव्हता. ती स्वयंसेवा आमचा हा वीर करीत होता.

जहागीरदार आपल्या उच्च स्वराने ओरडत होता, " टोपी, टोपी,

टोपी कोणाची ? फेटा, फेटा, फेटा कोणाचा ?"

शनिवार-रविवार मुली घरी असत. इतर दिवसांचे एवढे वाटत नसे, पण त्या घरी असल्या म्हणजे आमचा माकडोबा हटकून सुटे, आणि मुलींत जाऊन धुडगूस घाली. त्या ओरडायला लागल्या की मी धावत तेथे जाई, तो ही स्वारी माझ्या खांद्यावर येऊन बसे. त्या म्हणत, "आजीबाई, ह्या तुमच्या माकडाने सारा गोंधळ उडतो. त्याला बांधून टाका."

माकड माझ्या खांद्यावर बसले म्हणजे मी हळूहळू पावले टाकीत भिंतीजवळ येई. त्याच्या साखळीजवळ आले की त्याने वरच्यावर उडी मारून पुन्हा मुलींकडे जावे, की मी पुन्हा धावपळ करीत तिकडे जावे. मला पाहताच त्याने पुन्हा माझ्या खांद्यावर उडी मारून बसावे, पुन्हा हळूहळू पावले टाकीत मी त्याला भिंतीजवळ आणावे की पुन्हा वेताळ पूर्वस्थितीवर ! असे सात-आठ वेळेस झाले, आणि हा बोजा खांद्यावर. खांदे दुखून आले व जीव नकोसा झाला. मग दत्तू आला म्हणजे त्याने त्याला बांधावे.

एक दिवस दत्तू माझ्या मागे लागला की, "आई, तू नानाला घेऊन फिरायला जा."

मला इतर गावांपेक्षा मुंबईची फार भीती वाटते. मुंबईस मी कधीच एकटी बाहेर जात नाही. कोठे जायला निघालेच तर एका घरी जाऊन मग तेथून माणूस घेऊन दुसऱ्या घरी जाते. मग पुन्हा तेथून माणूस घेऊन तिसऱ्या घरी जाते. मी काही एकटी बाहेर जात नाही.

तो म्हणे, "मी तुला अशा ट्रॅममध्ये बसवून देतो की तुला उतरावेच लागणार नाही. गाडी थांबेल व तेथून परत निघेल. तू आपली तिच्यातच बसून रहा."

शिवाय ट्रॅमचा स्टँड आमच्या दारातच. हो-नाही करता करता मला व नानाला त्याने ट्रॅममध्ये बसविले. मजजवळ दहा-बारा रुपये होते. पण त्यांचा उपयोग करता यायला हवा होता. ट्रॅम थेटपर्यंत जाणार असा दत्तूचा समज होता, पण ट्रॅमने मध्येच साऱ्या उतारूंना उतरून दिले व ती एका मोठ्या घरात शिरून विसावा घेऊ लागली.

मी म्हटले, " मी उतरणार नाही. माझ्या मुलाने सांगितले आहे, की तू ट्रॅममध्येच बसून रहा म्हणजे तू परत येशील. मला उभ्या पारशाकडे जायचे आहे."

ट्रॅमवाला म्हणाला, " बाई, तुमच्या मुलाची काही चूक झाली आहे. ट्रॅम परत जात नाही."

आता मला त्रिभुवन आठवले. जाणार कोठे ? राहणार कोठे ? खाणार काय ? ह्या मुलाला कशी जपू ? तो लहान, तोही धड चालता न बोलता. त्याची-माझी स्थिती बहुतेक सारखीच होती. फरक एवढाच होता, की तो जी जिन्नस पाही ती तो मागे, खाण्या-खेळण्याच्या वस्तू दिसल्या की त्या तो मागे, दुधाच्या कावडी समोरून गेल्या की दूध मागे. मूल कडेवर, डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या आहेत, घेऊ काय नि देऊ काय, असे झालेले आहे, अशा थाटात मी चालले होते.

एकाला मी सांगितले, " बाबा रे, मला उभ्या पारशाजवळ नेऊन पोचीव, मी तुला चार आणे देते." तो तयार झाला.

पण गर्दीत कोठे दिसेनासा झाला कोणास ठाऊक ! आणखी एक परोपकारी भेटला. त्याने विचारले, " आजीबाई, कोठे जायचे तुम्हाला ?"

मी म्हटले, " खड्या पारशाजवळ."

तो म्हणाला, " चला, मी नेतो तुम्हाला."

मी म्हणाले, " मी चार आणे देईन बाबा तुला."

त्याने मला बऱ्याच अंतरावर नेले. तेथे एक पारशी कोणाची वाट पाहत उभा होता. त्याच्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, " आजीबाई, हा पहा येथे पारशी खडा आहे. मी येतो आता." असे म्हणून तो गर्दीत अदृश्य झाला.

मला इतका राग आला की, दोन ठेवून द्याव्या. पण तो जवळ होता कोठे ? पाय चालत होते. डोळे रडत होते. मन विचार करीत होते– ' जर का रात्री निजण्याची वेळ आली, तर फुटपाथवरच निजावे लागेल. पण नानाला कसे निजवू ? त्याचे आईबाप किती काळजी करतील !'

एक ना दोन, हजार विचार येत होते व जात होते. एकीकडे पाय चालतच होते व देव नेत होता. रस्ता ओळखीचा वाटे. पण मुंबईत सब भाई सारखेच. मी जड पावलाने बावकर हॉलच्या पुढे चालले, तो माकडाने किच किच करून बोलावले. ही सरळ पुढे का चालली असे त्याला वाटले असेल. मलाही शंका येतच होती. आम्ही जसजसे पुढे जाऊ लागलो तसतसे ते मोठ्याने ओरडू लागले. तेव्हा मी मागे पाहिले व माझे काळीज सुपाएवढे झाले.

ह्याच सुमाराला माझ्याकडे गाळात रुतलेली एक गाय आली होती. तिचे वय लहान होते. तिला एकच डोळा होता. कोणी तरी तिला लबाडीने फसवून आपण मोकळाच राहिला होता. तिला सातव्या महिन्यांतच मुलगा झाला. ती सातच महिने आमच्याकडे राहिली.

ह्या लहान मुलाचे सर्व मलाच करावे लागे. कारण पोरवय असल्याने तिला बिचारीला काही करता येत नसे. तिच्यात अशक्तपणामुळे त्याचे शरीरपोषण करण्याचे सामर्थ्य नव्हते. मी संभाळी तिचे मूल व ती संभाळी माझी चूल. मुलाचे नाव मी छोटचा ठेवले होते.

दुसऱ्याच्या दुःखाने दुःख होते, पण आनंदाने आनंद होणे पुष्कळ वेळेस जड जाते. मला दोन्ही भरपूर होतात. चंपा माझ्याच घरून दवाखान्यात गेली. मुलगा झाला. मुलगा झाला म्हणून केवढा आनंद लोकांना होतो ! पण तिला बिचारीला कसला आनंद करता येणार ? मी मात्र पेढे तर नाही पण छोटचाच्या जन्मानिमित्त बरीच साखर वाटली व माझी बऱ्याच जणींनी चेष्टा केली.

भास्करराव उजगऱ्यांचे अलिबागेहून पत्र आले की, " साराअम्मा, मी फार काळजीत आहे. सोनूची ही पहिलीच वेळ आहे. तुमच्या तिकडेच तिने यावे असे आम्हा दोघांना वाटते. तेथे बरेच दवाखाने आहेत."

भास्कर मला साराअम्मा म्हणे, टिळकांना आब्राहामपापा म्हणे व दत्तूला इजहाकबाबा म्हणे. टिळकांना ऐकू जाणार नाही अशा बेताने, पण मला व दत्तूला ऐकू जावे अशा तऱ्हेने तो नेहमी एक गाणे म्हणे—

**अब्रामपापा तुम्ही इझाकबाबाला कापा**

जुन्या करारात आब्राहाम नावाचा एक फार मोठा इब्री भगवद्-

भक्त सांगितला आहे. त्याच्या बायकोचे नाव सारा व मुलाचे नाव इझाक होते. परमेश्वराच्या प्रेमामुळे तो इझाकाचा यज्ञ करण्यास निघाला; पण परमेश्वराने इझाकाचा जीव वाचविला, अशी गोष्ट आहे. इझाक हा अब्राहामाचा एकुलता एक मुलगा होता. तेव्हा ही नावे आम्हाला चटकन बसत.

असो. साराअम्माचे ह्या लोटाला (पुतण्याला) पत्र गेले की, सोनूला सातव्या महिन्यात इकडे घेऊन या. पत्राप्रमाणे भास्करराव सहकुटुंब म्हणजे सोनूसह आले. संध्याकाळची वेळ होती. आमची जेवणे आटोपून आम्ही गप्पा मारीत बसलो होतो. अर्थात ही दोघे आमच्या गप्पाष्टकात सामील झाली. त्यांना येथल्या सर्व गमती सांगितल्या. मी म्हणाले.

" भास्कर, पण येथील एक मजा तुला पाहायला मिळेल तर मोठी मजा होईल. कशाची बाबा आरडाओरड! ती प्रत्यक्षच ऐकण्यात खरी मजा आहे. अरे, नशीब लागते त्याला. "

" खरं ? कशी काय मजा आहे बुवा ?" भास्कर आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे जमिनीवर दोन्ही हातांचे पंजे टेकून मजपुढे बसला व म्हणाला. हा माझ्यापुढे असाच नेहमी येऊन बसतो व माझी गंमत करतो.

" अरे नशीब लागते नशीब !"

" मग ? साराअम्मा, उद्या तर मी जाणार ! आजच ती गम्मत होईल तर किती छान होईल ! "

" अरे, ती गम्मत अशी सांगून थोडीच आणता येते ?"

पण भास्कर नशीबवान खरा. सारी निजानीज झाल्यावर कर्णा फुंकला गेला. ज्या खोलीत पॉवरचा स्विच होता त्याच खोलीत भास्कर निजला होता. बत्त्या सगळ्या विझल्या होत्या व त्या विझविण्याचे यंत्र भास्करच्या पायांशीच होते.

एक-दोनाच्या सुमारास एका मुलीच्या डोक्याशी बसून त्याने चौर्यकर्मास सुरुवात केली. तिच्या गळ्यातील वज्रटीकेवर त्याची नजर होती. तो तिचा गळा चाचपीत होता. कंदिलाचा अंधुक प्रकाश होता.

तिने विचारले, " कोण आहे ?"

तो म्हणाला, " मी. हं, नीज. "

ती डोळे किलकिले करून पाहत होती. तो दुसरीच्या डोक्याशी जाऊन बसला. तिच्या गळ्याशी त्याने हात घालताच आता मात्र त्या मुलीला धीर निघेना. तिने सप्तसुरात सुरुवात केली. भास्कररावांची इच्छा पूर्ण झाली व त्यांना ही आरडाओरड पुष्कळ वेळ ऐकायला मिळाली. कारण त्याला दार सापडेना व स्विच होता त्याच्याच खोलीत.

मी म्हणे, " अरे दार उघड. "

तो म्हणे " उघडू कसे ? मला ते सापडत नाही. " आम्ही बाहेरून फळ्या ठोकून त्याला दाराची खूण सांगत होतो, पण आतल्या आवाजापुढे आमच्या फळ्यांचा आवाज त्याच्या ध्यानात येत नव्हता.

शेवटी दत्तूने फटींना चिकटून कंदील धरला व त्याच्या अनुरोधाने त्याने दार उघडले. मग पॉवर उघडली. जिकडे-तिकडे प्रकाश झाला. आणि मग आम्ही चोर पाहण्यास निघालो. तो बिचारा केव्हाच निघून गेला होता.

चोरांत देखील इयत्ता असतात. तो किती वेळेस तुरुंगात गेलेला, किती दिवस राहिलेला, वगैरेंची विचारपूस केल्याशिवाय त्याला कोणी मुलगी द्यायचा नाही. आमच्याकडे येणारे चोर कोणत्या इयत्तेतील होते ठाऊक नाही; पण त्यांच्या हे ध्यानात आले की, मुलींकडे काही लाभ्यांश नाही, तेव्हा मेट्रनकडे काही लग्गा लागल्यास पाहण्याचे त्यांनी ठरविले.

दत्तूच्या पायथ्याशी त्याचे मोठे टेबल होते त्याला दोन्ही बाजूला कपाटे आहेत. अंधारात चोराला हीच तिजोरी वाटून तेथे त्याने खडबड करण्यास सुरुवात केली. ख्रिस्ती लोकांकडे चोराला काय सापडणार ? कपडे व लाकडे !

त्या दिवशी नेहमीचा कण्र्याचा आवाज नसून निराळाच आवाज ऐकू येऊ लागला. मी बिछान्यावर पडल्या पडल्या ऐकू लागले. कोणी फुगड्या खेळते आहे की काय ? मधूनच एकतारीने ताल धरल्याप्रमाणे वाटे ! आधीच फळ्यांचे घर, त्याखाली तळघर आणि त्यावर ही धावपळ. एकसारखे धप धप धपच व त्यातच चो चो चो.

मी पॉवर उघडते तो दत्तूच्या हातून चोर निसटला. मुंबईचे चोर

अंगाला काही तरी गुळगुळीत चोपडतात. दत्तू व चोर शिवाशिवी खेळत होते व रूथ चो चो चो करीत होती.

## ८८ : आजाराचा चौकोन

रूथला न मुलांना बरे वाटेना म्हणून त्यांना पुन्हा राहुरीला पाठविले. तिला आम्ही ५० रुपये पाठवीत होतो.

जहाल मंजुळाबाईची सून मी राहण्यास बोलावली होती. लग्न झाल्यापासून मी तिला पाहिलेच नव्हते. ती आली होती.

ह्या वेळेस दत्तू एल. एल. बी.च्या टर्म्स भरीत होता. त्यावरून त्याचे व त्याच्या अधिकाऱ्याचे खटके उडू लागले. तसेच चर्चमध्येही त्या दोघांचे पटेनासे झाले.

उद्या प्रिन्स ऑफ वेल्स येणार, तेव्हा प्रिन्स ऑफ वेल्सला पाहायला कोण कोण जाणार ह्याचे बेत चालले. सहाला जाऊन अकराला परत यायचे असे ठरले. लहान मुली खेरीज करून सर्व मोठ्या मुली व मास्तरणी पहाटेच घास घास खाऊन निघाल्या. बंदरावर जायचे होते. त्यांच्याबरोबर राधाही गेली! राधा म्हणजे जहाल मंजुळाबाईची सून.

मुलींच्या बरोबर समद्याही गेला. जहागीरदाराला मुली ' समद्या ' म्हणत. कारण तो साऱ्या मुलींसंबंधाने बोलायचे झाले म्हणजे ' समद्या मुली ' असे म्हणे.

दत्तू-बेबीनेही बंदरावर जावे असे मला वाटत होते; पण दोघेही घरी अभ्यास करीत बसले. मी चंपीकडून बराचसा भात व वालाचे बिरडे करविले. मी म्हटले, " बिचाऱ्या मुली-मास्तरणी भूक भूक करीत येतील, तेव्हा अन्न तयार ठेवलेले बरे."

मुली गेल्यावर थोड्या वेळाने घरी राहिलेली एक मोठी मुलगी धावत धावत येऊन मला सांगू लागली,

"आजी आजी, ती बघा गंमत ! अहो, पुढच्या माडीच्या साऱ्या खिडक्या भराभर लावून घेताहेत."

मी पुढे जाऊन पाहतें तो खरेच. आणखी आश्चर्य म्हणजे त्या खिडक्यांवर रस्त्याने भराभर दगड येऊ लागले.

मी माळ्याला सांगितले, "अरे काय आहे पाहून ये."

माळी फाटक बंद करून आला. आज 'समद्या' मुलींबरोबर गेला असल्याने गेटवर माळी बसला होता. गेट बंद होताच बाहेरून महात्मा गांधींचा जयजयकार होऊ लागला. आतमध्ये तीस-चाळीस लहान लहान मुले होती. ती बाहेरचे ऐकून 'गांधी की जय, गांधी की जय' म्हणून ओरडू लागली.

आधीच जातेवेळेस मुलींत दोन पक्ष होऊन मोठा कडाक्याचा वाद झाला होता. मी त्यांना बजावले होते की, "बायांनो, हा वाद-विवाद करायला पुढे पुष्कळ वेळ आहे. आज रस्त्याने एक अक्षर न काढता जा." पण त्या मुलींची मी समजूत काढली तशी ह्या लहान लहान पोरांची काढता येईना.

इतक्यात फाटकाला धक्के बसू लागले. आमचे दोन ख्रिस्ती भाऊ व बहिणी ओरडत होत्या, की आम्हाला लौकर आत घ्या ! त्यांना आम्ही आत घेतले. त्यांच्या येण्याने बाहेर काय चालले होते ह्याची कल्पना करता आली. आमच्या तीस-चाळीस गांधीभक्तांना मी दळणाच्या खोलीत नेऊन बसविले व पुढच्या दारी आले तो रस्त्यात मोठमोठ्याने आरडाओरड चाललेली.

आमच्या पाहुण्यांनी खबर दिली की, "ट्रॅमच्या तारा तोडल्या, बत्त्यांचे खांब आडवे केले, मोटारी तोडून अस्ताव्यस्त टाकल्या. चहूं-कडची दारे-खिडक्या बंद झाली आहेत. वाटेने दोन्ही प्रकारच्या टोळ्या हिंडत आहेत. आम्ही अर्ध्याच वाटेवरून माघार घेतली, पुढे जाण्यास कोणाचे धैर्य होत नाही."

हे सांगताना त्यांना दम लागत होता व अंगातून एकसारख्या घामाच्या धारा चालल्या होत्या.

आता दत्तू-बेबीला जाण्याचा हुरूप आला.

" बेत्री, चल, येतेस का ? मी जातो हे पाहायला."

" बाबांनो, तुम्ही दोघेही जाऊ नका."

" आई, तू फार बोवा भित्री !"

असे म्हणून ते दोघेही निघून गेले. आधी मुली-मास्तरणींची काळजी, त्यात पाहुणी म्हणून आलेली राधा– तिची भर; तिच्या अंगावर दोनतीनशांचे डाग. त्यातच दत्तू-बेबींचा आणि धाक.

ही दोघे भेंडीबाजार, पायधुणी, चौपाटी, नळबाजार, भायखळा नवा नागपाडा अशी बरीच ठिकाणे पाहून आली. रस्त्यात जिकडेतिकडे शुकशुकाट.

त्यांना आश्चर्य वाटे की, एवढा मोठा दंगा म्हणतात– पण येथे तर मुंबई रोजच्यापेक्षा शांत दिसते. दत्तू बोडकाच होता. बेबी तर खादीचे मोकळे लुगडे नेसली होती. उभ्या पारशाजवळ येताच त्यांना दोन्ही बाजूच्या लोकांनी अडविले; पण दोघे एकमेकांच्या साहाय्याने वाचली. बाई म्हणून तिला सरकार पक्षाच्या लोकांनी हात लावला नाही व अंगावर खादीची साडी म्हणून गांधीपक्षाच्या लोकांनी त्यांना मुकाट्याने जाऊ दिले.

दत्तू-बेबी संध्याकाळी सुखरूप घरी पोचले. आमच्या अमेरिकन मिशनच्या देवळापुढे भर रस्त्यात खून झाला. तेथले साहेब आपला बंगला बंद करून आत बसले. आमचे अधिकारी मात्र आपल्या मडमसाहेबांसह तेवढ्या दंगलीत मुलींना सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. काठ्या, सोटे, दगड हीच काय ती हत्यारे; पण सारी मुंबई घाबरून गेली होती.

आमच्या ' समद्या 'ने ' समद्या ' मुली-मास्तरणींचा कळप कसातरी संभाळून सुरक्षितपणे कॅनन जोशांच्या वाडीत नेऊन सोडला. तेही परातमा जाणणारे गृहस्थ होते. त्यांनी काही वेळाने म्हणजे चाराच्या सुमारास महत्प्रयासाने मुलींना एक एक गुटली, एक एक चहाचा कप आणून दिला.

आमचा माळी फाटकाच्या फटीला डोळे व कान अदलून बदलून लावीत बसला होता. पाच-पाच मिनिटांनी तो आत बातमी आणून

पोचवायचा. त्याची प्रत्येक खबर ताजी व खुसखुशीत असायची. आता काय, तर मुली पठाणाने पकडल्या; आता काय, तर त्या मवाल्यांनी कोंडल्या; आता काय, तर ट्रॅम उलटली त्यात मुली चेंगरल्या. त्याच्या सगळ्या बातम्यांचा संबंध केवळ आमच्याच मुलींशी असे.

रात्री नवाच्या सुमाराला कसेतरी लपतछपत आमचे साहेब येऊन पोचले. त्यांनी सांगितले, " आजीबाई, भिण्याचे काही कारण नाही. सर्व मुली कॅनन जोशीसाहेबांकडे सुखरूप आहेत. त्या कदाचित आता येतील, नाहीतर उद्या सकाळी येतील."

पण दहासाडेदहाला मुली येऊन खरोखरीच्या माझ्यापुढे उभ्या राहिल्या तेव्हा माझा जीव खाली पडला.

दुसऱ्या दिवशी मला दोन जोडकार्डे आली. त्यांच्यावर एकाच अर्थाचा मजकूर होता. तुम्ही सर्व कसे काय आहा ते उलट टपालाने कळवा. एक जोडकार्ड होते माझी बहीण शहाबाई मिसाळ ह्यांचे व दुसरे पुण्याहून श्रीमती मथुराबाई मल्हार ह्यांचे होते. मथुराबाईंनी दत्तूविषयी भलतेच काही ऐकिले होते.

रूथ, नाना व अशोक ह्यांना ज्या आजारामुळे राहुरी दाखविली तोच बेबीला आता झाला. आजार म्हणजे फार मोठा नाही, पण बेबीच्या शरीराला तो फार मोठा ठरला. हा हिवतापाचा आजार तिला झाला. तिच्या आयुष्यात तिला फार थोडे आजार झाले; पण जे थोडेसे झाले त्यांनी तिला अगदी पिळून काढिले. पहिला प्लेग, मग विषम आणि आता हा. तिला हिवात ताप व तापात हीव येऊ लागले.

तशात तिची बी. ए. ची परीक्षा सुरू झाली. ती तशीच परीक्षेला गेली. पहिल्याच दिवशी अर्धामुर्धा पेपर देऊन कशीतरी परत आली. अंगात ताप म्हणतो मी– तरी दुसऱ्या दिवशी तोच विचार व तोच नाद.

ती म्हणे, " मला जाऊ दे. माझी परीक्षा बुडेल. "

मी कसेतरी तिला थोपवून धरले. घरगुती काही काही औषधे दिली तरी ताप अधिकच. मग डॉ. दांडेकरांचे औषध सुरू केले. त्यांनी फार श्रम घेतले. तिच्या डोक्यावर किती बर्फ ठेवला असेल त्याचे मोजमापच नाही. आता तिला आपली सहीदेखील करता येईनाशी झाली.

दिवाळीची सुट्टी आली. मुली-मास्तरणी जिकडेतिकडे गेल्या. दत्तू राहुरीस गेला. जिकडेतिकडे शुकशुकाट झाला. चोरही येईनासे झाले. माझ्या मनाला सारखी हुरहूर लागून राहिली, की मुलीचा ताप तर राहत नाही आणि तिला सहीही करता येत नाही.

डॉक्टर म्हणाले, " हिला माशाचे पाणी द्या व हवा बदलण्यास न्या."

आता माशाचे पाणी द्यायचे कसे व ते आणायचे कोणी ? हवा बदलायला नेणार कुठे व जाणार कुठे ? बापाला नाही भाऊ व आईला नाही जाऊ. आमच्या शेजारी यशोदाबाई नावाची एक माऊली राहत होती. तिने पंधरा दिवस नियमाने माशाचे पाणी आणून दिले व तिनेच पुढे सुचविले की तुम्ही माथेरानला जा. माथेरान अगदी जवळ आहे. तिच्या सूचनेप्रमाणे मी बेत ठरविला. सारे सामानसुमान गोळा केले. तेथे बाजारहाटाची जरूर राहायला नको अशी व्यवस्था होती माझी.

आता माझी मानसकन्या चंपा मला नकळत पळून गेलेली होती. तिने छोट्यालाही नेले होते. गेल्यावर तिचा निरोप आला की, " आई, मी बरी आहे. काळजी करू नको." पण ती त्यानंतर मला अजूनपर्यंत भेटली नाही.

आमच्याबरोबर शाळेतली एक ऑर्फन मुलगी घेतली. ती सात-आठ वर्षांची होती. नेरळला माझ्या भावाची मुलगी सोनू होती. हे भाऊ म्हणजे गुडशस्त ब्राह्मण रा. बापूराव आढाव. तिला पत्र टाकले.

तिचे उत्तर आले, 'बेबीला घेऊन या. मी सर्व व्यवस्था ठेवीन.' इकडे बेंजीने आम्हाला गाडीत बसवून दिले. बसवून दिले म्हणजे एकीला तरी खरोखर उचलून गाडीत ठेवून दिले.

तिकडे सोनू व तिचा मुलगा स्टेशनवर आले होते. नेरळला आम्ही दोन दिवस राहिलो; पण बेबीचा ताप व माझी काळजी होती तीच होती.

सोनू म्हणे, " आत्याबाई, तुम्ही येथेच रहा व रोज बेबीला माथे-रानला पाठवीत जा. कारण आता सीझन आहे व माथेरानचे भाडे तुम्हाला झेपणार नाही."

दत्तू व रूथ येथे आले होते ते मला आठवले. मी तिच्या मुलाला माथेरानला पाठवून त्या घराचा तपास करविला. घरवाल्याने निरोप पाठविला की, " दत्तोपंतांच्या आईला म्हणावे, कधीही या, घर तुमचेच आहे."

सकाळीच आम्ही प्रभाला घेऊन माथेरानला गेलो. तेथे तांगे नाहीत, जिनरिक्षा आहेत. बेबीला जिनरिक्षेत बसविले व आम्ही पायी होतो.

आमच्या न्हावीबुवांनी निरोप पाठविल्याप्रमाणे खरोखरीच त्यांचे घर माझेच होते; पण आत पाऊल टाकायला मात्र मला जागा नव्हती. घर लहान व त्यात बिऱ्हाडे फार. पण मीही भटीण. मी आपले चंबूगबाळे त्या गर्दीतच झोकले. मात्र माझे ते चंबूगबाळे मागल्या पडवीत जाऊन पडले.

तेथे तीन दगड मांडण्यापुरती व तिघींना एकामेकींना चिकटून निजण्यापुरती पाच हात लांबीरुंदीची जागा मिळाली. पहाटे सहाच्या आत मी आपले काम आटोपून दिवा मालवी. सकाळचा सर्व स्वयंपाक करून शिदोरी, धुणे व बेबी आणि लक्ष्मी ह्यांना घेऊन बाहेर पडे, ती संध्याकाळी परत घरात येऊन जाताना जो दिवा मालवी तो परत लावी. संध्याकाळचा स्वयंपाक घरवाली किंवा भाडेकरणी ह्यांच्यापैकी कोणीतरी करून ठेवीत. कारण माझ्या उभ्या आयुष्यात मला कधी कोणी नाही म्हटले नाही. 'हे विश्वचि माझे घर' आहे.

माथेरानला हवा भरपूर तर पाणी तितकेच दुर्मिळ. दूध व पाणी ह्यांचा तुटवडा, पण तो आमच्यासारख्यांना, लक्ष्मीपुत्रांना नाही. मी लक्ष्मी असले तरी लक्ष्मीपुत्र नाही. आम्हाला चहाची जरुरी नव्हती. बेबीचे दूध बंद केले होते. पाण्याचा एक हंडा आम्ही घेत होतो. त्याला तीन आणे पडत. आमचे प्रातर्विधी, धुणे, अंघुळी वगैरे सारे काही पाण्याचा आश्रय पाहून होत असे. दिवसभर आमचा मुक्काम झाडाखाली होई. जसजशी त्याची सावली फिरे तसतसे आमचे बिऱ्हाड फिरे.

रात्री परत आल्यावर आम्ही घरवाल्यांच्या व इतर बिऱ्हाड-करूंच्या पायवाटेतच निजत होतो; पण ते बिचारे आपली पायवाट मग बाजूने करीत. त्या घरातील सर्वच माणसे फार सज्जन आहेत, पण सीझनमुळे सकाळी हातात धरलेले वस्तरे संध्याकाळीच त्यांना खाली ठेवता येत आणि पुरुषमंडळी अगदी दमून जाई.

त्यामुळे श्रमपरिहारार्थ रात्री कलालाला भेट देऊन येत. दिवसभर चाललेले हात थांबून त्यांची आता तोंडे चालू लागत. पण त्यांची लेक्चरे घरातील मालकिणी फारशी चालू देत नसत.

मुंबईहून एक नर्स हवा बदलण्यासाठी आली होती. ती शेजारीच राहत असे. बुद्धीने व मनाने ती माझीच सोबतीण होती. त्यामुळे आमचे मेतकूट चांगले जमले होते. आम्ही कोणत्या बाजूला जायचे ते तिला सांगून जात होतो. मग ती आपले सारे काम आटोपून चाराच्या सुमाराला आम्हाला शोधीत येई.

मला इंग्रजी येस, नो, कॅट, डॉग, कम, गो इतकेच येते. पण तिला इंग्रजी मुळीच येत नव्हते व तिला इंग्रजी शिकविण्याचे मी कबूल केले होते. तिला इंग्रजी शिकायला फार हवे होते. तशात माझ्या घरात तीन बी. ए. त्यामुळे तर ती जास्तच खूष होती.

ती आली म्हणजे आम्ही गाणी म्हणत होतो. तिला वाटे, माझा आवाज फारच चांगला आहे. मलाही माझ्या आवाजाचा अभिमान वाटे. मला सर्व टिळकांचीच गाणी पाठ. तिची गाणी मुरल्या, गवळणी अशी असत.

एक दिवस आम्ही अगदी रंगात आलो होतो. आमच्या आवाजाच्या रोखाने दोन-चार मुसलमान स्त्रिया आल्या. त्या चांगल्या श्रीमंत दिसल्या. पण त्यांना पाहून आम्ही आमचे गाणे थांबविले नाही. त्या आमच्याजवळ येऊन बसल्या तरी आमचे गाणे चालूच होते.

त्यांच्याबरोबर असलेल्या दोन बाया मधूनमधून त्यांना पानपट्ट्या करून देत होत्या, त्या पाने चघळीत होत्या. पण त्यांचे सारे लक्ष आमच्या गाण्याकडे होते.

आमच्या नर्सबाईंनी त्यांच्याशी बोलण्यास सुरुवात केली ती

त्यांच्याच भाषत,–

"आपने कभी गोहरजानका गाना सुना है ?"

"हां हां. सुना तो है. लेकिन हमारे सवाई गोहरजानका गाना आपने कभी सुना है ?"

त्यांतील एकजण म्हणाली,

"तुम्हारे गोहरजानका गाना सुनकर खाली आदमी बेहोष हो जायगे लेकिन हमारे सवाई गोहरजान का गाना सुनकर जंगलके नाग भी डोलते हैं."

नर्स म्हणाली,

"पाहू तुमच्या सवाई गोहरजानचे गाणे. खऱ्या गोहरजानच्या गाण्याला लोक दहा-दहा रुपये देऊन जातात. मी तिला पाहिली आहे, तिचे गाणे ऐकले आहे. तिची सर कोणालाच यायची नाही."

"सुनो तो."

आणि त्या सवाई गोहरजानने गाण्यास सुरुवात केली. तिचे गाणे स्वर्गीय वाटले. भोवताली लोक जमा झाले. तिने चार गाणी म्हटली व शेवटी सांगितले की, "तुम्ही म्हणता ती गोहरजान मीच."

पण आमच्या नर्सबाईंची खात्री पटेना.

इतकी श्रीमंत आणि कलानिपुण बाई आमच्याशी अगदी जुन्या ओळखीप्रमाणे वागू लागली. दुबळ्या अंतःकरणाला सज्जनांचा वारा हवा असतो असे मी कोठेसे वाचल्याचे आठवते. म्हणूनच ती आमच्या मागे मागे राहिली की काय कोणास ठाऊक, पण आम्ही प्लेग, कॉलरा, रक्तपिती अशा स्पर्शजन्य रोगाप्रमाणे तिच्यापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न करू लागलो. आम्हाला एखादा साथीचा रोग लागतो की काय असे आम्ही तिच्याशी वागलो. तिने काय काय केले– पण आम्ही तिच्या बंगल्यात गेलो नाही. मग तिने आम्हाला आपला मुंबईचा पत्ता दिला. तिचे वय साठ-पासष्ट वर्षांचे असावे.

आम्ही एकत्र जमलो होतो पण हळू हळू पांगलो; आमच्या भोवती जमा झालेला श्रोतृगण आपापल्या मार्गाला लागला; ती आपल्या बंगल्यावर गेली व आम्हीही घरी जाऊन आपल्या फूटपाथवर

पड पड कुडी केले.

( " पड पड कुडी, गंगाभागिर्थींच्या तिरी, गयागी गमन, प्रयागी मरण, नित्य काशीविश्वेश्वरा, तुझे स्मरण " असे निजताना म्हणण्याची पूर्वीच्या स्त्रियांची रीत होती व उठताना " कराग्रे वसते लक्ष्मी, करमूले सरस्वती, करमध्ये तू गोविंद, प्रभाते करदर्शनम् " हा पाठ असे.)

आम्ही येथे तीन आठवडे राहिलो. निघताना घरवाल्याच्या हातावर वीस रुपये दक्षिणा ठेवली. बेबी आता बोलू लागली होती, पण ताप मात्र चालूच होता.

जूनच्या पहिल्या तारखेला दोन-तीन दिवस पुढेच होते तोच आम्ही मुंबईला येऊन दाखल झालो. मास्तर-मास्तरणी जे ते आपापल्या कामावर हजर होण्याकरता परतू लागले. दत्तूही सहकुटुंब सहपरिवार राहुरीहून परतला. कारण आता राहुरीला राहण्याची सोयच नव्हती. एक तर पावसाळा व दुसरे म्हणजे तेथे मुंबईसारखी दवाखान्याची सोय नव्हती.

आता सर्वच एकत्र झालो. काळजीचे कारण काही उरले नाही असे मन म्हणत होते, तोच रूथ जी आली तोच ती व दोन्ही मुले तापाने पछाडली. आता मात्र आजाराचा चौकोन जमला. ही तिघे व चवथी बेबी. रूथला परत पाठविण्याची सोयच नव्हती. कारण ती मुळी दवाखान्यासाठी येथे आलेली.

तेव्हा मी नगरास मिसेस ह्यूम ह्यांना पत्र पाठविले की, मी अशा अशा अडचणीत आहे. तरी बेबीला तुमच्या कंपाउंडात ठेवा व तिच्या साह्याला एखादी बाई पाहून द्या. मी दरमहा दहा-पंधरा रुपये पाठवीन. कारण दत्तू कामात, मी कामात, घरात चार माणसे आजारी. त्यात दोन लहान मुले व बेबीही मूलच बनलेली.

पत्र पाहताच मिसेस ह्यूमचे उत्तर आले की, " बेबीला मजकडे पाठवा. मी तिला बंगल्यातच माझ्याजवळ ठेवीन. तुम्ही मुळीच काळजी करू नका. मला एकच वाईट वाटते, की तुम्ही पैशासंबंधाने लिहिले. मला तिच्या खर्चासाठी एक पैही नको. "

त्या माऊलीने लिहिल्याप्रमाणे तन, मन, धन खर्च करून बेबीची

शुश्रूषा आपल्या हाताने आपल्या घरी तीन महिने केली तेव्हा कोठे तिचा ताप गेला.

## ८९ : मुलीची हौस

त्याच सुमारास एक दिवस संध्याकाळी जराशी पावसाची भुरभुर चालू असता दाराशी एक व्हिक्टोरिया येऊन उभी राहिली. व्हिक्टोरियातून आवाज आला, " मिसेस टिळक येथेच आहेत ना ?"

हो म्हणताच पडत्या फळाच्या आज्ञेप्रमाणे बाई आत आल्या. त्यांच्यामागे व्हिक्टोरियावाल्याने आणलेले सामान आले. सलामालकी झाल्यावर त्यांनी आपले बोचके माझ्या बिछान्यासरसेच सरकावून दिले. ह्या बाई कोण, कोठल्या, कोणाकडे आल्या ह्याचा कोणालाच पत्ता नव्हता. पुन्हा बाई शकुनीमामांची बहीण. तिने सासूच्या कानगोष्टी सुनेला व सुनेच्या सासूला करण्यास सुरुवात केली.

पंधरा दिवस झाले तरी पाहुणी सुनेची की सासूची ह्याचा पत्ता लागेना. आमची घरे निराळी नसल्यामुळे दोन्ही घरचा पाहुणा उपाशी राहण्याचा प्रसंग तिच्यावर आला नाही, तरी एकमेकींच्या चुगल्या एकमेकींना सांगून आमचीच पोटे तिने भरपूर भरली, व त्यामुळे एक दिवस तिच्यावर मात्र उपाशी राहण्याचा प्रसंग आला. शिवाय ती पडद्यातली बिबी. पुरुषांसमोर कधी यायची नाही. जेवणखाण सारे पडद्यातच व्हायचे तिचे.

एक दिवस बाबू आला. त्याने विचारले, " काय हो काकू, ही कोण पडद्यातली बिबी आणली तुम्ही ?"

मी म्हटले, " मला नाही बाबा ठाऊक. तू आपल्या भावजयीला विचार."

" काय हो वहिनी, ह्या कोण ?"

" मला काय माहीत ? असतील तुमच्या काकूंच्या कोणी !"

" काकू, ही काय भानगड आहे ?"

" काही कळत नाही बाबा. पण ह्या बाईने फार त्रास दिला आहे

हे खरे. दत्तू भिडस्त. त्याचा अभ्यास. बेबी नगरास. तिची काळजी. घरात आजार. "

" अच्छा. "

इतके बोलून तो बाहेर गेला. त्याने एक व्हिक्टोरिया आणली. त्यात त्या बाईचे सामान भरले व तिला म्हटले, " हं, चला बाई. गाडी तयार आहे. "

ती मुकाट्याने गाडीत बसून चालती झाली.

" बाबू, हे काय केलेस ? ती तरुण बाई. मुंबईची वस्ती. ती कुठे जाणार ?"

" आली तेव्हा नव्हती का मुंबई ?"

मी त्याच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. माझ्या भावाचा मुलगा वासुदेव तेथेच होता. त्याला स्टेशनवर पाठविला. त्याने येऊन सांगितले की ती तिकीट काढते आहे.

माझ्या सुनेच्या स्वभावाची घडी कधी विस्कटत नाही. म्हणजे तिचा स्वभाव घडीव आहे. एक गाव, एक घर, एक जागा, एक व्यक्ती, अशी ती एकनिष्ठ आहे. एकदा एक पसंत पडले म्हणजे त्यात बदल न होऊ देण्याची तिला काळजी लागते.

तसेच औषधाविषयी. अशोकच्या जन्मापासून आमच्या घरात राजश्री कुन्हेंनी प्रवेश केला. व त्याला कारण आमचे तात्या. नाना लहान असताना आवेने अतिशय आजारी झाला. इतका, की त्याला कोणतेच औषध लागू पडेना. त्याच सुमारास तात्यांच्या कुन्हे उपायांचा आमच्या घरात त्यांच्या उत्तेजनाने प्रवेश झाला होता.

पुढे रूथ राहुरीला गेली. तेथे असल्याच विषयावरचे महात्मा गांधींचे एक पुस्तक तिच्या वाचण्यात आले व तिने मागे-पुढे न पाहता नानाच्या पोटावर मातीचे पोटीस ठेवले; व सर्व डॉक्टर-वैद्यांनी हात टेकल्यावर हात देणाऱ्या ह्या मातीच्या पोटिसाने नाना ताबडतोब बरा झाला.

आता आम्हाला तात्यांची आठवण झाली. तात्या टिळकांचे एक जुने मित्र. त्यांना आम्ही तात्यासाहेबच म्हणतो. त्यांना पत्र लिहिण्याचा

मोठा कंटाळा. पण मुलांच्या आजारासंबंधी आमची पत्रे गेली की त्यांची मात्र उत्तरे उलट टपालाने येत. पुढे त्यांचे रोज पत्र येऊ लागले व ते लिहीत ती ती उपाययोजना आम्ही करू लागलो.

ज्या माझ्या सुनेने बाळंतपणात कडधान्याचे पथ्यपाणी करायला मागे-पुढे पाहिले नाही ती का ह्या उपायांना डरते ! दोन्ही मुले व रूथ आजारी. तेव्हा आम्ही तात्यांना पुन्हा पत्र घातले. पण उत्तर नाही. आणखी पत्र घातले, तरी तसेच. तेव्हा आम्ही दोघातिघांनी बसून पोक्त विचार केला, की मी ही दोन्ही पोरे घेऊन तात्यांचे गाव गाठावे. सुनेला जाणे अशक्य. मुलगा शाळेत. मुलगी नगरास. तेव्हा राहता राहिले मीच.

" काय रे दत्तू, पण मला कसे रे जाता येणार ?"

" त्यात काय आहे ? मी गाडीत बसवीन. स्टेशनवर उतर, हमाल कर व पोस्टात जायचे असे सांग, की झाले. कुठे मधे उतरायचे नाही. थेट त्या गावीच उतरायचे झाले."

नाना अडीच वर्षांचा. अशोक दीड वर्षांचा. मी अडाणी.

आमच्या स्वाऱ्या निघाल्या.

डब्यात फारशी गर्दी नव्हती. नाना आजाराने फारच किरकिऱ्या बनला होता. त्याचा एक मुटकुळा माझ्या मांडीवर. अशोकही रोगी, पण उद्योगी. माझे पाय नानाला संभाळीत होते व डोळे अशोकला संभाळीत होते.

अशोकच्या पायाला जणू भोवरा बांधला होता. तो एका जागी बसेना व मला त्याला आवरता येईना. त्या डब्यात एक मारवाड्याचे जोडपे बसले होते. मी मुलांना बरेच खेळ शिकविले होते. आपडीथापडी, अटकमटक, आड्यामाड्या, बुवा बुवा.

अशोकला वाटले, समोरची बाई आपल्याशी " बुवा बुवा " खेळते आहे. तो जाई आणि तिच्या बुरख्यात हात घालून म्हणे, ' बुवा आव ! '

ती इतकी रागावली की बोलायची सोय नाही. ती त्याचा हात झिडकारून टाकी तसतसा ह्याला चेव येई. ह्याला वाटे, ती आपल्याशी खेळते आहे. तिचा बुरखा हले व त्याच सपाट्यात हातही हले. शिवाय

त्यां पडद्याच्या आत त्याला काय काय दिसत होते !

तेथे कधी न पाहिलेले पदार्थ होते. नथ, ठुशी, कपाळावरील सोन्याचे बोर, पुतळ्या, पांढरे-तांबडे सोनेरी दात !

हे युद्ध बराच वेळ चालले. ती म्हणे, 'तुम्ही आपले मूल सांभाळा.'

मला हसू येई. त्या बाईंचा रागही येई. ते मूल ते केवढे व त्याचा राग तो काय यायचा ? मी तिच्या जागी असते तर त्याला उचलून घेतले असते. पाठीवर केस मोकळे लोळताहेत, सारखा इकडून तिकडे वाऱ्याप्रमाणे आनंदाने धावतो आहे, तोंडाने काहीतरी बोबडे बोल बोलतो आहे, अशा बाळाला उचलून घेण्याचा मोह कोणाला होणार नाही ? बाकी तो रूपाने माझ्यासारखाच आहे.

ख्रिस्ती लोकांत काही काही रीतिरिवाज हाडीमांसी खिळलेले आहेत. आता मला ते बरेच कळू लागले आहेत, पण काही काही बाब-तीत वळत नाहीत एवढेच. इकडे कसे वागावे हे मी आपल्या सुनेजवळ बहुतेक शिकले.

तात्यासाहेबांना आधी न कळविताच मी मुले घेऊन त्यांच्या दारात येऊन उभी राहिले. बरोबर कामासाठी एक बाई आणली होती. ती उंच जातींच्या हिंदूंत शोभण्यासारखी नव्हती. तात्यासाहेब मोठे अंमलदार होते. त्यांना उंच वर्गाच्या हिंदू लोकांत वावरावे लागे. त्यांच्या हाताखालचे लोकही सारे उंच हिंदूंतील होते. त्यांच्या घरात ही बाई शोभण्यासारखी नव्हती.

आम्ही न कळविताच एकदम दत्त म्हणून तात्यासाहेबांच्या आवा-रात येऊन उभे राहिलो. आमच्या स्वाऱ्या पाहून तात्यासाहेबांना आश्चर्य वाटले आणि ती बाई पाहून तर त्यांना थोडा रागही आल्या-सारखे दिसले. तात्यासाहेबांच्या पत्नी मला बाई म्हणतात. त्या म्हणाल्या,

" तुम्ही कशा आलात ? पत्र तरी पाठवावयाचे होते ! "

" दत्तूने बरीच पत्रे तुम्हाला पाठविली. तात्यांचे उत्तर आले नाही. घरात सारे आजारी. तेव्हा मुले घेतली आणि आले. "

" हे पहा बाई, तुमच्या सुनेचे आता दिवस भरत आलेले. तुम्ही

कशाला आला ?"

तात्यांनी मला त्यांच्या पद्धतीचे सर्व उपाय समजावून दिले. त्या उपायांपासून काय फायदा होतो ह्यावर एक लेक्चर दिले. रात्र झाली. आम्ही सर्व निजलो.

अशोक आपल्या नित्यनियमाप्रमाणे मध्यरात्री जागा झाल्यावर गस्त घालण्यास निघाला, तो थेट तात्यांच्या खोलीत गेला व त्यांना उठविण्याचा प्रयत्न करू लागला. तात्यांना दिवसभर मरमर काम करावे लागे. त्यांना ही गस्तवाल्याची फेरी मुळीच मानवली नाही. ती पाहून त्यांना मोठा राग आला. सकाळी उठल्यावर ते मला म्हणाले,

" बाई, तुम्ही मुले घेऊन जा."

" मी कशी जाऊ ? त्यांना आणले कशाकरता ? दत्तूने मला बिऱ्हाड करून राहावयाला सांगितले आहे."

" तुम्हाला येथे घर मिळणार नाही. मी सांगितलेले उपाय करा म्हणजे झाले. मुलांना आराम पडेल."

त्यांनी दत्तूला तार केली, आम्हांला गाडीत बसवून दिले व आमच्या स्वाऱ्या परतल्या.

त्यांच्या सांगण्याचा मुख्य विषय पोट होता. ते स्वच्छ ठेवले पाहिजे. खरोखरच आपण जर आपली जिभली ताब्यात ठेवली म्हणजे आपली भांडणे आणि खाणी जर प्रमाणात ठेवली तर आपले बरेचसे मानसिक व शारीरिक रोग टळतील. पण मीदेखील ब्रह्मज्ञान सांगण्यापुरतीच आहे.

वर सांगितलेच आहे, की तात्यासाहेबांनी दत्तूला तार केली. दत्तू स्टेशनवर आला. पण मला तो कोठे दिसेना की मी त्याला दिसेना. मी हमाल करून उतरणार तो एकही पोर हमालाजवळ जाण्यास तयार होईना. व हमाल करावयाचा मुलांसाठी.

शेवटी हमालाने घेतले बोचके व दोन्ही बगलांत दोन पोरे घेऊन मी कशीतरी अदावतीने डब्यातून उतरू लागले. इतक्यात दत्तूने मला पाहिले, तेव्हा माझा बोजा उतरला.

तात्यासाहेबांनी सांगितलेल्या उपायांना सुरुवात झाली. दुसऱ्याच

दिवशी नानाला टबात बुचकळून ओलेच दाबून कसेतरी निजविले. अशोकला शेकून माती बांधली. असा क्रम पाच-सहा दिवस चालला. रूथला लौकर बरे वाटले. म्हणजे हीव गेले, पण तापात तिला ताप भरू लागला. तीनतीन, चारचार, पाचपाचपर्यंत ताप चढे.

नाना, अशोक बरे झाले; पण हिचा ताप निघेना. आता टॉवेल-पाण्याचा उपयोग सुरू केला. एकसारख्या थंड पाण्याच्या पट्टया ठेवीत होतो. तिचे दिवस भरत आलेले. आणि अशा स्थितीत मुंबईस कितीतरी बाया त्या वेळेस आजारी असल्याचे कानावर येत होते.

एक दिवस मी बऱ्याच वाटाण्याच्या शेंगा उकडून ठेवल्या होत्या. रूथची आई निजायला येत असे. त्या दिवशी रूथ बरी दिसेना. मी म्हटले, " काय ग, आज तू बरी का दिसत नाहीस ? वाटाण्याच्या शेंगा फार खाल्ल्यास वाटते ?"

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून पाहते तो दाराशी टांगा उभा व त्यात ह्या दोघी मायलेकी बसलेल्या ! मीही चटकन टांग्यात बसले व आम्ही सहाला दवाखान्यात पोचलो, पंधरा मिनिटांच्या आत मीराबाईंनी जगात प्रवेश केला. त्या वेळेस तेथे असलेल्या कित्येक बाळंतणीची मुले तापाने होरपळून निघाली होती; पण आमची मुलगी त्या दिव्यातून सहीसलामत बाहेर पडली. आम्हाला मुलीची हौस होती. मुलीची हौस म्हणूनच सुनेने अशोकचे केस ठेवले होते. दहा दिवसांनी बाळबाळंतीण घरी आली.

त्याच सुमारास कराचीहून ताराबाईचे पत्र आले की, " मी परीक्षे-करता मुंबईस येणार आहे. मजबरोबर आणखी एक विद्यार्थी आहे. तुमच्याकडेच मला उतरायला पाहिजे. तरी उलट टपाली उत्तर घाला."

ताराबाई सौ. शहाबाई मिसाळ ह्यांची कन्या. ताराबाई डॉक्टर असून त्यांनी कराचीस स्वत:चा एक मोठा दवाखाना उघडला आहे. त्यांच्या पत्राला दत्तूने व रूथने उत्तर दिले की, 'घर आपलेच आहे, आपण वाटेल तेव्हा या.'

बेबी आता बरी झाली होती. मिसेस ह्यूमच्या मेहनतीचे फळ आले. तीही नगराहून आली. चिकीचे वडील रामभाऊही आले होते.

दत्तूची मास्तरकीची परीक्षा. तो आपल्या गडबडीत होता. रूथला सरासरी तीन आठवडे झालेले. दिवाळीची सुट्टी जवळ आलेली. रूथने रामभाऊंना विचारले, " पारोळ्याची हवा कशी काय आहे ?"

रामभाऊच ते ! त्यांनी सांगितले, " फारच उत्तम."

रूथने विचारले, " तुमचे घरबीर केवढे आहे ?"

रामभाऊंनी सांगितले, " घर मोठे आहे, पाण्याची उत्तम सोय आहे, सामानसुमान भरलेले आहे, सरपण आहे, चहा-साखर आणून ठेवली आहेत. तुम्ही चला."

सून म्हणाली, " मग आम्ही येतो तुमच्याकडे. उद्यापरवा त्यांची परीक्षा संपेल. मग निघू आपण."

रामभाऊंनी मोठ्या आनंदाने हो म्हटले. चिकीप्रमाणेच तोही कधी कोणाला कमीपणा दिसू देत नसे. चिकीचाच बाप तो. पोकळ मिजाशी व ठोकळ गोष्टी.

डॉ. ताराबाई व त्यांच्याबरोबरचा विद्यार्थी आला. तो जेवी आमच्याकडे व निजायला दुसरीकडे जाई. दत्तूची परीक्षा संपली. त्याच दिवशी तो, त्याची बायको, मुले व रामभाऊ पारोळ्याला गेली. आता मागे दोन पाहुणे, आम्ही दोघी पेशंट व माझी काळजी, एवढीच आम्ही मुंबईस राहिलो.

काळजी करण्याचे कारण सून बाळंतीण, दोन लहान मुले, मीरा तीन आठवड्यांची, दत्तू थकलेला ; पण सत्तेपुढे शहाणपण काय कामाचे ! एकदा मुले मोठी झाली की ती सत्ताधीश होतात. घरातील इतकी माणसे व मुलांची गडबड एकदम कमी झाल्याने आम्हाला काही करमेना.

## ९० : स्वातंत्र्य

डॉ. ताराबाई कुंकू लावीत. त्यांचे पती दुसऱ्या समाजातील. आधीच आमच्या समाजाला कुंकवाचे वावडे. तशात परजातीत लग्न

झालेले. त्यात बरोबर एक हिंदू विद्यार्थी. असली ही आमची पाहुणे मंडळी.

आता बरीक आमच्यावर चांगलीच पाळत ठेवण्यात आली. हळूच पाहणे, टपून राहणे, काय काय होईल त्याचे विकृत स्वरूप करून त्याला तिखटमीठ लावून ते अधिकाऱ्यांना नेऊन वाढणे, अशा गोष्टींना सुरुवात झाली.

तिकडे दत्तूचे व अधिकाऱ्याचे काही ना काही कारणावरून खटके उडत. तेव्हा अधिकाऱ्यांची मनेही हे तिखटमिठाचे भरीत गट्ट करण्यास तयारच होती.

पण एकालाही उघड उघड येऊन बोलण्यास धैर्य होईना. ताराबाईंना व त्या विद्यार्थी पाहुण्याला प्रत्यक्ष पाहण्यासाठी अधिकारी व इतर युरोपियन डोकावून गेले. माझ्या प्रकृतीविषयी आता सर्वांना एकदम काळजी वाटू लागली ! तसे माझ्या प्रकृतीला काहीच झाले नव्हते ; पण ह्या इतरांच्या काळजीने मात्र होणार होते खास ! मला काही होण्याऐवजी त्यांनाच मात्र आमचा खोकला लागला होता व तो सुंठीवाचून कसा घालवावा ह्याची ज्याला त्याला काळजी वाटायला लागली होती.

जो कोणी मला भेटे तो म्हणे, " आजीबाई, तुम्ही हवा बदलण्यास जा."

मी म्हणे, " झालंय काय ? मी जाऊ कशाला ?"

मला काही झाले नव्हते तरी माझा जीव मात्र मला ह्यांच्या काळजीने नकोसा झाला. उघड उघड धडधडीत बोलण्यास मात्र कोणाचे भय थोडेच होते ? पण हा सुसंस्कारांचा परिणाम. डोळा फोडायला नको, काडी मोडायला नको.

कोणी जरी नकळत डोकावले तरी आमच्या घरी काही चोरूनलपून कधीच काही होत नसे. सारे काही उघड उघड होत असे. आम्ही बोलत बसलो असताना आमची दारेखिडक्या सताड उघडी असत. पडदा-पद्धतीचे आम्हाला नेहमीच वावडे असे. कानोसे घेऊन, चोरून पाहून, कल्पना करून जेव्हा माझ्यात लपंडाव दिसून येईना, तेव्हा हे हवा बदलण्याचे बंड उठले.

परदेशी मिशनरी. त्यांना आपली भाषाही धड समजत नाही, रीतिरिवाजही ठाऊक नसतात. त्यांना शिकवणारे व त्यांची मने कलुषित करणारे आपलेच लोक; व त्यांची दिशाभूलही तेव्हाच चटकन ह्यांना करता येते.

ह्याच गडबडीत एक दिवस एका सभ्य स्त्रीने येऊन आग्रहाचे बोलणे लावले की, "आजीबाई, तुम्ही खरोखरच कुठेतरी जा. तुम्ही दिसाव्या तशा दिसत नाही."

मी म्हणाले, "हे पहा, तुम्हा सर्वांना वाटते आहे की मला तुमचे बोलणे कळत नाही. मला सारे कळते. अलीकडे माझ्या प्रकृतीबद्दल तुम्हा सर्वांनाच एकदम फार काळजी उत्पन्न झाली आहे. पण माझी आता एवढीच इच्छा आहे की, हे काम बिनपगारी करावे. दत्तूची टर्म भरेपर्यंत मला राहायला जागा पाहिजे आहे."

सभ्य स्त्री म्हणाली, "पण बाई, येथे मला दवाखाना काढायचा आहे."

मी म्हटले, "काढा दवाखाना. मी हाताची नीट आहे. मी मिठाईचे दुकान काढीन आणि त्यावर माझ्या नावाची पाटी लावीन."

बाई गेली. दुसऱ्या दिवशी पाळक आले. त्यांचाही तोच सवाल. आता मात्र माझ्या काळजाने ठाव सोडला. दत्तू दूर, तशात तो तिकडे जाऊन आजारी पडलेला. माझ्यामागे ह्या लोकांची कुरकूर. मला आता खरेच वाटू लागले की मी आजारी पडणार व हवापालट मला करावीच लागणार!

बेबी म्हणाली, "आई, तू घाबरू नको." थोड्या वेळाने तिने टाळी वाजविली, "आई, मीरा पायगुणाची झाली. तिने आपली ह्या पारतंत्र्यातून सुटका केली."

"ते सारे खरे ग, पण मुले लहान. मुंबईची वस्ती. जाणार कुठे आणि राहणार कसे?"

"आई, मला आता पुरेसे शिक्षण आहे. कामाचे काय घेऊन बसली आहेस?"

डॉ. ताराबाई म्हणाल्या,

" मावशी, कराचीला येता का ? मी बेबीला आणि वहिनीला काम लावून देते. मग भाऊ वकिलीचा अभ्यास करावयास मोकळा होईल."

" कराचीच काय, इंग्लंडलासुद्धा जायची माझी तयारी आहे. स्वदेशी चोरी आणि परदेशी भीक ! "

दत्तू पारोळ्यास आजारी होता त्याची मला दादच नव्हती. ही मुले मला काहीच सांगत नसत. ताराबाई, पाटणकर, बेव्री ह्यांची पारोळ्यास तारा नि पत्रे येत-जात, फळांची पार्सले जात, पण मला त्याची गंधवार्ताही नसे. इकडील हकीगतीची पत्रे दत्तूला जात.

परीक्षा झाल्यावर ताराबाई कराचीस गेल्या. त्यांनी तेथे जाताच मुलींच्या कामाची खटपट चालविली. आता दत्तूला बरे वाटू लागल्याने तो सहकुटुंब सहपरिवार परत आला. आता सर्व एकत्र झालो. काळजी काय ती खाण्याची व नाण्याचीच उरली होती. बाकी आजारबिजार काहीच उरला नव्हता. नाही म्हणायला लोकांनी आणलेला तेवढा आजार होता. पण त्याला डॉक्टर काय करणार ?

लौकरच ताराबाईचे पत्र आले. परीक्षेच्या रिझल्टसारखी आम्ही ह्या पत्राची वाट पाहत होतो. एकदाचा निकाल लागला. ही परीक्षा म्हणजे आमच्या नशिबाची परीक्षा होती. तीत आम्ही उतरताच वरचा वर्ग गाठला.

ताराबाईचे पत्र आले की, कामाची व्यवस्था झाली. बेबीला पगार १३० रुपये व रूथबाईला पगार १५० रुपये ठरविला आहे. तीस रुपयांचे घरही पाहून ठेवले आहे. तरी ताबडतोब तारेने तुमचे म्हणणे कळवा.

हे पत्र पाहताच आमच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्याच दिवशी रे. एड्‌वर्डस्‌साहेबांनी टिळकांच्या कसल्याशा लेखाबद्दल खटपट करून पाऊणशे रुपये आणून दिले होते. शिवाय आम्ही अगदीच कंगाल नव्हतो. विम्याचे पैसे हसत हसत आमच्याकडे पाहतच होते.

कराचीस तार गेली व आमची आवराआवर व बांधाबांध सुरू झाली. तसाच बाजारहाटही सुरू झाला. तरी एक दुहेरी काळजी होतीच.

दत्तूची एक काळजी व दुसरी सामानाची काळजी. दत्तूला आमच्याबरोबर येणे शक्य नव्हते. सामान आवाच्या सवा वाढविलेले. दत्तूची राहण्याची सोय त्याच्या सासूकडे केली. सामानालाही तेथेच बावकर हॉलमध्ये एखादी खोली मिळणे अशक्य नव्हते. पण दुधाने तोंड भाजलेले, तेव्हा आम्हाला ताकही फुंकून प्यावेसे वाटले. सातारचा अनुभव ताजाच होता.

भास्करराव उजगऱ्यांना विचारले. आमचे भास्करराव आधी कोणत्याही गोष्टीला मोडता घालायचे, पण एकदा का त्यांच्या मनाने एखादे काम चांगले आहे असे घेतले की मग काही बदलायचे नाहीत. आमचा कराचीचा बेत त्यांना सांगताच आधी त्यांनी आमची थट्टाच केली. पण आम्ही चौघे व ते एकटे. आम्ही का त्यांना दाद देतो ? मी म्हणाले,

"अरे बाबा, ते सारे राहू दे, पण आमच्या ह्या एवढ्या सामानाची काय सोय करायची ?"

"माझी जागा फार मोठी आहे. ठेवा तेथे आणून."

भास्करराव त्या वेळी गिरगावातल्या अंग्रोली चर्चचे पाळक होते व त्यांना मुंबईच्या मानाने बरेच मोठे घर होते. शिवाय एक अडगळ टाकायला खोलीही होती. आम्ही पडत्या फळाची आज्ञा घेऊन सामानाचा भार हलका केला. हे काम बेबीनेच केले. कारण दत्तूची शाळा, माझे काम व सुनेची मुले. तेव्हा तीच तेवढी मोकळी होती.

मी कामाला लागल्यापासून माझ्या अधिकाऱ्यांना कधी जेवायला बोलविले नव्हते की कधी त्यांना काही वाढून पाठविले नव्हते. कारण मेट्रनच्या कामांपैकी हेही एक काम असते असा समज झालेला आहे.

वाढून पाठविणे किंवा जेवायला बोलावणे ह्यापेक्षा चोख कामाने आपले वरिष्ठ अधिकारी आपल्याला संतुष्ट ठेवता येतात, अशी माझी समजूत होती. आता काम सोडायचे आमचे पक्के ठरले असल्याने व सारी सोय व तयारी जय्यत करून ठेवली असल्याने मी आमच्या साहेबांना व मडमसाहेबांना पहिले व शेवटले जेवायला बोलावले.

माझ्या स्वभावाच्या विरुद्ध पण दत्तूच्या आग्रहामुळे मी जेवणाचा

दिवस काम सोडण्याच्या बरोबर एक महिना आधीच धरला. जेवण संपेपर्यंत आम्ही कोणी कामाबद्दल काही बोललो नाही. सर्व वेळ मोठ्या आनंदात घालविला. मग साहेब व मडमसाहेब निघण्याच्या वेळेस त्यांच्या हातात राजीनामा व महिन्याची नोटीस ठेवली.

राजीनामा अशा तऱ्हेने हाती पडल्यावर त्यांना मोठे आश्चर्य वाटले.

" तुम्ही कोठे जाणार ?"

" देव नेईल तिकडे !"

" ह्या एवढ्या सामानाचे काय करणार ?"

" सामानाची आम्ही सोय केली आहे !"

मडमसाहेब म्हणाल्या, " मी तुम्हाला सर्टिफिकेट पाठवून देईन."

" मला त्याची गरज नाही. माझे हे पहिले व शेवटले काम आहे. मी कोणाची ताबेदारी केली नव्हती व पुढे करणार नाही."

नाताळची सुट्टी आली. इकडचे काम पहिलीपासून सोडले होते. कराचीचे दुसरीपासून सुरू होत होते. आम्ही नाताळात कराचीला जाण्यास निघालो. दत्तू आम्हाला पोचविण्यास आला.

बंदरावर भास्करराव उजगरे, मनोहरराव उजगरे, लक्ष्मणराव पडाळे वगैरे मंडळी पोचविण्यास आली होती. म्हणजे आम्हाला हार-तुरे द्यायला नव्हती आली. कारण आम्ही असला काही पराक्रम गाजवायला निघालो नव्हतो. पण सामानाची व्यवस्था करायला व मुला-बाळांना उचलासाचलायला ही आमची मित्रमंडळी आली होती.

बोटीने कर्णा फुंकला. ती आम्हाला पोटाच्या वाटेकडे घेऊन निघाली. आम्ही दूर करणाऱ्या मुंबईकडे व तिच्या काठावर उभ्या असलेल्या आमच्या मित्रमंडळीकडे आनंदाने पाहत होतो. सागर शांत होता. पाण्याचे रंग मधूनमधून बदलत होते. आमच्याही मनात निरनिराळे विचार येत होते.

जगाच्या दृष्टीने नसले तरी आमच्या दृष्टीने कराची म्हणजे आम्हाला इंग्लंड वाटत होते. इतक्या दूरच्या परकीय प्रदेशात केवळ तीन मुले व तीन बायकांनी जाऊन तीन वर्षे काढायची होती ! आम्ही एकीकडे व दत्तू एकीकडे.

जवळ पुरुषमाणूस नाही. तसे आमच्याजवळ दोन पुरुष होते - पण त्यांचा उपयोग पंक्तीचाच. संगतीचा मुळीच नाही. एक पुरुष अडीच वर्षांचा, एक पुरुष दीड वर्षांचा.

स्वतंत्रता ! टिळकांचे एक गाणे ह्या वेळेस आठवते.

**सांग कुठे पाहु तुला सखि स्वतंत्रते**
**जनि विजनी सांग कुठे रमशि सुव्रते**
**फिरिव मला दाहि दिशा**
**कर मम अन्नान्न दशा**
**परि तू हो माझी एकदा**
**तुजविण मज जगत सकल विकल भासते**

## ९१ : कराचीस प्रयाण

आमच्याबरोबर आमचे सामान होते तसेच मुलाबाळांचेही सामान होते. आमची अंथरुणे पसरून भोवताली सामान व्यवस्थित मांडून आम्ही बोटीवर आमच्यापुरते घरकुल केले होते. आमचा पोपूही आमच्याबरोबर होता.

बोट फार लागते असे ऐकले होते म्हणून आम्ही बरीच पूर्व-तयारी करून ठेवली होती. पण आम्हाला कोणालाच तिने आपला पराक्रम दाखविला नाही. आम्ही सर्व मजेत होतो. सर्वजण हसत बोलत मार्गक्रमण करीत होतो. आमच्या बोलण्यात मुले व पोपूही भाग घेत होती.

मुंबई सोडल्यावर आम्हाला प्रथम द्वारका लागली. द्वारकेची शोभा अवर्णनीय वाटली. पाहता पाहता पाण्यावर द्वारका तरंगू लागल्या-

स्मृ... ३७

सारखे वाटले.

वर जाऊन द्वारकेची मजा आमच्यापैकी सर्वांनी पाळीपाळीने पाहिली. आमचे जहाज पुढे पुढे सरकू लागले. द्वारका लांब लांब जाऊ लागली व कच्छ मांडवी येऊ लागली.

कच्छ मांडवीला आम्ही पाण्यातील मोटार पाहिली. दत्तू व रूथ डेकवर गेले होते. त्यांनी आपल्याबरोबर चालती-बोलती मुले नेली होती. खाली मीरा, बेबी व पोपू एवढी मंडळी माझ्याबरोबर होती. मीराला चालता-बोलता येत नव्हते. ती हां हूं करीत लोळत पडली होती. तिच्या पायाशी तिची दुधाची बाटली पडली होती.

कच्छ मांडवीचे बंदर दिसताच आमची बोट थांबली. ज्याप्रमाणे एखादी मांजरी बऱ्याच वेळाने घरी परतल्यावर तिची पिले तिला चहू-बाजूंनी बिलगतात त्याप्रमाणे आमची ही 'विठामाय' तेथे येऊन थांब-ताच कितीतरी मचवे होडचा तिला येऊन बिलगली. ह्या होडचांतून प्रवासी उतरले, पण त्यांच्याहीपेक्षा अधिक संख्या होती हेल्यांची म्हणजे हेलकऱ्यांची.

पाण्याचा एखादा लोंढा यावा त्याप्रमाणे ह्या प्रवाशांचा व हेल्यांचा लोंढा आला. चाच्यांच्या हल्ल्यांच्या गोष्टी ऐकल्या होत्या. ते हल्ले असेच होत असावेत. हेले अगदी हेल्यांसारखे ओझ्यांवर धावून आले. ते जाणाऱ्यांची ओझी उचलीत तशीच न जाणाऱ्यांचीही उचलीत. एकाचा एक पाय मीराच्या दुधाच्या बाटलीवर पडून तिचा चक्काचूर झाला. दुसरा मीराच्या पोटावर पडणार इतक्यात बेबीने तिला फर्रकन ओढून पोटाशी धरली. थोडक्यात चुकले, नाहीतर मीराची कच्छातच गच्छन्ती होत होती.

दोन रात्री व दोन दिवस आम्ही बोटीत होतो. तिसऱ्या दिवशी म्हणजे नाताळाच्या दिवशी पहाटे कराची गाठली.

हिवाळ्याचे दिवस. कराचीचे दिवस लहान झालेले. पुढच्या घडचाळात आठ वाजले होते तरी साडेपाच-सहाचा सुमार झाल्याचा भास होत होता. बंदरावर आम्हाला नेण्यासाठी डॉ. ताराबाई व त्यांचे वडील ग्यानोबा मिसाळ आले होते. त्यांनी आम्हाला व आमच्या सामा-

नाला उतरून घेतले.

आम्हाला डॉ. ताराबाईंनी वडिलांबरोबर आपल्या घरी पाठवून दिले व सामान त्यांनी आमच्यासाठी ठरवून ठेवलेल्या भाड्याच्या घरात नेऊन ठेवले.

माझ्या बहिणीने म्हणजे ताराबाईंच्या आईने आमची तयारी करून ठेवली व त्या आमची वाट पाहत बसल्या होत्या.

आमचा नाताळ होता तरी बोटीच्या प्रवासाने आमची डोकी बेताल झाली होती. बोटीत काही वाटले नाही पण खाली उतरल्यावर कसेसेच वाटू लागले. त्यात कराचीची ती भयंकर थंडी. आम्ही नुसते थडथडत होतो. जेवणी वगैरे झाल्यावर आम्ही घरीच पोथी-प्रार्थना केली व नंतर गृहपरीक्षेस निघालो. आम्हाला वाटत होते अजून सकाळच आहे. प्रण माध्यान्ह झालेली होती.

घर चार मजली होते. आमचे बिऱ्हाड तळमजल्यावर होते. भाडे तीस रुपये. जागा दिसण्यात फार सोयीची. रस्त्यावर दारासमोरच एक नाला. चांगला सिमेंटाने बांधून काढलेला स्वच्छ व बिनपाण्याचा. नाल्याला लागून चार हातांचा दारापुढील रस्ता. आत जाण्या-येण्यास दोन पायऱ्या. त्याच्या आत एक लहानसा चार-सहा हातांचा चौक. त्याच्यापुढे बैठकीची जागा. तीत एक डबल कॉट ठेवली तर आत जाण्यास पाऊलवाट राहील इतकी ती लांब-रुद होती. त्याच्यामागे मागील चौक. चौकाला लागून ओसरीवजा पडवी. ती बिनभिंतीची. भिंत नसल्याने दाराचा प्रश्नच नव्हता. मागला चौक वरील तीन मजल्यांवरील लोकांच्या सोईसाठी व आमच्या गैरसोईसाठी मुद्दाम ठेवलेला होता.

कराचीस भेदभाव, स्पृश्यास्पृश्य वगैरे काही भानगडी नाहीत. जेवायला बसायचे झाले तर सारे एकाच रांगेने बसतात. तसेच घरातील निरनिराळ्या दालनांचे होते. ह्याला अपवाद मालकांची घरे. भाडेकऱ्यांच्या घरात स्वयंपाकघर, संडास, न्हाणीघर ही सारी एकाच ओळीत बसतात. आमच्याही घरात चौकाला लागून हीच सुव्यवस्था होती.

सामान लावणे, बाजार भरणे ह्याला दोन दिवस लागले. तिसऱ्या दिवशी आम्ही गृहप्रवेश केला. दत्तूला कामाला जावयाचे होते म्हणून आम्हाला ह्या घरी आणून पोचविल्यावर तो परत मुंबईला गेला. सून व मुलगी शाळेला जाऊ लागली.

आता घरात सारे पोरांचे व म्हाताऱ्यांचे राज्य राहिले. वडील माणूस मीच. आम्ही कराचीस जाताना पाटणकराने आपल्या एका मित्राला आमच्याबद्दल लिहिले होते. आमच्या नव्या घरी गेल्यावर पाटणकराच्या मित्राचे वडील आम्हाला भेटायला आले.

त्यांनी आम्हाला सांगितले, " आपणास हवी ती मदत करायला मी तयार आहे. काही संकोच ठेवू नका. "

मलाही पडत्या फळाचीच आज्ञा हवी होती. मी म्हणाले, " दोन गडी पाठवून आमचा एवढा पलंग लावून द्या. आणखी हे पहा, आम्हाला येथली भाषा समजत नाही, तेव्हा आम्हाला भाजीपाला रोजच्या रोज आणण्याची एक पंचाईत भासेल. "

मलिकांनी ताबडतोब गडी पाठविले आणि एक बैलगाडी ते घेऊन आले. ही बैलगाडी एक बैलाची होती. तीत भाजीपाला भरून गाडीवाला दारासमोर भाजी विकी. हेही आयते काम झाले. पलंग लावून घेतला. भाजी दाराशी येऊ लागली.

येथील हिंदू बायांनाही मुसलमान बायांप्रमाणे गोषा असतो. पण भाजीपाला त्या घेतात. हे सारे घरातल्या घरात चालते. वरच्या मजल्यावरून त्यांनी पैसे घालून टोपले खाली सोडून द्यावे व मग भाजीवाल्याने आत पाहिजे ती भाजी ठेवली की त्यांनी टोपले शेंदून वर घ्यावे.

आम्हाला अशी भाजी शेंदण्याचे कारणच नव्हते. कारण आम्ही तळमजल्यावर होतो. नाल्याच्या व घराच्या मध्ये सापडणाऱ्या बोळातून ती गाडी दाटीपुटीने येऊन आमच्या दारापुढे उभी राही. मुले लहान. मी बाहेर पडले की ती माझ्याबरोबर बाहेर पडत. मी भाजी घेऊ लागले की तेथे त्यांची लुडबूड सुरू होई.

एक दिवस थोरला नातू गाडीचे चाकाला खेटून पालथा पडला. गाडीवाल्याच्या किंवा माझ्या हे लक्षात आले नाही. आम्ही आपल्या

कामात दंग होतो. बैल देखील एक पाऊलही पुढे न टाकता शांतपणे उभा होता. धाकटा एकसारखा मला डवचून सांगत होता, " आजी, बघ नाना कसा निजला तो. "

पण मी आणा-पै करीत होते. इतक्यात माझ्या पायाला नानाचा हात लागला. मी त्याला चटकन उचलून घेतला व भाजीवाल्यास पुन्हा न येण्याविषयी सांगितले. घरात कोणी नसल्यामुळे मुले माझ्या मागे अशीच येणार आणि उद्या काही झाले तर काय करायचे ?

आम्ही पाताळात म्हणजे खालच्या मजल्यावर राहत होतो. स्वर्ग म्हणजे वरचे मजले जरी दोन बोटांवरच होते तरी आम्हाला नको तो स्वर्ग, असे झाले होते. कारण स्वर्गलोकाहून आमच्यापुढे धबधबा सारी घाण येऊन पडायची. खालच्यांच्या सुखाविषयी बेपर्वाई दाखविणे हा जन्मसिद्ध हक्क मुंबईस रहा की कराचीस जा, कोठेही सारखाच बजावण्यात येत असलेला दिसून येतो. आम्हाला आता त्या स्वर्गाच्या वाऱ्यासही उभे राहावेसे वाटेना.

मुलांची पहाटेच चुळबूळ सुरू व्हायची. आई, बाबा, आजी वगैरे शुद्ध मराठी शब्द त्या इमारतीत पहाटे घुमू लागायचे. हे शब्द ऐकून एक दिवस अगदी वरच्या मजल्यावर राहणारा एक गृहस्थ खाली आला. त्याचा चेहरा आनंदाने फुललेला दिसत होता.

" अलीकडे पहाटे उठल्याबरोबर आमच्या देशातील शब्द कानावर पडतात म्हणून मला फार आनंद वाटतो. म्हटले कोण, मराठी लोक राहायला आले म्हणून मी मुद्दाम पाहायला आलो. "

ह्या गृहस्थाला आपल्या देशातले लोक पाहून आनंद वाटला तसा आम्हालाही वाटला व आम्हाला कोणीही महाराष्ट्रीय भेटले तरी अत्यानंद होत असे.

आमचे घर बदलण्याचे ठरले. घरात पुरुषमाणूस कोणीच नाही, व कराचीला हिंदुमुसलमानांत गोषा सारखाच. एक दिवस सकाळी थंडीच्या कडाक्यात रूथ व बेबी निघाल्या. आज घर शोधून येण्याचा त्यांनी निश्चय केला.

लौकरच करीमजी मंझीलमधील ५ नंबरचा ब्लॉक रिकामा होणार

असल्याची शुभवार्ता त्यांनी आणली. भाडे रुपये तीस. दुसऱ्या दिवशी सकाळीच ह्या दोघी मुली पुन्हा बाहेर पडल्या. पाच जिने चढून वर गेल्या. पाच नंबरच्या खोलीचे दार ठोकले. एका तरुण सिंधी माणसाने दाढी करता करताच त्यांना दार उघडले. ह्या न बोलताच आत शिरून सारे घर पाहून आल्या. त्याची हजामत चाललीच होती. ह्या परतल्यावर त्याने दाढीवरचा हात न काढता शांतपणे सांगितले, की हे घर मोकळे होत नाही. बारा नंबरचे मोकळे होणार आहे.

ह्या दोघींनी १२ नंबरच्या दारावर थाप मारली. एका उतार वयाच्या सिंधी माणसाने दरवाजा उघडला व तो त्यांच्याकडे आ वासून बघू लागला. पण त्याही घरात न बोलता त्या शिरल्या व घर पाहून आल्या. नं. ५ चे घर चांगले व थोड्या भाड्याचे होते, पण त्याचा प्रश्नच उरला नाही.

ह्या दोघी आता हे पाच जिने उतरून खाली आल्या. पुन्हा पाच जिने चढून दुसऱ्या इमारतीत गेल्या. पण तेथली घरे चाळीसचाळीस रुपये भाड्याची होती, तेव्हा त्यांचा प्रश्नच राहिला नाही. दुसऱ्या दिवशी मी जाऊन ही दोन्ही घरे पाहून आले. १२ नंबरचे घेण्याचे ठरले. ५ चे मिळाले असते तर बरे झाले असते. पण उपाय नव्हता.

आता आमच्या सामानाची बांधाबांध सुरू झाली. फेब्रुवारीच्या सुरुवातीपासून घर बदलायचे ठरले. १२ नंबरचा खोलीवाला आपले घर देण्यास तयार झाला. त्याला रु. ३५ आगाऊ द्यावयाचे. पण आम्हाला खात्री वाटेना. शेवटी माझे बंधू ग्यानोबा मिसाळ ह्यांना पाठविले, आमच्या सामानाची बांधाबांधी निम्मीअधिक होत आली होती. रात्री दहा-साडेदहाला ग्यानोबा आले. ते सांगू लागले की, १२ नंबरचे घर मिळत नाही. आमची सर्वांची निराशा झाली.

पण मागे ठेवलेली आनंदाची बातमी त्यांनी नंतर सांगितली की, ५ नंबरचा ब्लॉक रिकामा होत आहे. भाडे रुपये तीस. आता खरोखरच आमच्या आनंदाला पारावार उरला नाही. घर ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळीच एक बोहोरी आला. त्याने एका छापील कागदावर रूथची व बेबीची सही घेतली. नंतर तो त्यांना आपल्याबरोबर बोलावू लागला.

त्या त्याच्याबरोबर गेल्या. तेथे बरेच बोहोरी होते. ते अकरा महिन्यांचे लीज करून मागू लागले. ' लीज ' म्हणजे काय ते त्यांना कळेना. त्यांना वाटले, अकरा महिन्यांचे आगाऊ भाडेच ते मागताहेत.

त्यांनी विचारले, " तुम मतरीक है ?" ह्यांनी त्यांना आपण बी. ए. असल्याचे सांगितले. पण त्यांना बी. ए. चा अर्थ कळेना. पगडी, मिठाई वगैरे मुंबईचे प्रकार न करता घर मिळाले व आम्ही एक महिन्यात पहिले घर बदलून दुसऱ्या घरात आलो.

परप्रांतावर आम्ही केलेल्या स्वारीत घरसंशोधनाच्या पहिल्या चकमकीत आम्ही यशस्वी झालो. हीत एकही स्त्री आम्हाला आढळली नाही. सर्व पुरुषांचा कारभार. तरी कराचीचे पुरुष स्त्रियांशी फारच अदबीने वागणारे आहेत असा आम्हाला अनुभव आला. मुली बाजारात जात तरी तेथेही सर्वजण त्यांना फार चांगल्या रीतीने वागवीत. दुकानदारांना बहुतेक इंग्रजी कळते व ह्या इंडियन गर्ल स्कूलमधील मास्तरणी ! इंडियन गर्ल स्कूल तेथे फार प्रसिद्ध आहे.

आमचे हे नवीन बिऱ्हाड चौथ्या मजल्यावर होते. गोषापद्धतीला साजल असेच हेही घर होते. चौथ्या मजल्यावर एकदा पुढचे दार बंद करून घेतले की आमचे घर अजिंक्य किल्ला बनायचा.

येथेही पहिल्याच घराप्रमाणे बहुतेक व्यवस्था होती. मात्र घर जरा अधिक ऐसपैस असून आमच्या गच्चीवर वर स्वर्ग बसविला नसून तेथून केवळ निरभ्र आकाश दिसे. रात्री चंद्र, चांदण्या व दिवसा सूर्य ह्यांची सोबत आम्हाला होती. विमानेही रोज आपल्या ह्या एवढ्याशा जगातून आम्हाला दिसायची. बाकी मात्र शेजारचे घरही दिसायची पंचाईत.

## ९२ : कराचीतील वास्तव्य

आम्ही कराचीस पोचल्यावर दहा-पंधरा दिवसांनी आम्ही जहाल मंजुळाबाईला बोलावून घेतले. येथे आम्हांला नोकर माणूसच मिळेना.

पण मंजुळाबाईला आम्ही नोकराप्रमाणे वागविले नाही. मुलांची तीही एक तिसरी आजी होती.

नवे घर फार चांगले होते. मात्र येथील स्वर्गसुख भोगायला सहा जिने म्हणजे साठ पायऱ्या चढाव्या लागत. घराला मागल्या बाजूस लहानशी गच्ची असल्याने मुलांना खेळायला चांगली सोय झाली होती. शिवाय ऊन ह्या दुर्मिळ झालेल्या वस्तूचा खूपच अनुभव घेण्यास मिळे.

पूर्वीच्या घरांत आमच्या डोक्यावर राहणारी माणसे खाली पाणी फेकीत. आम्ही ते सारे मुकाट्याने गिळीत होतो. (पाणी नव्हे.) इकडे आल्यावर एकदा आम्हीही वरून असेच नकळत पाणी फेकले.

थोड्या वेळाने दारावर थाप ऐकू आली. रूथने दार उघडले. लहंगेवाली एक बाई आत आली. दुसरी आली. तिसरी आली. चौथी आली. बरोबर कोणाच्या कडेवर मूल तर कोणाच्या लहंग्याला चिकटून मूल. काही मुले तशीच मागेपुढे घोटाळत शिरलेली. आमची खोली अर्धी अधिक भरून गेली.

आम्हाला मराठी येत होते, मुलींना इंग्रजी येत होते. त्या बाया काय बडबड-कलकलाट करीत होत्या ते कळेना. पण आमच्या पाणी टाकण्याचा त्या बोलण्याशी संबंध असावा असे त्यांच्या एकंदर हाव-भावांवरून आम्ही ओळखले व त्यांनी आम्हाला आमच्या पूर्वस्थितीची आठवण करून दिल्यावर मग मात्र आम्ही कधी खाली पाणी टाकले नाही.

येथे माणसांचा वारा नव्हता व पक्ष्यांचा थारा नव्हता. माणूस पाहायला जायचे झाले तर खाली रस्त्यावर जावे लागे कारण खिडकी व गच्ची ह्या दोन्ही उंच असल्याने त्यांतून डोकावून पाहणेही अशक्य. त्या भुईकोट किल्ल्यात आमच्या चौघींशिवाय दुसरे कोणी फारसे मुलांच्या दृष्टीसच पडत नसे.

बाहेरची गम्मत म्हणजे विमाने. घरघर ऐकू येऊ लागली की मंजुळाबाईने ' विमान आले ग पोरींनो विमान ' म्हणून आरोळी ठोकली की पोरांची गडबड उडायची. जवळजवळ चार-पाच विमाने रोज घिरट्या घालायची. ती दिसायला लागल्यापासून दिसेनाशी होईपर्यंत मुलांनी वर

डोकी वळवून पाहत बसावे, किंवा अंगठ्या-चौड्यांवर उभे राहून खिड-कीतून खाली पाहण्याचा प्रयत्न करावा व खालची डोकी पागोटी दिसतील त्यांतच मजा मानून घ्यावी.

बाबूचे एक मित्र गुरुदयाळ मलिक कराचीस राहतात. त्या वेळी ते टागोरांच्या शान्तिनिकेतनात शिकवीत असत. आम्ही गेल्यावर गुरु-दयाळचे वडील आमचा शोध काढीत आले. बाबूने गुरुदयाळला आमच्या-बद्दल लिहिले होते व त्याने आपल्या वडिलांना लिहिले होते. त्यांनी आम्हाला फार साहाय्य केले. आणि माझ्या स्वभावाप्रमाणे मी ते करून घेतलेही.

दांतामुळे मीरा आजारी पडू लागली. मलिकआजोबांनी तिला डॉक्टरकडे नेले. तिच्यासाठी औषध आणले.

नाना-अशोकला ते फिरायला घेऊन जात. त्यांचा एक मुलगा व ते व्यापार करीत. पण त्यांना फिजिकल कल्चरचा फार नाद. आपल्या दोन्ही मुलांपेक्षा त्यांची प्रकृती कितीतरी पटीने छान असे. ते कधी औषध घेत नसत.

मलिकांच्याच साह्याने पहिल्या घरातून दुसऱ्या घरात एवढे मोठे सामान केवळ अडीच रुपयांत आम्ही आणले. त्यांची तीन माणसे त्यांनी त्या दिवशी आमच्याकडे साहृचार्थ पाठविली होती. ती फारच उपयोगी पडली.

मुलांना मलिकआजोबा फार आवडत. आमचे पहिले घर त्यांच्या वाटेवर असल्याने ते जवळजवळ रोज येत. पण नव्या घरी आल्यावर त्यांचे येणे पुष्कळ कमी झाले. एक दिवस दार जोराने खडखडले. बाहेरून आजोबांचा आवाज आला—"नाना."

मुले दार उघडायचे विसरून आतच दाराशी आजोबा आले करीत उभी राहिली व आतूनच बंद दारातून त्यांना हात जोडून नमस्कार करू लागली.

ते आत येऊन बसल्यावर नानाने आपली सारी खेळणी त्यांच्यापुढे आणून ठेवली. त्याने आपली मोडकी 'भगाई' आणली. मग आपले बूट आणून ठेवले, मग एक खरकटे भांडे त्यांच्यापुढे ठेवले मग केरात पडलेली

एक मनूक शोधून आणली व तो खाऊ त्याने मलिक आजोबांना दिला. आजोबांनी ती मनूक डोळ्यांपुढे धरली, निरखून पाहिली. मग खिशातून रुमाल काढून ती पुसली व मग तोंडात टाकली !

मग नानाने त्यांना आपली 'लाछी', 'बिछी' (लॉसिंजर व बिस्किट) आणून दिली. ही खाल्ल्यावर त्यांनी आनंदाने ढेकर दिला !

तिन्ही मुले एकाखाली एक असल्याने एकाने काही केले की दुसऱ्याने तेच करावे. मग तिसरीचे रडणे नाहीतर हुंकार सुरू व्हावे. नानाने खूप प्रश्न विचारावे. त्यांची समाधानकारक उत्तरे न मिळालीं की रागवावे. प्रश्नांत आम्हाला घोटाळावे.

एकदा नानाचे व त्याच्या आईचे खालील आशयाचे बोलणे झाले. पुढील दोन-तीन संवाद त्या वेळी लिहिलेल्या पत्रांतून घेतले आहेत. नाना आपल्या आईला प्रार्थनेबद्दल विचारीत होता.

नाना : आई, निजण्यापूर्वी बापा केली पाहिजे का ?

रूथ : हो, देवबाप रागावेल नाहीतर...

नाना : आई, देवबाप रोज बापा करतो का ? कोणाची करतो ?

रूथ : हं.

नाना : आई, देवबाप तुझा कोण आहे ?

रूथ : माझा बाप आहे.

नाना : माझा कोण तो ?

रूथ : बाप आहे.

नाना : मुंबईत आहेत ते माझे कोण आहेत ?

रूथ : तुझे बाबा.

नाना : बाबा पण बाप आहेत. दोन-दोन बाप आहेत मला ?

रूथ : नीज रे ! मला काम आहे.

नाना : देवबापाला किती बाप आहेत ?

रूथ : नीज रे !

नाना : आई, बाबा तुझे कोण आहेत ?

रूथ : तू सांग.

नाना : तुझे बाबा माझे कोण ?

रूथ : आजोबा

नाना : माझे बाबाही तुझे आजोबा का ?

रूथ : नाही.

नाना : का बरं ?

ह्यावर रूथ त्याच्यावर रागावली व तो झोपला.

अशोक बोबडे बोलत असे. लठ्ठ आणि लांब लांब केस रुळत आहेत, लुटूलुटू चालत आहे व तोंडाने सारखे बोबडे प्रश्न विचारीत आहे असे चित्र पुढे उभे धरून खालील संवाद वाचावा. रूथ शाळेचे काम घेऊन बसली आहे. अशोक जवळ लुडबूड करीत आहे. नाना व मीरा निजली आहेत.

अशोक : आई, मी पण लिहितो दे.

रूथ : जा बाळ, नीज आता.

अशोक : जाऊ ? निजू ?

रूथ : हं.

अशोक : पयंगावर निजू का खाली निजू ?

रूथ : कुठेही नीज जा. नाना-ताई कशी शहाणी मुले आहेत !

अशोक : आई, छानी मुअं छानी असतात का ?

रूथ : हो बाळ.

अशोक : आई. वेवी (वेडी) मुअं (मुलं) वेवी असतात का ?

रूथ : होय रे ! अशोक मोठा छाना हं.

अशोक : मोठा छाना नाही न नान छाना, अं अं अं.

रूथ : बरं बरं. नान छाना आहे अशोक. जा आता नीज.

अशोक : मी नाही निजत.

रूथ : (रागाने) नको निजू. नाच !

अशोक : नाचू ? कुठे नाचू ? इथेच नाचू का ?

रूथ व आम्ही हसतो. (तालावर नाचतो.)

अशोक : आता पुवे (पुरे) का ?

रूथ : पुरे आता नीज.

अशोक : मी तुझ्या हातावर निजतो.

रूथ आपले लिहावयाचे गुंडाळून ठेवते व अशोकला घेऊन निजते

मीराला कराची चांगली मानवली. येथे आल्यावर तिला पटापट दात निघू लागले. दात निघतो असे वाटले की रूथ तिला सिट्झ बाथ देण्यास सुरुवात करी, त्यामुळे दाताच्या वेळी मुलांना जो त्रास होतो तो तिला झाला नाही. अधूनमधून थोडीशी तापे एवढेच.

तिला मंजुळाबाई फार आवडे. आमच्याजवळून तिच्या अंगावर ती झेप टाकी.

अशोकचे बोबडे बोलणे फार गमतीचे असे. मीराला तो ' मिया ' म्हणे. व ती बोलायला लागली तो तिचा पहिला शब्द होता ' अल्ला ' अर्थात ' मिया ' ' अल्लाच ' म्हणायची !

मंजुळाबाईसमोर उभा राहून कमरेवर हात देऊन अशोक मोठ्या ऐटीत तिला म्हणे,

" चा पिवा (चहा प्या), पा खा (पान खा), चुना खा, दा कोवा (दात कोरा), का कोवा (कान कोरा)." खांद्यावर कपडा टाकून म्हणायचा, " मी बावा जातो " (मी बाजाराला जातो).

अशोक फार गमत्या. इतक्या लहान वयात तो गमती गमती करून आम्हा सगळ्यांना खूप हसवायचा. एखादे वेळेस रागाने त्याला म्हटले, गप बैस, म्हणजे खाली दिलेला संवाद हटकून व्हायचा.

" गप बैस का म्हणतेस ?"

" मग काय म्हणू ?"

" चूप बैस म्हण."

" बरं, चूप बैस."

" चूप बैस का म्हणतेस ?"

" मग काय म्हणू ?"

" गप बैस म्हण."

आमच्या करमणुकीला फोनोग्राफ नेला होता. त्याच्या रेकॉर्ड लावल्या म्हणजे त्यांच्या ठेक्यावर अशोक नाचे. एक प्लेट ' नका टाकून जाऊ ' ही होती. एक दिवस मंजुळाबाई त्याच्यावर रागावल्या व त्याला

मारण्याचा आविर्भाव करू लागल्या तर करो म्हणतो, " नका टाकून जाऊ डावा डोळा पाण्याने माझा भववा." हे ऐकताच त्या हसायला लागल्या.

एकदा सिंहगड चित्रपट आला होता. आम्ही मुलांना नेहमी महाराष्ट्रातील गोष्टी सांगत असू. हा चित्रपट आल्यावर आम्ही त्यांना घेऊन मुद्दाम सिनेमाला गेलो होतो. घरी आल्यावर त्यांच्या मनावर त्या चित्रपटाचा एवढा परिणाम झाल्याचे दिसले, की त्यांच्यात संभाषण सुरू झाले.

नाना : अशोक, आपण कीनाही महाराष्ट्रातील आहो बरं का! सिंधी नाही. आपला गाव किती सुंदर आहे! मोठ्या मोठ्या नद्या आहेत, डोंगरावर मोठे मोठे किल्ले आहेत. इथे काय एकच मलकट कलकट नदी आहे. एक मातीचा किल्ला आहे. आपला महाराष्ट्र फार सुंदर गाव आहे. आपण जाऊ तिकडे बरं का.

अशोक : आपण मालात्ल लोक आहो. मालात्ली लोक ललत नाहीत. सिंधी लोक, पंजाबी लोक लत्तात. बंगाली लोक पण लत्तात. मी तल तानाजी आहे. आई, तानाजी ललत होता? नाही.

नाना : मीरा, तू रडू नको. आपण मराठे लोक आहो बरं का?

मीरा : अं. अं.

पण हे शूर मराठे कोंबडीला भिऊन पळायचे. त्यांनी बाहेरचे जग फारसे पाहिले नव्हते. एखादे वेळेस मुलांना घेऊन कधी खाली उतरले व रस्त्याने कोंबडी दिसली की त्यांनी 'आमली आमली' म्हणून माझ्या पायांना बिलगावे.

एक दिवस आम्ही बाहेरच्या खोलीत काही करीत बसलो. नाना, अशोक व मीरा आतमध्ये गच्चीवर उन्हात खेळत होते. गच्ची व मागील दोन खोल्या व पुढची उठण्याबसण्याची खोली ह्यांमधला दरवाजा बंद केला, की ही दोन अलग होत. आम्ही इकडे बोलण्याच्या नादात तर तिकडे मुले खेळण्याच्या नादात. खेळता खेळता नानाने मधले दार लावले व चवड्यावर उभे राहून दाराला तिकडून कडीही घातली. झाले! मला मुलांना काही सांगता येईना की खूण करताही येईना. मुलांनाही काही

समजेना. मीरा लहान. तिचा रडण्याचा आवाज येई. आता काय करावे ? शेवटी एक-दोन घंटे श्रम केल्यावर नानाला कसेतरी समजून कडी काढविली.

मला नानाचा फार संताप आला. मी एक लाटणे घेऊन त्याला खोटी खोटी मारायला निघाले. त्याला आपला अपराध काही कळेना. तोही माझ्यावर रागावला. पण आपला राग कसा व्यक्त करावा हे हे त्याला कळेना. शेवटी लाल होऊन तो मोठ्याने ओरडला, "ए छोकरे ! " मला इतके हसू आले, की लाटणे तेथेच जमिनीवर टेकून मी हसत बसले.

बाबूचा मित्र गुरुदयाळ ह्याला आम्ही पाहिले नव्हते. मलिक-आजोबांकडून त्यच्यासंबंधी नेहमी ऐकायला मिळे. तो शान्तिनिकेतनात असल्याने प्रत्यक्ष परिचय झाला नव्हता. पण गुरुदयाळ येणार येणार म्हणून ऐकू येऊ लागले आणि एक दिवस मलिकआजोबांबरोबर एक लहानसा माणूस आमच्या घरी येऊन उभा राहिला. अंगात बंगाली धर्तीचा खादीचा पोषाख, पायांत खडावा, डोक्यात काही नाही. डोळ्याला सोन्याच्या फ्रेमचा चष्मा. तोंडावर शुद्धतेची, सरळतेची चमक, असा गुरुदयाळ आमच्यापुढे येऊन उभा राहिला.

मुलांची व त्याची क्षणात मैत्री जमली. त्याने नेहमी येण्याचे कबूल केले. पण एक अट घातली की, आम्ही त्याला काही खाण्याचा आग्रह करायचा नाही व काहीतरी सेवा करण्यास सांगायची.

पण अट कबूल करूनही तो आमच्याकडे आला नाही. त्याचे कारण नंतर आमच्या ध्यानात आले. त्याचा स्वभाव फार संकोची व भिडस्त आहे.

मलिकआजोबांना दोन मुलगे. वडील ईश्वरदास व धाकटा गुरु-दयाळ. ईश्वरदास मोठा व्यापारी. मलिकआजोबा व ईश्वरदास ह्यांच्याच श्रमाचे फळ म्हणजे त्यांचा एवढा मोठा व्यापार. गुरु-दयाळ ह्याच्या अगदी उलट. विद्वान, रसिक, सेवारत, धार्मिक अशी त्याची स्थिती. डॉ. टागोरांचा तो अगदी आवडता. गुरुदेवांच्या आज्ञे-प्रमाणे त्याचे सारे बेत-विचार ठरायचे. संसारात किंवा जगातल्या

व्यवहारात मुळीच लक्ष नाही. ठराविक कामे करून– व ती कर्तव्य म्हणून अगदी व्यवस्थितपणे करून– उरलेला सारा वेळ लोकहितार्थ झटत राहणे व तसे करीत असता स्वतःच्या देहाची सुद्धा काळजी न करणे हे त्यांचे खरे सुख.

शरीरप्रकृती आजोबांची फार चांगली. हे दोघे मुलगे आपले असे-तसेच. त्यातल्या त्यात गुरुदयाळ म्हणजे तर जरत्कारू. मालिकआजोबा मात्र फिजिकल कल्चरचे मोठे भोक्ते. डोक्यावरील केस व मिशा तेवढ्या म्हाताऱ्याच्या, बाकी मुद्रा तरुण माणसाची, अशी त्यांची स्थिती होती.

एकदा काही शर्यती होत्या. म्हाताऱ्याकडे त्यांतील काही व्यवस्था होती. शेवटी गंमत म्हणून लोकांनी एका पळण्याच्या शर्यतीत म्हाताऱ्यालाही घातले. त्यात मुलगा गुरुदयाळही होता. त्या शर्यतीत म्हातारा पहिला आला व गुरुदयाळ शेवटला आला !

मुले नेहमी गाणे म्हणत.– "आनि मताला मनगत दावी तुझे हालपेल."

गुरुदयाळाकडे पाहिले म्हणजे मात्र आपल्या मुलांची दर्पोक्ती खरी वाटे.

समाप्त

# स्मृतिचित्रे

मराठी सारस्वतात अमर राहणारी जी काही थोडी पुस्तके आहेत त्यात स्मृतिचित्रांचा समावेश होतो. आत्मचरित्रात तर इतके पारदर्शी, भावपूर्ण व हृदयंगम आत्मचरित्र दुसरे नाहीच. प्रसिद्ध समीक्षक माधव मनोहर म्हणतात की 'हा ज्ञानेश्वरीजवळ ठेवावा असा ग्रंथ आहे.'

स्मृतिचित्रे हे केवळ आत्मचरित्र नाही, तर तो १८६० ते १९२० या या कालखंडातील सामाजिक इतिहास आहे. या कालातील सामाजिक बदलांचेही चित्रण यात आढळेल. यातील भाषा ओघवती व अकृत्रिम आहे. त्यावर इंग्रजीचा छाप नाही. अगदी बालबोध मराठी किती गोड असू शकते ते या पुस्तकातून कळेल.

हे लिखाण हृदयातून उत्स्फूर्तपणे बाहेर आलेले आहे. त्यामुळे त्यात ताजेपणा व जिवंतपणा आहे. लक्ष्मीबाईंचे जीवन एकप्रकारे अद्भूतरम्य व तसे जगावेगळे आहे. त्या रम्यतेचे, अद्भूततेचे प्रत्ययकारी चित्रण त्यांच्या सोप्या व शैलीदार भाषेने वाचकाच्या डोळ्यासमोर चित्रपटाप्रमाणे उभे राहते.

आत्मचरित्र म्हणजे आपले दोष लपवणे व दुसऱ्याचे दाखवणे असा प्रकार असतो. तो मात्र येथे मुळीच सापडणार नाही. दोषांचे दर्शन नाही व कसलीच लपवाछपवी येथे नाही, किंवा कोणावर आरोप केलेले नाहीत.

कोणतेही प्रचलित शिक्षण न घेता केवळ कठीण परिस्थितीशी लढा देऊन मन किती सुसंस्कृत होऊ शकते याचे चित्र या पुस्तकात आढळते.

आपल्या जीवनाकडे संपूर्ण निर्विकार मनाने पाहण्याची लक्ष्मीबाईंची दृष्टी या पुस्तकात आढळून येईल. इतकेच नव्हे तर अनासक्त बुद्धीने कर्तव्य करीत राहण्याची निष्ठा आणि काळोखातही सोनेरी किनार लावणारी असामान्य विनोदबुद्धी त्यांच्या ठिकाणी होती. यातील विनोद कोणालाच बोचणारा नाही. किंबहूना स्वतःवरच केलेला आहे. प्रसन्न व गोड विनोद कसा असतो ते या पुस्तकावरून समजेल.

आचार्य अत्र्यांनी लक्ष्मीबाईंना साहित्यलक्ष्मी अशी पदवी दिली ती किती यथार्थ होती हे या पुस्तकावरून कळेल. कितीही कालावधी लोटला तरी लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांचे अन्यन्यसाधारण माधुर्य आणि महत्त्व मराठी रसिकांच्या दृष्टीने अबाधित राहिले आहे. जोपर्यंत मराठी भाषा या पृथ्वीवर आहे तोपर्यंत हे चरित्र घरोघर वाचले जाईल.